Barcode - 99999990103007
Title - Lokmanya Tilak Sukti Sangrah
Subject -
Author -
Language - marathi
Pages - 456
Publication Year - 1980
Creator - Fast DLI Downloader
https://github.com/cancerian0684/dli-downloader
Barcode EAN.UCC-13
9 999999 010300

# लोकमान्य
# टिळक-सूक्ति-संग्रह

ब. वि. बापट

लोकमान्य

# टिळक-सूक्ति-संग्रह

संग्राहक

सदाशिव विनायक बापट

प्रस्तावनालेखक

श्रीयुत महादेव हरि मोडक

शके १८४८] पुणें [सन १९२६

प्रथमावृत्ति

किंमत अडीच रुपये

रु. २००/-

प्रकाशक
सदाशिव विनायक बापट,
'केसरी' कचेरी, नारायण, पुणें.

७११७५

[stamp]

मुद्रक
अनंत सखाराम गोखले,
'विजय' प्रेस, ५७० शनवार, पुणें.

# अर्पणपत्रिका

लो० टिळक-'तत्त्वांवर' ज्या बंधु-भगिनींनीं
अचल व नितान्त निष्ठा ठेवून त्यांच्या
तत्त्वांनुसार आचरण करण्याचा पूर्वी
प्रयत्न केला, जे सांप्रत करीत
आहेत आणि पुढेंहि करतील,

**त्या सर्वांस**

हा ग्रंथ विनम्रभावानें प्रेमादरपूर्वक
अर्पण केला आहे.

सदाशिव विनायक बापट.

# प्रस्तावना

"Thy word is a lamp unto my feet, and a light unto my path."

*—The Holy Bible.*

बोलण्यासारखें चालणें । स्वयें करूनी बोलणें ।
त्याचीं वचनें प्रमाणें । मानिती जनीं । —समर्थ.

Great thoughts and great things came to him, like instinct, unawares.

*--Richard Mines.*

ईशेच्छेनें कोणीहि मनुष्य कालसात् होऊन या नश्वर जगाचे रहाटीप्रमाणें कायमचा दृष्टिआड झाला म्हणजे, त्याचे आप्त-इष्ट, स्नेही-सोबती, उपासक किंवा प्रेमी 'दुधाची तहान ताकानें' या न्यायानेंच कां होईना, गताची कृति, मूर्ति, गुणसंतति जेणेंकरून त्यांचे डोळ्यांपुढें किंवा मनापुढें पूर्णपणें उभी राहील अशा वस्तूंचा, साधनांचा किंवा उपायांचा अंतःप्रेरणेनेंच संग्रह करून अनन्यगतिकत्वास्तव आपलें त्या साधनांनीं समाधान करून घेतात. अलीकडे किरण-लेखनाची युक्ति निघाल्यामुळें कोणाचीहि छायामूर्ति हुबेहुब करून ठेवणें सुगम व सर्वसाध्य झालें आहे. आणि त्या



छायाचित्रावरून आधिक चिरस्थायी असे पाषाणाचे किंवा धातूचे पुतळे करून निदान स्वरूपदर्शनाची हौस पुरवितां येते व यासाठींच थोर पुरुषांचे धातूचे पुतळे ओतावितात. कोणत्याहि गोष्टीचा उगम—जसें, गंगेचें मूळ—पाहण्याची उत्कंठा जीवांचे ठिकाणीं स्वभावसिद्धच असल्यानें

गुणांचें किंवा कृतींचें उगमस्थान जें शरीर किंवा मूर्ति तें पाहण्यास मिळाल्यानें मनुष्याचें याथोगानें एकप्रकारें समाधान होतें; तथापि ज्याप्रमाणें गंगेचें उगमस्थान जें गिरिकुहर तें दिसल्यानें जरी उत्कंठा-विनोद झाला तरी तिच्या पुण्यपावन सलिलाचें अंगभर स्नान व पोटभर पान लाभल्यानें होणारे आनंदाची महती या विनोदापेक्षां अधिक; त्याचप्रमाणें नुसते मूर्ति-दर्शनानें होणाऱ्या समाधानापेक्षां गताच्या कृतींचें किंवा गुणांचें चित्र पुढें उभें रहाणें अधिक महत्त्वाचें असतें. शिवाय मूर्ति दृष्टीस पडली कीं, पहाणारा अपरिचित असल्यास त्याचे मनांत सहजींच प्रश्न येतो, कीं मूर्ति पाहिली; पण या मूर्तीचें दर्शन म्हणजे एका सुंदर रूपाचा नमुना याच अर्थी जर नसेल, तर मूर्तीपेक्षांहि अधिक महत्त्वाची गोष्ट जी कीर्ति किंवा कृति, ती काय व कशी. आणि या जिज्ञासेची तृप्तिच अधिक आनंदावह व उपयुक्त असल्यानें मूर्तीपेक्षां कीर्तीचे रक्षणाचेच उपाय ज्ञाते अधिक यत्नानें करितात. रघुकुलावतंस श्रीरामचंद्र किंवा वृष्णिकुलोत्तंस श्रीकृष्ण यांच्या अस्सल मूर्तींची छबी आज कोठेंहि उपलब्ध नाहीं; तथापि वाल्मीकि व व्यास महर्षि यांनीं उभयतांचे लोकोत्तर गुण व कृति यांचा जो रामायण-भारत-रूपानें चिरस्थायी संग्रह करून ठेविला आहे, तोच आज सहस्रावधि मुमुक्षूंस अनेक शतकेंपर्यंत ऐहिक व पारलौकिक आनंद देत आहे व त्यांचे जन्माचें सार्थक करीत आहे. राजतरंगिणीकारानें म्हटलें आहे, कीं ह्या चरित्रकारांनीं जर हीं चरित्रें लिहून ठेवलीं नसतीं, तर या प्रत्यक्ष ईश्वरी-विभूति होऊन गेल्या, तरी कोणाला पुरापूर ठाऊकहि झाल्या नसत्या. अर्थात् कोणाहि व्यक्तीच्या गुण-कृतींचा संग्रह करणाऱ्या चरित्रकारांचें व तत्कृत चरित्रांचें उपकारकत्व मूर्तिकारापेक्षां कितीतरी अधिक आहे.

वरील सत्य लक्षांत आणूनच महाशयचक्रवर्ती लोकमान्यांचे फोटोग्राफ, तसबिरी व पाषाणमय किंवा धातुमय ओवलेल्या मूर्ति जरी उपलब्ध आहेत व मूर्तीशिवाय, लोकमान्यांचे नांवानें देशभर अनेक स्वरूपांच्या संस्थाहि लोकांनीं आत्मस्फूर्तीनें काढिल्या आहेत, तरी सगुणापेक्षां तत्त्वदृष्ट्या जसें निर्गुणच अधिक श्रेयस्कर त्याप्रमाणेंच कोणाचेहि मूर्त स्वरूपापेक्षां अमूर्तच अधिक हितकर असल्यानें, लोकमान्यांच्या 'समग्र अमूर्त स्वरूपा'चा

आविष्कार करण्यासाठीं केसरी व मराठा संस्थेच्या प्रेमी व दूरदर्शी चालकांनीं लोकमान्यांचें शक्य तितकें सोपाख्यान-जीवनचरित्र व त्यांचे वाणींतून व लेखणींतून उतरलेले महत्त्वाचे बोल व लेख संग्रहित करण्याचा म्हणजे त्यांचें **'वाङ्मय'**स्मारक करण्याचा निश्चय केला. ज्या पुरुषाचा सारा जन्म वाणी व लेखणी यांच्या व्यवसायांत गेला, त्याचें वाङ्मयात्मक स्मारकाहून अनुगुण असें दुसरें कोणतेंहि स्मारक होणार नाहीं. शहाजहाननें मुमताजवर चतुःखंडाला कौतुकास्पद असा भव्य व दिव्य ताजमहाल बांधून जरी अपूर्व स्मारक केलें, तरी तें बादशहाचे प्रेमाचें स्मारक होईल, पण त्या स्त्रीचें आनुगुण्य त्यांत फारसें नसल्यानें तें खरें खरें समाधानकारक स्मारक नव्हे. ह्याच दृष्टीनें लोकमान्यांच्या इतर स्मारकांपेक्षां त्यांच्या वाङ्मय-स्मारकाचें औचित्य वाचकांचे ध्यानांत येईल.

असो. वाङ्मय-स्मारकाचा संकल्प केल्याप्रमाणें लोकमान्यांचे चरित्राचा प्रथम खंड रा० केळकर यांनीं प्रसिद्ध केला; केसरींतील लोकमान्यांच्या लेखांपैकीं राजकीय लेखांचें प्रामुख्य असल्यानें, त्या लेखांचे दोन खंड, आणि लोकमान्यांच्या रा० बापटकृत "आठवणी व आख्यायिका" यांचे दोन खंड याप्रमाणें पांच ग्रंथ प्रसिद्ध झाले. आणि या त्रिविध स्वरूपाचे आणखीहि ग्रंथ यथावकाश प्रसिद्ध करण्याचा संस्थेचा निश्चय आहे. कारण रा० केळकरकृत चरित्राचा खंड सन १८९९ पर्यंतचाच असल्यानें पुढील काळचा खंड प्रसिद्ध होणें क्रमप्राप्त आहे आणि तो ते कार्यबाहुल्यांतून वेळ सांपडेल त्याप्रमाणें करणार आहेत. केसरींतील लेखांचे भाग, ग्राहकांना जड जाऊं नये म्हणून, अवकाश-अवकाशानें प्रसिद्ध होणार आहेत. आणि 'आठवणी व आख्यायिकांचा'हि आणखी एक खंड तयार करण्याच्या खटपटींत रा० बापट आहेतच! एतावता, आज जरी संकेतित सर्व ग्रंथ पूर्ण प्रसिद्ध झाले नसले तरी त्यांचे जे अंश किंवा खंड प्रसिद्ध झाले आहेत, त्यांवरून त्यांची रूपरेखा व उपयुक्तता आपले ध्यानांत येण्यासारखी आहे. प्रस्तुत लेखकाचे मतें मोक्षमार्गी सत्पथिकांना मार्गदर्शी जशी जुनी प्रस्थानत्रयी आहे तसे हे लोकमान्यांचे त्रिविध वाङ्मय-ग्रंथ म्हणजे सांसारिकांना—विशेषतः राजकारणप्रविविक्षूंना—प्रस्थान

त्रयीच आहे. हिचें जो लक्षपूर्वक अध्ययन करील त्याला संसारांत व त्याहूनहि आजकालचे राजकारणांत कसें वावरावें हें अचुक समजेल.

याप्रमाणें या ग्रंथत्रयीचें साधारण महत्त्व सांगितलें. आतां तिचें व्यस्त किंवा पृथक् दृष्टीनें महत्त्व कसकसें तें पाहूं. प्रथम केसरींतील राजकारणी लेखः—रा० रा० पांगारकर हे आपल्या 'वाङ्मय-समालोचनें'त म्हणतातः "टिळकांनीं चालू राजकारणाची परिभाषा बनविली, लोकांस चटक लाविली, राजकारणी वाङ्मय निर्माण केलें." म्हणणें खरें आहे. केसरी-पूर्वीं राजकारण म्हणजे काय व कशाशीं खातात हें साधारण जनतेला राहो, पण सामान्यतः सुशिक्षितांनादेखील ज्ञात नव्हतें. पण केसरीचे प्रसारापासून सर्व देशभर आचाण्डाल राजकारण सर्वांचे तोंडीं झालें. लोकमान्यांचे लेखांनींच लोकांतील बहुतांची 'जो-हुजुरी' वृत्ति कमी करून स्वाभिमान, स्वातंत्र्यप्रेम व धैर्य उत्पन्न केलें. आपण कोल्हे नसून केसरी आहों ही जाणीव लोकांत पेरिली. तरुण पिढीचे लोकमान्य हे राजकारणांतील दीक्षागुरुच आहेत. इतरहि या विद्येचे मंत्र-तंत्र-गुरु असतील, तरी 'शाब्दे परे निष्णातः' या सद्गुरुलक्षणाचे मालक टिळकच. आणि म्हणूनच 'तुका म्हणे करूनी दावी, त्याचे पाय माझे जीवीं' या साधूक्तीचा प्रत्यय त्यांचे लोकमान्यतेनें येत आहे. जो कोणी निरसूय दृष्टीनें पाहील त्याला असें दिसेल कीं, लोकमान्यांनीं अमृतसर येथें 'प्रतियोगी' सहकारितारूप जो आदेश केला तोच आजचे राजकारणांतील अखेरचा तारक-मंत्र आहे. राज-कारणाचे महार्णवांत इतस्ततः स्वैर विहार करीत गटंगळ्या खाणारांना लोकमान्यांचे शब्द दीपगृहांतील प्रकाशाप्रमाणें आहेत. त्यांची दिशा सोडून भटकतील ते बुडतील. 'राजकारणा'चे दीक्षागुरु लोकमान्य यांचें राज-कारणांतील अंतिम ध्येय जें 'स्वराज्य' तें जरी रुपयांत एकदोन आण्यांपेक्षां लोकांचे पदरांत पडलें नाहीं, तरी लोकमान्यांनीं आपलें कर्तव्य पुरें केलें, असें म्हणण्यास कांहींच हरकत नाहीं. श्रीसमर्थ हे दासबोधांत एके ठिकाणीं म्हणतातः "जनाचा प्रवाह चालिला। म्हणजे कार्यभाग आटोपला ॥" या न्यायानें लोकमान्यांचे प्रयत्नामुळेंच सर्व महाराष्ट्रीय जनांचे वृत्तीचा प्रवाह किंवा ओघ त्यांच्या ध्येयाकडे त्यांचे देखत जोरानें वाहूं लागलासें पाहून जर त्यांनीं देह ठेविला, तर तें कृतकार्यच झालें. उरलें

तें काम पुढच्यांकडे आहे. याशिवाय लोकमान्यांनीं सुरू केलेल्या राजकारणी संग्रामांत तरुण युयुत्सूंना लागणारीं दिव्यास्त्रेंहि या लेखांतच सांपडणारीं आहेत. प्रभु रामचंद्राचे हातांतील दिव्यास्त्राप्रमाणेंच तीं गुरुजनांचे तपस्तेजानें निर्माण झालेलीं असल्यानें जयिष्णु आहेत. अशी या लेखांची थोडक्यांत योग्यता आहे.

आतां लोकमान्यांचें चरित्र. याचा पूर्वभाग सोडून अधिक महत्त्वाचा जो उत्तरभाग ( प्रसिद्ध होणारा ) त्याकडे पहातां, जॉर्ज सौंड म्हणतो, "The life of great geniuses is a sublime storm" "लोकोत्तरांचें चरित्र म्हणजे एक दिव्य तुफानच होय," या म्हणण्याचें मूर्त चित्रच पुढें उभें राहतें. आज बांबप्रकरण, उद्यां चिरोलप्रकरण, परवां ताईमहाराज; कांहीं ना कांहीं वादळ माजलेलें. पण एक इंग्रज कवि म्हणतो कीं, समंतात् वात्याचक्रानें दशदिशा व्याकुळ केल्या असतांहि गरुडपक्षी आपल्या उत्तुंग शैलशृंगावरील घरट्यांत मौजेनें हवा खात डुलत बसतो, त्याप्रमाणें असल्या दारुण वावटळींतहि लोकमान्य आत्मानंदांतच राहिले. खरोखरच सामान्यांचे दृष्टीनें ते अखंड विंचू-सर्पांचे तळ्यांत उभे होते, पण विषकंठ शंकराप्रमाणें त्यांचा समाधिभंग झाला नाहीं. उलट शरतल्पशायी भारतपितामहाप्रमाणें ते पुढल्यांस ज्ञानोपदेश करीतच होते. व्यसनांचे चक्रव्यूहांत सांपडूनहि इतपत निराकुल वृत्तीचा धीरवीर दुसरा कोठें पहावा! या अनर्थबहुल संसारांत उभे राहणारास पदोपदीं जरूर लागणारा जो धैर्यगुण तो लोकमान्यांचे चरित्रापासूनच शिकावा. लोकमान्यांचें हें धैर्य गीतेंत सांगितलेल्या दैवीसंपदेचें अभिजात पुरुषांचें धैर्य होय; रामोशी-बेरडांचें नव्हे. ज्ञानेश्वर म्हणतातः 'त्रिविध तापांच्या लाटांचा भोंवतीं कहर उसळत असतांहि अशा "चित्तक्षोभाचे अवसरीं। **उचलूनि धैर्यानें चांग करी।** धृति म्हणिजे अवसरीं। तियेतें गा" किंवा संस्कृत कवि म्हणतोः 'आपदि स्फुरति प्रज्ञा यस्य धीरः स एव हि'—हें लक्षण लोकमान्यांनाच लागू. हायकोर्टानें जबर शिक्षा सुनावून काराप्रवेश होतांच कागद-पेन्सिल घेऊन रातोरात अपिलाचे मुद्दे स्वतःच विनतोड लिहून उजाडायला भायखळा-क्लबांत बॅरि० गार्थ व प्यूचे हातीं देणाराचे किंवा तुरुंगांत जातांच स्वस्थ अंगाई करून घोरूं लागणाराचे धैर्याचा मासला अनन्यच नव्हे काय? एकाद्या योग्याचें

अकुतोभयत्वहि या कोटीला पोंचणार नाहीं. हें ज्यास शिकणें त्यांनीं या चरित्राचीं पारायणें करावीं, म्हणजे संसार सुसह होईल.

आतां त्रयींतला तिसरा ग्रंथ रा० बापटकृत (संपादित) 'आठवणी व आख्यायिका' ह्या ग्रंथाचा पहिला विशेष म्हणजे हें एक अठरा धान्यांचें कडबोळें आहे. पण त्यामुळें तें मोठें खुसखुशीत व रुचकर झालें आहे. आणि कडबोळ्याप्रमाणेंच 'चरित्र'रूपी मुख्य ताटांतहि तोंडीलावणें म्हणून घेतलें तरी मुख्यान्नाला मदतच करील. बरें, एरव्हीं फराळाची जिन्नस म्हणून स्वतंत्रच जातां जातां चाखली तरी समाधानच करील. रा० केळकर प्रस्तावनेंत त्याला लोकमान्यांचे अनेकांगी चित्रांचें 'अल्बम' म्हणतात. तेंहि उचितच आहे; किंवा असंख्य तजेलदार भिन्न वर्णांच्या छटा एकवटून बनणाऱ्या शक्रधनुष्याप्रमाणें हें एक दृङ्मनोहर दृश्य म्हटलें तरी शोभेल. रा० केळकरांनीं त्याच प्रस्तावनेंत स्वतःच्या शालीनतेला व सत्यप्रियतेला स्मरून असें म्हटलें आहे कीं, 'लोकमान्यांच्या झाल्या म्हणून सर्वच गोष्टी असामान्य असणें शक्य नाहीं', हें जरी खरें तरीहि त्यांचें लोकोत्तरत्व सिद्ध करणाऱ्या गोष्टीहि अनेक आहेत हें खास. मला तर लोकमान्यांचा हा ग्रंथ पाहून पांडवगीतेचें स्मरण होतें. कारण पांडवगीतेंत ज्याप्रमाणें, ब्रह्मादिदेव, ध्रुवप्रल्हादादि बालभक्त, कुंती, माद्री, अरुंधत्यादि महिला, व्यासवसिष्ठादि मुनी व धर्मार्जुन-कर्णसुयोधनादि परस्पर प्रतिपक्षी योद्धे सर्व मिळून एकच रवानें श्रीकृष्णाची भिन्न भिन्न शब्दांनीं पण प्रेमळ स्तुति करितात, त्याचप्रमाणें या आठवणींत, कै० केरूनाना छत्रे, भांडारकर, रानडेप्रभृति गुरुदेव; डॉ० वर्डस्वर्थ, प्रो० मॅक्स्‌म्यूलर, महात्मा गांधींसारखे तपस्वी; डॉ० बिझांट, श्री०सरलादेवीसारख्या महिला व इतरहि 'सुहृन्मित्रार्युदासीन मध्यस्थद्वेष्यबंधवः–' या श्रेणींत येणारे भिन्न भिन्नवर्गीय सर्वजण परोपकारी लोकमान्यांचें 'कथमपि भुवनेऽस्मिंस्त्वादृशाः संभवन्ति' अशा आशयाचे धन्यवादच गात आहेत. एवढा पुरावा बस्स आहे. पुढील पिढीला लोकमान्यांच्या ह्या आठवणी म्हणजे एक सद्‌गुणांचा संकेतकुंजच आहे किंवा हें एक Experimental farm (प्रयोगक्षेत्र) आहे. आणि

क्षेत्रांतून घेतो, त्याप्रमाणें, 'आत्मविश्वास, मनोजय, धैर्य, औदार्य, तितिक्षा, मित्रवात्सल्य, साधेपणा, स्वार्थत्याग, विरक्ति, विवेक, राष्ट्राभिमान व निःस्वकता ( selfiessness )' इत्याद्यनेक स्पृहणीय गुणांचें अस्सल बियाणें पाहिजे असेल त्यानें येथून घ्यावें. कोणी म्हणेल हे गुण लोकांत नाहींत काय ? आहेत. पण तुलसीदास म्हणतातः—'रामनाम सब कोई कहे, ठग ठाकूर ओर चोर। ध्रुवप्रल्हाद जिस्से तरे वो नाम कुच और'—तेंच तारतम्य येथें आहे. म्हणून तिसरा खंड प्रसिद्ध झाल्यावर रा० केळकरांनीं वर दिलेले तिसरे चाळणीनें पुनः सर्व गाळून उरलेल्या नगद-माल गोष्टींची एक खिशांत मावणारी आवृत्ति 'नीतिमंजूषा' किंवा 'सद्गुणकल्पलता' या नांवानें तरुण मुलांमुलींकरितां गीतारहस्याप्रमाणें अनेक देशभाषांत रा० बापटांनीं छापावी. कारण, शीलचारित्र्यसंवर्धनास या 'गुरुचरित्रा'-पेक्षां अधिक प्रासादिक ग्रंथ दुसरा आढळत नाहीं. पुराण-नीतिग्रंथांत शाब्दबोध आहे. या चरित्रांत वस्तुबोध आहे. आजपर्यंत 'राजमान्य', व 'राजश्रिया विराजित राजमान्यहि' अनेक झाले, लोकहितेच्छु झाले, कैवारी झाले, जनताग्रयायी झाले, तथापि 'लोकमान्य' ही पदवी कोणास मिळाली नाहीं, ती कै० टिळकांस कां मिळाली हेंहि ह्या 'आठवणीं'वरूनच समजतें. समर्थ म्हणतात: 'जो जगदंतरीं मिळाला। तो जगदंतरचि झाला ॥' याचेंच हें उदाहरण.

येथवर या ग्रंथत्रयीचें पृथक्रूप वर्णिल्यावर, पुढील 'सूक्तिसंग्रहांत' ज्यांतून वारंवार वचनोद्धार केला आहे असा मोठा ग्रंथ म्हणजे गीतारहस्य. कस्तुरीमृगाचा जसा 'सकलसुरभि-द्रव्य-गर्वापहारी' परिमलपूर्ण मृगनाभ तसाच लोकमान्यरूपी सुरभिमृगाचा 'रहस्य' हा ग्रंथ 'नाभ' किंवा 'हृदय'च आहे. आणि जों जों भोंवतीं वारा उसळेल तों तों मृगनाभाचा परिमल दिगंतापर्यंत पसरत चालतो त्याप्रमाणें 'रहस्य' प्रसिद्ध होतांच टीकाकारांनीं उठविलेल्या वाहुटळीनें या 'नाभा'चा परिमल अधिकाधिकच पसरत चालला, एवढें म्हणणें पुरें आहे.

येथवर पुढील 'सूक्ति-संग्रहाला' आकरभूत ग्रंथांचें महत्त्व सांगितलें. आतां प्रकृत ग्रंथाकडे वळूं. लोकमान्यांच्या 'आठवणी' जुळविणाऱ्या भगीरथ-प्रयत्नी रा० बापटांनीं लोकमान्यांचे वाणींतून व लेखणींतून उतरलेले जेवढे

मिळून विचार आज उपलब्ध झाले, तेवढ्यांचें आलोचन करून तुल्य व स्तुत्य प्रयत्नानें हा एक सूत्रग्रंथ निर्माण केला आहे. इंग्रजींत असे संग्रह आहेत. हक्स्लेचें ॲफारिझम्, सूशिफूकोचीं मॅक्सीमस् इत्यादि. लॉर्ड स्टन्ले म्हणतो* "वडिलार्जित मिळकतींतील शेलकीं रत्नें पिढ्यान्पिढ्या जपून ठेवितात, इतर मौल्यवान् वस्तूंची वासलात लागते." या दृष्टीनें पाहातां बापटांनीं पुढील पिढीची ही एक मोठीच सोय केली आहे. शिवाय याहि पिढीला हा ग्रंथ उपयोगी आहे. केव्हांहि काय, 'आयुष्य थोडें, आणि कार्यें फार'!! स्विफ्ट म्हणतो‡ 'आजकाल ग्रंथसंतति व ज्ञेयविषयांची गर्दी एवढी झाली आहे कीं, सारग्रहणाशिवाय गत्यंतर नाहीं'. श्रीमच्छंकराचार्यांनींदेखील वादिजयार्थे शारीरसूत्रभाष्य, उपनिषद्भाष्य व अखेर भगवद्गीताभाष्य हे बृहद्ग्रंथ लिहिल्यावर सामान्यांचे नित्य पाठाकरितां व सुलभ समजुतीकरितां अपरोक्षानुभूति, विवेकचूडामणि, अद्वैतमकरंदासारखे चुटकेग्रंथ व त्याहून अल्प म्हणजे चर्पटपंजरी, षट्पदीसारखीं स्तोत्रें करून वरील भाष्यत्रयीचें सार सर्वत्र पेरलें. समर्थांनीं म्हटलें आहे: "जाणत्याचे जाणावे प्रसंग। जाणत्याचे घ्यावे रंग। जाणत्याचे स्फूर्तीचे तरंग। अभ्यासावे ॥१॥ जाणत्याचें धूर्तपण। जाणत्याचें कारण। जाणत्याचें निरूपण। ऐकत जावें ॥२॥ लोकमान्यांस 'जाणता' हें विशेषण अन्वर्थक नव्हतें असें जर

शालिग्राम किंवा गणपतीसारखे सुंदर पाषाणदेखील कावेरी, गंडकी, नर्मदा या विशिष्ट नद्यांचे ओघांत विशिष्ट भूमींतच सांपडतात. त्याचप्रमाणें सूक्ति किंवा सुभाषितेंहि सर्वांचेच लेखांत प्रचुर सांपडतील असें नाहीं.

कोणाचेहि तोंडून विरळच निपजतात (सूक्ति २०४ पहा). तथापि, जुनींच सत्यें सफाईचा हात देऊन नव्या रूपानें मांडणें देखील भलत्यालाच साधत नाहीं. एक वेळ नवें भांडें घडण्यापेक्षां मोडींत पडलेलें जुन्याचें नवें करून दाखविण्यालाच अधिक कुशलता लागते; तसाच हा प्रकार आहे. 'भोग सरता आणि वैद्य पुरता' ही सर्वज्ञात जुनीच म्हण आहे. परंतु तुकोबांसारख्या कारागिराचे हातून ती 'तुका म्हणे भोग सरे। गुणा येतील अंगारे' अशा रूपानें अधिक सफाईचा रंग घेऊन आली. लोकमान्यांचे ठिकाणींहि ही तुकोबांची द्विविध शक्ति होती हें सूक्तींच्या वाचकांस स्वतःच समजून येईल.

ग्रंथ म्हटला कीं, व्यवस्थाहि पाहिजेच. प्रस्तुत सूक्तींची वर्गवारी केल्यास १ धार्मिक, २ तात्त्विक, ३ राजकीय, ४ नैतिक, ५ सामाजिक, ६ शास्त्रीय (वैज्ञानिक), ७ शैक्षणिक, ८ वाङ्मयिक, ९ ऐतिहासिक, १० आध्यात्मिक, ११ व्यावहारिक, १२ औद्योगिक व १३ सर्वसाधारण, असे तेरा वर्ग होतील. पण कांहीं कारणानें ही वर्गवारीची पद्धति येथें स्वीकारली नाहीं. भॉननें आपल्या Handbook of Proverbs (म्हणींचें पुस्तकांत) ही पद्धत कांहीं भागांत स्वीकारली, पण तीमुळें त्याला अखेर सर्व पुस्तकाच्या शेवटीं अक्षरानुक्रमणिका द्यावी लागली. यासाठीं येथें प्रथमच अक्षरानुक्रम स्वीकारला आहे. आतां या योजनेमुळें नवरत्नांचे हाराप्रमाणें भिन्न विषयांतर्गत सूक्तिरत्नांची एकत्र खिचडी झाली आहे खरी; पण त्यांतील रत्नांप्रमाणेंच व्यक्तिगत रत्नाची चमक तर न बिघडतां उलट परस्पराश्रयानें सौंदर्य वाढलेंच आहे.

येथवर सूक्तींचे व्यवस्थेबद्दल झालें. आतां त्यांचे व्याप्तीकडे व स्वरूपाकडे वळूं. वर जे तेरा वर्ग दिले आहेत, त्यांकडे पाहतां ध्यानांत येईल कीं, आजकालच्या विशिष्ट वैज्ञानिक विषयांखेरीज साधारणतः लिहितां वाचतां येणाऱ्या माणसांचा ज्या ज्या विषयांशीं संबंध येतो ते सर्व विषय या वर्गांत अंतर्भूत आहेत. त्यांतहि राजकीय, सामाजिक, धार्मिक, नैतिक, व्यावहारिक हे अखिलजनसाधारण व शास्त्रीय (वैज्ञानिक), शैक्षणिक, वाङ्मयिक, ऐतिहासिक, आध्यात्मिक व औद्योगिक हे विशेष शिकल्यासवरल्यांकारितां होत.

एवंच मनुष्य चतुरस्त्र होण्याला मुख्यतः जे विषय अवश्य ते येथें आहेत. आणि हातीं घेतल्या विषयाची सीमांतरेषा गांठल्याशिवाय समाधान नाहीं अशी लोकमान्यांची उपजत वृत्ति असल्यामुळें, त्यांच्या त्या त्या विषयांतील उक्ति म्हणजे चरम सिद्धान्तच आहेत, असें म्हटलें तरी चालेल. बहुतेक सर्वच बोलांत स्पष्टोक्ति किंवा परिच्छिन्नता, व्यवहार्यता, देशकालौचित्य व विवेक हे धर्म दिसून येतात. या खेरीज व्यक्तिशः कांहीं सूक्तींची तेजस्विता, कांहींतील शब्दसौष्ठव, कांहींतील दृष्टान्तचातुर्य, कांहींतील सरस विनोद, कांहींचा खोंचदारपणा, कांहींचें अल्पाक्षररमणीयत्व, कांहींचें व्यापकत्व, कांहींचा बांधेसूदपणा, कांहींतील सूचकत्व, कांहींचें गांभीर्य इत्यादि गुण विलोभनीय आहेत. धार्मिक व आध्यात्मिक भावनेचे वाचकांस येथें धर्माचें स्वरूप, आस्तिक्य, ईशनिष्ठा, सगुण-निर्गुण-आत्मज्ञान, मोक्षोपाय, श्रद्धा-भक्ति, नैष्कर्म्य, स्वार्थी कर्म, परार्थी (लोकसंग्राहक) कर्म या सर्वांवर बोल सांपडतील. नीतिबोधेच्छु व समाजहितेच्छूंस नीतीचीं मूलतत्त्वें, तात्त्विक नीति, व्यावहारिक नीति, शत्रुमित्रभाव, आचार, विचार, धर्माचरण, कुलाचार, स्पृश्यास्पृश्यत्व, विवाहविधि, चातुर्वर्ण्यसंस्था इत्यादिकांवर बहुमान्य असे विचार आढळतील. राजकारणी उमेदवारांस तर येथें पञ्हयच आहे. स्वातंत्र्य, पारतंत्र्य, पक्षभेद, राष्ट्रहित, राष्ट्रीय शिक्षण, लोकाग्रणित्व, लोकाराधन, आजची राजकीय परिस्थिति, राष्ट्रोदयाचे मार्ग व साधनें, सर्वैक्य, सरकारची नीति व धोरण इत्यादि इ० संबंधी भरपूर बोध आहे. नुसत्या लोकाग्रणीत्वावर किंवा पुढारीपणावर (८४६—८९९) इतके बोल आहेत. तात्त्विकांना जगदुत्पत्ति, जीवाचें स्वरूप व कर्तव्य, सुख-दुःखाची मीमांसा, त्यांचे साधकबाधक उपयोग, उपचयापचयाच्या युक्त्या इ० विचार आहेत. याचप्रमाणें अन्य विषयांसंबंधींहि समजावें. या सूक्तींचें वैशिष्ट्य हें आहे कीं, यांतील पुष्कळशा वक्त्याचे स्वानुभवाचे उद्गाररूप आहेत आणि मांसखाऊ लोक जसें म्हणतात कीं, वनस्पतींचें रूपांतर होऊन नंतर रक्तमांस होण्यापेक्षां मांस मांसाला तत्काळ मिळतें, त्याचप्रमाणें लोकमान्यांचे हे सद्यःस्थितींतलेच अनुभव असल्यामुळें, आजच्यांना तरी तत्काळ पटतील. आणि यामुळें यथारुचि ते कोठें धर्मश्रद्धा दृढावतील; कोणाचा आत्म-

विश्वास बळावतील; हताशांना आशावादी बनवितील; घाबरल्यांस धीर देतील; भ्याडांचे मर्द करतील; निद्रितांस जागे करतील; आळशांस उद्यमपर बनवितील; किंकर्तव्यतामूढांना योग्य दिशा दाखवितील; अज्ञानाचें व दुःखाचें उन्मूलन करतील; अहंमन्यांचा गर्व झाडतील; उन्मार्गगामीयांस वाटेवर आणितील. सारांश, व्यक्ति, समाज व राष्ट्र यांचे उन्नतीचे अनेकविध मार्ग दर्शविणारे हे बोल किंवा सूक्ति आहेत. प्रभु रामचंद्रांनीं जगज्जननी सीतादेवीचे उक्तीला उद्देशून म्हटलें आहे, "म्लानस्य जीवकुसुमस्य विकासनानि। कर्णामृतानि मनसश्च रसायनानि ॥" हें लोकमान्यांच्या या सूक्तींनाहि अनुरूप आहे, असें म्हणण्यास दिक्कत वाटत नाहीं.

असो, रा० बापटांनीं मधमाशीप्रमाणें दृढश्रमानें हा सूक्ति-संग्रहरूप मधुकोश आयताच लोकांस प्राप्त करून देण्यानें जी लोकसेवा केली तिजबद्दल ते प्रशंसेस पात्र आहेत. इति शम्.

पडघवली–भोर.
ता. १३-७-२६.

महादेव हरि मोडक

# आत्मनिवेदन

**आपणास निवेदावें। आपण विवेकें नुरावें।**
**आत्मनिवेदन जाणावें। याचें नांव॥**

—श्रीसमर्थ— दासबोध ६-२-३९

कै० लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या वाङ्मय-स्मारकाच्या अनेक अंगांपैकीं 'आठवणी व आख्यायिका' या ग्रंथाचे दोन खंड गेलीं दोन वर्षें टिळकजयंतीस मीं प्रसिद्ध केल्यानंतर, तिसरे वर्षींहि तिसरा म्हणजे शेवटचा खंड प्रसिद्ध करण्यापूर्वींच, दरम्यान केव्हां तरी, लोकमान्यांचा 'सूक्ति संग्रह' प्रसिद्ध करण्याचें कार्य उरकून घ्यावें अशी प्रथम माझी इच्छा होती. म्हणून तारीख १९ माहे जानेवारी सन १९२६ च्या केसरींत प्रसिद्ध केलेल्या जाहीर विनंतिपत्रकांत मीं म्हटलें होतें कीं, "लोकमान्यांच्या आठवणी, उक्ति व पत्रें या त्रिदलात्मक वाङ्मय-स्मारकापैकीं उक्तींचा संग्रह करून तो प्रसिद्ध करणें हें काम जितकें एकमुखी, स्वावलंबी व स्वाधीनचें आहे, तितकेंच 'आठवणी व पत्रें' मिळविणें हें काम परावलंबी, परतंत्र व सर्वस्वी परेच्छाधीन असल्याचें लक्षांत घेऊनच प्रथम स्वतंत्र 'उक्ति-संग्रह' प्रसिद्ध करण्याचें काम लवकरच उरकून टाकण्याचें मीं योजिलें आहे." पण हा संकल्प यापूर्वींच सिद्धीस न जाण्याचीं मुख्य दोन कारणें म्हणजे गेल्या लागोपाठ दोन वर्षांप्रमाणें याहि वर्षीं आठवणींचा मजकूर मिळविण्याकरितां, परिश्रमांत कांहींहि बाकी ठेविली नसतांहि अपेक्षित असा किती तरी मजकूर शेवटपर्यंत हातींच न आल्यामुळें अखेर मनाप्रमाणें यंदांच्या टिळकजयंतीस ग्रंथ तयार होण्याची आशा सोडून देणें प्राप्त झालें. तेव्हां अर्थात् ओघानेंच व औचित्याच्या दृष्टीनेंहि प्रस्तुत ग्रंथप्रकाशनार्थ आजचा दिवस गांठण्याकडे मनाची प्रवृत्ति होणें स्वाभाविक होतें. शिवाय सदरहू काम 'एकमुखी, स्वावलंबी व स्वाधीनचें' असलें तरी त्यास प्रारंभ केल्या दिवसापासून

कळून आलेली त्याची व्याप्ति, वेळोवेळीं बदललेलीं त्याचीं स्वरूपें व तें किचकट काम करण्यास मोडणारा वेळ याची प्रारंभीं मला असावी तितकी कल्पना नसल्यामुळें, हें पुस्तक उशिरानें कां होईना, पण आजच्या पुण्यदिवशीं वाचकांस समर्पण करण्यास मला फार आनंद होत आहे.

प्रस्तुत पुस्तकाची कल्पना जरी गेल्या तीन चार वर्षांत जोरानें माझे मनांत खेळूं लागली तरी तिचें बीजारोपण मात्र सुमारें एकवीस बावीस वर्षांपूर्वीं म्हणजे मी विद्यार्थिदशेंत असतांनाच माझे मनोवाटिकेंत झालेलें होतें, हें येथें नमूद करणें अप्रासंगिक होणार नाहीं असें वाटतें. आणि म्हणूनच केसरींतील वर उल्लेखिलेल्या जाहीर विनंतिपत्रकांत मीं म्हटलें होतें कीं, " लोकमान्यांच्या उक्ति प्रसिद्ध करण्याची हीं कल्पना आठवणींचे दोन खंड प्रसिद्ध केल्यानंतर मला सुचलेली नसून ती पूर्वींपासूनच माझ्या मनांत एकसारखी घोळत आहे." सन १९०४--१९०५ सालीं केसरी वाचून त्यांतील सुंदर अशीं कित्येक वाक्यें वाक्येंच्या वाक्यें तोंडपाठ करण्याची मला हौस वाटत असे; व पुढें पुढें तर त्यांतील उत्कृष्ट 'वचनें'

एका गोष्टीची आठवण होते. बरेच दिवसांपूर्वी एकदां पुणें सार्वजनिक सभेच्या दिवाणखान्यांत कोणी एका गृहस्थानें श्रीगजाननाच्या मूर्तींचें प्रदर्शन भरविलें होतें. त्यांतील सर्वोत्कृष्ट मूर्तीस अमुक एक बक्षीस देण्याचें ठरवून तें बक्षीस आर्यसंस्कृतीचे जाज्वल्य अभिमानी महर्षि श्रीसद्गुरु अण्णासाहेब पटवर्धन यांच्या परीक्षेप्रमाणें देण्यांत यावयाचें होतें. सदरहू कामाकरितां महर्षींस बोलवायास मी त्यांचे घरीं गेलों तेव्हां ते म्हणाले, "बाबारे, मी तेथें येणें शक्य नाहीं. परमात्म्याच्या त्या सर्वच मूर्ति आहेत; त्यांत निवडानिवड करणें–बरेंवाईट म्हणणें–या जिव्हेस अशक्यप्राय आहे." पण त्याच ब्रह्मर्षींनीं एकदां त्यांस अत्यंत पूज्य असलेल्या श्रीगुरुचरित्र ग्रंथांतील वेंचे–उक्ति या स्वरूपाचा भाग कोणता हें आम्हांस अगदीं तार्किकदृष्ट्या विशद करून सांगितलें होतें, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. आणि हें खरेंच आहे कीं, मनुष्याच्या बुद्धीचा उपजत असा हा तर-तमभाव जागृत न ठेवणें म्हणजे साक्षात् परमेश्वराशीं एवढ्यापुरती ही एक प्रकारें प्रतारणा करणेंच नव्हे काय ? 'अहमादिश्च मध्यं च भूतानामंत एव च' असें म्हणणाऱ्या भगवंतांनीं 'हंत ते कथयिष्यामि दिव्याह्यात्मविभूतयः' असें म्हणून साऱ्या विश्वांतील निवडक वस्तूंची पृथक् यादी केलीच कीं नाहीं ?

पण इतक्या खोल पाण्यांत न शिरतां, आपल्या संस्कृत वाङ्मयांतहि अशा प्रकारचा प्रयत्न, इंग्रजी वाङ्मयाप्रमाणें मोठ्या प्रमाणांत नसला तरी, थोड्याबहुत अंशानें केलेला आपणांस पहावयास सांपडतो. सुभाषितरत्न-भाण्डागार, रत्नावली, सूक्तिकुसुमांजलि वगैरे ग्रंथ याची साक्ष देतील. तथापि अनेक ग्रंथकारांच्या निरनिराळ्या ग्रंथांतील वचनांचीं हीं उदाहरणें असलीं तरी, एकाच ग्रंथकाराच्या एक अगर त्याच्या अनेक ग्रंथांतील उक्ति एकत्र संग्रहित केल्याचीं उदाहरणें मात्र पहावयास सांपडत नाहींत. तसेंच, आपल्या मराठी वाङ्मयांतहि अशा तऱ्हेचीं पुस्तकें फारशीं नाहींत म्हटलें तरी चालेल. सिमियन बेंजामिनकृत मार्कस् ऑरेलियस बादशहाचीं 'बोधवचनें', श्री० न. रा. परांजपेकृत श्रीरामकृष्ण परमहंसदेव यांचीं 'बोधवचनें' अशासारखीं कांहीं–पांचपंचवीस पानांचीं किरकोळ पुस्तकें आहेत, नाहीं असें नाहीं. तसेंच, श्रीयुत महादेव हरि मोडक यांचें 'खडे

❀

तात्त्विक बोल' हें पुस्तक प्रसिद्ध आहे; पण याचें स्वरूप मात्र अगदीं भिन्न आहे. इंग्रजी भाषेंत मात्र या विषयासंबंधानें अनेक ग्रंथ पहावयास सांपडतात. इंग्रजी व संस्कृत या दोन्ही भाषांत ज्ञानभांडार विपुल आहे; परंतु इंग्रजी भाषेंत त्यांतील ग्रंथरत्नावर पैलू पाडून ते अधिक दीप्तिमान् होतील याबद्दल जो उद्योग करण्यांत आला आहे, तशा प्रकारचा उद्योग संस्कृत वाङ्मयांत फारसा केलेला दृष्टीस पडत नाहीं. आणि संस्कृत भाषेची जर ही स्थिति तर मराठीविषयीं बोलावयासच नको. इंग्रजींत नेपोलियनच्या ऐशींहून अधिक लहानमोठ्या पुस्तकांतून डी. लियनकोर्ट यानें सदुक्ति काढून त्यांचा संग्रह केला आहे. व कायसर वुइल्यमच्या ग्रंथांतून, तसेंच त्याच्या खाजगी पत्रांतून, फार काय पण त्यानें वेळोवेळीं पाठविलेल्या असंख्य तारांतूनहि, त्याचा उक्ति-संग्रहकार जे. एम्. केनेडी यानें बारीकसारीकहि उक्ति जमवून त्यांचें पुस्तक प्रसिद्ध केलें आहे. परवां एका विद्वान् सद्गृहस्थांशीं सहज या माझ्या प्रस्तुतच्या प्रयत्नासंबंधानें मी बोलत असतां माझी योजना पूर्ण ऐकून घेतल्यावर या बाबतींत त्यांनीं काढलेले उद्गार, केलेलें आंबट तोंड व माझ्या श्रमाचें दाखविलेलें वैयर्थ्य व वर्णिलेलें वैफल्य हीं लक्षांत घेऊन या बाबतींत पाश्चात्य विद्वानांचें तरी काय म्हणणें आहे हें पुढील उदाहरणांवरून वाचकांचें लक्षांत येईल. वुइल्यम् पेन लिहितो, "The wisdom of nations lies in their maxims, which are brief and pithy. Collect and learn them; they are notable measures and directions for human life; they save time in speaking; and upon occasions may be the fullest and safest answers." इंग्रजी भाषेंतील प्रसिद्ध टीकाकार ॲडिसन् याचें म्हणणें असें कीं, "Maxims are of great weight; and a few useful ones at hand do more toward a happy life than whole volumes that we know not where to find." याशिवायहि कित्येक उदाहरणें माझ्या अवलोकनांत आलीं आहेत. त्यांपैकीं कांहीं मनोरंजक, प्रसंगोचित् व ह्या विषयास पोषक अशीं वाटल्यावरून तीं संक्षेपतः खालील टीपेंत देत आहे.*

---

* सूक्तींविषयीं प्रसिद्ध इंग्रजी तत्त्ववेत्ता लॉर्ड बेकन आपला स्वानुभव सांगतो: 'Wise sayings are not only for ornament, but for action and business,

having a point or edge whereby knots in business are pierced and discovered.' प्रसिद्ध पंडित जॉन मोर्ले यांचा अभिप्राय असा कीं, 'Maxims are the guiding oracles which man has found out for himself in that great business of ours, of learning how to be, to do, to do without, and to depart...आणखी पुढें ते म्हणतात्, 'Aphorisms, let us remember that this wisdom of life is the true salt of literature;—that those books are most nourishing which are most richly stored with it, and that it is one of the main objects which men ought to seek in the reading of books.' डब्ल्यू. आर. ॲल्जर यांचें सूत्रमय वाक्य असें आहे कीं, 'Aphorisms are portable wisdom.' इमर मॅन लिहितो, 'A moral lesson is better expressed in short sayings than in long discourse and hence their importance.' सदुक्तीचा परामर्ष कसा घ्यावा यासंबंधानें सर हेन्री सिडने म्हणतो, 'If you find a wise sentence or an apt phrase commit it to your memory.' जोबर्ट यानें याविषयीं आपलें मत अनेक ठिकाणीं ग्रथित केलें आहे. तो एके ठिकाणीं म्हणतो, 'Good maxims are the germs of all excellence. They are to the intellect what laws are to actions; they guide and direct, and, although themselves blind are protective.' सर जे. मॅक्निटॉश लिहितो, 'Maxims are the condensed good sense of nations.' सर व्हॅन्टिस् हा आपलें असें मत देतो कीं, 'I am of opinion that there is no maxim which is not true, because they are all sentences drawn from experience itself, the mother of all the sciences.' कोलरीज म्हणतो, 'A maxim is a conclusion upon observation of matters of facts, and is merely speculative; a 'principle' carries knowledge within itself, and is prospective.' जेरिमि टेलर सूक्तीची उपयुक्तता वर्णितो, 'If these little sparks of holy fire which I have thus heaped up together do not give life to your prepared and already enkindled spirit, yet they will sometimes help to entertain a thought, to actuate a passion, to employ and hallow a fancy.' हुड याचें सूत्र असें कीं, 'Apothegms form a short cut to much knowledge.' सूक्तींच्या स्वरूपाविषयीं डॉ॰ जॉनसन् म्हणतो, 'The excellence of aphorisms consists not so much in the expression of some rare or abstruse sentiment as in the comprehension of some usful truth in few words.' टायलॉटसन् सूक्तींचा महिमा गातो कीं, 'The little and short sayings of nice and excellent men are of great value like the dust of gold, or the least sparks of diamonds.' प्लुटार्क प्रतिपादितो कीं, 'Apothegms are the most infallible mirror to represent a man truly what he is.'

सूक्तींसंबंधानें पाश्चात्य पंडितांचें काय मत आहे तें वरील उदाहरणां-वरून दिसून येईल; पण तेवढ्यावरून या बाबतींत त्यांना आपण गुरुस्थानीं मानण्याचें कारण नाहीं. कारण इंग्रजी शिक्षणाचा गंधहि ज्यांस नाहीं अशा कांहीं रसज्ञ व विद्याव्यासंगी लोकांनींहि अशा तऱ्हेचे पण निराळ्या वळणाचे केलेले प्रयत्न प्रस्तुत लेखकास माहीत आहेत. फार काय, पण वरील कोटींतहि समाविष्ट होण्यास तो (प्रकृतलेखक) अपात्र असतां, सदर ग्रंथ तयार करण्याचें लहानपणापासून म्हणजे कोणताहि इंग्रजी ग्रंथ वाचण्यापूर्वी, त्याच्या मनांत आलें यास कारण तरी एका ग्रंथकारानें म्हटल्याप्रमाणें 'It is God Himself who speaks to us, when noble thoughts inspire us.' अशी लोकमान्यां-संबंधानें असलेली त्याची भावनाच होय असें त्यास वाटतें व या त्याच्या कल्पनेस पाश्चात्य ग्रंथांची माहिती मुळींच कारण झालेली नाहीं हें येथें अवश्य नमूद करणें जरूर वाटतें.

लोकमान्यांनीं आपल्या चाळीस वर्षांच्या राजकीय चळवळीच्या उद्योगा-बरोबरच श्रीसरस्वती देवीची उपासनाहि कांहीं थोडीथोडकी केलेली नाहीं: तिची विविधता सर्वश्रुतच आहे. या त्यांच्या अगाध वाङ्मयोदधीचें मी माझ्या शक्त्यनुसार अवगाहन करून त्यांतून माझ्या हातीं लागलीं तेवढीं ओजस्वी, संग्राह्य व संस्मरणीय सूक्तींचीं पाणिदार मौक्तिकें गोळा करून त्यांचा हा हार गुंफिला आहे. बोलून चालून हा एक अत्यंत नम्र प्रयत्न आहे. कारण वर म्हटल्याप्रमाणें, लोकमान्यांचें वाङ्मय म्हणजे खरोखर तो एक समुद्र आहे. आणि सागराचा सर्वव्यापी ठाव एकएकटा कोण घेऊं शकणार ? तथापि, निष्ठेनें व आत्मविश्वासपूर्वक केलेल्या या सार्वजनिक सेवेचा गेल्या दोन वर्षांप्रमाणें यंदांहि वार्षिक वृत्तांत कथन करणें हें मी माझें कर्तव्य समजतों.

सदर ग्रंथांत संग्रहित केलेल्या सूक्ति ह्या लोकमान्यांच्या हातचा लेख अगर त्यांचें व्याख्यान अशा जाहीरपणें छापिल्या गेलेल्या मजकुरांतूनच उद्धृत केलेल्या आहेत; खासगी संभाषणांतून अगर अप्रकाशित बाडांतून त्या घेतलेल्या नाहींत हें येथें प्रथम सांगितलें पाहिजे. कारण या बाबतींत मागें एकदां एके प्रसंगीं लिहितांना केसरीकारांनीं दिलेला खालीलप्रमाणें

इषारा मला सर्वांशीं पटलेला होता; म्हणून तो मीं पूर्णपणें अमलांतहि आणिला आहे. केसरीकार म्हणतातः "आठवणी व आख्यायिका कोणी आपल्या स्मरणाप्रमाणें सांगूं शकेल; परंतु 'वचनां'चें (उक्तींचें) क्षेत्र असें अमर्याद नाहीं. लोकमान्य टिळकांचीं भाषणें किंवा लेख आज कोठें ना कोठें छापलेले मिळण्यासारखे असल्यामुळें, तसा कागदोपत्रीं पुरावा ज्या वचनांस आहे तेवढींच वचनें विश्वसनीय व बाकीचीं वचनें स्वतः कितीहि मौल्यवान् असलीं तरी निराधारपणामुळें अविश्वसनीय, अतएव बिनकिंमतीचीं असेंच समजलें पाहिजे." तसेंच दुसरेंहि कारण असें कीं, प्रत्येक सूक्ति जेथून उद्धृत केली तेथील संदर्भहि तिचे खालीं देण्यांत आला आहे. या दोन्ही कारणांमुळें 'नामूलं लिख्यते किंचित्' असें या बाबतींत विधान करण्यास मला मुळींच हरकत वाटत नाहीं. कारण, 'आधारावांचुनि। काय सांगसी कहाणी॥' असें पूर्वींच्या संतांनींहि लिहून ठेविलें आहे हें मी कसें विसरेन?

याप्रमाणें छापील व प्रसिद्ध झालेल्या मजकुरांतूनच जरी सर्व उतारे घेतले असले तरी या मजकुराच्या विश्वसनीयतेविषयीं तारतम्य वाचकांस चालवावें लागेलच. गीतारहस्यासारखे खुद्द लो० टिळकांच्या नांवावर प्रसिद्ध झालेले ग्रंथ व लेख हे या तारतम्यांत पहिल्या प्रतीचे ठरतील, त्या खालोखाल केसरींतील लेख येतील. कारण यांत क्वचित् एखादे ठिकाणीं लोकमान्यांचा नसलेल्या अशा लेखांतील उतारा येण्याचा संभव; याचेहि खालोखाल व्याख्यानें, कारण त्यांत रिपोर्टराचे प्रमाद असण्याचा संभव; व याचेहि खालोखाल आठवणी. कारण आठवणी सांगणाऱ्यांची स्मृति व यथातथ्य वर्णन करण्याचा गुण यांच्या कमजास्त प्रमाणावरच आठवणींत नमूद झालेल्या उक्तींची विश्वसनीयता अवलंबून राहणार हें उघड आहे.

सदर पुस्तकाकरितां वर म्हटल्याप्रमाणें आजवर प्रकाशित झालेलें

पासून, जरी केसरीचे एक उत्पादक म्हणून लोकमान्यांचा केसरीशीं निकट संबंध होता, तरी सन १८८७ सालीं त्यांच्या संपादकत्वाखालीं केसरी सुरू होईपर्यंत त्यांतील त्यांचे लेख कोणते हें समजणें कठीण, म्हणून पहिलीं सात वर्षें सोडून देऊन सन १८८७ ते सन १८९७, १८९९ ते १९०८ व १९१४ ते १९२० या सालांतील त्यांच्या लेखांतून सूक्ति निवडलेल्या आहेत. करितां या बाबतींत येथें दोन शब्द सांगणें जरूर आहे. ही गोष्ट सर्वांच्या परिचयाचीच आहे कीं, ज्या मुदतींत एखादा मनुष्य एखाद्या वर्तमानपत्राचा जाहीर रीतीनें संपादक असतो, त्या मुदतींत त्या वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झालेले सर्व संपादकीय लेख त्यानेंच लिहिलेले असतात असें नाहीं. या नियमान्वयें लोकमान्य हे केसरीचे जाहीर संपादक असलेल्या मुदतींत केसरींत प्रसिद्ध झालेल्या अग्रलेखांतून इतरांनीं लिहिलेलेहि जे अग्रलेख मिसळलेले आहेत ते अर्थातच वगळून, बाकी उरलेल्या खुद्द त्यांच्या लेखांतून, व ते केसरीचे जाहीर संपादक नसतां, वेळोवेळीं त्यांनीं लिहिलेल्या अग्रलेखांतूनहि उक्ति घेण्यांत आलेल्या आहेत. लोकमान्यांचे लेख कोणते हे ठरविण्याचे कामीं लोकमान्यांचे एक लेखक व 'गेलीं आठ वर्षें' या पुस्तकाचे कर्ते श्री० आप्पाजी विष्णु कुलकर्णी यांचें मला बरेंच साह्य झालें हेंहि येथें नमूद केलें पाहिजे. पण इतकें करूनहि कदाचित् चुकून क्वचित् एखादे ठिकाणीं लोकमान्यांचा लेख समजून इतरांच्या लेखाचा उपयोग केला जाण्याचा जसा संभव आहे, तसा तो दुसऱ्याचा लेख समजून ऐनजिनसी मुळांत लोकमान्यांचा लेखच वगळला जाण्याचाहि संभव आहे. अंगावर पडणाऱ्या ह्या जबाबदारीच्या पेंचांतून सुटण्याकरितां 'लो० टिळकांचे केसरींतील लेख भाग १ ला' या ग्रंथास गुरुवर्य तात्यासाहेब केळकर यांनीं लिहिलेल्या मार्मिक व अधिकारपूर्ण प्रस्तावनेंतील त्यांच्या पुढील वाक्यानेंच उत्तर देऊन आपण मुक्त व्हावें हेंच श्रेयस्कर होय. ते म्हणतात, "पण या बाबतींत मुख्य हेतूकडेच लक्ष देऊन किरकोळ चुकांची उपेक्षा करणेंच योग्य होईल. किंवा किंचित् अडमुठेपणा मुद्दाम स्वीकारून आम्हीं असाहि युक्तिवाद कां न करावा कीं, स्वतः जाहीर संपादक असतां, म्हणजे केसरींत आलेले अग्रलेख आपलेच (टिळकांचे) आहेत अशी लोकांची समजूत होण्यासारखी असतां,

जे लेख टिळकांनीं संपादकीय म्हणून स्वीकारले, ते एका अर्थानें त्यांचेच झाले ! 'आपणांसारिखे करिती तात्काळ' किंवा 'लोह परिसा खाया जाये। लोह सुवर्णचि होये।' या अभंग वाणीप्रमाणें केसरींतील अग्रलेखां-संबंधीं लेखकांलेखकांत भेद करणें हें सर्वथा अयोग्यच होईल; म्हणून अशा गोष्टीची वाच्यता करण्याचा कोणाला अधिकार नाहीं, हें जसें कायदेशीर रीतीनें म्हणतां येतें, तसेंच वरील विचारसरणी लक्षांत घेतां मार्मिकतेच्या आग्रहानेंहि तें म्हणतां येईल."

केसरीच्या खालोखाल उक्तिसंग्रहास उपयोगी पडलेला ग्रंथ म्हणजे ग्रंथराज 'गीतारहस्य' हा होय. हा ग्रंथ वाचीत असतां यांतून काय घ्यावें आणि काय न घ्यावें अशी माझी अगदीं बावरल्यासारखी स्थिति होई. आरसेमहालांत बसलेल्यास आंत ठेवलेल्या दिव्याचीं अनंत रूपें आठहि दिशांना दिसावीत तद्वतच हा ग्रंथराज वाचीत असतां मला सर्वत्र उक्तीच उक्ति दिसूं लागाव्यात ! पण अखेर एका विद्वान् सन्मित्राच्या साहाय्यानें व त्याच्या विवेचकपणाच्या कसोटीनें ह्या ग्रंथाचा परामर्श घेतां आला हें लिहिण्यास आनंद वाटतो. बाकीच्या इतर साधन सामुग्रीसंबंधानें विशेष सांगण्यासारखें कांहीं नाहीं. तथापि सुमारें बावीस वर्षांपूर्वीं मायावतीच्या प्रबुद्ध भारतांत लोकमान्यांनीं 'The Path of the soul' या विषयावर लिहिलेला पण आतां दुष्प्राप्य झालेला निबंध मीं मिळविला होता. पण तो निव्वळ शास्त्रीय स्वरूपाचा असल्यामुळें या कामीं त्याचा मला कांहींच उपयोग करून घेतां आला नाहीं.

'सूक्ति-संग्रहा'ची कल्पना मनांत दृढमूल असली तरी तिचें स्वरूप कसें असावें याचा मात्र मनाशीं निश्चय होत नसे. एकदां वाटे, निरनिराळ्या विषयांसंबंधानें लोकमान्यांचे विचार काय आहेत यास प्राधान्य देऊन त्यांचें, बार्नेट स्मिथ यानें तयार केलेल्या 'Thoughts from Gladstone' या ग्रंथासारखें पुस्तक तयार करावें; म्हणजे होमिओपाथिक औषधीप्रमाणें अगदीं सूत्रमय वाक्येंहि नाहींत व मोठे लांबलचक पानेंच्या पानें उतारेहि नाहींत. स्मिथच्या वरील ग्रंथांत वीसपासून फार तर तीसपसतीस ओळींपर्यंत ग्लॅडस्टन साहेबांचे जसे निरनिराळ्या विषयांवरील विचार एकत्र ग्रथित केले आहेत तसे आपण करावे. एकदां वाटे, पुस्तक

अगदीं लहानच कां होईना, पण केवळ सिद्धान्तस्वरूपाचें ए. डब्ल्यू. हॉल यांच्या 'A thousand Flashes of French thought' ह्या पुस्तकाचें आपण अनुकरण करावें. एकदां मनांत येई कीं, 'Beauties of Shakspeare' या ग्रंथाप्रमाणें आपल्या पुस्तकाची मांडणी करावी. पण लोकमान्यांसारख्या युग-प्रवर्तकांच्या अवतारकार्याचें रहस्य लक्षांत आणून, ज्यांच्या एका शब्दाच्या स्फुलिंगानें मनें चेतून तीं कार्यक्षम व्हावीं त्यांच्याविषयींचे निवळ एकेरी घाटाचें पुस्तक न बनवितां, ज्यांत वरील सर्व कल्पनांचा थोड्याबहुत प्रमाणानें समावेश होईल असा आपण प्रयत्न करावा, असें शेवटीं मनानें ठरविलें. म्हणून त्यांचें स्वभाववैशिष्ट्य, त्यांचें मत, त्यांनीं केलेलें सामान्य तत्त्वांचें असामान्य वर्णन, त्यांचे सिद्धान्त, त्यांची भाषा, त्यांचीं तत्त्वें, त्यांचा अधिकार आणि स्फूर्तीनें निघालेले त्यांचे काांहीं संस्मरणीय उद्गार वगैरे अनेक दृष्टींनीं सूक्तींची निवड करण्यांत आली आहे. त्यांत एखादी उक्ति दिसण्यास अगदीं सामान्य अशी असेल, नाहीं असें नाहीं; पण अशा सूक्तींतूनहि लोकमान्यांचें कांहींना कांहीं तरी वैशिष्ट्य भासलें म्हणूनच तिचा संग्रह केला आहे. 'Beauties of Shakspeare' हा ग्रंथ तयार करणारा डब्ल्यू. डॉड यानेंहि या बाबतींत अगदीं अशाच तऱ्हेचे उद्गार काढलेले पहावयास सांपडतात. तो म्हणतोः 'But I have another apology to make, for some passages introduced merely on account of their peculiarity, which to some, possibly, will appear neither sublime nor beautiful, and yet deserve attention, as indicating the vast stretch and sometimes particular turn of the Poet's imagination.'

वास्तविक 'सूक्ती'चें तत्त्वतः स्वरूप पाहिलें तर तें अगदीं अर्थपूर्ण पण सूत्ररूपच असलें पाहिजे. काडीची शक्ति जशी तिच्या गुलांत अगर बंदुकीचें सामर्थ्य जसें तिच्या तोंडांतील अंगुष्ठमान काडतुसांत, तद्वतच सूक्तींचें आहे. खनिजद्रव्यांतून निवडून काढलेले जसे सुवर्णकण, किंवा द्राक्षांच्या घोसांतून वेचून काढलेलीं टपोरीं व शेलकीं द्राक्षें तशाच उक्ति होत. उक्ति म्हणजे हंडाभर दह्याचें मंथन करून निघालेलें नवनीत किंवा

मक्षिकांनीं विविध फुलांतून जमविलेला मधच होत. फार काय, पण सूक्ति ह्या तद्विषयक वाङ्मयाचें अत्तरच होय असें म्हणण्यास हरकत नाहीं. हवेल यांनीं सूक्तीची अशी व्याख्या दिली आहे कीं, 'Sense, shortness and salt are the ingredients of a good maxim.' तसेंच पण्डित जॉन मोर्ले उक्तीचें असें लक्षण बांधतात कीं, 'The essence of aphorism is the compression of a mass of thought and observation into a single saying'. सूक्ति निवडतांना हें धोरण मीं आपल्या डोळ्यांपुढें अढळ ठेविलें होतें. तथापि तें धोरण मजकडून न कळत सुटल्यामुळें व दुसऱ्या अनेक कारणांमुळें मी निवडून काढलेल्या एकंदर सर्व उक्ति वाचून त्यांपैकीं सुमारें दीड हजार उक्ति माझ्या एका विद्वान्, मार्मिक व मेहनती स्नेह्यानें, ग्रंथ-विस्ताराच्या भीतिस्तव, नापसंत म्हणून बाजूस ठेवून देण्यास सांगितलें. तथापि त्या वाचतांना, त्या उद्धृत करितांना व त्यासंबंधानें चिंतन करितांना, कविवर्य गटे याच्या पुढील म्हणण्याप्रमाणेंच त्यांचा केव्हांहि मनावर परिणाम झाल्याखेरीज राहणार नाहीं अशी माझी समजूत आहे. तो म्हणतो, 'We should only utter higher maxims so far as they can benefit the world. The rest we should keep within ourselves, and they will diffuse over our actions a lustre like the mild radiance of a hidden sun.'

चरित्र लिहिण्याचे जसे अनेक प्रकार श्रीयुत तात्यासाहेब केळकर यांनीं लो० टिळक यांच्या चरित्राच्या प्रस्तावनेंत वर्णिलेले आहेत, तसेंच उक्ति निवडण्याचे व त्यांची मांडणी करण्याचेहि अनेक प्रकार होऊं शकतात. कोणास विषयवारी आवडेल, तर कोणास विषयवारीनें वाचणें कंटाळवाणें होतें म्हणून त्या सरमिसळ रीतीनें असणें बरें वाटेल. ऐतिहासिक दृष्टीचा मनुष्य त्यांत कालानुक्रमाची अपेक्षा करील, तर केवळ रसोद्ग्राही पद्धतीच्या मनुष्याची त्यांतील महत्त्वमापनक्रमाकडेच दृष्टि जाईल. तसेंच कोणास शेवटीं सूची असावी असें वाटेल, तर 'कोशास कोणीं कोठें सूची केली आहे का ?' असा कोणी प्रश्न करील. फार काय, पण उगाच प्रत्येक उक्तीच्या मागें क्रमांकाची उपाधी नसावी असें कोणी म्हणेल, तर हे आंकडे सांखळीच्या आडव्या गंधांतील अक्षदीच्या टिकलीप्रमाणें दोन उक्तींच्या

मध्यें घातल्यास फार बरें दिसेल असेंहि कोणास वाटेल. तात्पर्य, अशोकवनिता-न्याय हा कोठेंहि लागूंच पडेल. म्हणून वरील गोष्टींचा ज्यांत अंशतः अंतर्भाव होईल असाच एक नवा प्रकार मीं उपयोजिला आहे. तो म्हणजे चावीच्या दगडानें जशी कमान आधारलेली असते, तसा कोणत्याना कोणत्या एका प्रधान शब्दावर आधारलेल्या प्रत्येक सूक्तींतील सूचक शब्द (Key-word) शोधून, त्यास अध्यक्ष करून (!) म्हणजे तो जाड्या टाइपांत छापून, त्याच्या अक्षरानुक्रमवार सूक्तींची मांडणी केलेली आहे व ही योजना वाचकांस पसंत पडावी अशी कल्पना आहे.

सारांश, आरंभीं म्हटल्याप्रमाणें लोकमान्यांचें वाङ्मय ही पवित्र गंगा असल्यानें, वाटेल त्यानें आपल्या शक्त्यनुसार तिच्यांतील सूक्त्युदकानें आपल्या ग्रंथरूपी गिंड्या भरून त्यांचा सर्व जनतेस लाभ जोडून द्यावा. स्वतःपुरतें बोलावयाचें म्हणजे मी हा प्रयत्न करीत असतां, कदाचित् माझ्या अपात्रतेमुळें, या गिंडींत सूक्तीच्या उदकाबरोबर क्वचित् वाळूचा कण चुकून येण्याचा संभव आहे, म्हणूनच 'Political Aphorisms of Emperor Napoleon' या पुस्तकाच्या आपल्या आत्मनिवेदनांत लियन् कोर्ट यानें 'मीं तयार केलेल्या या पुस्तकांतील सूक्ति सर्व योद्धे, मंत्री आणि तत्त्ववेत्ते यांनीं मुखोद्गत कराव्यात' असें जें फाजील आत्मविश्वासाचें किंबहुना गर्वोक्तीचें विधान केलें आहे, तसें मात्र माझ्यानें करवत नाहीं! शेवटीं आभारप्रदर्शनापूर्वीं, एवढेंच सांगावयाचें कीं, नियोजित अध्यक्षाचे अगोदर जसें एखाद्या स्वागताध्यक्षानेंच आपल्या प्रास्ताविक भाषणानें सर्व वेळ व्यापून टाकावा, तद्वतच या माझ्या लांबलेल्या आत्मनिवेदनाच्या अतिप्रसंगाबद्दल वाचकांनीं मला क्षमा करावी अशी त्यांस माझी विनंति आहे.

खरोखर आभार मानण्यासारखें गोड काम दुसरें कोणतेंहि नसेल. कारण आभार मानणें म्हणजे आपली कृतज्ञता व्यक्त करणें होय; आणि कृतज्ञतेची व्याख्या 'अधिक उपकारांची अपेक्षा' अशी मार्मिक लोक करितात; तेव्हां हे आभार म्हणजे व्याजीं घातलेलें भांडवलच होय, असें कोणी म्हणतील; परंतु तशी भावना मनांत न बाळगतां, केवळ कृतज्ञताबुद्धीनेंच हें काम मी करीत आहें. तें करीत असतांना, प्रथम गुरुवर्य तात्यासाहेब केळकर यांचा निर्देश करणें जरूर आहे. पूर्वीं प्रसिद्ध झालेले

लोकमान्यांच्या 'आठवणी व आख्यायिका' या ग्रंथाचे दोनहि खंड आणि आतां प्रसिद्ध होणारा हा ग्रंथ हे सर्व तात्यासाहेबांच्या कृपेचें, आश्रयाचें व प्रोत्साहनाचें फल होय, एवढें नमूद केलें असतां त्यांच्या उपकारांची कल्पना येणार आहे. त्यानंतर ज्या सन्मित्रांनीं मला या कामीं निरनिराळ्या रूपानें मनःपूर्वक सहाय्य केलें त्यांच्या नांवाचा उल्लेख केल्याखेरीज माझ्यानें राहवत नाहीं. अर्वाचीनकाळच्या वाङ्मययुगांतील ग्रंथरचनेंत प्रस्तावना हें ग्रंथाचें नाक मानलें जातें; किंवा घराची शोभा आंगण राखतें म्हणतात, त्याप्रमाणें ग्रंथाचें स्वरूप प्रस्तावनेवरून कळतें. या दृष्टीनें सदर ग्रंथाचे विद्वान्, मार्मिक, रसिक व 'अधिकारी' प्रस्तावनाकार 'खडे तात्त्विक बोल' बोलणारे श्रीयुत महादेव हरि मोडक, बी. ए. यांनीं प्रकृतीस स्वास्थ्य नसतांहि लिहिलेल्या प्रस्तावनेबद्दल त्यांचे आभार मानावे तेवढे थोडे आहेत. तसेंच केसरी व मराठा पत्रांचे 'मॅनेजर व ट्रस्टी श्रीयुत धोंडोपंत ऊर्फ बाबासाहेब विद्वांस, श्री० काशिनाथ नारायण घारप, बी. ए. एलूएल्.बी. वकील, ठाणें, इतिहाससंशोधक श्री० शंकर नारायण जोशी, न्यू पूना कॉलेजचे माजी फेलो श्री० वामन त्र्यंबक आपटे, बी. ए., टिळक महाविद्यालयाचे आचार्य श्री० विष्णु प्रभाकर लिमये, बी. ए., श्री० सदाशिव केशव भावे, बी. ए., टिळक-वाङ्मय-स्मारक–योजनेच्या बाबतींत उपक्रमापासून माझे सहकारी असलेले मित्र वाङ्मय-विशारद श्री० काशीनाथ नरसिंह ऊर्फ बापूराव केळकर, बी. ए. यांचें मला अनेक प्रकारें साहाय्य झालें आहे व त्याबद्दल मी त्यांचा उपकृत आहें. तसेंच, गुप्त दानाप्रमाणें गुप्त मदत करण्यांत संतोष व भूषण मानणाऱ्या माझ्या एका सगोत्रज, विद्वान् व प्रेमळ 'समोपनामधारी' पदवीधर मित्राचे मी अंतःकरणांतल्या अंतःकरणांत मूक आभार मानीत आहे! लोकमान्यांच्या आठवणींच्या ग्रंथाच्या दोनहि खंडांप्रमाणें याहि पुस्तकाचे कामीं मला कायमचे उपकारबद्ध करणारे 'गीता-बीज'कर्ते श्री० गजानन विश्वनाथ केतकर बी. ए., एल्एल्. बी., उपसंपादक केसरी-मराठा हे होत. श्रीयुत गणपतराव यांनीं हें पुस्तक आपलेंच समजून तें वेळेवर प्रसिद्ध करण्याच्या बाबतींत कळकळीनें, निरलसपणानें व निरपेक्षतेनें जी मेहनत घेतली त्याबद्दल त्यांचे योग्य शब्दानें उतराई होणें कठीण आहे. तथापि माझ्या

शाब्दिक आभारांपेक्षां आपले परमपूज्य मातामह लोकमान्य टिळक यांची ही सेवा आपले हातून घडली याच कल्पनेनें ते आपलें समाधान करून घेतील अशी मला आशा आहें.

'विजय' प्रेसचे उत्साही, मुद्रणकलाभिज्ञ व कार्यदक्ष मालक श्रीयुत अप्पासाहेब गोखले यांच्या सर्वसाधारण मुद्रण-विषयक सल्ल्याबद्दल व त्यांनीं वचन दिल्याप्रमाणें वेळेवर पुस्तक तयार करून दिल्याबद्दल मी त्यांचा फार फार आभारी आहें.

टिळक-जयन्ति
शके १८४८
केसरी कचेरी, पुणें.

सर्वांचा नम्र सेवक
**सदाशिव विनायक बापट**

# 'टिळक-सूक्ति-संग्रहां'तील संक्षिप्त चिन्हांचा खुलासा व संक्षिप्त चिन्हांनीं दाखविलेल्या आधारभूत ग्रंथां-बद्दल वर्णानुक्रमवार माहिती.

| | |
|---|---|
| **अ०** | अधिकारविभागणी कमिशन पुढील लो० टिळक यांची साक्ष; ( १९०८च्या खटल्याचें पुस्तक. प्रकाशक म. ना. कवडे ). |
| **आ० आ०** | लो० टिळक यांच्या आठवणी व आख्यायिका–खंड १ ला आवृत्ति १ ली व खंड २ रा, स. वि. बापटकृत. खंड व पान या क्रमानें आंकडे आहेत. |
| **आ० व०** | लो० टिळक यांचीं गेलीं आठ वर्षें–भाग १ व २, आ. वि. कुळकर्णीकृत. आंकडे पानांचे आहेत. |
| **ई०** | ईशगुणादर्श; ( विष्णुसहस्रनाम ) डॉ० ग. कृ. गर्देकृत. या पुस्तकाची प्रस्तावना. आंकडे पानांचे आहेत. |
| **कां० जा०** | कॉंग्रेस-लोकशाहीपक्षाचा जाहीरनामा. |
| **के०** | केसरीच्या फायली. सन, अंक, पान, रकाना या क्रमानें आंकडे आहेत. |
| **के० ले०** | लो० टिळकांचे केसरींतील लेख–भाग १ व २. प्रकाशक, केसरी-मराठा संस्था. भाग व पान या क्रमानें आंकडे आहेत. |
| **ख०** | लो० बाळ गंगाधर टिळक यांच्यावरील १९०८ सालचा राजद्रोहाचा खटला. प्रकाशक, म. ना. कवडे. |
| **गां०** | महात्मा गांधींचें चरित्र. सौ० अवंतिकाबाई गोखलेकृत. या पुस्तकाची प्रस्तावना. आंकडे पानांचे आहेत. |
| **गी०** | श्रीभगवद्गीतारहस्य अथवा कर्मयोगशास्त्र, प्रथमावृत्ति, बा. गं. टिळककृत. आंकडे पानांचे आहेत. |

| | |
|---|---|
| च० | लो० टिळक यांचें चरित्र—भाग १ ला. न. चिं०केळकरकृत. आंकडे पानांचे आहेत. |
| चरि० | लो०बा. गं. टिळक-चरित्र; गं. कृ. लेले व वा. त्र्यं. आपटेकृत. |
| च० सु० | लो० चरितसुधा. ता. ने. पांगळकृत. आंकडे पानांचे आहेत. |
| चि० ज० | 'चित्रमय जगत्' जानेवारी १९१५च्या अंकांतील 'हिंदुधर्माचें स्वरूपलक्षण' हा निबंध. आंकडे पानांचे आहेत. |
| ज० | लो० टिळक यांजवरील जमानतीचा खटला (१९१६) दा. वि. गोखलेकृत. |
| धा० | लो० टिळक यांचीं धार्मिक मतें; प्रकाशक--टिळक स्मारक ट्रस्ट. आंकडे पांनाचे आहेत. |
| प० | पहिलें कीर्तनसंमेलन. प्रकाशक—पं. य. दि. ब्रह्मनाळकर. आंकडे पानांचे आहेत. |
| भा० | भारतीय युद्ध—द. गो. लिमयेकृत. या पुस्तकाची प्रस्तावना. |
| विष्णु० | विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचें चरित्र—वि. म. भुस्कुटेकृत यांतील लोकमान्यांचा निबंध. आंकडे पानांचे आहेत. |
| विश्व० | 'विश्ववृत्त' मासिकाच्या एप्रिल १९०६ च्या अंकांतील 'आशेची निराशा आणि निराशेची आशा' हा निबंध. आंकडे पानांचे आहेत. |
| व्या० | लो० टिळक यांचीं व्याख्यानें—भाग १ व २. स. ह. भावेकृत. भाग व पान या क्रमानें आंकडे आहेत. |
| स्व० गी० | स्वराज्य गीतारहस्य—आंकडे पानांचे आहेत. |
| स्व० मो० | स्वराज्याची मोहीम—भाग १ ते ४. अ. ह. गद्रेकृत. भाग व पान या क्रमानें आंकडे आहेत. |

| | |
|---|---|
| **A.** | The Arctic Home in the Vedas. |
| **D.** | Demands of the Indian National Congress as presented to the Joint Select Committee of the Parliament on the Govt. of India Bill. |
| **Introd.** | Introduction to Samskarmimansa by Prof. Kinjavadekar Shastri. |
| **L.** | The life of Lok. Tilak by D. V. Athalye. |
| **L. P.** | Letter Sent to the Peace Conference held at Verselis. |
| **M.** | Mahratta. |
| **O.** | Orion. |
| **P. L.** | Private letter sent from England to Mr Gokhale which is published in the specia Number of the Daily 'Lokamanya' of Bombay. |
| **Q. J.** | Poona Sarvajanik Sabha-quarterly Journal. Three Numbers:-July 1917; April 1918 and July 1919. |
| **R.** | Resignation of the Lifemembership of the Deccan Education Society, Poona. |
| **R. M.** | Reminiscences of Lokamanya Tilak, Parts 1 and 2. ( Marthi ) |
| **Rep.** | Reports of the Indian Home Rule League 1916-17 1917-18 and 1920. |
| **S. B.** | Tilak's Speeches Published by H. R. Bhagwat. |
| **S. I.** | Speeches of Srj. B. G. Tilak; Published byt he Indian Stores, Bellary. |
| **S. S.** | Tilak's Speeches. Edited by R. R. Srivastava. |
| **S. T.** | Tilak's speeches. Edited by R. Thirumalai and Co. Madras. |

**T. C.** Tilak-V-Chirol. Printed by V. P. Pendherkar, Bombay.

**T. P.** Tilak-Paranjpe Controversy. Published by T. A. Kulkarni; Bombay.

**V. C.** Vedic Chronology and Vedanga Jyotisha.

**W. S.** Bal Gangadhar Tilak. His writings and speeches. Published by Ganesh and Co., Madras.

# लोकमान्य
# टिळक-सूक्ति-संग्रह

**श्रीमद्भगवद्गीता** हा आमच्या धर्मग्रंथांपैकीं एक अत्यंत तेजस्वी व निर्मल हिरा आहे.

—गी० १

२

मनाला व्यामोह होऊन कर्तव्याची दिङ्मूढता आली असतांना आणि अंतःकरण अस्वस्थ झालें असतां धर्मबुद्धि जागृत ठेवून कर्तव्याची योग्य दिशा दाखविणारा ग्रंथ जगाच्या वाङ्मयांत **श्रीमद्भगवद्गीता** हाच एक होय.

—के० १९०२-३-२-२

३

तारुण्याची तरतरी व जोम आहे तोंपर्यंत सर्व ठीक; पण संसारांत पडून अडचणी उभ्या राहिल्यावर मनाची होणारी चलबिचल **श्रीमद्भगवद्गीतेंतल्या** उपदेशामृतानें नाहींशी होईल. —के० १९०२-३-२-४

४

तुकारामबुवा जरी संसारी होते तरी त्यांचा कल थोडासा कर्मत्यागाकडेच होता. म्हणून उत्कटभक्ति आणि त्याबरोबरच आमरणान्त ईश्वरार्पणपूर्वक निष्काम कर्म असें जें प्रवृत्तिपर भागवतधर्माचें लक्षण किंवा गीतेचा सिद्धान्त त्याचा पूर्ण खुलासा कोणास पाहिजे असल्यास तुकारामबोवांनींच शिवाजी महाराजांस ज्या 'सद्‌गुरूस शरण' जाण्यास सांगितलें त्या **श्रीरामदास** स्वामींच्या दासबोध ग्रंथाकडेच त्यानें वळलें पाहिजे.

—गी० ४३४

५

**श्रीरामदासांनीं** मनुष्य जातींतील स्त्रीबरोबर जरी लग्न केलें नाहीं तरी त्यांचें आत्म्याशीं लग्न झालें होतें. केवळ त्यांच्या कुडींतील आत्म्याशींच नव्हे तर प्रत्येकाच्या शरीरांतील आत्म्याशीं लग्न झालें होतें. —व्या० २.२१

६

धर्म व राजकारण दोन नाहींत असेंच **श्रीरामदासांनीं** शिकविलें.

—धा० २२६

७

ऐहिक सुखाची निवृत्ति होऊन परमार्थाकडे लय लागलेल्या साधुसंतांची प्रत्यक्ष कृति जरी आपल्या नजरेस येत नाहीं तरी त्यांचें अस्तित्व हीच एक मोठी जागृति आहे. त्यांची निरपेक्षता, त्यांचा स्वार्थत्याग, त्यांचें दयालुत्व इत्यादि गोष्टीच इतर मनुष्यांचे ठिकाणीं स्वधर्म व स्वकर्म आचरण्याची प्रवृत्ति करतात. **श्रीरामदासांनीं** जें कार्य केलें त्याला ज्ञानदेवादि पूर्वींच्या संतांचाच पाठिंबा होता ही गोष्ट विसरतां कामा नये.

—आ० व० २७८

८

आपल्या थोर पूर्वजांस विसरून जाऊन कोणतेंही राष्ट्र उदयास आलें नाहीं व येणेंही शक्य नाहीं, असा जो सर्वसामान्य ऐतिहासिक सिद्धान्त आहे याचेंच **श्रीशिवजयंत्युत्सवा**सारखे उत्सव हें दृश्य स्वरूप होय.

—के० ले० २-२३२

९

स्वभाषेची अभिवृद्धि स्वराष्ट्राच्या इतिहासाचा स्वकीय दृष्टीनें अभ्यास, मनन व स्वधर्मश्रद्धा इत्यादि गोष्टी जशा राष्ट्राच्या उत्कर्षाला कारणीभूत होतात त्यांतलाच **श्रीशिवजयंत्युत्सवा**सारख्या उत्सवाचा प्रकार होय. हे उत्सव कांहीं विवक्षित हक्क मिळविण्याकरितां किंवा विशिष्ट सद्यःफलप्राप्ती मिळविण्याकरितां करीत नसतात. वैद्यशास्त्रांतील दृष्टान्त घ्यावयाचा असल्यास असल्या उत्सवांची गणना ताप, खोकला, दमा वगैरे रोगांवरील औषधांत न करितां सामान्य आयुर्वर्धक किंवा शक्तिवर्धक उपायांत करावी लागेल.

—के० ले० २.२३२

१०

महाराष्ट्रांतील निरनिराळ्या जातींचें प्रेम एकाच ठिकाणीं बसण्यासारखें जर कोणतेंही स्थल असेल तर तें **श्रीशिवछत्रपतींचें** चरित्र हेंच होय.

—के० ले० १-५३२

११

श्रीमच्छंकराचार्य व तदनंतरची त्यांची प्रतापी शिष्यपरंपरा यांनीं हिंदुधर्मा-वर जे उपकार करून ठेविले आहेत, तेच उपकार **श्रीशिवाजीमहाराज** व त्यांचे अनुयायी यांनीं सर्व हिंदुमात्रांवर करून ठेवले आहेत.

—के० १९०२-२४-४-५

१२

रामदास आदिकरून साधुसंतांच्या आशीर्वादानें व कृपासाहाय्यानें एक विचारानें भरलेल्या महाराष्ट्र-मंडळांतील निरनिराळ्या टोळ्यांस गनिमी काव्याच्या पद्धतीनें, विजापुराविरुद्ध हलावयास लावून अखेरीस सर्वांची संघशक्ति निर्माण करून **श्रीशिवाजी महाराजांनीं** स्वराज्याची स्थापना केली.

—के० १९०२-३१-४-४

१३

हिंदुस्थानासारख्या गतप्राण झालेल्या देशांत **श्रीशिवाजी महाराजां**-सारख्या विभूतींची आठवण जितकी अधिक वेळां व सर्वतोमुखीं होईल तितकी अत्यंत श्रेयस्कर आहे.

—के० १९०२-१६-४-५

१४

**श्रीशिवाजीमहाराजांचे** नांवांत जितकी जादू भरली आहे, तितकी जादू महाराष्ट्रांतील दुसऱ्या कोणत्याही राजकारणी पुरुषाच्या नांवांत भरलेली नाहीं.

—के० १९०२-१५-४-५

१५

समान शस्त्रें, लोकांची पूर्ण मदत, व डोंगर, किल्ले आणि जंगल यांचा पूर्ण पाठिंबा, इतकी सिद्धता असल्यावर गनिमी काव्यानें स्वराज्य स्थापितां येतें, ही गोष्ट हिंदुस्थानचे इतिहासांत **श्रीशिवाजीमहाराजांचे** प्रथम लक्षांत आली.

—के० १९०२-३१-४-४

१६

अलीकडे झालेल्या **श्रीशिवाजीमहाराजां**सारख्या वैदिकधर्मीय कर्त्या पुरुषाच्या अंगांत, त्याच्या परम उत्कर्षाच्या वेळींहि परधर्मासहिष्णुता हा दोष आढळून येत नव्हता, हें 'देव भावाचा भुकेला', प्रतीकाचा नव्हे, या तत्त्वाचेंच फल आहे.

—गी० ४२१

१७

ज्याच्या अंगांत माणुसकी वास करीत आहे, त्यास **श्रीशिवाजीमहाराजांच्या** स्मारकाबद्दल आस्था वाटेलच; पण ज्याचा महाराष्ट्रकुलांत जन्म झाला आहे, त्यास तर असल्या कृत्याबद्दल विशेष अभिमान, आस्था, कळकळ किंवा भक्ति असणें हें त्याचें कुलव्रतच होय. —के०ले० १-४६४

१८

पुरेशी तयारी झाल्यावांचून लढाईला तयार होणारे सेनापती आरंभीं स्वतां धैर्याचे पुतळे ठरतील; पण त्यांना त्या लढाईत अपयश आल्यास राष्ट्राला मागें खेंचण्याच्या पापाचे धनी होऊन बसावें लागतें हें विसरूं नका! म्हणून ताणावें; पण तुटणार नाहीं हें पहात असावें. प्रतापसिंहापेक्षां **श्रीशिवाजीमहाराजांचा** हाच विशेष होता. —आ० आ० २-३८

१९

**श्रीशिवाजी महाराजांची** 'गोब्राह्मण-प्रतिपालक' म्हणून ख्याती आहे. पण विचार करा कीं, त्यांनीं काय गोशाळा स्थापन केल्या होत्या कीं, ब्राह्मणभोजनें सुरू केलीं होतीं? यांपैकीं कोणतीही गोष्ट न करतांही शिवाजी महाराजांस 'गोब्राह्मण-प्रतिपालक' असें म्हणतात, यांतील मर्म काय? देशाची उन्नति करणें यासारखें दुसरें कोणतेंही गोरक्षण नाहीं हें त्यांतील मर्म होय. —आ० आ० १-१५३

२०

धैर्यानें, उमेदीनें, उत्साहानें, निष्काम कर्मानें राष्ट्राला जें तेज येतें, त्याचें प्रत्यक्ष उदाहरण म्हणजेच **श्रीशिवाजीमहाराजांचें** चरित्र होय.

—के० १९१६-१९-७-२

२१

स्वदेशबंधूंस गुलामगिरी व धर्मछळ यांतून मुक्त करणाऱ्या **श्रीशिवाजीमहाराजांची** योग्यता, दुसऱ्या देशांतील लोकांस गुलाम करून त्यांवर अंमल चालविणाऱ्या लोकांस कोठून समजणार?—के० १९०२-२६-५-४

२२

**श्रीशिवाजीमहाराजांचें** स्मारक आम्ही मोठ्या कळकळीनें व भक्तीनें कां करावें, याबद्दल बलवत्तर कारण म्हटलें म्हणजे आमची, आमच्या राष्ट्राच्या अभ्युदयाचा पाया घालणाऱ्या गृहस्थाबद्दलची कृतज्ञताबुद्धि ही होय. —के० ले० १-४६४

२३

महत्त्वाकांक्षा **कोठवर** न्यावी, स्वतंत्रतेचा प्रयत्न किती करावा, याचा विचार आपण दोन–तीनशें वर्षांपूर्वीच्या **श्रीशिवाजीमहाराजांच्या** चरित्रापासून करावा. —व्या० २-१०६

२४

राजनीतीला धर्मातून अजीबात फांटा मिळण्याची कल्पना अलीकडची आहे. **श्रीशिवाजीमहाराजांची** राष्ट्रीयता अशी फारकत करून बाहेर पडलेली नाहीं. धर्म हा तिचा पोषक होता. परंतु महाराजांचा हेतु कोणताही मानला, तरी त्यामुळें राष्ट्रोदय व राष्ट्रोन्नति खरोखरी झाली, हें प्रत्येकास मान्य आहे. —आ० व० ३६२

२५

**श्रीशिवाजीमहाराजांचा** अभ्युदय म्हणजे मराठी भाषेचा अभ्युदय असें म्हणण्यास हरकत नाहीं. —के० १९०६-२३-४-३

२६

**श्रीशंकराचार्यांच्या** ग्रंथांतून कर्मसंन्यासपक्षच जरी प्रतिपाद्य असला, तरी ज्ञानी पुरुषांनीं व संन्याशांनींही यथाधिकार धर्मसंस्थापनेसारखीं लोकसंग्रहाचीं कामें करण्यास त्यांची हरकत नव्हती, असें खुद्द त्यांचेंच चरित्र साक्ष देत आहे. —गी० ४९६

२७

मार्गातील अनेक **अडचणी** बाजूला सारून जो पुढें पाऊल टाकतो त्यालाच यश मिळतें. अलीकडच्या तीरावर बसून जो नुसता संकल्प करतो, त्याला यश मिळावयाचें नाहीं. --आ० व० ३९८

२८

भित्र्या माणसास ज्याप्रमाणें अंधेरांत भुतें नाचलेलीं दिसतात, त्याच-प्रमाणें निरुद्योगी व निरुत्साही माणसाचे वाटेंत **अडचणींचे** डोंगर नेहमीं उभे असावयाचेच. —के० ले० २-५५७

२९

स्वराज्याचे हक्क प्राप्त करून घेण्याची इच्छा जितकी कायदेशीर आहे, तितकेच **अडवणुकीचे** मार्गही कायदेशीर आहेत.—के० १९०७-३४-४-४

३०

लोकांच्या मनांत डांचत असलेला कोणताही प्रश्न राजकारणाचा प्रश्न होऊन तो सोडविण्यास मुत्सद्द्यांना भाग पाडावयाचें असल्यास, लोकांनीं **अडवणुकीच्याच मार्गाला** लागलें पाहिजे. —के० १९०७-४१-४-४

३१

**अतिपरिचयानें** चांगल्याच्या चांगुलपणाचा देखील कंटाळा येत असतो; आणि सांवलींत विश्रांति घेणाऱ्या माणसास कांहीं वेळ तरी उन्हांत जाऊन बसावेंसें वाटतें. —के० १९०७-९-४-५

३२

**अद्वैतवाद** मुख्य मानून, निर्गुण ब्रह्म सगुण होतांना मात्र तेवढ्यापुरती मायिक द्वैताची स्थिति प्राप्त झाल्यासारखी दिसते, असें मानिल्यानें सर्व वचनांची जशी व्यवस्था लागते, तशी व्यवस्था द्वैतपक्ष प्रधान मानून लागत नाहीं. —गी० २३२

३३

आत्मौपम्यबुद्धीचें जें नीतितत्त्व गीतेंत सांगितलें आहे, त्याची पुरी उपपत्तिहि **अद्वैताखेरीज** दुसऱ्या प्रकारच्या वेदान्तदृष्टीनें लागत नाहीं. —गी० २३३

३४

एकंदर उपनिषदांचा बराच भाग कापून काढिल्याखेरीज किंवा जाणून बुजून त्याकडे दुर्लक्ष केल्याखेरीज, उपनिषच्छास्त्राचें **अद्वैताशिवाय** दुसरें कांहीं रहस्य आहे, असें दाखवितां येणें शक्य नाहीं. —गी० २३३

३५

**अद्वैतसिद्धान्ताचा** व भौतिकशास्त्रांचा विरोध तर नाहींच; पण उपकार्योपकारक भाव आहे. —के० १८९३-१३-३-१

३६

ज्या बाबतींत आपला **अधिकार** नाहीं, ती अमक्या प्रकारें घडून आली पाहिजे अशी आशा करणें हें वेडेपणाचें लक्षण होय. —गी० ११४

३७

ज्यास पूर्वपुण्याईनें म्हणा अगर नशिबानें म्हणा, मनुष्यमात्रावर **अधिकार** चालविण्याचीं वस्त्रें मिळतात, त्यानें बोलण्याचा जितका प्रसंग टाळवेल तितका टाळावा असा साधारण नियम आहे.

—के० १८९४-४३-३-१

३८

**अधिकाराचा लोभ** अत्यंत कठीण आहे; मग अधिकारीवर्ग स्वजातीय असो अथवा परकीय असो. —के० १९०७-२३-४-२

३९

मनुष्य कितीही शहाणा असला तरी **अधिकाराचे** चष्मे त्याच्या डोळ्यास लागल्यावर त्याला पूर्वींचेंच जग निराळ्या रंगाचें दिसूं लागतें.

—के० १९१६-२९-४-१

४०

इंग्रज लोक किंवा **अधिकारी** राज्य कायम होईपर्यंत जसे वागत असत तसे आतां वागत नाहींत. त्यांचा स्वभाव मनुष्यस्वभावाहून कांहीं निराळा नाहीं. कित्येक वेळां नखें बाहेर दाखविणें फायद्याचें नसतें. परंतु एकदां कार्यसिद्धि झाली म्हणजे पांघरूण काढून टाकण्यास कांहीं हरकत रहात नाहीं. युरोपियन अधिकाऱ्यांची स्थिति अशा प्रकारची झाली आहे. —के० ले० २-२०२

४१

खालील **अधिकारी** हेच सरकारचे नेत्र होत. पण हे नेत्र पुष्कळदां बिघडलेले असतात हें जरी निर्विवाद आहे, तरी तें सिद्ध करण्याचा बोजा रयतेच्या तर्फे भांडणाऱ्या लोकांवरच येऊन पडतो.—के० ले० २-२०८

४२

**अधिकारी** दौऱ्यावर गेल्यानें त्यांस रयतेची अधिक माहिती होते व लोकनियुक्त सभासदांपेक्षां रयतेची खरी कळकळ ते अधिक बाळगतात असें प्रतिपादन करणें म्हणजे खेडेगांवांतून सदैव संचार करणाऱ्या वायूस शेतकऱ्याची स्थिति खुद्द शेतकऱ्यापेक्षांही अधिक चांगल्या रीतीनें समजते असें म्हणण्याइतकेंच उपहासास्पद आहे. —के० ले० २-२८४

४३

सार्वजनिक शांतता ही एक अमोलिक चीज आहे, आणि ही शांतता असल्याखेरीज कोणत्याही राजकीय हक्काची वाढ होणें शक्य नाहीं हें तत्त्वही सर्वमान्य आहे. पण सरकारी **अधिकारी** शांततेच्या सबबीवर जेव्हां राष्ट्राच्या प्रगतीच्या विरुद्ध कांहीं गोष्ट करण्यास उद्युक्त होतात, तेव्हां त्यांच्या कृत्याबद्दल लोकांच्या मनांत गैरविश्वास उत्पन्न झाल्याखेरीज रहात नाहीं. —के० १९१६-२९-४-२

४४

मक्त्यानें दिलेल्या एखाद्या लग्नांत निरनिराळ्या समारंभाचे वेळीं लागणारे अहेर व मानपान, मक्तेदार व्याही ज्याप्रमाणें एका हातानें पुढें करतो व दुसऱ्या हातानें परत घेतो त्याचप्रमाणें इंग्रजी राज्यांत सुटी व सवलती या एक **अधिकारीवर्ग** देतो व दुसरा युक्तीनें काढून घेतो.

—के० १९०४-५०-५-२

४५

आपण ज्यांच्यावर अधिकार चालवितों त्यांस शहाणे करून अखेर सदर अधिकार त्यांच्या हातून चालविणें हेंच **अधिकारीवर्गाचें** उच्च ध्येय असलें पाहिजे आणि तत्सिध्यर्थ स्वतःचे अधिकार सोडण्यासाठीं जो स्वार्थत्याग करावा लागणार तो करण्यास वेळेवर नजर देऊन तयार असणें यांतच त्यांचें खरें शहाणपण आहे. —के० १९१६-४५-४-४

४६

मनुष्य कसाही असो, अधिकारासनाचा गुणच असा आहे कीं, त्यावर आरूढ झालेल्या लोकांस स्वतःची सत्ता अबाधित असावी अशी बुद्धि उत्पन्न होत असते; आणि यांचें नियमन होण्याकरितां सुधारलेल्या राष्ट्रांतून **अधिकारीवर्गास** लोकांस जबाबदार धरण्यांत येत असते.

के० १९१६-४५-४-३

४७

खालील **अधिकाऱ्यांकडून** कधीं कधीं दांडगाई होते हें आम्हांला माहीत आहे. पण ही दांडगाई आम्ही करूं देतों म्हणून होते हें तत्व आम्ही लक्षांत ठेविलें पाहिजे. —के० ले० १-५८०

४८

**अधिकाऱ्यांनीं** आपल्या जुलमी कारकीर्दीचा लोकांना अतिपरिचय होऊं न देणें हें त्यांच्या अप्पलपोटेपणाच्या दृष्टीनेंही अत्यंत आवश्यक आहे. —के० १९०६-२६-५-१

४९

सर्व संकल्पाचा दाता अव्यक्त परमेश्वर वास्तविक सगुण असून उपनिषदांत व गीतेंत निर्गुण स्वरूपाचें जें वर्णन आहे तें अतिशयोक्तीचें किंवा उगाच प्रशंसापर आहे असें म्हणणें म्हणजे **अध्यात्मशास्त्राच्या** मूळ पायावरच घाव घालणें होय. गी० २०६

५०

आधिभौतिक शास्त्रांच्या युक्त्यांनीं इंद्रियांस गोचर होणारा अतिसूक्ष्म किंवा अत्यंत दूरचा पदार्थ घ्या, तें सर्व दिक्कालादि नियमांच्या कैदेंत पडलेलें नामरूपात्मक जग आहे; खरा परमेश्वर त्यांत असूनहि त्यांहून निराळा आणि त्यांपेक्षां जास्त व्यापक, एकजिनसी व नामरूपाच्या पाशांत न गुंतलेला अतएव स्वतंत्र असल्यामुळें केवळ नामरूपांचाच विचार करणाऱ्या अधिभौतिक शास्त्रांच्या युक्त्या किंवा साधनें हल्लींपेक्षां शतपट सूक्ष्म किंवा प्रगल्भ झालीं तरी जगाच्या मूळ 'अमृततत्त्वाचा' त्यांनीं पत्ता लागणें शक्य नाहीं. तें अविनाशी, अविकार्य व अमृत तत्त्व **अध्यात्मशास्त्राच्या** ज्ञानमार्गानेंच अखेर शोधिलें पाहिजे. —गी० २४५

५१

**अध्यात्मशास्त्रांत** केवळ बुद्धीच्या साह्यानें कोणतेंहि एकच अनुमान निश्चित करितां येत नाहीं, आत्मप्रतीतीची त्याला नेहमीं जोड असली पाहिजे. आधिभौतिक शास्त्रांतही अनुभव आधीं येऊन त्याची उपपत्ति मागाहून कळते किंवा शोधून काढितात. —गी० २२४

५२

कोणत्याही शास्त्राची माहिती करून घेण्याची एखाद्यास जर पूर्वी इच्छा नसेल तर तो तें शास्त्र शिकण्यास अनधिकारी होतो; आणि अशा **अनाधिकारी** पुरुषास तें शास्त्र सांगणें म्हणजे पालथ्या घागरीवर पाणी ओतण्यासारखें आहे. —गी० ५२

५३

सामान्यतः पाहिलें तर आपल्या हातांतील **अनियंत्रित सत्ता** गमावण्यास कोणीहि झाला तरी नाखूषच असणार; आणि गमावण्याची वेळ आल्यास ती टाळण्यास किंवा निदानपक्षीं आजचें मरण उद्यांवर ढकलण्यास तो कधींहि मागें घेणार नाहीं. —के० १९१७-२५-४-१

५४

**अनीतीनें** आणि त्यांतही उघड उघड अनीतीनें आजपर्यंत कोणीहि तरला नाहीं. के० १८९६-२२-३-२

५५

एखादें महत्कृत्य शेवटास नेण्यासाठीं शिवाजी-नेपोलियन सारखे महात्मे जीं जीं कृत्यें करतात तीं सर्वच सामान्य नीतीच्या दृष्टीनें योग्य असतात असें नाहीं; यासाठीं त्यांचें जें **अनुकरण** करावयाचें तें सर्वांनीच आपलें सामर्थ्य न पाहतां, सर्वस्वीं व सर्व बाबतींत करूं पाहणें केव्हांहि योग्य अथवा श्रेयस्कर होणार नाहीं. —के० १९०१-२३-३-४

५६

मनुष्याच्या अंतःकरणांतील विचार कधीं कधीं झोंपेंत व वेडेपणांतच बाहेर पडत असतात असा **अनुभव** आहे. —के० ले० २.२०५

५७

चुकीचा **अनुभव** आला तरच शहाणपणा येतो. एका कवीनें म्हटलें आहे कीं, परमेश्वर जग निर्माण करण्यांत चुकला. आम्हांला चुक्या करून शहाणें व्हावयाचें आहे ! —स्व. गी० १०

५८

**अनुभवानें** व ज्ञानानें चित्ताला एक प्रकारचें स्थैर्य येत असतें.
—च० ४४१

५९

आपल्या **अनुयायांचें मत** घेऊन तदनुसारच नवीन " चाल " चालू करणें हा आमचा क्रम आहे. —आ. आ. १-१३९

६०

**अन्याय** घडतात तेव्हांच देशाची स्थिति सुधारण्यास आरंभ होतो.
—के० १९०७-२१-४-५

६१

माझ्या २५।३० वर्षांच्या अनुभवांत **अपयश** इतकें अंगवळणीं पडून गेलेलें आहे कीं, यापुढें जर कांहीं चमत्कार होऊन माझ्या प्रयत्नांना यश येऊं लागलें, तर मला अगदीं चुकल्या चुकल्यासारखें होईल.
—आ० आ० १-९०

६२

**अर्ज** करणाराचें दरबारांत वजन असेल तर अर्ज करण्यांत फायदा; नाहींतर हजारों अर्ज केले काय आणि न केले काय सारखेच.
—आ० व० ४२७

६३

मनुष्याच्या मनाची स्वाभाविक रचनाच अशी आहे कीं; सगुण वस्तुपैकीं सुद्धां जी वस्तु **अव्यक्त** म्हणजे कोणताच विशिष्ट आकार, गंध वगैरे नसल्यामुळें नेत्रादि इंद्रियांस अगोचर असत्ये तिच्यावर प्रेम ठेवणें, अगर तिच्या नित्य चिंतनानें मन तिच्या ठायीं स्थिर करून वृत्ति तदाकार करणें मनुष्यास अत्यंत कठीण किंबहुना दुःसाध्य होतें. —गी० ४१०

६४

**असंतोष** हा सर्व भावी उत्कर्षाचें, प्रयत्नाचें, ऐश्वर्याचें व मोक्षाचेंही बीज आहे; आणि हा असंतोष जर आपण सर्वांशीं नष्ट केला तर या जगांत व परलोकींहि आपली धडगत लागणार नाहीं हें प्रत्येकानें नेहमीं लक्षांत ठेविलें पाहिजे. —गी० १०९

६५

यशःप्राप्तीला **असंतोष** हें साधन आहे, संतुष्ट मनुष्य राजकारणांत निरुपयोगी आहे. —के० १९२०-१०-२.४

६६

असंतोष म्हणजे नुसती हांव अगर रडवेपणा असा अर्थ नव्हे. हा असंतोष शास्त्रकारांनींहि गर्ह्य मानिला आहे. पण आपणांस प्राप्त झालेल्या स्थितींतच कुजत न राहतां, तींत यथाशक्ति शांत व सम चित्तानें उत्तरोत्तर अधिक सुधारणा करीत राहून, ती शक्य तेवढ्या उत्तमावस्थेस आणण्याची जी इच्छा, तिला मूलभूत होणारा जो **असंतोष** तो कधींच गर्ह्य मानितां येत नाहीं. चातुर्वर्ण्यानें बांधलेल्या समजांत ब्राह्मणांनीं ज्ञानाची, क्षत्रियांनीं ऐश्वर्याची आणि वैश्यांनीं धनधान्याची अशा प्रकारची इच्छा अगर वासना जर सोडिली, तर तो समाज लवकरच अधोगतीस जाईल हें सांगावयास नको. —गी० १०८

६७

हिंदुस्थानांतील **असंतोष** हा ब्रिटिश जनतेविरुद्ध नसून गेल्या १५० वर्षांतील जुलमी सत्तेचा तो नैसर्गिक परिणाम आहे.

—के० १९१९-३१-२-१

६८

राजा किंवा त्याचा अधिकारीवर्ग कितीही जुलमी असला, तरी अखेरीस प्रजेच्या **असंतोषापुढें** त्यास हात टेंकण्याची पाळी येते.

—के० १९०५-४७-४-४

६९

अंतःकरणेंच जेथें जळत आहेत तेथें **असंतोषाग्नीच्या** ज्वाला बाहेर पडण्याचें एखाद दुसरें, किंबहुना सर्व द्वारें, बंद केल्यानें कांहीं उपयोग व्हावयाचा नाहीं. —के० १९०६-८-४-४

७०

राष्ट्राचें आत्यंतिक कल्याण होत असेल, तर मी **अस्पृश्यवर्गा**बरोबर सर्व व्यवहार करण्यास तयार आहें. शिवाजीच्या वेळीं कित्येक ब्राह्मणांनीं अशा रीतीनें आपला स्वार्थत्याग दर्शविला आहे. —के० १९२०-१०-५-५

७१

**अस्पृश्यता** ही वैदिक धर्मास संमत नाहीं. —घा० १२६.

७२

**अस्पृश्यता** गेली पाहिजे असेंच माझें मत आहे. ही रुढि आहे, ही नष्ट झालीच पाहिजे —घा० ६९

७७

सांख्य व वेदान्त या दोन्ही शास्त्रांप्रमाणें शोक करणें जर व्यर्थ ठरतें, आणि आत्मा अनित्य आहे असें मानिलें तरीहि जर हीच गोष्ट सिद्ध होत्ये, तर मग लोक मृत्यूबद्दल शोक कां करितात? आत्मस्वरूपाबद्दलचें **अज्ञान** हेंच याचें उत्तर होय. —गी० ६२२

७८

**अज्ञेयवाद्यानें** आपल्या विशेषणांतला 'अ' वाटेल तेवढा मोठा लिहिला, तरी तो समाधानाला पुरा पडत नाहीं. —च० ४३८

७९

देशकालानुरूप कांहीं **आचार** सोडावेच लागतात. कुमारिलभट्टानें किंवा शंकराचार्यांनीं सर्व जुन्या श्रौताचारांचा आग्रह धरला नाहीं, म्हणूनच हिंदुधर्म जगला; नाहीं तर आम्ही सर्व बौद्ध झालों असतों. —धा० ७२.

८०

स्वधर्मावरील श्रद्धा दृढ करणें आणि एका धर्मबंधनानें आपण सर्व बांधलेले आहोंत हें त्या त्या धर्माच्या अनुयायांस ज्ञान करून देऊन तत्तद्धर्मीयांची संघशक्ति वाढविणें हेंच **आचारांचें** मुख्य उपयोग होत. —धा० १०५

८१

**आचार्य** हे एक मोठे अलौकिक ज्ञानी असून त्यांनीं आपल्या दिव्य सामर्थ्यानें त्या वेळीं चोहोंकडे माजलेल्या जैन व बौद्धमतांचें खंडन करून आपलें अद्वैत मत स्थापन केलें; व श्रौतस्मार्त वैदिक धर्माच्या संरक्षणार्थ भरतखंडाच्या चारी दिशांस चार मठ उभारून निवृत्तिपर वैदिक संन्यास-धर्म किंवा संप्रदाय त्यांनीं कलियुगांत पुन्हा सुरू केला. —गी० १३

८२

ब्रह्मज्ञानासारख्या अतींद्रिय विषयांत आपल्या बुद्धिवैभवानें निर्भय संचार करणारा **आचार्यां**सारखा पुरुष हिंदुस्थानांत नव्हे तर सर्व जगाच्या इतिहासांत आजपर्यंत झालेला क्वचितच आढळेल.—के० १९०२-३१-५-१

## ८३

कोणाचा कोणताहि पंथ असो, त्यास **आचार्यांची बुद्धिमत्ता** सूर्याच्या तेजाप्रमाणें कबूल करावी लागेल. —के० १९०२-३१-५-१

## ८४

समाजधारणा घ्या किंवा सर्वभूतहित घ्या, हीं बाह्योपयोगीं तत्त्वें जर आमच्या **आत्मकल्याणाच्या** मार्गांत आड येत असलीं, तर तीं आम्हांस नकोत. —गी० ६७

## ८५

मनूनेंच नव्हे तर अर्वाचीन फौजदारी कायद्यानेंहि आत्मसंरक्षणाचा हक्क कांहीं मर्यादा ठेवून कबूल केला आहे. अशा प्रसंगीं अहिंसेपेक्षां **आत्मसंरक्षणाची** योग्यता अधिक समजतात. भ्रूणहत्या म्हणजे कोवळ्या पोराची हत्या सर्वांत अतिगर्ह्य मानिली आहे; पण आडवें आलें म्हणजे कापून काढावयास नको काय ? —गी० ३१

## ८६

सगळ्या मनुष्यांना **आत्मा** एक आहे [illegible]

८९

ज्याला स्वस्वरूपाची पूर्ण ओळख झाली, स्वहृदयांत वास करणारा ब्रह्माण्डव्यापी परमेश्वर आपणच, असा ज्याचे बुद्धीचा निर्धार झाला, तो **आत्मवेत्ता** होय. —के० १९०३-३७-४-२

९०

**आत्मसुधारणा** व आत्महित हाच जगद्धित व जगत्सुधारणा यांचा पाया होय. —के० १९०१-२-५-१७-२-५

९१

अध्यात्म विषय असो कीं राजकीय प्रश्न असो, आत्यंतिक मोक्ष हवा असो कीं देशोन्नतीचा प्रयत्न करणें असो, कोणत्याहि दृष्टीनें पाहिलें तरी, स्वतःची व स्वकीयांची उन्नति करून घ्यावयाला प्रथम खरें **आत्मज्ञान** झालेंच पाहिजे. —के० १९०३-३७-४-३

९२

उन्नति आत्म्यापासून सुरू होऊन शरीरापर्यंत होत असते, शरीरापासून आत्म्यापर्यंत होत नाही, म्हणून **आत्मे** नीट जतन करून ठेवा.

—व्या० २-१२८

९३

कुटुंब हें आत्मौपम्यबुद्धीचा पहिला धडा शिकण्याचें साधन होय, यांतच सदैव लंपट होऊन न राहतां कुटुंबाचे पुढें मित्र, आप्त, गोत्रज, ग्रामस्थ, ज्ञातिबंधु, धर्मबंधु आणि अखेर सर्व मनुष्यें अगर सर्व भूतें याप्रमाणें प्रत्येक मनुष्यानें आपली **आत्मौपम्यबुद्धि** जास्त जास्त व्यापक करून आपल्या ठिकाणीं जो आत्मा तोच सर्व भूतांच्या ठिकाणीं आहे हें ओळखणें व अखेर त्याप्रमाणें वर्तन करणें ही ज्ञानाची व आश्रमव्यवस्थेची परमावधि किंवा मनुष्यमात्राच्या साध्याची सीमा होय असा आत्मौपम्य-बुद्धिरूप सूत्राचा शेवटचा व व्यापक अर्थ आहे. —गी० ३८८

९४

समाजांत एका मनुष्यानें दुसऱ्या मनुष्याशीं कसें वागावें याचा निर्णय करण्यास **आत्मौपम्यबुद्धीचें** " सर्वभूतस्थमात्मानं सर्वभूतानि चात्मनि " हें सूत्र " पुष्कळ लोकांचें पुष्कळ हित " या आधिभौतिक तत्त्वापेक्षां अधिक मुद्देसूद, निर्दोष, निःसंदिग्ध, व्यापक, स्वल्प व अगदीं अडाणी मनुष्याच्याहि लवकर लक्षांत भरण्यासारखें आहे. —गी० ३८६

९५

मोकळ्या वाफेंत कांहीं जोर नसतांहि ती एखाद्या भांड्यांत कोंडली म्हणजे मग त्याच वाफेचा भांड्यावर ज्याप्रमाणें दाब बसूं लागतो, त्या न्यायानें अनादिपूर्वकर्मार्जित जड देह व इंद्रियें यांनीं परमात्म्याचा अंशभूत जीव कोंडला गेला म्हणजे या कोंडींतून त्याची सुटका करून देणारीं (किंवा मोक्षानुकूल) कर्में करण्यास देहेंद्रियांची प्रवृत्ति होऊं लागते व यालाच व्यावहारिक दृष्टया **'आत्म्याची स्वतंत्र प्रवृत्ति'** असें म्हणतात. —गी० २७५

९६

ज्याची बुद्धि पूर्ण साम्यावस्थेस पोंचली तो लोकांस केवळ **आधिभौतिक सुख** मिळवून देण्यासाठींच आपले सर्व व्यवहार करील हें संभवनीय नाहीं. तो दुसऱ्याचें नुकसान करणार नाहीं हें खरें; पण हें त्याचें मुख्य ध्येय नसून समाजांतील मनुष्याची बुद्धि अधिकाधिक शुद्ध होत जाऊन आपल्याप्रमाणेंच अखेर सर्व लोक जेणेंकरून आध्यात्मिक पूर्णावस्थेस पोंचतील असे प्रयत्न स्थितप्रज्ञ करीत असतो. मनुष्याच्या कर्तव्यापैकीं हेंच श्रेष्ठ व सात्त्विक कर्तव्य होय. केवळ आधिभौतिक सुखवृद्धीचा प्रयत्न आम्ही गौण किंवा राजस समजतों. —गी० ३८०.

९७

आधिभौतिक शास्त्रांची कितीहि वाढ झाली, तरी जगाचें मूलतत्त्व समजून घेण्याची मनुष्यमात्राची जी स्वभाविक प्रवृत्ति तिचें नुस्त्या **आधिभौतिकवादानें** पूर्ण समाधान होणें केव्हांच शक्य नाहीं. —गी० ५०१

## ९८

**आधिभौतिक शास्त्रांची** अर्वाचीन काळीं अश्रुतपूर्व वाढ झाली असून दृश्य सृष्टीचें मनुष्याचें ज्ञान पूर्वींपेक्षां शेंकडोंपट वाढलें आहे; आणि 'जशास तसें' या न्यायानें जें प्राचीन राष्ट्र हें आधिभौतिक ज्ञान संपादन करून घेणार नाहीं त्याचा सुधारलेल्या नवीन पाश्चिमात्य राष्ट्रांपुढें टिकाव लागणें अशक्य होय. —गी० ५०१

## ९९

चांदोबास धरण्यासाठीं आकाशांत हात पसरणाऱ्या लहान मुलाच्या मुठींत ज्याप्रमाणें चांदोबा कधींच सांपडत नाहीं, तद्वतच आत्यन्तिक सुखाच्या आशेनें केवळ **आधिभौतिक सुखाच्या** पाठीस लागणाऱ्यांस केव्हांहि अत्यंत सुखाची प्राप्ति होणें दुर्घट होय. —गी० ११४

## १००

मनुष्य या पृथ्वीवर निर्माण झाल्यादिवसापासून सर्व दृश्य व नाशवंत सृष्टीचें मूलभूत अमृततत्त्व काय, व तें मला कसें प्राप्त होईल, याचा विचार तो एकसारखा करीत आला आहे; व **आधिभौतिक शास्त्राची** किती जरी वाढ झाली तरी मनुष्याची अमृत तत्त्वाच्या ज्ञानाकडील स्वाभाविक प्रवृत्ति कधींहि कमी व्हावयाची नाहीं. -गी २१०

## १०१

**आधिभौतिक शास्त्रें** कितीहि वृद्धिंगत होवोत; सर्व आधिभौतिक सृष्टिविज्ञान बगलेस मारून तत्वज्ञान नेहमींच त्याच्यापुढें धांव घेत राहणार ! —गी० २१०

## १०२

**आभार**प्रदर्शनास आमच्या वेदांत-शास्त्रांत आधार नाहीं. समजा-लग्न लागल्यावर नवऱ्यानें नवरीचे व नवरीनें नवऱ्याचे आभार मानले तर तें योग्य होईल काय ? लग्न जसें दोघांचें कार्य तसेंच स्वराज्य मिळविणें हें सर्वांचें कार्य आहे. —स्व० मो० ४-८३

१०३

**आध्यात्मिक विचारांत** मनुष्य कितीहि गढून गेला तरी मध्यान्ह टळून गेल्यावर पोटांत क्षुधेची टोंचणी लागली म्हणजे हे सर्व विचार लटपटतात. —के० १८९१-२१-२-४

१०४

**आर्यधर्म** किंवा वैदिक धर्म हा सर्वांहून प्राचीन आहे, इतकेंच नव्हे तर मनुष्याच्या आत्म्यास कोणत्या उपायांनीं मुक्ति मिळेल याबद्दलच्या विचारामध्येंही आर्यधर्मासच श्रेष्ठपणा द्यावा लागतो.

—के० १९०१-९-२-४

१०५

निवळ धर्मतत्त्वांचें इतर असारभूत गोष्टींपासून पृथक्करण करून सदर तत्त्वांचा केवळ सत्य दृष्टीनें ज्यांत विचार केला आहे असा **आर्यधर्मा**-खेरीज इतर धर्म क्वचितच सांपडेल. —के० १८९२-८-२-४

१०६

**'आर्ष काव्य'** जर देशांतील सामान्य लोकांच्या अंगीं शौर्य, धर्म, अभिमान, उत्साह किंवा सत्यनिष्ठा यांची जागृति करणार नाहीं, तर त्या काव्याची योग्यता जितकी मानली जावी तितकी कधींहि मानली जाणार नाहीं. —के० १९०५-१६-४-३

१०७

**आर्ष महाकाव्य** म्हटलें म्हणजे नायकाच्या नुसत्या पराक्रमाचेंच त्यांत वर्णन केल्यानें काम भागत नाहीं; नायक जें कांहीं करितो तें योग्य का

१०८

भीष्म, युधिष्ठिर, भीम, अर्जुन, श्रीकृष्ण, दुर्योधन आदिकरून या **आर्ष महाकाव्यांतील** जे नायक, उपनायक किंवा प्रतिनायक आहेत, त्यांचीं चरित्रें इतकीं उदात्त, बोधप्रद आणि मनोरंजक आहेत कीं, त्यांच्या पश्चात् हिंदुस्थानास प्राप्त होणाऱ्या दैन्यावस्थेंत भारतवर्षीय लोकांस सदैव धर्माचरणाकडे प्रवृत्त करण्याकरितां परमेश्वरानें या कलियुगाचे आरंभीं या महापुरुषांस मुद्दाम निर्माण केलें होतें कीं काय, असेंहि पुष्कळदां मनांत येतें. —भा० २.

१०९

निराशेमुळें नवीन **आशा** उत्पन्न होते. —के० १९०६-१०-४-४

११०

निराशेच्या पोटीं उत्पन्न होणारी **आशाच** खरी कार्यकारी व सिद्धिप्रद असते. —विश्व० १४

१११

मोठमोठ्या संकटांत सांपडलेल्या लोकांच्या अंगीं हुरूप कायम राहण्यास पुन्हा अभ्युदय होण्याची **आशाच** कारणीभूत होते. —आ०व०३९४

११२

प्रेम ज्याप्रमाणें आंधळें आहे असें म्हणतात, त्याचप्रमाणें किंबहुना त्याहूनहि **आशा** ही अधिक आंधळी आहे. —के० १९०६-३०-४-२

११३

प्रिय गोष्टीचा विरह झाला असतांना आततायीपणापासून जर कोण पराङ्मुख करीत असेल, तर तो **आशातंतु** होय. —के० १९०८-२१-४-५

११४

**आशिया खंडाच्या** भावी स्थितीचा विचार हिंदुस्थानच्या राजनीतीचा पाया होय. —के०१९०३-३०-४-३

११५

हिंदुस्थान देश **आशिया खंडाचें** नाक आहे व आशिया खंडाचें वैचित्र्य आणि स्वातंत्र्य कायम राहिलें तरच हिंदुस्थानांतील लोकांचा कांहीं तरणोपाय आहे. —के० १९०३-२६-५-१

११६

**आशिया खंडांत** युरोपियन राष्ट्रांच्या ज्या अनेक हालचाली चालू आहेत त्यांचें बाह्यस्वरूप वेळोवेळीं बदलतें व त्यामुळें वरचेवर कांहीं तरी नवीन प्रश्न उपस्थित झाल्याचा प्रथमदर्शनीं भास होतो. परंतु वस्तुतः या सर्व हालचालींचें मूळ हिंदुस्थानांत आहे ही एक गोष्ट ध्यानांत ठेवली म्हणजे कांहींच गूढ राहणार नाहीं. —के० ले० २-४३६

११७

सांप्रत युरोपियन राष्ट्रें आमच्यावर राज्य करोत; परंतु सर्वांना श्रेष्ठ प्रकारचे धर्मविचार व तत्त्वज्ञान शिकविण्याचा **आशिया खंडाला,** विशेषत: हिंदुस्थानाला उपजत अधिकार आहे, ही गोष्ट कोणालाहि ना-कबूल करतां यावयाची नाहीं. —धा० १७०

११८

**आशिया खंडरूपी** बुद्धिबळाचे पटावर पांढऱ्या व काळ्या मोहोऱ्यांचा डाव सुरू झाला आहे; त्यांत अखेर कोणाची बुरजी अगर प्यादी होते हें पहाणें आहे. —के० १९०३-२९-४-५

११९

निरनिराळ्या राष्ट्रांच्या अंगीं निरनिराळे गुण कमीअधिक प्रमाणानें वास करीत असतात हें खरें; परंतु हा गुणावगुणांचा भेद जरी वास्तविक असला तथापि **आशियांतील राष्ट्रांनीं** सदैव युरोपियन राष्ट्रांच्या कह्यांत राहिलें पाहिजे असा कांहीं देवदत्त अवगुण आशियांतील लोकांच्या अंगीं नाहीं हें वाचेनें नव्हे, तर कृतीनें जपानी लोकांनीं सर्व जगाच्या प्रत्ययास आणून दिलें आहे. —के० ले० २-५५९

## १२०

आशियाखंडांतील लोकांमध्यें एक प्रकारचें विलक्षण प्राचीन काळापासून चालत आलेलें विचारैक्य आहे. व हिमालय पर्वत आड आल्यानेंहि जर तें नाहींसें झालेलें नाहीं, तर अन्य कारणानेंहि तें नाहींसें होणें शक्य नाहीं; बुडविलेल्या भोंपळ्याप्रमाणें केव्हांना केव्हां तरी तें पाण्याच्या सपाटीवर तरंगून दृक्प्रत्ययास येईल हें निश्चित आहे.

—कें० लें० २-४२६

## १२१

आशियाखंडांतील लोक जर कांहीं बाबतींत युरोपियनांपेक्षां मागें असतील तर तो परिस्थितीचा दोष आहे, त्यांचा कमीपणा नाहीं.

—के० १९०३-२७-४-५

## १२२

आशियाटिक आचारविचारांशीं पूर्ण तादात्म्य असून त्या भूमीवर अर्वाचीन शास्त्रीय शोधांनीं प्राप्त झालेल्या विद्याकलादिकांची मखलाशी जें राष्ट्र उत्तम तऱ्हेनें करूं शकेल तेंच आशियाखंडांत चिरकाल राज्य करील.

—के० १९०३-२३-४-४

## १२३

संहत कार्याला लागणारें ऐकमत्य व उत्साह आशियाटिक लोकांत उत्पन्न होण्यास कदाचित् वेळ लागेल; पण जसजशी त्यांची सुधारणा, संघट्टण व दळणवळण वाढेल तसतसें हें ऐकमत्य लवकर होईल यांत शंका नाहीं. —के० १९०३-२९-४-४

## १२४

आशियांतील लोकांचा, भौतिक परिस्थिति, राजकीय प्रसंग आणि मागील संस्कार इत्यादि कारणांनीं जो विशिष्ट स्वभाव बनला आहे तो तसाच कायम ठेवून त्याला युरोपियन लोकांचें अर्वाचीन शास्त्रज्ञान कलाकौशल्य, राजनीति व साधनें यांनीं जितकें सुसंस्कृत व समर्थ करतां येईल तितकें करणें हाच आशियाटिक लोकांच्या उन्नतीचा खरा उपाय आहे.

—के० १९०३-२३-४-५

१२५

युरोप खंडांतील केवळ विजेच्या वेगानें भरधांव जाणारी सुधारणा व आशियांतील लोकांची मंदगति, शांत व गतानुगतिक दिनचर्या या दोहोंत आज जें एवढें अंतर पडलेलें दिसतें त्याचें मूळ कारण हवा.

—के० १९०३-२७-४-५

१२६

वर्ष दोन वर्षें ऑफिसच्या आराम खुर्चीवर पंख्याखालीं बसून रोजीं दहापांच सह्यांच्या श्रमानें जे साहेब इतके थकतात कीं, सहा महिने फर्लो-वर थंड हवेंत जाऊन ताजेतवाने होऊन यावें लागतें. त्यांनीं आज हजारों वर्षें पिढ्यान्‌पिढ्या प्रखर शीतोष्ण सहन करणाऱ्या आशियांतील लोकांस हंसावें, नामर्द म्हणावें, काळे म्हणून दूर सरावें यापेक्षां निलाजरेपणा तो कोणता ?

—के० १९०३-२७-४-५

१२७

निराशेंतील आशेच्या जोरावर भवाब्धि पार पडून अनेक लोकांनीं जर ईश्वरपदाची प्राप्ति करून घेतली आहे, तर आपल्यावर आलेल्या संकटांचा सागर तरून जाण्याची शक्ति आपल्या अंगीं उत्पन्न करण्यास हें साधन समर्थ आहे याबद्दल शंका घ्यावयास नको.

—विश्व० १४

१२८

आशेवांचून आयुष्य अळणी आहे हें तत्त्व आम्हांस मान्य आहे. आम्ही कांहीं इंग्रजींत ज्यास 'पेसिमिस्ट' किंवा आमच्या भाषेंत 'रड्ये' म्हणतात त्या पक्षाचे नाहीं.

—विश्व० १३

१२९

आपण प्रपंच यथाशास्त्र पुरा करून आपलीं मुलें सवाई कर्तीं झालीं म्हणजे वृद्धापकालाच्या लुडबुडीनें त्यांच्या उमेदीच्या आड न येतां निव्वळ मोक्षपरायण होऊन आपण आनंदानें संसारांतून निवृत्त व्हावें असा या आश्रमव्यवस्थेचा मूळ हेतु होता.

—गी० ३३६

१३०

नुसती वासना किंवा इच्छा असणें यांत कांहीं दुःख नसून त्यांतील **आसक्ति** हें दुःखाचें खरें मूळ होय. म्हणून सर्व प्रकारच्या वासना मारीत न बसतां, ज्ञात्यानें केवळ आसक्ति सोडून सर्व कर्म करावें असा गीतेचा सिद्धान्त आहे. —गी० ३१९

१३१

पुरुष ज्ञानी झाला तरी श्वासोच्छ्वासादि इंद्रियांचीं कर्में इंद्रियें करणारच. किंबहुना क्षणभर जिवंत रहाणें हें देखील कर्मच; मग संन्यासमार्गी ज्ञानी पुरुष कर्में सोडितो व कर्मयोगी करितो हा भेद राहिला कोठें ? कर्में करणें दोघांसहि प्राप्त आहे. पण अहंकारयुक्त आसक्ति सुटली म्हणजे तींच कर्में बंधक होत नसल्यामुळें **आसक्ति** सोडणें हेंच काय तें यांतील मुख्य तत्त्व होय. —गी० ६८७

१३२

आपल्या राष्ट्राचा विचार करा; कामास लागा. नुसत्या **आहारविहारा-साठीं** मानवजन्म नाहीं. —आ० आ० १-६

१३३

**इंग्रज लोक** कोठेंही गेले तरी आपल्या आचारविचारांना चिकटून राहणारे व नेहमीं तोऱ्यानें वागणारे असल्यामुळें परकी लोकांत मिसळून तद्रूप कधींही होत नाहींत; व आशियाटिक लोकांशीं तर कधींच त्यांचा मिलाफ व्हावयाचा नाहीं. —के० १९०३-३२-५-१

१३४

इंग्रजी विद्येचें व इतिहासाचें ज्यानें परिशीलन केलें आहे, त्यास **इंग्रज लोक** मुसलमानांस अगर हिंदूंस अखेरीस सारखेंच गणून दोघांपैकीं कोणासही भांडल्याखेरीज मुळींच हक्क देणार नाहींत असें आज नाहीं तर उद्यां उघड कळून येईल. —के० ले० १-२७०

१३५

ज्याचें पोट दुखतें तो ओवा मागतो हें तत्त्व **इंग्रज लोकांच्या** हाडीं खिळून गेलें असल्यामुळें, कोणी मुकाट्यानें आपले हक्क बुडवून घेईल ही गोष्ट त्यांस खरी देखील वाटत नाहीं. —के० ले० २-६२५

१३६

**इंग्रजसरकारच्या** अमलांतील शांतता अगदीं तारीफ करण्यासारखी अवर्णनीय खरी; परंतु ती शांतता विकत घेण्याकरिता आपल्या भाकरीपैकीं अर्धी भाकर मोठमोठ्या इंग्रजी कामगारांच्या अगर गोऱ्या शिपायांच्या भरीस घालून, अर्काटच्या वेढ्यांत ज्याप्रमाणें तांदूळ सोल्जरास आणि पेज नेटिव शिपायास खाऊन रहाण्याच्या प्रसंग आलेला होता तसा अर्धपोटी अगर एका जेवणानें दिवस काढण्याचा हिंदुस्थानच्या कोट्यवधी प्रजेवर प्रसंग येऊन ठेपला आहे! —के० ले० १-१३५

१३७

सूर्यापासून जशी कोणतीहि वस्तु लपत नाहीं, तशीच **इंग्रजसरकारा**-पासून आमची कोणतीहि मसलत चोरून ठेवणें अशक्य होय. यापेक्षां स्पष्टपणाच अधिक श्रेयस्कर होय. —के० १९०६-३९-२-४

१३८

एखादा मनुष्य जन्मल्यापासून मरेपर्यंत देवाचें स्मरण न करतां जसा मरावा तद्वत् आमच्या देशांतील सुशिक्षित वर्ग जन्मापासून अखेरपर्यंत राजकीय चळवळीचा विटाळ न होतां, पिढ्यान् पिढ्या मरत जाणार, अशी **इंग्रजसरकारची** योजना आहे. —के० १९०५-४३

१३९

पोर्च्युगीज लोकांनीं हिंदुस्थानांत ख्रिस्ती धर्माचा प्रसार करून ज्या-प्रमाणें हल्लीं येथें असणाऱ्या युरोपियनांस बलटर मिळणें सोपें करून ठेवलें आहे,त्याप्रमाणेंच **इंग्रज सरकारानें** आम्हांस शिक्षण देऊन तद्वारा हल्लींच्या राज्यव्यवस्थेस लागणाऱ्या हलक्या प्रतीच्या नोकरांची रेलचेल करून ठेविली आहे! —के० १९०१-४१-३

१४०

सुताच्या व विणकरीच्या कामावर पोट भरणाऱ्या दोन कोटींहून अधिक माणसांच्या तोंडचें अन्न कोणी काढून घेतलें म्हणाल तर **इंग्रज सरकारानें** होय. —के० १९०५-४५

१४१

**इंग्रजांचा** इतिहास वाचणारानें इंग्रज लोक क्षत्रियापेक्षां जात्याच अधिक वैश्य आहेत **हें** विसरतां कामा नये. —के० ले० २-४४५

१४२

**इंग्रजी अधिकारी वर्गाकडून** किंवा त्यांच्या विलायती देशबांधवांकडून आर्जवानें आम्हांस कांहीं हक्क अगर सवलती मिळतील अशी जर कोणास आशा असेल तर तो पुरुष साधूच्या वर्गांतीलच समजावयास पाहिजे. —विश्व० ११

१४३

द्यावयाचें कोणास कांहीं एक नाहीं; परंतु शहाणपणाचा आव आणून दोन भिकाऱ्यांत कलह लावावयाचा आणि या कलहांत ते दोघेही मेले तर आपल्या धूर्ततेचें कौतुक करून समाधान मानून घ्यावयाचें यासच **इंग्रजी कावा** असें म्हणतात. —के० १९०६-३६-४-४

१४४

कोणी म्हणतात, **इंग्रजी नोकरशाही** व व्यापारी यांनीं आगगाड्या, तारायंत्रें केलीं कीं नाहीं ? होय केलीं; पण तो मढ्यावर शृंगार झाला ! लोक जवान होतील, शूर होतील, विद्वान् होतील तर उपयोग; नाहीं तर मला या शृंगाराची मुळींच किंमत नाहीं. —स्व० मो० ४-४१

१४५

उडाणटप्पूंमध्यें देखील गोरा आणि काळा हा भेद असावा ही **इंग्रजी राज्यांतील न्यायाच्या** समतेची एक मोठीच साक्ष आहे. —के० ले० २-२३

१४६

मुळास धक्का न लावतां भ्रामक वरप्रदानानें लोकांच्या तोंडास कशीं पानें पुसावीं या कपट राजनीतींत **इंग्रजी मुत्सद्दी** मोठे कसलेले आहेत.

—के० १९०७-२४-४-४

१४७

धर्मद्वेषाच्या ज्या खडकावर मोगलाईचें तारूं आदळून फुटलें तो खडक आपलें राजकीय जहाज चालवितांना **इंग्रजी मुत्सद्यांनीं** अजीबात टाळला आहे.

—के० १९०६-३२-४-२

१४८

गारोडी जसा सापास पकडल्याबरोबर आधीं त्याचे दांत पाडून टाकतो, त्याप्रमाणें जिंकलेल्या लोकांना आधीं निःशस्त्र व निरुपद्रवी करून टाकावयाचें ही **इंग्रजी राजनीतीच** आहे.

—के० १९०१-४८-२-५

१४९

हिंदुस्थानावर सध्यां असलेलें **इंग्रजी राज्य** हें शांततेकरितां जरी अभूतपूर्व असलें तरी तें परकीय आहे; इतकेंच नव्हे तर सहा हजार कोसांवरून मूठभर परकीय लोक येथें येऊन येथील लोकांवर फारसा विश्वास न ठेवतां, त्यांनीं मुख्यत्वेंकरून आपल्या हिताकरितां तें चालविलें आहे; हें नेहमीं लक्षांत ठेवलें पाहिजे.

—के० ले० २-५९५

१५०

**इंग्रजी राज्य** म्हणजे काय ? राज्य या शब्दाचा अर्थ जर हल्लीं चालू असलेली पद्धति असा असेल किंवा हजारों इंग्रज लोक आज ज्याप्रमाणें हिंदुस्थान देशावर चरत आहेत व एतद्देशीय लोकांच्या बुद्धीची, करामतीची, शौर्याची, व्यापाराची किंवा इतर प्रकारच्या प्रगतीची वाट बंद करीत आहेत तशीच ती पुढें बंद ठेवणें, हेंच जर इंग्रजी राज्याचें लक्षण असेल तर इंग्रजी राज्य या देशांत आचंद्रार्क राहणें अशक्य आहे, असें निक्षून सांगण्यास आम्हांस कोणत्याहि प्रकारची भीति वाटत नाहीं.

—के० ले० २-४६४

१५१

इंग्रजी व्यापारी घ्या, अगर **इंग्रजी राज्यकर्ते** घ्या, दोघेहि त्यांस कांहीं चट्टा बसल्याखेरीज आमच्या म्हणण्याचा विचार करण्यास प्रवृत्त व्हावयाचे नाहींत.

—के० १९०५-३७-५-१

१५२

'**इंग्रजी राज्य**छत्राखालीं शांतता आणि सुरक्षितपणा यांच्या योगानें देशांमध्यें सुबत्ता होऊन देश इंग्रजी अमलाखालीं भराभराटीस येत चालला आहे' ही राज्यकर्त्यांची ओरड म्हणजे एक प्रकारें एखादी स्त्री सती चालली असतां, मंगलवाद्यांचा ज्याप्रमाणें गजर चालू असतो त्याप्रमाणेंच होय.

—के० १९०१-४९-२-४

१५३

**इंग्रजी राज्यपद्धत** कितीहि सुयंत्रित असली तरी त्यामुळें आम्ही उत्तरोत्तर हतवीर्य होत जाऊन कंगाल बनत चाललों आहोंत.

—के० १९०२-७-४-४

१५४

लोकांमधील फूट, अज्ञान, नामर्दपणा आणि परस्परांबद्दल मत्सर हे हिंदुस्थानांतील बलाढ्य **इंग्रजी राज्याचे** प्रमुख आधारस्तंभ होत.

—के० १९०७-२२-४-३

१५५

ज्याप्रमाणें पदार्थमात्र शुद्धावस्थेंत क्वचित् सांपडावयाचे, त्याचप्रमाणें या **इंग्रजी राज्याच्या** फायद्याच्या गोष्टींविषयींहि झालें आहे.

—के० ले० १-७३

१५६

या **इंग्रजी राज्यांत** आम्हांस दुसऱ्याच्या ओंजळीनें पाणी पिण्याची इतकी कांहीं बेसुमार संवय झाली आहे कीं, आपल्या पदरचे पैसे खर्च करून सत्कार्य करण्याची जरी कोणास प्रवृत्ति झाली तरी देखील त्याच्या संकल्पाची सिद्धि किंवा पूर्तता होण्यास सरकारी शिक्कामोर्तब पडल्या-शिवाय चालत नाहीं.

—के० १९०३-१९-४-३

१५७

स्वस्थ बसण्याचा हा काळ नव्हे. इतकेंच नाहीं तर प्रत्येकानें आपण होऊन आपलीं गाऱ्हाणीं सरकारच्या व लोकांच्या नजरेस आणल्याशिवाय त्यांची कधींहि दाद लागावयाची नाहीं, हें **इंग्रजी राज्यनीतीचें** मुख्य तत्त्व आहे.

—के० ले० १-११०

१५८

इंग्रजी राज्य आणि **इंग्रजी व्यापार** या दोन्ही गोष्टी एकमेकांस इतक्या लागून आहेत कीं, शंकरपार्वतीच्या देहाप्रमाणें त्यांचा बहुतेक एकजीव झाला आहे.

—के० १९०५-३७-४-५

१५९

विद्या, नीतिमत्ता, धर्मनिष्ठा, व्यवस्थित आचरण आणि गृहस्थिति यांचा एकमेकांशीं जो नित्यसंबंध असावा लागतो, व जो असल्याखेरीज राष्ट्रांतील विद्वान् लोक पुढारीपणा घेऊन जोरानें राष्ट्राचा उत्कर्ष करण्यास पात्र होत नाहींत तो संबंधच **इंग्रजी शिक्षणानें** पहिल्यानें तोडून टाकला.

—के० १९०१-१२-२-२

१६०

**इंग्रजी शिक्षण**पद्धतीचा आमच्या समाजावर पहिला वाईट परिणाम म्हटला म्हणजे त्यामुळें झालेली आमच्या पुढाऱ्यांच्या मनाची अव्यवस्थित वृत्ति आणि सदर वृत्तीच्यायोगें बिघडलेली गृहव्यवस्था हा होय.

—के० १९०१-१२-२-२

१६१

नुसत्या **इंग्रजी शिक्षणानें** दहापांच नव्या कल्पना मनांत शिरल्या-बरोबर कोणताहि पुरुष समाजाचा पुढाकर घेण्यास पात्र होतो ही कल्पनाच चुकीची होय. व या कल्पनेच्या पायावर ज्या चळवळींची इमारत उभारली गेली होती, त्या चळवळी केव्हांना केव्हां तरी खालीं पडणें अगदीं स्वाभाविक होतें.

—विष्णु० ११

१६२

निस्सीम तपोबलाचें महत्त्व व वैराग्याची योग्यता आधुनिक **इंग्रजी शिक्षणामुळें** आम्हांस चांगली कळेनाशी झाली आहे.

—के० १९०१-१०-२-५

१६३

प्रस्तुतच्या **इंग्रजी शिक्षणानें** आमच्या तरुण पिढींतील तेजस्विता, जोम, स्वावलंबन, कर्तृत्वशक्ति वगैरे गुण कमी होऊन निवळ खर्डेघाशी व गुलामगिरींतच सुख मानणाऱ्या मंडळींचा जिकडे तिकडे सुकाळ झाला आहे. —के० १९००-१-२-५

१६४

**इंग्रजी साम्राज्याचे** जर आम्ही भागीदार आहों तर ह्या साम्राज्यांत गोऱ्या प्रजेस जे हक्क आहेत तेच हिंदी प्रजेसहि असले पाहिजेत हें न्याय-दृष्ट्या अगदीं उघड आहे. —गां० १२

१६५

लष्करी धोरण किंवा लष्करी डावपेंच यासंबंधानें **इंग्रजी सेनेनें** हिंदु-स्थानचे भूमीवर दाखविलेलें प्रदर्शन फारच दरिद्री आहे.

—के० १९०२-२७-४-४

१६६

देशाच्या स्वदेहावर परकीयांचा ताबा असला तरी मला तितकें वाईट वाटणार नाहीं; पण तरुणांच्या मनावर **इंग्रजांच्या राज्यानें** बराच अनिष्ट परिणाम केला आहे. याबद्दल मात्र फार वाईट वाटतें.—आ०आ० २-१७०

१६७

**इतिहास** हा देशाच्या अवनत स्थितीमध्यें लोकांस समाधानवृत्ति प्राप्त करून देण्यास व पुढील काळ चांगला येईल या आशेवर दिवस कंठण्याचें सामर्थ्य आणण्यास एक प्रकारची शक्ति आहे.

—के० १९०५-१३-४-४

१६८

**इतिहास** व शास्त्र कोणाचे पक्षपाती नाहींत. त्यावरून निघणारीं प्रमेयें कोणास कडू लागोत किंवा गोड लागोत, जीं खरीं दिसतील तीं ओळखून त्यांचें अनुरोधानें आचरण ठेवण्यास आपण तयार असलें पाहिजे. —के० १९०३-३२-४-५

१६९

कोणत्याहि लोकांचा अगर राष्ट्राचा परक्या लोकांनीं लिहिलेला **इतिहास** कधींहि विश्वसनीय अथवा समाधानकारक असत नाहीं.

—के० १८९४-१८-३-१

१७०

ऐतिहासिक लेख व त्यांजवरून लिहिलेला **इतिहास** यांमध्यें रसिक वाचकांचे दृष्टीनें जो भेद आहे, तो एखाद्या नाटकाचा प्रयोग रंगभूमीवर पाहणें व तेंच नाटक खोलींत बसून वाचणें यांमधील भेदाइतका आहे.

—के० १९०१-३०-२-३

१७१

**इतिहास**शास्त्रांतील कालमान हें पौराणिक कालमानाप्रमाणें किंवा भूगर्भशास्त्रांतील कालमानाप्रमाणें प्रचंड आहे. —के० १९०१-१६-२-५

१७२

तरुण पिढी तेजस्वी निपजण्यास जुन्या कागदपत्रांच्या साहाय्यानें लिहिलेल्या खऱ्या **इतिहासाचा** फार उपयोग होतो.

—के० १९१६-१९-२-३

१७३

इतिहासाचा योग्य उपयोग जाणून त्यापासून बोध घेतां येईल, बुद्धीला [illegible] वळण लागेल व आनुवंशिक संस्कार दृढ होऊन आपली बुद्धि

१७६

आमच्या **इतिहासांतील** उणेपणा काय तो हाच कीं, सर्व प्रकारच्या लोकांस एकत्र धरून ठेवण्याचें अवगत असलेलें धोरण राजनीतींतील प्रमुख तत्त्व समजून सर्व मुत्सद्द्यांचें सर्व कालीं तिकडे लक्ष रहावें अशा प्रकारची व्यवस्था अमलांत न येतां हें शहाणपणाचें धोरण कांहीं विशिष्ट व्यक्तींच्या कारकीर्दींतच अमलांत राहिलें. —के० १९००-२५-२-५

१७७

**इंद्रियांचें** योग्य संयमन गीतेस इष्ट आहे; पण हट्टानें किंवा जबरीनें इंद्रियांच्या स्वाभाविक वृत्तिहि अजीबात मारून टाकणें शक्य नाहीं असें येथें सांगणें आहे. उदाहरणार्थ—देह आहे तोंपर्यंत भूक, तहान इत्यादि धर्म प्रकृतिसिद्ध असल्यानें मनुष्य कितीहि ज्ञानी असला तरी भूक लागली म्हणजे तरी तो भिक्षा मागावयास बाहेर पडतो; म्हणून इंद्रियें जबरीनें अजीबात मारण्याचा वृथा हट्ट न धरितां, योग्य संयमनानें तीं आपल्या ताब्यांत ठेवून, त्यांच्या स्वभावसिद्ध वृत्तींचा लोकसंग्रहार्थ उपयोग करून घेणें हेंच शहाण्या पुरुषाचें कर्तव्य होय. —गी० ६६

१७८

मोठमोठ्या लढायांत शत्रूचा पराभव करून जय संपादन करणाऱ्या शूर पुरुषाची जी योग्यता आहे त्यापेक्षांहि **इंद्रियदमन करून** स्वार्थेच्छेचा लेशहि अंत:करणांत न शिरूं देणाऱ्या पुरुषाची योग्यता जास्त आहे.
—के० १९०१-१०-२-४

१७९

**इंद्रियनिग्रह** म्हणजे कर्मेंद्रियांची एक प्रकारची तालीम **आहे**. या तालमेनें इंद्रियें आपल्या ताब्यांत ठेवितां येतात हें खरें; पण मनुष्याची वासनाच जर खोटी असेल तर इंद्रियें ताब्यांत असून उपयोग होत नाहीं. कारण वासना दुष्ट असल्यावर याच इंद्रिय-निग्रहरत सिद्धीचा जारणमारणादि दुष्कृत्यें करण्यांत कित्येक लोक उपयोग करितात, असें आढळून येतें. म्हणून इंद्रियनिग्रहाबरोबरच वासनाही 'सर्वभूतस्थ-मात्मानं सर्वभूतानि चात्मनि' या प्रमाणें शुद्ध पाहिजे. —गी० ४५४

१८०

मनोनिग्रहद्वारा **इंद्रियनिग्रह** हा सर्व साधनांचें मूळ होय. इंद्रियें विषयांत व्यग्र होऊन सैरावैरा धांवत असलीं म्हणजे आत्मज्ञान प्राप्त करून घेण्याची ( वासनात्मक ) बुद्धिच होऊं शकत नाहीं. बुद्धि नाहीं म्हणजे त्याबद्दल दृढ उद्योगहि होत नाहीं आणि मग शांति व सुखहि नाहीं.

—गी० ६३९

१८१

जगाचे व्यवहार निष्काम बुद्धीनें करितां यावे यासाठीं इंद्रियनिग्रहाचा अभ्यास करण्यास सांगितलें असून तो चालू असतां त्याबरोबरच निष्काम कर्मयोगहि यथाशक्ति प्रत्येकानें नेहमीं आचरला पाहिजे, पूर्ण **इंद्रियनिग्रह** होईपर्यंत वाट पहात बसूं नये, असा गीतेचा उपदेश आहे.

—गी० २८०

१८२

आपली बुद्धि सात्विक करणें हें प्रत्येकाचें काम होय; आणि **इंद्रियनिग्रहाखेरीज** तें काम होऊं शकत नाहीं. —गी० १३९

१८३

वैराग्य, इंद्रियदमन, शांति आणि दृढाभ्यास वगैरे साधनांनीं **इंद्रियवर्गाचें** पूर्ण दमन केल्यावर मनुष्याच्या मनाची प्रवृत्ति संसाराकडे किंवा संसारिक कृत्याकडे सहसा होत नाहीं. —के० १९०१-१०-२-४

१८४

शरीर कृश करणारीं निराहारादि साधनें एकांगी अतएव त्याज्य ठरवून माफक आहार विहार आणि ब्रह्मज्ञान हेंच **इंद्रियनिग्रहाचें** उत्तम साधन होय असा गीतेचा सिद्धान्त आहे. —गी० ६३७

१८५

मारूं देत; मला खुशाल मारूं देत. मी करीत आहें तें सत्कार्य आहे. मला कोण मारणार ! आमचें रक्षण करण्यास **ईश्वर** समर्थ आहे.

—आ० आ० २-३७९

१८६

बंधन हा धर्म कर्माचा नसून मनाचा आहे, म्हणून व्यावहारिक कर्माच्या फलांत आपली जी आसक्ति असते ती, **इंद्रियनिग्रहानें** कमी कमी करून सदर कर्मे शुद्ध म्हणजे निष्कामबुद्धीनें करीत गेल्यानें हळुहळू साम्यबुद्धिरूप आत्मज्ञान देहेंद्रियांत मुरून जातें व शेवटीं पूर्ण सिद्धि प्राप्त होते. —गी० २९८

१८७

सरकारनें मला जबर एकान्तवासाची सहा वर्षांची शिक्षा दिली; म्हातारा तुरुंगांत मरणार असेंहि त्यांस वाटलें असेल; परंतु **ईश्वर** रक्षक असल्यावर सरकार झालें म्हणून तरी तें काय करणार! —आ०आ०२-३७९

१८८

सर्वव्यापी **ईश्वराकडे** जाण्यास ईश्वरानें एकच वाट ठेविली आहे हें म्हणणें ईश्वराच्या घराला रानटी मनुष्याच्या घराप्रमाणें एकच दरवाजा आहे, असें म्हणण्याइतकेंच उपहासास्पद आहे. —धा० ६१

१८९

**ईश्वराला** कमी दर्जाचा जोडीदार खपत नाहीं. —धा० २७

१९०

बोकेसंन्यासी किंवा लबाड लोक सर्वत्र असतात म्हणून **ईश्वरभजनाची** योग्यता कमी समजणें म्हणजे उंदराच्या भयानें घर सोडून देण्याइतकेंच वेडेपणाचें आहे. —के० १९०१-४०-२-५

१९१

देवाला माणसांचा विटाळ होतो असें म्हणणें म्हणजे ईश्वरानें मनुष्यें उत्पन्न केलींच नाहींत असें म्हणण्यासारखें आहे. व ज्याअर्थी ईश्वरानें मनुष्यजात निर्माण केली आहे, त्याअर्थी प्रत्येक मनुष्याला **ईश्वरभक्तीचा** सारखाच अधिकार असला पाहिजे हें निर्विवाद आहे. —धा० २२०

१९२

मोठ्या बुद्धीचा किंवा धैर्याचा पुरुष निपजणें व त्यास मनुष्याच्या प्रयत्नाधीन नसलेल्या गोष्टींची अनुकूलता मिळणें हें ईश्वरी कृपेचें लक्षण असून असले पुरुष भगवद्गीतेंतील सिद्धान्ताप्रमाणें **ईश्वरी अवतार** नाहींत असें म्हणणें कठीण आहे. —के० ले० १-५४५

१९३

मनुष्य कितीहि कर्मवादी असला व मृत्पिंडाप्रमाणें आपल्या आयुष्याचा क्रम वाटेल तसा बनवितां येईल अशी जरी त्याची उमेद असली, तरी जगांतील पुष्कळ गोष्टी आपल्या हातच्या नसून कोणत्याहि कामांत यश अगर अपयश येणें हें बऱ्याच प्रसंगीं या आपल्या हातीं नसलेल्या गोष्टीवर अवलंबून असतें हें कोणासहि कबूल करावें लागेल. अशा स्थितींत ह्या बाह्य साधनांची सर्वांशीं किंवा त्याहून कांहीं कमी प्रमाणानें अनुकूलता असणें हें **ईश्वरीकृपेचेंच** फल मानलें पाहिजे. —के० ले० २-१

१९४

खरा **उत्सव** म्हणजे ज्यापासून आपल्या प्रगतीला मदत होते तो.
—आ० व० ३५८

१९५

मोठ्या लोकांचे जे **उत्सव** होतात, ते त्यांच्या गुणांचा प्रसार व्हावा म्हणून होतात. —आ० व० ४४१

१९६

राष्ट्र कितीहि गरीब असो, कितीहि दरिद्री असो, कितीहि परतंत्र असो, पण त्याला जर **उत्सव** माहीत नसेल, नेहमींच्या राहणीपेक्षां अधिक उत्साहानें दिवस काढण्याची ज्यास पद्धत माहीत नाहीं, तर तें राष्ट्र पशूंचें होय, माणसांचें नव्हे. —के० १९०६-३५-४-२

१९७

मनुष्य जात्याच **उत्सव**प्रिय आहे. —के० १८९९-३९-२-५

१९८

राष्ट्रांत निपजलेल्या मोठमोठ्या लोकांचे **उत्सव** करण्यापासून राष्ट्रांतील लोकांचें कल्याण होतें हें निर्विवाद होय. —के० १९००-१७-३-१

१९९

मेलेल्या राष्ट्राचें पुनरुजीवन करण्यास धार्मिक उत्सवांचा फार उपयोग होतो व जिवंत राष्ट्रांना हे **उत्सव** म्हातारपणापासून निर्भय ठेवतात.
—के० १९०७-३६-५-१

२००

**उत्सव** व्यक्तिशः उपासनेकरितां नाहीं, सामाजिक धर्मबुद्धि जागृत करण्याकरितां आहे. —के० १९००-३७-३-३०

२०१

आपल्या मनोवृत्ति उच्चतऱ्हेच्या बनतील असे उपाय योजणें, त्यांना उदात्त स्वरूप आणणें हा **उत्सवाचा** खरा हेतु आहे. —आ० व० ३५९

२०२

आमची धर्मबुद्धि जागृत रहावी, आमच्या नैतिक व राजकीय मनोवृत्ति जोमाच्या रहाव्यात, आमची राष्ट्रीयत्वाची ज्योत नेहमीं प्रकाश देणारी असावी, म्हणूनच आमच्या वाडवडिलांनीं या **उत्सवाची** योजना केलेली आहे. —के० ले० १-५६७

२०३

कैद्याहून आमची रहाटी निराळी आहे, गुलामाहून अधिक वाईट नीच स्थितींत आम्ही नाहीं असें दाखवावयाचें असल्यास, मनुष्याच्या अंगांत स्वभावतः खिळून राहिलेल्या **उत्सव**भक्तीस जरा तरी उचंबळूं दिलें पाहिजे. —के० ले० १-५६७

२०४

गुरुत्वाकर्षण किंवा सृष्टिरचनेंतील उत्क्रान्तितत्त्व, अथवा ब्रह्मात्मैक्य यांसारख्या **उदात्त कल्पना** शेंकडों वर्षांनीं एखाद्या महात्म्यास सुचत असतात, म्हणून ज्या कालीं जो सामान्य सिद्धान्त किंवा व्यापक तत्त्व प्रचलित असतें तेवढ्यावरच भिस्त ठेवून आपलें प्रतिपादन करण्याची वहिवाट सामान्यतः सर्व देशांतील ग्रंथांतून आढळून येते. —गी० १५२

२०५

एकाला दुसऱ्याचा स्वभाव मान्य नसल्यास त्यांच्यामध्यें सामाजिक प्रेमभाव कदाचित् राहणार नाहीं. पण राष्ट्रीय कार्याकरितां जेव्हां दोघांनीं प्रयत्न करावयाचा आहे तेव्हां "न मे द्वेष्योऽस्ति न प्रियः" या **उदार मनोवृत्तीचा** आश्रय करूनच दोघांनींहि तो केला पाहिजे.

—के० १९१६-१९-४-३

२०६

इंजनाला जशी वाफ किंवा विद्युद्यंत्रांत जशी वीज तशी पुरुषांचे प्रयत्नांना **उत्साह** ही मोठी प्रेरक शक्ति आहे. —के० १९०३-३७-४-३

२०७

आत्मिक बलाच्या साधनानें मनुष्य परमेश्वर बनूं शकतो. **उद्योग** व निश्चय हीं परमेश्वरप्राप्तीचीं दोन चाकें आहेत. दैव हें तिसरें चाक कोणी म्हणतात. पण तें मला आजपर्यंत आढळलें नाहीं. उद्योग करून यश आलें नाहीं तरीहि दैव नाहीं. दैव अनुकूल करून घेण्याकरितां पुन्हा उद्योग केला पाहिजे. उद्योगापुढें दैवाला केव्हां तरी माघार घ्यावीच लागते. उद्योग करा व स्वराज्य कसें मिळत नाहीं तें पाहूं हा निश्चय बाळगा. उद्योग झाला म्हणजे परमेश्वराचा पदर धरून त्याला विचारूं! पण त्यापूर्वीं उद्योग झाला पाहिजे. —स्व० गी० ७

२०८

**उद्योगाचें** फल अमुकच होईल ही गोष्ट आपले हातीं नाहीं; म्हणून ईश्वरावर भार टाकून संतोषानें काम करावें व ईश्वरेच्छेला शरण जाऊन कसाहि प्रसंग आला तरी त्यास तयार असावें यांतच मनुष्याचा मोठेपणा आहे. —के० १९०३-४०-५-५

२०९

डॉक्टरीचा धंदाच असा आहे कीं, त्यांत मनुष्याच्या मनांत असल्यास पुष्कळ लोकांवर **उपकार** करण्यास सांपडतें. —के० १९००-३७-२-५

२१०

दूर अरण्यांत जनावर मरून पडलें असतां गिधाडांना कोणी जाऊन आमंत्रण द्यावें लागत नाहीं, तर तीं **उपजतबुद्धीनें** व तीक्ष्ण घ्राणेंद्रियांचे साहाय्यानें एका क्षणांत नसतील तेथून जमतात.

—के० १९००-२६-२-३

२११

रड म्हणून सांगितल्यानें कोणी रडत नाहीं किंवा लढ म्हणून फुकाचा **उपदेश** केल्यानें कोणी लढत नाहीं; दोन्ही गोष्टींसाठीं आंतड्याला पीळ पडून जिव्हाळ्याला चिमटा बसावा लागतो. —के० १९०७-१०-५-१

२१२

कोणताहि **उपदेश** झाला तरी तो करण्यास कांहीं तरी कारण घडून यावें लागतें; आणि तो उपदेश सफल होण्यास शिष्याच्या मनांत सदर उपदेशाचें ज्ञान करून घेण्याची इच्छाहि प्रथम जागृत झालेली असावी लागते.

—गी० ४४२

२१३

एकंदर उपनिषदांचा बराचसा भाग कापून काढल्याखेरीज **उपनिषच्छास्त्राचें** अद्वैताशिवाय दुसरें कांहीं रहस्य आहे असें दाखवितां येणें शक्य नाहीं.

—धा० १५२

२१४

जो पहावा तो गीतेचा **उपक्रम** म्हणजे पहिला अध्याय आणि शेवटचा **उपसंहार** आणि फल यांकडे दुर्लक्ष करून, गीतेंतील ब्रह्मज्ञान किंवा भक्ति आपआपल्या संप्रदायासच कशीं अनुकूल होतात याचा निवृत्तिदृष्ट्या खल करण्यांत गढून गेलेला आहे. जणुं काय ज्ञान व भक्ति यांचा कर्माशीं नित्य संबंध ठेवणें हें एक मोठें पापच होय.

—गी० २७

२१५

नवीन विचारास प्रत्यक्षत्वाचें स्वरूप देण्याचे वेळीं देशकालवर्तमान व समाजाची योग्यता या **उपाधींचा** (Conditions) विसर पडूं देणें अनिष्ट होय.

—के० १८९०-३२-२-५

२१६

**उपासना** म्हणजे, चिंतन, मनन किंवा ध्यान होय; आणि चिंतित वस्तूचें रूप नाहीं तर दुसरे कोणते तरी गुण मनाला कळल्याखेरीज मन चिंतन कशाचें करणार ?

—गी० २०३

२१७

**उपासनेला** नेहमीं प्रत्यक्ष मूर्तिच डोळ्यांपुढें पाहिजे असें नाहीं. निराकार म्हणजे चक्षुरादि ज्ञानेंद्रियांना अगोचर अशा स्वरूपाची देखील उपासना होऊं शकत्ये. पण ज्याची उपासना करावयाची तो चक्षुरादि इंद्रियांना गोचर नसला तरी मनाला गोचर असल्याखेरीज त्याची उपासना होणें शक्य नाहीं.

—गी० २०३

२१८

**उपासनेसाठीं** व्यक्त स्वरूपाची भगवंतांनीं गीतेंत प्रशंसा जरी केली आहे, तरी परमेश्वराचें श्रेष्ठ स्वरूप अव्यक्त म्हणजे इंद्रियांना अगोचर असून तो अव्यक्ताचा व्यक्त बनतो ही त्याची माया आहे; आणि ही माया तरून जाऊन अखेर तिच्या पलीकडच्या शुद्ध व अव्यक्त स्वरूपाचें ज्ञान झाल्या-खेरीज मनुष्यास मोक्ष मिळत नाहीं असा गीतेचा सिद्धान्त आहे.

—गी० २०२

२१९

कोणत्याहि लोकांत ऐक्याची वृद्धि होण्यास जीं अनेक साधनें असतात त्यांपैकींच एक **उपास्यदैवत** असणें हें एक आहे. —के० ले० १-४८७

२२०

एकनिष्ठ माणसांनींच आपल्या **एकनिष्ठव्रतानें** मोठीं कार्यें केलेलीं आहेत हें जगास सांगण्यास इतिहास उभा आहे. —आ० आ० १-२०२

२२१

भिन्न भिन्न कारणांमुळें एकाच विषयावर दोघांचें **एकमत** असूं शकेल; पण तेवढ्यामुळें ते दोघेहि सर्व बाबतींत एक आहेत असें म्हणणें म्हणजे सर्व नद्या समुद्रास मिळतात म्हणून त्या सर्व गंगा आहेत असें म्हणण्या-सारखेंच आहे. —के० १८९५-४३ ३-१

२२२

हल्लींच्या राजकर्त्यांनीं रेल्वे, तारायंत्रें वगैरे बाह्य साधनांनीं, आणि राज्य करण्याची एकसारखी पद्धत, एकसारखे कायदे आणि राज्यव्यव-हारांत उपयोगी पडणारी एक भाषा, यांमुळें सर्व हिंदुस्थान देश जणुं काय, एकत्र करून बांधून टाकला आहे. पण अशा रीतीनें बाह्य साधनांनीं बांधून टाकलेल्या लोकांचीं दिलें एक करून त्यांस खरोखर **एकराष्ट्रीयत्व** आणणें हें काम करण्यास राष्ट्रीय सभा हेंच काय तें उत्तम साधन आहे.

—के० ले० १-४७६

२२३

निरनिराळ्या प्रांतांत किंवा जातींत व्यक्तिशः विद्वान्, कर्ते आणि समंजस पुरुष आमच्यांत उत्पन्न झाले नाहींत किंवा होत नाहींत असें नाहीं; परंतु कांहीं कारणामुळें **एकराष्ट्रीयत्वाची** कल्पना सर्वांच्या मनांत जितक्या जोराची जागृत असावी तितकी अद्याप असूं लागली नाहीं.

—के० ले० २-४८२

२२४

सर्व लोकांच्या आदरास पात्र झालेल्या जितक्या अधिकाधिक वस्तु असतात त्या मानानें **एकराष्ट्रीयत्वाची** कल्पना अधिकाधिक दृढ होत जाते हें तत्त्व निर्विवाद आहे. व राष्ट्राचे जे खरे हितकर्ते आहेत ते अशीच कांहीं रचना करतात कीं, त्यामुळें सर्वांचीं अंतःकरणें एका गोष्टीकडे लागून लोकांस आपण एक राष्ट्रांतील व्यक्ति आहों असें वाटूं लागावें.

—के० ले० १-५३२

२२५

पाश्चिमात्य राष्ट्रांतील प्रजेप्रमाणें हिंदुस्थानांतील लोक **एकराष्ट्रीयत्वा-च्या** कल्पनेनें प्रेरित होऊन आपापल्या हक्कांसाठीं जर एकीनें भांडणारे असते, तर इंग्रज सरकारचें राज्यहि या देशावर झालें नसतें आणि कॉंग्रेस-चीहि पण जरूर पडती ना! —के० ले० २-४८२

२२६

सर्व लोकांची सर्व बाबतींत सर्व विचारांची **एकवाक्यता** होणें कधींहि शक्य नाहीं. —के० १९०८-७-४-३

२२७

राष्ट्रीय सभेंत **ऐकमत्य** होण्यापूर्वीं प्रत्येक प्रांतांत, त्यापूर्वीं प्रत्येक जिल्ह्यांत व त्यापूर्वीं प्रत्येक खेड्यांत तें झालें पाहिजे. ह्या नैसर्गिक क्रमानें ज्या दिवशीं आमचे प्रयत्न चालूं लागतील तेव्हांच आम्ही राजकीय हक्क भोगण्यास खरोखर पात्र होऊं व सरकारहि आमचें म्हणणें ऐकेल, हें प्रत्येक देशहितचिंतकानें लक्षांत बाळगलें पाहिजे. —के० ले० १-११२

२२८

भिन्न भिन्न लोकांचें परस्पर सख्य व **ऐक्य** वृद्धिंगत होणें जितकें इष्ट आहे, तितकेंच त्या प्रत्येकाचें वैशिष्ट्य कशांत आहे तें ओळखल्याशिवाय त्यांची प्रगति होणेंहि अशक्य आहे. —के० १९०३-२७-४-३

२२९

रोटीव्यवहार, बेटीव्यवहार, एक धर्म, एक राज्य, निकट सान्निध्य, सतत दळणवळण वगैरे बाह्य साधनांनीं **ऐक्य** करण्याचा कितीहि प्रयत्न केला, तरी प्रसंगीं प्रत्येक इसम आपल्या परंपरागत गुणधर्माप्रमाणेंच वागतो.

—के० १९०३-२७-४-३

२३०

प्रगतीचा मार्ग **ऐक्यांतच** आहे. —के० १९१६-१८-५-३

२३१

जो **ओरड** करीत नाहीं तो संतुष्ट असा इंग्रजी राज्याचा सिद्धान्त आहे. तुम्हांला ज्या गोष्टी जाचत असतील त्यांची ओरड केल्याशिवाय या काळीं दाद लागणें शक्य नाहीं. —स्व० मो० (४) १२२

२३२

**औदार्य** हा गुणच असा आहे कीं, त्यास जातीचें, धर्माचें अगर दुसरें कसलेंहि कोतें बंधन घालण्याचा प्रयत्न केला तरी घालतां येत नाहीं.

—के० १८९१-४८-३-२

२३३

**औद्योगिक** दृष्ट्या राष्ट्राच्या उन्नतीचें खरें लक्षण म्हटलें म्हणजे निरनिराळ्या धंद्यांच्या व शिक्षणाच्या तरबेज माणसांनीं निरनिराळे धंदे स्वतंत्रपणें चालवून त्यांत प्राविण्य मिळविणें हें होय.

—के० १८९२-२५-२-४

२३४

जिल्ह्याजिल्ह्यांतून लहान लहान नवे धंदे लोकांस शिकविण्याकरितां किंवा बुडत चाललेले धंदे सुधारण्याकरितां ज्या शाळा पाहिजेत त्या निघाल्याखेरीज देशाची **औद्योगिक उन्नति** कधींहि व्हावयाची नाहीं.

—के० ले० २-४-९५

२३५

देशाची कायमची व खरीखुरी अशी **औद्योगिक** व सांपत्तिक भरभराट होण्यास देशी मजुरांखेरीज स्वदेशी भांडवल व स्वदेशी इंजिनीयरांचें कौशल्य यांचाहि उपयोग करून घेतला पाहिजे. —के० १९०३-५-५-१

२३६

'Emotion' वाचून जग समजत नाहीं असें आमच्या जुन्या लोकांना ठाऊक होतें. एऱ्हवीं तर्कावर ग्रंथ लिहिणाऱ्यांनीं नाटकें कशीं लिहिलीं ! आम्हीं 'तर्ककर्कशधी' कांहीं केवळ नाहीं, असें जयदेवानें स्पष्ट म्हटलेंच आहे. मनुष्याला डोकें, **अंतःकरण** दोन्ही जर आहेत तर एक वगळून चालेल कसें ? तसें समाजाचें आहे. —स्व० मो० (३) १८

२३७

आपलें **अंतःकरण** जोंपर्यंत शुद्ध आहे तोंपर्यंत कशाचीहि भीति बाळगण्याची जरूर नाहीं. —के० ले० २-११

२३८

ज्याचें मन किंवा **अंतःकरण** शुद्ध तोच पुरुष उत्तम म्हणावयाचा. किंबहुना अंतःकरण निर्मल, निर्वैर व शुद्ध नसतां केवळ बाह्य कर्मांच्या हिशोबी तारतम्यांत गुंतून, त्याप्रमाणें वागणारा पुरुष ढोंगीहि बनण्याचा संभव आहे. —गी० ४०२

२३९

ज्यावेळीं एखादा देश उदयास येतो त्यावेळीं लोखंडी शस्त्रांपेक्षां लोकांचीं **अंतःकरणरूपी** शस्त्रें अधिक काम करतात.

—के० १९०७-३-४-४

२४०

२४१

कोणत्याहि मनुष्याची योग्यता धंद्यावर अगर जातीवर **अवलंबून** नसून सर्वस्वीं त्याच्या **अंतःकरणाच्या** शुद्धीवर अवलंबून असते. —घा० १५५

२४२

राष्ट्राच्या अभ्युदयाची अंतिमांतली **अंतिम मर्यादा** काय असावी, याबद्दल कोणीहि निर्बंध करणें शक्य नाहीं आणि योग्यहि नाहीं.

—के० १९०८-७-४-५

२४३

कायद्याच्या मर्यादेंत होईल तितकें अत्युच्च **अंतिम साध्य** लोकांपुढें ठेवणें हेंच खऱ्या देशभक्ताचें कर्तव्य होय. —के० १९०८-९-४-३

२४४

**अंतिम साध्या**बद्दलचा तंटा, मालक पैहि देत नसतां, यजमानाला लाख रुपये मागावे का कोट रुपये मागावे, याबद्दलच्या भिक्षेकऱ्यांच्या तंट्यासारखा आहे. —व्या० २-९१

२४५

समोर **अंधार** दिसत असला तरी त्यापलीकडे उजेड आहे हें लक्षांत ठेवा. —व्या० २-१५२

२४६

बलिष्ठ व निर्बल यांच्यांत **करार** होत नाहीं. —व्या० १-६

२४७

स्वतःस कांहीं बंधनें लावून घेऊन इमानें इतबारें तीं पाळण्याचा प्रयत्न करण्यास एक प्रकारचा **करारीपणा** लागतो.

—के० १९००-४६-२-४

२४८

एकदां शिपायाचा पेशा पतकरला म्हणजे मग धन्याकरितां इमानानें प्राण जाईपर्यंत लढणें हें खऱ्या **शिपायाचें कर्तव्य** होय.

—के० १९०५-२-५-२

२४९

ज्यांच्या अंगांत **करारीपणा** आहे ते कधींहि उपाशी मरत नाहींत.
—व्या० २-७९

२५०

चोरांस ज्याप्रमाणें कितीहि गरीब मनुष्य असला तरी तो श्रीमंतच भासतो, किंवा नाकांत सुंकलें घालून रिलीफ कामावर आलेली मोलकरीण सर रिचर्ड टेंपल यांस जशी श्रीमंत वाटली, तद्वत् लॉर्ड **कर्झन** यांस आमच्या लोकांनीं भूमींत पुरलेलें द्रव्य तेवढें आधीं दिसतें; त्यास इलाज नाहीं. —के० ले० २-४००

२५१

**कर्तव्य** करीत असतांना कोठेंहि आणि केव्हांहि मृत्यु आला तरी तो काशीक्षेत्रांतील मरणाप्रमाणें मोक्षप्रदच होतो. —आ० आ० १-३८

२५२

स्वतःचें पवित्र **कर्तव्य** करतांना जर निरुपायास्तव कोणाच्या मनास वाईट वाटलें तर त्याचा विधिनिषेध मानण्याची काय जरूर आहे ?
—के० १९०५-३९-४-५

२५३

'मला दोन लाख रुपये मिळाले म्हणजे मी अमुक करीन' असें म्हणणारे पुष्कळ लोक असतात. अर्थात् त्यांची प्रीतीहि कांहीं विशिष्ट कामापेक्षां दोन लाखांवर जास्त असते. अशा लोकांच्या हातून किंवा लोकांस दाखविण्याकरितां स्वार्थत्याग करणाऱ्या लोकांच्या हातून कांहीं-एक व्हावयाचें नाहीं. याकरितां स्वार्थापेक्षां **कर्तव्य** जास्त प्रिय वाटणारी जितकी मंडळी देशांत निघेल तितकी चांगली. —विष्णु० २०

२५४

कर्तव्यजागृति ज्याच्या ज्याच्या मनांत ज्या ज्या क्षणीं होईल त्या त्या क्षणीं त्यानें आपलें **कर्तव्य** बजावण्यास निरलसपणानें स्वार्थत्याग करून आणि आपणावर किंवा आपल्या कुटुंबावर संकट येणार किंवा येतील याची पर्वा न करितां, परमेश्वरावर भरंवसा ठेवून निष्कामबुद्धीनें लागलें पाहिजे.
—गां० ११

२५५

पुढचे पडले तर मागच्यांनीं आपलें **कर्तव्य** बजावणें यांतच खरें समाधान आहे, रडण्यांत नाहीं ! —के० १९१५-८-६-३

२५६

**कर्तव्याचा** मार्ग कित्येक प्रसंगीं कठीण असतो खरा; पण तो मार्ग कोणता याबद्दल कधींच शंका नसते; व त्या मार्गानें आक्रमण करीत असतां, प्रसंगविशेषीं चांगल्या ठिकाणींहि ठेंच लागण्याचा संभव असतो. —के० ले० २-२

२५७

निर्वाहाचें साधन प्रत्येकास पाहिलेंच पाहिजे. पण त्याची सोय झाल्यावर "शती दशशतं सोऽपीह लक्षं" या न्यायानें आपली आशा अनावर वाढवून **स्वकर्तव्यास** विसरणारे पुष्कळ गृहस्थ आमच्यांत आहेत ही मोठ्या दुःखाची गोष्ट आहे. —विष्णु० २०

२५८

हा दुर्लभ पण नाशवंत मानवदेह खर्चीं घालून यापेक्षांहि अधिक शाश्वत अशी एखादी वस्तु जेव्हां प्राप्त करून घ्यावयाची असते तेव्हां— उदाहरणार्थ, देशासाठीं, धर्मासाठीं, सत्यासाठीं, आपला बाणा, व्रत किंवा ब्रीद राखण्यासाठीं, अब्रूसाठीं, यशासाठीं अथवा सर्वभूतहितार्थ— अनेक महात्म्यांनीं अनेक प्रसंगीं या तीव्र **कर्तव्याग्नींत** आनंदानें आपल्या प्राणांचीहि आहुति दिलेली आहे. —गी० ४१

२५९

असें करावें कां तसें करावें, असल्या शुष्क वाटाघाटीनें ज्यांना पछाडलेलें आहे, व इतरांची कृति जोरांत असतांना द्विधा मन होऊन कोणताच निर्णय ज्यांच्या बुद्धीला करतां येत नाहीं ते **कर्तेपणास** कायमचे आंचवले म्हणून समजावें ! —के० १९०८-१६-४-२

२६०

सर्व कामें भिन्न भिन्न राखून एकमेकांत मिसळूं न देतां, पृथक् पृथक् उरकून टाकणें याच मार्गानें **कर्ते पुरुष** जात असतात. —के० १८९६-२९-२-४

२६१

कोणत्याहि देशांतील लोकांत कांहीं गुण व कांहीं अवगुण हे सांपडायाचेच. परंतु सर्व अवगुण नाहींसे होईपर्यंत वाट न पाहतां ते कह्यांत ठेवून राष्ट्रांतील गुणांचाच उत्कर्ष करण्याचें ज्यांच्या अंगीं सामर्थ्य आहे तेच खरे **कर्ते पुरुष** होत. —के० १८९३-२०-२-३

२६२

केवळ उत्कट इच्छेनें कामें होत नसतात, तर **कर्ते पुरुष** पुढें यावे लागतात. —के० १९०६-२२-५-२

२६३

मुक्तीसाठीं **कर्म** सोडण्याची किंवा सांख्य म्हणतात त्याप्रमाणें कर्मसंन्यासरूप वैराग्याची जरूर नाहीं; इतकेंच नव्हे तर या कर्मभूमींत कर्मांचा पूर्ण त्याग करणें शक्यहि नाहीं. —गी० ३१८

२६४

कर्मबंधांतून सुटका होण्यास **कर्म** सोडणें हा मार्ग नसून ब्रह्मात्मैक्यज्ञानानें बुद्धि शुद्ध ठेवून परमेश्वराप्रमाणें वागत गेल्यानें अखेरीस मोक्ष मिळतो; कर्म सोडणें हा भ्रम आहे; कारण कर्म कोणालाच सुटत नाहीं. —गी० २७४

२६५

जसें करावें तसें भोगावें हा नियम केवळ एका व्यक्तीसच लागू आहे असें नाहीं. एका मनुष्याप्रमाणेंच एका कुटुंबास, एका जातीस, एका राष्ट्रास किंबहुना सर्व जगास आपापलें **कर्म** भोगिल्याखेरीज सुटका नाहीं. आणि प्रत्येक मनुष्याचा ज्या अर्थीं कोणत्या तरी कुटुंबांत, ज्ञातींत किंवा देशांत समावेश झालेला असतो त्या अर्थीं आपल्या स्वतःच्या कर्मांचीच नव्हे तर कुटुंबादिकांच्या सामाजिक कर्मांचीं फलेंहि प्रत्येक मनुष्यास अंशतः भोगावीं लागत असतात. —गी० २६७

२६६

माया, नामरूपें व **कर्म** हीं तिन्ही मुळांत एकस्वरूपीच आहेत. —गी० २५९

२६७

सगुण म्हणजे नामरूपात्मक आणि नामरूपात्मक म्हणजेच **कर्म** किंवा कर्माचा परिणाम होय. —गी० २६३

२६८

कोणत्याहि कारणानें कां होईना जें **कर्म** एकदां आपलें म्हणून पत्करिलें तें कितीहि कठिण वा अप्रिय असलें तरी, आसक्ति सोडून केलेंच पाहिजे. कारण मनुष्याचा लहानमोठेपणा धंद्यावर अवलंबून नसून ज्या बुद्धीनें तो सदर धंदा अगर कर्म करितो त्या बुद्धीवर त्याची योग्यता अध्यात्मदृष्ट्या अवलंबून आहे. —गी० ८४५

२६९

**कर्म** थोडें करा किंवा ज्यास्त करा तें कधीं फुकट जात नसतें. कर्माची सारखी वृद्धिच होत असते, हा सिद्धान्त लक्षांत ठेवाल तर बरेंच कार्य होईल. —स्व० मो० १६

२७०

सोडणें, धरणें आणि चालू ठेवणें ह्या क्रियांत मला आतां कांहीं अंतरच कळत नाहीं. **कर्म** करितां करितां मरण येणें एवढेंच मला आतां कळतें, व हीच स्वर्गप्राप्ति आहे, होय कीं नाहीं? —आ० आ० २-४५०

२७१

कर्माकर्माच्या विवेचनेंत अनेक अडचणी उद्भवतात, म्हणून **कर्म** सोडून देणें युक्त नसून, जेणेंकरून जगांतील कर्मांचा लोप न होतां त्यांचें पाप किंवा बंधन मात्र आपणांस लागणार नाहीं, अशा प्रकारचा योग म्हणजे युक्ति शहाण्या पुरुषानें स्वीकारली पाहिजे. —गी० ५३

२७२

ज्ञान हेंच जरी मोक्षाचें साधन असलें तरी कर्मशून्य रहाणें कधींच शक्य नसल्यामुळें त्याचें बंधकत्व नाहींसें होण्यास आसक्ति सोडून ती करणें जरूर पडतें. यासच **कर्मयोग** म्हणतात. —गी० ६४५

२७३

कानांतील काप नाहींसे होऊन भोकें शिल्लक रहावीं त्याप्रमाणें सध्यां व्यवहारांत "इदं कृष्णार्पणमस्तु" किंवा "हरिर्दाता हरिर्भोक्ता" या संकल्पांची स्थिति झाली असून त्यांतील खरें मर्म न समजतां उपाध्याय हे संकल्प पोपटाप्रमाणें सांगतो आणि यजमान बहिऱ्याप्रमाणें उदक सोडण्याची कवाईत करतो हें खरें. पण मुळांत पाहूं गेलें असतां, **कर्म-फलाशा** सोडून कर्में करण्याचा हा प्रकार आहे. व याची थट्टा केल्यानें शास्त्रास वैगुण्य न येतां हंसणाराचें अज्ञान मात्र व्यक्त होतें. –गी० ४३०

२७४

गीतेंत **कर्मयोग** गौण आणि संन्यास मुख्य समजणें म्हणजे यजमानास त्याच्याच घरांत पाहुणा ठरवून पाहुण्यास यजमान करण्याइतकेंच असमंजसपणाचें होय. –गी० ४६६

२७५

चित्तशुद्धीसाठीं स्वधर्माप्रमाणें वर्णाश्रमविहित कर्में करून ज्ञानप्राप्ति झाल्यावर मोक्षासाठीं शेवटीं सर्व कर्में सोडून संन्यास घेणें यास सांख्य, आणि कर्में कधींहि न सोडितां शेवटपर्यंत तींच निष्काम बुद्धीनें करीत रहाणें यास योग किंवा **कर्मयोग** असें म्हणतात. –गी० ४४४

२७६

सर्वच कर्ममार्गी खरे; पण पाश्चिमात्य कर्ममार्गी सुखेच्छु अथवा दुःख-निवारणेच्छु–कांहीं म्हटलें तरी ०च्छु अर्थात् सकाम, आणि गीतेंतील कर्मयोगी नेहमींच फलाबद्दल निष्काम असतो,–किंवा हाच अर्थ दुसऱ्या शब्दांनीं व्यक्त केला तर गीतेंतील **कर्मयोग** सात्त्विक आणि पाश्चिमात्य कर्मयोग राजस असा या दोहोंमध्यें शुद्ध नीतिदृष्ट्याहि फरक आहे.

–गी० ४९४

२७७

विद्या व अविद्या, कर्म व ज्ञान या दोहोंतील गुण एकत्र करून **कर्मयोग** होतो व त्याच्या आचरणानें उभय लोकांची प्राप्ति होते.

–के० १९१७-२१-४-२

२७८

**कर्मयोग** हेंच इहलोकीं व परलोकीं उन्नतीचें साधन आहे.

—के० १९१७ २१-४-२

२७९

माझी दृढ भक्ति करून मत्परायण बुद्धीनें स्वधर्माप्रमाणें प्राप्त झालेलीं कर्में करीत जा म्हणजे इहलोकीं व परलोकीं उभयत्र तुमचें कल्याण होईल, भिऊं नका, असें अर्जुनाला निमित्त करून भगवान् अखेर सर्वांसच आश्वासन देत आहेत. यासच **कर्मयोग** असें म्हणतात. व हेंच सर्व गीताधर्माचें सार होय.

—गी० ८५०

२८०

**कर्मयोग** एकसारखा चालवीत असतां थोडावेळ नित्य किंवा मधून मधून कांहीं काल एकांताचें सेवन करणेंहि जरूर पडतें. पण त्यासाठीं जगाचे व्यवहार सोडावे असें भगवान् कोठेंहि सांगत नाहींत.

—गी० २८०

२८१

ज्ञानोत्तर (आधीं नव्हे) कर्मसंन्यास करणें किंवा **कर्मयोग** स्वीकारणें हे दोन्ही मार्ग मोक्षदृष्ट्या जरी एकाच योग्यतेचे असले तरी लोकव्यवहार-दृष्ट्या विचार करितां संन्यास बुद्धींत ठेवून म्हणजे बुद्धि निष्काम करून देहेंद्रियांमार्फत आमरणान्त लोकसंग्रहकारक कर्म करीत रहाणें, हा मार्गच सर्वांत श्रेष्ठ होय.

—गी० ३०७

२८२

आपल्याजवळ जें कांहीं थोडेंबहुत भांडवल असेल तेवढ्यावरच प्रथम व्यापार सुरू करून हळुहळू त्या व्यापारानेंच जसा एखादा व्यापारी अखेर अपार संपत्ति मिळवितो तद्वतच गीतेंतील **कर्मयोगाची** गोष्ट आहे; आपणांस शक्य तेवढा इंद्रियनिग्रह करून प्रथम कर्मयोगास सुरवात करावी लागते व त्यानेंच अखेर इंद्रियनिग्रहसामर्थ्य प्राप्त होत असतें.

—गी० २८०

२८३

या कर्मभूमींत कर्म निसर्गतः प्राप्त व प्रवाहपतित असून अपरिहार्यहि आहे; मनुष्याच्या वासनेवर अवलंबून नाहीं, हा गीताशास्त्रांतील **कर्मयोगाचा** पहिला सिद्धान्त होय. —गी० ३१९

२८४

कोणत्याहि देशांत झालें तरी कर्ते पुरुष म्हटले म्हणजे ते कर्ममार्गाचेच पुरस्कर्ते असले पाहिजेत हें उघड आहे. परंतु कर्ते झाले तरी ब्रह्मज्ञान न सोडितां त्याला जोडूनच कर्तृत्व कायम ठेवणें हें आमच्या **कर्मयोगाचें** मुख्य तत्त्व आहे. —गी० ४९४

२८५

कर्मांनीं चित्त शुद्ध होऊन ज्ञान झाल्यावर चतुर्थाश्रम घेऊन ब्रह्मचिंतनांत गढून राहिलें काय किंवा प्रेमानें निस्सीम वासुदेवभक्तींत रंगून गेलें काय, दोन्हीहि मार्ग **कर्मयोगदृष्ट्या** एकाच मासल्याचे म्हणजे निवृत्तिपर होतात. —गी० १६

२८६

गीतेंत भक्ति व ज्ञान यांचें बिलकुल विवेचन नाहीं असें आम्ही म्हणत नाहीं. आमचें एवढेंच सांगणें आहे कीं, कर्म, भक्ति व ज्ञान हे तिन्ही विषय किंवा निष्ठा स्वतंत्र म्हणजे तुल्यबल कल्पून गीतेच्या अठरा अध्यायांची भाऊबंदकीप्रमाणें या तिघांत जी सारखी वांटणी करितात तसें करणें युक्त नसून, ज्ञानमूलक व भक्तिप्रधान कर्मयोग ही एकच निष्ठा सर्व गीतेंत प्रतिपाद्य होय; आणि सांख्यनिष्ठा, ज्ञानविज्ञान किंवा भक्ति यांचें जें निरूपण भगवद्गीतेंत आलेलें आहे तें एका **कर्मयोगनिष्ठेच्या** पूर्त्यर्थ किंवा समर्थनार्थ अनुषंगानें आलेलें आहे, स्वतंत्र विषयप्रतिपादन करण्यासाठीं नव्हे. —गी० ४५६

९१

## २८७

"आत्मा वै पुत्रनामासि" अशा प्रकारें आत्म्याच्या व्याप्तीचा संकोच न करितां "लोको वै अयमात्मा" अशी त्याची स्वभावतःच असलेली व्याप्ति ओळखून "उदारचरितानां तु वसुधैव कुटुंबकम्";–थोर लोकांचें पृथ्वी हेंच कुटुंब–या समजुतीनें प्रत्येकानें आपले व्यवहार करीत जावे असें अध्यात्मज्ञानाच्या पायावर रचिलेलें **कर्मयोगशास्त्र** सर्वांना सांगत आहे; आणि या बाबतींत आमचें कर्मयोगशास्त्र इतर देशांतील प्राचीन किंवा अर्वाचीन कोणत्याहि कर्मयोगशास्त्रास हार जाणार नाहीं; इतकेंच नव्हे तर उलट तीं सर्व पोटांत घेऊन परमेश्वराप्रमाणें 'दहा अंगुळें' शिल्लक राहील अशी आमची खात्री आहे.　　　—गी० ३८९

## २८८

एकच कर्म करण्याचे जे अनेक योग, साधनें, किंवा मार्ग असतात त्यांपैकीं पराकाष्ठेचा चांगला व शुद्ध मार्ग कोणता, तो नेहमीं आचरितां येईल कीं नाहीं, नसल्यास त्याला अपवाद कोणते व ते कां उत्पन्न होतात, जो मार्ग आपण चांगला समजतों तो चांगला कां, किंवा ज्यास वाईट म्हणतों तो वाईट कां, आणि हा चांगलेवाईटपणा कोणी व कोणत्या धोरणानें ठरवावा किंवा त्यांतील बीज काय इत्यादि गोष्टी ज्या शास्त्राचे आधारें निश्चित करितां येतात त्यास **कर्मयोगशास्त्र** किंवा गीतेंतल्या संक्षिप्त रूपाप्रमाणें 'योगशास्त्र' असें म्हणतात.　　　—गी० ६१

## २८९

नुसत्या ऐश्वर्यापेक्षां नुसतें आत्मज्ञान जरी अधिक योग्यतेचें असलें तरी या जगांत ज्यास रहावयाचें आहे त्यास लोकांप्रमाणेंच ऐहिक समृद्धि-हि आपणास किंवा आपल्या देशास प्राप्त करून घेण्याची आवश्यकता व नैतिक हक्कहि असल्यामुळें मनुष्याचें या जगांत परमसाध्य काय या प्रश्नास शांति व पुष्टि, प्रेय व श्रेय, किंवा ज्ञान व ऐश्वर्य या दोहोंचा समुच्चय, हेंच आमच्या **कर्मयोगशास्त्राचें** शेवटचें उत्तर आहे.

—गी० ११८

७११४

२९०

सर्वभूतहित, पुष्कळांचें पुष्कळ सुख, माणुसकीचा परम उत्कर्ष वगैरे नीतिनिर्णयाचीं सर्व बाह्य साधनें किंवा आधिभौतिक मार्ग गौण ठरवून आत्मप्रसादरूपी अत्यन्त सुख आणि त्यालाच जोडून असणारी कर्त्याची शुद्ध बुद्धि या आध्यात्मिक कसोटीनेंच कर्माकर्माची परीक्षा केली पाहिजे असा आमच्या **कर्मयोगशास्त्रांत** अखेर सिद्धान्त केला आहे. –गी० १२०

२९१

**कर्मविपाकाचा** पहिला नियम असा आहे कीं, कर्माला एकदां सुरवात झाली म्हणजे त्याचा व्यापार किंवा खटाटोप पुढें एकसारखा अखंड चालू राहतो; व ब्रह्मदेवाचा दिवस संपून सृष्टीचा संहार झाला तरीहि हें कर्म बीजरूपानें शिल्लक राहून पुन्हा सृष्टीचा आरंभ होऊं लागला म्हणजे त्याच कर्मबीजापासून पुनः पूर्ववत् अंकुर फुटूं लागतात. –गी० २६२

२९२

तुम्ही आपल्या **कर्माचा** पडदा जर स्वच्छ कांचेसारखा कराल तर

२९५

माझ्या प्रत्येक **कर्माचें** फल मला कधीं तरी भोगावें लागेल ह्यासारखी नीतीला उत्तेजक दुसरी कोणतीच कल्पना होणार नाहीं.

—के० १८९३-१६-२-४

२९६

कर्माचा विंचू कधींच ठार मरत नाहीं. यासाठीं तो जेणेंकरून निर्विष होईल अशी युक्ति म्हणजे **कर्माच्या** ठिकाणीं असलेली आपली आसक्ति सोडणें ही होय, असा गीतेचा सिद्धान्त आहे. —गी० ६४५

२९७

एखाद्या कापडाचा रंग (राग) काढून टाका असें म्हटल्यानें त्या कापडाचा नाश, केला पाहिजे असें ज्याप्रमाणें होत नाहीं, त्याप्रमाणें **कर्माच्या** ठायीं काम, संग किंवा राग म्हणजे प्रीति ठेवूं नये असें म्हटल्यानें तीं कर्मेंच सोडून द्यावीं असें होत नाहीं. —गी० ३२५

२९८

परमेश्वराच्या इच्छेनें जगांतील कर्माला केव्हां आरंभ झाला किंवा तदंगभूत मनुष्य पहिल्यानें कर्माच्या तावडींत कसा सांपडला याचें उत्तर देणें जरी आमच्या बुद्धीस शक्य नसलें, तरी कर्माचे पुढील परिणाम म्हणजे फलें केवळ कर्माच्या कायद्यांनींच उत्पन्न होत असतात असें आढळून येत असल्यामुळें, जगाच्या आरंभापासून प्रत्येक प्राणी नामरूपात्मक अनादि **कर्माच्या** कैदेंत पडल्यासारखा झालेला आहे एवढें आमच्या बुद्धीनें आम्हांस निश्चित करितां येतें. —गी० २६४

२९९

लंगडा व आंधळा यांची जोडी जमल्यावर आंधळ्याच्या खांद्यावर लंगडा बसून दोघेहि ज्याप्रमाणें वाट चालूं लागतात, त्याप्रमाणें जड प्रकृति व सचेतन पुरुष यांचा संयोग झाला म्हणजे सृष्टींतील **कर्में** सुरू होत असतात. —गी० १६१

३००

घाटांतून एकदां एका कुशल इंजिनियरानें आगगाडीची लाइन मारल्यानंतर त्यांत सुधारणा करणारे जरी पुष्कळ लोक निघाले तरी मूळ इंजिनियराच्या **कल्पकपणास** कमीपणा येत नाहीं. —के० १९०१-४-२-५

३०१

**काँग्रेसचें** ज्यांच्या मनांत हित करावयाचें आहे त्यांनीं तिच्याशीं नुसतें वैर न केल्यानें भागत नाहीं, तिची उपेक्षाहि त्यांनीं करतां कामा नये, अथवा तिच्यासंबंधानें उदासीनपणाहि दाखवितां कामा नये.

—के० ले० २-४८०

३०२

काँग्रेसचे जे प्रतिनिधि आहेत त्यांना **काँग्रेसच्या** धोरणाला विरोध करणें मुळींच शोभत नाहीं. —च० सु० १००

३०३

उत्तम शीलाचा प्रतिनिधीच तेवढा **काँग्रेसमध्यें** घ्यावयाचा असा आम्हीं निर्धार केला तर तसे उत्तम शीलाचे दहापांच लोक तरी काँग्रेसला लाभतील कीं नाहीं याची शंका वाटते. 'तुला स्वराज्य पाहिजे ना?' असें आम्ही प्रत्येकाला विचारणार आणि तो होय म्हणाला, कीं त्याला काँग्रेस-मध्यें घेणार—मग तो कोणत्याहि पक्षाचा असो किंवा कसल्याहि शीलाचा असो. —आ० आ० २-४६३

३०४

**कांटा** काढणें तो कांट्यानेंच काढला पाहिजे, तो चिंधीच्या बोळ्यानें निघत नाहीं. —के० १९०४-२२-४-५

३०५

आनंद झाला असतां हंसणें व दुःख झालें असतां रडणें या निवळ माकडचेष्टा आहेत असें समजून आपण आपलें **काम** अखंड करीत राहिलें पाहिजे. —आ० आ० १-२५४

३०६

**काम व क्रोध** हे शत्रु खरे, पण केव्हां ? अनावर राहूं दिल्यास. सृष्टिक्रम चालू राहण्यास योग्य मर्यादेचे आंत त्यांची अत्यंत आवश्यकता आहे. सर्व सुधारणा म्हटली म्हणजे या प्रबळ मनोवृत्तीस आळा घालणें ही होय; समूळ नाश करणें ही नव्हे. —गी० ४६

३०७

राजाचा शद्ब **कायदा** होईल, पण नीति होऊं शकत नाहीं.
—के० १९०६-१९-४-३

३०८

**कायदा** जितका अधिक कडक तितकी तो चुकविण्याची बुद्धि अधिक होत असते. —व्या० १-५८

३०९

नवीन **कायदा** केल्यानें नवीन पद्धतीचा बेकायदेशीरपणा नाहींसा होईल. पण त्यांतील अन्याय नाहींसा होत नाहीं. —के० ले० २-२५०

३१०

**कायदा** कितीहि कडक असला तरी जर तो अन्यायाचा आहे तर त्याचा प्रतिकार करण्यास कडक उपायांचीच योजना केली पाहिजे.
—के० ले० १-५१०

३११

**कायदा** प्रजाजनापैकीं प्रत्येकाचें तोंड, हात वगैरेंचे बाह्य व्यापार नियंत्रित करूं शकेल; प्रजेच्या अंतःकरणांतील विचार किंवा विकार त्यानें नियंत्रित होत नाहींत. —के० १९०६-८-४-२

३१२

**कायदा** हा अत्युच्च प्रावल्याला लागू होत नाहीं, तर आपलें प्राबल्य प्राप्त करून घेण्याकरितां ज्या साधनांचा उपयोग आपण करूं त्या साधनांना मात्र कायदा लागू होत असतो. —व्या० १-११५

३१३

जो **कायदा** आपल्याला जुलमी वाटतो तो न मानणें हें प्रजेचें काम आहे.

—व्या० १-५९

३१४

**कायदा**, नीति आणि व्यवहार यांच्या मर्यादा भिन्न भिन्न आहेत; व एखादी गोष्ट यांपैकीं एका दृष्टीनें अशास्त्र असली तर ती दुसऱ्या बाजूनें नेहमीं तशीच असली पाहिजे, या म्हणण्यांत जीव नाहीं.

—के० १९०७-२३-५-१

३१५

**कायदे व न्यायकोर्टें** हे राजमार्ग आहेत खरे; परंतु रानांत वाट चुकलेल्या मुशाफराप्रमाणें, अन्यायी इंग्रजी दरबारांत नेटिवाला 'मी नेहमीं राजमार्गानेंच जाईन' असें म्हणून उपयोगी नाहीं.

—के० १८९७-१९-३-२

३१६

जेथें **कायदाच** बेकायदेशीर होतो, किंवा कायद्याचे दाखवावयाचे दांत व खाण्याचे दांत निराळे असतात त्या ठिकाणीं आपलें वर्तन कायदेशीर आहे कीं बेकायदेशीर आहे याचा विचार करण्यांत फारसा वेळ न घालवितां, जगाचा इतिहास, पूर्वपरंपरा, नीति व व्यवहार यांचे दृष्टीनें आपलें वर्तन एकंदरीनें फायदेशीर आहे कीं नुकसानीचें आहे एवढ्याच गोष्टीचा विचार करणें श्रेयस्कर होय. —के० १९०७-१९-४-५

३१७

समशक्तीच्या राजेलोकांनींहि जर प्रथम सामदामाचाच उपयोग विहित म्हणून राजनीतींत सांगितला आहे, तर न्याय व हक्क देणारे व घेणारे यांच्या शक्तीमध्यें जमीन-अस्मानाचें अंतर असतां, सामोपचार अर्थात् **कायदेशीर चळवळ** हीच प्रथम करणें जरूर आहे, व ती सर्वांगांनीं पूर्ण होईपर्यंत वाट पाहणें हें प्रजेचें एका दृष्टीनें कर्तव्य आहे.

—के० ले० २-५५६

३१८

**कायदेशीर** राजकीय चळवळ किंवा इंग्रजींत ज्याला 'कॉन्स्टिटयूशनल ॲजिटेशन' म्हणतात, हाच जर आमच्या उन्नतीचा खरा मार्ग असेल तर ती आम्हांस फलद्रूप झाली पाहिजे; आणि नसेल तर हा पंथ सोडून देऊन दुसरा कोणता तरी श्रेयस्कर मार्ग आपणांस पत्करला पाहिजे.

—के० ले० २-४८५

३१९

समाजाच्या चालीरीति पालटण्यास समाजाच्या खऱ्या पुढाऱ्याचें आचरण जितकें कारण होतें, त्याच्या शतांश, नव्हे सहस्रांशहि, **कायद्यांचा** उपयोग होत नाहीं.

—के० १९०३-९-४-५

३२०

**कायद्याचा** अंमल शरीरावर चालतो, मनावर चालूं शकत नाहीं.

—व्या० २-१२२

३२१

हे दिवस दांडगाईचे नाहींत, **कायद्याचे** आहेत हें रयत व सरकारी अंमलदार ह्या दोघांनींहि लक्षांत ठेविलें पाहिजे. के० ले० १-५८८

३२२

हें राज्य **कायद्याचें** आहे, दांडगाईचें नव्हे. राजकीय भांडण झालें तरी कायदेशीर भांडावयास पाहिजे; तसें आपण भांडूं तेव्हांच आपणांस कांहीं हक्क मिळतील.

—के० ले० १-५९०

३२३

आम्ही छातीठोकपणानें जनतेचें आचार-विचार-स्वातंत्र्य **कायद्याच्या** निस्सीम टोंकापर्यंत नेऊन भिडविलें पाहिजे. —आ० आ० १-९३

३२४

**कायद्यानें** भांडत असतांहि बाजू एखादे वेळीं अंगावर येईल, पण त्यास जर आमचे लोक तयार होणार नाहींत तर इंग्रजींत एक म्हण आहे त्याप्रमाणें त्यांच्या तोंडांत भाकरी ऐवजीं माती अगर वाळू पडल्याखेरीज राहणार नाहीं.

—के० ले० १-५९२

३२५

ज्या समाजांत आपणांस रहावयाचें आहे त्याच्या समजुतीविरुद्ध जी **गोष्ट** आपणांस करवत नाहीं ती त्याच्यावर **कायद्यानें** लादणें अगदीं सर्वथा भित्रेपणाचें काम आहे. —के० १८९०-४३-३-३

३२६

मेलों तरी बेहेत्तर; पण **कायद्यानें** दिलेल्या सवलतीचें पुरें माप आम्ही आपल्या पदरांत पाडून घेऊं असा लोकांनीं निश्चय केला पाहिजे.

—के० ले० १-५९२

३२७

मनुष्यमात्राचे सर्व व्यवहार **कायद्यानें** नियंत्रित होऊं शकत नाहींत व करणेंहि इष्ट नाहीं. शिष्टाचाराचा प्रकारहि त्यांतलाच आहे.

—के० ले० १-३११

३२८

मनुष्य कितीहि बुद्धिमान् असला आणि त्याला गरीब लोकांचे हाल कसे होतात याचें जरी पूर्ण ज्ञान असलें तरी त्याच्या अंगांत जर **कारुण्यवृत्ति** जागृत नसेल तर गरीबाला मदत करण्याची इच्छा त्याला कधींच होणार नाहीं. —गी० १३३

३२९

अगाध **काळसमुद्रांतून** एक शतक निघून जाणें म्हणजे पृथ्वीवरील खऱ्या समुद्रांतलें एक शिंपलीभर अगर टिटवीच्या चोंचींत मावण्याइतकें पाणी कमी होणें होय. —के० १९०१-२-२-४

३३०

पिनलकोड हा मारका मास्तर होय; पण **कीर्तनकार** हे सामोपचारानें शिक्षण देणारे गुरु होत. —प० ४

३३१

कीर्तनसंस्था कांहीं सामान्य संस्था नव्हे; शाळेंतील शिक्षक किंवा वर्तमानपत्रकार यांच्यापेक्षांहि **कीर्तनकाराचा** अधिकार मोठा आहे. कारण समाजास वळण लावून देणें हें कांहीं लहानसहान काम नव्हे. —प० १५

३३२

आपद्धर्म म्हणून कां होईना इंग्रजीसारख्या पाश्चात्य भाषेचें अध्ययन करून त्यांतील धार्मिक व नैतिक ज्ञानभांडार श्रोतृवर्गास खुलें करून देऊन तद्द्वारा हिंदु-धर्माची महती स्थापन करणें हें हल्लींच्या काळीं उत्तम **कीर्तनकाराच्या** लक्षणापैकीं एक लक्षण समजण्यास हरकत नाहीं.

—प० १४

३३३

हल्लींचा श्रोतृसमाज पाश्चात्यपद्धतीनें सुसंस्कृत असल्यामुळें त्यावर जर **कीर्तनकाराला** आपली छाप पाडावयाची असली तर ती नव्या संस्कृती-च्या द्वारेंच पाडली पाहिजे. —प० १२

३३४

समाजशिक्षण हें कीर्तनकाराचें मुख्य कर्तव्य आहे, म्हणून समाज जेथें पालटला किंवा समाजाला प्रस्तुतकाळीं ज्याप्रमाणें शिक्षण मिळत

३३७

**कीर्तनाचा** पूर्वरंग साधनकोटींतील लोकांना उपयोगी पडेल असा दाखविला जाऊन तो उज्ज्वल स्वरूपाचा व प्रवृत्तिपर असा असावा.

—प० ११

३३८

विद्या, विवेक, वैराग्य, निस्पृहता व लोककल्याणाची प्रबल इच्छा हे **कीर्तनकाराचे** मुख्य गुण होत. —प० ४

३३९

दिवसभर संसारांत गढलेल्या लोकांचें लक्ष हरिकथानिरूपणानें परमेश्वराकडे लावणें हें **कीर्तनाचें** पहिलें स्वरूप होय. —प० ९

३४०

संसारी मनुष्याच्या मनांत परमेश्वराबद्दल व धर्माबद्दल उदात्त विचार जागृत करणें हें **कीर्तनाचें** ध्येय होय. —प० ४

३४१

**कीर्तनसंस्था** ही नाटकांपेक्षां जास्त उपयुक्त व महत्त्वाची आहे.

—प० ५

३४२

नव्या शिक्षणानें विद्वान् झालेल्या ग्रॅज्युएटांचेंहि लक्ष जर या **कीर्तनसंस्थेकडे** जाईल तर इष्ट सुधारणा लौकरच घडून येतील. —प० १५

३४३

कालचक्राचा मोठा जोर आहे खरा; पण सबंध आगगाडीच्या चक्रांचा मार्ग जर एक सांधेवाला फिरवूं शकतो तर **कुशलपुरुषाला** कालचक्र फिरवून आपणास अनुकूल करून घेतां यावयाचें नाहीं असें नाहीं.

—के० १९०५-२५-४-३

३४४

सूर्याचे किरण जमिनीवर पोंचणें अगर न पोंचणें हें बऱ्याच अंशीं **कोरडया अभ्रांच्या** हातांत असतें ! —के० १८९३-३-२-५

३४५

हल्लीं जे **कृत्रिम उच्चनीच भाव** आहेत ते नष्ट झाले पाहिजेत व कालांतरानें ते होणारच. —के० १९२०-१०-५-५

३४६

आपलीं शस्त्रास्त्रें शत्रूंस दाखवून मग त्यांत यशस्वी होणें यांतच तर खरें पौरुष व युद्ध-**कौशल्य** आहे! —आ० आ० १-१९८

३४७

साधूपणानें दुष्टाच्या दुष्ट कृत्याचें निवारण होत नसेल किंवा सामोपचाराचें व शिष्टाईचें म्हणणें या दुष्टांस पसंत नसेल तर "**कंटकेनैव कंटकं**" या न्यायानें पोटीसानें बाहेर न पडणारा कांटा अखेर साध्या किंवा लोखंडी कांट्यानें म्हणजे सुईनेंच बाहेर काढणें जरूर आहे.

—गी० ३९५.

३४८

कंपनीच्या व्यापाऱ्यांनीं तराजू फेंकून देऊन राजदंड धारण केला तरी, पागेदारी जरी आली, तथापि वाघेपणा जसा स्वभावांतून जात नाहीं, तशी **कंपनीसरकारचीहि** स्थिति होती. —के० १९०२-४२-४-५

३४९

**कंपनीसरकारची** सर्व हिंदुस्थानभर विजयी झालेली कुटिल नीतिच पेशव्यांचें राज्य बुडण्यास बऱ्याच अंशीं कारणीभूत झाली.

—के० १९०२-४२-४-३

३५०

३५१

**कंपनीसारख्या** परकीय व व्यापारी अमलामुळें आमचे उद्योगधंदे बुडत चालले, व पूर्वीं कधींमधीं सणासारखा पाहुणा म्हणून येणारा दुष्काळ आमचा कायमचाच धनी होऊन बसला !

—के० १९०२-४२-४-५

३५२

धर्माची सत्यनिष्ठा, कर्णाची उदारता, भीमाचें बाहुबल, अर्जुनाचें हस्त-कौशल्य इ० गुणांचें कितीहि कौतुक करावेंसें वाटलें तरी **कृष्णाचें** मुत्सद्दी-पण आणि भीष्माचा दृढनिश्चय या दोन गुणांपुढें इतर सर्व गुण फिके पडतात.

—आ० आ० १-१४७

३५३

सृष्टिक्रमांत एखादी अवाढव्य अदलाबदल किंवा **क्रांति** जेव्हां व्हावयाची असते तेव्हां तिचें दिग्दर्शन अल्प गोष्टीनें पूर्वींच होऊन चुकतें.

—कें० ले० १-४५८

३५४

मनुष्य एकदां **क्रोधवश** झाला म्हणजे तो काय करील आणि काय न करील याचा नेमच राहत नाहीं.

—के० १९१९-४९-४-२

३५५

मुख्य **खजिन्याची** किल्ली हातीं असली म्हणजे जुलुमाची भीति आट-पलीच.

—के० १८९०-२०-२-६

३५६

हल्लीं हिंदुस्थानांत गोऱ्या सनदी नोकरांनीं जी जुनी राज्यपद्धति चाल-विली आहे, ती हाणून पाडण्याचा यत्न करण्यास पुढील पिढी आम्हांस तयार केली पाहिजे. सरकारी कॉलेजांत किंवा शाळांत हें शिक्षण मिळत नाहीं. सरकार ही गोष्ट करीत नाहीं तर न करूं द्या. पण ती खाजगी शाळांनीं अवश्य केली पाहिजे; **खाजगी शाळांचें** अस्तित्व जर कशाकरितां पाहिजे असेल तर तें याचकरितां होय. आणि हें जर काम त्यांच्याकडून होत नसेल तर त्या असून नसून सारख्याच.

—च० सु० ८०

## ३५७

शिक्षण जितकें सुगम व सुलभ करतां येईल तितकें करणें हेंच **खाजगी शाळांचें** मुख्य कर्तव्य आहे. —के० १८९६-३१-२-४

## ३५८

प्राचीन काळीं प्रत्येक **खेडेगांव** म्हणजे एक लहानशी स्थानिक स्वराज्याची संस्थाच होती. —के० १९०३-४५-४-४

## ३५९

मुळांत केवळ कर्ममय अशा यहुदी धर्मांत सुधारणा म्हणून संन्यासयुक्त भक्तिमार्ग प्रतिपादणारा **खिस्तीधर्म** उद्भवण्यास काय कारण झालें असावें हा मुख्य प्रश्न आहे; आणि खिस्तापेक्षां निःसंशय प्राचीन अशा [illegible]

### ३६३

इतिहासावरून निष्पन्न होणारी परंपरा पाहिली म्हणजे डॉ० लॉरिनसन म्हणतो त्याप्रमाणें खिस्तीधर्मांतून कांहींतरी गीतेंत घेतलें जाण्याची **गोष्ट** तर दूरच; पण उलटपक्षीं आत्मौपम्यदृष्टीचीं, संन्यासाचीं, निर्वैरत्वाचीं **किंवा** भक्तीचीं जीं तत्त्वें बायबलाच्या नव्या करारांत आढळून येतात, तीं **खिस्ती धर्मांतच** बौद्ध धर्मांतून म्हणजे परंपरेनें वैदिक धर्मांतून घेतलेलीं असण्याचा मात्र बळकट संभव किंवा बहुतेक खातरी आहे. हिंदु लोकांस त्यासाठीं दुसऱ्याच्या तोंडाकडे पहाण्याची केव्हांच बिलकुल जरूर नव्हती.

—गी० ५८८

### ३६४

खिस्तास 'क्रूसा'वर चढवून त्याचा वध केल्यामुळें **खिस्ती लोकांस** पवित्र व पूज्य झालेली 'क्रूसा'ची खूणहि 'स्वस्तिक' या रूपानें वैदिक **व** बौद्ध धर्मांतील लोक खिस्तापूर्वीं शेकडों वर्षें शुभदायक मानीत होते; आणि इजिप्त वगैरे पृथ्वीच्या जुन्या खंडांतील देशांतच नव्हे तर कोलंबसापूर्वीं कांहीं शतकें अमेरिकेंतील पेरू व मेक्सिको देशांतहि स्वस्तिक चिन्ह शुभावह मानिलें जात होतें असें प्राचीन शोधकांनीं ठरविलें आहे. यावरून खिस्ताच्या पूर्वींच सर्व लोकांस पूज्य झालेल्या स्वस्तिक चिन्हाचा खिस्तभक्तांनीं पुढें एका विशिष्ट रीतीनें उपयोग करून घेतला आहे, असें अनुमान करावें लागतें.

—गी० ५८४

### ३६५

पंढरीच्या उत्सवासारखा एखाददुसरा उत्सव सर्व लोकांस प्रिय होण्यासारखा आहे. पण हे उत्सव अथवा यात्रा पुरातन असल्यानें त्यांचें स्वरूप आपणास पाहिजे तशा रीतीचें करणें अशक्य नसलें तरी बहुतेक असाध्य आहे असें म्हटलें तरी चालेल. त्यांतून, जो सार्वजनिक उत्सव असावयाचा तो ठिकठिकाणच्या लोकांस आपापल्या गांवीं करतां येण्यासारखा पाहिजे. तसा विठोबाच्या यात्रेचा प्रकार नाहीं. ही उणीव **गणपतीच्या उत्सवानें** नाहींशी होईल अशी आमची समजूत आहे.

—के० ले० १-४८७

३६६

**गणिताची** ज्याला गोडी नाहीं किंवा गणितांत ज्याचें डोकें शिरत नाहीं त्याची विचारसरणी एक प्रकारें अपक्क (Defective) राहते. गणिताच्या योगानें विचारांची सांखळी अत्रुटित व सुसंबद्ध होते.

—आ० आ० १-७९

३६७

केवळ **गतानुगतिकत्व** हा जसा दोष आहे, तसाच लोकप्रिय गोष्टींचा विनाकारण तिरस्कार करणें हाहि पण तितकाच मोठा दोष होय.

—के० १९०४-२-४-४

३६८

**गनिमी काव्याची** लढाई म्हणजे आंधळ्या कोशिंबिरींतील पाठशिवणीच्या डावाची थोरली नकल आहे. —के० १९०२-२८-४-५

३६९

**गनिमी काव्याचा** आश्रय केला असतां, एक दहांना भारी होतो.

—के० १९०२-२४-४-५

३७०

**गनिमी काव्याच्या** लढाईचे वेळीं योद्ध्याच्या प्रधानअंगाची खरी परीक्षा होते व त्यामुळें संग्रामदेवतेचें शाश्वत स्वरूपहि नजरेस पडतें.

—के० १९०२-२४-४-४

३७१

धैर्य, बुद्धि व परपक्षासारखीं शस्त्रें इतकी सामुग्री गोळा केल्यावर

३७३

आश्रा घेण्यास व शत्रूस चुकवून पळण्यास योग्य असा डोंगराळ प्रदेश, शत्रूंशीं लपंडाव करून स्वजनास मदत करण्यास उत्सुक असलेला जनपद, देशाभिमानी, शूर व चपल असे लढवय्ये, व क्षणोक्षणीं लढाईचें धोरण बदलणारे व प्रसंगीं योग्य अशा डावपेंचांनीं शत्रूस जेरीस आणणारे सेनापति, या सर्वांचें योग्य संमेलन झालें असतां **गनिमी काव्याच्या** लढाईस तेजी येते. —के० १९०२-२८-४-५

३७४

**गनिमी काव्याच्या** लढाईस एक तऱ्हेची देशाची रचनाच असावी लागते; डोंगर व नद्या यांचें प्राधान्य व सपाट मैदानाची कमताई अशी देशाची रचना असल्याशिवाय या लढाईस तेजी येत नाहीं.

—के० १९०२-२९-४-४

३७५

**गनिमी काव्याच्या** पद्धतीनें लढाई चालली असतां, दुर्बल पक्षास युद्धकलेच्या प्रधानतत्त्वांचा जितका वारंवार व क्षणोक्षणीं उपयोग करावा लागतो, तितका उपयोग इतर ठिकाणीं क्वचित्‌च केलेला दृष्टीस पडतो.

—के० १९०२-२८-४-३

३७६

मोठ्या अपजयानें लढणारांची रग कांहीं काळपर्यंत नाहींशी होते, ही गोष्ट खरी; पण **गनिमी काव्यानें** लढणारांना समूळ उपटून काढण्यास असले अपजय पुरेसे होत नाहींत. —के० १९०२-२९-४-४

३७७

नेपोलियननें केलेले असंख्य पराक्रम कालांतरानें विसरण्यांत येतील; पण स्पॅनिश लोकांनीं केलेली **गनिमी काव्याची लढाई** युरोपचे इतिहासांत चिरस्मरणीय राहील. —के० १९०२-३०-४-५

३७८

**गरीब विद्यार्थ्यांना** शिक्षणाचा लाभ करून देणें हें पवित्र कर्तव्य आहे.

—के० १९१८-१३-२-५

३७९

**गरीब** परंतु बुद्धिमान् विद्यार्थ्यांस अधिक उत्तेजन दिल्यानेंच देशांत विद्येची अभिवृद्धि जास्त होण्याचा संभव आहे. —के० १९०२-२३-४-५

३८०

**गायनाभिरुचि** ही मनुष्याच्या अंतःकरणांतील एक नैसर्गिक व उदात्त-वृत्ति असून तिची वृद्धि झाल्यानें त्याच्या एकंदर स्वभावावर व आचरणावर उदात्त परिणाम झाल्याशिवाय रहावयाचा नाहीं.

—के० १८९२-३४-२-५

३८१

इतर नैसर्गिक मनोवृत्तींप्रमाणें **गायनाभिरुचीसहि** चांगलें वळण देणें हें सुशिक्षणाचें एक प्रधान अंग आहे. —के० १८९२-३४-२-५

३८२

आपला हिंदुस्थानदेश ज्ञानाचें, वैभवाचें, यशाचें आणि पूर्ण स्वराज्याचें सुख अनुभवीत आहे अशी जेव्हां त्याची चोहोंकडे ख्याति झाली होती, तेव्हां एका सर्वज्ञ, महापराक्रमी, यशस्वी व परमपूज्य क्षत्रियानें दुसऱ्या महान् धनुर्धरास क्षात्रधर्माच्या स्वकार्यास प्रवृत्त करण्यासाठीं **गीता** उपदेशिली आहे. —गी० ४४२

३८३

ब्रह्मविद्यामूलक भक्ति गीतेंत प्रतिपाद्य आहे, इतकेंच नव्हे तर त्याबरोबर तितक्याच योग्यतेचा निष्काम-कर्मयोगहि आवश्यक म्हणून प्रतिपादिला असल्यामुळें **गीता** हें ब्रह्मविद्यामूलक भक्तिसहचारी नीतिशास्त्र होय असें माझें मत आहे. —के० १९१४-३७-७-१

३८४

हवेंत ज्याप्रमाणें ऑक्सिजन, हैड्रोजन व नायट्रोजन असतात, पण त्यांचें मिश्रण जसें निराळेंच असतें, त्याप्रमाणें ज्ञान, भक्ति व कर्म या तिहींची गोष्ट आहे. यांचा मेळ **गीता** घालते. —स्व० मो० ६६

३८५

महाभारत हा ग्रंथ विस्तीर्ण असल्यामुळें त्यांत मधून मधून दुसरे श्लोक घालणें किंवा असलेले काढणें शक्य आहे. परंतु गीतेची गोष्ट तशी नाहीं. **गीता** हा ग्रंथ नेहमींच्या पाठांतला असून वेदांप्रमाणें सबंध गीताहि तोंडपाठ म्हणणारे पुष्कळ लोक पूर्वी होते व अद्यापहि कांहीं आहेत. हल्लींच्या गीतेंत पाठांतरें फारशीं आढळून येत नाहींत आणि जे थोडे भिन्न पाठ आहेत ते टीकाकारांस माहीत आहेत याचें कारणहि हेंच होय. शिवाय गीताग्रंथांत फेरबदल करूं नये या हेतूनेंच त्यांत बरोबर सातशें श्लोक घातले असावे, असेंहि म्हणण्यास हरकत नाहीं. —गी० ५०८

३८६

श्रीकृष्णांनीं युद्धारंभींच अर्जुनास गीता सांगितली ही परंपरागत कथा क्षणभर बाजूला ठेवून महाभारत हें धर्माधर्म-निरूपणार्थ रचलेलें एक आर्ष महाकाव्य अशा बुद्धीनें जरी विचार केला, तरी **गीता** सांगण्यास भारतांत जी स्थलयोजना केली आहे तीच गीतेचें महत्त्व लोकांचे लक्षांत भरण्यास काव्यदृष्टयाहि योग्य आहे. —गी० ५०६

३८७

**गीता** हें महाभारताचें रहस्योपनिषत् व शिरोभूषण होऊन, महाभारत हें गीतेंत प्रतिपादलेल्या मूलभूत कर्मतत्त्वांचें सोदाहरण विस्तृत व्याख्यान झालें आहे. --गी० ५०

३८८

इसापाचे गोष्टीच्या शेवटीं जसें एक Moral असतें त्याप्रमाणें '**गीता**' हें महाभारताचें Moral आहे. —के० १९१४-३६-२-५

३८९

तत्त्वज्ञानाचा उदय आमच्या देशांत प्राचीन काळींच झाला असल्या-मुळें **गीताधर्मांत** श्रद्धा आणि ज्ञान यांचा विरोध न येतां वैदिक ज्ञानमार्ग श्रद्धापूत तर वैदिक भक्तिमार्ग ज्ञानपूत झालेला आहे व त्यामुळें मनुष्य कोणत्याहि मार्गानें गेला तरी अखेर त्याला एकच सद्गति प्राप्त होते.

—गी० ४३२

३९०

ज्ञानानें आणि श्रद्धेनें, पण त्यांतले त्यांतहि विशेषेंकरून भक्तीच्या सुलभ राजमार्गानें, बुद्धि होईल तितकी सम करून प्रत्येकानें लोकसंग्रहार्थ स्वधर्माप्रमाणें आपापलीं कर्में निष्कामबुद्धीनें आमरणान्त करीत राहणें हेंच त्याचें परम कर्तव्य असून यांतच इहलौकिक व पारलौकिक कल्याण आहे. मोक्षप्राप्तीसाठीं कर्में सोडण्याची किंवा दुसरें कोणतेंहि अनुष्ठान करण्याची जरूर नाहीं हा सर्व **गीताशास्त्राचा** फलितार्थ होय. —गी० ५९१

३९१

सर्वतोपरी निर्भय व व्यापक असून सम म्हणजे वर्णाचा, ज्ञातीचा, देशाचा किंवा दुसरा कोणताच भेद न ठेवितां सर्वांस एकाच मापानें एकच सद्गति देणारा व इतर धर्मांबद्दल योग्य सहिष्णुता दाखविणारा ज्ञान-भक्तिकर्मयुक्त **गीताधर्म** सनातन वैदिकधर्मवृक्षाचें अत्यंत मधुर व अमृतफल आहे. —गी० ५०३

३९२

एका **गीताधर्मांत** सकल वैदिक धर्मांचें सार आलें आहे. हा नित्यधर्म ओळखून केवळ कर्तव्य म्हणून सर्वभूतहितार्थ शेंकडों खटाटोप करणारे महात्मे व कर्ते पुरुष जेव्हां या भरतभूमीस अलंकृत करीत होते तेव्हां हा देश परमेश्वराच्या कृपेस पात्र होऊन ज्ञानाच्याच नव्हे तर ऐश्वर्याच्याहि शिखरास पोंचला होता. आणि हा उभयत्र श्रेयस्कर पूर्वतर धर्म सुटला तेव्हां त्याला निकृष्ट स्थिति प्राप्त झाली. —गी० ५०३

३९३

ज्ञानोत्तरहि संन्यासमार्ग पतकरण्यापेक्षां कर्मयोग स्वीकारणें हाच उत्तम पक्ष होय असा **गीतेचा** कायम सिद्धान्त आहे. —गी० ३०७

३९४

ब्रह्मज्ञान व भक्ति यांची जोड घालून अखेर तद्द्वारा कर्मयोगाचें समर्थन करणें हाच **गीतेचा** मुख्य प्रतिपाद्य विषय आहे. —गी० ४६७

३९५

अध्यात्मदृष्ट्या मनुष्याची परमश्रेष्ठ अवस्था कोणती तें सांगून त्याच्या आधारें कर्माकर्मरूप नीतिधर्मांचें मूलतत्त्व काय, तें ठरविणें हा **गीतेचा** मुख्य विषय होय. —गी० ५०२

३९६

गंगेस दुसऱ्या कितीहि नद्या येऊन मिळाल्या तरी गंगेचें स्वरूप त्यामुळें जसें भंगत नाहीं तद्वतच **गीतेचीहि** गोष्ट आहे. त्यांत सर्व कांहीं असलें तरी कर्मयोग हाच मुख्य प्रतिपाद्य विषय होय. परंतु कर्मयोग जरी मुख्य विषय आहे तरी कर्माबरोबरच मोक्षधर्माचें मर्महि यांत सुंदर रीतीनें निरूपिलें आहे. —गी० ४६७

३९७

वैराग्ययुक्त ज्ञानाची म्हणजे संन्यासमार्गाची उपनिषत्कालीं सरशी होऊं लागल्यावर यज्ञयागादि कर्माकडे किंवा चातुर्वर्ण्यधर्माकडेहि ज्ञानी पुरुष साहजिकरीत्या दुर्लक्ष करूं लागले; आणि लोकसंग्रह करणें हें आपलें कर्तव्य आहे, ही समजूत मंदावत चालली. स्मृतिकारांनीं आपापल्या ग्रंथांतून गृहस्थाश्रमांत यज्ञयागादि श्रौत किंवा चातुर्वर्ण्याचीं स्मार्त कर्में केलींच पाहिजेत, असें सांगून गृहस्थाश्रमाची थोरवी गाइली आहे खरी; पण स्मृतिकारांच्या मतेंहि अखेर वैराग्य व संन्यासाश्रम श्रेष्ठ असल्यामुळें, उपनिषदांनीं कर्मकांडाला आलेलें गौणत्व स्मृतिकारांच्या आश्रमव्यवस्थेनें कमी होणें शक्य नव्हतें. अशा स्थितींत ज्ञानकांड व कर्मकांड यांपैकीं कोणासहि गौणत्व न देतां या दोघांचीहि भक्तीला जोडून एकवाक्यता करण्यास **गीतेची प्रवृत्ति** झालेली आहे. —गी० ३४२

३९८

**गीतेचा** कटाक्ष भगव्या किंवा पांढऱ्या वस्त्रांवर अगर विवाह किंवा ब्रह्मचर्य यांवरहि नसून ज्ञानी पुरुष जगाचे व्यवहार करितो किंवा न करितो एवढ्या एकाच गोष्टीवर नजर देऊन संन्यास व कर्मयोग या दोन मार्गांचा गीतेंत भेद केलेला आहे. —गी० ३०२

३९९

इंद्रियांच्या व मनाच्या वृत्ति मारण्याच्या भरीस न पडतां, सदर वृत्ति आपल्या फायद्याच्या होण्यास इंद्रियें व मन आपल्या ताब्यांत ठेवा, स्वैर होऊं देऊं नका, असा भगवंतांचा उपदेश आहे. हा उपदेश, आणि तृष्णा किंवा तृष्णेबरोबरच इतर सर्व मनोवृत्ति समूळ नाहींशा करा म्हणणें, यांत जमीनअस्मानाचें अंतर आहे. जगांतील सर्व कर्तृत्व किंवा पराक्रम अजीबात नाहींसा करावा असें गीतेचें तात्पर्य नसून उलट अठराव्या अध्यायांत कर्त्याचे अंगीं समबुद्धीबरोबरच धृति व उत्साह हे गुण पाहिजेत, असें **गीताशास्त्र** सांगत आहे. –गी० १००

४००

गीतेंतील भक्तिमार्ग कर्मप्रधान असून केवळ पुष्पांनीं किंवा वाचेनेंच नव्हे तर स्वधर्मोक्त निष्काम-कर्मांनींहि परमेश्वराचें पूजन होतें व असें पूजन प्रत्येकानें अवश्य केलें पाहिजे हें त्यांतील मुख्य तत्त्व आहे. आणि कर्ममय भक्तीचें हें तत्त्व गीतेप्रमाणें ज्या अर्थीं कोठेंच प्रतिपादिलें नाहीं त्या अर्थीं हेंच **गीतेंतील भक्तिमार्गाचें** विशेष लक्षण म्हटलें पाहिजे.
–गी० ४३६

४०१

पिंडब्रह्मांडज्ञानपूर्वक आत्मविद्येचीं गूढ व पवित्र तत्त्वें थोडक्यांत पण असंदिग्ध रीतीनें सांगून त्यांच्या आधारें मनुष्यमात्रास आपल्या आध्यात्मिक पूर्णावस्थेची म्हणजे परमपुरुषार्थाची ओळख करून देणारा आणि त्याबरोबरच भक्तीची ज्ञानाशीं व अखेर या दोहोंचीहि शास्त्रतः प्राप्त होणाऱ्या व्यवहाराशीं सोपपत्तिक व सुंदर जोड घालून संसारांत भांबावून गेलेल्या मनास शांत आणि विशेषतः निष्काम कर्तव्याचरणास प्रवृत्त करणारा **गीतेसारखा** दुसरा बालबोध ग्रंथ संस्कृतांतच काय पण जगांतील इतर वाङ्मयांतहि सांपडणें दुर्मिळ होय. –गी० पा० १

४०२

यज्ञयागादिकच काय पण चातुर्वर्ण्याचीं सर्व कर्मेंहि ब्रह्मात्मैक्यज्ञानानें व साम्यबुद्धीनें आसक्ति सोडून करा, म्हणजे कर्मचक्र कायम ठेवूनहि तुम्ही मुक्तच आहां हें सर्व **गीतोपदेशाचें** सार आहे. –गी० २९१

४०३

ज्ञान, भक्ति व कर्म यांचा उत्तम मेळ घालूनच कृष्णांनीं अर्जुनाला युद्धास प्रवृत्त केलें आहे व हेंच **गीतेचें रहस्य** होय. —च० सु० ९१

४०४

एखाद्या कर्माचा भयंकर परिणाम डोळ्यापुढें दिसत असतांहि शहाण्या पुरुषानें तें कां केलें पाहिजे हें सांगण्यासाठींच गीताशास्त्राची प्रवृत्ति झाली असून, **गीतेचें** जें काय वैशिष्ट्य आहे तेंहि हेंच होय. —गी० २९९

४०५

ब्रह्मज्ञानाच्या व भक्तीच्या जोडीनें निष्काम-कर्मयोग प्रतिपादन करणें हाच **गीतेंतील** मुख्य विषय होय. —के० १९१५-४३-२-१

४०६

**गीतेंतील** ब्रह्मज्ञान जरी उपनिषदांच्याच आधारें सांगितलें आहे तरी उपनिषदांतील अध्यात्मज्ञानाचाच केवळ अनुवाद न करितां त्यांत वासुदेवभक्तीची आणि सांख्यशास्त्रांतील सृष्ट्युत्पत्तिक्रमाची म्हणजे क्षराक्षरज्ञानाची भर घालून सामान्य जनास आवरण्यास सुलभ आणि उभयत्र श्रेयस्कर अशा वैदिक कर्मयोग-धर्माचेंच गीतेंत मुख्यत्वेंकरून प्रतिपादन केलेलें आहे; आणि उपनिषदांपेक्षां गीतेंत जें कांहीं **विशेष** आहे तें हेंच होय. —गी०-५२७.

४०७

हिंदुधर्म व नीतिशास्त्र यांच्या मूलतत्त्वांची ज्यांस ओळख करून घ्यावयाची असेल त्यांनीं या अपूर्व ग्रंथाचें प्रथम अध्ययन करावें. कारण सांख्य, न्याय, मीमांसा, उपनिषदें, वेदान्त वगैरे क्षराक्षर सृष्टीचा व क्षेत्र-क्षेत्रज्ञ ज्ञानाचा विचार करणारीं प्राचीन शास्त्रें तत्कालीं शक्य तेवढ्या पूर्णावस्थेस आल्यावर वैदिक धर्मास ज्ञानमूलक भक्तिप्रधान व कर्मयोगपर असें जें अखेर स्वरूप आलें, व हल्लीं प्रचलित असलेल्या वैदिकधर्माचें जें मूल आहे, तेंच गीतेंत प्रतिपादिलेलें असल्यामुळें संक्षेपानें पण निःसंदिग्ध रीतीनें सांप्रतच्या हिंदुधर्माचीं तत्त्वें समजावून देणारा **गीतेसारखा** दुसरा ग्रंथच संस्कृत वाङ्मयांत नाहीं म्हटलें तरी चालेल. —गी० ११

४०८

सर्व कालीं एकसारखेंच लागू पडणारें, म्हणजे त्रिकालाबाधित ज्ञान सांगणाऱ्या **गीतेसारख्या** ग्रंथानें कालभेदानुरूप नवें नवें स्फुरण मनुष्याला प्राप्त व्हावें यांत कांहीं नवल नाहीं. कारण अशा व्यापक ग्रंथाचा हा धर्मच असतो. परंतु तेवढ्यानें प्राचीन पंडितांनीं असल्या ग्रंथावर जे परिश्रम केलेले असतात ते व्यर्थ होत नाहींत. —गी० १३

४०९

शिष्याचें राष्ट्रहित जो पहात नाहीं तो त्याचा **गुरु** नव्हे.
—के० १९०५-४२-४-५

४१०

गुरूपगुरूंच्या विद्याव्यासंगाचा आणि सद्वर्तनाचा परिणाम शिष्यांच्या मनावर होण्यास **गुरुजी** खरोखर विद्याव्यसनी असून छात्रवर्गाशीं प्रेमभावानें वागणारे असले पाहिजेत. —के० १८९६-८-३-१

४११

वडील किंवा **गुरु** यांस शास्त्रांमध्यें जो मान सांगितला आहे तो सर्व आपणांस मिळावा अशी ज्यांची इच्छा असेल त्यानें पुत्राच्या किंवा शिष्याच्या कल्याणाचाच उपदेश त्यांस करण्यास नेहमीं तयार असलें पाहिजे. —के० १९०५-४४-४-४

४१२

विवर्तवादाप्रमाणें मूळ निर्गुण परब्रह्मांत एकदां मायेचा देखावा उत्पन्न झाल्यावर, या मायिक देखाव्याच्या म्हणजे प्रकृतीच्या पुढील विस्ताराच्या उपपत्तीसाठीं **गुणोत्कर्षाचें** तत्त्व गीतेसहि मान्य झालेलें आहे. सर्व दृश्य जग हाच मायात्मक देखावा म्हटलें म्हणजे या देखाव्याचीं जीं रूपांतरें होतात त्यांना गुणोत्कर्षासारखा कांहीं नियम असूं नये असें म्हटलेंच पाहिजे असें नाहीं. मायात्मक देखाव्याचा विस्तारहि नियमबद्धच असतो हें वेदांत्यांस नाकबूल नाहीं. —गी० २४०

४१३

वयांत आलेल्या मुलास स्वतंत्रता न देतां त्याला वडिलोपार्जित मिळालेल्या इस्टेटीवरहि जर बाप डोळा ठेवूं लागला, अथवा सरकारच्या प्रत्यक्ष किंवा परोक्ष कह्यांत गुंतून एखादा **गुरु** जर शिष्याच्या मनोवृत्तीस व ज्ञानास आळा घालूं लागला तर त्यासहि पुत्रानें आणि शिष्यानें मान दिलाच पाहिजे असें जगांतील कोणतेंहि शास्त्र प्रतिपादन करीत नाहीं.

—के० १९०५-४४ ४-४

४१४

आधिभौतिक शास्त्रांचें ज्ञान आतां पुष्कळ वाढलें असल्यामुळें, 'सत्त्व' 'रज', 'तम' या सांख्यांच्या तीन गुणांऐवजीं अर्वाचीन सृष्टिशास्त्रज्ञांची गति, उष्णता किंवा आकर्षणशक्ति यांच्या कमीजास्तपणाची समजूत अधिभौतिक शास्त्रदृष्ट्या अधिक लवकर पडत्ये हें खरें, तथापि 'गुणा गुणेषु वर्तन्ते' असें जें गुणांच्या पसाऱ्याचें किंवा **गुणोत्कर्षाचें** तत्त्व तें दोहोंकडे एकच आहे.

—गी० १६९

४१५

शिष्य ज्या राष्ट्राचा अवयव आहे तें राष्ट्र सुधारलेल्या राष्ट्रांच्या बरोबरीनें वाढावें आणि त्याकरितां या शिष्यानें उद्योग करावा आणि अशा प्रकारचा उद्योग तो करील अशी आपल्या शिक्षणानें त्याच्या मनांत हिंमत यावी अशी **गुरूची** इच्छा असली पाहिजे. —के० १९०५-४२-४-५

४१६

ज्या देशांत केवळ उदरभरणासक्त, काबाडकष्ट करणारे व क्षणिकसुखांत धन्यता मानणारे लोक असतात तो देश पशूंना योग्य अशा **गुलामगिरींत** लोळत पडणार. —के० १९०३-३७-४-३

४१७

**गुलामगिरी** हा धंदाच असा आहे कीं, गुलामाचा धनी त्यामुळें आपणांस कितीहि कृतकृत्य समजत असला तरी गुलामाबरोबर धन्याची स्वतंत्रता त्यामुळें कमी होत असते. —के० १९०४-४९-४-५

४१८

लवकर घडून येणारी **गोष्ट** लवकरच नष्ट होते व चांगली गोष्ट घडून येण्यास कालावधीच लागत असतो. —के० १९१७-७-५-४

४१९

ज्याच्या भाषणांत किंवा शब्दांत गोंधळ आहे त्याच्या विचारांतहि **गोंधळ** असावयाचाच. —के० १९०७-१५-४-२

४२०

सौम्य पण शिस्तवार **गृहशिक्षणाचा** व गृहस्थितीचा लहानपणीं मुलांच्या मनावर किती परिणाम होत असतो हें सांगावयास पाहिजे असें नाहीं. —विष्णु० ४

४२१

'साठी बुद्धि नाठी' या म्हणीचा खरा अर्थ साठ वर्षे पुरीं झालीं असतां **गृहस्थाश्रमांतील** बुद्धि नाठी—अस्थायिक होते हा होय. ६१ वें वर्ष हें परिणत प्रज्ञेचें लक्षण होय. —के० १९१७-३९-२-२

४२२

ज्या देशांतील पुढारी कुटुंबांतील **गृहव्यवस्था** बिघडलेली असते त्यांत चांगले पुरुष निपजणें कठीण आहे. —विष्णु० ४

४२३

**सौम्य** पण शिस्तवार **गृहशिक्षणाचा** व गृहस्थितीचा लहानपणीं मुलांच्या मनावर **फार** परिणाम होत असतो. —के० १९०१-१२-२-२

४२४

### ४२६

**ग्रंथ** वाचतांना लिहिणाराचा हेतु शोधून काढून तो हेतु शेवटपर्यंत साधला आहे कीं नाहीं हें पाहिलें पाहिजे. —के० १९१४-३६-२-४

### ४२७

**सद्ग्रंथसंग्रहा**करितां हपापून थोडें पाप करावें लागलें तरी विद्यार्थि-पेशाच्या माणसानें मागेंपुढें पाहूं नये. —आ० आ० १-२-८९

### ४२८

" माझा जन्म साहेब लोकांनीं लिहिलेल्या ग्रंथांचीं भाषांतरें करून देण्यासाठीं नाहीं. माझे हातून पुढेंमागें कांहीं **ग्रंथकर्तृत्व** व्हावयाचें असेल तर तें त्या त्या विषयावर मातृभाषेंत स्वतंत्र ग्रंथ निर्माण करण्यांतच इष्टोत्पत्तीस येईल. मला एखाद्या विषयावर स्वतंत्र ग्रंथ लिहावयास सांगा, माझी केव्हांहि तयारी आहे. —आ० आ० १-१५७

### ४२९

स्वदेश पारतंत्र्यांत असतांना **ग्रंथलेखना**सारखीं कामें हीं मुख्य नसून फुरसतीच्या अगर तुरुंगवासांतील अपरिहार्य विश्रांतीच्या काळांतच करण्यासारखीं असतात. —आ० आ० १-२२८

### ४३०

कोणताहि धर्मपंथ निघाल्यावर लागलीच त्यावरील **ग्रंथ** तयार होतात असें नाहीं; आणि भारत व गीता यांसहि तोच न्याय लागू पडतो. —गी० ५५०

### ४३१

कोणत्याहि ग्रंथाचें तात्पर्य, त्यांच्यातील विचारसरणीशीं वाचकानें क्षणभर आपलें तादात्म्य करून ठरवावें लागतें; आणि हें काम पूर्वग्रहा-मुळें कांहीं स्थलीं जरी कठीण असलें तरी वाचकानें किंवा ग्रंथपरीक्षकानें आपल्या या पूर्वग्रहास ताब्यांत ठेवून कोणत्याहि ग्रंथाचें परीक्षण करणें हेंच आधुनिक [illegible]

४३२

फालतू लेखक सोडून द्या, पण खरे स्फूर्ति असणारे जे **ग्रंथकार** असतात, ज्यांच्या वाणीला कृत्रिमपणाचा विटाळ होत नाहीं, त्यांच्या विचारांचा ओघ अगदीं सहज अस्खलित असतो; त्यामुळें ते पुढें काय सांगणार हें रसिकाला आगाऊच कळावयालाहि अडचण पडत नाहीं.

—आ० आ० १-८०

४३३

कोणत्याहि भाषेंतील **ग्रंथसंग्रह** वाढविण्याचें काम ती भाषा बोलणाऱ्या लोकांच्या अंगीं उत्साह आणि कांहीं विशिष्ट हेतूकरितां खटपट करण्याची बुद्धि हीं जागृत असल्याखेरीज होत नाहीं. —के० १८९६-२३-३-४

४३४

कोणत्याहि भाषेंत चांगली **ग्रंथरचना** होण्यास (१) शब्दसामुग्री, (२) विचारसंग्रह आणि (३) ग्रंथाची जरूरी या तिन्ही साहित्यांची अपेक्षा असते. —के० १८९४-१०-२-४

४३५

कोणत्याही **ग्रंथाची** परीक्षा करावयाच्या दोन दृष्टि आहेत; एक धर्म-दृष्टि व दुसरी काव्यदृष्टि. —के० १९१४-३६-२-४

४३६

**ग्रंथाचें परीक्षण** दोन प्रकारचें असतें; एक अंतरंग-परीक्षण व दुसरें बहिरंग-परीक्षण. समग्र ग्रंथ अवलोकन करून त्यांतील मर्म, रहस्य, मथितार्थ किंवा प्रमेय काढणें यास 'अंतरंग-परीक्षण' हें नांव असून, ग्रंथ कोठें व कोणीं केला, त्याची भाषा कशी आहे, काव्यदृष्ट्या त्यांत माधुर्य किंवा प्रसाद हा गुण कितपत वठला आहे, ग्रंथांतील शब्दरचना व्याकरण-शुद्ध आहे किंवा त्यांत कांहीं जुने आर्ष प्रयोग आहेत अगर कोण-कोणत्या मतांचा, स्थलांचा किंवा व्यक्तींचा त्यांत उल्लेख केला आहे व त्यावरून ग्रंथाचा कालनिर्णय करण्यास अथवा तत्कालीन समाजस्थिति समजण्यास कांहीं साधन मिळतें कीं नाहीं, ग्रंथांतील विचार स्वतंत्र आहेत कीं दुसऱ्यापासून घेतलेले आहेत व दुसऱ्यापासून घेतलेले असल्यास कोठून व कोणते इत्यादि केवळ बाह्यांगांचें विवेचन करणें यास 'बहिरंग-परीक्षण' असें म्हणतात. —गी०-६

४३७

कोणत्याहि दोन ग्रंथांतील सिद्धान्त एकसारखे आहेत एवढ्याच गोष्टीवरून त्यांपैकीं पहिला कोणता, मागाहूनचा कोणता याचा निर्णय होऊं शकत नाहीं. कारण (१) या दोहोंपैकीं पहिल्या ग्रंथांतील विचार दुसऱ्यावरून किंवा (२) दुसऱ्या ग्रंथांतील विचार पहिल्यावरून घेतले असतील असे दोन्ही पक्ष या ठिकाणीं संभवतात. म्हणून कोणत्याहि दोन **ग्रंथांचे काळ** स्वतंत्ररीत्या प्रथम निश्चित केल्यानंतर मग विचारसादृश्यावरून अमक्यानें अमक्यापासून अमुक विचार घेतले असतील असें ठरवावें लागतें; शिवाय एकमेकांसारखे विचार दोन देशांत दोन ग्रंथकारांस स्वतंत्रपणें एकाच काळीं किंवा भिन्न काळीं सुचणें अगदींच अशक्य नसल्यामुळें, दोन ग्रंथांमधील साम्य पहातांना तें स्वतंत्ररीत्या उद्‌भवण्यासारखें आहे कीं नाहीं आणि ज्या दोन देशांत हे ग्रंथ झाले त्यांमध्यें तत्कालीं कांहीं दळणवळण असून एका देशांतून हे विचार दुसऱ्या देशांत जाण्याचा संभव होता कीं नाहीं याचाहि विचार करावा लागतो. —गी० ५८१

४३८

जें तात्पर्य ग्रंथाचा आरंभ आणि शेवट यांस न सोडितां या दोन टोकांमध्यें नीट बसतें तेंच त्या **ग्रंथाचें** सरळ तात्पर्य होय. —गी० २२

४३९

कोणत्याहि मताचा नुसता उपन्यास करणें, आणि तें सप्रमाण सिद्ध करून समग्र **ग्रंथाची** मांडणी त्याप्रमाणें लावून दाखविणें, या दोन गोष्टी अत्यंत भिन्न आहेत. के० १९१५-४३-२-१

४४०

हल्लींच्या राज्यांतील खात्यांच्या फाजील बडेजावीमुळें ज्यांची स्वतंत्रता पार नष्ट झाली आहे, त्या खेड्यांच्या **ग्रामपद्धतीचें** पुनरुज्जीवन प्रथम हातीं घ्यावयास पाहिजे. —अ. ११९

४४१

**ग्रामसंस्था** हा आमच्याकडील प्राचीन राज्यव्यवस्थेचा पाया होय. —के० १९१५-४८-६-१

४४२

गांवें ज्या वेळेस पुरतीं वसलेलीं नव्हतीं, नव्या नव्या गांवांमध्यें आर्य लोक वस्तीसाठीं जात होते, त्या त्या ठिकाणीं त्यांनीं ही संस्था स्थापिली. वैदिक काळापासून **ग्रामसंस्था** अस्तित्वांत आहेत. आणि या ग्रामसंस्थांमुळेंच आज हजारों वर्षेंपावेतों हिंदुलोक हिंदुस्थानांत टिकाव धरून राहिले.

—के० ले० २-३७०

४४३

गांव हा स्वराज्याचा घटक समजला जावा व **ग्रामसंस्था** किंवा ग्राममंडळें यांजवर शिक्षण, न्यायमनसुबा, जंगल, अबकारी, दुर्भिक्षदुःखनिरसन, पोलीस, औषधोपचार व आरोग्यरक्षण यांसंबंधाच्या सर्व किंवा बहुतेक प्रश्नांची व्यवस्था लावण्याचे निश्चित अधिकार सोंपविले पाहिजेत.

—अ० ११९

४४४

**ग्रामसंस्थेचें पुनरुज्जीवन** कसें करावें हा प्रश्न प्रांतिक अधिकार लोकांस मिळाल्यानंतरचा आहे आधींचा नव्हे. —के० १९१५-४९-६-२

४४५

पूर्वींची ग्रामव्यवस्था इंग्रजी राज्याच्या सुधारलेल्या राज्यव्यवस्थेनें अजिबात मोडून टाकली, आणि त्याबरोबरच शेतकरी लोकांच्या अंगांत जो एकप्रकारचा परस्परसाहाय्यकारित्वाचा किंवा स्वावलंबनाचा गुण परंपरेनें आला होता तोहि नाहींसा होऊन नवीन राज्यव्यवस्थेच्या नांगराखालीं पूर्वींच्या **ग्रामसंस्थेचीं** सर्व बीजें चिरडून नष्ट झालीं. —सु० ७६

४४६

गतीचा नाश होईल इतकें फाजील घर्षण होऊं देतां कामा नये म्हणजे झालें. पण **घर्षण** हें राहिलेंच पाहिजे. —व्या० १-१०९

४४७

महात्म्यांच्या **चरित्र-वाचनापासून** सामान्य मनुष्याचे बुद्धीस एक प्रकारचें वळण व उन्नतीची एक प्रकारची दिशा लागत असते.

—के० १९०१-२३-३-५

४४८

थोर व उदार पुरुषांचीं **चरित्रें** शीलचारित्र्यवर्धनास उपयोगी पडतात.
—गां० १६

४४९

शील किंवा चारित्र्य—ज्यामुळें या कर्ममय भूमींत मनुष्याची सभोंवतालच्या वस्तुस्थितीवर सत्ता चालूं शकते, आणि ज्यामुळें निरनिराळ्या गोष्टींबद्दल केलेल्या प्रयत्नास सिद्धि प्राप्त होण्याचा संभव उत्पन्न होतो—तें शील व चारित्र्य ज्या उदाहरणावरून आपल्या प्रत्यक्ष निदर्शनाला येईल अशीं **चरित्रें** आमच्याकडे फारच कमी दृष्टोत्पत्तीस येतात. —गां० ९

४५०

सर्व **चळवळ** सोडून दुर्मुखल्याप्रमाणें दूर राहण्यापेक्षां आमच्या मागण्यांची सत्यता व न्याय्यता ब्रिटिश जनतेला पटविण्यांतच आमचा तरणोपाय आहे. —च० सु० १००

४५१

सदोष राज्यपद्धतीमुळें हल्लींची **चळवळ** उपस्थित झालेली आहे, कांहीं हक्क दिले तरच ती बंद करतां येईल, दडपशाहीच्या उपायांनीं ती नाहींशी करतां येणें शक्य नाहीं. —ख० २८८

४५२

पारतंत्र्यांत असलेल्या लोकांना मुक्त करण्याकरितांच **चळवळ** करणाऱ्या लोकांना अटकेचा अनुभव असावा लागतो.
—के० १९१७ ४०-७-३

४५३

**चळवळ** माणसांमुळें नढून राहते, द्रव्यामुळें नढून राहत नाहीं.
—के० १९०८-२३-४-४

४५४

कोणतीहि **चळवळ** लोकांच्या अनुकूलतेखेरीज सिद्धीस जात नाहीं. लोक अनुकूल नसल्यास एकटा पुढारी फशीं पडतो.
—के० १९०५-३७-५-१

४५५

संकटांनीं न डगमगतां कार्य सिद्धीस नेणारे पुरुष ज्या चळवळीस मिळतात त्याच चळवळीला जिवंत **चळवळ** म्हणतात.

—के० १९०८-२४-४-१

४५६

कोणतेंहि नवीन मत घ्या; तें बद्धमूल होण्यास समाजांत पूर्वीं रूढ झालेल्या मतांत **चळवळ** किंवा खोदवाखोदवी होणें जरूर आहे.

—के० १९१५ ४३-२-१

४५७

प्रत्येक मनुष्य कोणती तरी एकादीच **चळवळ** हातीं घेऊन ती यशस्वी रीतीनें चालवूं शकतो. —के० १९२०-१०-५-५

४५८

ज्याप्रमाणें राजकीय बाबतींत आम्हीं कॉन्स्टिटयूशनल् किंवा कायदेशीर चळवळ करतों तशी सामाजिक बाबतींतहि शास्त्रोक्त **चळवळ** झाली पाहिजे. —चरि० ३०५

४५९

कोणच्याहि **चळवळी** फाजील वाटाघाटींची कांस सोडून जोंपर्यंत कृतींत उतरल्या नाहींत तोंपर्यंत त्यांना जय नाहीं. —के० १९०८-१६-४-२

४६०

खरी प्रगति **चळवळी**मुळेंच होत असते. —ख० १५४

४६१

कोणत्याहि **चळवळीला** जिवंतपणा येण्यास माणसें एकनिष्ठ लागतात.

—लो० टि० व्या० २-१५१

४६२

सामना देणाऱ्या सैन्यांत ज्याप्रमाणें समोरासमोर येऊन थडक देण्याचीच इच्छा प्रबळ असते त्याचप्रमाणें नूतन राष्ट्रांतील पहिल्या पहिल्या **चळवळी** होतांना सकृद्दर्शनीं दुष्प्राप्य अशा राजकीय हक्कांच्या रणभूमीवरच पहिली थडक व्हावी लागते. —के० १९०४-२३-४-४

४६३

सरकारला तुमच्यांतील चहाडखोर लोक कसे वाढतील याची काळजी आहे. असल्या प्रकारची **चहाडी** करणें हा देशाशीं—मातेशीं बेइमानपणा आहे. —व्या० १-७४

४६४

चाकरी ती **चाकरी**; तिचा अर्धा पगार वरिष्ठाचें बोलणें सोसण्याबद्दल व अर्धा पगार कामाबद्दल असें समजलें पाहिजे! —आ० आ० १-१६९

४६५

एका धर्मांतील सर्व लोकांस एकच प्रकारचे विधि व संस्कार विहित असले पाहिजेत असा कांहीं कोठें नियम दिलेला नाहीं, किंवा असलाच पाहिजे असेंहि म्हणतां येत नाहीं. ऐतिहासिकदृष्ट्या विचार केला तर असें दिसून येईल कीं, फार प्राचीन काळीं वैदिक आर्य जेव्हां हिंदुस्थानांत आले, तेव्हां त्या सर्वांचे आचारसंस्कार एकच प्रकारचे होते. पण पुढें या आर्यांचा हिंदुस्थानच्या मूळ अनार्य लोकांशीं जसजसा अधिक संबंध येऊं लागला तसतशी वैदिक आचारसंस्कारांची हिंदुस्थानांतील तत्कालीन अनार्य लोकांवर कमजास्त छाप बसली, आणि अखेर या सर्व अनार्य आणि मिश्र लोकांचा वैदिक धर्मांतच समावेश करण्यांत येऊं लागला

४६७

श्रेष्ठ समाजाचें कनिष्ठ समाजाशीं संघट्टन झालें असतां उच्चतर समाजाच्या **चालीरीतींचा** अवनत समाजानें अंगिकार करणें हा नैसर्गिक क्रमच आहे. —के० १८९०-२९-२-१

४६८

गुरुपरंपरा तंतोतंत स्वीकारणें म्हणजे **चिकित्सकबुद्धीस** खो घालणें होय, आणि असा खो घातला म्हणजे ज्ञानाचीच नव्हे तर जगाचीहि प्रगति बंद होईल. —के० १९१६-३८-२-१

४६९

राष्ट्रीय हितासारखा मोठा लाभ करून घेण्यास प्रत्येकानें कांहीं तरी **झीज सोसलीच** पाहिजे. —के० १८९३-१-३-३

४७०

**टीका** करतांना ज्यावर ती करावयाची त्याबद्दल आदर पाहिजे; पण ती ज्या हेतूनें केली **असेल** तो हेतुहि सफल झाला पाहिजे. —आ०व० ४४२

४७१

नुसत्या हिंदुस्थानचेंच नव्हे तर **जगाचें संरक्षण** करून कायमची शांतता राखण्याचें सामर्थ्य हिंदुस्थानांत आहे. —के० १९१८-१८-२-५

४७२

यंत्र सुरळीत चालण्यास मोठ्या चाकाप्रमाणेंच अत्यंत लहान चाकाचीहि जशी जरूर लागत्ये तद्वत्‌च सर्व **जगाचीहि** मोठी अवाढव्य घडामोड अथवा रहाटगाडगें व्यवस्थित चालू रहाण्यास व्यासादिकांच्या मोठ्या अधिकाराप्रमाणेंच इतर मनुष्यांचे लहान अधिकारहि पूर्णपणें व योग्य रीतीनें बजाविले जाणें अवश्य आहे. —गी० ३३२

४७३

**जगांतील शांतता** कायम राखणें आणि हिंदी लोकांची प्रगति साधणें या उभय दृष्टींनीं हिंदुस्थानचा प्रश्न उत्तम रीतीनें सोडविणें अगत्याचें आहे. —के० १९१९-१७-७-१

४७४

**जन्ममृत्यु** हीं केवळ एका स्थितींतून दुसऱ्या स्थितींत जाण्याचीं द्वारें आहेत. —के० १८९३-१६ २-३

४७५

पुढील सालाचा अंदाज, संपणाऱ्या चालू सालाचा फिरून तपासलेला अंदाज आणि मागील सालाचा झालेला नक्की हिशेब म्हणजे दरवर्षी ही एक प्रकारची **जमाखर्चाच्या** श्राद्धांतील त्रयीच म्हटलें तरी चालेल! —के० १९०२-१२-४-३

४७६

साधुपणानें निवारण होणें शक्य नसेल तर **जशास तसें** होऊन दुष्टाचें निवारण करूं नये, त्याच्या दुष्ट कृत्यास साधुपुरुषांनीं खुशाल बळी पडावें असें आमच्या धर्मग्रंथकारांनीं कोठेंहि प्रतिपादन केलेलें नाहीं. आपल्या दुष्ट कृत्यानें लोकांचे गळे कापण्यास जो पुरुष प्रवृत्त झाला, त्यास इतरांनीं आपल्याबरोबर साधुपणानें वागावें असें म्हणण्यास कोणताहि नैतिक हक्क राहिलेला नसतो. —गी० ३९५

४७७

'आघाताइतकाच प्रत्याघात' असा जो अचेतनच सृष्टींतील कर्माचा न बदलणारा कायदा त्याचेंच **'जशास तसें'** हें सचेतन सृष्टींतील रूपांतर आहे. —गी० ३९२

४७८

ब्रिटिश साम्राज्यांतील कोठल्याहि भागांत हिंदी लोकांस इतर नागरिकांच्या बरोबरीनें हक्क मिळाले पाहिजेत व जेथें तसे हक्क न मिळतील तेथें **'जशास तसें'** या न्यायानें प्रतिकार करण्याचा हिंदुस्थानास कायदेशीर अधिकार पाहिजे. —का० जा०

४७९

स्वदेशाकरितां काम करणाऱ्यांच्या मार्गांत प्रकृतिभिन्नत्वामुळें सध्यांहि फरक असेल. पण खरा **जहालपणा** अजून उत्पन्न झाला नाहीं व तो उत्पन्न झालाच तर सरकाराच्या करणीनेंच होईल. —व्या० १-७९

४८०

प्रत्येक **जात,** बाहेरून कितीहि सुधारणेचें व ज्ञानाचें पांघरूण पडलें तरी, आपल्या नैसर्गिक गुणावरच जाते. —के० १९०३-२७-४-३

४८१

इंग्लंडसारख्या थंड देशांतील सगळे लोक सगळीं कामें करण्यास ज्याप्रमाणें तयार असतात तशी स्थिति उष्ण प्रदेशांत कधींहि यावयाची नाहीं. करितां कोणत्याहि गुणाचें येथें रक्षण करणें असल्यास तो गुण संभाळून ठेवण्याचें काम कांहीं विशिष्ट लोकांनीं आपल्या हातांत घेतलें पाहिजे व हें काम जे लोक हातांत घेतात त्यांची कांहीं दिवसांनीं निराळी **जातच** बनून जाते. —घा० १९१

४८२

**जातवार निवडणुकीनें** जातिमत्सर उत्पन्न होऊन हिंदुस्थानाची संघशक्ति नाहींशी होईल. —के० १९१७-४६-२-४

४८३

**सर्व जाति** एकवट व्हाव्या अशी आशा करणें म्हणजे बहुतेक अमेरिकेंतल्या युरोपियन लोकांनीं नीग्रोशीं सोयरिकी कराव्या असेंच म्हणण्यासारखें आहे. —घा० १२५

४८४

उंदीर-घुशी बिळें करतील म्हणून घर बांधावयाचें ज्याप्रमाणें कोणी सोडीत नाहीं, त्याप्रमाणें आमच्यांत फूट पडून स्वराज्यसाधनाच्या मार्गांत अनंत अडचणी उत्पन्न होतील या भीतीनें मागें न सरतां, **जातीजातींचीं** निष्कारण भांडणें उपस्थित न करतां, आपण एकमतानें व एकदिलानें स्वराज्याचें मंदिर उभारण्याच्या कामीं प्रयत्न केला पाहिजे.

—के० १९१७-४६-२-४

४८५

देशाची प्रगति होण्यास **जातीजातींत मत्सर** न वाढतां स्वजातीची उन्नति करून घेण्यासंबंधानें चुरस वाढली पाहिजे.

—के० १९१७-४६-२-४

४८६

पूर्वींसारखे आतां जातिनिर्बंध चालणार नाहींत. च० सु० ६३

४८७

विसाव्या शतकांत आमचें वैशिष्ट्य कायम राहण्यास आमचीं जातिबंधनें व जातिधर्म हीं जाचत असतील तर जेथें जाचतील तेथेंच–केवळ स्वच्छंदीपणाकरितां नव्हे–तीं ढिलीं करा; पण त्यांतील इतर चांगुलपणाचा नुसत्या शब्दांनीं नव्हे तर, आचरणानें अभिमानपूर्वक अंगिकार करण्यास प्रत्येक मनुष्यानें–आणि विशेषतः सुधारकानें तयार असलें पाहिजे.

—के० १९०३-९-४-४

४८८

रणांगणांत तरवार गाजवणारा कोणी असला तरी ज्याप्रमाणें तो क्षत्रिय अगर मराठा समजावयाचा तद्वत्च हल्लींच्या कठिण राजकीय प्रसंगीं कामास आलेला किंवा येणारा पुरुष ब्राह्मणेतर असला तरी तो ब्राह्मणच समजला पाहिजे. जातिभेद जन्मसिद्ध न मानतां गुणकर्मसिद्ध मानण्यास येथेंच सुरुवात होते व झाली पाहिजे. —के० १९२०-११-४-४

४८९

जातिभेदाच्या संस्थेनें उत्पन्न केलेला विलगपणा काढण्यास जातिभेदच समूळ मोडून टाकावा असें म्हणणें, म्हणजे मुंबईशहर सुधारण्यासाठीं इंप्रूव्हमेंट ट्रस्ट न करतां एकदम सर्व शहरास आग लावून देऊन, मग जुन्या इमारतींच्या राखेच्या पायावर, शक्ति असेल तर नवें शहर उठवावें, असें म्हणण्याइतकेंच वेडेपणाचें आहे. —के० १९०३-९-४-४

४९०

एक अतिशूद्र खेरीज करून जे हिंदु लोकांत जातिभेद आढळतात, ते सर्व भिन्न भिन्न उद्योगधंद्यांमुळेंच झालेले आहेत. —के० [illegible]

४९२

आगंतुक कारणांनीं उत्पन्न झालेला **जातिभेद** कृत्रिम उपायांनीं दूर होऊं शकतो, पण रक्तांत जाऊन भिनलेला जातिभेद नाहींसा होणें कठिण.

—के० १९०३-२८-४-३

४९३

**जातिभेद** हा हिंदु लोकांच्या अगदीं हाडीं खिळलेला आहे.

—के० १९०१-४३-२-३

४९४

लोकांत मानमान्यता होण्यास **जातीपेक्षां** गुण अधिक कारण होतात.

—के० १९००-३७-२-४

४९५

**जातीचा भेद** प्रत्येक बाबतींत आणण्याची आपली पूर्वापारची वाईट खोड आहे. आहेत त्या जाती पुष्कळ झाल्या; राजकीय बाबतींत तरी आतां जाति करूं नका. —व्या० २-९१

४९६

पुढें येणारा शिवाजी मुसलमानांत जन्मला तरी मला वाईट वाटणार नाहीं. गुणांची अपेक्षा आहे, **जातीची** नाहीं. —व्या० २-११९

४९७

प्रत्येक **जातीचे** जे विशिष्ट गुणधर्म असतील त्यांच्या अनुरोधानेंच त्या त्या जातीची उन्नति करणें यांतच शहाणपण आहे.

—के० १९०३-२७-४-४

४९८

निरनिराळ्या **जातींचें एकीकरण** होण्यास प्रत्येकानें आपले आचार व धर्म सोडून भिसमिल्ला केलाच पाहिजे असें नाहीं; मुख्य विचारैक्य पाहिजे.

—के० १९०३-३६-४-३

४९९

हल्लींची आपल्या देशाची स्थिति म्हटली म्हणजे निरनिराळ्या **जातींच्या** अंगीं असलेले गुण वाढविण्याचा प्रयत्न करून त्यांतूनच होईल तितकें राष्ट्राचें हित करून घ्यावयास पाहिजे आहे. —च० सु० ५९

५००

एका सामान्य जातींतील पोटभेदांच्या बीजांचें मिश्रण केलें असतां त्या **जातींच्या** विशिष्ट गुणांचा उत्कर्ष होतो हा वनस्पतींचा नियम पुष्कळदां मनुष्यांसहि लागू पडतो. —के० १९०३-२८-४-४

५०१

संस्काराच्या वेळीं वैदिक मंत्र म्हणणें हें आज हजारों वर्षें चालत आलेल्या वहिवाटीनें एका विशिष्ट जातींतील पुरुषांचें (स्त्रियांचें नव्हे) लक्षण झालें आहे; परंतु **जातीजातीस** जो कांहीं मान आहे, तो या लक्षणावर नसून त्या त्या ज्ञातींत कार्यकर्ते पुरुष ज्या प्रमाणावर निपजतात त्या प्रमाणावर आहे. —के० १९११-४४-२-५

५०२

**जातीजातीस** जो कांहीं मान आहे तो या वेदोक्त लक्षणावर नसून त्या त्या ज्ञातींत कार्यकर्ते पुरुष ज्या प्रमाणावर निपजतात त्या प्रमाणावर आहे ही गोष्ट इतिहासावरून सिद्ध आहे. —धा० १९३

५०३

**जातीजातींतील** सार्वजनिक हक्काबद्दलचे **तंटे** पंचांकडे जावे हेंच अधिक सोयीचें व न्याय्य आहे. —के० ले० १-२३९

५०४

कोणत्याहि विशिष्ट **जातीनें** हिंदुधर्मशास्त्रांत आधार असतील तितके हक्क मिळवूं नयेत असें आमचें कधींच म्हणणें नाहीं. —धा० १३०

५०५

ज्याची बुद्धि सम झाली तो श्रेष्ठ, मग धंद्यानें तो सुतार असो, वाणी असो वा खाटिक असो; कोणत्याहि मनुष्याची योग्यता धंद्यावर किंवा **जातीवर** अवलंबून नसतां सर्वस्वीं त्याच्या अंतःकरणाच्या शुद्धीवर अवलंबून असत्ये असें भगवंताचें सांगणें आहे. —गी० ४३७

५०६

**जाहीरसभा** या शब्दांतच असा एक गुण आहे कीं, तो ज्या सभेला लावतां येईल तिच्याविषयीं ऐकणारांच्या अगर वाचणारांच्या मनांत गौरवबुद्धि उत्पन्न व्हावी. —के० १८९१-९-२-५

५०७

गुरुशिष्यांप्रमाणेंच व्याख्याता व श्रोता यांचें नातें आहे; ज्ञानासंबंधानें तीव्र **जिज्ञासा** असली म्हणजे शिष्य जसा अधिकारी होतो तसा अधिकार विद्यार्थ्यांत असतो. --के० १९१५-२३-२-३

५०८

अमुक ठिकाणीं अडतें असें पहिल्यानें अनुभवास आल्याखेरीज अडचणींतून सुटण्याच्या शास्त्रांचें महत्त्व लक्षांत भरत नाहीं; आणि महत्त्व न कळल्यामुळें केवळ घोकलेलें शास्त्र पुढें ध्यानांतहि राहण्यास कठीण पडतें. यामुळें चांगले गुरु प्रथमतः शिष्यास **जिज्ञासा** आहे कीं नाहीं हें पहातात व नसल्यास ती जागृत करण्याचा प्रयत्न करीत असतात.

—गी० ५२

५०९

नवीन देवालय बांधण्याचें जितकें श्रेय त्याहून अधिक श्रेय जीर्णोद्धाराचें आहे; कारण **जीर्णोद्धार** केल्यामुळें पूर्वापार चालत आलेल्या कल्पना बदलून नवीन प्रकार अंगवळणीं पाडण्याचा खटाटोप करावा लागत नाहीं. —के० १९०२-२४-४-४

५१०

**जीवन्मुक्तावस्था** ही मनाच्या निर्विषयतेची, सम व शुद्ध बुद्धीची आणि आध्यात्मिक उन्नतीची शेवटची पायरी आहे; आधिभौतिक धंद्यांतील हुषारीची परीक्षा नव्हे. —गी० ३३२

५११

**जूट** पाहिजे; मग ती तीस कोट मुंग्यांनीं केली तरी त्या हत्तीला जेरीस आणतील. —व्या० २-१०२

५१२

आम्ही **जुन्या पिढीच्या** खांद्यावर उभे राहिलों आहों आणि म्हणूनच आमच्या दृष्टीचें क्षितिज अधिक विस्तीर्ण झालें असून आम्हांस अधिक दूरचें दिसत आहे. —व्या० १-११८

५१३

ज्या वेळीं सर्व राजसत्ता एकाच पुरुषाच्या हातांत आमरण असते, आणि तोच कायतो 'कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुं' समर्थ असून त्या व्यतिरिक्त दुसरा कोणीहि सूत्रधार नसतो, तेव्हां असल्या पुरुषाचा खून केल्यानें कदाचित्–आणि तोहि कदाचितच–**जुलमाचा प्रतिकार** होण्याचा संभव असतो. —के० ले०२-५३८

५१४

लोकांची महत्त्वाकांक्षा कांहीं वेळ जरी कुंठित करतां आली तरी अखेरीस 'इंद्राय स्वाहा, तक्षकाय स्वाहा' असा प्रकार होऊन **जुलमी** राजे व त्यांस उत्तेजन देणारे जुलमी सरदार हे दोघेहि नाश पावतात. —के०१९०५-५-५-१

५१५

मनगटाच्या जोरावर एकादा **जुलमी** राजा जेव्हां प्रजेस पादाक्रांत करतो तेव्हां दीन झालेल्या प्रजेस न्यायाचा त्राता जो ईश्वर त्याखेरीज कोणीहि शरण नसतें. —के० ले० २-५३८

५१६

गांजलेली प्रजा जसजशी जास्त क्षुब्ध होते तसतसा **जुलमी राजाचा** हट्ट व निष्ठुरपणा वाढत जातो. —के० १९०५-६-५-२

५१७

**जुलमी** अंमलदाराचा अगर राजाचा स्वभावच असा असतो कीं, ते आपल्याजवळ जीं माणसें बाळगतात तीं अशीं असावीं कीं, त्यांस कोणी शालजोडींतले मारले तरी त्यांनीं शालजोडीच्या मऊपणाचीच तारीफ करीत राहावें ! —के० ले० २ १२८

५१८

बादशहाचा **जुलूम** असह्य झाला म्हणजे प्रजाजनांचे पुढारी किंवा प्रजेपैकीं सामान्य लोक नेहमींच त्याचा प्रतिकार करण्यास तयार होतात व अखेरीस प्रजापक्षाचाच जय होतो. —के० १९०५-५-४-५

५१९

शारीरिक जुलमापेक्षां मानसिक **जुलूम** अतिशय भयंकर असतो !

—के० १९०७-५-४-३

५२०

**जुलूम** केला असतां चालणार नाहीं अशी खात्री असल्यावर कोणीच जुलूम करीत नाहीं; व अशा वेळीं त्यानें जुलूम न केला तर त्यांत त्याचा गुणहि कांहीं नाहीं !

—के० ले० १-५५१

५२१

प्रजाजनांवरील **जुलूम** बंडखोरांना प्रसवत असतो.

—के० १९०७-४५-४-३

५२२

**जुलूम** सहन करणें यांत स्वार्थ नाहीं, आणि परमार्थहि नाहीं, ही पशुवृत्ति होय.

—के० १९०७-४३-४-२

५२३

सैतानाचा आणि देवांचा जसा नित्य तंटा आहे तसा स्वातंत्र्याचा व **जुलमाचा** नेहमीं तंटा असतो.

—व्या० १-५१

५२४

अधिकारी वर्गाच्या **जुलमास** नैतिक धैर्यानें जो आळा बसेल तो शक्तीच्या जोरावर बसणाऱ्या आळ्यापेक्षांहि अधिक महत्त्वाचा व श्रेयस्कर होय.

—के० १९०७-३८-४-४

५२५

**जुलमानें** कोणतीहि प्रजा वठणीस येत नाहीं.

—के० १९०७-३३-४-४

५२६

**जुलमी कायद्यानें** प्रजेच्या मनांतील असंतोष नष्ट होत नाहीं, किंवा स्वराज्य-प्राप्त्यर्थ त्यांचे प्रयत्न ढिले पडत नाहींत.

—के० १९०७-४३-४-२

५२७

धर्मशास्त्राचे नियम तत्कालीन **ज्योतिषशास्त्राच्या** साह्यानें तयार करण्यांत आले. त्या ज्योतिषशास्त्रावरून निघणारीं अनुमानें सांप्रतच्या पूर्णावस्थेस पोंचलेल्या ज्योतिषशास्त्राच्या दृष्टीनें चुकीचीं ठरतील तर त्या अनुमानांत व धर्मशास्त्राच्या नियमांत जरूर तो फरक करण्याला आपली तयारी पाहिजे. —आ० आ० १-१८३

५२८

**ज्यूरीचा** अधिकार स्वतंत्र आहे. आपल्या अधिकाराचा उपयोग जर ज्यूरी करणार नाहीं तर तिनें आपलें कर्तव्य बजाविलें नाहीं असें होईल. इतकेंच नाहीं तर, कायद्यानें प्रजा म्हणून प्रत्येक व्यक्तीस जो हक्क दिलेला असतो त्याची पायमल्ली होईल. —ख० १७१

५२९

**ज्यूरीचा** अधिकार जो लोकांस दिला आहे तो केवळ न्यायाचा तराजू चांगला चालावा म्हणून नव्हे, तर हा एक विशिष्ट प्रकारचा राजकीय हक्क असून राजकीय कारणाकरितां तो लोकांस दिला आहे.
—के० ले० १-१५३

५३०

अनियंत्रित राजसत्ता व व्यक्तिविषयक स्वातंत्र्य यांच्या लढ्यामध्यें **ज्युरीची** पद्धत लोकांच्या हक्कांचें संरक्षण करूं शकते. —ख० १७१

५३१

ऊन पडलें असतां वाळवण घातलें पाहिजे; ह्यालाच **ज्योतिषशास्त्रांत** मुहूर्त म्हणतात. —स्व० मो० (३) ११२

५३२

**ज्योतिषशास्त्राची** आणि धर्मशास्त्राची परंपरा व क्रम भिन्न आहेत.
—के० १९००-२२-३-२

५३३

**ज्योतिष** हें वैद्यकाप्रमाणें प्रत्यक्ष शास्त्र असून चंद्र व सूर्य हे या शास्त्राच्या सत्यतेचे साक्षीदार होत. हे साक्षीदार कोणाहि ज्योतिषाच्या राजाच्या किंवा इतर मनुष्याच्या तंत्रानें वागणारे नाहींत; हा कोर्टांतील साक्षीदारांत आणि यांच्यांत मोठा ध्यानांत ठेवण्यासारखा भेद आहे.

—के० १९००-२२-३-२

५३४

धर्मशास्त्र आणि **ज्योतिषशास्त्र** हीं दोन अगदीं निरनिराळ्या प्रकारचीं शास्त्रें आहेत; धर्मशास्त्राचें प्रयोजन अदृष्टार्थक तर ज्योतिषशास्त्राचें प्रयोजन दृष्टार्थक आहे. —के० १९०५-३-४-४

५३५

आपले हजारों देशबांधव विपन्नावस्थेंत असतांना जे नाक धरून घरांत बसतात ते **ढोंगी** आहेत. —व्या० २-१७

५३६

दोन्ही पक्षांच्या संमतीनें **तडजोड** निघाल्यास ती कबूल करून आपणास ज्या गोष्टी इष्ट वाटत असतील त्या अखेरीस घडवून आणण्याचा आपण उद्योग करीत असावें हेंच आपलें कर्तव्य आहे.

—के० १८९२-२३-३-१

५३७

स्वसामर्थ्याविषयींच्या फाजील घमेंडीचा उन्माद नेहमीं **तडजोडीच्या** आड येतो व खऱ्या वस्तुस्थितीचें अंजन डोळ्यांत बळेंच घातलें गेल्याशिवाय हा उन्माद उतरत नाहीं. —के० १९०८-१-४-५

५३८

एखाद्या कामाचा निकाल लावण्याकरितां निरनिराळ्या मताचे लोक जेव्हां एकत्र जमतात तेव्हां त्या वेळेपुरता **तडजोडीनें** निकाल लावला नाहीं तर कोणतेंहि सार्वजनिक काम कोणत्याहि प्रतिनिधि-सभेच्या हातून कोणत्याहि देशांत कधींहि पार पडावयाचें नाहीं. —के० १९०६-४५-४-३

५३९

स्त्रीस जसें पातिव्रत्य तसें **तत्त्वनिष्ठ पुरुषास** तत्त्वप्रतिपालन!

—आ० आ० १-२०२

५४०

सर्व जग सुधारण्यास निघणाऱ्या रासेलससारख्या भ्रांतिष्ट **तत्त्ववेत्त्याचें** हातून, किंवा सर्व जगांतील दुःखें निवारण्यास निघालेल्या डॉन क्विक्झोट-सारख्या विक्षिप्त वीरांचे हातून कोणाचेंच खरें काडीभरहि कल्याण होणार नाहीं.

—के० १९०१,१७-२-५

५४१

मोठे कवि किंवा महान् **तत्त्वज्ञ** हे कोणत्याहि देशांत जन्मले असले तरी ते सर्व जगाचे उपकर्ते या नात्यानें पृथ्वीवरील सर्व राष्ट्रांतील लोकांस ते आपलेसेच वाटत असतात.

—के० १९०३-४९-४-२

५४२

फलभोगाची अपेक्षा न करितां कसाहि प्रसंग आला तरी, कर्तव्यकर्म करण्यास तयार असावें, हें खऱ्या **तत्त्वज्ञाला** शोभण्यासारखें आहे.

—के० १९०३-४०-५-५

५४३

**तत्त्वज्ञानाची** योग्यताच अशी आहे कीं, त्यावर राजकीय सत्ता चालूं शकणार नाहीं; उलट तें मात्र आपला अंमल सर्वत्र बसवील.

—के० १९०३-३७-२-५

५४४

अनेक आधिभौतिक शास्त्रांच्या सिद्धान्तांचें परीक्षण करून व त्यांत सारखेपणा कोठें आहे आणि विसदृशत्व कोठें आहे हें पाहून निरनिराळ्या शास्त्रांतील सिद्धान्त एकाच सामान्य सिद्धान्ताचीं निरनिराळीं स्वरूपें असतील कीं नाहीं हें ठरविणें हें **तत्त्वज्ञाचें** काम होय.

—के० १९०१-१९-२-४

५४५

पशूला जें जें सुख उपभोगणें शक्य आहे तें तें सर्व तुला देतों असें सांगून कोणास 'तूं पशु होण्यास राजी आहेस काय ?' असा प्रश्न केला तर एक देखील मनुष्य पशु होण्यास तयार होणार नाहीं. तसेंच **तत्त्वज्ञानाच्या** गहन विचारामुळें बुद्धीस जी एक प्रकारची शांति मिळते तिची योग्यता ऐहिक संपत्ति किंवा बाह्योपभोग यांजपेक्षां शतपट अधिक आहे हें ज्ञानी पुरुषांस सांगावयास नकोच. —गी० ९२

५४६

**तत्त्वज्ञानावर** राजकीय सत्ता चालूं शकत नाहीं. —धा० २२५

५४७

मस्तक किंवा आत्मा नसल्यास जसें जीवित अशक्य होईल, तसें **तत्त्वज्ञानावांचून** धर्माचें अस्तित्वच संभवणार नाहीं.

—के० १८९३-१२-२-४

५४८

एकाच्या हातांत हजार **तरवारी** असण्यापेक्षां हजार माणसांच्या हातांत हजार तरवारी दिल्या तरच त्या जास्त कार्यक्षम होत असतात.

५५२

तुमच्या सारख्या **तरुणांनीं** रोज प्रातःकाळीं स्नानोत्तर गायत्रीजपाच्या साधनानें चित्तैकाग्र्याचा अभ्यास केल्यास सुईच्या अग्राप्रमाणें तुमची बुद्धि सर्वभेदक होईल, इतकेंच नव्हे तर विशेष अभ्यासानें पुढें ती आत्मसाक्षात्कारीहि होईल. —आ० आ० १-२६०

५५३

देशाची जर कांहीं उन्नति व्हावयाची असेल तर ती जोमदार **तरुण पिढीच्या** हातूनच पुढें होणार आहे. —के० १९१७-२५-४-४

५५४

देशाकरितां **तरुण** लोक फकीर झाल्यास हल्लींच्या देशपरिस्थितींत हें इष्टच आहे. पण ते आमच्या राजवाड्यांप्रमाणें (प्रसिद्ध इतिहास-संशोधक विश्वनाथ काशीनाथ राजवाडे) निष्कलंक व शुद्धाचरणानें समाजांत राहूं अशी मनांत शपथ घेतील तरच त्यांनीं या मार्गांत पडावें. एरवीं त्यांनीं आपला व समाजाचा नाश करूं नये.

—आ० आ० २-४४२

५५५

आंब्याचें झाड खरें; पण ऋतूमध्यें फरक झाल्यानें एखाद्या वर्षीं त्यास जसा मुळींच मोहोर येत नाहीं किंवा आला तर गळून पडतो तशी आमच्या **तरुण पिढीची** स्थिति झालेली आहे. —के० १९०३-९-४-५

५५६

मुग्धत्व व यौवन यांमधील स्थिति विशेष मनोरम असते खरी; तथापि **तारुण्यांत** सुरू करावयाचे नवीन उद्योग, अंगावर घ्यावयाची नवीन जबाबदारी ह्यांविषयीं विचार करण्याची हीच वेळ आहे.

—के० १८९७-२-३-१

५५७

**तुकाराम** स्वतः संस्थापक नव्हता व त्याला जगाची पर्वाहि नव्हती. संस्थापनेचें काम त्याच्या जवळच्या त्याच्यापेक्षां कमी दर्जाच्या मनुष्याचें आहे; व त्यानेंच तें केलें पाहिजे. —आ० व० ४२३

५५८

**तुकारामासारख्या** अंतर्बाह्य पांडुरंगमय झालेल्या साधूस न्हाव्या-भटांची किंवा तीर्थांची निंदा करण्याचा किंवा प्रसंगविशेषीं श्रीपांडुरंगासहि टाकून बोलण्याचा अधिकार होता तोच आम्ही संसारिकांनीं बजाविल्यास आम्ही आपल्यास किती उपहासास्पद करून घेऊं हें सांगावयास नकोच.

**५६४**

राजकीय हक्क गोडीगुलाबीनें मिळावयाचे नाहींत; त्याकरितां पुढाऱ्यांस **तुरुंगांत** गेलें पाहिजे, हद्दपार झालें पाहिजे किंवा दुसरा छल सोसला पाहिजे.

—के० १९०७-३४-४-४

**५६५**

**तुरुंगांत** गेलों तरी बेहत्तर; पण माझ्या सदसद्विवेकबुद्धीविरुद्ध मी अन्यायाला व जुलुमाला मदत करणार नाहीं. —व्या० १-५१

**५६६**

**तुरुंगांतून** बाहेर आल्यावर देखील जर आपल्याला प्रशस्त वाटेल तें लोकहिताचें काम करावयाचें नाहीं, तर जन्मभर तुरुंगांतच राहिलेलें काय वाईट ?

—आ० आ० १-६८

**५६७**

**तुरुंगाची** शिक्षा संभावित गृहस्थांस मरणप्राय वाटते ही गोष्ट खरी आहे; पण सरकारी अधिकारी उघड उघड अन्याय करून जर लोकांस तुरुंगांत पाठवूं लागले तर तुरुंगाची भीति लवकर नाहींशी होते.

—के० १८९४-४०-२-४

**५६८**

अन्यायी अधिकाऱ्यांच्या अरेरावी अंमलबजावणीस बळी पडून **तुरुंगांत** जावें लागलें तरी त्यास तरुण पिढीनें तयार असलें पाहिजे. —व्या० २-७२

**५६९**

अग्नीच्या एका ठिणगींत जितकें **तेज** असतें तितकें हत्तीयेवढ्या शिळेंतहि असत नाहीं.

—के० १८९२-४-२-४

**५७०**

नुसत्या गोड शब्दांचें **तेज** पराक्रमी व कर्तबगार माणसांवर पडत नाहीं.

—के० १९००-१२-३-२

५७१

**थिऑसफी** हा धर्म नव्हे; सर्व धर्मांतील लोकांस धर्माचें तत्त्व ओळखून प्रेमानें वागण्यास सांगणारी तत्त्वज्ञांची संस्था आहे. —च० सु० ७४

५७२

राष्ट्रांत जे **थोर पुरुष** निर्माण होतात ते एक प्रकारच्या अदृष्ट बलानेंच निर्माण होतात. —के० १९०१-१०-२-५

५७३

विद्वत्ता, मुत्सद्दीपणा, काम करण्याची हौस, सार्वजनिक हित कोणत्या उपायांनीं करतां येईल याबद्दल एकसारखा निदिध्यास, आणि लोकांनीं नेहमीं आपल्या उन्नतीच्या चळवळींत व्यग्र असावें अशी अनिवार इच्छा इतके गुण अंगीं वसत असलेले **थोर पुरुष** राष्ट्रांत वारंवार निपजत नसतात. —के० १९०१-४-३-१

५७४

समाजाची स्थिति, अथवा कालाचा ओघ, अथवा अज्ञेय गोष्टी याच **थोर पुरुष** निर्माण होण्याचें कारण आहे; परंतु कालाचा ओघ फिरविण्यांतहि मनुष्याचे प्रयत्न थोड्याबहुत अंशानें उपयोगी पडतात.

—के० ले० १-५४७

५७५

ज्याचा स्वभाव निसर्गतःच सात्विक असतो त्याला आपल्या

५७७

**थोर विभूति** सामान्य शास्त्रतत्त्वांच्या वर आहेत.
—के० १८९७-२४-३-२

५७८

ज्यांचा स्वभाव किंवा प्रकृति जन्मतःच अपरिपक्व असेल त्यांसहि सदर प्रकृति परिपक्वदशेस आणण्यास **थोर विभूतींच्या चरित्राचा** चांगला उपयोग होत असतो.
—गां० १६

५७९

राष्ट्राचा विकास करणारीं व राष्ट्रीय तेज उत्पन्न करणारीं जीं कारणें असतील त्यांची गति खुंटवून त्यांना मागें खेचणें याचें नांव पीछेहाटीचें किंवा **दडपशाहीचें** धोरण.
—ख० २७४

५८०

स्वराज्याबद्दलच्या आकांक्षा **दडपशाहीच्या** योगानें चिरडून टाकणें अशक्य आहे.
—के० १९१७-२५-५-१

५८१

**दडपशाहीनें** व अन्यायानें सत्पक्षाचा नाश न होतां तोडलेल्या झाडा-प्रमाणें तो पुनः अधिकच बळावतो.
—के० १९१७-२५-५-२

५८२

जशी प्रीति अंधळी असते तशीच **दडपशाहीहि** अंधळी असते.
—के० १९१९-३१-२-२

५८३

आपल्यावर प्रसंग आल्यास लोकांनीं आपल्यास मदत करावी याच अंतस्थ बुद्धीनें कोणी झाला तरी दुसऱ्यास मदत करितो किंवा **दान** देतो; आणि आपणावर लोकांनीं माया करावी म्हणून आपण त्यांच्यावर माया करितों.
—गी० ७९

५८४

भरभराटीच्या वेळीं बुद्धीस पडलेला भ्रंश **दारिद्र्यानें** दूर होतो
—के० १९०६-३५-४-२

५८५

या दुनियेंत संसारी मनुष्याला दारिद्र्यासारखें अन्य दुःख नाहीं.
—के० १८९१-१७-२-३

५८६

श्रम करून थकवा आल्यावर तो नाहींसा करण्यास दारू हें औषध नव्हे—झोंप हें उत्तम औषध आहे. —लो० टि० व्या० २-१४६

५८७

दारूचें व्यसनच असें आहे कीं, त्यांत सूचिकाग्रानें एकदां प्रवेश झाला म्हणजे तेंच व्यसन अधिकाधिक लागत जाऊन अखेर बुद्धिनाश होतो व बुद्धिनाशानंतर गीतेंत सांगितल्याप्रमाणें मनुष्याचा सर्वस्वीं घात होत असतो.
—के० १९१५-१४-६-२

५८८

प्रत्यक्ष परमेश्वर येऊन 'दारू प्या' म्हणून सांगूं लागला तर त्याच्यावर देखील बहिष्कार टाका. —लो० टि० व्या० २-१४२

५८९

दारूचे परिणाम पिणाऱ्याच्या शरीरासच नव्हे तर राष्ट्रासहि घातक आहेत. —के० १९१५-१४-६-१

५९०

कर्ममार्गाचें खरें महत्त्व शुद्ध व प्रासादिक मराठी भाषेंत सांगितलेलें ज्यास पहावयाचें असेल, त्यानें समर्थांच्या दासबोधाचें व त्यांतल्या-त्यांतहि विशेषेंकरून उत्तरार्धाचें पठन केलें पाहिजे. —गी० ४९८

५९१

आपल्या पूर्वजांनीं कर्तबगारी केली असतां जो कायम दास्याचा उपदेश करतो तो आपल्या हातांनीं आपल्या देशबांधवांचे पाय कापतो, असें समजावें. —व्या० २-१११

५९२

सैन्य जय्यत तयार ठेवल्यानें परचक्र टाळतां येईल, पण प्रजाजनांस कायमच्या **दास्यांत** ठेवून राज्यकारभार चालविणें दुर्घट होय.

—के० १९०७-२२-४-३

५९३

**दास्यांत** रहावयास ईश्वरानें आम्हांस उत्पन्न केलेलें नाहीं.

—व्या० २-११७

५९४

एखाद्या राष्ट्राला दुसऱ्या राष्ट्राला कायमचें **दास्यांत** ठेवण्याचा हक्कच नाहीं.

—के० १९१७-२०-४-३

५९५

पाऊस कमी पडला म्हणून **दुष्काळ** होतो असें सांगत बसणें म्हणजे त्रिदोष झाल्याखेरीज कोणी कांहीं मरत नाहीं असें सांगत बसण्यासारखेंच आहे.

—के० १९००-१५-२-३

५९६

**दुष्काळाचें** मूळ कारण अनावृष्टि हेंच होय, राज्यपद्धति नव्हे; पण या अनावृष्टीचेंहि मूळ व आधिदैविक कारण राजाचें दुर्वर्तन असूं शकेल, नाहीं असें नाहीं.

—के० १९००-५१-२-३

५९७

**दुष्काळाचे** वेळीं गरीब लोकांस पोटास देणें हें सरकारचें कर्तव्य आहे. आणि त्यांस काम सांगणें तें केवळ धर्मार्थ देणगीचा दुरुपयोग होऊं नये एवढ्याकरितां होय.

—के० लें० २-१५०

५९८

एखाद्या इसमास दुसऱ्याच्या घरीं चोरी करण्याची संधि मिळाली म्हणून त्यानें चोरी करावी असें जसें होत नाहीं, त्याप्रमाणेंच **दुष्काळांत** संधि आली म्हणून खालसा झालेल्या जमिनीवरील खातेदाराचे सर्व हक्क बुडवून त्या जमिनी वाटेल त्यास देण्याचा अधिकार सरकारनें आपल्या हातांत घेणें योग्य नाहीं.

—के० लें० २-२६०

५९९

ज्या वेळेस विधर्मी लोकांचे जुलमापासून स्वधर्माचें रक्षण करण्याची आवश्यकता प्रत्येक मराठ्याचे, ब्राह्मणाचे व शेणव्याचे अंतःकरणांत पूर्णपणें जागृत होती, त्यावेळीं अमुक मनुष्य संध्या वेदोक्तानें करतो कीं पुराणोक्तानें करतो, हा विचारच मनांत येण्याचा संभव नाहीं. वेदहि आपलेच व पुराणेंहि आपलींच; व दोन्ही नाहींशी होण्याची वेळ आली असतां कोणतें बरें हा वादच लोकांचे मनांत येत नाहीं. परमेश्वर एकच आहे व कोणत्याहि मार्गानें त्याची उपासना केली असतां त्यास पोंचते ही बुद्धि जेव्हां लोकांचे मनांत दृढपणें बिंबलेली असते, त्या वेळेस असले वादच उत्पन्न होत नाहींत. परंतु जेव्हां खरी धर्मवासना नसते, व स्वधर्मसंरक्षण व राष्ट्रसंरक्षण करण्याकरितां परस्पर भेद विसरून एकवट होण्याची आवश्यकता उत्कटतेनें भासत नाहीं, त्यावेळीं अर्थातच असले बुद्धिभेद उत्पन्न करणारे वाद उपस्थित होऊन आपसांत दुही माजते.

—के० ले० २-४३३

६००

अरे **दुःख** म्हणजे काय ? 'प्रतिकूलसंवेदनोत्पादकं दुःखम्' असें म्हणतात. पण ज्यानें अभ्यासानें व विवेकानें मुळांत निःसंवेदित्वच जेथें प्राप्त करून घेतलें तेथें मग आतां दुःख कसलें ? दुःखाचें बीजच जर उपटलें तर तेथें अंकुर फुटणार कसा ? अपेक्षा, आसक्ति व कर्तव्यच्युति यांत दुःख आहे.

—आ० आ० १-२६०

६०१

**दुःख** सोसल्याशिवाय दुःख कमी होत नसतें.

—के० १९१७-६-७-२

६०२

शिमग्यांत होळीकरितां घरोघर जशा गोवऱ्या गोळा करितात, तशीच माझ्या घरावर पाळी येऊन प्लेगदेवतेला मलाहि एका मुलाची गोवरी द्यावी लागली. असलें **दुःख** मनुष्यानें मुकाट्यानें सहन केलें पाहिजे.

—चरि० १२६

६०३

दुःखाशिवाय सुखालाहि चव येत नाहीं. —स्व० मो० ४६

६०४

कोणत्याहि स्थितींत सुखाविषयींची मनाची लालसा कमी होत नसते; तेव्हां निराश झालेल्या राष्ट्रानें दुःखें भोगण्यांतच सुख मानण्याची मनास संवय लावून घ्यावी लागते. —के० १९०६-१०-४-५

६०५

जगांत कांहीं सगळींच जनावरें गाई नाहींत. ज्याप्रमाणें त्यांत वाघ, सिंह व सापहि असतात त्याचप्रमाणें जगामध्यें सज्जनांबरोबर दुर्जनाहि असतात. —के० १९२०-२१-२-३

६०६

दुष्ट मनुष्यें आपल्या कर्मांनींच मरत असून त्यांना मारणारा फक्त निमित्तमात्र असल्यामुळें मारणाराकडे त्याचा दोष येत नाहीं. —गी० ७६८

६०७

जगामध्यें कितीहि अडचणींचे प्रसंग आले, आपल्या उद्देशसिद्ध्यर्थ चाललेल्या प्रयत्नांत आपल्याला कितीहि ठोकरा खाव्या लागल्या, तरी मनांत दृढनिश्चय ठाम करून हातीं घेतलेल्या कामाची चिकाटी सोडावयाची नाहीं अशा प्रकारचीं माणसें या जगांत फार कमी आढळतात. —के० १८९०-३३-२-२

६०८

दृढनिश्चय व एकजुटीची कृति यांनाच कर्मभूमींत यश मिळत असतें. —के० १९०८-१६-४-२

६०९

दृढनिश्चय, करारीपणा हे गुण कांहीं अंशीं आनुवंशिक आहेत हें खरें; पण उदाहरणानें, उपदेशानें, विचारानें आणि अभ्यासानें हे गुण बऱ्याच अंशीं येऊं शकत नाहींत असें नाहीं. —के० १९०३-३४-४-५

६१०

ज्याला मोक्षप्राप्ति पाहिजे असेल त्यास आपल्या देशबांधवांची काळजी केल्याखेरीज गत्यंतर नाहीं. **देश** आणि देव हे दोन मानणारे जे लोक आहेत ते सर्व प्रकारें धर्मभ्रष्ट आहेत असें मी समजतों. —व्या० २-१७

६११

केवळ धर्मदृष्टि जे असतील, वेदांती होऊन आयुष्याचें सार्थक करण्याचा ज्यांचा विचार असेल, व्यवहारांतील किंवा संसारांतील दगदग ज्यांना नकोशी झाली असेल त्यांना देखील केवळ मोक्षाच्या दृष्टीनेंहि देशभक्ति व **देशकार्य** यांसारखी कल्याणप्रद तपश्चर्या क्वचितच सांपडेल.

—के० १९०६-७-४-२

६१२

**देशकार्य** हें केवळ बुद्धीवर अवलंबून नसून दीर्घोद्योगावर व स्वार्थत्यागावरच अवलंबून आहे. —के० १९१९-४९-४-२

६१३

व्यक्तिविषयक अभिमान देशकार्यांत विसरून जाऊन सर्वांनीं **देशकार्याला** हातभार लावणें हेंच श्रेयस्कर आहे. —के० १९१७-४४-२-२

६१४

६१७

**देशमाता** ही मोठी कामधेनु होय. या कामधेनूला चारा घालण्याचा अधिकार आपल्या हातीं घ्या. ही कामधेनु प्रसन्न होईल, तर तुम्हांलाच काय, पण तुमच्या पुढच्या व अनेक पिढ्यांना दूध देऊन पुष्ट करील. या कामधेनूला विसरूं नका हेंच मी तुमच्याजवळ पदर पसरून मागत आहें.

—आ० आ० १-१५३

६१८

**देशरक्षणार्थ** लढाईमध्यें आनंदानें मरण्यास देशाच्या ठायीं आपलेपणाची भावना असल्याखेरीज कोणीहि तयार होणार नाहीं.

—के० १९१८-१९-४-५

६१९

देश म्हणजे काय हें ज्यांना कळतें असे मध्यम वर्गांतले नागरिक योद्धे जेव्हां पुढें होत असतात तेव्हांच **देशरक्षणास** अवश्य लागणारी ईर्षा व अभिमान सैन्यांत जागृत होत असतो. —के० १९१८-२५-४-४

६२०

आपला हात राखून फावल्या वेळांत शरीरास व मनास विशेष दगदग न होईल अशा रीतीनें सवडीनुसार **देशहिताचें काम** करण्याचा ज्या राष्ट्रांत धडा घालून देण्यांत येतो, त्या राष्ट्राचे मागण्यांस तितकाच मान मिळावयाचा.

—के० १९०२-१५-५-२

६२१

देशाची स्थिति सुधारण्याचा प्रयत्न करणाऱ्या बायका असोत, ब्राह्मण असोत, अस्पृश्य असोत, ब्राह्मणेतर असोत, जो कोणी **देशाचें कार्य** करावयाला पुढें येईल त्याला मी देवाप्रमाणें मानावयाला तयार आहे.

—स्व० गी० ३६

६२२

स्वस्त्रीवर जुल्म झाल्याचें कळल्यावर जो षंढ कोर्टांत फिर्याद करण्यास जाण्याइतका शांत राहातो, त्याच्या **देशाची उन्नति** अजून फार दूर आहे !

—आ० आ० २-११

६२३

**देशाच्या प्रगतींत** कोणतीहि इष्ट गोष्ट कायमची अशी मागें पडत नाहीं. —के० १९१५-४७-६-४

६२४

स्वतंत्रतेचा किंवा राष्ट्रीयत्वाचा अभिमान म्हणून जो कांहीं जोम आहे तो जोंपर्यंत जागृत असतो तोंपर्यंत समाजरचना कशीहि असली तरी त्यांतील दोष राष्ट्राच्या उन्नतीस किंवा भरभराटीस आड येत नाहींत. पण एकदां कां तो जोम नाहींसा झाला, म्हणजे तेच दोष रावणाच्या धनुष्याप्रमाणें छातीवर बसून जगांत त्या लोकांची उपहास्यता होण्यास कारण होतात. सारांश, समाजरचनेपेक्षां लोकांमध्यें एक प्रकारचा आपल्या संस्थांबद्दल व **देशाबद्दल अभिमान** जागृत ठेवण्याची प्रत्येक देशकल्याणाकरितां झटणाऱ्या माणसानें आधीं तजवीज ठेविली पाहिजे. —धा० १९२

६२५

मला मिळालेलें ज्ञान मराठी भाषेंत मिळालें असतें—**देशी भाषेंत** मला मिळालें असतें—तर हें सर्व ५२ वर्षांचें ज्ञान २५ व्या अगर ३० व्या वर्षांत मला मिळालें असतें. या इंग्रजी भाषेमुळें इतकीं वर्षें फुकट जातात. —व्या० २-२७

६२६

**देशी भाषांचा** प्रश्न एकंदर भावी संततीच्या हिताला मूलभूत आहे. —के० १८९४-४९-२-५

६२७

खरा **देशाभिमान** जर कशांत असला तर तो यांतच आहे कीं, ज्यांमुळें आपल्या देशाची व लोकांची निकृष्टावस्था झाली तीं कारणें शोधून काढून त्यांच्या प्रतिकारार्थ उद्योग करावयाचा. —के० ले० २-१९६

६२८

कोणत्याहि देशांतील, कोणत्याहि काळांतील व कोणत्याहि परिस्थितींतील **देशाभिमानी** मनुष्य स्वार्थत्याग करणारा व परोपकारी असलाच पाहिजे. —के० १९०६-६-४-३

६२९

**देशाभिमानाची** कल्पना मनुष्याच्या अंतःकरणांत सहज उद्भवणाऱ्या परोकारबुद्धीपासूनच उत्पन्न होते. —के० १९०६-६-४-२

६३०

जगांतील सर्व मनुष्यांची स्थिति सुधारतां सुधारतां केव्हां तरी सर्वभूतात्मैक्य ओळखण्यापर्यंत त्यांची मजल येईल यांत शंका नाहीं. निदान तशी स्थिति मनुष्यमात्रास प्राप्त करून देण्याची आशा बाळगणें तरी अयुक्त नव्हे. परंतु आत्मोन्नतीची ही परमावधीची स्थिति जोंपर्यंत सर्वांस प्राप्त झाली नाहीं तोंपर्यंत इतर राष्ट्रें किंवा समाज यांची स्थिति लक्षांत आणून साधुपुरुषांनीं आपआपल्या समाजास तत्तत्कालीं श्रेयस्कर होईल असा **देशाभिमानादिधर्मच** उपदेशिला पाहिजे. —गी० ३९७

६३१

घराचे वरचे मजले बांधून तयार केले तरी खालचे मजले ज्याप्रमाणें काढून टाकतां येत नाहींत, किंवा तरवार हातांत पडली म्हणजे कुदळीची अगर सूर्य असला म्हणजे अग्नीची जरूर ज्याप्रमाणें नाहींशी होत नाहीं, तद्वत् सर्व भूतहिताच्या शेवटल्या पायरीवर पोंचलें तरी **देशाभिमानाचीच** नव्हे तर कुलाभिमानाचीहि आवश्यकता नाहींशी होत नाहीं. कारण, समाजसुधारणेच्या दृष्टीनें पाहिलें तर कुलाभिमान जें विशिष्ट काम करतो तें केवळ देशाभिमानानें होत नाहीं. आणि देशाभिमानाचें कार्य निव्वळ सर्वभूतात्मैक्य दृष्टीनें सिद्ध होत नाहीं. —गी० ३९७

६३२

**देशाभिमानामध्यें** दुसऱ्याच्या दुःखाच्या निरसनाकरितां स्वतःच्या सुखाचा त्याग करण्यास तयार होणें ही बुद्धि प्राधान्येंकरून असावी लागते.
—के० १९०६-६-४-२

६३३

**देशी माल** वापरण्याचा निश्चय करणें हें ज्याप्रमाणें लोकांचें कर्तव्य आहे त्याचप्रमाणें लोकांच्या गरजा पुरवावयास लागतील ते उद्योग करणें हें देशांतील धनाढ्य लोकांचें कर्तव्य होय. —के० ले० १-५२०

६३४

देह जरी अनित्य असला तरी आत्म्याचें कायमचें कल्याण किंवा मोक्ष संपादन करण्यास **देह** हेंच काय तें एक साधन असल्यामुळें आत्महत्या करणें, किंवा योग्य कारणाखेरीज दुसऱ्यास मारणें, हीं दोन्ही शास्त्रप्रमाणें घोर पातकेंच होत. —गी० ६२३

६३५

**दैवगतीच्या** अपरिहार्य फेऱ्यांत सांपडून दुःखाच्या भोंवऱ्यांत गटंकळ्या खात असतांना नुसतें रडत बसण्यापेक्षां ही प्रतिकूल दैवगति कशानें प्राप्त झाली याचा विचार करणें व दैवालाच बदलावयास लावणाऱ्या नवीन वर्तनाचा अंगीकार करणें हें अधिक शहाणपणाचें होय. —के० १९०६-१-४-३

६३६

राज्याचा सुरक्षितपणा **दंगे** न होण्यावर जितका अवलंबून असतो, तितका दंगे मोडण्यावर असत नाहीं. —के० ले० १-२२९

६३७

हिंदु, मुसलमान आणि सरकार असे तीन पक्ष घेतल्याखेरीज दंग्याच्या कारणाची नीट उपपत्ति लागत नाहीं. मागील राज्यांतून जातींच्या पुढाऱ्यांस अगर पंचांस जो अधिकार असे तो आतां राहिला नाहीं. सर्व गोष्टी कायद्यानें बांधून गेल्या आहेत व कायदा ज्यास त्यास समजूं लागला आहे. अशा स्थितींत फक्त हिंदु व मुसलमान पुढाऱ्यांच्या हातूनच **दंग्याचीं** कारणें निःशेष होतील असें आम्हांस वाटत नाहीं. गोडीगुलाबीनें जेवढा भाग व्हावयाचा असेल तेवढा भाग या पुढाऱ्यांच्या हातून पार पडेल; पण जेथें अमुक गोष्ट अमक्या लोकांनीं करावी कीं नाहीं अशा प्रकारचे प्रश्न उपस्थित होतात व त्यांचा निकाल कायदेशीर रीतीनेंच लागणें जरूर आहे तेथें दंगा होणें अगर न होणें हें सर्वस्वीं सरकारी अधिकाऱ्यांच्याच वर्तनावर अवलंबून आहे. —के० ले० १-२१४

६३८

सत्तेपुढें शहाणपण नाहीं हें जसें खरें, तसेंच **द्रव्याच्या** हातीं सत्ता असते हेंहि खरें. —के० १८९०-२०-२-३

६३९

**धनी** कुंभार असो कीं परीट असो, गाढवाचे हाल चुकत नाहींत !

—के० १८९२-२६-३-३

६४०

थंडाईचे वेळीं उत्तराप्रमाणें बडबड करणारे पुरुष कांहीं कमी नसतात. पण घरांत बायकोच्या नथेंतून तीर मारणारे हंबीरराव जरी पुष्कळ असले तरी त्यांपैकीं रणभूमीवर **धनुर्धर** म्हणून गाजणारा एखादाच निघतो.

—गी० ४७

६४१

हिंदुस्थानांतील समाजांपैकीं बऱ्याच मोठ्या भागांत जर कांहीं सामान्य एकीचें लक्षण असलें तर तें **धर्मच** होय. —के० १९०१-९-३-१

६४२

ज्याच्या योगानें आपला देशच नव्हे तर सर्व जग सुरळीत चाललें आहे तोच **धर्म** होय. —के० १९१५-३९-२-४

६४३

आमचें वैभव, आमचें स्वातंत्र्य सर्व कांहीं लुप्त झालें आहे; परंतु आमचा **धर्म** अद्याप आमचेपाशीं शिल्लक आहे.

—के० १९०२-२७-४-३

६४४

ज्या धर्मांत ईश्वर व जीव यांच्या परस्पर संबंधाचें अति सूक्ष्म रीतीनें विवेचन झालेलें नाहीं तो **धर्म** कोणत्याहि शिकलेल्या लोकांत प्रसृत होण्याची आशा नको. —के० १८९६-४३-२-४

६४५

**धर्म** सुटला म्हणजे समाजाचीं बंधनें तुटलीं असें समजावें; आणि समाजाचीं बंधनें तुटलीं म्हणजे आकर्षणशक्तीखेरीज आकाशांतील सूर्यादिक ग्रहमालेची किंवा सुकाणाखेरीज समुद्रावर तारवाची जी स्थिति व्हावयाची तीच समाजाचीहि होत असत्ये. —गी० ६७

६४६

हिंदुस्थानांतील विद्यमान सर्व धर्म जाऊन एक **धर्म** होणें शक्य मानणेंच वेडेपणाचें आहे. —च० सु० ७१

६४७

ज्या देशांत निरनिराळे **धर्म** प्रचारांत आहेत तेथील सरकारानें सर्वांस खूष ठेवावयाचें असल्यास कोणत्याहि धर्माचा अभिमान ठेवणें चांगलें नाहीं. —के० १८९२-६-३-१

६४८

राज्यांत भिन्नभिन्न **धर्म** चालत असल्यास प्रत्येक धर्मांतील लोकांस आपापल्या धर्माप्रमाणें चालण्यास सरकारांतून योग्य मदत व सवलत मिळाली पाहिजे. —के० १८९२-६-३-१

६४९

आमच्या धर्मतत्त्वाप्रमाणें राजाचा व माझा आत्मा सारखा आहे. राजाच्या विशिष्ट क्रियेनें त्याला अधिकार प्राप्त झालेला आहे. तशी क्रिया केल्यास दुसऱ्याला राजा होतां येतें. मग ज्या धर्मानें परमेश्वर होतां येतें, तो **धर्म** काय राजा होऊं देणार नाहीं ? —घा० २२६

६५०

सर्व मानवजातीचें किंबहुना प्राणिमात्राचें ज्यानें हित होईल तोच **धर्म** हा जरी अखेरचा सिद्धान्त आहे, तरी परमावधीची ही स्थिति प्राप्त होण्यास कुलाभिमान, धर्माभिमान, देशाभिमान या चढत्या पायऱ्या असल्यामुळें त्यांची आवश्यकता केव्हांहि नाहींशी होत नाहीं.

—गी० ३९७

६५१

गोरी फौज आमचे शरीरावर व घरादारांवर अंमल करो; पण आपला **धर्म** यूरोपच्या बुद्धीचें आकर्षण करील अशी महत्त्वाकांक्षा आपणास असली पाहिजे. —के० १९०३-३७-४-५

६५२

आमची हल्लीं अवनति झाली आहे ती हिंदुधर्मामुळें नव्हे, तर **धर्म** अजीबात सुटल्यामुळें झाली आहे. —के० १८९२-१३-२-३

६५३

**धर्म** झाला तरी प्रथमतः त्याचें महत्त्व कोणाच्या तरी लक्षांत येऊन मग त्याची प्रवृत्ति होत असते; खा, पी, चैन कर हें कांहीं कोणास सांगावयास नको; कारण हे इंद्रियांचे स्वाभाविक धर्मच आहेत. —गी० ७०

६५४

मोक्षरूपी वृक्षाच्या **धर्म व व्यवहार** अशा दोन शाखा असून परस्परांशीं त्यांचा अत्यंत निकट संबंध आहे. —के० १९१७-४०-२-३

६५५

**धर्म व राजकारण** दोन नाहींत. —व्या० २-७

६५६

प्रतिपाद्य विषय, प्राप्य फल व तत्प्रापक साधन ह्या तिन्ही गोष्टी ज्या धर्मांत उत्तम रीतीनें विचाराच्या कसोटीस उतरतील तो **धर्म** उत्तम होय. —के० १८९३-१७-२-४

६५७

ईश्वर व आत्मा नाहीं असें प्रतिपादन करणारा **धर्म** फार दिवस टिकणें शक्य नाहीं. —के० १८९२-२०-३-४

६५८

सतत कर्माकडे प्रवृत्ति ठेवून सदाचरण करावें याखेरीज दुसरें कांहीं **धर्म** शिकवीत नाहीं. —के० १९०३-४-५-५

६५९

एक सामान्य **धर्म** लोकांत परस्पर सहानुभूति व आपलेपणाची वृत्ति उत्पन्न करण्यास मोठें साधन होतो. —के० १९०३-३६-४-४

६६०

**धर्म** मन तयार करतो. स्वार्थत्याग करावयास जो मनोनिग्रह लागतो तो मनोनिग्रह धर्म शिकवील. योगानें अगर धर्मानें जर मनोनिग्रह अंगीं येईल तर मग मनुष्य नुसता धार्मिक नाहीं तर उत्तम नागरिक होईल.

—व्या० २-१०

६६१

कोणताहि **धर्म** घ्या, त्यांत कांहीं तरी बंधनें, व्यवस्था, परंपरा आणि त्या त्या धर्मांतील श्रेष्ठ व पूज्य मानलेल्या व्यक्तींबद्दल आणि ग्रंथांबद्दल आदर या गोष्टी असावयाच्याच. —के० १८९९-४४-२-४

६६२

ख्रिस्ती लोकांप्रमाणें आठवड्यांतील एक दिवसापुरता—रविवारापुरता—आमचा **धर्म** नाहीं. —व्या० १-२८

६६३

**धर्म** शब्दांत परमेश्वराच्या ज्ञानाचा व त्याची कृपा संपादन करून घेण्याच्या मार्गांचाच समावेश होतो असें नाहीं, तर त्याबरोबर कांहीं सामाजिक, व्यावहारिक व नैतिक आचारांचा आणि आयुष्यांतील प्रसंग-विशेषीं कराव्या लागणाऱ्या विधींचा व संस्कारांचाहि त्यांत समावेश केला जातो. —धा० १४९

६६४

स्वार्थत्याग करावयास जो मनोनिग्रह लागतो, तो मनोनिग्रह करावयास **धर्म** शिकवील. धर्मानें मनाचें संकुचितत्त्व जातें. —धा० २२६

६६५

गोरी फौज आमचे शरिरांवर व घरादारांवर अंमल करो; पण आपला **धर्म** युरोपच्या बुद्धीचें आकर्षण करील अशी महत्त्वाकांक्षा आपणांस असली पाहिजे. —धा० २०२

६६६

निर्गुण ब्रह्माचा परमेश्वर बनण्यास ज्याप्रमाणें त्यांत सर्व उच्च गुणांची भर घालावी लागत्ये, तद्वतच नुसत्या बुद्धिग्राह्य तत्त्वज्ञानास व नीतिज्ञानास धर्माचें स्वरूप येण्यास या ज्ञानास कांहीं विशिष्ट विधि, आचार व संस्कार –मग ते थोडे असोत वा पुष्कळ असोत–यांचा पोषाख चढवावा लागतो, किंबहुना या पोषाखाचेंच लौकिकांत अधिक प्रस्थ असतें, असें कोणताहि **धर्म** पाहिला तरी दिसून येईल.
–चि० ज० ३

६६७

**धर्म** म्हटला म्हणजे त्यांत कांहीं बऱ्या, कांहीं वाईट, कांहीं सकारण, कांहीं निष्कारण अशा गोष्टी असावयाच्याच. –के० १८९२-५०-३-२

६६८

कोणताहि **धर्म** घ्या; त्यांतील धर्मग्रंथांत नीतितत्त्वांची सळमिसळ असावयाचीच; मग ती कोठें जास्ती असेल, कोठें कमी असेल.
–के० १८९२-८-२-४

६६९

**धर्म** 'आचारप्रभव' असला म्हणून तो एखाद्या विशिष्ट ज्ञातींतील आचाराशीं समानव्यापक आहे असें होत नाहीं. –के० १९०३-७-४-५

६७०

ज्यानें मोक्ष मिळतो तोच **धर्म** अशी निदान आमच्या धर्माची तरी व्याख्या नाहीं.
–धा० २२५

६७१

राज्य कोणतेंहि असलें तरी **धर्मकार्य** केलेंच पाहिजे.
–के० १९०३-३७-२-५

६७२

आजच्या मनूंत **धर्मकार्याची** जबाबदारी शास्त्रीमंडळावर नसून तें काम नव्याच मंडळीनें अंगावर घेतलें पाहिजे. –के० १९०३-३७-२-४

६७३

पीठावर आमच्या धार्मिक हक्कांसाठीं भांडणारा आणि ते हक्क जाणणारा माणूस पाहिजे. हल्लींचे **धर्मगुरु** लक्ष देत नाहींत, त्यामुळें सरकार आमचे धार्मिक हक्क सुद्धां हिरावत चाललें आहे. —आ० आ० १-२

६७४

**धर्मगुरूंनीं** केलेली आज्ञा कोणाला पसंत पडो वा न पडो ती सर्वांनीं पाळलीच पाहिजे, असा निर्बंध असल्याशिवाय त्या त्या धर्माला चिर-स्थायित्व कदापि येणार नाहीं. —के० १८९२-३०-२-४

६७५

रहाटाचा बैल गाडीस जुंपला म्हणजे जसा बिचकतो व वांकडा वांकडा चालूं लागतो, त्याचप्रमाणें **धर्मग्रंथाचा** विचार करण्यास लागलें असतां कॉलेजांतील शिकलेल्या विद्यार्थ्यांच्या मनाची स्थिति होते.

—के० १९०३-४३-४-४

६७६

सोनें कितीहि चांगलें असलें तरी त्यास वारंवार उजळा देऊन तें ज्याप्रमाणें दैदीप्यमान् ठेवावें लागतें त्याप्रमाणेंच **धर्मतत्त्वाची** स्थिति होय. —के० १९०१-९-२-५

६७७

शिकलेल्या लोकांवर **धर्मतत्त्वांचें** वजन पडण्यास नव्या तऱ्हेनेंच त्या विषयाचें प्रतिपादन केलें पाहिजे. —आ० व० २६२

६७८

**धर्मतत्त्वें** स्वत: समजणें, ग्रंथांवरून त्यांची शाब्दिक उपपत्ति लावणें आणि हजारों लोकांच्या मनावर छाप राहील अशा रीतीनें ती समजावून देणें या तिन्ही गोष्टी भिन्न भिन्न असून यांपैकीं एखादीचाच अतिशय एखाद्या व्यक्तीच्या ठायीं दिसून आल्यास इतर गोष्टी त्याच्या ठायीं नाहींत म्हणून नांवें ठेवणें म्हणजे मोरास आवाज नाहीं व पोपटास पिसारा नाहीं म्हणून त्यांस नांवें ठेवण्यासारखें मूर्खपणाचें आहे.

—के० १९०२-२३-४-३

६७९

जेव्हां एखादी चाल धर्मांत रूढ होऊन बसलेली असते तेव्हां त्या चालीच्या गुणावगुणांचा विचार **धर्मदृष्टि** बाजूला ठेवून कधींहि करतां येत नाहीं. —के० १९०५-२७-५-३

६८०

एखाद्या धर्मोपदेशकानें एखादी गोष्ट बरी म्हटली म्हणजे तेवढ्याचमुळें ती प्रचारांत येत नसून लोकांचीं मनें तिकडे वळण्यास तत्पूर्वीं कांहींतरी सबळ कारणें घडत असतात, आणि मग लोकाचारांत हळुहळू फेर पडून तदनुरूप **धर्मनियमांतहि** फेर होत असतो. —गी० ४९५

६८१

**धर्म**, नीति आणि कायदा यांतील भेद अत्यंत सुधारलेल्या राष्ट्रांतहि अद्याप नाहींसा झालेला नाहीं; व तो कधींतरी या जगांतून पूर्णपणें नाहींसा होईल कीं नाहीं, याचीहि वानवाच आहे. —चि० ज० ३

६८२

इतर वाईट गोष्टींत पैसे खर्च होऊन जाण्यापेक्षां **धर्मबाबतींत** थोडा-बहुत खर्च झाल्यास पुण्यच आहे. —आ०व० २६८

६८३

**धर्मप्रसार** हा राजकीय साम्राज्य वाढविण्याचा श्रीगणेशा आहे.
—के० ले० २-२४१

६८४

ज्या धर्मशिक्षणानें पुरुषाचा स्वभाव एक प्रकारचा अभिमानी, श्रद्धाळू, कर्तव्यदक्ष व सत्यनिष्ठ बनेल तेंच खरें **धर्मशिक्षण** होय.
—के० १९०३-३७-२-५

६८५

**धर्मशिक्षण** म्हणजे जातिविरोधाचें शिक्षण नव्हे.
—के० १९०४-२०-४-५

६८६

उच्च कल्पना, अत्युच्च कल्पना लोकांस शिकवून त्या त्यांच्यांत खेळूं देणें—जातीजातींतील भेद नाहींसे करून आपण सारे एकत्र:आहों असें वाटावयास लावणें हें खरें **धर्मशिक्षण** आहे. —व्या० २-८

६८७

विद्यार्थ्यांचा स्वभाव बनणें म्हणजे सत्यनिष्ठा, देशप्रीति, करारीपणा इत्यादि गुणांची त्यांच्या अंगीं अभिवृद्धि होऊन राष्ट्रांतील लोकांचे पुरस्कर्ते होण्याची योग्यता त्यांच्या अंगीं यावी हें इष्ट आहे व त्यास **धर्मशिक्षणाखेरीज** दुसरें साधन नाहीं. —के० १९०३-४३-४-३

६८८

धार्मिक किंवा सामाजिकरीत्या आपला विशिष्टपणा कायम राखण्याकरितां कांहीं प्रसंगीं अडचणहि सोसावी लागते व अशा प्रकारच्या अडचणी सोसण्यास लोकांस तयार करणें हें **धर्मशिक्षणाचें** एक अंग आहे.
—के० १९०४-३-४-५

६८९

**धर्मशिक्षणापासून** एक प्रकारचें मानसिक धैर्य येतें.
—के० १९०४-३-४-५

६९०

ज्याप्रमाणें राज्यप्रकरणीं सार्वभौमत्व सरकारकडे आहे त्याप्रमाणें **धर्मसंबंधीं** आधिपत्य त्यांजकडे कधींहि जाऊं शकत नाहीं.
—के० १८९१-४-२-४

६९१

मनुष्य हिंदु असो वा खिस्ती असो, त्यास **धर्मश्रद्धा** आणि भाव हीं कोठेंहि चुकलीं नाहींत. —के० १८९९-४४-२-४

६९२

राष्ट्राच्या उत्कर्षास, **धर्मश्रद्धा** राष्ट्राच्या पुढाऱ्यांच्याहि अंगीं असणें अवश्य आहे. —के० १९०३-४३-४-४

६९३

**धर्मश्रद्धा** व कळकळ यांचा केवळ धार्मिक बाबतींशींच नव्हे तर सामाजिक आणि व्यावहारिक बाबतींशींहि अत्यंत निकट संबध असून त्याचा मनुष्याच्या एकंदर वर्तनक्रमावर परिणाम घडत असतो.

—के० १८९९-४४-२-५

६९४

दिव्याशिवाय अंधेरांत किंवा मार्गदर्शकावांचून दाट जंगलांत मार्ग सांपडणें जसें दुर्घट आहे, तसें **धर्मश्रद्धेची** मदत असल्याखेरीज केवळ तर्कशक्ति तत्त्वशोधनाच्या कामीं पंगू होते. —के० १८९३-१३-२-४

६९५

लोककल्याणाचें खरें तत्त्व विसरून जाऊन **धर्माचा** बाह्य विधि आचरण्यांत खरें हित नाहीं. —के० १९१५-३९-२-५

६९६

जगामधील दुसऱ्या कोणत्याहि धर्मांत आपल्या **धर्माइतकी** उदारता व समंजसपणा दृष्टीस पडावयाचा नाहीं. —के० १८९२-८-२-४

६९७

समाजधारणा हाच **धर्माचा** मुख्य बाह्य उपयोग होय हें तत्त्व जरी आम्हांस कबूल आहे, तरी वैदिक किंवा इतर सर्व धर्मांतील परम साध्य जें आत्मकल्याण किंवा मोक्ष त्यावरची आमची दृष्टि आम्ही कधींहि चळूं देत नाहीं हा इतरांपेक्षां आमच्या मतांतला विशेष आहे. —गी० ६७

६९८

जगांतील दुसऱ्या कोणत्याहि धर्मांत "येप्यन्यदेवताभक्ताः" असलें श्रेष्ठ तत्त्व प्रतिपादिलेलें मला आढळून आलेलें नाहीं. किंबहुना चित्तशुद्धि हा आमच्या **धर्माचा** जसा पाया मानला जातो, तशी इतर धर्मांची गोष्ट नाहीं. —प० १३

६९९

हिरा जरी खरा आणि मौल्यवान् असला, तरी ज्याप्रमाणें निरनिराळ्या काळीं प्रवृत्त असलेल्या रुचीप्रमाणें त्यास निरनिराळें कोंदण करावें लागतें, तसाच **धर्माचाहि** प्रकार आहे. —के० १९०४-१३-४-५

७००

**धर्माचा** नायनाट करून व सर्व समाज धर्मशून्य बनल्यामुळें राष्ट्रैक्य किंवा राष्ट्रोन्नति झाल्याचें जगांत एकहि उदाहरण नाहीं.

—के० १९०४-३८-४-३

७०१

परमेश्वराची प्राप्ति करून आयुष्याचें सार्थक करणें हा **धर्माचा** मुख्य विषय होय हें खरें आहे; पण धर्मश्रद्धेनें संसारांत किंवा राष्ट्राच्या व्यवहारांत किंवा राष्ट्राच्या इतिहासांतहि पुष्कळ फायदा होतो.

—के० १९०३-४३-४-४

७०२

कोणाहि मनुष्यास दुसऱ्याच्या **धर्माची** निंदा करण्याचा कायद्यानें, नीतीनें अगर शिष्ट सांप्रदायानें अधिकार पोंचत नाहीं.

—के० १८९१-४०-३-३

७०३

कोणत्याहि **धर्माची** महति कायम राखण्यास त्या त्या धर्मांतील विद्वान् लोकांनीं त्याचा नीट ऊहापोह करून त्याचें रक्षण केलें पाहिजे.

—के० १९००-३८-२-१

७०४

**धर्माची** बाजू युक्तिदृष्ट्या कदाचित् लंगडी असेल, पण जगांतील सर्व व्यवहार कांहीं युक्तीनेंच होत नाहींत. प्राचीन कालापासून चालत आलेली धर्मपरंपरा युक्तीपेक्षां शतपट प्रबल असते. —धा० ११४

७०५

**धर्माची** खरी योग्यता केवळ धर्मसंस्थांच्या व्यवस्थेवर अवलंबून नसते.

—के० १८९६-४३-२-४

७०६

इंग्रजी शिकल्याशिवाय सध्यांच्या काळीं आपल्या धर्माचें वजन चोहोंकडे पाडतां यावयाचें नाहीं. **धर्माचें** वजन पाडण्यास तुलना रूपानें त्याचें विवेचन केलें पाहिजे. —आ० व० २१४

७०७

**धर्माचें** श्रेष्ठत्व, त्यांतील उत्कृष्ट तत्त्वें व ईशभक्तीचे मार्ग यांवरच अवलंबून आहे. —के० १९०४-२४-५-२

७०८

ज्या वेळीं जगांतील बहुतेक देश अज्ञानांत बुडाले होते व धर्म म्हणजे काय याचीहि त्यांस पुरी ओळख झाली नव्हती त्या वेळीं या देशांत **धर्माचें खरें स्वरूप** लोकांस अवगत झालें होतें, इतकेंच नव्हे तर जीं तत्त्वें अगदीं अलीकडे लोकांस समजलीं आहेत असें आपणांस वाटतें त्या तत्त्वांचा पूर्ण ऊहापोह करून आमच्या ऋषींनीं मागेंच निर्णय केला आहे.

—के० १८९२-८-२-३

७०९

**धर्माचें** रहस्य तंट्यांत नाहीं, तें एकी करण्यांत आहे. —व्या० २-१६

७१०

स्वधर्माचा आपल्या लोकांत प्रसार करणें हें **धर्माच्या** राष्ट्रीय स्वरूपाचें अंग आहे. —के० १९०३-२४-५-५

७११

वाफेचें इंजिन चालण्यास जशी वाफ ही मुख्य आहे, तसाच समाज सुव्यवस्थितपणानें चालण्यास **धर्माच्या** मूलतत्त्वांवरच मुख्यतः नजर दिली पाहिजे. —के० १९१५-३९-२-५

७१२

**धर्माच्या** आज्ञेपेक्षां सरकारची आज्ञा अधिक योग्यतेची नाहीं.

—व्या० २-५०

७१३

ज्या **धर्मानें** परमेश्वर होतां येतें तो धर्म काय राजा होऊं देणार नाहीं ?

—व्या० २-९

७१४

मनुष्य नराचा नारायण होईल व तो आपल्याच करणीनें होईल हें तत्त्व आमच्या **धर्माशिवाय** इतकें स्पष्ट असें दुसऱ्या कोणत्याहि धर्मांत नाहीं.

—के० १९०६-३५-४-२

७१५

कोणाहि मनुष्याची किंवा राष्ट्राची योग्य बुद्धिवादानें खात्री करून देऊन त्यांतील लोकांची मनें त्यांच्या **धर्माहून** श्रेष्ठ धर्माकडे प्रवृत्त करणें हें अन्यायाचें नाहीं. —के० १८९९-५०-२-३

७१६

**धार्मिक उत्सव** म्हटला म्हणजे तो वर्षाचा एक सणच समजला पाहिजे; परंतु सणापेक्षां त्यांत विशेष इतकाच कीं, धर्म आणि नीति यांचा बोध या सणांत अनायासें आणि आनंदानें करतां येतो.

—के० १८९९-३९ २-५

७१७

एका धर्माच्या लोकांनीं दुसऱ्या धर्माच्या लोकांच्या **धार्मिक बाबतींत** हात घालणें इष्ट नसतें, इतकेंच नव्हे, तर त्याचे परिणामहि चांगले होत नाहींत. —के० १९००-२५-३-१

७१८

अंगीं कितीहि शौर्य असलें तरी पूर्ण निग्रहानें व निश्चयानें एखाद्या गोष्टीच्या पाठीस लागून कार्य करून घेणें ही गोष्ट 'आपण चांगलें काम करीत आहों व परमेश्वर त्या कामीं आपणांस सहाय्यक आहे' असा दृढ भरंवसा **धार्मिकबुध्दीनें** किंवा अलौकिक साधुसंतांच्या आशीर्वादानें मनांत उत्पन्न झाल्याखेरीज सहसा घडून येत नाहीं. —के० १९०१-१०-२-५

७१९

दुःखमय संसारयात्रा जरा तरी सुखाची वाटण्यास व ऐहिक गोष्टींत मग्न झालेल्या मनास पारमार्थिक शांतीचा लाभ कांहीं वेळ तरी होण्यास **धार्मिक महोत्सवासारखें** दुसरें साधनच नाहीं. —के० के० १...

७२१

निर्णय करणें हें काम बुद्धीचें आहे; परंतु बुद्धीनें योग्य निर्णय केला तरी तो कायम टिकला पाहिजे. निर्णयाला बळकटपणा आणणें हा मनाचा धर्म होय. म्हणून **धृति** किंवा मानसिक धैर्य हा गुण मन आणि बुद्धि या दोघांच्या साह्यानें उत्पन्न होतो असें म्हटलें पाहिजे.

—गी० ८४०

७२२

**धैर्य** हें ईश्वरदत्त देणगी म्हणण्यापेक्षां विचाराचें फळ आहे असें म्हणावें लागतें. —आ० आ० १-११६

७२३

विद्या व सौजन्य यांनीं मनुष्याचें मन जरी संस्कृत झालें तरी मोठमोठीं कामें निर्भीडपणें करण्याची हिम्मत व **धैर्य** केवळ या गुणांनीं कोणाच्याहि अंगीं येत नाहीं. —के० ले० १-१५१

७२४

निर्भीडपणा व **धैर्य** हे गुण आमच्यांत दिसूं लागले म्हणजे आमच्या मतास आपोआप मान मिळूं लागेल, आमचा बोज वाढेल आणि आमच्या हक्काची पायमल्ली होणार नाहीं. —के० १८९०-१८-२-५

७२५

मनुष्याचें **धैर्य** व परमेश्वराची मदत यांचें प्रमाण समच आहे, व्यस्त नाहीं हें लक्षांत ठेवा. —व्या० १-६३

७२६

आशेचेहि दोन प्रकार आहेत; एक लोभमूलक परावलंबी, आणि एक निराशेच्या पोटीं उत्पन्न झालेली स्वावलंबी. या दुसऱ्या आशेसच निर्वाणीचें **धैर्य** असें म्हणतात; आणि याच धैर्यानें खऱ्या साधुसंतांनीं परमेश्वरप्राप्ति करून घेतलेली आहे. —विश्व० १३

७२७

दुसऱ्याला शिव्या देण्यापेक्षां दुसऱ्याच्या शिव्या संथपणें ऐकून घेणें अधिक **धैर्याचें** लक्षण आहे. —के० १८९३-२२-३ २

७२८

कोणताहि योग मग तो राजकीय असो, धार्मिक असो वा तांत्रिक असो, सिद्धीस जाण्यास **धैर्याची** आणि निश्चयाची नेहमींच अपेक्षा असते.

—के० १९०५-३७-४-५

७२९

नुकसानीला भिऊन अश्लाघ्य वर्तन करणें हें **धैर्याभावाचें** लक्षण होय.

—के० १८९०-१८-२-५

७३०

लोकप्रिय असलेली गोष्ट जर खरोखरच सदोष व त्याज्य असेल तरच तिची निंदा करणाऱ्याच्या **धैर्याला** कांहींतरी किंमत येईल, एरव्हीं नैतिक धैर्य व निखालस चारगटपणा हे दोन्ही शब्द समानार्थकच होतील.

—के० १९०४-२०-४-४

७३१

कोणताहि **धंदा** एकदां स्वीकारिला—मग तो चातुर्वर्ण्यव्यवस्थेमुळें स्वीकारा किंवा खुषीनें स्वीकारा म्हणजे तो धर्म झाला. मग प्रसंगविशेषीं पुढें त्यांत खोड्या काढून आपलें कर्तव्यकर्म सोडून देणें चांगलें नाहीं; जरूर पडल्यास त्या धंद्यांतच मेलें पाहिजे. —गी० ६६१

७३२

कोणताहि **धंदा** घेतला तरी त्यांत कांहींना कांहीं तरी दोष सहज काढतां येण्यासारखा असतो; परंतु तेवढ्यामुळें आपलें नियतकर्तव्य सोडणें हा धर्म नव्हे. —गी० ६६१

७३३

प्रत्येक धंद्यांतला प्रत्येक मनुष्य आपण आपल्या धंद्यामध्यें वर यावें असा प्रयत्न करूं लागला म्हणजे तो **धंदाहि** उर्जितावस्थेस येतो व अशा रीतीनें प्रत्येक धंद्याची व प्रत्येक व्यक्तीची सुधारणा झाली म्हणजे राष्ट्राची निराळी सुधारणा व्हावयाची ती काय राहिली ? व अशा सर्वांग-परिपूर्ण राष्ट्रास कोणी चेपूं म्हटलें तरी कोण चिरडूं शकणार ?

—आ० आ० २-२७५

७३४

कोणीहि कोणचा **धंदा** केला तरी तो हलका होत नाहीं; पण धंद्यांत कौशल्य व कर्तबगारी दाखविली पाहिजे. —के० १९२०-१५-७-२

७३५

असा कोणताहि **धंदा** किंवा आश्रम नाहीं कीं, लबाडांनीं किंवा अयोग्य पुरुषांनीं त्यांत आपला प्रवेश करून घेतला नाहीं; पण तो

७४१

शरीराच्या अंतर्भागीं लागणारे पदार्थ उत्पन्न करण्यासाठीं जसें आपल्यास नानापरीचे पदार्थ खाणें अवश्य असतें तद्वत्च सर्व राष्ट्राचें पोषण योग्य रीतीनें होण्यास व बुद्धीचा प्रकाश अनेक रूपानें बाहेर येण्यास देशांत निरनिराळे **धंदे** पाहिजेत. —के० १८९०-२८-२-३

७४२

लहानसान **धंदेच** देशांतील पुष्कळ लोकांच्या उपजीविकेचें साधन आहे. —के० १९००-३८-२-५

७४३

**धंदेशिक्षणावांचून** हल्लींच्या व्यापारी चढाओढीच्या काळांत स्वत्व राखण्यास दुसरा मार्गच नाहीं. —के० १८९१-५२-२-५

७४४

देशांत लहान मोठे धंदे चालविण्याचें ज्ञान लोकांस यावें व पोटा-करितां केवळ सरकारच्या तोंडाकडे पाहण्याचा त्यास प्रसंग येऊं नये हाच **धंदेशिक्षणाचा** मुख्य फायदा आहे. —के० १८९२-६-२-४

७४५

तुम्ही ज्या व्यवसायांत पडाल त्याची गोष्ट निघाली असतां तुमचें नांव लोकांच्या मनःश्चक्षूंसमोर प्रथम उभें राहिलें पाहिजे, व अशा तऱ्हेची मनोवृत्ति ज्या देशामध्यें प्रत्येक **धंद्यांत** पडणाऱ्या मनुष्यामध्यें आहे त्या देशाची केव्हांहि भरभराट झाल्यावांचून राहणार नाहीं हें निश्चित समजा.
—आ० आ० २-२७५

७४६

तात्त्विक ध्येयाच्या वायफळ चिकित्सेनें डोकें न पिकवितां, मध्यम-वय-प्रवेशाच्या वेळीं योग्य वाटेल तें **ध्येय** पसंत करावें, आणि मग त्या ध्येया-करितां जन्मभर स्वतःस वाहून घेऊन कोणत्याहि उद्योगाचें फळ देशाला वाहीन असा निश्चय मनाशीं करून विद्यार्थ्यांनीं युनिव्हर्सिटींतून बाहेर पडावें.
—के० १९१९-२८-४-२

७४७

कोणतेंहि **ध्येय** घेतलें तरी तत्सिद्ध्यर्थ उद्योग करावा लागतो; ध्येय आपण होऊन निरुद्योगी माणसाच्या हातांत पडत नाहीं.

—के० १९१६-२९-४-२

७४८

धार्मिक ध्येय हवें तेवढें उच्च असो, पण व्यवहारांत व्यवहाराचें म्हणून निराळें ध्येय असलेंच पाहिजे. नुसतें धार्मिक **ध्येय** ठेवून जगांत चालावयाचें नाहीं. ध्रुवाकडे लक्ष असूं द्या; पण ध्रुवावर जातां यावयाचें नाहीं हेंहि लक्षांत असूं द्या. —आ० आ० १-१११

७४९

आपला जन्म कोणत्याहि देशांत झालेला असो, तो केवळ आपण त्या देशांतील अन्न खाऊन आमरणान्त आपल्या बायकामुलांसह चैनींत राहण्यासाठीं नाहीं; यापेक्षां कांहीं तरी उच्चतर **ध्येय** सिद्ध करण्याकरितां आहे ही गोष्ट शास्त्रकार आणि धर्मकार या दोहोंसहि पूर्णपणें मान्य आहे. या उच्चतर ध्येयाची मर्यादा इतकी श्रेष्ठ आहे कीं, मनुष्य या मार्गानें जातां जातां अखेर त्याला ह्या जगाचें पालनपोषण करणाऱ्या परमेश्वराचें तादात्म्य प्राप्त होतें. म्हणजे तो देवपणा पावतो, असें शास्त्रांतून वर्णन आहे.

—गां० १०

७५०

आपल्या आवडत्या **ध्येयाकरितां** आपलें आयुष्य खर्च करण्यास तयार होणें व आपल्या कार्यक्रमांत प्राप्त होणारीं दुःखें बिनतक्रार सोसणें यांतच खरा पुरुषार्थ आहे; एरवीं ध्येयांची कोरडी चर्चा करीत बसणें हा नुसता चावटपणा होय. —के० १९१९-२८-४-२

७५१

मनुष्याची आवडनिवड वरचेवर पालटत असते. कोणत्याहि एका **ध्येयाची** आवड व तें गांठण्याचा निश्चय सतत कायम टिकविणें अत्यंत कठीण असतें. तसें होण्यास एक ठराविक वयोमर्यादा प्राप्त व्हावी लागते.

—आ० आ० १-१२८

७५२

कोणाहि देशभक्ताची तारीफ केवळ त्याच्या **ध्येयावरून** जग करीत नसून त्या ध्येयाकरितां तो स्वतः किती उद्योग व स्वार्थत्याग करितो यावरून करीत असते. —के० १९१९-२८-४-२

७५३

कोणाचाहि **नवीन पक्ष** उपस्थित झाला असतां जुन्या पक्षाचा व त्याचा विरोध उत्पन्न होत असतो खरा; पण हा विरोध फार वेळ कायम न ठेवतां नव्या पक्षाचें अभिनंदन करून पुढें काम सुरू ठेवणें हेंच शहाण्याचें काम आहे. —के० १९०८-७-४-४

७५४

नवे विचार आणि नव्या गोष्टी लोकांस सांगतांना त्यांस केवळ मूर्ख न मानतां त्यांचें जें कांहीं म्हणणें असेल तें पूर्णपणें लक्षांत घेऊन, त्या धोरणानें **नव्या जुन्याचा मेळ** घातला पाहिजे, व त्याकरितां जितक्या स्पष्ट व निर्भीडपणानें कांहीं गोष्टी समाजापुढें मांडणें जरूर आहे तितक्या रीतीनें त्या मांडल्या पाहिजेत. —के० १९०२-६-४-२

७५५

**नादब्रह्मांत** तल्लीन होऊन क्षणभर साक्षात् स्वात्मसुख अनुभवण्याची ज्याला पात्रता नाहीं अशा मनुष्याच्या हातून कोणतेंहि सत्कृत्य व्हावयाची आशा नको. —के० १८९२-३४-२-५

७५६

'दौलतीचें कल्याण तीच नीत' या लहानशा वाक्यांत **नानांच्या** अमदानीच्या पंचवीस वर्षांच्या इतिहासाचें सार आहे.

—के० १९००-१२ २-२

७५७

बहुतेक लोक आस्तिक आहेत म्हणून त्यांच्याविरुद्ध मतें प्रतिपादन करणाऱ्या **नास्तिकानें** आपल्या आचरटपणास धैर्य ही संज्ञा द्यावयाची तर बहुतेक लोक डोळस आहेत म्हणून आंधळ्यानें आपल्या ज्ञानचक्षूची कां शिफारस करूं नये ! —के० १९०४-२२-४-४

७५८

सृष्टीचें अगम्य मूलतत्त्व काय व त्यापासून ही विविध दृश्य सृष्टि कशी झाली असावी याबद्दल **नासदीय सूक्तांत** जे विचार प्रदर्शित केलेले आहेत, त्यांसारखे प्रगल्भ, स्वतंत्र व मूळाला हात घालणारे तत्त्वज्ञानाचे मार्मिक विचार दुसऱ्या कोणत्याहि धर्मांच्या मूलग्रंथांत आढळून येत नाहींत, इतकेंच नव्हे तर अशा प्रकारच्या अध्यात्मविचारानें भरलेला याच्या-इतका प्राचीन लेखहि अद्याप कोठेंच उपलब्ध झालेला नाहीं.

—गी० २४८

७५९

व्यक्तिमहात्म्य कमी होऊन व कार्याचा गौरव वाढून राष्ट्रनिशाणाचा जयघोष करीत ही जनता इतक्याच उत्साहानें नाचूं लागेल तर मला अत्यंत आनंद होईल. गुरुपूजा, प्रतिमापूजा या पायरींनें **निर्गुण उपासना** करण्याचें सामर्थ्य व्यक्तीला येतें; याच हिंदु संस्कृतींतील तत्त्वाचा अखिल राष्ट्राला देशकार्य करण्यास प्रवृत्त करण्यास उपयोग केला पाहिजे.

—आ० आ० १-९३

७६०

'**निर्वाण**' हें मरणाचें मरण किंवा उपनिषदांत वर्णिल्याप्रमाणें 'मृत्यु तरून जाण्याचा मार्ग' आहे, नुसतें मरण नव्हे. —गी० ५७०

७६१

आम्ही **निराशेंतूनच** जगतों. —धा० २९

७६२

**निराशावाद** हा नेहमीं विपन्न स्थितींतील लोकांस सदाशावादापेक्षां अधिक प्रिय वाटावा हा स्वाभाविक नियमच आहे. परंतु ज्यांनीं कोणत्या-हि प्रकारचा उद्योग केलेला नाहीं अगर स्वार्थत्याग केलेला नाहीं, अशा आळशी, उदरपरायण अशा लोकांस अमंगळ दिवाभीताप्रमाणें निराशा-वादाचा दगड उगाळीत बसून राष्ट्रीयसभा काय किंवा दुसऱ्या सार्व-जनिक उपयोगाच्या संस्था काय, त्यापासून कांहीं एक निष्पन्न व्हावयाचें नाहीं, असा अभिप्राय देत त्यांस अल्पायुष्य चिंतण्याचा अधिकार कसा पोंचतो हें आम्हांस तरी कळत नाहीं. —के० ले० २-५५७

७६३

ज्याला जो धंदा निसर्गत: प्राप्त झाला आहे तो त्यानें **निष्कामबुद्धीनें** चालू ठेविला म्हणजे कर्त्याला त्याचें कांहीं पाप लागत नाहीं; कर्में तेथून सर्व सारखींच; दोष कर्त्याच्या बुद्धींत आहे, कर्मांत नाहीं; म्हणून बुद्धि सम करून सर्व कर्में केल्यानें परमेश्वराची उपासना घडून पाप न लागतां अखेरीस सिद्धि मिळते. —गी० ४८७

७६४

भक्तिमार्गांतील लोक भोजनाचे वेळीं घांस घेतांना 'गोविंद' 'गोविंद' असें जें म्हणतात त्यांतील बीज कृष्णार्पणबुद्धिच होय. आपले सर्व व्यवहार लोकोपयोगाकरितां **निष्कामबुद्धीनें** चालू आहेत असें ज्ञानी जनकानें म्हटलें असून भगवद्भक्त आपल्या खाण्यापिण्याचेहि व्यवहार कृष्णार्पणबुद्धीनेंच करीत असतात. —गी० ४३०

७६५

किल्ल्याचें अभेद्यत्व जितकें त्याच्या तटाचे व बाहेरच्या चौक्यांचे मजबुतीवर अवलंबून आहे तितकेंच किंबहुना त्याहूनहि अधिक तें आंतील लोकांची **निष्ठा**, संतोष, उत्साह, हिम्मत, कर्तबगारी व भरभराट यांजवर अवलंबून आहे. —के० १९०४-२७-५-३

७६६

**निश्चयाची** दृढता ही नुसती मानसिक क्रिया आहे, आणि ती बरी किंवा वाईट हें ठरविण्यास ज्या कामाला ही क्रिया लावितात तें काम कसें आहे तें पाहिलें पाहिजे. झोंप आणि आळस इत्यादि कामांतच जर दृढ-निश्चय असेल तर तो तामस, फलाशेनें नित्य व्यवहारांतलीं कामें करण्यांत असेल तर राजस, आणि फलाशात्यागरूप योगांत दृढनिश्चय असेल तर तो सात्त्विक होय. —गी० ८४०

७६७

**निश्चयाचें** जेथें बल आहे तेथें ईश्वरकृपेनें अखेरीस सिद्धि अवश्य प्राप्त होते. लोककल्याणाचा राजमार्ग हाच होय. —के० १९००-१७-३-१

७६८

प्रजा **निःशस्त्र** केल्यानें त्यांतील तंटेभांडणें कमी होतात आणि त्यांजवळ शस्त्रें ठेवल्यानें तीं वाढतात हें तत्त्वच आधीं खोटें आहे. कारण ज्या राष्ट्रांतील प्रजेजवळ शस्त्रें आहेत तेथें गुन्ह्याचें प्रमाण जास्त आहे असें आढळून येत नाहीं. ज्यास खून किंवा मारामारी करावयाची आहे तो जेथें शस्त्रें असतील तेथें शस्त्रानें करील आणि नसतील तेथें कोयता, विळी, काठी, सुरी, कुऱ्हाड किंवा दुसरें कांहीं नसल्यास दगडांनींहि करूं शकेल. —के० ले० २-४०७

७६९

**निःशस्त्रप्रतिकार** हा सरकारापाशीं रुसवा आहे, 'सरकार'चा बहिष्कार नव्हे. —के० १९१५-६-६-३

७७०

राष्ट्राची **नीति** एकदां खराब झाली म्हणजे नाहीं तेथून नवीन नवीन अनर्थ उत्पन्न होतात. --के० १९०६-११-४-३

७७१

सूर्याच्या किरणांनीं एखाद्या पदार्थाची सावली सपाटप्रदेशावर सपाट आणि उंचसखल जाग्यावर उंचसखल पडते, म्हणून ती सावली मुळांतच उंचसखल असली पाहिजे असें ज्याप्रमाणें अनुमान करितां येत नाहीं त्याप्रमाणें दुष्ट लोकांच्या समाजांत आढळून येणारें **नीतिधर्माचें** अपूर्ण स्वरूपच मुख्य किंवा मूळचें होय असें म्हणतां येत नाहीं. हा दोष समाजाचा आहे नीतीचा नव्हे. —गी० ३७५

७७२

बाह्य सुखाचीच काय, पण जीविताचीहि पर्वा न ठेवितां, प्रसंगविशेषीं आध्यात्मिक दृष्टया त्याहून अधिक योग्यतेचे सत्यादि **नीतिधर्म** पाळण्याइतका मनोनिग्रह असणें यांतच मनुष्याचें मनुष्यपण आहे. —गी० ९३

७७३

भारती युद्धाबद्दलच काय, पण दुसऱ्या अनेक प्रसंगीं **नीतिमत्तेचा निर्णय** केवळ संख्येवरून करणें चुकीचें आहे. —गी० ८६

७७४

दिशा दाखविणारें होकायंत्र किंवा ध्रुव तारा यांचेकडे दुर्लक्ष्य करून अफाट समुद्रावर लाटा आणि वारा या दोहोंचेंच तारतम्य पाहून गलबतावरील खलाशी दर वेळीं आपल्या गलबताचें सुकाणूं धरूं लागले तर त्यांची जी स्थिति होईल तीच **नीतिनियमांचें** परमावधीचें स्वरूप लक्षांत न आणितां केवळ देशकालप्रमाणें वागणाऱ्या मनुष्यांची झाली पाहिजे.

—गी० ३७५

७७५

**नीतिमत्ता** हा निर्मळ, शुद्ध, प्रेमळ, सम किंवा थोडक्यांत सांगणें असल्यास सत्त्वशील अंतःकरणाचा धर्म आहे, नुसत्या सारासार विचारांचें फल नव्हे.

—गी० ४७८

७७६

नीतिधर्माचें पूर्ण, शुद्ध व नित्य स्वरूप कोणतें याचा शास्त्रीय निश्चय करण्यासाठींच नीतिशास्त्राची प्रवृत्ति झालेली आहे; आणि हें काम जर **नीतिशास्त्र** न करील तर तें निष्फळ म्हणावें लागेल.

—गी० ८४

७७७

आर्यांच्या पूर्वापार परंपरेस अनुसरून जेथें वेदान्त, योग, कर्ममार्ग आदिकरून लोकमान्य शास्त्रें जीवाच्या निरंतर कल्याणाकडे लक्ष पुरवितात, तेथें **नीतिशास्त्राचा** पाया नुसत्या संख्येवर मांडणें हें मुळींच नापसंत आहे.

—के० १९०२-३-२-३

७७८

व्याकरणशास्त्र ज्याप्रमाणें नवी भाषा न बनवितां व्यवहारांत जी भाषा असत्ये तिचेच नियम शोधून काढून भाषेच्या अभिवृद्धीस मदत करितें याप्रमाणें **नीतिशास्त्राचा** प्रकार आहे.

—गी० ४८४

७७९

कर्म म्हटलें म्हणजे तें बंधक असावयाचें हें सांगावयास नको. म्हणून पाऱ्याचा उपयोग करण्यापूर्वीं तो मारून ज्याप्रमाणें वैद्य शुद्ध करून घेतात तद्वत् कर्मे करण्यापूर्वीं त्यांचें बंधकत्व किंवा दोष जेणेंकरून नाहींसा होईल असा उपाय करावा लागतो, व अशा युक्तीनें कर्मे करण्याची जी स्थिति तिला **'नैष्कर्म्य'** असें म्हणतात. याप्रमाणें **नांगी** मोडलेलें **कर्म** मोक्षाला प्रतिबंधक होत नसल्यामुळें, ही स्थिति कशी संपादन करावी हा मोक्षशास्त्रांतील एक महत्त्वाचा प्रश्न आहे. —गी० ६४४

७८०

इंग्रजी राज्य म्हणजे काय? नोकरांच्या तांड्यांचें राज्य. हे **नोकर** वरून मात्र मोठा परोपकाराचा डौल दाखवितात; पण आले मात्र पोट भरण्याकरतां! —स्व० मो०(४)१२७

७८१

राजाची **नोकरी** करण्यांत प्रजेशीं बेइमानीपणा केलाच पाहिजे असें नाहीं. आणि एवढें जर लोकांनीं लक्षांत ठेवलें, तर पतिव्रता वधू ज्याप्रमाणें उभयकुलांस आनंददायक होते त्याप्रमाणें राजा व प्रजा या दोघांसहि ते मान्य होतील. —के० १९०५-२५-५-१

७८२

मी **न्याय** मागण्यासाठीं उभा आहें; दया करा, अशी माझी मुळींच मागणी नाहीं. —ख० १५९

७८३

आजपर्यंतचे इतिहासांत केवळ **न्याय** मागणाऱ्या अर्जदारांनाहि अखेर हस्तपरहस्तें सोट्याचाच आश्रय करावा लागला आहे, व न्याय मिळविण्याच्या कामीं आपल्या पंचप्राणांसह सर्वस्वाचा बळी देण्यास तयार व्हावें लागलें आहे. —के० ले० २-५५६

७८४

जो तो आपल्या धर्माची संख्या वाढवितो आहे. आणि आमचे शास्त्रीपंडित पहावें तर **पतितपरावर्तन** योग्य कीं अयोग्य याचा वाद-विवादच करीत बसले आहेत. आमची सर्व बाजूंनीं सांखळी सुटली आहे. मला अशी खात्री आहे कीं, ख्रिस्ती, मुसलमान, यांपेक्षांहि वैदिकधर्मप्रसाराचें काम आपल्या पूर्वजांनीं फार सुव्यवस्थित आणि नेटानें केलें आहे. —आ० आ० २-११०

७८५

उत्तम शिक्षण मिळालें, उत्तम गुरूचा सहवास घडला व अलौकिक पुरुषांचा स्नेह संपादन झाला, तरी त्यांच्या उपदेशाचा सुपरिणाम सर्वच लोकांचे मनावर होतो असें नाहीं; असें असतें तर **'पढतमूर्ख'** ही म्हण प्रचारांत आली नसती. —के० १८९५-१-३-३

७८६

विश्वविद्यालयांतून जें **पदवीदान** होतें त्याचा जो एक अनिष्ट परिणाम होतो तो असा कीं, **पदवीदान** झाल्याबरोबर आपण विद्येच्या शिखरास जाऊन पोहोंचलों असें आमचे तरुण लोक समजतात; परंतु वास्तविक स्थिति अशी असते कीं, झालेला विद्येचा संस्कार अगदीं अपुरा असून वाचन, मनन, व अभ्यास हीं जर पुढें ठेविलीं नाहींत तर **पदवीधर लोकांसहि** सुशिक्षित म्हणण्याची सोय नाहीं. —के० ले० १-४८२

७८७

**परकी अमलाखालीं** कल्पनाशक्तीस वाव मिळत नाहीं आणि आत्म-प्रत्ययाला तर आधारच रहात नाहीं. —के० १९१९-१७-७-१

७८८

स्वतंत्र देशांत शिक्षणाच्या संस्था राष्ट्रीय विचाराचीं आदिस्थानें होऊन राष्ट्रहितास पोषक होतात. परंतु **परकीय अमलाखालीं** याच संस्था राष्ट्रास कायमच्या दास्यत्वांत लोटण्यास किंवा राष्ट्रांतील पुढारी लोकांचे विचार कमकुवत करून त्यांस विचारानें आणि बुद्धीनें नेभळे करण्यास उपयोगी पडतात. —के० १९०५-४२-४-४

७८९

**परकीय अमलांत** राजकीय महर्षि किंवा संत उत्पन्न होणें अशक्य आहे. —के० १९०६-२२-४-४

७९०

राष्ट्रास **परकी भाषेंत** शिक्षण देणें म्हणजे त्याची खच्ची करण्यासारखें आहे. —व्या० २-२७

७९१

केवळ दाईच्या स्तनपानावर जशी बालकांची नीट जोपासना होत नाहीं, त्याप्रमाणेंच **परकी भाषेंतून** दिलेल्या उष्टया व निःसत्त्व **शिक्षणानें** मुलांचीं मनें कधींहि सुसंस्कृत व्हावयाचीं नाहींत.

—के० १८९४-४९-२-५

७९२

आमचेकडील शिक्षणांतील खरा दोष विषयबाहुल्य किंवा ज्ञानातिरेक हा नसून तें ज्ञान **परकी भाषेंतून** मिळवावें लागत असल्यामुळें होणारा बुद्धीचा व शक्तीचा अपव्यय हा होय. —के० १९००-१-३-१

७९३

कोणत्याहि राज्यांत विशेषतः **परकी राज्यांत** भित्रे, स्वार्थसाधु किंवा तोंडपुजे लोक नेहमीं सांपडावयाचेच. —के० १९०७-३३-४-४

७९४

राजकीय हक्कप्राप्तीचा मार्ग स्वदेशी राजाच्या राज्यांतहि सुलभ आणि सामोपचाराचा नसतो; मग जेथें **परकीय अधिकारी** वर्गाच्या हातांत सत्ता असते तेथील प्रकार विचारावयासच नको.

—के० १९०७-२३-४-३

७९५

विद्यार्थ्यांच्या मनांत राष्ट्रीय तत्त्वांची अभिवृद्धि करून विद्यार्थ्यांचें शील राष्ट्रीय बनविण्यास **परकी गुरु** निरुपयोगी होत.

—के० १९०५-४३-४-२

७९६

आमचें असें मत आहे कीं, तरवारीच्या जोरावर राज्य करणाऱ्या **परकीय** प्रभूंच्या **अमलाखालीं** व्यक्तीच्या स्वभाववैचित्र्यास्तव स्वातंत्र्यास आतां पूर्वींप्रमाणें अवकाश राहिला नाहीं. उत्साह, ओज, साहस, योजना वगैरे गुणांची जेथें जेथें जरूर आहे त्या सर्व जागा राज्यकर्त्यांनीं आपल्या हातीं ठेवून आम्हांस त्यांच्या हुकमतीखालीं केवळ मानवी यंत्रें बनविलीं आहेत. —के० ले० १-१२

७९७

देशामध्यें जेव्हां **परकीय** लोकांचें राज्य असतें आणि सदर परकीय राजे विद्यापीठें आपल्या ताब्यांत घेऊन सदर पीठांचा देशांतील प्रजेस दास्यत्वांत ठेवणाऱ्या राजकीय धोरणाकडे उपयोग करून घेतात, तेव्हां हीं विद्यापीठें जवळ जवळ दारूच्या पिठ्यासारखींच होत असतात.

—के० १९०५-४२-४-३

७९८

भाषेंत **परकीय शब्द** नसणें हें स्वाभिमानाचें लक्षण आहे खरें, पण त्याचा अर्थ असा कीं, परकीय शब्दांचा स्वदेशी शब्दांवर शिरजोरपणा होऊं नये; परकीय शब्द मुळींच स्वभाषेंत येऊं नयेत असा नव्हे.

—के० १९०३-४२-४-५

७९९

देशांतील बुद्धिमान लोकांचा सगळा वर्ग उदरपोषणाकरितां **परकीय राज्यकर्त्यांच्या** अगदीं कह्यांत गेल्यावर देशाची उन्नति लवकर झाली नाहीं, तर त्यांत नवल तें कोणतें ? —के० ले० २-५८३

८००

मनुष्याचा स्वभाव हा कांहीं जात्या स्थिर नसून मोठ्या झाडाचीं ज्या-प्रमाणें कलमें बनवितां येतात त्याप्रमाणें तेजस्वी माणसेंहि **परकीय** राष्ट्राचे सत्तेखालीं वागल्यानें कालांतरानें निरुपद्रवी स्वभावाचीं बनतात किंवा बनवतां येतात. —के० १९२०-१६-४-२

८०१

तरुण पिढीस खऱ्या राष्ट्रीय विचारांचें जर वळण लावावयाचें असेल तर तें वळण **परकीय सरकारी संस्थांतील** शिक्षकांकडून कधींहि मिळावयाचें नाहीं.

—के० १९०५-४२-४-४

८०२

भिवविणें हें **परकीय सरकाराचें** कामच आहे. —व्या० २-११३

८०३

सावटाखालीं जसें झाड वाढत नाहीं तसेंच **परकीय सत्तेखालीं** अभिवृद्धि होणें कठिण आहे. तथापि अभिवृद्धि होणें अशक्य नाहीं; उशीर लागेल. जितक्या अडचणी अधिक बिकट तितकें डोकें अधिक खर्च केलें पाहिजे. निश्चयाची तयारी अधिक पाहिजे, तेव्हां यश मिळेल.

—आ० व० ३९८

८०४

**परक्यांचा पिंड** पचनीं पाडून पुनः स्वार्थानें दृष्टि आकुंचित न होऊं देणारे महात्मे फारच थोडे. —के० १९०६-४४-४-३

८०५

आपली जात व धर्म राखणें ही गोष्ट आपल्या हातांत असते व त्याबद्दल आपणांस योग्य अभिमान असला म्हणजे व्यापाराकरितां किंवा अन्य कारणाकरितां **परदेशास प्रवास** करण्यास आमचा धर्म आड येत नाहीं.

—च० ६५२

८०६

**परधर्मांची** महति किंवा परभाषेचें सौंदर्य पूर्णपणें समजल्यानें स्वधर्मावरील किंवा स्वभाषेवरील श्रद्धा कमी होते असें नाहीं.

—के० १९००-४४-२-४

८०७

सरकार स्वधर्मी आणि स्वदेशी असतां त्यांच्या हातांत जे अधिकार असणें इष्ट असतें ते सर्व अधिकार **परधर्मी** आणि परकी सरकारनें हातांत घेणें योग्य व इष्ट नाहीं. —के० १९००-२५-३-१

८०८

केवळ तर्कदृष्टया विचार केला तर **परब्रह्माचें** किंवा आत्म्याचेंहि अ-ज्ञेयत्व कबूल केल्याखेरीज मार्ग रहात नाहीं. परंतु ब्रह्म याप्रमाणें निर्गुण व अज्ञेय अतएव इंद्रियातीत असलें तरी प्रत्येक मनुष्यास त्याच्या स्वतःच्या आत्म्याची साक्षात् प्रतीति असल्यामुळें, या निर्गुण आत्म्याचें जें कांहीं अनिर्वाच्य स्वरूप साक्षात्कारानें आपण ओळखतों तेंच पर-ब्रह्माचेंहि स्वरूप आहे अशी प्रतीति येऊं शकत्ये; व त्यामुळें ब्रह्म व आत्मा एकस्वरूपी आहे हा सिद्धान्त निरर्थक होऊं शकत नाहीं. अशा दृष्टीनें पाहिलें म्हणजे 'ब्रह्म आत्मस्वरूपी आहे' यापेक्षां त्याच्या स्वरूपा-बद्दल जास्त कांहींच सांगतां येण्यासारखें नाहीं; बाकीच्या गोष्टींबद्दल सर्व हवाला स्वानुभवावर ठेवावा लागतो. —गी० २२६

८०९

मनुष्याचें ज्ञान कितीहि पूर्ण व त्याची बुद्धि कितीहि साम्यावस्थेस पोंचलेली असली, तरी कामक्रोधादिकांच्या कह्यांत सांपडलेल्या अशुद्ध बुद्धीच्या लोकांबरोबर वागतांना अहिंसा, दया, शांति, क्षमा इत्यादि नित्य व **परमावधीच्या सद्गुणांचाच** सर्व प्रकारें सर्वदा स्वीकार करून त्याचा निभाव लागावयाचा नाहीं. —गी० ३७३

८१०

परमेश्वरावर भक्ति ठेवा. आणि सर्व उद्योगाचें मूळ जो निश्चय तो कायम ठेवा, म्हणजे **परमेश्वर** तुम्हांस साह्य करील. —व्या० २-३८

८११

राजकीय बाबतींत **परमेश्वर** हें एक कोर्ट आहे. —व्या० २-३३

८१२

तुम्ही आपल्या **कर्मांचा** पडदा जर स्वच्छ कांचेसारखा कराल तर त्यांतून **परमेश्वर** दिसेल; गोणपाटाचा कराल तर त्यांतून परमेश्वर दिसाव-याचा नाहीं. —धा० २२५

८१३

**परमेश्वर** हा सर्वांत मोठा डिटेक्टिव आहे आणि तो सारें पाहात आहे. —व्या० १-३

८१४

सर्व जन्मभर एकाच भावनेंत मन रंगून गेल्याखेरीज अंतकालच्या यातनेंत तीच भावना होणें शक्य नाहीं; म्हणून आमरणान्त म्हणजे सर्व आयुष्यभर **परमेश्वराचें ध्यान** करणें जरूर आहे. —गी० ७३०

८१५

ज्यूरीनें कसाहि निकाल दिला असला तरी, मी पूर्ण निर्दोषी आहें अशीच माझी मनोदेवता मला अद्याप सांगत आहे. सृष्टीच्या भवितव्यतेवर या कोर्टापेक्षां वरिष्ठ असलेल्या **परमेश्वरी सत्तेचें प्रभुत्व** असतें. माझ्या स्वातंत्र्यापेक्षां माझ्या हालअपेष्टांनींच मी अंगीकृत केलेलें राष्ट्रकार्य अधिक भरभराटीस यावें असाहि परमेश्वराचा संकेत असेल.

—ख० ५०

८१६

राजाच्या डिटेक्टिवापेक्षां **परमेश्वराच्या** डिटेक्टिवाची भीति जास्त बाळगिली पाहिजे. —व्या० १-५५

८१७

साधारण कामधंदा करणाऱ्या माणसाला तारीख बदलली म्हणजे आपल्या कॅलेंडराचें पान बदलावें लागतें, तितकासुद्धां उपद्व्याप शतक बदललें असतां **परमेश्वराच्या** घरच्या कारखान्यांत लागत नाहीं.

—के० १९०१-२-२-४

८१८

**परमेश्वरास** स्त्री काय, चांडाळ काय, आणि ब्राह्मण काय सारखेच. 'देव भावाचा भुकेला', प्रतीकाचा नाहीं, काळ्या गोऱ्या वर्णाचा नाहीं, आणि स्त्री-पुरुषादि, ब्राह्मण-चांडाळादि भेदाचाहि नाहीं.

—गी० ४३७

८१९

मनूनें एक बायकांचा श्लोक लिहिला आहे; तो म्हणतो कीं, बायकांना लहानपणीं बाप, तरुणपणीं नवरा व म्हातारपणीं मुलगा असे धनी असतात. तशीच आमचीहि स्थिति झाली आहे. लहानपणीं मास्तर, तरुणपणीं नोकरीचें जोखड व म्हातारपणीं पेन्शन. 'न हिंदुः प्रभुरात्मनः' अशी लोकांची **पराधीन स्थिति** झाली आहे. —स्व० मो० (४) १२८

८२०

**परिस्थिति** उत्पन्न होण्यास जरी आपण कारणीभूत नसलों तरी ती सुधारण्यास आपल्या हातून शक्य तेवढे प्रयत्न करणें हें प्रत्येक मनुष्याचें व्यक्तिदृष्ट्या आणि सार्वजनिक दृष्ट्या कर्तव्य आहे, पवित्र कर्तव्य आहे, असा शास्त्राचा आणि धर्माचाहि सिद्धान्त आहे. —गां० १०

८२१

प्रकृतीच्या विरुद्ध जाण्याची आपली योग्यता नाहीं अशा विचारानें नाउमेद न होतां, आपल्या स्वातंत्र्यबुद्धीचा उपयोग करून **परिस्थिति** प्रतिकूल असली तरी, निसर्गाच्या तत्त्वांची आपापसांत झोंबी लावून देऊन किंवा त्यांचा योग्य मिलाफ करून ती अनुकूल करून घेण्याचा प्रयत्न मनुष्यानें केला पाहिजे. —के० १९१५-३-९-२-२

८२२

प्रतिकूल **परिस्थिति** असतांना तिला अनुकूल करून घेण्याची कांहीं स्वतंत्र शक्ति ( Freedom of will ) मनुष्यांत आहे.

—के० १९१५-३९-२-२

८२३

**परिस्थितीचा** गुलाम न बनतां परिस्थितीला यथासंभव, यथाशक्ति व यावच्छक्य आपल्या ताब्यांत आणण्यास जो मनोनिग्रह, स्वार्थत्याग, निर्लोभीपणा आणि धैर्य लागतें तें ज्याच्या अंगांत आहे, आणि दुःखाची अगर संकटाची भीति अगर पर्वा न बाळगतां जो आपल्या ठायीं असणाऱ्या या सद्‌गुणांचा लोकोपयोगार्थ उपयोग करतो तोच मोठा म्हणावयाचा. —के० १९१६-२७-४-१

८२४

व्यक्तीच्या संसारांत काय, किंवा देशाच्या संसारांत काय **परिस्थिति** ही प्रायः पूर्व पिढीच्या किंवा पूर्वकालीन कर्माच्या परिपाकानें निर्माण झालेली असते. —गी० ९

८२५

**परीक्षा** हें विद्वत्ता मापण्याच्या अनेक साधनांपैकीं एक साधन आहे, परंतु त्यानें खऱ्या विद्वत्तेची नेहमींच परीक्षा होते असें नाहीं.

—के० १८९२-५२-३-१

८२६

हिंदुस्थानची नौका कोणीकडे हांकावी, हें दाखविणारी **परंपरा** हा ध्रुवाचा तारा आहे. तो जर कां सुटला तर कांहींहि कामास यावयाचें नाहीं. व्या० २-१२२

८२७

योग्य व कर्त्या माणसांची **परंपरा** हेंच कोणत्याहि राष्ट्राच्या जीवित्वाचें मुख्य लक्षण आहे. —के० १८९५-२१-२-५

८२८

रोमन राष्ट्र नामशेष झालें, कार्थेजचें साम्राज्य धुळीस मिळालें, इराणचें साम्राज्य लयाला गेलें, तरी पण आमचा धर्म, आमची परंपरा हीं सर्व कायम आहेत. कांहीं कमी असेल, पण **परंपरा** अद्याप कायम आहे. हा जो चिवटपणा आमच्यांत आहे तोच आमच्या जिवंतपणाचें कारण होय.

—व्या० २-१२२

८२९

[illegible]

८३०

**परवशता** ही राष्ट्राचें पौरुष खच्ची करते आणि त्याच्या नैतिक व भौतिक सुधारणेचीहि कुचंबणा होते. —के० १९१९-१७-७-१

८३१

राष्ट्राची किंवा देशाची जी प्रगति व्हावयाची असते, ती निरनिराळ्या **पक्षांतील** लोकांकडून राष्ट्रीय प्रश्नांची चर्चा झाल्याखेरीज कधींहि होत नाहीं. —के० १९०६-२९-४-२

८३२

राष्ट्रीय-संस्था अमुक एक पक्षाच्याच हातांत कायमची असावी, इतकेंच नव्हे तर त्या **पक्षाखेरीज** इतर पक्षांचे लोकहि त्या संस्थेंत असूं नयेत असा आग्रह धरणें हा मूर्खपणा होय. —के० १९०६-२९-४-२

८३३

आपापलीं मतें लोकांपुढें मांडून लोकांस आज नाहीं तर उद्यां आपल्या बतीचे करून घेण्याची दोन **पक्षांची** जी नेहमीं झटापट चालू असते तीच राष्ट्राच्या प्रगतीचें खरें साधन होय. —के० १९०८-९४-५

८३४

कांहीं विशिष्ट कार्याकरितां एक होऊन पुनः आपापलीं विशिष्ट मतें लोकांपुढें मांडण्याची प्रत्येक **पक्षास** मुभा असणें यांतच राष्ट्राचें हित आहे. —के० १९०८-९-४-५

८३५

**पाटीलकुलकर्णी** यांस हल्लीं जे हक्क आहेत ते एक प्रकारें स्थानिक-स्वराज्याच्या तत्त्वावरच दिले आहेत असें म्हणतां येईल. —के०ले० २-५४९

८३६

प्राच्य भाषांतील ग्रंथसमूहापैकीं युरोपांतील विद्वानांवर ज्याचा विशेष परिणाम झाला ते ग्रंथ भाषाविषयक आणि धर्मविषयक असून भाषा-विषयक ग्रंथांताहि **पाणिनीचें व्याकरण** हा पहिला किंवा श्रेष्ठ ग्रंथ होय. —के० १९००-४४-२-३

८३७

**पातक** करतो तो, पातकास अनुमोदन देतो तो, व पातक होत असतां तें बघतो तो, हे सारे पातकी आहेत, असें आमचें शास्त्र सांगतें.

—व्या० २-११७

८३८

गरिबांच्या चुकांपेक्षां मोठ्यांचींच **पातकें** लोकांस अधिक भोगावीं लागतात. —के० १९०७-३९-४-३

८३९

**पातंजलयोग** म्हणजे मनाचा निरोध करण्याची एक युक्ति किंवा क्रिया होय. या कसरतीनें मन ताब्यांत आलें तरी तें एकाग्र मन भगवंताचे ठायीं न लावितां दुसऱ्या गोष्टींकडेहि लावितां येईल. पण एकाग्र चित्ताचा असा दुरुपयोग न करितां, मनाची ही एकाग्रता अगर समाधि परमेश्वराच्या स्वरूपाचें ज्ञान होण्याकडे लाविली पाहिजे, व तसें झालें म्हणजेच हा योग सुखकारक होतो एरवीं हे नुस्ते क्लेश होत. —गी० ७०१

८४०

आपण केलेली स्तुति किंवा आपण केलेली निंदा ह्यांच्यांत जोर रहावा अशी जर कोणाची इच्छा असेल तर त्यानें **पात्रापात्र विचार** अगोदर केला पाहिजे.

—के० १९००-३-३-१

८४१

**पापग्रहांस** पापग्रह म्हटल्यानें ते जास्त क्रुद्ध होतात ही समजूत वेडेपणाची आहे. —के० १९००-१८-२-४

८४२

**पारतंत्र्यांत** राहून पारतंत्र्यांत राहिलों असें म्हणण्याची मनाई असावी हा धर्म नव्हे, हें पाप आहे. —स्व० गी० ८

८४३

**पारलौकिक स्वराज्य** इहलौकिक स्वराज्याशिवाय शक्य नाहीं.

—के० १९१७-२१-४-२

८४४

आम्हांस जें **पाश्चात्य शिक्षण** मिळालें आहे त्यानें हल्लींची आमची स्थिति आम्हांस दुःसह झालेली आहे. —विश्व० १२

८४५

हिंदुस्थानचें दारिद्य, शारीरिक ऱ्हास, औद्योगिक पुनरुज्जीवन, आर्थिक उन्नति, औद्योगिक शिक्षण, जाति व रूढीसंबंधीं नाजूक प्रश्न या सर्वांचा केवळ **पाश्चात्य संस्कृतींत** वाढलेल्या परकीयांकडून निकाल होऊं शकणार नाहीं तर तो हिंदी लोकांकडूनच होईल. —के० १९१९-१७-७-२

८४६

कोणत्याहि समाजाचा ज्यास **पुढाकार** घ्यावयाचा असेल त्यानें आपल्या एकनिष्ठपणानें, नीतिमत्तेनें, स्वार्थत्यागानें व समाजाबद्दलच्या खऱ्या कळकळीनें समाजाचा विश्वास पहिल्यानें संपादन केला पाहिजे. —विष्णु-७

८४७

समाजाचे **पुढारी** होण्यास विद्वत्तेपेक्षां सदाचरण, धर्मनिष्ठा आणि स्वार्थत्याग यांची अधिक जरूर लागत असते. —विष्णु० ७

८४८

देशांतील सर्व लोक उपजीविकेची नवीन साधनें शोधून काढण्यास असमर्थ असतात. तीं कामें देशांतील **पुढारी** लोक अगर ज्ञाती आणि सरकार यांनींच केलीं पाहिजेत. के० ले० १-१४८

८४९

खरे **पुढारी** इंग्रजी राज्यपद्धतींत व इंग्रजी अमलाखालीं उत्तरोत्तर दुर्मिळ होत चालले आहेत. —के० १९०१-४९-२-४

८५०

आपल्या आवडीप्रमाणें किंवा शक्तीप्रमाणें कर्तव्याची दिशा ठरविल्यानंतर उदरपोषणाकरितां नव्हे, तर द्रव्य व अधिकार यांच्या लालचीनें जो मनुष्य आपलें ठरविलेलें कर्तव्य सोडून देतो किंवा क्षणभर बाजूला ठेवतो तो **पुढारी** नव्हे आणि देशाचा हितकर्ताहि नव्हे. —विष्णु०-१९

८५१

**खरे पुढारी** ज्या देशांत जन्मत नाहींत त्याची इतिहासज्ञ पुरुष मेलेल्या राष्ट्रांत गणना करीत असतात. —के० १९०१-४९-२-४

८५२

बड्या बड्या अधिकारी वर्गाच्या समाजांत आपणांस गोडी राखून वागतां यावें म्हणून लोकांचें खरें मत योग्य प्रसंगीं प्रदर्शित करण्याचें ज्यांच्या अंगीं धैर्य नाहीं ते लोकांचे **पुढारी** असून नसून सारखेच; किंबहुना असल्या नरम पुढाऱ्यांमुळें लोकांच्या फायद्यापेक्षां त्यांचें नुकसानच जास्त होतें असें म्हटलें तरी चालेल. —के० ले० २-१२९

८५३

८५७

कायदेशीर रीतीनें सरकाराशीं भांडावयास रयतेस कसें शिकवावें ही विद्या आमच्या **पुढारी** लोकांस शिकावयाची आहे व ती जेव्हां ते शिकतील तेव्हांच सरकारी अधिकाऱ्यांचा उर्मटपणा उतरेल व रयतेस कांहीं फायदा होईल. —के० ले० १-५८९

८५८

राष्ट्रांत ज्या तऱ्हेचे **पुढारी** निपजतात त्या मानानें त्यांची स्थिति सुधारते अगर बिघडते हें निर्विवाद आहे. —के० ले०-२-१२८

८५९

**पुढारी** झाले म्हणजे 'मुखरस्तत्र हन्यते' या न्यायानें आघातहि सोसावे लागतात. —के० १९१९-४९-४-५

८६०

लोकमत जागृत करण्यास **पुढारी** लागतात हें खरें आहे; पण तें लोकमत एकदां जागृत झालें म्हणजे लोकांच्या पुढाऱ्यांसहि त्या जागृत लोकमतास अनुसरून वागावें लागतें, त्यापासून वेगळें होऊन चालत नाहीं. —के० १९१८-३४-४-२

८६१

कोणताहि देश विपन्न स्थितींत आला असतां त्याच्या रोगाचीं खरीं कारणें आपल्या बुद्धिबलानें शोधून काढून तीं दूर करण्याचा कायावाचामनें-करून यथाशक्ति, अव्याहत, आमरणान्त प्रयत्न करणें हें देशांतील पुढाऱ्यांचें कर्तव्य होय. असे पुढारी ज्या देशांत जन्मत नाहींत त्याची इतिहासज्ञ पुरुष मेलेल्या राष्ट्रांत गणना करीत असतात. शरीरास ज्याप्रमाणें प्राण त्याप्रमाणें असले **पुढारी** हे राष्ट्राचे जीव होत. —के० ले० २-२९२

८६२

जो **पुढारी** झाला त्याजवर बरेवाईटपणाचा दोष नेहमींच पडत असतो; व पुढारी म्हणून जर इतरांच्या उच्छृंखल वृत्तीचा अवरोध करण्याचा त्यास अधिकार असतो, तर यशापयशाचा बोजाहि विनाकारण त्याच्या माथीं पडतो, असें म्हणतां यावयाचें नाहीं. —के० ले० २-१११

८६३

राजकारणी माणसांच्या अंगांत दोन गुण पाहिजेत. एक तर त्यांच्या हृदयांत प्रखर आग पेटलेली पाहिजे; आणि दुसरा म्हणजे त्या हृदया-च्या वरच्या बाजूस डोकें बर्फासारखें थंड असलें पाहिजे. हे दोनहि गुण

८६९

आपलीं मतें कांहींहि असोत; पण तीं लोकांवर न लादतां लोक पुढें जाण्यास किती खुषी आहेत त्या बेतानेंच त्यांच्या **पुढारीपणाचें** काम केलें पाहिजे. —के० १८९५-४७-३-२

८७०

**पुढाऱ्याची** पाठ राखणें लोकांचें कर्तव्य आहे.—के० १९१६-४९-२-१

८७१

माझा दृढ विश्वास आहे कीं, हिंदुस्थानचा उर्जितकाळ आतां समीप आला आहे. अर्थात् उत्तम **पुढाऱ्यांची** वाण ह्यापुढें परमेश्वर मुळींच पडूं देणार नाहीं. माझें काम शक्य त्या प्रमाणांत मीं केलें. पुढील मार्गा-बद्दल माझा परमेश्वरावर विश्वास आहे. —आ० आ० १-९०

८७२

आपण लोकमत उत्पन्न होण्यास कारणीभूत व्हावें आणि लोकमत त्याप्रमाणें बनल्यावर पुनः आपण माघार घ्यावी हें कांहीं **पुढाऱ्यांचें** लक्षण नव्हे. —के० १९१८-३४-४-३

८७३

मनुष्यांची पारख, त्यांच्या हातून चुक्या घडल्या असतां त्यांस शांत-पणें संभाळून घेऊन पुनः उत्तेजन देण्यास अवश्य लागणारे उत्साह, शांती वगैरे गुण **पुढाऱ्यांचे** अंगीं जरूर असावे लागतात. —के० १९०१-४-३-१

८७४

सृष्टींतील प्रत्येक जातीचे प्राण्यांत कांहीं विशिष्ट गुणधर्म आहेत व त्यांचा विवक्षित उपयोगहि असतो; तसेंच मनुष्य जातींतहि प्रत्येकाचे अंगीं कांहीं विशिष्ट गुण व एकंदर मानवकोटीच्या उन्नतीसाठीं कांहीं विशिष्ट कर्तव्य करण्याचें सामर्थ्य आहे; ते गुण व सामर्थ्य कोणत्या प्रकारचें आहे हें ओळखून त्याचा पूर्ण विकास व उपयोग होईल असें त्या त्या राष्ट्रास किंवा जातीस वळण लावणें हें तेथील **पुढाऱ्यांचें** कर्तव्य आहे.

—के० १९०३-३३-४-५

८७५

भावी सुपरिणामाबद्दल निःसंशय मनोवृत्ति फारच थोड्या **पुढाऱ्यांचे** ठायीं आढळून येते. —के० १९०१-४-३-२

८७६

**पुढाऱ्याचें** काम मोठें कठीण आहे व त्यांतहि परकी राज्यांत तें फार कठीण आहे. —के० १८९९-४२-३-२

८७७

राष्ट्र तयार नसल्यास तें तयार करण्याचें काम **पुढाऱ्यांचें** आहे; किंबहुना पुढाऱ्यांचें तें कर्तव्यच होय; कारण सर्व राष्ट्र तयार असल्यास मग पुढाऱ्यांचीहि जरूर नाहीं. —के० १९०७-३४-४-४

८७८

हिंदुस्थानांतील राजकीय चळवळीस यश न येण्याचीं जीं कारणें आहेत, त्यांमध्यें आमच्या राजकीय **पुढाऱ्यांचें** वर्तन हें एक जबरदस्त कारण आहे. —के० १९०४-२८-५-२

८७९

देशांतील सर्व लोक कळकळीचे असल्यावर **पुढाऱ्यांचें** कांहीं महत्त्व नाहीं. आणि पुढारी चांगला असल्यास तो आपल्या वर्तनानें व उद्योगानें लोकांच्या अंगांत कळकळ नसली तरी ती उत्पन्न करतो, व कांहीं अंशीं तरी लोकांवर आपली छाप ठेवून त्यांची प्रगति करतो, हें तत्त्व प्राचीन आणि अर्वाचीन इतिहासांवरून सहज समजण्यासारखें आहे.

—के० लें० २-४८३

८८०

**पुढाऱ्यांचें** खरें कर्तव्य म्हणजे आपलें मत स्पष्टपणें व कोणत्याहि प्रकारचे आढेवेढे न घेतां प्रसिद्ध करणें हेंच असून ते त्याप्रमाणें वागले नाहींत तर इतर लोकांना नासकें व नादान उदाहरण घालून देण्याचें पातक त्यांच्या माथीं बसल्यावांचून राहणार नाहीं.

—के० १९००-७-३-२

८८१

कोणत्याहि पक्षाची मजबुती त्याच्या **पुढाऱ्यांच्या** शहाणपणावर, निश्चयावर आणि धूर्ततेवर अवलंबून असते. —के० १८९१-४७-२-५

८८२

सरकारास पचतें तितकें स्पष्ट बोलावयाचें आणि यापेक्षां जास्त निर्भीडपणें कोणी बोलूं लागल्यास अथवा कृति करा म्हणून सांगूं लागल्यास त्याचा उपहास करून आपला नेभळेपणा झांकावयाचा, यासारखें लोकांच्या **पुढाऱ्यांत** दुसरें कोणतेंहि लांच्छनास्पद नाहीं.

—के० १९०५-३७-५-१

८८३

जेथें अधिकारी वर्गांत मुत्सद्दीपणा नसून पोरकट बादशाही अभिमानामुळें व खेळाडूपणाच्या चैनीमुळें अभ्यासपूर्वक लोकस्थितीचें निरीक्षण करण्याचें सामर्थ्य राहिलेलें नसतें, तेथें लोकांच्या **पुढाऱ्यांनीं** स्पष्टवक्तेपणा पत्करून सद्यःस्थितीविषयीं सरकारास जागें केल्याशिवाय सरकारचें व लोकांचें कल्याण कधींहि होत नाहीं. —के० १९०६-३५-४-३

८८४

**पुढाऱ्यांनीं** आपले विचार स्वतंत्र व निर्धास्त रीतीनें व्यक्त केल्याखेरीज लोकांमध्यें जी एकप्रकारची विशिष्ट स्वातंत्र्यप्रीति येणें जरूर आहे ती यावयाची नाहीं. —के० १८९३-१५-३-३

८८५

राष्ट्राच्या इतिहासांत ज्या घडामोडी होतात त्या पुष्कळदां कांहीं निमित्तानें क्षुब्ध झालेल्या लोकमतास वळण देण्याची संधि देशांतील **पुढाऱ्यांनीं** साधल्यामुळें होत असतात. —के० १९०५-३७-५-१

८८६

कोणत्याहि कामांत कां होईना, मुख्यतः **पुढाऱ्यांनीं** उचल केली पाहिजे. —के० १८९०-४६-३-१

८८७

कोणतीहि चळवळ घ्या, ती सिद्धीस नेण्यास अमुक एक तऱ्हेचा उद्योग पाहिजे असें ठरल्यावर सदर चळवळीच्या **पुढाऱ्यांनीं** रात्रंदिवस त्या उद्योगास लागलें पाहिजे, लोक वर्गणी देत नाहींत म्हणून रडत बसण्यांत कांहीं हंशील नाहीं. वर्गणी मिळणें किंवा न मिळणें हें स्वतःच्या उद्योगावर व हिमतीवर अवलंबून आहे; त्याकरितां परिश्रम केले पाहिजेत आणि नाउमेद हा शब्द आपल्या कोशांतून अजीबात काढून टाकला पाहिजे. —के० ले० २-४८३

८८८

राष्ट्रांत हजारों लोक असले तरी ते सर्व राष्ट्रीयत्वास अवश्य लागणाऱ्या गोष्टींचा नेहमीं विचार करीत नाहींत. हें काम देशांतील **पुढाऱ्यांनींच** केलें पाहिजे. —के० ले० २-२९३

८८९

लोक कसेहि असले तरी त्यांचे दोष आपल्या नाउमेदीचें कारण होतें अशी सबब **पुढाऱ्यानें** लोकांपुढें मांडणें म्हणजे स्वतःचा कमीपणा कबूल करण्यासारखेंच आहे. —के० ले० २-४८३

८९०

आमच्या **पुढाऱ्याला** सरकारनें किंमत दिली नाहीं, तरी तो जेव्हां आमची कामगिरी करील तेव्हां तिची किंमत आम्हीं पूर्ण ओळखतों, हें सरकारास उघडपणें दाखविणें हें आमचें कर्तव्य होय.

—के० ले० २-२८२

८९१

समाजांतील खालच्या लोकांत मिसळल्याशिवाय समाज कशावर चालतो याचें धोरण **पुढाऱ्यास** समजणार नाहीं. वरच्या वर्तुळांत हिंडल्यानें अहंपणादि दुर्गुण जडतात आणि खालच्यांत गेल्यानें, ते लोक वरच्यांचे दोष काढीत असल्यामुळें, आपलें चुकतें कोठें हें त्यांना सहज समजतें.

—आ० व० ४२४

८९२

विधवाविवाहासंबंधानें शास्त्रनिषिद्धता सांगून संकटकालीं अक्षतयोनि अशा गतधवांचा **पुनर्विवाह** खुशाल करावा किंवा ज्यांना अशा विवाहाची आवश्यकताच वाटते त्यांना तो करूं द्यावा. —आ० आ० २-४१४

८९३

इंग्रजी विद्येनें आमची धर्मश्रद्धा उडत चालली आहे असें जरी मानलें तरी, आपल्या **पुरातन रीतिभातींचा** व त्यांचा ज्यांस अभिमान आहे त्यांचा तिरस्कार करावा हें आमच्या शहाणपणास व सभ्यपणास शोभत नाहीं. —च० २६०

८९४

ज्या गोष्टीस **पुरावा** नाहीं ती नेहमींच लंगडी राहावयाची; मग ती विद्वानांच्या मुखांतून बाहेर पडो किंवा अविद्वानांच्या पडो. —के० १९००-२५-३-२

८९५

परिस्थितीवर आपला पगडा बसविणें, तिचें आकलन करून तिला वळण देणें, हें **पुरुषत्वाचें** लक्षण आहे. —व्या० २-११०

८९६

प्रगतीच्या मार्गांत आलेला अडथळा काढून टाकणें हाच खरा **पुरुषार्थ** होय. —के० १९०५-२०-४-३

८९७

आपल्या बुद्धीनें व कर्तृत्वानें कालाचें प्रवर्तकत्व थोडेंबहुत तरी आपणाकडे घेणें हाच **पुरुषार्थ** होय. —के० १८९१-२३-३-३

८९८

निराशेनें उगीच बसणें हा कांहीं **पुरुषार्थ** नव्हे. —आ० च० ३९४

८९९

अडचणी, संकटें हीं यावयाचींच व तीं आलीं असतांना त्यांतून मार्ग काढून यश मिळविणें यालाच **पुरुषार्थ** म्हणतात. —आ०आ०१-१२६

९००

**'पुष्कळांचें पुष्कळ सुख'** हें नीतितत्त्व केवळ बाह्य परिणामासच लागूं पडणारें आहे; आणि हे सुखदु:खात्मक बाह्य परिणाम निश्चित रीतीनें मोजण्याचें बाह्य साधन ज्या अर्थीं अद्याप निघालें नाहीं त्या अर्थीं नीतिमत्तेच्या या कसोटीनें नेहमींच यथार्थ निर्णय लागेल असा भरंवसा नाहीं.

—गी० ३७८

९०१

**'पुष्कळांचें पुष्कळ हित'** या आधिभौतिक नीतितत्त्वांत जो मोठा दोष आहे तो हाच कीं, कर्त्याच्या मनांतील हेतूचा किंवा बुद्धीचा त्यांत कांहींच विचार होत नाहीं; आणि अंतस्थ हेतूकडे लक्ष द्यावयाचें म्हटलें तर, पुष्कळांचें पुष्कळ बाह्य सुख हीच काय ती एक नीतिमत्तेची कसोटी अशी जी पहिली प्रतिज्ञा तिला विरोध येतो. कायदे करणारी सभा किंवा मंडळी अनेक व्यक्तींचा समुदाय असल्यामुळें त्यांनीं केलेला कायदा अगर नियम योग्य आहे कीं नाहीं, याचा विचार करतांना त्यांचें अंत:करण कसें होतें हें पाहण्याचें कारण रहात नाहीं; त्यांच्या कायद्यापासून पुष्कळांना पुष्कळ सुख होईल कीं नाहीं एवढाच बाह्य विचार केला म्हणजे पुरे होतें; पण इतर ठिकाणीं तो न्याय लागूं पडत नाहीं.

—गी० ८८

९०२

लहान मुलांस **पूर्वपरंपरेचें ज्ञान** दिल्यास त्यांच्या मनांत उदात्त तत्त्वें बिंबलीं जातात, त्यांच्यांत अभिमान उत्पन्न होतो, व त्यामुळें देशाची आणि देवाची नौकरी करण्यास त्यांच्या अंगीं अधिक योग्यता येते.

—व्या० २-२८

९०३

**सर्व पृथ्वीतल** प्रथम स्वच्छ सपाट करून मग आपणास फायदेशीर अशा पर्वतांच्या रांगा व नद्यांचे ओघ उत्पन्न करण्याच्या खटपटीला कोणी लागला तर त्याला काडीचेंहि यश यावयाचें नाहीं हें उघड आहे.

—के० ले० १-५६५

९०४

**पेशवाई** इंग्रजांनीं जिंकून घेतली म्हणण्यापेक्षां अत्यंत लाजिरवाण्या स्वेच्छाचारांत मग्न होऊन भागूबाईचा पेषा स्वीकारून दिवट्या बाजीनें इंग्रजांचे हातावर पेशवाईचें उदक सोडलें असें म्हणणें सयुक्तिक होईल.

—के० १९०२-२७-४-४

९०५

**पेशवाईंत** मराठी भाषेस जें उत्तेजन मिळालें तें राजपुरुषांपेक्षां साधुपुरुषांच्या मेहनतीनेंच जास्त मिळालें. —के० १८९१-४०-२-५

९०६

मिल, स्पेन्सरच्या ग्रंथांचीं आम्हीं पारायणें करतों, पण त्यांचेपेक्षां फार पुढें गेलेल्या आपल्या **पूर्वाचार्यांची** आम्हीं ओळखहि विसरून जावें, यापेक्षां बुद्धिभ्रंशाची दुसरी कोणती खूण पाहिजे ?—के० १९०३-३७-४-४

९०७

ज्ञानाची वाढ व प्रसार होण्यास **पूर्वाचार्यांनीं** केलेल्या कृतींचें व सिद्धान्तांचें पुनः पुनः परीक्षण होणें जरूर असतें. —के० १९१५-४३-११-२

९०८

**पूर्वजांचा गौरव** करणें, त्यांचें वर्षांतून एकदां तरी स्मरण करणें हें भावी उत्कर्षाचें चिन्ह होय. उदयोन्मुख जें राष्ट्र असेल त्याला याची जरुरी आहे. —के० १९१६-१९-७-१

९०९

हल्लीं ज्याप्रमाणें पोलीस-व्यवस्थेचा तालुक्यांतील ठाणीं हा पाया आहे त्याप्रमाणें इतउत्तर गांवपोलीस हा त्याचा पाया केला पाहिजे. दरएक गांवास त्यांतील लोकसंख्येप्रमाणें बलूतेदार रक्षक नेमून, खेरीज गांवांतील संभावित गृहस्थांस त्यांवर देखरेख करण्याचा अधिकार देऊन त्यांजजवळ कांहीं तरी शस्त्रें ठेवण्याची त्यांस परवानगी दिली पाहिजे. सारांश, **पोलीस**खात्याच्या सुधारणेचा पाया गांवपोलीस होय.

—के० ले० २-४०९

९१०

शस्त्रें असणाऱ्या लोकांचें संरक्षण करण्यास जितकें पोलीस लागतें त्यापेक्षां निःशस्त्र लोकांचें संरक्षण करण्यास अधिक **पोलीस** पाहिजे.

—के० ले० २-३१३

९११

पोलीस म्हटले म्हणजे लोकांचें रक्षण करणारे आहेत आणि जो कोणी आपलें रक्षण करतो त्यास, रक्षण होतें त्याकडून योग्य मदत मिळाली पाहिजे इतकेंच नव्हे, तर मानहि मिळाला पाहिजे. पण पोलिसांच्या अजाणतेपणामुळें म्हणा किंवा दांडगाईनें म्हणा **पोलीस** आपले रक्षणकर्ते आहेत असें लोकांस वाटतच नाहीं.

—के० ले० २-४०७

९१२

वास्तविक पाहिलें असतां **पोलीस**खातें हें न्यायखात्याचें मदतनीस आहे; तेव्हां न्यायखात्याइतका नाहीं तरी त्याहून जरा कमी पोलिसखात्यावर लोकांचा विश्वास असला पाहिजे; पण व्यवहारांत याच्या उलट प्रकार नजरेस येतो.

—के० ले० २-४०४

९१३

हल्लीं **पोलीस**खातें म्हटलें म्हणजे बड्या गोऱ्या कामगारांच्या गैरहुशार पोरांकरितां राखून ठेवलेलें गायरान होय. —के० ले० २-४०५

९१४

एकपक्षीं फौजदार व दुसऱ्यापक्षीं मामलेदार, मुनसफ यांचेमध्यें हुशारींत, संभावीतपणांत आणि वजनदारींत जें अंतर असतें तितकेंच अंतर जिल्ह्याजिल्ह्याचे कलेक्टर व पोलीस सुपरिंटेंडन्ट यांचेमध्यें आढळून येतें. हें अंतर जोंपर्यंत कायम आहे तोंपर्यंत **पोलीसखातें** कधींहि लोकांच्या विश्वासास पात्र व्हावयाचें नाहीं व त्याची कर्तबगारी किंवा हुशारीहि हल्लींपेक्षां सरकारच्या किंवा लोकांच्या जास्त नजरेस यावयाचा संभव नाहीं.

—के० ले० २-४११

९१५

एक **पंचांग** होणें ही राष्ट्रीयत्वाची एक खूण आहे.

—आ० व० ४३१

९१६

ज्यानें त्यानें आपला उद्धार आपणच करून घेतला पाहिजे, व **प्रकृति** कितीहि बलवत्तर झाली तरी तिचा जय करून आत्मोन्नति करणें ही गोष्ट ज्याच्या त्याच्या स्वाधीनची आहे. —गी० ६९७

९१७

नाटकांत ज्याप्रमाणें प्रेक्षकांच्या मनोरंजनार्थ एखादी नटी आतां एक तर घटकाभऱ्यानें दुसरें याप्रमाणें सोंगें घेऊन नाचते त्याप्रमाणें पुरुषाच्या फायद्यासाठीं ( पुरुषार्थाकरितां ) पुरुष कांहीं एक मोबदला देत नसतांहि **प्रकृति** सत्त्व-रज-तमांच्या कमीजास्तपणानें अनेक सोंगें घेऊन त्यापुढें एकसारखी नाचत असते. —गी० १६१

९२२

राष्ट्रांत प्रजासत्ताक पक्षाची जेव्हां सरशी होते तेव्हां ती सर्व **प्रजा** सुशिक्षित झाल्यावरच होते असा कांहीं नियम नाहीं.

—के० १९०७-२३-४-२

९२३

**प्रजा** सुखी असणें व त्यांस पोटभर खावयास मिळणें हीं राज्यांत आबादानी व स्वस्थता राखण्याचीं दोन साधनें आहेत.

—के० १८९४-२०-३-१

९२४

**प्रजाजन** एकदां क्षुब्ध झाले म्हणजे मग त्यांची शांति राजसत्तेस आळा घातल्याखेरीज होत नाहीं. —के० १९०५-५-४-५

९२५

सध्यांच्या पिनलकोडांत **प्रजाद्रोहाला** शिक्षा सांगितलेली नाहीं, आणि ती जरी पृथ्वीवरील राजांच्या पिनलकोडांत सांगितलेली नसली, तरी सर्व राजांचा राजा जो परमेश्वर त्याच्या कोडांत प्रजाद्रोहाबद्दल शिक्षा सांगितलेली असलीच पाहिजे. —व्या० २-१२२

९२६

**प्रजाद्रोहाचा** गुन्हा राजांकडून घडत असला म्हणजे प्रजेच्या मनोवृत्ति प्रज्वलीत होऊन राजेलोक त्यांत पतंगाप्रमाणें नाश पावतात.

—व्या० २-१२३

९२७

सरकारचें कोणचेंहि कृत्य जुलमाचें आहे किंवा योग्य आहे, हें ठरविण्याचा अधिकार **प्रजेचा** आहे. —के० १९०६-२०-४-४

९२८

**प्रजेची** प्रीति राजावर जडण्यास राजाचें वर्तन सर्वस्वीं प्रजेच्या हिताचेंच असलें पाहिजे. —के० १९०६-८-४-२

९२९

**प्रजेचीं** अंतःकरणें जर राजाचे हातीं लागलेलीं नसलीं तर केवळ बाह्योपचारानें फार दिवस निभाव लागत नाहीं. —के० १९०६-७-४-२

९३०

**प्रजेचें** म्हणणें सयुक्तिक आहे कीं नाहीं हें राजानें पाहिलें पाहिजे; लष्कराच्या जोरावर त्यांच्या म्हणण्याची पायमल्ली करून त्यांचा जितका अपमान होईल तितका करणें हें कांहीं शहाण्या राजाचें लक्षण नव्हे.
—के० १९०५-५-५-१

९३१

**प्रजेचे हक्क** काय असतात, व त्यांपैकीं आपणाला किती आहेत हें मुलांनाहि समजलें पाहिजे. —व्या० ९०

९३२

सरकार कितीहि बलाढ्य असो, **प्रजेच्या** मनांत एकदां स्वराज्याचे हक्क मिळविण्याची बुद्धि जागृत झाली म्हणजे तिचा निरोध—कायमचा निरोध—कोणत्याहि सरकारास करतां येत नाहीं. —के० १९०७-२२-४-३

९३३

एकदां प्रजापक्षाची सरशी होऊन राज्यकारभाराचें धोरण **प्रजेच्या** सल्लामसलतीनें चालूं लागलें म्हणजे मग राजा स्वदेशी नसला तरी त्यापासून फारसें नुकसान होत नाहीं. —के० १९०७-१५-४-४

९३४

**प्रजेच्या** नीतिमत्तेवर राज्याची भरभराट पुष्कळ अवलंबून असते.
—के० १८९२-६-३-१

९३५

देशाचा हितकर्ता पुरुष कोणत्याहि **प्रांतांत** जन्मलेला असो त्याचा सर्वांनीं गौरव करणें हेंच देशास श्रेयस्कर आहे. —के० १९०६-२४-४-२

९३६

दुष्ट पुरुषाचा **प्रतिकार** साधुपणानें होणें शक्य असेल तर प्रथम तो साधुपणानेंच करावा; कारण दुसरा मनुष्य दुष्ट झाला म्हणजे तेवढयामुळेंच आपणहि त्याबरोबर दुष्ट झालें पाहिजे, किंवा एकजण नकटा झाला म्हणून इतरांनींहि आपलीं नाकें कापून घ्यावीं असें होत नाहीं; किंबहुना हा धर्महि नव्हे. —गी० ३९४

९३७

**प्रतिकारार्थ** जें कर्म करावयाचें तें निर्वैरत्वानें आणि परमेश्वरार्पण-बुद्धीनें केलें म्हणजे कर्त्यास त्याचें कोणतेंहि पाप अगर दोष लागत नाहीं; इतकेंच नव्हे तर प्रतिकाराचें काम संपलें म्हणजे ज्या दुष्टाचा प्रतिकार केला त्याचेंच पुढें आत्मौपम्य दृष्टीनें कल्याण चिंतण्याची बुद्धिहि मनांतून नष्ट होत नाहीं. —गी० ३९३

९३८

सहज **प्रतिभा** ही काव्याची प्राणज्योति आहे. ती नसेल तर, बाह्य सर्व कृत्रीम प्रकाश रसिक चित्तवृत्तींना दिपविणारा होत नाहीं.

—आ० आ० २-३१६

९३९

सूड घेण्याची, वैराची, अभिमानाची, क्रोधानें, लोभानें किंवा द्वेषानें दुर्बलांना लुबाडण्याची, अगर हेक्यानें आपल्या प्रौढीचें, शेखीचें, सत्तेचें व शक्तीचें प्रदर्शन करण्याची बुद्धि सामान्य लोकांप्रमाणें ज्याच्या मनांत राहिली नाहीं त्यानें आपल्या अंगावर आलेला चेंडू केवळ माघारा फिरविल्यामुळें त्याची शान्त, निर्वैर व समबुद्धि न बिघडतां उलट दुष्ट लोकांचें जगांत प्राबल्य माजून गरीबांचा छळ होऊं नये म्हणून असलें **प्रत्याघातरूप कर्म** करणें हें लोकसंग्रहदृष्ट्या त्याचा धर्म म्हणजे कर्तव्य होय. —गी० ३९२

९४०

मोठ्या मनुष्याप्रमाणें आपल्यांतहि ईश्वरी अंश आहे असा दृढविश्वास ठेवून व तो ओळखून प्रत्येकानें **प्रयत्न** केला पाहिजे. जितक्या अडचणी अधिक बिकट तितकें डोकें अधिक खर्च केलें पाहिजे. —चरि० ३३३

९४१

मनुष्य आपण जें कांहीं केलें असें समजतो तें केवळ त्याच्या प्रयत्नाचें फल नसून त्याचा **प्रयत्न** आणि जगांतील इतर व्यापार किंवा चेष्टा या सर्वांच्या सहाय्यानें तें कार्य घडून आलेलें असतें. —गी० ८३४

९४२

माझ्यासाठीं गाडी लेट होऊन दैवानें माझ्यावर उपकार करावा ही गोष्टच मला मान्य नाहीं. गाडी वेळेवर येवो अगर लेट होवो, मी वेळेवर स्टेशनवर जाऊन बसणार आणि गाडी गांठणार. मी **प्रयत्नवादी** आहें, दैवाचा उपकार मला नको आहे. —आ० आ० १-१४९

९४३

भाकरी रुचकर होण्यास ज्याप्रमाणें पिठांत थोडें तरी मीठ घालावें लागतें त्याप्रमाणें कर्मसृष्टींतील स्वतःसिद्ध व्यापार मनुष्याच्या फायद्याचे होण्यास त्यांत मनुष्याच्या **प्रयत्नाची** थोडी तरी भर घालावी लागते.
—गी० ३२४

९४४

फक्त कार्याची सिद्धि जर कार्यांतून वजा केली, तर त्या कर्त्याची जी पूर्वतयारी असते तिला **प्रयत्न** म्हणतात. —ख० १६९

९४५

मी स्वतः आशावादी नसून **प्रयत्न**वादी आहें. भोंवतालची परिस्थिति कितीहि विकट असली तरी आपल्या हातून होईल तें व आपणांस पचेल

९४९

आपला देश व प्रांत सोडून परकीय प्रांतांत अगर देशांत कांहीं दिवस काढणें यांतच एक प्रकारचें शिक्षण आहे; आणि अशा **प्रवासांत** निरनिराळ्या प्रांतांतील लोकांच्या सामाजिक किंवा औद्योगिक स्थितीचें जर लक्षपूर्वक अवलोकन केलें तर त्यामुळें आपल्या विचारास एक प्रकारें निराळेंच वळण लागत असतें. —च० ६५०

९५०

धाकट्या–मोठ्याचेंच नव्हे तर पितापुत्राचें सर्वमान्य नातेंहि कधीं कधीं दुसरे वरचढ संबंध उपस्थित होऊन तेवढ्यापुरतें नाइलाजास्तव क्षणभर विसरावें लागतें; पण असे **प्रसंग** प्राप्त झालेले नसतांहि हाच न्याय हवा

९५४

**प्रसंग** आला असतां परमेश्वराच्या कृपेनें दुर्बल लोकांसहि शिरजोर किंवा जुलमी राज्यकर्त्यांशीं तोंड देण्याची बुद्धि होऊन त्यांतच निश्चय आणि अपूर्व मनोनिग्रह यांची भर पडून अखेरीस सत्याचा, न्यायाचा आणि स्वातंत्र्याचा विजय होतो. —के० १९०७-३८-४-२

९५५

भगवद्गीतेच्या आरंभीं दोन परस्पर-विरुद्ध धर्मांच्या कैचींत सांपडल्यामुळें कर्तव्यमूढ होऊन अर्जुनावर जो प्रसंग आला होता तो कांहीं अपूर्व नाहीं. संन्यास घेऊन व जग सोडून रानांत राहणारांची किंवा दुबळेपणानें जगांतील अनेक अन्याय मुकाट्यानें सोसून घेणाऱ्या अशक्त व उदरंभरू लोकांची गोष्ट निराळी; पण समाजांत राहूनच ज्या थोर व कर्त्या पुरुषास संसारांतील आपलें कर्तव्य धर्मानें व नीतीनें बजावावयाचें आहे, त्यांवर अशा प्रकारचे **प्रसंग** अनेक वेळां गुदरत असतात. —गी० २९

९५६

व्यक्तीवर काय आणि राष्ट्रावर काय कधीं कधीं असे **प्रसंग** येऊन ठेपतात कीं, त्यावेळीं एखाद्या दुष्ट आचाराच परिणाम एकाएकीं भयंकर रीतीनें नजरेस येऊन हे अनर्थ टाळण्यास व्यक्ति किंवा राष्ट्र एकाएकीं एकदम तयार होतें. —के० १९१५-१४-६-१

९५७

तुटे तों ओढूं नये ही गोष्ट खरी; पण कित्येक **प्रसंग** असे असतात कीं, त्यावेळीं तुटेल या भीतीनें ओढण्याचें सोडून दिलें असतां विरुद्ध पक्ष सहज लीलेनें वेसण घातल्याप्रमाणें आपणास विरुद्ध कळपांत ओढून नेतो.
—के० १९००-७-३-२

९५८

**प्रस्थानत्रयी** म्हणजे निवृत्ति व प्रवृत्ति मिळून दोन्ही मार्गांचें पद्धतशीर व तात्त्विक विवेचन करणारे वैदिक धर्माचे तीन मुख्य आधारभूत ग्रंथ किंवा खांब होत. —गी० १२

९५९

भाषासादृश्य व वंशसादृश्य या दोहोंच्या पायावर **प्रांताची पुनर्घटना** व्हावी व मध्यवर्ती सत्तेखालीं त्यांचें एक संघटित मंडळ व्हावें. –अ० १२०

९६०

**प्राथमिक शिक्षण** व धंदेशिक्षण यांची जोडी जर नीट जमली नसली तर केवळ शिक्षणानें गरीब लोकांचीं मनें संस्कृत न होतां त्यांस उलट आपापले धंदे वाईट वाटूं लागतात. –के० १८९३-७-३-२

९६१

हल्लींचे **प्रार्थनासमाज** किंवा इतर समाज पुढें सरसावत नाहींत याचें कारण कळवळा (Emotion) किंवा भक्ति (Devotion) असणारा मनुष्य त्यांत फारसा नाहीं. (Churches) देवालयें वगैरे त्यांचीं (Bodies) शरीरें आहेत; पण आंतला (Soul) आत्मा नाहीं. –आ० व० ४२३

९६२

**प्रायश्चित्त** म्हणजे पश्चात्ताप नव्हे, तें फक्त पापनाशक कर्म होय.

–च० २९७

९६३

**फलाशा** सोडणें म्हणजे सर्व प्रकाराची इच्छा सोडणें किंवा माझ्या कर्माचें फल कोणास कधींहि मिळूं नये, व मिळाल्यास तें कोणींहि घेऊं नये, अशी बुद्धि ठेवणें हा अर्थ नसून, मला अमुक फल अवश्य मिळावें म्हणून मी हें कर्म करितों अशा प्रकारच्या फलाबद्दलच्या ममत्वयुक्त आसक्तीस किंवा बुद्धीच्या आग्रहास 'फलाशा', 'संग' किंवा 'काम' हीं नांवें गीतेंत दिलेलीं आहेत. –गी० ३२३

९६४

कालमानाप्रमाणें अवश्य लागणारा **फेरफार** जर आपण आज केला नाहीं, निदान फेरफार करण्याविषयीं यत्न केला नाहीं, तर न फिरविल्या-मुळें घोडा जसा अडतो, त्याप्रमाणें समाज अडेल हें ध्यानांत ठेविलें पाहिजे. –घा० १६५

९६५

दिवाणी न्यायाधीश म्हणजे मुनसफ ज्याप्रमाणें स्वतंत्र असतात, त्याप्रमाणें **फौजदारी न्यायाधीशहि** स्वतंत्र असले पाहिजेत; ते जोंपर्यंत स्वतंत्र नाहींत तोंपर्यंत पोलिसांचें दोष काढण्याचें काम त्यांचे (मॅजिस्ट्रेटांचे) हातून निर्भीडपणें व्हावयाचें नाहीं. —के० ले० २-४१५

९६६

हिंदुस्थानांत परदेशांतून येणाऱ्या कापडावर, आपमतलबामुळें जोंपर्यंत सरकार जबर जकात बसविण्यास कबूल होणार नाहीं तोंपर्यंत परकीय कापडावर **बहिष्कार** घालून सरकारचीं हीं कर्तव्यकर्मे लोकांनींच आपल्या हातांत घेणें अवश्य आहे. —के० १९०५-४५

९६७

जर **बहिष्कार** नसता तर स्वर्गांत बदमाष लोकांचा भरणा झाला असता; आसुरी मायेनें दैवी गुणास ग्रासून टाकलें असतें.

—व्या० २-१२८

९६८

हिंदुस्थानासारख्या सर्वतोपरी पंगू झालेल्या देशास आपलें म्हणणें तडीस नेण्यास जर कांहीं साधन किंवा योग शिल्लक राहिला असेल तर तो 'राष्ट्रीय **बहिष्कार**' हाच होय. —के० १९०५-३६-४-३

९६९

परमेश्वर आणि माया हीं ज्याप्रमाणें एकाच ब्रह्मतत्त्वाचीं दोन भिन्न स्वरूपें होत व जगाच्या उत्पत्तीकरितां हीं ज्याप्रमाणें भिन्न असावीं लागतात, त्याप्रमाणें व्यापारी जगाच्या दृष्टीनें निदान हिंदुस्थान देश सजीव आहे, मेलेला नाहीं, हें सिद्ध करून दाखविण्याचें कार्य तडीस नेण्याकरितां स्वकीयांस उत्तेजन व नावडत्यास **बहिष्कार** अशा दोन प्रकारांनीं उद्योगास आरंभ करणें जरूर आहे. —के० १९०५-३९-४-३

९७०

**बहिष्कार** हें शस्त्र कायदेशीर आहे व त्याचा उपयोग करणारांचा जर सरकारांतून छल होईल तर तो अन्याय आहे. —के० १९०६-३-४-३

९७१

राष्ट्रीय **बहिष्कार** हा उपाय योग्य आहे खरा; पण त्याची योग्यता शब्दांत नाहीं, कृतींत आहे. —के० १९०५-३४-४-५

९७२

इंग्लंडांतील लोकांस जागें करावयाचें असल्यास त्यांच्या मालावर **बहिष्कार** घालून त्यांच्या पैशाच्या खिशास चिमटा काढणें एवढाच कायदेशीर मार्ग हिंदुस्थानास मोकळा आहे. —के० १९०५-५१-४-२

९७३

**बहिष्कार** हें असें शस्त्र आहे कीं, त्या योगानें निःशस्त्र असलेल्यांचे सर्व हेतु पूर्ण होतात. —व्या० २-१२९

९७४

आम्ही द्वेषामुळें **बहिष्कार** घालीत नसून स्वदेशाच्या प्रीतीमुळें आम्ही बहिष्कार घालीत आहों. —व्या० २-१२८

९७५

**बहिष्कारयोग** श्रेयस्कर आहे, शक्य आहे, निरपवाद आहे व याचा अभ्यास करणारांस कधींहि दुर्गति प्राप्त व्हावयाची नाहीं, थोडें जरी आचरण घडलें तरी तें परमेश्वरकृपेनें कल्याणप्रदच होईल.

—के० १९०५-३६-४-५

९७६

**बहिष्कार-योग** निर्वाणीचाच असून आपलें वाजवी म्हणणें अधिकारारूढ सबल पक्ष योग्य रीतीनें ऐकत नाहीं, तेव्हांच दुर्बल लोकांनीं त्याचा उपयोग करावयाचा आहे. —के० १९०६-३-४-३

९७७

दांडग्या सशक्त लोकांच्या विरुद्ध अशक्त लोकांच्या हातांतील कायदेशीर हत्यार म्हणजे **बहिष्कार-योग** होय. —के० १९०६-३-४-४

९७८

राज्यकर्त्यांनीं प्रजेचें म्हणणें ऐकावें एतदर्थ **बहिष्कार-योग** अमलांत आणला पाहिजे. —के० १९०५-३७-४-५

९७९

**बहिष्कार-योग** लहानापासून थोरांना, गरीबापासून श्रीमंतांना, परतंत्रांपासून स्वतंत्रांना, सर्वांनाहि सारखाच उपयोगी पडणारा आहे.

—के० १९०५-३८-४-५

९८०

**बहिष्कार-योग** हें रामबाण औषध आहे. —के० १९०६-३-४-३

९८१

**बहिष्कारा**बद्दल तंटा करणें म्हणजे प्रत्यक्ष परमेश्वर तुमच्या घरांत अमृताचा घोंट घालीत असतां तो नको म्हणण्यासारखें आहे.

—व्या० २-१२९

९८२

तुम्हीं जर या **बहिष्कार-योगाचा** त्याग कराल तर घरीं चालत आलेल्या कामधेनूला गमाविल्यासारखें होईल. —व्या० २-१२९

९८३

आपखुषीच्या **बहिष्कारावर** बलाढ्य राष्ट्राचीहि मात्रा चालत नाहीं.

—के० १९०६-३-४-४

९८४

इंग्लंडचे लोकांस आमच्यावर प्रेम करावयास शिकविण्यास **बहिष्कार-योगाच्या** साधनाशिवाय दुसरें साधन दिसत नाहीं.

—के० १९०५-३८-४-५

९८५

**बहुमत** आपल्या बाजूचें झाल्याखेरीज हल्लींच्या काळांत कोणास कोणत्याहि प्रकरणीं यश येण्याची आशा राहिली नाहीं.

—के० १८९०-४६-२-३

९८६

मनुष्य कितीहि शहाणा असला तरी जोंपर्यंत देशांतील **बहुमत** त्याच्या बाजूचें नाहीं, तोंपर्यंत त्याचें मत म्हणजे देशाचें मत नव्हे.

—के० १९१९-४८-२-२

९८७

सर्व संस्था बहुमतानें चालतात, किंबहुना सर्व प्रजासत्ताक किंवा पार्लमेंटरी राज्येंहि बहुमतानें चालतात, आणि हें **बहुमत** जर कोणास कबूल नसेल तर त्यानें संस्था न सोडतां, त्यांतच राहून बहुमत आपल्या बाजूला पुढें मागें बळवून घेतलें पाहिजे. —के० १९१८-३४-४-३

९८८

व्यक्ति तितक्या प्रकृति ही म्हण प्रसिद्धच आहे. पण अनेक प्रकृतींच्या अनेक व्यक्तींनीं एका कार्यासाठीं एकत्र होऊन जेव्हां कांहीं गोष्ट ठरवावयाची असते तेव्हां त्यासाठीं कांहींतरी नियम किंवा निर्बंध सर्वांसच पाळावा लागत असतो. हल्लींच्या राजकीय पद्धतीप्रमाणें '**बहुमताचा** स्वीकार' हाच तो निर्बंध होय; व हा मान्य करून सर्वांनीं आपल्या सामान्य ध्येयाच्या सिद्ध्यर्थ एकत्र व्हावें आणि कोणत्याहि प्रकारचे खासगी मनोविकार बाजूला ठेवून सर्वांस एकसारख्याच प्रिय असलेल्या गोष्टींचा विचार करावा हें राजकीय बाबतींतल्या समेटाचें खरें तत्त्व आहे. —के० १९१६-१९-४-३

९८९

**बळी** पडणारांचें अभिनंदन करा, त्यांना मदत करा, निदान त्यांना मागें ओढूं नका. —व्या० १-४६

९९०

**बळी** तो कान पिळी हाच न्याय सर्वत्र लागू असून शहाणे लोक बोलून न दाखवितां कृतीनें दाखवितात; व सामान्य लोक तोंडानेंहि तो बाहेर काढतात यापेक्षां दोघांच्या कृतींत कोणताहि फरक नाहीं. —के० १८९७-८-२-४

९९१

एकदां आप्तेष्टांची मुर्वत सोडून **बायका साहसी** झाल्या म्हणजे पुरुषांना कल्पनाहि करतां येणार नाहीं इतक्या नीच स्थितीस त्या जाऊन पोहोंचतात. —के० १९००-९-३-३

९९२

लष्करी धोरणाचें कामीं **बाजीरावाचें** जितकें हातखंडा काम असे तितकें हातखंडा काम महाराष्ट्राच्या सर्व इतिहासांत दुसऱ्या कोणत्याहि मराठी सेनापतीचें दिसत नाहीं. —के० १९०२-२५-४-५

९९३

मनुष्य कितीहि ज्ञानी, धर्मवेत्ता किंवा शहाणा असो त्याची **बुद्धि** जर सर्वांभूतीं सम झालेली नसेल तर त्याचें कर्म नेहमींच शुद्ध किंवा नीतिदृष्ट्या निर्दोष असेल असा नियम नाहीं. —गी० ३७८

९९४

मनुष्य कितीहि शहाणा असला तरी त्याची बुद्धि जर पुरी शुद्ध झाली नसेल तर तो हरएक प्रसंगीं धर्मानेंच वागेल असा नियम नाहीं. विशेषतः त्याचा जेथें स्वार्थ आला तेथें तर बोलावयासच नको. —गी० ३७८

९९५

**'बुद्धि'** हें इंद्रिय असें आहे कीं, तें एका बाजूनें त्रिगुण प्रकृतीच्या पसाऱ्याकडे पहातें, व दुसऱ्या बाजूनें या पसाऱ्याच्या बुडाशीं म्हणजे सर्व भूतांत आत्मस्वरूपानें असणाऱ्या परब्रह्माचाहि त्याला बोध होऊं शकतो. म्हणून इंद्रियनिग्रहानें त्रिगुणात्मक प्रकृतीच्या पसाऱ्यांतून बुद्धि काढून अंतर्मुख व आत्मनिष्ठ केली, आणि पातंजल योगानें जें काय साधावयाचें तें हेंच, म्हंणजे ती प्रसन्न होऊन खऱ्या व अत्यंत सुखाचा मनुष्यास अनुभव येतो. —गी० ८४१.

९९६

बुद्धीच्या सहाय्याखेरीज नुसत्या मनोवृत्ति आंधळ्या आहेत. म्हणून मनुष्याच्या हातून कोणतेंहि शुद्ध कर्म घडण्याच्या प्रसंगीं **बुद्धि** शुद्ध म्हणजे बऱ्यावाईटाचा बिनचूक निर्णय करणारी, मन बुद्धीच्या तंत्रानें वागणारें, आणि इंद्रियें मनाच्या ताब्यांत असणारीं याप्रमाणें त्यांची जोड असावी लागते. —गी० १३४

९९७

मनुष्यास हर्षोत्पादक अगर शोकजनक अशी कोणतीहि परिस्थिति प्राप्त झाली, तरी त्या परिस्थितींत हर्षानें हुरळून न जातां किंवा दुःखानें न गांगरतां स्वतःच्या अध्यात्मिक उन्नतीकरितां अगर लोककल्याणाकरितां प्राप्त परिस्थितींत जें करितां येण्यासारखें असेल तें शांत चित्तानें करीत राहणें, हीच **बुद्धीची** खरी साम्यावस्था होय. —आ० आ० १-३७

९९८

संसार न सोडितां केवळ गृहस्थाश्रमांतच राहून, परमसुख अगर अर्हतावस्था कधींच शक्य नाहीं हें **बुद्धाच्या** सर्व उपदेशाचें तात्पर्य होय. —गी० ५७१

९९९

बायकापोरांच्या ऐवजीं देशाचा संसार करण्याची बुद्धि होणें हा त्या **बुद्धीचा विकास** आहे. त्याच्या पुढची पायरी मानवजात कशी संतुष्ट करावयाची ही आहे, व त्याच्यापुढें ईश्वर आहे. —व्या० २-२१

१०००

**बुद्धीची** तीव्रता ही एखाद्या जाज्वल्य शस्त्राप्रमाणेंच आहे. तिचा उपयोग चांगल्या कामाकडे झाला तर त्यापासून लोकांचें व आपलें कल्याण होतें, नाहींपेक्षां सर्वांस संकटांत घालण्यास हीच बुद्धि कारणीभूत होते. —के० १८९३-३५-२-५

१००१

फळ एकच, पण कोणत्या **बुद्धीनें** मनुष्य त्यासाठीं उद्योग करण्यास प्रवृत्त होतो हें लक्षांत ठेवून तदर्थ झटणाऱ्या प्रत्येक पुरुषाची किंमत करावी लागते. —के० १९१५-८-६-२

१००२

नीतिमत्ता ही नुसत्या जड कर्मांत नसून ती सर्वस्वीं कर्त्याच्या **बुद्धीवर** अवलंबून असते असा गीतेचा सिद्धांत आहे. —गी० ३८१

१००३

कर्माची योग्यता कर्त्याच्या **बुद्धीवरून** ठरवावी लागते. कर्त्याची बुद्धि शुद्ध असली, म्हणजे लहान कर्महि कित्येकदां मोठ्या कर्माची नैतिक योग्यता पावतें. हत्या करणें हें कर्म एकच; पण आपल्या आंगावर चालून आलेल्यास स्वसंरक्षणार्थ मारणें व एखाद्या श्रीमंत वाटसरूचा द्रव्यासाठीं वाटेंत खून करणें या दोन गोष्टी नैतिकदृष्ट्या अत्यंत भिन्न आहेत.

—गी० ४७३

१००४

**बेटीव्यवहाराखेरीज** निरनिराळ्या जाती सारख्याच योग्यतेच्या राहूं शकतात, हें ब्राह्मण जातींतील पोटभेदांवरून उघड होतें. —धा० ६७

१००५

जें करावयाचा तुमचा संकल्प असेल तें तुम्हीं बेलाशक **बोलून** दाखवा आणि जें बोलून दाखवावयाची तुमची तयारी नाहीं तें करावयास जाऊं नका. जें करावयाचें आहे तें बोलावयास भिऊं नये व करावयाचें नाहीं त्याविषयीं व्यर्थ बडबड करूं नये. —व्या० १-१०४

१००६

वैदिक गार्हस्थ्यधर्मापैकीं हिंसात्मक श्रौत यज्ञयाग व चातुर्वर्ण्यभेद बुद्धास मान्य नव्हता. या गोष्टी सोडून दिल्यावर स्मार्त पंचमहायज्ञ, दानादि परोपकारक धर्म आणि नीतीनें वागणें एवढेंच कायतें गृहस्थाचें कर्तव्य शिल्लक रहातें; आणि गृहस्थधर्म वर्णन करितांना एवढ्या गोष्टींचाच **बौद्ध** धर्म-ग्रंथांत उल्लेख असतो. —गी० ५७१

१००७

जैन धर्माप्रमाणें **बौद्धधर्महि** वैदिक धर्मरूप आपल्या पित्यापासून आपल्याला पाहिजे तेवढया संपत्तीचा वांटा घेऊन कांहीं कारणासाठीं वेगळा निघालेला मुलगा आहे. अर्थात् तो परकी नसून तत्पूर्वीच्या ब्राह्मणधर्माची येथेंच उत्पन्न झालेली एक शाखा आहे. —गी० ५६६

१००८

लोकांची शेंकडा ५० टक्के खरी तयारी मला दाखवा, म्हणजे मी बाकीचा हवाला ईश्वरावर ठेवून उद्यां **बंड** पुकारतों. आपल्याला निःशस्त्रच बंड करावयाचें आणि सशस्त्र करावयाचें नाहीं, असा कांहीं माझा हट्ट नाहीं. साधेल तें मी करावयास तयार आहें.

—आ० आ० १-७५

१००९

ज्या थोर ऋषींनीं मन एकाग्र करून सूक्ष्म व शांत विचारांनीं "यतो वाचो निवर्तन्ते अप्राप्य मनसा सह" (तै० २-९) मनाला सुद्धां जें दुर्गम असून वाणीहि ज्याचें वर्णन करूं शकत नाहीं—तेंच अखेरचें ब्रह्म-स्वरूप असा सिद्धान्त केला त्यांची आत्मप्रतीति अतिशयोक्तीची व माझ्या मनाला अनंत व निर्गुण ब्रह्माचें आकलन होत नाहीं म्हणून खरें **ब्रह्म** सगुणच असलें पाहिजे असें प्रतिपादन करणें म्हणजे सूर्यापेक्षां आपली दिवटी अधिक श्रेष्ठ असें म्हणण्याइतकेंच समंजसपणाचें होय. —गी० २०६

१०१०

**ब्रह्मज्ञान** ही आत्म्याची शुद्धावस्था आहे, जादू अथवा मायिक चमत्कार नव्हे; व म्हणून सदर चमत्कारानें ब्रह्मज्ञानाची महति वाढत नाहीं. इतकेंच नव्हे तर ब्रह्मविद्येच्या महत्त्वाचा सदर चमत्कार हा पुरावाहि होऊं शकत नाहीं. पक्षी किंवा आतां विमानवाले लोकहि आकाशांत उडतात; पण त्यासाठीं त्यांची गणना कोणीहि ब्रह्मवेत्त्यांत करीत नाहीं. किंबहुना आकाशगमनादि सिद्धि प्राप्त झालेले कांहीं पुरुष मालतीमाधव नाटकांतील अघोरघंटाप्रमाणें क्रूर व घातकी देखील असूं शकतात.

—गी० २३१

१०११

सत्यदृष्ट्या आमचें शास्त्र असें सांगतें कीं, कोणत्याहि ब्राह्मणसमाजानें कोणत्याहि **ब्राह्मण**समाजाशीं अन्नव्यवहारच तर काय, पण शरीरसंबंध-व्यवहार सुद्धां करावा. पण आम्हीच आमचे शास्त्राज्ञेप्रमाणें वागत नाहीं, त्यास शास्त्र काय करणार? —आ० आ० २-२५७-२५८

१०१२

मी मराठा, मी **ब्राह्मण** ही फुशारकी फुकट आहे. इंग्रजी राज्यांत सगळ्यांचीच शेंडी कापली गेली आहे. —स्व० गी० ९

१०१३

कोणत्याहि देशांत झालें तरी राजकीय चळवळींत सर्वच लोक पडतात असें नाहीं. अशा लोकांचा प्रत्येक देशांत एक विशिष्ट वर्ग असतो व हिंदुस्थानांतील तसा वर्ग म्हटला म्हणजे **ब्राह्मण**लोक होत.

—के० १८९६-२७-३-१

१०१४

डामडौलास न भुलतां, आपण जसे एकटेच निर्धन जन्मलों, तसेच एकटे निर्धन जाणार हें लक्षांत आणून ऐहिक सुखाचा त्याग करणें, आणि केवळ देशहितकारक धर्म आचरणें यांतच खरें **ब्राह्मणत्व** आहे. आणि हा धर्म ज्यानें पाळला तो दुसरें कांहीं करो वा न करो, त्यानें योजलेले उपाय सौम्य असोत वा कडक असोत, केवळ वरील धर्म पाळल्या-मुळेंच तो देशकल्याणकर्त्या पुरुषांचे वर्गांत पडून सद्गति पावतो.

—के० १९१५-८-६-२

१०१५

(संध्यावंदनादि) प्रार्थनेच्या योगानें **ब्राह्मणांच्या** इच्छाशक्तीची जोपासना होत असते. —स्व. मो० २३

१०१६

एका काळीं **ब्राह्मणांना** असा अभिमान होता कीं, राष्ट्राचे मेंदु आपणच होत. परंतु आज ब्राह्मणांचा मेंदु इतका दुबळा बनला आहे कीं, त्याची भर परराष्ट्रांतील मेंदूनें करावी लागते. —स्व. मो० २१

१०१७

लोकांस त्यांच्या हक्कांचें ज्ञान करून देऊन त्यांस सुखप्राप्तीचे मार्ग दाखविणें व जेणेंकरून परकीय लोकांच्या खटपटीनें आमच्या लोकांतील आपलेपणा नाहींसा होणार नाहीं अशी तजवीज करणें हीं **कामें** **ब्राह्मणांचींच** आहेत. —के० १८९६-३१-२-४

१०१८

मागितल्याखेरीज कोणी देत नाहीं हें खरें; पण त्याजबरोबर हेंहि पक्कें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, राजकीय बाबतींत महाभारतांत सांगितल्या-प्रमाणें, ब्राह्मणी मागणीचा कांहीं उपयोग होत नाहीं.

—के० १९०६-२८-४-३

१०१९

सूत्रकालापासून तों तहत पुराणकालापर्यंत विवाह–विषयक जीं वचनें आहेत त्यांत **ब्राह्मणवर्णांतील** पोटजातींचा कोठेंच उल्लेख केलेला नाहीं.

—के० १९००-४५-२-३

१०२०

कोंकणस्थ, देशस्थ व कऱ्हाडे **ब्राह्मणांचा** त्रिवर्गभेद देशपरत्वें आहे, शास्त्रोक्त नव्हे.

—के० १९००-४५-२-३

१०२१

व्यापार, कारखाने व इतर अनेक किफायतशीर धंदे आणि बहुतेक सर्व नेटिव्ह संस्थानेंहि **ब्राह्मणेतरांच्याच** हातीं असून ब्राह्मणवर्ग हा

१०२४

परक्यांच्या बँका म्हणजे आमच्यांतील सर्व सुखवस्तु व विचारी लोकांच्या घराण्यांच्या नाकांत वेसण घालणाऱ्या संस्था होत.

—के० १९०६-४४-४-५

१०२५

भक्ति हा अंतःकरणाचा धर्म आहे व ज्ञान हें बुद्धिगम्य आहे.

—के० १८९६-४२-२-३

१०२६

ज्याकरितां प्रत्येकाचा आत्मा आतुर झालेला असतो त्याकरितां बुद्धीला जागृत करून परमावधीप्रत पोहोंचविणें, सर्वांना सुखी करणें, ही भक्ति आहे.　—व्या० २-२२

१०२७

भक्ति कोणत्याहि प्रकारची असली तरी परमेश्वरावर निरतिशय व निर्हेतुक प्रेम ठेवून वृत्ति तदाकार करणें असें जें भक्तीचें सामान्य काम तें प्रत्येक मनुष्यानें आपल्या मनानेंच केलें पाहिजे. कारण बुद्धि हें अंतरिंद्रिय केवळ बरें—वाईट, धर्माधर्म किंवा कार्याकार्य याचा निर्णय करण्यापेक्षां जास्त कांहीं करीत नसून, बाकी सर्व मानसिक कामें मनासच करावीं लागतात.　—गी० ४०९

१०२८

ज्ञान हें भक्तीवांचून लंगडें आहे.　—व्या० २-५

१०२९

अद्वैत हें भक्तीला विरुद्ध नाहीं.　—व्या० २-४

१०३०

निर्जीव सृष्टींत किंवा सजीव सृष्टींत कोठेंहि ईश्वराचा अंश दृष्टीस पडला असतां, त्याबद्दल आश्चर्य व प्रेम वाटणें म्हणजे हृदयांत भक्तीचा व प्रेमाचा पाझर फुटणें यासारखा मनुष्यांत अत्युत्तम गुण दुसरा कोणचाच नाहीं.　—के० १८९७-२२-२-४

१०३१

कोणत्याहि ईश्वरस्वरूपाची भक्ति करा, त्या स्वरूपाप्रमाणें त्या **भक्तीची** योग्यता व फळ हें हिंदुधर्माचें मुख्य तत्त्व आहे.
—के० १८९३-१४-२-३

१०३२

**भक्तीचें** पर्यवसान ज्ञान असून भक्ति हें त्याचें साधन आहे, साध्य नव्हे.
—गी० ४१२

१०३३

भक्तीच्या पोटांतून निघालेलें ज्ञान हेंहि अखेर **भक्तींतच** विलीन झाल्यास तीहि एक आनंदाची अवस्था आहे. —आ० आ० २-४३३

१०३४

मूर्तींचें विसर्जन केलें म्हणजे देवतेचें विसर्जन केलें असें नाहीं. मृण्मय मूर्ति ज्या उद्देशानें स्थापली असेल तो उद्देश संपल्यावर तिचें फक्त विसर्जन करावयाचें; बाकी तिचें ध्यान, भक्ति वगैरे गोष्टी अंतःकरणांत सांठवून ठेवावयाच्या, **भक्तीचें** रहस्य हेंच आहे. —आ० व० ४३९

१०३५

आपल्या बांधवांकरितां अंतःकरण तळमळणें, त्यांना मुक्ति मिळावी अशी इच्छा ठेवणें, त्यांना मोक्ष प्राप्त व्हावा व त्यांना भक्तीचीं साधनें मिळावीं असें वाटणें हें **भक्तीचें** लक्षण आहे. —धा० २२५

१०३६

कोणाहि पुरुषाविषयीं अथवा कोणच्याहि वस्तूंविषयीं ज्याच्या मनांत **भक्तिभाव** उत्पन्न होत नाहीं त्याची कृति नेहमीं समाजाला दुःखाच्या डोहांत लोटून देणारीच असावयाची. —के० १८९७-२२-२-४

१०३७

मनुष्याच्या मनाचा प्रत्यक्षाकडे किंवा व्यक्ताकडे जो साहजिक ओढा, त्याची आणि तत्त्वज्ञानाच्या गहन सिद्धान्तांची एकवाक्यता करण्याची वैदिक धर्माची ही शैली इतर कोणत्याहि देशांतील लोकांच्या **भक्ति-मार्गांत** आढळून येत नाहीं. —गी० ४३१

१०३८

गीतेंत जो गोडवेपणा, प्रेमळपणा किंवा रस भरला आहे तो त्यांत प्रतिपादन केलेल्या **भक्तिमार्गाचा** परिणाम होय. —गी० ४१५

१०३९

प्राचीन उपनिषदांतून ज्या सगुणोपासना वर्णिल्या आहेत त्यांतूनच क्रमाक्रमानें आमचा भक्तिमार्ग निघालेला आहे, आणि पातंजलयोगांत चित्त स्थिर होण्यास कांहीं तरी व्यक्त व प्रत्यक्ष वस्तु डोळ्यांपुढें ठेवावी लागत असल्यामुळें भक्तिमार्गाला त्यानें दुजोरा मिळालेला आहे, **भक्तिमार्ग** दुसऱ्या कोठून हिंदुस्थानांत आलेला नाहीं, व येण्याचें कारणहि नव्हतें. —गी० ५२५

१०४०

जो परमेश्वर अचिंत्य, सर्वसाक्षी, सर्वव्यापी व सर्वशक्तिमान् जगदात्मा असूनहि आपल्याप्रमाणें आपल्याशीं बोलेल, आपल्यावर ममता करील, आपल्याला सन्मार्गाला लावून सद्गति देईल, ज्याला आपण आपला असें म्हणूं शकूं, आपल्या सुखदुःखाचा ज्याला कळवळा येईल किंवा जो माझे अपराध पोटांत घालील, त्याचा मी आणि जो माझा असे प्रत्यक्ष संबंध जेथें आमच्यामध्यें उत्पन्न होतील, तो माझें पित्याप्रमाणें रक्षण करील, माझी माउली होईल, अगर "गतिर्भर्ता प्रभुः साक्षी निवासः शरणं सुहृत्"–माझी गति, माझा पोषणकर्ता, माझा धनी, माझा साक्षी, माझ्या निवाऱ्याचें व आरामाचें घर, माझा अखेरचा आधार व विसावा, माझा सखा व कैवारी म्हणून लेंकराप्रमाणें मी ज्याचें प्रेमानें व लडिवाळपणानें आकलन करूं शकेन असा सत्यसंकल्प, सकलैश्वर्यसंपन्न, दयासागर, भक्तवत्सल, परम कारुणिक, परम पवित्र, परमोदार, परमपूज्य, सर्वसुंदर, सकलगुणनिधान किंवा थोडक्यांत सांगणें असल्यास जिव्हाळ्याचा सगुण, प्रेमगम्य व व्यक्त म्हणजे प्रत्यक्ष रूपधारी सुलभ परमेश्वरच मनुष्य '**भक्तीसाठीं**' स्वभावतः स्वीकारीत असतो असें कोणताहि धर्म पाहिला तरी आढळून येतें. —गी० ४१३

१०४१

**भक्तिमार्गांत** मनुष्याला तारण्याची जी शक्ति आहे ती सजीव अगर निर्जीव मूर्तींत किंवा दगडाच्या इमारतींत नसून, या प्रतीकापेक्षां श्रेष्ठ अशी जी ईश्वरभावना सदर प्रतीकाचें ठायीं उपासक ठेवीत असतो तीच खरी तारक होय. —गी० ४१९

१०४२

देव भावाचा भुकेला, पूजाद्रव्याचा नव्हे; मीमांसकमार्गापेक्षां भक्तिमार्गांत जो कांहीं विशेष आहे तो हाच होय. यज्ञयाग करण्यास बराच द्रव्यसंग्रह करावा लागत असून खटाटोपहि पुष्कळ लागतो; पण **भक्तियज्ञ** एका तुळशीपत्रानेंहि होतो. —गी० ७४५

१०४३

**भगवद्गीत**—भगवंताच्या मुखानें गाइलेलें गाणें ऐकल्यामुळें मानवगीत रुचेनासें झालें; अमृत प्यायला मिळाल्यानंतर थंडगार सरबत पिण्याची इच्छा होत नाहीं ! —आ० आ० २-१५

१०४४

कर्माचा परिणाम बरा होवो किंवा वाईट होवो, तें आनंदानें व सुखासमाधानानें करावयास सांगणारा धर्म-ग्रंथ जगाच्या वाङ्मयांत **भगवद्गीता** हाच एक आहे. —के० १९०२-३-२-३

१०४५

भगवंताचें **जगांत** **कार्याकार्य** काय, तर साधूंचें रक्षण, दुष्टांचें **निर्दलन** आणि धर्माची संस्थापना हीं कार्यें जेथें चाललीं असतील तेथें **भगवंताचें अधिष्ठान** आपोआपच आलें. आमची होमरूलची चळवळ ही हिंदुस्थानाची परकीय जुलमांतून सोडवणूक करण्याकरितां आणि सनातन धर्म रक्षण्याकरितां आहे म्हणून हें कार्य जेथें जेथें चालू असेल तेथें तेथें भगवंताचें अधिष्ठान आहेच आहे. —आ० आ० १-१४९

१०४६

शास्त्रीलोकांना वाईट वाटत होतें तरी वेदाची शिकवण साधुसंतांनीं मराठींतून दिली. त्या वेळचे **भगवद्भक्त** आज देशभक्त झाले आहेत हाच काय तो फरक होय. —स्व० मो० ३०

१०४७

सरकारचें उत्पन्न वाढणें व शिल्लक भरपूर राहणें हीं देशाच्या **भरभराटीचीं** लक्षणें नसून लोकांपासून जरूर नसतां अप्रत्यक्ष उपायानें सरकारानें पैसा घेतला त्या निष्ठुरपणाचीं दर्शक आहेत.

—के० १९०३-१३-५-१

१०४८

गीतेंत सांगितलेलें अहेतुक काम करावयास मनांत सात्त्विक वृत्तींचा उदय झाला पाहिजे. करावयाचें काम ईश्वरानें अगोदरच नेमून ठेवलें आहे असा **भरंवसा** असला पाहिजे. —के० १९०२-३-२-४

१०४९

भक्ति मुख्य धरून देवतारूप प्रतीक गौण होय, किंवा विधिभेद असला तरी उपासना एकाच प्रकारची होते असें **भागवतधर्म** स्पष्टपणें सांगत असतां, भागवतधर्मीयांनींसुद्धां शैवांशीं तंटे करीत बसावें हें आश्चर्य आहे. —गी० ४४

१०५०

ज्या सात्वतज्ञातींत **भागवतधर्माचा** प्रादुर्भाव झाला त्यांतील सात्यकि आदिकरून पुरुष, परमभगवद्भक्त भीष्मार्जुन आणि स्वतः श्रीकृष्णहि पराक्रमाच्या अनेक उलाढाली करणारे व करविणारे होते. यासाठीं हाच कित्ता इतर भगवद्भक्तांनींहि गिरवून तत्कालीं प्रचारांत असलेलीं चातुर्वर्ण्या-प्रमाणें युद्धादि व्यावहारिक कर्मे करावीं हा मूळ भागवतधर्मांतील मुख्य विषय होता. —गी० ५४९

१०५१

**भागवतधर्मानें** औपनिषदिक निष्काम कर्मांपुढें धांव घेऊन शुद्ध निवृत्ती-पेक्षां निष्कामकर्मपर प्रवृत्तिमार्ग (नैष्कर्म्य) अधिक श्रेयस्कर ठरविला, आणि ज्ञानाशींच नव्हे तर भक्तीशींहि कर्माची योग्य जोड घालून दिली, ही वैदिक धर्माच्या इतिहासांतील त्याची महत्त्वाची आणि स्मार्तधर्मापेक्षां निराळी कामगिरी होय. —गी० ५४९

१०५२

ज्याचें मन शांत असून ज्यानें सर्वभूतान्तर्गत ऐक्य ओळखिलें तो धंद्यानें अगर जातीनें व्यापारी असो वा खाटीक असो; निष्कामबुद्धीनें धंदे करणारा सदर पुरुष स्नानसंध्याशील ब्राह्मणाइतका किंवा शूर क्षत्रिया-इतकाच थोर व मोक्षाला अधिकारी आहे. इतकेंच नव्हे तर कर्में सोडि-ल्यानें जी सिद्धि मिळावयाची तीच निष्कामबुद्धीनें आपापले धंदे करणा-रास मिळत्ये. **भागवतधर्मांतील** जें काय रहस्य तें हेंच होय. या-प्रमाणें आचरण ठेवून हें तत्त्व अमलांत आणणें अशक्य नाहीं हें महाराष्ट्र संतमंडळींच्या इतिहासावरून उघड होतें. —गी० ८४५

१०५३

**भागवतधर्मास** द्वैत किंवा विशिष्टाद्वैत मताचाच स्वीकार केला पाहिजे अशी जी कित्येकांची समजूत झाली आहे ती चुकीची आहे.

—के० १८९६-४१-२-३

१०५४

आमचीं एकमेकांत भांडणें आणि त्याला इन्धन घालून दोघांच्या डोकें आपटाआपटीची वाट बघणारे सरकार, ह्या तिघांचीहि आपापसांत **भांडणें** नकोत. लोण्यासाठीं भांडणाऱ्या मांजरासारखी आमची स्थिति व्हावयाची! कारण येथील नोकरशाहीचें माकड मधल्या मध्येंच लोणी खाऊन टाकणार व आम्ही मिशा व दाढ्या चाटीत बसणार!

—चरि० २२४

१०५५

देशांतील **भांडवल** कमी होत चाललें म्हणजे तो देश भिकारी व्हावयास लागला असें समजावें. —के० १८९०-४-३-१

१०५६

पांडवांचा काल म्हणजे **भारतभूमीच्या** भाग्योत्कर्षाचा काल होय.

—भा० ३

१०५७

**भाषण** नुसतें गोड किंवा सौजन्ययुक्त असून चालत नाहीं, त्यांत खरेपणा पाहिजे. —के० १९१८-१९-४-५

१०५८

लिहिण्याची 'स्टाईल' कांहीं आणावी लागत नाहीं, व आणून येतहि नाहीं. आपलें जें असेल तें खरें. खरोखर अंतःकरणास पीळ पडला म्हणजे भाषा शिकावी लागत नाहीं. अंतःकरणाला चटका लागतो कीं नाहीं, एवढाच खरा प्रश्न आहे. —आ० आ० १-१५१

१०५९

**भाषा** हें राष्ट्राचें हत्यार होय; आणि हें हत्यार जो तयार करून देतो त्याचे राष्ट्रावर कांहीं लहानसहान उपकार नाहींत. —विष्णु० १८

१०६०

सभेचें मन पक्कें अजमावल्याशिवाय व अनुकूल उत्तर येण्याची खात्री असल्याशिवाय **भाषणांत** सवाल टाकूं नयेत. —आ० आ० १-१७८

१०६१

कोणतीहि विशिष्ट **भाषा** बोलणारे लोक राज्यकर्ते झाले म्हणजे त्यांच्याबरोबरच त्यांच्या भाषेचाहि अधिक गौरव होत असतो.

—के० १९०६-२३-४-३

१०६२

समाजाचा व्यवहार, समाजाचे विचार, समाजाचा व्याप आणि समाजाची **भाषा** यांच्यामधील संबंध इतका निकट आणि नित्य आहे कीं, एकाचें प्रतिबिंब दुसऱ्यांत उमटल्याखेरीज कधींहि राहात नाहीं.

—के० १९०६-२२-४-६

१०६३

**भाषा** हें एक राष्ट्रीयत्वाचें अंग आहे. —के० १९०५-१-५-५

१०६४

राष्ट्राचा प्राचीन इतिहास दाखविण्याचें साधन **भाषा** असून संग्रहालय हें भाषेच्या अभिवृद्धीचें साधन होय. —के० १९०५-१-५-५

१०६५

**एकभाषा** असणें हें राष्ट्रीयत्वाचें एक दर्शक आहे. —आ० व० ४३०

१०६६

सौम्य भाषेचा जेथें कांहींच उपयोग नाहीं तेथें सरळ, निर्भीडपणाची व स्पष्ट रीतीचीच **भाषा** पाहिजे. —आ० व० ४४२

१०६७

**भाषा** हें लोकमत तयार करण्याचें एक उत्तम शस्त्र असून तें उपयोग करणारालाच कसें वापरावें हें समजत असतें. —आ० व० ४४२

१०६८

कोणत्याहि भाषेंतील ग्रंथ वाचतां येऊन त्यांतील मर्म समजणें आणि ती **भाषा** लिहिणें व बोलणें या दोन्ही गोष्टी अगदीं भिन्न आहेत.

—के० १८९३-५-३-२

१०६९

**भाषावृद्धि** हें देशाच्या स्वातंत्र्याचें बीज आहे.

—के० १८९१-३९-२-५

१०७०

कोणत्याहि **भाषेचा** अधिक प्रसार होणें तो राज्यसत्तेवर अवलंबून असतो; भाषेचें गांभीर्य वाढविणें हें सुशिक्षित वर्गाचें काम होय.

—के० १९०५-१-५-५

१०७१

**भाषेचा** अपकर्ष करणारा मनुष्य सर्व वस्तु चोरणाऱ्या मनुष्यापेक्षांहि जास्त निंद्य आहे. —विष्णु० १६

१०७२

**भाषेची** मर्यादा किंवा व्याप्ति वाढविण्यास धर्म कारण होत असतो.

—के० १९०६-२३-४-२

१०७३

**भाषेची** वाढ व्हावयाची ती विद्वत्तेच्या, युक्तीच्या आणि लोकमताच्या जोरावरच झाली पाहिजे; सरकारच्या जोरावर होऊन उपयोगी नाहीं.

—के० १९०४-४०-४-३

१०७४

**भाषेची** वाढ होण्यास मुख्य साधन त्या भाषेंत व्यवहार चालणें हें होय. —के० १९०६-२४-५-१

१०७५

मनुष्याची किंवा वनस्पतीची वाढ ज्याप्रमाणें चोहोंकडे सारख्याच रीतीनें, प्रमाणानें आणि साधनांनीं होत असते, त्याचप्रमाणें देशाच्या एकंदर **भाषेची** व ग्रंथसमूहाची स्थिति होय. —के० १८९१-३९-२-४

१०७६

जामदारखान्यांत केवळ रत्नें पुष्कळ असल्यानें भागत नाहीं; तर ज्याप्रमाणें जामदारखान्याच्या मालकाजवळ सदर रत्नांच्या रूपाची, वर्णाची किंवा किंमतीची याद असावी लागते तद्वतच **भाषेचें** शब्दभांडागार वापरणाऱ्यांची स्थिति होय. —के० १९०३-४२-४-३

१०७७

बागेमध्यें ज्याप्रमाणें कुशल मालाकाराच्या प्रयत्नानें निरनिराळीं फुलझाडें व फळझाडें तयार होतात तशी **भाषेच्या** मालाकारांचीहि स्थिति आहे. —के० १९०२-६ ४ २

१०७८

कोश आणि व्याकरण हीं कोणत्याहि **भाषेच्या** उत्कर्षाचीं प्रधान अंगें होत. —के० १९०३-४२-४-३

१०७९

एखाद्या तळ्यांत सभोंवारच्या वस्तूंचें जसें प्रतिबिंब पडतें, त्याप्रमाणें प्रत्येक देशांतील लोकांच्या आचारविचारांचें, धर्माचें, नीतीचें, तत्त्वज्ञानाचें, व्यापाराचें व समाजस्थितीचें चित्र त्यांच्या **भाषेंत** उतरलेलें असतें. —के० १९०३-४२-४-३

१०८०

स्त्रियांस केशसंस्कार किंवा केंस विंचरून वेणीफणी करणें हें जितकें इष्ट व अवश्य आहे, तितकेंच **भाषेंतील** शब्दांस सुसंस्कृत करणें अवश्य होय. —के० १९०४-३०-४-५

१०८१

एखाद्या नागरिक प्रौढ वधूच्या शृंगारांतील नखरा खेडेगांवांतील मुग्ध-वधूजनांच्या विलासानें व्यक्त करणें जितकें अवघड आहे तितकेंच प्रौढ **भाषेंतील** शब्दांचे निरनिराळे वाच्य किंवा व्यंग अर्थ त्यापेक्षां कमी दर्जाच्या भाषेंतील शब्दांनीं स्पष्ट करणें दुर्घट होय.

—के० १९०३-४२-४-४

१०८२

नाडीवरून ज्याप्रमाणें शरीरांतील रोगाची किंवा स्वास्थ्याची परीक्षा होते तद्वत्‌च **भाषेवरून** राष्ट्राची बरी वाईट स्थिति तज्ज्ञ लोक तेव्हांच ताडतात. —के० १९०६-२३-४-२

१०८३

**भाषेस** जें प्रौढ स्वरूप प्राप्त होतें तें त्यांतील शब्दसंचयामुळें होत असतें. —के० १९०३-४२-४-३

१०८४

स्वराज्याखालीं **भाषेस** जो जोम होता तो अगदीं कुणब्यापासून वामन-पंडितापर्यंत सारखाच होता; परंतु हल्लींच्या राज्यांत तो प्रकार अगदींच पालटला आहे. —के० १८९१-४०-३-१

१०८५

केवळ उच्चाराकडे पाहून शब्द लिहावयाचे म्हटल्यास **भाषेस** स्थैर्य व निश्चितपणा कधींहि यावयाचा नाहीं. —के० १९०४-२८-४-५

१०८६

**भाष्य** व टीका या दोन शब्दांचा कित्येकदां समानार्थी उपयोग करण्यांत येतो खरा; पण सामान्यत: टीका म्हटली म्हणजे त्यांत मूळ ग्रंथाचा सरळ अन्वय सांगून त्यांतील शब्दांचा अर्थ सुगम केलेला असतो; आणि भाष्यकार तेवढ्यावरच संतुष्ट न राहतां, एकंदर ग्रंथाचें न्यायरीत्या पर्यालोचन करून आपल्या मतें त्यांतील तात्पर्य काय व तदनुसार ग्रंथाचा अर्थ कसा लावावा, हें सांगत असतात. —गी० ११

१०८७

स्वतःच्या हक्काची व मालकीची बाब असली तरी ज्यावेळेस मनुष्य ती गोष्ट संपादन करतांना दुसऱ्याच्या उदारपणावर व न्यायी बुद्धीवरच अवलंबून राहून वरच्यावर मागण्यानें ती गोष्ट आपणांस मिळेल असें समजून वारंवार दांत विचकणें एवढ्याच उपायाची योजना करीत असतो, तेव्हां त्याच्या मागण्या कितीहि न्यायीपणाच्या व हक्कदारीच्या असल्या तरी, त्या मागण्या संपादन करण्याच्या मार्गाला जग **भिक्षांदेहीचाच मार्ग** समजतें. —के० १९०७-१-४-२

१०८८

लक्षावधि लोक देशोधडीस लागल्यावर त्यांस अन्न पुरविणें हें एक प्रकारचें औदार्य आहे खरें; पण लाखों भिकारी लोकांस भिक्षा घालीत बसण्यापेक्षां **भिक्षेकऱ्यांची** संख्याच जेणेंकरून कमी होईल अशी तजवीज योजणें अधिक शहाणपणाचें होय. —के० १९००-३०-२-४

१०८९

**भीकमाग्या** लोकांबद्दल कींव उत्पन्न होते, सहाय्य करण्याची सहानुभूति व स्फूर्ति उत्पन्न होत नाहीं. —के० १९०५-४८ ४-४

१०९०

जोंपर्यंत स्वभावामध्यें भिन्नता आहे तोंपर्यंत मवाळ आणि जहाल हे **भेद** कायमच राहणार; पण तेवढ्यासाठीं, राष्ट्रीय कामास दोघांनीं एके ठिकाणीं बसून बहुमतानें कोणताच ठराव करूं नये असें म्हणणें म्हणजे राजकीय उन्नतीसाठीं जे प्रयत्न करावयाचे त्यांचें तत्त्व न ओळखण्यासारखें होय. —के० १९१६-१९-४-३

१०९१

हिंदी लोकांत धर्म, जाति आणि सामाजिक दर्जा यांत **भेदभाव** आहेत; पण त्यामुळें स्वराज्य चालविणें अनिष्ट किंवा अशक्य होईल असें जें आमच्या प्रतिपक्षाचें मत आहे तें चुकीचें आहे. —के० १९१९-१३-२-४

१०९२

राष्ट्रकार्यांत सर्व क्षुल्लक **भेदाभेद** विसरून गेले पाहिजेत.

—के० १९२०-१०-५-५

१०९३

**भौतिक उन्नतीसाठीं** सारखी धडपड करणाऱ्या राष्ट्रांत स्वार्थबुद्धीचा निवळ अभाव आढळून येणें जवळ जवळ अशक्यच आहे.

—के० १९०२-३४-५-२

१०९४

या जगांत सर्वच **मजूर** आहेत. —के० १९१९-४७-४-१

१०९५

आपण मजूरलोक राजे होतां, व आतां रंक झालां आहांत—पण **मजूर** लोकांना राजे व्हावयाचे दिवस यावयाचे आहेत—ते खात्रीनें येतील असें मी सांगतों. —व्या० २-१४४

१०९६

देशाचा उद्धार व्हावयाचा म्हणजे **मजूर** वर्ग निर्व्यसनी व सुशिक्षित झाला पाहिजे. —के० १९०८-२४-७-२

१०९७

**मजुरी** करणें हा खिस्ती धर्ममतानें देवाचा शाप असला तरी आमच्या धर्माप्रमाणें तें एक कर्तव्य आहे. —के० १९१९-४७-४-१

१०९८

तुम्हा **मजुरांत** साधुसंत निर्माण झाले व त्यांच्या चरणीं आम्हीं ब्राह्मण लीन झालों होतों. —लो० टि० व्या० २-१४७

१०९९

मद्यप्राशन वेदाविरुद्ध, कुराणाविरुद्ध व बायबलाविरुद्धहि आहे. **मद्यपाननिषेधाचे** चळवळीस परमेश्वराचा पाठिंबा खास आहे.

—लो० टि० व्या० २-८१

११००

प्रजेकरितां झटणारे आणि प्रजेच्या हक्कांकरितां प्राण देणारे स्वार्थत्यागी पुरुष **मध्यम स्थितींतील** सुशिक्षित वर्गांतच निपजावे लागतात.

—के० १९०७-२३-४-२

११०१

एखादा हिरा कितीहि दैदीप्यमान व किंमतवान असला तरी तो जड असल्यामुळें, त्याला मुकुटांत बसवून डोक्यावर धारण करा कीं पायाखालीं तुडवा, त्याचें त्यासंबंधानें **मत** असें कांहींच नसतें.

—के० १९०३ ९-५-१

११०२

मत ही प्रचंड शक्ति आहे; **मत** देण्याचा ज्यांना हक्क तेच खरे राजे.

—के० १९२०-१०-२-३

११०३

आम्हाला तिसऱ्याशींच झगडावयाचे असल्यामुळें आपले आपआपसांतील बारीकसारीक **मतभेद** या क्षणीं पार झुगारून दिले पाहिजेत.

—स्व० मो० १२

११०४

या जगांत प्रत्येक मनुष्याचा स्वभाव जोंपर्यंत भिन्न आहे तोंपर्यंत माणसामाणसांत **मतभेद** कायम राहणारच. —के० १९१६-१९-४-२

११०५

**मतभेद** सर्वथा टाळणें अशक्य आहे; कारण विचारापेक्षां स्वभावावरच मतभेद प्रायशः अवलंबून असतात. —के० १९१६-११-४-३

११०६

मतभेद निर्मूळ करण्यापेक्षां **मतभेद** एककार्यवाहि कसा करतां येईल, इकडे मुत्सद्यांनीं प्रथमतः लक्ष दिलें पाहिजे. —के० १९०८-७-४-३

११०७

ज्या बाबतींत **मतभेद** नाहीं त्या बाबतींत सर्वांनीं एकत्र मिळावें व काम करावें, व जेथें मतभेद असेल तेथें प्रत्येक मताच्या लोकांनीं आपापलीं कामें निरनिराळीं करावीं हेंच सार्वजनिक काम करण्याचें मुख्य तत्त्व आहे. —के० १८९६-२५-३-१

११०८

परस्परांत **मतभेद** असल्यास तो जाण्यास एकमेकांनीं एकत्र जमून काम करणें हाच उत्तम उपाय आहे. —के० १९०५-२५-४-२

११०९

**मतभेद** पुष्कळ बाबतींत असूं शकेल; व खुळचट लोकहि सर्व पक्षांत व सर्व ठिकाणीं आढळण्यांत येतील; एका हाताचींच बोटें घेतलीं तर तीं सारखीं नसतात; पण खाणेंपिणें वगैरे सर्व प्रकारचे व्यवहार करण्याचे वेळीं त्या सर्व बोटांचें साहाय्य लागतें. —के० ले० २-१०

१११०

**मतभेद** पूर्णपणें नाहींसे होण्याची वाट पहात बसणें म्हणजे नदीचें सर्व पाणी ओसरेपर्यंत परतीरीं जाण्याचें तहकूब करण्यासारखें आहे.

—के० १९०७-२६-५-५

११११

राजकीय बाबतींत रुचिवैचित्र्य व **मतवैचित्र्य** यास पुष्कळ अवकाश आहे, हें प्रत्येकानें लक्षांत ठेवलें पाहिजे. व एखाद्या बाबतींत मतवैचित्र्यामुळें झालेला भेद नेहमीं मनांत न वाळगतां दुसऱ्या बाबतींत म्हणजे, मतभेद नसेल तेथें पुन्हा एकच व्हावयास पाहिजे, हेंच एकुणिसाव्या शतकांतील उदार शिक्षणाचें फळ आहे. —के० ले० १-२२७

१११२

बुद्धिमान् गृहस्थांस आपलें मत व्यक्त करण्याचा जर हक्क नसेल, लोकांवर आपल्या **मताची** छाप पाडून बहुजन-समाज आपल्याकडे खेंचण्याची जर त्यांना मोकळीक नसेल, तर जगाचें पाऊल पुढें पडणें अशक्य आहे.

—ख० १५६

१११३

आपणाला जें योग्य मत वाटतें त्या **मता**प्रमाणें दुसऱ्याचीं मतें बनविणें व त्याप्रमाणें वागावयास लावणें हा मनुष्यास परमेश्वरानें दिलेला स्वभावसिद्ध हक्कच आहे. —के० १९०५-४६-५-२

१११४

जगांत **मताला** किंमत नाहीं, निश्चयाला असते; मत खरें कोणाचें ? जो आपल्या माताकरितां मरणास तयार होतो त्याचें. —आ० व० ३९८

११११५

कोणतींहि **मतें** बोलून दाखविण्याचें धैर्य असल्यानेंच तीं खरीं ठरतात असें नाहीं. —के० १८९२-१८-३-२

१११६

वृद्धांची सावधगिरी व तरुणांची हिंमत ह्यांची योग्य सांगड घातल्यानें उत्कृष्ट असा **मध्यम मार्ग** सांपडणार आहे. —व्या० १-११६

१११७

ज्या देशांत **मध्यमस्थितींतील** लोक सधन असून कर्तव्यदक्ष, विद्वान व हुशार आहेत तो देश, वरच्या व खालच्या लोकांच्या स्थितीची माहिती नसतांहि, भरभराटीच्या मार्गास लागला आहे असें खुशाल निदान करावें. —के १९०६-७-६-३

१११८

राष्ट्रांतील संख्येला राष्ट्रीयत्वाच्या एका विचारानें भरवून सर्वांची मोट बांधून संघशक्ति निर्माण करण्याचें साधन राष्ट्रांतील **मध्यमस्थितींतील** लोकांच्याच अंगीं असतें. —के० १९०६-७-४-३

१११९

प्रजाजन सुशिक्षित असो वा अशिक्षित असो, त्यांचा पुढाकार घेण्यास **मध्यमवर्गांतील लोकांनींच** नेहमींच कंबर बांधली पाहिजे, आणि राजा किंवा अधिकारीवर्ग यांच्याशीं टक्कर देण्यास त्यांस तयार केलें पाहिजे. —के० १९०७-२३-४-१

११२०

ज्याचें **मन** मजबूत नाहीं त्याचें शरीर कितीहि धिप्पाड असलें तरी त्याचा उपयोग नाहीं. —व्या० २-११३

११२१

**मन** शुद्ध नसतां केवळ लोकांच्या भीतीनें किंवा लोकांनीं बरें म्हणावें म्हणून फक्त बाह्येंद्रियांच्या व्यापारास आळा घालणारा पुरुष खरा सदाचरणी नव्हे, ढोंगी होय. —गी० ६४५

११२२

बोध कितीहि चांगला असला तरी त्याचा मनावर संस्कार होण्यास **मनाची** पूर्ण तयारी असावी लागते. —के० १९०५-४८-४-३

११२३

**मनाच्या** पापांचा निवाडा परमेश्वर करीत असतो, कृतींतील पापापलीकडे दुनियेला जातां येत नाहीं. —के० १९०८-२-४५

११२४

सत्पुरुषाचा मोठेपणा त्याच्या स्वतःसिद्ध किंवा कमावलेल्या **मनांत** असतो. —के० १९१६-२७-४-२

११२५

मनुष्याचा मोठेपणा त्याच्या **मनावर** आहे, केवळ कृतीवर नव्हे.
—के० १९१६-२७-४-१

११२६

पशूला परिस्थितीशीं नमून वागावें लागतें; पण **मनुष्य** हा परिस्थिति वांकवूं शकतो. —स्व० गी० ३४

११२७

पोट भरण्यापलीकडे देशोन्नति म्हणून एक आपलें अति महत्त्वाचें कर्तव्य आहे, हें जर सतत मनांत ठेवून त्याप्रमाणें जन्मभर वर्तन केलें तर त्यांत माणुसकी व **मनुष्यजन्माचें** सार्थक आहे.

—के० १९०१-३४-३-५

११२८

**मनुष्यस्वभावच** असा आहे कीं, हातांत आलेली सत्ता कोणी सुखानें सोडूं इच्छित नाहीं. —के० १९०७-२१-४-५

११२९

**मनुष्यस्वभाव** येथून तेथून सारखाच आहे; व रानटी मनुष्य अडाणीपणानें जर भांबावून जात असला तर सुधारलेलें सरकार भांबावून जाण्यास नवीन शास्त्रीय शोधांच्या नांवावर मोडेल, अशी कांहीं तरी कल्पना असली म्हणजे बस्स आहे. —के० ले० २-३७२

११३०

**मनुष्यस्वभावच** असा आहे कीं, त्यास एकसारखें यश मिळत गेलें असतां, तो इतर लोकांपेक्षां आपल्या अंगांत कांहीं तरी विलक्षण दैवी शक्ति आहे असें मानूं लागतो. —के० १९०५-१२-४-४

११३१

जिंकलेल्या लोकांना जेते लोक अथवा त्यांनीं नेमलेले शिक्षक राष्ट्र-धर्माचीं खरीं तत्त्वें सांगतील ही गोष्ट **मनुष्यस्वभावाच्याच** विरुद्ध आहे.

—के० १९०५-४३-४-२

११३२

मनुष्य म्हणजे केवळ देहरूपी नुस्ती वस्तु नसून देह आणि आत्मा यांचा समुच्चय आहे. पैकीं 'मी' या अहंकाररूपानें व्यक्त होणारा आत्मा नित्य व अमर आहे. तो आज आहे, काल होता व उद्यांहि असणारच; म्हणून **मरणें** किंवा मारणें हे शब्दच त्यास लागू पडत नाहींत व त्याचा शोकहि करावयास नको. बाकी राहिला देह. हा तर बोलून चालून अनित्य व नाशवंत असून आज नाहीं उद्यां, उद्यां नाहीं तर शंभर वर्षांनीं तरी तो नाश पावणार हें निश्चित आहे.—अद्य वाऽब्दशतांते वा मृत्युर्वै प्राणिनां ध्रुवः ( भाग० १०-१-३८ )—आणि एक देह सुटला तरी कर्मानुरूप पुढें दुसरा देह मिळाल्याखेरीज रहात नाहीं म्हणून त्याचाहि शोक करणें बरोबर नव्हे. —गी० ६१६

११३३

मनुष्याचें जीवित नश्वर आहे वगैरे तत्त्वज्ञानाचे विचार कितीहि डोक्यांत घोळत असले तरी वैभवानें, बुद्धीनें, कर्तृत्वानें किंवा विद्वत्तेनें ज्या थोर गृहस्थांनीं राष्ट्राचा कार्यभार उचलून पुढाकार घेतलेला असतो त्याच्या **मृत्यूनें** कांहीं कालपर्यंत तरी जग शून्यवत् भासणें अगदीं स्वाभाविक आहे. —के० १९०१-४-२-४

### ११३४

स्वदेशावर अकृत्रिम प्रेम, स्वदेशाचा इतरांनीं योग्य प्रकारें बहुमान ठेवावा म्हणून सतत उद्योग, इष्ट कार्यसिद्धि साधण्यास काय केलें पाहिजे हें तात्काल समजण्याजोगी तीक्ष्ण बुद्धि, आपल्या देशाचा बीज निरंतर अबाधित रहावा म्हणून पुढील संकटांची आगाऊ तरतूद करणारी दूरदृष्टि, सभोंवारच्या सामुग्रीची जुळवाजुळव करून इष्ट साहित्य निर्माण करणारी योजकता इत्यादि गुण खऱ्या **मुत्सद्याचें** अंगीं असावे लागतात.

—के० १९००-१२-२-१

### ११३५

इंद्रियशक्ति शाबूत आहेत, शरीर स्वार्थासाठीं उद्योग करण्यास समर्थ आहे, वार्धक्य अजून दूर राहिलें आहे, आणि संसारांतील सुखाचें स्वरूप अद्याप मनोहर असून तिकडे चित्ताची प्रवृत्ति होणें साहजिक आहे, अशा वेळीं आणि विशेषेंकरून या दिशेनें गेलें असतां आपणांस यश मिळण्याचा इतरांपेक्षां कांकणभर अधिक संभव आहे, अशी मनास खात्री वाटत असतांहि या सर्व मनोहर देखाव्यांवरून दृष्टि मागें ओढून यथाशक्ति आपल्यास देशकार्यास वाहून घेणें, त्यांत आलेलीं संकटें सोसण्यास कबूल असणें, किंबहुना त्यांतच आनंद मानून त्यासाठीं सतत परिश्रम करण्यास तयार होणें याला एक प्रकारचा बळकट **मनोनिग्रह** लागत असतो. आणि तो मनोनिग्रह ज्यानें दाखविला, दाखविलाच नव्हे तर आमरणांत कायम ठेवला, तोच पुरुष धन्य होय. —के० १९१५-८-६-२

### ११३६

जोंपर्यंत **मराठी भाषेचा** अभिमान बाळगून सर्व दिशेनें तिची अभिवृद्धि करणें आपलें कर्तव्य आहे असें महाराष्ट्रांतील सुशिक्षित लोकांस वाटत नाहीं, तोंपर्यंत महाराष्ट्रभाषा चांगल्या नांवारूपास येण्याची आशा नको. —के० १९०४-४६-४-५

### ११३७

ब्राह्मणांची लेखणी आणि मराठ्यांची तलवार या दोघांचेंहि **मराठी-राज्य** कांहीं दिवस चालण्यास सारखेंच साहाय्य होतें.

—के० १८९६-२५-२-४

११३८

**मराठी राज्यांत** ब्राह्मणांची बुद्धि व क्षत्रियांचें युद्धनैपुण्य यांचें जसें ऐक्य झालें तसें चतुर आणि धाडशी वैश्य जातीचें सहाय्यहि मिळालें असतें तर सुरत, वसई, गोंवा, मद्रास, हुबळी येथील वखारी कधींच तेथें टिकल्या नसत्या व पुढील इतिहासहि बेगळा झाला असता.

—के० १९०३-३६-४-४

११३९

झालेली जखम भरून येणें हेंच जिवंतपणाचें खरें लक्षण होय; व तें लक्षण **मराठी राज्यास** लागूं केलें असतां त्यांतील जोमाची तेव्हांच पारख होते.

—के० १८९४-२४-२-४

११४०

'जीन तक्त जीन' 'Saddle is my throne, saddle is my home' हें वर्णन **मराठी शिलेदारांस** पूर्णपणें लागूं पडतें.

—के० १९०२-३१-४-४

११४१

तोबऱ्यांतले हरभरे मूठभर घोड्यास दे, मूठभर स्वतःचे तोंडांत टाक, अशा रीतीनें उपहार करित असतां हजारों स्त्रियांनीं वेष्टिलेल्या शहाजाद्याचें **गृहसुख** मराठी शिलेदारांना मिळत असे. —के० १९०२-३१-४-४

११४२

आमच्या समाजाचें मुख्य स्थल जें **मराठेमंडळ** त्यास कांहींएक धक्का न पोंहोचून आमचा स्वधर्म जशाचा तसाच अजून कायम आहे हें जेव्हां आपल्या चक्षूंनीं पाहिलें, तेव्हां आम्हांस फार कौतुक वाटलें. आपल्या घरांत एखादी चीर पडलेली पाहून पोटांत धस्स व्हावें, पण पायाचे दगड व ओसरीचे खांब शाबूद आहेत असें पाहून जसें स्वस्थ चित्त होतें तद्वतच आमच्या मनाची स्थिति झाली. —धा० २५

११४३

**मराठे** लोकांस जर आपण खरे क्षत्रिय असें वाटत असेल तर वेदोक्तमंत्रांनीं श्रावणी करणें हा कांहीं खरा मार्ग नव्हे. —धा० १२९

११४४

महाराष्ट्रांत **मराठे** लोकांस जो मान आहे, तो त्यांच्या वाडवडिलांच्या शौर्यामुळें त्यांस प्राप्त झालेला आहे, व तशा प्रकारचें शौर्य, धाडस व देशाभिमान हे गुण जोंपर्यंत त्यांच्यामध्यें जागृत राहतील तोंपर्यंत त्यांचा मान कधींहि कमी व्हावयाचा नाहीं. —च० सु० ६०

११४५

जातीनें अस्सल क्षत्रिय असोत वा नसोत, त्यांची मुसलमानी लाट परतवून हिंदुधर्माचें पुनरुज्जीवन करणाऱ्या **मराठ्यांची योग्यता** स्नानसंध्या करून धर्म राखण्याऱ्या ब्राह्मणापेक्षां कोणत्याहि रीतीनें कमी आहे असें आम्ही मानीत नाहीं. —धा० ६८

११४६

**मराठ्यांचा** सर्व अंमल, सर्व तयारी, सर्व लष्करी धोरण, त्यांचा घोडा, भाला व घोंगडी यांत एकवटलेलीं होतीं. —के० १९०२-३१-४-४

११४७

**मराठ्यांचें लष्करच** असें होतें कीं, गनिमी काव्याची लढाई लढण्याकरितांच तें जन्मास आलें असलें पाहिजे. —के० १९०२-३१-४-४

११४८

साधी रहाटी, सहनशीलता, चिकटपणा, रणभूमीवरची धूर्तता, केव्हां पळून जावें केव्हां मिळावें या संबंधाची सहजस्फूर्ति, स्वधर्मावर पूर्ण निष्ठा, परमेश्वर आपला पाठीराखा आहे ही पक्की खात्री व या प्रचंड शत्रूस आपण अखेर जिंकणार ही पुरी उमेद **मराठ्यांच्याप्रमाणेंच** बोअर लोकांत दृष्टीस पडली. —के० १९०२-३४-४-४

११४९

युद्धकला व तदंगभूत राजकारणें **मराठ्यांस** अवगत होतीं; पण शांततेच्या काळांतील व्यापारी लढाई त्यांस माहीत नव्हती. —के० १९०३-३६-४-४

११५०

स्वतः एक प्रकारें अलिप्त राहून जनतेच्या हितासाठीं दुसऱ्यांच्या कृत्यांचें आस्थेनें व प्रेमपूर्वक परीक्षण करणाऱ्या **महापुरुषाची** जरूरी सर्व काळीं असते. —के० १९०२-२५-५-२

११५१

नेहमींच्या निर्बंधाचा कोठें अतिक्रम करावयाचा हें जाणण्याची जी शक्ति **महापुरुषांच्या** अंगीं असते त्यामुळेंच त्यांस अलौकिकत्व प्राप्त झालेलें असतें. —के० १८९७-३०-३-३

११५२

**महापुरुषांच्या** शब्दांतील जादू इतर ठिकाणीं नसल्यामुळें त्यांच्या आशीर्वादाविषयीं सर्व लोक भुकेलेले असतात. —के० १९०२-२५-५-२

११५३

एखाद्याच्या कृत्याविषयीं एखाद्या **महापुरुषानें** दिलेलें अनुकूल मत प्रोत्साहन देऊन नवीन उमेद उत्पन्न करण्यास जितकें कारणीभूत होतें तितका हजारों लोकांच्या सहानुभूतीचा उपयोग होत नाहीं.
—के० १९०२-२५-५-२

११५४

भारतवर्षांत उन्नत पुरुषार्थांचीं बीजें सदैव कायम ठेवून प्रसंगानुसार सदर बीजांपासून योग्य अंकुर उत्पन्न करण्यास **महाभारत** हाच राष्ट्रीय ग्रंथ मूळ संस्कृत भाषेंत किंवा प्राकृत भाषांतरद्वारा कारण झालेला आहे.
—भा० ४

११५५

**महाभारत** म्हटलें म्हणजे भारतवर्षांतील लोकांचें जीवित होय; कारण आर्यधर्मांतील आचारविचारांचीं सर्व मूलतत्त्वें यांत ग्रथित केलेलीं आहेत. —के० १९०५-११-४-४

११५६

केवळ "आर्ष महाकाव्य" किंवा 'एपिक' काव्य या नात्यानें **महाभारत** सर्व काव्यांत श्रेष्ठ आहे इतकेंच नव्हे तर आचार, व्यवहार, राजनीति, धर्म, अध्यात्म, प्राचीन इतिहास वगैरे अनेक बाबतींत भारतीय लोकांचें महाभारत म्हणजे एक अनुपम व अक्षय्य ज्ञानभांडार होऊन राहिलें आहे. —के० १९०५-१६-४-५

११५७

महाभारत हा ग्रंथ इतिहासाचे पायावर रचलेला आहे; किंबहुना जुन्या संस्कृत वाङ्मयांत 'इतिहास' हेंच नांव त्यास दिलेलें आहे.

—भा० २

११५८

भगवान् वेदव्यास यांची वाणी काव्यदृष्ट्या रसभरित तर खरीच; पण या वाणीच्या कोंदणांत जे हिरे बसविले आहेत, ते तेजानें कांहीं कमी आहेत असें नाहीं. महाभारत ग्रंथ आणि त्यांतील नायक, उपनायक वगैरे थोर पुरुष आर्यभूमींतील आबालवृद्ध स्त्री-पुरुषांस कित्येक शतकेंपर्यंत एक-सारखे जे प्रिय होत आले आहेत, त्यांतील बीज हेंच होय. थोडक्यांत सांगावयाचें असल्यास, महाभारत हा एक अत्युत्तम राष्ट्रीय ग्रंथ आहे. 'पांचवा वेद' म्हणून जी संज्ञा या ग्रंथाला प्राप्त झाली आहे, ती अगदीं यथार्थ होय.

—भा० प्र० २

११५९

संसारांतील अनेक अडचणींच्या प्रसंगीं थोर थोर प्राचीन पुरुषांनीं कसें वर्तन केलें याचा कथानकाच्या सुलभरूपानें सामान्य जनास बोध करण्यासाठींच भारताचें 'महाभारत' झालेलें आहे; एरवीं नुस्त्या भारती-युद्धाचें किंवा 'जय' नामक इतिहासाचें वर्णन करण्यास अठरा पर्वें सांगण्याची कांहीं जरूरी नव्हती.

—गी० ३०

११६०

राष्ट्रीयदृष्ट्या रामायणापेक्षांहि महाभारताची योग्यता अधिक आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं.

—भा० १

११६१

धर्मार्थकाममोक्ष ह्या चतुर्विध पुरुषार्थांचें ज्ञान प्राप्त करून घेण्याचे कामीं महाभारताची योग्यता वर्णावी तेवढी थोडीच. या कामीं भरत-भूमींत चोहोंकडे पसरलेल्या हिंदुसमाजाचा हा ग्रंथ म्हणजे एक जीवात्माच आहे म्हटलें तरी चालेल.

—भा० ३

११६२

**महाभारत** हें नुसतें आर्ष काव्य अगर नुस्ता इतिहास नसून धर्माधर्मांच्या सूक्ष्म प्रसंगांचें निरूपण करणारी ही एक संहिताच आहे; आणि या धर्मसंहितेंत जर कर्मयोगाचें शास्त्रीय व तात्त्विक विवेचन आलें नाहीं तर तें येणार कोठें ? नुस्त्या वेदांतावरील ग्रंथांत हें विवेचन येऊं शकत नाहीं. धर्मसंहिता हेंच त्याचें योग्य स्थल होय; आणि महाभारतकारांनीं जर हें विवेचन केलें नसतें तर धर्माधर्माचा हा मोठा संग्रह, किंवा पांचवा वेद, त्या मानानें अपुराच राहिला असता. ही अपूर्तता काढून टाकण्यासाठीं भगवद्गीता महाभारतांत आली आहे; आणि कर्मयोग समर्थनाचें हें काम करण्यास वेदान्त शास्त्राप्रमाणेंच व्यवहारांतहि अत्यंत प्रवीण असा महाभारतकारांसारखा उत्तम ज्ञानी पुरुष आम्हांस लाधला हें आमचें भाग्य समजलें पाहिजे. —गी० ५१९

११६३

प्रधान पुरुषांच्या शीलवैचित्र्याबद्दल **महाभारताचा** हात धरणारें दुसरें काव्य क्वचितच सांपडेल. —के० १९०५-१६-४-४

११६४

इंग्रजी 'एपिक' काव्याचें लक्षण घेऊन जरी **महाभारताचें** परीक्षण केलें, तरीहि त्यांतील प्रमुख पात्रांचें स्वभाववैचित्र्य, त्यांचें समयोचित आणि स्पष्ट भाषण, उदात्त विचार आणि अनेक प्रसंगीं त्यांनीं दाखविलेलें धैर्य आणि नीतिमत्ता, किंबहुना एकंदर संविधानकाचें गांभीर्य आणि लौकिक अथवा व्यावहारिक महत्त्व या सर्व बाबतींत महाभारताचा नंबर जगांतील सर्व आर्ष महाकाव्यांत निःसंशय पहिला लागल्याखेरीज राहणार नाहीं. —के० १९०५-१६-४-५

११६५

राष्ट्रांतील सर्व लोकांस एकसमयावच्छेदेंकरून आनंद, ज्ञान, ईर्षा किंवा उत्साह देणारें **महाभारतासारख्या** महाकाव्यासारखें दुसरें साधन मिळणें कठीण आहे. —के० १९०५-११-४-३

११६६

अत्यंत धोरणी, देशभक्त, धर्मनिष्ठ व खरा मुत्सद्दी प्रल्हाद निराजी हा जर **महाराष्ट्राचा** आत्मा बनला नसता, संताजी घोरपडे व धनाजी जाधव हे जर महाराष्ट्ररूपी देहाच्या चलनवलनाच्या मुख्य शक्ति झाले नसते, महाराष्ट्रांतील साधुसंतांनीं उत्पन्न केलेली व औरंगजेबाच्या जुलमानें अत्यंत प्रखर झालेली धर्मनिष्ठा जर सर्व महाराष्ट्राचे मनांत उचंबळून गेली नसती, तर औरंगजेबानें जवळ जवळ आंखडत आणलेल्या महाराष्ट्राच्या नाड्या खरोखरच बंद पडून सर्व देश थंड झाला असता !

—के० १९०२-३१-४-५

११६७

**महाराष्ट्राचा** स्वभावच असा आहे कीं, प्रथम त्याचे डोळे दिपून जातात; पण हळुहळू इतर सर्वांपेक्षां शत्रूचीं छिद्रें त्याच्या आधीं ध्यानांत येतात.

—के० १९०२-३१-४-४

११६८

जातीचा, वर्णाचा, स्त्री-पुरुषादिकांचा किंवा काळ्या-गोऱ्या रंगाचा वगैरे कोणताच भेद न ठेवितां सर्वांस एकच सद्गति देणारा भगवद्भक्तीचा जो हा राजमार्ग त्याची खरी महती **महाराष्ट्रांतील संतमंडळींच्या** इतिहासावरून कळून येईल.

—गी० ७४८

११६९

**महाराष्ट्रानें** आधीं केलें आहे, या गोष्टीची त्याला ओळख आहे, व स्वराज्य म्हणजे काय याचा त्याला अनुभव आहे.

—व्या० १-८०

११७०

अत्यंत वेगानें व दर्पानें खालीं उतरणाऱ्या गंगेस ज्याप्रमाणें शंकरांनीं आपल्या शिखाप्रदेशीं थांबवून धरून गुप्त करून टाकिलें, त्याप्रमाणें अजिंक्य साम्राज्याच्या मदानें तर्र झालेल्या मुसलमानांच्या दक्षिणेंत उतरणाऱ्या सेनेला **महाराष्ट्रानें** आपल्या माथीं थोपवून धरून कांहीं काळानें त्या सेनासमुदायास गडपहि करून टाकिलें.

—के० १९०२-२४-४-५

११७१

सह्याद्री पर्वताचा, त्याच्या प्रत्येक दऱ्याखोऱ्यांचा, त्याच्या लहानसहान टेंकड्यांचा, त्याच्या घाटांचा, त्याच्यांतील किल्ल्यांचा **महाराष्ट्रावर** एवढा प्रचंड व अतर्क्य उपकार आहे कीं, लोकांची आराध्य देवताच सह्याद्रीस्वरूप होऊन देशाचें रक्षण करीत आहे असें वाटल्यास नवल नाहीं !

—के० १९०२-२४-४-५

११७२

**महाराष्ट्रीयांच्या** अंगांत त्या पूर्वजांचें शुद्ध रक्त जर खेळत असेल तर हल्लींच्या परिस्थितीला योग्य व आंखून दिलेल्याच कायद्याच्या मर्यादेंत ते स्वराज्याचे हक्क संपादतील. —व्या० १-८०

११७३

मागणी मागतांना जें मागतां तें मिळविण्याचा तुमचा निश्चय इतका दृढ असला पाहिजे कीं, तुमच्या **मागणीस** नाहीं म्हणणें अशक्य झालें पाहिजे. —व्या० १-१२०

११७४

राजहित व प्रजाहित या दोहोंमध्यें जें एक प्रकारचें विमार्गित्व आहे त्याचा गुणच असा आहे कीं, तें मोडण्यास सकृद्दर्शनीं मिळण्यास अशक्य अशाच **मागण्या** कराव्या लागतात. —के० १९०४-२३-४-४

११७५

**मागसलेला** कोण ! इंग्रजांपुढें आम्ही सारेच मागसलेले आहों. हा मागसलेला, हा पुढें गेलेला, हा बुद्धिभेद उराशीं बाळगाल तर देशाचें नुकसान कराल. ज्याच्याजवळ जें असेल तेंहि भारतमातेला अर्पण केलें पाहिजे. श्रीकृष्णांनीं करांगुलीवर पर्वत उचलला पण त्याला गवळ्यांनीं काठ्या लावल्या होत्या; परमेश्वर सर्व घडवून आणतो पण तुम्ही आपल्या काठ्या लावण्यास तयार असलें पाहिजे. —स्व० गी० १०

११७६

**मार्ग** व साधनें कदाचित् भिन्न असतील; पण त्यांबद्दल एकमेकांनीं एकमेकांचे मार्गांत आड येण्याचें कारण नाहीं. —के० १९०३-२०-५-३

११७७

**मॉंटेग्यु-चेम्सफर्ड** बिल स्वयंनिर्णयाच्या तत्त्वाला अनुसरून नसल्यानें त्याच्या बजावणीच्या कामीं आम्हांस सहानुभूति वाटत नसून सरकारला आमची संपूर्ण सहकारिता मिळणें शक्य नाहीं. —च० सु० ९९

११७८

काँग्रेसनेंच **मॉंटेग्यू-चेम्सफर्ड योजना** अपुरी व निराशाजनक आहे असा तिजवर शिक्का मारला आहे. अर्थातच हें बिल आमच्या मागणी-पेक्षां फारच कमी आहे; तथापि काँग्रेस ही संस्था पार्लमेंटचा अधिकार मानणारी आहे व पार्लमेंटनें बिल पास केल्यास तें मान्य करून त्याप्रमाणें वर्तन करणें प्राप्त आहे. —च० सु० ९९

११७९

आम्ही आपल्याला **मॉडरेशनिस्टस्** म्हटल्यानें सरकारच्या दृष्टीनें मॉडरेशनिस्टस् होत नसतों. —के० ले० २-९

११८०

कोणत्याहि विशिष्ट परिस्थितींत जगण्याला अवश्य लागणारे गुण व चालीरीति अभ्यासानें आपले अंगीं आणण्याचें सामर्थ्य व बुद्धि ईश्वरानें **माणसास** दिली आहे; व त्यामुळेंच त्याला सर्व चराचर सृष्टीचें स्वामित्व मिळालें आहे. —के० १९०३-२८-४-२

११८१

**मातृभूमि** म्हणजे केवळ ज्या देशांत आपण नुसते जन्मलों तो देश नव्हे, तर ज्या भूमींत आपलेपणानें वागण्याचा आपला हक्क आहे त्या भूमीचा बोध होत असतो. —के० १९१८-२७-४-२

११८२

बुद्धि, शहाणपण, धूर्तता व पोंच इत्यादि गुण ज्याप्रमाणें सर्वत्र आढळतात त्याचप्रमाणें **माथेफिरूपणा**हि सर्व देशांत सारखाच आढळण्यांत येतो. —के० १९००-१५-३-२

११८३

सत्कार्याची इच्छा हा सर्व **मानवजातीचा** सर्वसाधारण असा सद्गुण आहे; व म्हणूनच मानवजातींतला जन्म इतरांच्या जन्माहून अत्यंत मौल्यवान् समजला जातो. —के० १९०८-१० ४-२

११८४

**मानवस्वभावाची** ही एक साहजिक प्रवृत्ति आहे कीं, उद्योग न करितां थोड्याशा लबाडीनें जर आपणास एकदम कोठें लग्गा साधण्याचा संभव असला तर, नीतिमार्ग सोडून देऊन मनुष्यप्राणी कुनीतीनें सुद्धां तो लाग साधण्यास सिद्ध होतो. —के० १८९०-३४-२-३

११८५

आपल्या हातांतलि सत्ता जाऊं न देण्याची सरकारनें इच्छा बाळगणें हें पूर्णपणें **मानवी स्वभावास** अनुसरून आहे. पण प्रजेला निरंतर दास्यत्वांत राहणें न आवडणें हेंहि मानवीस्वभावास पूर्णपणें धरून आहे.

—व्या० १-११४

११८६

देशाची उन्नति करणें असेल तर अगोदर आत्मसंयमन करण्यास शिकून स्वतःची **मानसिक उन्नति** केली पाहिजे. —के० १८९२-१३-२-३

११८७

**माया** ही परमेश्वराचीच कांहीं तरी विलक्षण व अनादि लीला आहे हें अद्वैत वेदान्तासहि मान्य आहे. कारण, माया ही जरी इंद्रियांनीं उत्पन्न केलेला देखावा आहे, तरी इंद्रियें हीं परमेश्वराच्या सत्तेनेंच हें काम करीत असल्यामुळें माया ही अखेर परमेश्वराचीच लीला म्हणावी लागते. ही माया तत्वतः सत्य का मिथ्या एवढाच काय तो वाद आहे; आणि या बाबतींत ज्या नामरूपात्मक मायेनें अव्यक्त परमेश्वर व्यक्त मानिला जातो ती माया—मग तिला अलौकिक शक्ति म्हणा किंवा दुसरें कांहीं म्हणा—'अज्ञाना'नें उत्पन्न झालेली दिखाऊ वस्तु अगर 'मोह' असून, खरें परमेश्वरतत्त्व त्याहून निराळें आहे, असा अद्वैत वेदान्ताप्रमाणेंच गीतेचा सिद्धान्त आहे. —गी० ७२३

११८८

इष्ट हेतु चांगला असला तरी अत्युत्कंठेनें भलत्याच **मार्गाचें** अवलंबन केल्यानें मुख्य उद्देशाविषयींहि तिटकारा उत्पन्न होतो.

—के० १८९२-३४-३-३

११८९

सनातनधर्माचें रहस्य समजण्यास पूर्व व उत्तर **मीमांसांचें** यथासांग अध्ययन होणें जरूर आहे. —के० १९१७-४०-७-४

११९०

**खरा मुत्सद्दी** कोण तर स्वार्थापेक्षां स्वदेशप्रीति ज्याचे अंतःकरणांत अधिक आहे, ज्याची स्वराज्य वाढविण्याची उत्कट इच्छा आहे व संकट-परंपरा आली असतां, त्याशीं टक्कर देऊन साम्राज्यशकट अबाधित चाल-वावयाचा ज्याचा निश्चय आहे व ज्याचें मन उदात्त आहे तो होय.

—के० १९०५-१३-१

११९१

प्रसिद्धि आणि परिस्थिति यांच्या दरम्यान **मुद्रणस्वातंत्र्य** आहे.

—ख० १६२

११९२

**मुत्सद्दी** म्हटला म्हणजे त्याला क्षणभर तात्त्विक विचार एका बाजूस ठेवून व्यवहारदृष्ट्या साध्यासाध्यतेचा व शक्याशक्यतेचा विचार करावा लागतो. —के० १९०६-३८-४-३

११९३

**मुत्सद्दी** पंडित असावा लागत नाहीं व प्रत्येक पंडित मुत्सद्दी असतोच असेंहि नाहीं. —के० १९०७ २७-७-२

११९४

सुधारलेल्या विसाव्या शतकांत **मुत्सद्दी** लोक—विशेषतः करून परकीय राज्यकर्ते मुत्सद्दी—आपला हेतु उघडपणें लोकांस कळवीत नाहींत, होतां होईल तोंपर्यंत, तो शर्करावगुंठित करून प्रजेस चकवीत असतात.

—के० ले०२-५१७

११९५

दूरदर्शीपणा हा मुत्सद्यांच्या अंगचा मोठा गुण असल्यानें **मुत्सद्दी** लोक पुढची वेळ ओळखून तत्पूर्वींच आपल्या राष्ट्रास भावी संकटाशीं झुंजण्यासाठीं शास्त्रीयदृष्ट्या तयार ठेवण्याच्या उद्योगास लागत असतात.

—के० १९१८-१८-४-५

११९६

राजकारणांत **मुत्सद्दीगिरीचा** अवलंब करणें म्हणजे असत्याचा अवलंब करणें नव्हे. —के० १९२०-२-२-४

११९७

**मुत्सद्दीपणा** किंवा राज्यकारभार हा कांहीं नेहमीं उदात्त तत्त्वांच्या जोरावर चालत नसतो. —के० १९०६-३८-४-३

११९८

खरा **मुत्सद्दीपणा** म्हणजे अधिकारी वर्गाची सत्ता कमी करून त्यांतील कांहीं भाग तरी लोकांच्या हातांत देणें हाच होय.

—के० १९०७-२६-४-५

११९९

एका देशानें दुसऱ्या देशावर राज्य करण्यांत स्वार्थ हाच राज्यकर्त्यांचा प्रधान हेतु असतो; पण त्या स्वार्थाची धांव प्रजा क्षोभ न पावेल अशा बेतानें मर्यादित केलेली असणें यासच **मुत्सद्दीपणा** म्हणतात.

—के० १९०८-१९-४-४

१२००

वेदान्ती वेदान्ततत्त्वावर एखाद्याचा संसार चालविण्यास प्रवृत्त झाला असतां तरी त्याची फजिती होईल परंतु **मुत्सद्दीपणाचें** काम तात्त्विक

१२०२

भय पुढें उपस्थित होणार अशीं चिन्हें दिसूं लागल्याबरोबरच त्याच्या प्रतिकाराची तजवीज करावयास लागणें हेंच खरें **मुत्सद्दीपणाचें** लक्षण होय.

—के० १९१८-२७-४-१

१२०३

लोकांच्या टीकेनें चिडून जाऊन आपलाच अधिकार दृढ व चिरस्थायी करण्याच्या प्रयत्नास लागणें हें खऱ्या **मुत्सद्दीपणाचें** लक्षण नव्हे.

—के० १९१६-४५-४-४

१२०४

प्रजेस निराश करणें किंवा चिडविणें **मुत्सद्दीपणास** योग्य नाहीं.

—के० १९०७-२१-४-४

१२०५

युद्ध जुंपेपर्यंत **मुत्सद्द्यांचा** मान असतो, पण युद्ध जुंपल्यावर रणांगणावर बळी पडणाऱ्या शिपायास जो मान मिळतो तो गैरवाजवी असतो असें नाहीं. —के० १९०७-३८-४-३

१२०६

जेथें राजकीय पक्ष परकीय असतो व प्रजापक्ष जिंकलेल्या लोकांचा असतो अशा देशांमध्यें दोन्ही पक्षांचें हित साधूं पहाणाऱ्या **मुत्सद्द्याचें** काम फारच बिकट होतें. —के० १९०४-५१-५-३

१२०७

राष्ट्रीय प्रगतीच्या मार्गांत जर एखादी अडचण आली असेल तर तिचें अनेक दिशांनीं परीक्षण करून ती खरी असल्यास तिचें तितक्यापुरतें निवारण करणें किंवा ती आपल्या राष्ट्राच्या एकंदर प्रगतीस आड येणार नाहीं अशी तजवीज करणें हें **मुत्सद्द्याचें** खरें काम होय.

—के० १९०६-३८-४-३

१२०८

लोकांस संतुष्ट ठेवून राज्यकारभार सुरळीत चालविणें हेंच खऱ्या **मुत्सद्द्याचें** काम आहे. —के० १८९४-१७ ३-२

१२०९

देशांतील लोकांच्या सहज प्रकृतीला अनुसरूनच राज्यकारभाराचें सुकाणूं **मुत्सद्द्यांना** चालवावें लागतें. —के० १९०७-१०-५-१

१२१०

कुटिल **मुत्सद्द्या**मुळें राष्ट्राचा जरी फायदा झाल्यासारखें क्षणभर वाटलें तरी फायद्यापेक्षां हें राष्ट्राचें असंख्यपट नुकसान करीत असतात व राष्ट्राची खरी इभ्रत वाढविण्याच्या ऐवजीं राहूप्रमाणें ती ग्रासून टाकीत असतात.

—के० १९०३-३-४-५

१२११

राष्ट्रीय झटापटींत वेळोवेळीं जे अनेक प्रश्न उद्भवतात त्यांचा कार्य-कारणभाव व अंतर्गत उद्देश समजला पाहिजे; व ज्या **मुत्सद्द्याला** या गोष्टी चांगल्या समजतात तोच आपल्या राष्ट्राचें तारूं आजूबाजूच्या खडकावर आपटूं न देतां सुरळीतपणें उद्दिष्ट स्थळीं नेतो.

—के० १९०३-३१-४-४

१२१२

वेळ कसली बघतां ? चांगलेपणा हाच तिचा **मुहूर्त** आहे.

—धा० ४९

१२१३

राज्यकर्ते आणि प्रजा हा मुख्य भेद आहे, व त्याच्यापुढें हिंदुमुसलमानादि सर्व भेद रद्द होत. आज **मुसलमान** लोकांवर कांहीं इंग्रज फिदा होत असतील; पण इंग्रज लोकांचा हा अनुग्रह अगदीं कावेबाजपणाचा आहे, हें धूर्त मुसलमानांच्या लक्षांत आल्यावांचून राहणार नाहीं.

—के० ले० १-२७१

१२१४

सरकारी अंमलदार, **मुसलमान** लोकांस जी कधीं कधीं सवलत देतात ती भिऊन देत नाहींत, तर लोकांमधील दुफळी कायम रहावी या हेतूनें देत असतात. —के० ले० १-५७३

१२१५

**मुसलमानांचा** द्वेष करण्यांत आम्हाला कांहीं हांशील नाहीं. एका दावणींत बांधलेल्या मेंढरांनीं आपआपसांत दांडगाई केल्यानें उलट दोघांचेंहि नुकसान होतें. —चरि० ७४

१२१६

**मुसलमानांचा** पक्ष यथार्थ नाहीं. सर्व मशिदीपुढें, सर्वकाळीं, सर्व प्रकारचीं वाद्यें बंद ठेवलींच पाहिजेत, हें म्हणणें अगदीं चुकीचें असून त्यास कोणीहि समंजस मनुष्य आपली संमति देणार नाहीं. मशिदीपुढें वाद्यें बंद करण्याचा हक्क काय तो थोडाबहुत वहिवाटीवरूनच निष्पन्न होतो. —धा० ८४

१२१७

आमच्यापैकीं कांहीं मंडळी अशी आहे कीं, **मुसलमानांनीं** कांहींहि आगळिकी केल्या तरी भावी परिणामावर नजर ठेवून बंधुत्वाच्या नात्यानें आम्ही त्यांस आलिंगन द्यावें, आणि क्षमा व शांति हे ब्रह्मगुण प्रकट करावे असें ते प्रतिपादन करीत असतात. आजची स्थिति लक्षांत आणितां, हा पक्ष आम्हांस बिलकूल मान्य नाहीं. इतकेंच नाहीं तर सरकारानेंहि तो मान्य करितां कामा नये, अशी आमची समजूत आहे. —के० ले० १-२७५

१२१८

**मुसलमानांशीं** सलोखा करा, त्यांच्याशीं प्रीतीनें वागा; पण प्रीति दाखवावयाची म्हणजे गणपतीचा उत्सव सोडून द्यावयाचा असा अर्थ करण्याचें कांहीं प्रयोजन नाहीं. आपआपल्या धर्मानें वागून एकमेकांचा बहुमान ठेवितां येतो. —धा० ८३

१२१९

मुसलमानी अमदानींत धर्माची जी एक बाजू मोकळी होती त्या दिशेनेंच त्यावेळच्या थोर पुरुषांनीं धर्म आणि भाषा राखून **महाराष्ट्राचें** महाराष्ट्रपण कायम ठेवलें. —के० १९०६-२३-४-२

१२२०

लष्करी धोरणाची दूरदृष्टि, डावपेंचानें कार्य साधण्याची हाव व गनिमी काव्याची पद्धत यांचा जर राजपुतान्यांत उदय झाला असता तर **मुसलमानी बादशाहीची** दिल्लीस स्थापना होण्याची आशाच नको होती.
—के० १९०२-३१-४-४

१२२१

**मुसलमानी** लोकांची मनधरणी करण्यापासून भस्मासुरी प्रकार होतो.
—के० ले० १-४९१

१२२२

**मुंबई इलाख्यांत** ज्या वर्गाचे वांट्यास बुद्धि आलेली आहे त्याच वर्गाचे वांट्यास निर्धनताहि आलेली आहे. —के० १९००-४१-३-१

१२२३

**मूर्तिपूजा** कित्येकांस जरी हीन वाटत असली तरी ज्या कल्पना बाह्येंद्रियांस अगोचर असतात त्या सामान्य लोकांस विशद करून दाखविण्यास प्रतिमेसारखें दुसरें साधनच नाहीं, असें म्हटलें तरी चालेल.
—के० ले० १-६५५

१२२४

ईश्वराच्या सर्वव्यापी स्वरूपाची मूर्ति ही प्रतिनिधि आहे. **मूर्तिपूजेंत** कांहीं सूचक चिन्हेंहि आहेत. जुन्या पैशावरील तराजू हें जसें ईस्ट इंडिया कंपनीचें चिन्ह आहे, तसेंच विष्णूच्या हातांत चक्र ठेविलें आहे तेंहि त्याच्या हातांत कालचक्र फिरत आहे त्याचें दर्शक आहे. —धा० २०६

१२२५

**मूर्तीच्या** ठायीं परमेश्वराची भावना न ठेवतां मूर्ति म्हणजे केवळ कांहीं विशिष्ट प्रकारच्या आकाराची माती, दगड अगर धातु समजून तिची कोणी पूजा करीत नाहीं; आणि केली तर त्याला मातीची किंवा दगडाचीच गति प्राप्त होईल हें निर्विवाद आहे. प्रतीक आणि प्रतिकांत ठेवलेला भाव यांचा याप्रमाणें भेद केल्यावर प्रतीक कोणतेंहि असलें तरी त्याबद्दल तंटा करण्याचें कारण नाहीं. —धा० १५४

१२२६

मृत्यूस भितां ? व त्यानें कोणास गांठलें म्हणून दुःख करितां ? माझेबद्दल मी तुम्हांस सांगतों कीं, **मृत्यु** जरी मजकडे आला तरी मी त्याला माझें काम संपेतोंपर्यंत बाहेर जाण्यास सांगेन ! —आ० आ० १-२५९

१२२७

'जातस्यहि ध्रुवो **मृत्युः**' या सिद्धान्ताप्रमाणें पाहिलें तर, मनुष्यमात्र जन्मल्यापासूनच मृत्युवश होण्यास पात्र होतो, हें जरी तात्त्विकदृष्ट्या खरें आहे, तरी या सत्य वचनाचा आधार घेऊन रांगत्या खेळत्या मुलाच्या संसार-यात्रेचा विचार अगर व्यवस्था न करितां त्याचे डोक्यावर मृत्युसंकट आज येऊन ठेपलें आहे अशा बुद्धीनें मनुष्य निर्वाणीच्या गोष्टी बोलूं लागेल अगर संसारयात्रेच्या व्यवस्थेच्याऐवजीं त्याच्या स्मशानयात्रेचीच तयारी करूं लागेल तर तें हास्यास्पदच व्हावयाचें ! —के० १९०५-१४-४-५

१२२८

ज्या सूक्ष्म बीजामध्यें प्रचंड वृक्ष उत्पन्न करण्याचें सामर्थ्य असतें त्याच बीजांत त्या वृक्षाचा नाश करणारा **मृत्युहि** वृक्षाच्या उत्पत्तीबरोबरच उत्पन्न झालेला असतो. —के० १९०८-२२-४-३

१२२९

**मृत्यु** संसाराचा ओघ बदलीत नाहीं; किंवा संसार नाहींसाहि करीत नाहीं; संसाराचा दर्प हरण करण्याचें काम मृत्यूकडे आहे.

—के० १९०८-२२-४-३

१२३०

मोफत शिक्षण देणें हें जसें सरकारचें कर्तव्य आहे तसेंच **मोफत वाचनालयें** स्थापणें हेंहि सरकारचें कर्तव्य आहे.

—के० १९१७-३८-७-१

१२३१

मनुष्याची आध्यात्मिक पूर्णावस्थाच सर्व नीतीच्या नियमांचा मूळ झरा असून यालाच वेदान्तांत **'मोक्ष'** असें म्हणतात. —गी० ४८६

१२३२

क्षणभर परमेश्वरानें मला साक्षात् **मोक्ष** देतो म्हणून म्हटलें तरी, तो मी झिडकारून त्यास म्हणेन कीं, प्रथम पारतंत्र्यांतून सुटलेला माझा देश मला पहावयाचा आहे. कारण वैयक्तिक मोक्ष झाला तरी तो उच्च कोटीचा पण पराकाष्ठेचा स्वार्थसाधूपणाच आहे !! —आ० आ० २-४४५

१२३३

आत्म्याची **मोक्षप्राप्ति** हें प्रत्येक हिंदूचें आदिकर्तव्य आहे; इतर कर्तव्यें मोक्षानुकूल हवींत, प्रतिकूल नकोत. —के० १९०२-३-२-३

१२३४

ज्ञानयज्ञाचा परिणाम कर्मभूमींत तात्काल दृष्टीस पडत नाहीं; द्रव्य-यज्ञाचा परिणाम बराच होतो; पण शरीरयज्ञासारखा तात्काळ फलदायक दुसरा **यज्ञ** कर्मलोकाकरितां सांगितलेला नाहीं. —के० १९०८-२३-४-४

१२३५

प्रत्यक्ष पशु मारण्यापेक्षां प्रत्येकाच्या शरिरांत ज्या पशुवृत्ति आहेत त्यांचा साम्यबुद्धिरूप संयमाग्नींत होम करणें हा **यज्ञ** अधिक श्रेयस्कर होय. आपली ममत्वबुद्धि सोडणें हेंच यज्ञांतील मुख्य तत्त्व होय. —धा० १६४

१२३६

मनुष्याचीं इंद्रियें त्याला पशूप्रमाणें वागण्यास सांगत असतात आणि त्याची बुद्धि त्याला उलट खेंचीत असत्ये. या कलहाग्नींत देहांत संचार करणाऱ्या पशुत्वाचा **यज्ञ** करून जे कृतकृत्य होतात तेच खरे याज्ञिक व धन्य होत ! —गी० ७१

१२३७

वेदांत अमुक अमुक कारणासाठीं यज्ञ करावे असें जरी सांगितलें तरी त्याला न भुलतां केवळ यष्टव्य म्हणजे **यज्ञ** आपल्याला कर्तव्य आहे म्हणून हे यज्ञ करावे, काम्य बुद्धि सोडावी, यज्ञ सोडूं नये व त्याचप्रमाणें इतर कर्मेंहि करावीं हें गीतेच्या उपदेशाचें सार आहे. —गी० ६३०

१२३८

इतिहासदृष्ट्या पाहिलें तर इंद्र, वरुण वगैरे देवतोद्देशानें जे द्रव्यमय यज्ञ श्रौतग्रंथांत सांगितले आहेत ते मागें पडत जाऊन, पातंजलयोगानें, संन्यासानें किंवा आध्यात्मिक ज्ञानानें परमेश्वरप्राप्ति करून घेण्याचे मार्ग जेव्हां अधिकाधिक प्रचारांत येऊं लागले, तेव्हां **यज्ञ** शब्दाचा अर्थ विस्तृत करून त्यांतच सर्व मोक्षोपायांचा लक्षणेनें समावेश करण्यास सुरुवात झाली असावी असें दिसून येतें. पूर्वीं धर्मदृष्ट्या रूढ झालेले शब्दच पुढील धर्ममार्गास लावावयाचे हें यांतील बीज होय. —गी० ६७७

१२३९

ज्यांत आपला कांहीं स्वार्थ नाहीं असें कर्म शुद्ध बुद्धीनें केल्यास तो **यज्ञच** होतो. —गी० २९१

१२४०

आमच्या धर्मांतील **यज्ञयाग**, श्रौतस्मार्त कर्में वगैरे एक (Old Testament) जुन्या करारासारखेंच आहे. पुढें उपनिषदें, अद्वैतवाद वगैरे जरी झाले तरी वरील तत्त्वें धर्मांत कायमच राहिलीं, व जुन्या कराराशिवाय जसा नवा करार चालत नाहीं तसेंच हें आहे. —आ० ४२३

१२४१

द्रव्यमय **यज्ञा**पासून प्रारंभ होऊन त्याची परिसमाप्ति ज्ञानमय यज्ञांत व्हावी हेंच वैदिक धर्मांत मनुष्याचें इतिकर्तव्य मानलें जातें.

—के० १९१७-४०-७-४

१२४२

ब्राह्मणांचें **यज्ञोपवीत** किंवा जानवें हें हल्लीं जरी सूत झालें आहे तरी फार प्राचीन कालीं हें उपवीत म्हणजे विणलेलें वस्त्र होतें व तें ज्याचा तो विणीत असे. —के० १९०५-४५-४-३

१२४३

सुखदुःखांचा त्याग न करितां, समबुद्धीनें तीं सोसणें हेंच **युक्तपणाचें** खरें लक्षण होय. —गी० ६९१

१२४४

ज्या ठिकाणीं **युक्ति** व शक्ति एकच झालीं तेथें ऋद्धिसिद्धि निश्चित वास करितात, नुसत्या शक्तीनें अगर युक्तीनें नेहमीं काम भागत नाहीं.

—गी० ८५३

१२४५

हल्लींच्या **युनिव्हर्सिट्या** म्हणजे कनिष्ठ प्रतीच्या सरकारी नोकऱ्यांकरितां लागणारे उमेदवार तयार करणाऱ्या टांकसाळी किंवा हमालखाने होत.

—के० १९०२-३३-४-४

१२४६

हिंदुस्थानांत **युनिव्हर्सिट्या** आहेत; परंतु त्यांना विश्वविद्यालय म्हणण्यापेक्षां परीक्षायंत्रें किंवा मुलांना पढतमूर्ख आणि निःसत्त्व करण्याचे चरक म्हटलें असतां अधिक शोभेल.

—के० १९००-२-२-५

१२४७

युरोपांतील **युनिव्हर्सिट्या** हिंदुस्थानांतील युनिव्हर्सिट्यांप्रमाणें परीक्षा घेणाऱ्या व डिग्रया देणाऱ्या कंपन्या नसून निरनिराळ्या विषयांत पूर्णपणें निष्णात माणसें निर्माण करणारीं विद्यापीठें आहेत.

—के० १९०१-९-३-२

१२४८

हल्लीं चालू असलेल्या **युनिव्हर्सिटीच्या** शिक्षणांत अनेक प्रकारचे फेरफार व्हावयास पाहिजेत, ते असे कीं जेणेंकरून युनिव्हर्सिट्या म्हणजे खरोखरींच विद्वत्तेचीं किंवा विद्वानांचीं माहेरघरें होतील.

—के० १९०२-३३-४-३

१२४९

**युरोपखंडांत** धर्म आणि तत्त्वज्ञान यांची ताडातोड झाल्यामुळें एक पोकळ व दुसरें अकिंचित्कर झालें आहे; तसा प्रकार हिंदुधर्मासंबंधानें नाहीं.

—के० १८९३-१२-२-५

१२५०

बाणासुराला ज्याप्रमाणें आपल्या एकवीस बाहूंचें वजन असह्य झालें व बरोबरीच्या वीरांशीं लढून बाहूंची फाजिल शक्ति नाहींशी करण्याची संधि यावी म्हणून ज्याप्रमाणें त्यास परमेश्वराची आराधना करावी लागली तशासारखींच कांहीं तरी तोड या लष्करी चढाओढींतून मुक्त होण्याकरितां या **युरोपियन राष्ट्रांस** योजणें भाग आहे.

—के० ले० २-३३१

१२५१

पृथ्वीचा जेवढा भाग जबरीनें, युक्तीनें किंवा दुसऱ्या कोणत्याहि उपायानें हस्तगत करून घेतां येईल तितका घेण्यास आपणांस ईश्वरदत्त हक्क आहे अशी **सर्व युरोपियन राष्ट्रांची** समजूत झालेली दिसते.

—के० १९०३-२६-४-५

१२५२

कर्मांचें पाप न लागतां कर्में करण्याची समत्वबुद्धिरूप जी विशेष युक्ति तिचेंच नांव 'कौशल' असून, या कौशल्यानें म्हणजे युक्तीनें कर्में करणें यासच गीतेंत **योग** म्हटलें आहे. —गी० ५८

१२५३

भगवान् एकान्तीं योगाभ्यास करण्यास सांगतात म्हणून जगाचे सर्व व्यवहार सोडून **योगाभ्यासांतच** सर्व आयुष्य घालविणें हें गीतेचें तात्पर्य असा अर्थ समजावयाचा नाहीं. —गी० २८०

१२५४

**योद्धयाचे** प्रधानगुण ऐत्यावेळीं पैशाच्या किंवा वैभवाच्या लालुचीनें बाजारांत मिळण्याजोगे नाहींत. —के० १९०२-२४-४-४

१२५५

लोककल्याणार्थ झटणाऱ्या पुरुषाचा **योगक्षेम** कधीं अडून राहिला आहे असें या जगांत आढळून येत नाहीं. परार्थ करण्यास मात्र त्यानें निष्कामबुद्धीनें तयार असलें पाहिजे. —गी० ३८३

१२५६

कर्मठ, शूर, मनोदुर्बल, अदूरदर्शी पण एकंदरीनें भोळा किंबहुना भंपक अशा तऱ्हेचा **रघुनाथराव** हा पेशवाईच्या वेळच्या मनुष्यस्वभावाचें एक विचित्र चित्रच होय. —के० १९०१-३०-२-५

१२५७

या हतभागी देशाची विपन्न स्थिति पाहून रोजचें **राजकारण** टाकून दुसऱ्या उद्योगास लागणें म्हणजे कुरुक्षेत्रावरील अर्जुनाच्या मनोदौर्बल्याचें अनुकरण करणेंच होय. —आ० आ० १-२२८

१२५८

ज्योतिषामध्यें जसे योग असतात तसे इतिहासांत--**राजकारणांतहि** योग असतात. —ज० ४६

१२५९

मी **राजकारणांत** पडलों नसतों तर मला दुसऱ्याचें मन दुखविण्याचा प्रसंग आला नसता,—मी अजातशत्रु बनलों असतों.

—आ० आ० १-१२७

१२६०

**राजकारणांत** पडलेले लोक एवढ्या—तेवढ्यानें संतुष्ट होऊन स्वस्थ बसूं लागले तर त्यांचा नाश झालाच म्हणून समजावें.

—के० १९२०-२-२-४

१२६१

**राजकारणांत** व्यावहारिक रीतीनें वागा. —व्या० २-११८

१२६२

**राजकारणांतील** संयोग वा वियोग यांचा 'यथा काष्ठं च काष्ठं च समेयातां महोदधौ। समेत्य च व्यपेयातां तद्वद्भूतसमागमः।' या श्लोकांत वर्णन केलेल्या वेदान्तदृष्टीनेंच कर्मयोग्यांनीं विचार केला पाहिजे.

—के० १९२०-४-४

## १२६३

आम्हांस ज्या गोष्टी बऱ्यावाईट वाटतात त्याबद्दल बरें-वाईट म्हणण्याचा आमचा हक्क आम्ही न बजावला तर आमची **राजकीय उन्नति** होण्याची आशा कधींहि बाळगावयास नको. —के० १९००-१८-२-५

## १२६४

आकाशांतील ग्रहाप्रमाणें राजकीय अंतरिक्षांतील ग्रहांची उच्चनीच दशा होणें ही आमच्या ताब्यांतली गोष्ट नव्हे. पण एवढ्याकरितां ज्योतिषशास्त्रांतील ग्रहस्थितीचा फलविचार करण्याचें ज्याप्रमाणें आम्ही सोडून [illegible]

१२६९

प्रबल व दुर्बल यांची स्पर्धा लागली असतां, बलिष्ठानें आपल्या पोळी-चरच सगळें तूप ओढून घ्यावें, हा जगाचे आरंभापासून प्रकार चालत आला आहे व तो खासगी व्यवहारांत व **राजकीय बाबतींत** सारखाच दृष्टोत्पत्तीस येतो. —के० १९०३-२२-५-१

१२७०

कृतज्ञता या शब्दाचा **राजकीय** बाबतींतील अर्थच मुळीं असा आहे कीं, नव्या उपकाराच्या अपेक्षाबुद्धीनें पूर्वींच्या उपकाराची आठवण करणें. —के० १९०३-१३-४-५

१२७१

कोणतेंहि सरकार आपल्या प्रजेस **राजकीय हक्क** अडल्याखेरीज कृपेनें देत नाहीं. —के० १९०७-५०-५-१

१२७२

**राजद्रोह** या शब्दाचा खरा अर्थ म्हटला म्हणजे राजाचा द्रोह, अर्थात् राजाचा पाडाव करून त्याचा अधिकार किंवा सत्ता नष्ट करण्याची बुद्धि, हा होय. —के० १९०६-८-४-२

१२७३

१२७६

एखाद्या ठिकाणची राज्यव्यवस्था अन्यायाची असली तर ती सुधारण्याचा प्रयत्न करणें हा कांहीं न्यायदृष्ट्या **राजद्रोह** होऊं शकत नाहीं.

—गां० १३

१२७७

दुसऱ्या कोणत्याहि गोष्टीचा विचार न करितां, फक्त भाषेच्या प्रयोगांत **राजद्रोह** असूं शकतो, ही जी समजूत ती चुकीची आहे. —ख० १४८

१२७८

अव्यक्त राजसत्ता आणि व्यक्त अधिकारीवर्ग यांमध्यें भेद केला पाहिजे आणि व्यक्तावरील टीका अव्यक्ताच्या माथीं मारून पर्यायानें अशा प्रकारच्या टीकेस **राजद्रोहाचें** स्वरूप देणें इष्ट नाहीं.

—के० १९१६-४५-४-४

१२७९

आम्हांस ज्या कांहीं गोष्टी कर्तव्य आहेत त्या **राजद्रोहाच्या** नाहींत. त्या शब्दानें कशा व्यक्त करावयाच्या एवढ्याचबद्दल काय तो वाद आहे.

—के० ले० २-६

१२८०

राजा जर प्रजाद्रोह करीत असेल तर त्यास **राजद्रोहाबद्दल** कुरकुर करण्याचा कांहीं अधिकार नाहीं. —आ० आ० १-१८०

१२८१

आमच्या मनांतील तळमळ बोलून दाखविणें **राजद्रोहीपणाचें** समजलें जावें हें कांहीं राजनीतीचें सुलक्षण नाहीं. —व्या० १-६९

१२८२

बंड करण्याचा जोंपर्यंत कोणाचा इरादा नाहीं, तोंपर्यंत एखाद्याची भाषा कडक असली म्हणून त्यास **राजद्रोही** ठरविण्याचा कोणी प्रयत्न केल्यास त्यास माना डोलविणें घरबुडवेपणाचें लक्षण होय.

—के० ले० २-२०५

१२८३

जोंपर्यंत आम्ही तुमच्या—इंग्रजांच्या—इतिहासाची तारीफ करीत आहों, तोंपर्यंत तुम्ही इंग्रज खूष असतां; पण या इतिहासाचें अनुकरण आम्ही करूं लागतांच तुम्ही त्याला **राजद्रोही** म्हणतां. —ख० १८४

१२८४

हिंदुस्थान ही आमची मातृभूमि आणि देवता, हिंदुस्थानवासी हेंच आम्हां सर्वांचें बंधुत्वाचें नातें, आणि वस्तुस्थिति लक्षांत आणून आमची राजकीय व सामाजिक परिस्थिति सुधारण्याचा एकनिष्ठपणानें स्वार्थाकडे लक्ष न देतां सतत परिश्रम करणें हाच आमचा नूतन **राजधर्म**.

—धा० २०

१२८५

आम्ही हिंदुस्थानांतील गरीब प्रजेनें कितीहि **राजनिष्ठपणा** दाखविला तरी राज्यरक्षण करण्यास यापेक्षां अन्य उपायांची योजना केली पाहिजे असें आम्हांस निःशस्त्र केलेल्या राजकर्त्यांस वाटणें स्वाभाविकच आहे.

—के० ले० २-२२४

१२८६

राज्यपद्धतींतील दोष अधिकाऱ्यांच्या नजरेस आणणें हीच खरी **राजनिष्ठा** होय. —के० १९१७-४१-२-२

१२८७

एखाद्या नोकराप्रमाणें सरकारच्या प्रत्येक कृत्याला मान डोलवीत राहणें म्हणजे कांहीं खरी **राजनिष्ठा** नव्हे. —के० १९१७-४१-२-२

१२८८

खरी **राजनिष्ठा** आणि अन्याय सहन करण्याची बुद्धि हीं कधींच एकत्र होऊं शकत नाहींत. —के० ले० १-५०९

१२८९

**राजनीति** पहिल्यानें स्वार्थास ओळखते आणि मग तर्कशास्त्र तदनुकूल असेल तर त्याकडे वळते. —के० १९०६-१०-४-४

१२९०

जाति, धर्म, रीतरिवाज, देश इत्यादि दृष्टींनीं राज्यकर्ते आणि प्रजाजन यांचेमध्यें जेथें मोठा भेद असतो, व म्हणूनच परस्परांस परस्पर परकीय वाटतात, तेथें निरपेक्ष **राजनिष्ठा** अथवा निरपेक्ष प्रजावात्सल्य हीं सांपडणें बहुतेक अशक्यच आहे. —के० १९०५-१०-४-५

१२९१

**राजनीति** किंवा एका राष्ट्रानें दुसऱ्या राष्ट्रावर राज्य करण्याची पद्धत ही कांहीं औदार्याच्या किंवा परमार्थाच्या पायावर रचलेली नसते, हा एक स्वार्थाचा धंदा आहे; आणि तो चालवितांना जिंकलेल्या लोकांचीं मनें विशेष न दुखवितां अर्थात् आपला फायदा चिरस्थायी कसा होईल या गोष्टीकडे अवश्य लक्ष पुरवावें लागतें. —विश्व० १३

१२९२

जेणेंकरून आपल्या हिंदुस्थान देशाचा उत्कर्ष होईल तो मार्ग दाखविणारी **राजनीति** ही हिंदुस्थानची खरी राजनीति होय.

—के १९०३-३०-४-३

१२९३

**राजनीतिशास्त्र** आमचेइकडे प्राचीन काळापासून माहीत आहे; पण अलीकडे उत्क्रांतितत्त्वांचा फैलाव झाल्यापासून इतर समाजशास्त्रांप्रमाणें या राजनीति ऊर्फ पॉलिटिक्स या शास्त्राची मर्यादाहि व्यापक झाली आहे.

—के० १९०३-३०-४-३

१२९४

एक राष्ट्र दुसऱ्या राष्ट्राचें स्वातंत्र्य हरण करून त्यावर जेव्हां चरत असतें, तेव्हां चरणारा वर्ग अगर त्यांचे आप्त गांजलेल्या लोकांचीं दुःखें ऐकून केवळ परमार्थबुद्धीनें तीं दुःखें निवारण्याचा उद्योग करतील अशी आशा बाळगणें म्हणजे **राजनीतीचीं** तत्त्वें आपणास माहीत नाहींत अगर त्यांत आपण अनुभवलेले नाहीं अतएव फसतों, असें जगाच्या निदर्शनास आणून देणें होय. —के० १९०६-१०-४-३

१२९५

प्रत्येक राष्ट्राचा उत्कर्ष त्यांतील घटकावयव व्यक्तींच्या गुणधर्मांप्रमाणें होतो; व तो उत्कर्ष वाढविणाऱ्या उपायांचें दिग्दर्शन करणारें शास्त्र त्या राष्ट्राचें **राजनीतिशास्त्र** होय. —के० १९०३ ३०-४-३

१२९६

हिंदुस्थान सरकारच्या **राज्यनीतीचें** तत्त्व असें कांहीं विलक्षण आहे कीं, लोकांच्या संतोषानें, खुषीनें किंवा संमतीनें आपण राज्य चालवितों असें जरी बाह्यात्कारी दाखविण्यांत येतें, तरी एकंदर व्यवस्था अशी असते कीं, लोक नाखुष असले तरीहि राज्याच्या सुरक्षितपणास काडीइतका देखील धक्का येऊं नये. —के० १९०२-११-४-३

१२९७

लोकांमध्यें सलोखा राखणें व एकमेकांतील प्रेमभाव वाढवणें हेंच खऱ्या **राजनीतीचें** बीज होय. —के० १८९४-३९-३-१

१२९८

सामान्य मनुष्यस्वभाव व प्रत्येक राष्ट्राचे विशिष्ट गुणधर्म यांना अनुसरून त्या राष्ट्राचा उत्कर्ष कसा होईल हें ठरविणें व तत्प्रीत्यर्थ उपाय योजणें हें त्या त्या राष्ट्राच्या **राजनीतीचें** धोरण असलें पाहिजे.

—के० १९०३-३०-४-३

१२९९

चित्तांत एक आणावयाचें, वाणीनें दुसरें बोलावयाचें व कृतीनें तिसरेंच करावयाचें हें अर्वाचीन युरोपियन मुत्सद्दी पुरुषांच्या **राजनीतीचें** आदितत्त्वच झालें आहे. —के० १९०४-३२-५-३

१३००

गुणांकडे लक्ष देऊन निरनिराळ्या जातींस एके ठिकाणीं वागविणें, मुख्य सरकारी सत्ता कायम ठेवून हाताखालील सरदारांस वरचढ होऊं न देणें अथवा राज्याचे सर्व अवयव एकत्र राहून जुटीनें काम करतील अशी व्यवस्था ठेवणें या **राजनीतीच्या** गोष्टी आहेत.

—के० १९००-२५-२-५

१३०१

**राजनीतीच्या** तत्त्वांची ज्यास यत्किंचित्‌हि ओळख आहे, त्यास दरबारी भाषेंत व कृतींत किती अंतर असतें हें समजणें कठीण नाहीं.

—के० १९०२-७-४-४

१३०२

इंग्रज लोक हिंदुस्थानांतून आपखुषीनें निघून जातील असें मानणें म्हणजे **राजनीतीच्या** मूलतत्त्वाचें अज्ञान दाखविणें होय.

—के० १९०३-३१-४-५

१३०३

**राजनीतींत** परोपकारबुद्धीपेक्षां स्वार्थाचेंच प्राबल्य अधिक असतें.

—के० १९०८-६-४-१

१३०४

**राजभक्ति** हा सद्गुण आहे खरा; परंतु तिचा तारतम्याचा अभाव व स्वाभिमानशून्यता यांशीं संयोग झाल्यास ती हास्यास्पद होते.

—के० १९०२-२३-५-२

१३०५

**राजसत्ता** ही बहुतेक अशाश्वत आहे; आणि केव्हांना केव्हां तरी ती सत्ता अथवा त्यांतील पुष्कळ भाग राजाकडून प्रजेकडे जातो हा नियम नैसर्गिक आहे.

—के० १९०५-५-४-४

१३०६

राष्ट्रांत जागृति उत्पन्न करण्याचें काम किंवा राष्ट्रांतील प्रत्येक व्यक्तीस विलक्षण गति देऊन त्यापासून राष्ट्रोन्नति घडवून आणण्याचा उद्योग **राजसत्तेनेंच** केला पाहिजे.

—के० १९०५-५१-४-३

१३०७

केवळ अधिकाराच्या व सत्तेच्या जोरावर साधुवृत्तीच्या तरुणांना सत्कर्माकरितां कैदखाना दाखविणें जगांतील कोणच्याहि अत्यंत बलाढ्य **राजसत्तेला** इष्ट होत नसतें.

—के० १९०८-२३-४-४

१३०८

**बदमाष** व बलिष्ट शेजारी असला म्हणजे घरच्या शांततेस ज्याप्रमाणें नेहमीं धोका असतो, त्याप्रमाणें बरोबरीची व अधिक महत्त्वाकांक्षी राजसत्ता शेजारीं आली असतां प्रजेशीं बेपर्वाईनें वागणाऱ्या **राजसत्तेला** विलक्षण काळजी उत्पन्न झाल्यावांचून रहात नाहीं.

—के० १९०२-१९-४-४

१३०९

**राजा** ही संस्था लोकांनीं आपण होऊन काढलेली असो, ऐतिहासिकरीत्या कुटुंबव्यवस्थेपासून क्रमानें ती वाढत आलेली असो अथवा दुसऱ्या कोणत्या तरी कारणांनीं उपस्थित झालेली असो, ती लोकांच्या [illegible]

१३१५

राज्याची उलथापालथ करण्याची शक्ति ज्यांचे अंगांत आहे अशा पुरुषांवर **राजाची** वक्रदृष्टि असावयाचीच. —के० १९०७-२०-४-४

१३१६

लोकांचें हित हेंच राजाचें हित असलें पाहिजे, लोकांचें हित पायाखालीं तुडवील तो **राजाहि** नव्हे व जे तसे तुडवून देतील ती प्रजाहि नव्हे. लोकहिताच्या कामीं कोणीहि आड येतां उपयोगी नाहीं. आडवें आलें म्हणजे कापून काढावें लागतें. -आ० आ० १-१३५

१३१७

ज्याप्रमाणें प्रजेचे धर्म आहेत त्याप्रमाणें राजाचेहि **धर्म** आहेत. प्रजा म्हणजे कांहीं राजाचे गुलाम नव्हेत, किंवा राजा म्हणजेहि अंमल चालविणारा राक्षस नव्हे. **राजा** व प्रजा यांमध्यें जेव्हां एक प्रकारची एकी असते तेव्हां राज्यकारभार सुरळीत चालतो. —स्व० मो० (४) ७०

१३१८

रोज नवरेपणा म्हणून गाजविल्यानें ज्याप्रमाणें दंपत्यांतील स्नेह वाढत नाहीं, तो वाढण्यास खरोखरच प्रेमाचा अंकुर फुटला पाहिजे, तद्वत्‌च **राजा** व प्रजा यांचेमधील संबंध होय. —के० १९०३-१-५-३

१३१९

प्रजा सुजाण झाली असतां **राजाचा अधिकार** मर्यादित असावा लागतो. —के० १९१५-४७-६-२

१३२०

**राजाची** नोकरी करण्यांत प्रजेशीं बेइमानपणा केलाच पाहिजे असें नाहीं. —के० ले० २-५८७

१३२१

सुखानें व चैनीनें कालक्रमणा केलेले **राजे** थोडे झाले आहेत असें नाहीं; पण नल-राम-युधिष्ठिरांप्रमाणें त्यांची महती कोणी गात नाहीं व गाणारहि नाहीं. —के० १९०५-२०-४-३

१३२२

**राजाचें** पाप राष्ट्राला भोंवतें. —व्या० १-७३

१३२३

ज्याप्रमाणें चालीरीति व आचार यांना राजेलोकांपासूनच स्थिति येते, त्याप्रमाणेंच **राजाश्रया**विरहित तर्कशास्त्र देखील लुलें पडतें.
—के० १९०२-३८-५-१

१३२४

एका देशानें दुसऱ्या देशावर **राज्य** करावयाचें तें कांहीं परमार्थाकरितां नाहीं, स्वार्थाकरितां आहे; हें तत्त्व आतां आमच्या पुढाऱ्यांच्या नजरेस अधिकाधिक येऊं लागलें. —विश्व० १०

१३२५

तुम्हांला हें **राज्य** चांगलें वाटत असेल तर माझें कांहींच म्हणणें नाहीं. गुरांना गोठाच आवडत असेल तर त्याला यजमान तरी काय करील!
—स्व० गी० १७

१३२६

कोणताहि देश दुसऱ्यावर **राज्य** करतो तें कांहीं परमार्थाकरितां करीत नाहीं. —के० १९०६-२८-४-३

१३२७

निश्चय कृतींत उतरत चालला अशी जेव्हां **राज्यकर्त्यांची** खात्री होते तेव्हांच ते प्रजेच्या म्हणण्यास मान देतात. —के० १९०५-३७-५-२

१३२८

प्रजेस ममतेनें वागविणें, संकटसमयीं त्यांस मदत करणें, त्यांच्या व्यापाराची व उद्योगधंद्याची अवनति झाली असल्यास ती जेणेंकरून भरून येईल असे उपाय अमलांत आणणें, परराष्ट्रांतील व्यापारी लोकांच्या मोहिमेपासून त्यांचें संरक्षण करणें व त्यांस योग्य हक्क देऊन स्वतःचें संरक्षण करण्यास समर्थ करणें हें शहाण्या व दूरदर्शी **राज्यकर्त्यांचें** कर्तव्य होय. —के० १९०३-१-५-३

१३२९

हुषारी किंवा कर्तृत्व यांखेरीज लोकांची सहानुभूति व त्यांच्या उत्कर्षाबद्दल खरी कळकळ हे गुणहि **राज्यकर्त्यांचे** अंगीं असावे लागतात.

—के० १९०२-२३-४-५

१३३०

एकदां मुनीम दुकान बळकावून बसला म्हणजे तो पहिल्यानें मालकालाच चार गोष्टी सांगायला लागतो. मग म्हणतो हिशेब तयार नाहींत. अगदींच निकरावर आलें तर सांगतो कीं, 'जा, फिर्याद करा'. हा नित्याचा व्यवहार आहे. मग तोच [illegible]

१३३५

**राज्यपद्धतीच्या** बऱ्यावाईटपणाची कसोटी केवळ सद्धेतूवर नसून प्रजेविषयीं आत्मीयभाव किंवा आपलेपणा राज्यकर्त्यांस कितपत वाटत आहे यावर अवलंबून आहे. —के० १९०३-३८-५-४

१३३६

आज देशांतील सर्व व्यापार, शौर्य, कर्तबगारी हीं सारीं इंग्रजांकडे गेलीं आहेत. व्यापार बुडाला, विद्या बुडाली, क्षत्रियांचा वर्गहि बुडाला! तुमच्या मुलांनीं कोठें जावें, कोठें न जावें हेंहि तुमच्या हातांत राहिलें नाहीं! मग आतां तुमच्या हातची सत्ता जायची जायची ती काय राहिली? तुरुंगाबाहेर ठेवून कैद्यांप्रमाणें कसें वागवावयाचें ही हल्लींची **राज्यपद्धति** आहे. बोलावें तर राजद्रोह होतो. सर्व देशाला एक प्रकारें कैदेंत कोण ठेवतो? सरकार. आम्हीं बादशहाची प्रजा झालों म्हणून काय या नोकरांचें कैदी व्हावें? —स्व० मो० (४) १०३

१३३७

एकदां दिलेले अधिकार विनाकारण परत घेण्याचा अधिकार कोणाच्याहि हातांत असणें व विशेषत: एखाद्या विशिष्ट अधिकाऱ्याच्या हातांत असणें हें चांगल्या **राज्यपद्धतीचें** लक्षण नव्हे.

—के० १८९३-३-२-५

१३३८

उत्तम पण सर्वस्वीं परकी राज्यपद्धतीपासून सुद्धां जर इकडील लोकांचें सांपत्तिकदृष्ट्या कल्याण होणें शक्य नाहीं, तर ज्यांत मोठमोठाले दोष ढळढळीत दिसून येण्यासारखे आहेत अशा **राज्यपद्धतीनें** हिंदुस्थानच्या लोकांची सांपत्तिक स्थिति एकसारखी खालावत जावी यांत काय नवल आहे? —के० १९०२-४२-४-४

१३३९

ज्यांच्यापासून पैसे घ्यावयाचे व ज्यांच्या जिवाकरितां म्हणून ते खर्च करावयाचे, त्यांचें ते खर्च करण्याच्या कामीं मत घेऊं नये ही अन्यायाची, जुलमाची आणि बऱ्याच अंशीं चांगल्या **राज्यपद्धतीस** घातक रीत आहे. —के० १८९३-६-३-१

१३४०

शेतकरी, व्यापारी **व** कारखानदार या सर्वांचें जीवन **राज्यपद्धतीवर** अवलंबून असतें. —के० १९०६-११-४-३

१३४१

लोकांचा ज्या राज्यव्यवस्थेंत हिताहितसंबंध नाहीं, किंवा नोकरीपेक्षां अन्य रीतीनें संबंध रहात नाहीं, ती **राज्यव्यवस्था** शाश्वत टिकणारी नव्हे. —के० ले० २-५४९

१३४२

लोकांच्या सल्ल्यानें जी **राज्यव्यवस्था** चालते तीच त्यांस हितावह आणि प्रिय असते. —के० १९१५-४७-६-२

१३४३

देशाची स्थिति सुधारण्यास त्यांतील **राज्यव्यवस्था** सुधारणें हेंच मुख्य साधन होय. —के० १८९३-८-२-५

१३४४

जसे लोक त्याचप्रमाणें त्यांचे पुढारी व कार्यकर्ते; व त्याच मानानें त्यांच्या देशांतील **राज्यव्यवस्था.** —के० १८९२-५०-३-१

१३४५

पौर्वात्य दृष्टीनें पाहिलें असतां **राज्याधिरोहणसमारंभ** हा क्षात्रतेज व ब्रह्मतेज यांचा मिलाफ करण्याचा एक विधि आहे.

—के० १९०२-३२-४-४

१३४६

**राज्याचा** सुरक्षितपणा आणि सरकारबद्दलचा पूज्यभाव या दोन गोष्टी अगदीं स्वतंत्र आहेत. —के० १९०६-८-४-३

१३४७

[illegible] हिशागांत गोड व मजक असे कायदे आणि बोलण्यांत

१३४८

मनुष्यमात्रास ज्याप्रमाणें मृत्यु त्याप्रमाणें कोणत्याहि राष्ट्रांतील **राज्यास** नाश हा केव्हांना केव्हां तरी यावयाचाच. —के० १९०५-१४-४-४

१३४९

आपापसांत भांडणें व दुही हीं चाललीं असतांना परक्यांशीं संबंध येण्याबरोबर जे लोक एक होऊं शकतात ते लोक **राष्ट्र** या संज्ञेस योग्य होत.
—के० १९०८-१८-४-४

१३५०

आपलीं भिन्न भिन्न मतें सोडून लोक एक होतात तेव्हां त्यास **राष्ट्र** म्हणतात. —के० १९०८-१८-२-५

१३५१

कोंडलेली हवा व अडविलेलें पाणी जशीं नासतात तसेंच वाढ खुंटलेलें **राष्ट्र** लवकरच आळशी, चैनी व नामर्द होऊन लयास जातें.
—के० १९०३-३१-४-५

१३५२

आपल्या अंगीं सामर्थ्य आहे, आपण जिवंत आहों, व जगांत नांव राहण्यासारखें आपण कांहींतरी खास करूं अशी ज्याची पूर्ण व दृढ श्रद्धा असेल तोच पुरुष जगांत एखादें मोठें कृत्य करूं शकतो; व अशा श्रद्धेची पुष्कळ माणसें ज्या राष्ट्रांत निपजतात तेंच **राष्ट्र** अभ्युदयास येतें.
—के० १९०३-३७-४-३

१३५३

राष्ट्रीय उत्कर्षास जरूर लागणारें शौर्य, धाडस, काटकपणा, बुद्धि व समयसूचकता हे गुण उत्पन्न करणारी परिस्थिति ज्या लोकांचे वांट्यास येते तेंच **राष्ट्र** अभ्युदय पावतें. —के० १९०३-२८-४-३

१३५४

व्यक्ति जातील; पण **राष्ट्र** कायमचें राहावयाचें आहे; आणि हें त्याचें कायम राहणें जेणेंकरून अधिकाधिक सुखावह होईल तो प्रयत्न करणें हें प्रत्येक पिढींतील लोकांचें कर्तव्य आहे. —के० १९१६-४५-४-५

१३५५

ज्या लोकसमुदायांत एकप्रकारचा धार्मिक, सामाजिक किंवा राजकीय आपलेपणा भरलेला नाहीं, ज्याचे घटकावयव सामान्य बंधनांनीं एकत्र बांधलेले नाहींत, अथवा ज्यांच्या अंगांत इतर समुदायांहून भिन्न अशा प्रकारचें वैशिष्ट्य वास करीत नाहीं. ते लोक किंवा त्यांचा समुदाय कधींहि **राष्ट्र** या संज्ञेस पात्र होत नाहीं. —के० १९०१-४९-२-४

१३५६

कोणतेंहि **राष्ट्र** किंवा लोकसमाज यंत्राप्रमाणें पाहिजे तेव्हां मोडून नवा बनवितां येत नाहीं. —के० १९०३-३०-४-३

१३५७

**राष्ट्र** जिवंत असलें म्हणजे कर्त्या पुरुषांची परंपरा कमीअधिक जोरानें अव्याहत चालत असते. —के० १९०२-१६-४-५

१३५८

कोठेंहि व कोणत्याहि व्यक्तीसंबंधानें अन्याय होवो, त्याबद्दल आपलें मत आधीं स्पष्टपणें कळविण्याइतकी धमक ज्यांत आहे तेंच **राष्ट्र** जिवंत होय. —के० १९०४-१२-४-४

१३५९

ज्या कोणत्याहि राष्ट्रांत आपल्या विद्येचा, अकलेचा, हुषारीचा आणि कर्तबगारीचा म्हातारपणीं नव्हे, तर भर उमेदींत लोकोपयोगीं कामाकडे इमानानें आणि नेकीनें उपयोग करणारे शेंकडा नाहींतरी हजारीं तरी कांहीं गृहस्थ निघत नाहींत तें **राष्ट्र** जिवंत असून मेल्यासारखेंच आहे. —के० १८९५-२५-२-४

१३६०

राजकीय दृष्ट्या **राष्ट्र** तेंच होय कीं, ज्यांतील पुढारी लोकांस स्वार्था-च्या पलीकडे अशी कांहीं बाब असते कीं, ज्या बाबींकरितां सर्व जातींचे अथवा सर्व प्रकारचे लोक आपले मतभेद विसरून हौसेनें, ईर्षेनें आणि उमेदीनें एकत्र जमतील; तोच देश खरोखर भाग्यवान होय. —के० १९००-१४-५

१३६१

कोणतेंहि **राष्ट्र** वर यावयाचें. त्याचा उदय व्हावयाचा म्हणजे तो

१३६७

शरीराला बाह्य सुख व स्वास्थ्य मिळूं लागलें, कीं अंतर्गत रोग उत्पन्न होतात, असा वैद्यशास्त्राचा अनुभव आहे. त्याचप्रमाणें कोणत्याहि राष्ट्राला बाह्य शत्रूपासून स्वसंरक्षण करण्याची काळजी नाहींशी झाली म्हणजे त्यांतहि अंतर्गत कलह, घरभेदेपणा आणि सार्वत्रिक शैथिल्य इत्यादि रोग उत्पन्न होऊन तें **राष्ट्र** उत्तरोत्तर खालावत जातें, असें इतिहासावरून आपणांस दिसून येतें. —के० ले० २-४३२

१३६८

जिवंत व्यक्तीप्रमाणें **राष्ट्रहि** जोंपर्यंत वाढत असतें तोंपर्यंतच सजीव असतें; वाढ खुंटली कीं त्याचे ऱ्हासास प्रारंभ झालाच.

—के० १९०३-३१-४-५

१३६९

गेलेलें राज्य पुन: मिळतें व हरण केलेली संपत्ति परत आणतां येते; पण ज्या लोकांचीं अंतःकरणें पराधीन झालीं त्यांचें **राष्ट्रत्व** संपलेंच म्हणून समजावें. —के० १९०३-३७-४-३

१३७०

प्रत्येकानें **राष्ट्रकार्याच्या** गोवर्धनपर्वताला काठी लाविली पाहिजे.

—व्या० २-९१

१३७१

परोपकारबुद्धीचा मनुष्य **राष्ट्रभक्त** बनल्यानें वेदान्तांतील खऱ्या साधुवृत्तीच्या मार्गाचेंच अवलंबन करीत असतो. —के० १९०६ ७-४-२

१३७२

**राष्ट्राचा** अभ्युदय होण्यास सैन्यबल, द्रव्यबल आणि कर्ते व अभिमानी पुरुष या बाह्य साधनांची नेहमीं जरूर असते. —के० १९०१-१०-२-४

१३७३

एकंदर **राष्ट्राकरितां** जें काम करावयाचें त्यांत एका व्यक्तीचा अगर कांहीं व्यक्तींचा हेका, खूळ अगर आग्रह चालणार नाहीं व चालूं नये.

—के० १८९१-४७-३-२

१३७४

मतभेद असूनहि विशिष्ट कार्यास सर्व पक्ष एक होणें हें जिवंत राष्ट्राचें लक्षण आहे. —के० १९०७-२६-५-५

१३७५

सत्याचरणास मान देणारे लोक प्रत्येक राष्ट्रांत प्रत्येक काळीं असतातच; पण राष्ट्रांतील या लोकांची संख्या, त्यांचें वजन, राष्ट्राचे मनावर त्यांचा बसणारा पगडा, ह्या सर्व गोष्टींवर राष्ट्राचा न्यायीपणा व अन्यायीपणा अवलंबून असतो. —के० १८९९-४९ ३-१.

१३७६

ज्या राष्ट्राची आपल्या धर्मावर श्रद्धा नाहीं अथवा आपापल्या समजाप्रमाणें ज्यांतील कर्ते पुरुष नैतिक तत्त्वांचा किंवा उन्नतीचा विचार करीत नाहींत, त्यास स्वोन्नतीच्या उद्योगास कायमचें यश कधींहि यावयाचें नाहीं. —के० १९०१-१०-२.६

१३७७

राष्ट्राची उन्नति होण्यास ज्या हजारों गोष्टी कराव्या लागतात त्या एकट्याच्या हातून होत नाहींत; त्यांस योग्य माणसांची निवड करून त्यांचें सहाय्य घ्यावें लागतें. —के० १९०१-४-३-१

१३७८

कृत्रिम दाबादाबीनें राष्ट्राची पिछेहाट होण्यापेक्षां त्याचे अंगीं असलेल्या वाढीच्या शक्तीस अधिकच उसळी येते.

—के० १९०५-३५-४-५

१३७९

राजा आणि विद्वान् लोक यांजवर समग्र राष्ट्राची जबाबदारी असते. —के० १८९०-३९-२-४

१३८०

स्वतःच्याच प्रेरणेनें राष्ट्राचीं मनें जिवंत होत असतात; व स्वतःच्याच हेळसांडीनें राष्ट्राचीं मनें मरत असतात. —के० १९०७-१०-५-२

१३८१

एकदां वाढीस लागलेली **राष्ट्राची** महत्त्वाकांक्षा कोणत्याहि उपायानें खुंटून टाकणें अशक्य आहे. —के० १९०८-९-४-४

१३८२

चुक्यांची परंपरा चालेल तेव्हांच **राष्ट्राची** प्रगति होते; पूर्वीच्यांतील दोष काढून त्यांचा खल करून त्यांत चांगल्याची भर टाकणें याचेंच नांव प्रगति. —आ० व० ४४२

१३८३

सृष्टीमध्यें व्यक्तींच्या अदृष्टाप्रमाणें **राष्ट्रांचेंहि** अदृष्ट असतें; व त्या अदृष्टानुरूप व्यक्तींप्रमाणेंच राष्ट्रांनाहि उच्चनीच स्थिति प्राप्त होते.

—के० १९०१-१६-२-४

१३८४

आमच्या कोत्या मानवी दृष्टीनें ज्यांस आपण शतकें म्हणतों तीं **राष्ट्राचे** आयुष्यांत केवळ दिवसासारखीं होत.—के० १९०१-१६-२-४

१३८५

जें **राष्ट्राचें** हित तेंच व्यक्तीचें हित व जें राष्ट्राचें कर्तव्य तेंच प्रत्येक व्यक्तीचें कर्तव्य अशी भावना ज्या दिवशीं प्रत्येकाचें चित्तांत वागूं लागेल तोच या देशाचा सुदिन होय. —के० १९०३-३७-४-५

१३८६

चवदा रत्नें काढण्याला जसें देवदानवांना क्षीरसमुद्राचें मंथन करावें लागलें तसेंच देशांत नवीन राज्य किंवा नवीन धर्म स्थापन होण्याला सर्व **राष्ट्राचें** चित्त व बुद्धीची खळबळ झाली पाहिजे.

—के० १९०३-३६-५-१

१३८७

जेथें राष्ट्रांतील सर्वच लोक 'विधवा' झालेले आहेत, तेथें एक विधवेचा उद्धार झाला काय आणि न झाला काय याची फारशी किंमत नाहीं. तेव्हां **राष्ट्राचें वैधव्य** घालविण्याकडे सर्वांनीं लक्ष द्यावें.

—आ० आ० २-४१५

१३८८

राष्ट्राला स्वतंत्रतेचा थोडासा वाव मिळाल्याखेरीज **राष्ट्राचें** पुनरुज्जीवन होत नाहीं.

—च० सु० ८६

१३८९

प्रत्येक **राष्ट्राचें वैशिष्ट्य** कायम ठेवून जेवढी सुधारणा इष्ट व शक्य दिसेल तेवढी करणें प्रत्येक राष्ट्रभक्ताचें कर्तव्य आहे; पण तें वैशिष्टयच गमावलें तर मग राष्ट्र कोठें राहिलें व सुधारणा तरी कशाला ?

—के० १९०३-३३-४-५

१३९०

**राष्ट्राचे व्यवहार** अखेर राष्ट्रांतील लोकांनींच करावयास शिकलें पाहिजे, व केले पाहिजेत.

—के० १९१५-४८-६-१

१३९१

स्वभाषेची वृद्धि, स्वराज्याच्या इतिहासाचा स्वकीय दृष्टीनें अभ्यास व मनन, स्वधर्मश्रद्धा इत्यादि गोष्टी **राष्ट्राच्या** उत्कर्षास कारणीभूत होतात.

—धा० २२

१३९२

समुद्राला जेव्हां भरती येते तेव्हां लाटा मागें पुढें होत असतात. लाट जेव्हां मागें जाते तेव्हां भरती ओसरली असा डोळ्यांना उगीच भास होतो, हा दोष डोळ्यांचा आहे. पण वास्तविक जी लाट मागें

१३९५

**राष्ट्राच्या** अभ्युदयास सेना आणि द्रव्य यांच्याप्रमाणेंच धार्मिक व नैतिक कळकळहि कारण होते. —के० १९०१-१०-२-४

१३९६

झाडाच्या अभिवृद्धीस जमीन आणि बीज या दोघांचा संयोग जसा अपेक्षित आहे, तद्वत्च **राष्ट्राच्या** अभ्युदयास निरनिराळ्या मतांचे एकांतून एक निघणारे किंवा परस्पर निरपेक्ष पक्षहि कांहीं कार्याकरितां एकत्र झाले पाहिजेत. —के० १९०८-७-४-४

१३९७

कोणत्याहि **राष्ट्राच्या** सांपत्तिक स्थितीचा विचार करावयाचा असतां त्या राष्ट्रांतील लोकांचा चरितार्थ कशावर अवलंबून आहे व प्रत्येक मनुष्य स्वतःकरितां म्हणून जितकें द्रव्य उत्पन्न करण्यासाठीं अथवा मिळविण्यासाठीं खटपट करितो त्यांपैकीं त्यास किती मोठ्या भागाचा उपभोग घ्यावयास सांपडतो हें पाहणें जरूर आहे. —के० ले० ३-३६०

१३९८

**राष्ट्रांत** जिवंतपणा असेल तर त्याला कधीं तरी पालवी फुटून प्रफुल्लित वृक्ष होईल; पण मेलेलें किंवा जीर्ण झालेलें खोड कितीहि मोठें असलें तरी शेवटीं सडूनच जावयाचें. —के० १९०३-३२-४-५

१३९९

अंतर्गत जोम, कडकडीत स्वाभिमान व स्वार्थत्याग हे गुण ज्या **राष्ट्रांत** जागृत असतात, तें राष्ट्र कितीहि संकटें आलीं तरी उदयास येतें.

—के० १९०३-३२-४-५

१४००

**राष्ट्रांत** जोम असला म्हणजे धार्मिक समजुती कोठें व किती अमलांत आणाव्या याचा त्या त्या राष्ट्रांतीलच लोक निर्णय करितात.

—के० १८९२-५०-३-२

१४०१

**राष्ट्रांत** लोकांची मोठी संख्या असल्यानें राष्ट्र मोठें होत नाहीं.
—के० १९०६-७-४-३

१४०२

प्रत्येक देशांत धर्मभेद, ज्ञातिभेद व मतभेद कमी-अधिक प्रमाणानें असतात; परंतु जोंपर्यंत एका सामान्य परकीय शत्रूशीं टक्कर देण्याची जरूर त्या देशांतील लोकांना भासत असते तोंपर्यंत ते आपले सर्व अंतर्गत भेद विसरून सामान्य राष्ट्रीय कार्याकरितां एकवट होऊं शकतात, व त्यामुळें एकंदर **राष्ट्रांत** एक प्रकारचें बंधुप्रेम व राष्ट्रीय अभिमान जागृत राहतो.
—के० ले० २-४३३

१४०३

रोजच्या कृत्यांत निरनिराळ्या प्रसंगीं ज्या **राष्ट्रांतील** लोक तेजस्विता दाखवितात त्या लोकांबद्दलच तेजस्वी जनसमूहाच्या मनांत आदरबुद्धि उत्पन्न होते. —के० १९०७-१८-५-१

१४०४

एका **राष्ट्रानें** दुसऱ्या राष्ट्रास कायमच्या गुलामगिरींत ठेवल्यानें दोन्ही-हि राष्ट्रें सारखींच अधःपतन पावतात. —के० १९०४-४९-४-५

१४०५

कोणत्याहि **राष्ट्रानें** विजिगीषा धारण करावी, पण ती धर्माच्या पायावर उभारली असली पाहिजे. —के० १९१५-१९-११-५

१४०६

**राष्ट्राला** अमुक एक गोष्ट अशक्य आहे असें म्हणतील त्यांस इतिहास समजला नाहीं असेंच म्हटलें पाहिजे. —के०१९०८-१८-७-२

१४०७

ज्या राष्ट्राला थोडक्या प्रसंगीं तरी एक होतां येत नाहीं, त्या **राष्ट्रानें** ऊर्जितदशेस चढण्याची आशाच करूं नये. —के० १८९७-२४-३-३

१४०८

**राष्ट्रामध्यें** आपलेपणाची जागरूकता राहण्यास त्या त्या राष्ट्रांतील पूर्वीं झालेल्या पराक्रमी पुरुषांचें लोकास नेहमीं स्मरण असलें पाहिजे किंवा दिलें पाहिजे, हें तत्त्व सगळ्या जिवंत राष्ट्रांना हल्लीं पूर्णपणें मान्य झालेलें आहे. आम्हींच जर तें विसरलों असलों तर तें आमच्या निद्रावस्थेचें अगर दुर्दैवाचें लक्षण होय ! —के० ले० १-४६४

१४०९

ज्या **राष्ट्रामध्यें** वर यावयास आपली कांहीं तरी कर्तबगारी दाखविण्यास मार्ग आहे, मोकळीक आहे, त्या राष्ट्रामध्यें गुण उदयाला येत असतात. —ज० ४६

१४१०

माणसालाच कर्म भोंवतें असें नाहीं, तर तें **राष्ट्रालाहि** भोंवतें. —व्या० १-३५

१४११

भाषणस्वातंत्र्य व मुद्रणस्वातंत्र्य हीं **राष्ट्रास** जन्म देतात व पोसतात. —के० १९०८-२३-४-२

१४१२

**राष्ट्रीय उत्सव** जागृत राखणें व नसल्यास नवे प्रचारांत आणणें हा राष्ट्रीयत्व कायम ठेवण्याचा एक उत्तम मार्ग आहे. —च० ४२४

१४१३

**राष्ट्रीय अभिमान** प्रदीप्त करण्याला एक परकी शत्रु जशी मदत करतो तशी शेंकडों व्याख्यानें व हजारों पुस्तकें यांनीं होत नाहीं, असें प्रत्येक जिवंत राष्ट्राचे इतिहासावरून आपणास आढळतें. —के० ले० २-४३४

१४१४

**राष्ट्रीय आपत्ति** हें कर्तव्यशिथिलतेचें समर्थन नसून ती कर्तव्यनिष्ठेची कसोटी आहे. —के० १९०३-१६-५-४

१४१५

स्वदेशाबद्दल प्रीति, परस्परांमधील क्षुद्र भेद किंवा द्वेष विसरून जाऊन देशकार्याकरितां झुटीनें काम करण्याची प्रवृत्ति व संवय, परदेशांत जाऊन ज्ञान संपादन करून घेण्याची उमेद, आपल्या राष्ट्राचें वैशिष्ट्य कायम ठेवण्याबद्दलची आस्था इत्यादि गुण **राष्ट्रीय उन्नतीस** अवश्यक आहेत. —च० ६५३

१४१६

ज्यामुळें जिवंत राहण्यांत एकप्रकारचा थोरपणा आहे त्या गोष्टी शिकण्याच्या शाळा म्हणजे **राष्ट्रीय उत्सव** होत. —आ० व० २६९

१४१७

कांहीं गोष्टींत तट असले तरी दुसऱ्या बाबतींत त्यांचा संबंध न ठेवणें हेंच खऱ्या **राष्ट्रीय उन्नतीचें** लक्षण आहे.

—के० १८९६-२३-३-२

१४१८

**राष्ट्रीय कामांत** सर्वांनीं खांद्याशीं खांदा लावूनच लढलें पाहिजे.

—व्या० २-९०

१४१९

पृथ्वीमध्यें भागीरथी नदीपेक्षांहि कांहीं मोठ्या नद्या आहेत; पण आर्यभूमींत जन्मास आलेल्या मनुष्यास गंगेइतकी इतर कोणतीहि नदी पवित्र वाटणें ज्याप्रमाणें शक्य नाहीं, तद्वतच **राष्ट्रीय ग्रंथासंबंधानें** गोष्ट होय. —भा० ३

१४२०

या देशांत जन्मलेले जे जे कोणी-मग ते ब्राह्मण असोत, मराठे असोत, मुसलमान असोत, त्यांनीं या देशाच्या कल्याणार्थ पूर्वीं ज्यांनीं आपापलीं आयुष्यें खर्च केलीं, त्यांचे गुण मनांत बाळगणें व काळाला व परिस्थितीला उचित अशी खटपट करून **राष्ट्रीयता** कायम व जागृत राखणें हें त्यांचें कर्तव्य आहे. —के० १९०१-३४-३-५

१४२१

पाश्चिमात्य सुधारणेनें उत्पन्न केलेल्या वर्तमानपत्रासारख्या संस्थांच्या हातूनहि जें काम नीटसें रेटत नाहीं, तें कार्य **राष्ट्रीय महोत्सवच** नीट तडीस नेऊं शकतात. —के० ले० १-५६४

१४२२

राष्ट्रांतील महापुरुषांचें स्मरण हें **राष्ट्रीयत्व** कायम राखण्यास एक चांगलें साधन आहे. —के० ले० १-५३२

१४२३

विद्यार्थ्यांस राष्ट्रीय शिक्षण मिळण्याचा मार्ग म्हटला म्हणजे **राष्ट्रीय युनिव्हर्सिटीची** स्थापना हा होय. —के० १९०५-४५-५-१

१४२४

**राष्ट्रीय धोरणावर** जर राज्यकारभार चालविलेला नसेल, तर राज्यांतील मुत्सद्दी वर्ग व राज्यकारभारांत मन घालणारा वर्ग प्रथम रसातळास जाईल. —के० १९०६-११-४-३

१४२५

**राष्ट्रीय** कामें जर पार पाडावयाचीं असलीं, तर त्याकरितां आपलें तन, मन, धन, तिकडे खर्च करण्यास तयार झालें पाहिजे.

—के० १९००-४७-३-१

१४२६

**राष्ट्रीयत्वाचा** मुख्य घटक समानहितत्व हा असून हें जेथें सर्वांत अधिक प्रमाणानें साध्य होईल तेथेंच परिच्छेदाची रेषा बरोबर पडेल.

—के० १९०१-१७-२-५

१४२७

राष्ट्राच्या आकांक्षा व गरजा भागवून राष्ट्रांतील पुरुष, स्त्रिया व मुलें अधिकाधिक ज्ञानसंपन्न होऊन राजकीय, सामाजिक, आर्थिक व औद्योगिक दृष्ट्या राष्ट्राची एकजुटीनें उन्नति करण्यास प्रवृत्त होतील तें **राष्ट्रीय शिक्षण** होय. —चरि० २८९

१४२८

कोणत्याहि सुधारणेचा मुख्य उद्देश म्हटला म्हणजे विशिष्ट **राष्ट्रीयत्वाचा अभिमान** जागृत करणें हा होय. —धा० २२

१४२९

**राष्ट्रीयत्वाची** दिशा सुटली म्हणजे समाजसुधारणा झाली काय आणि न झाली काय सारखीच होय. —धा० ७५

१४३०

समानहितत्त्व हें **राष्ट्रीयत्वाची** कल्पना सिद्ध होण्याचें प्रत्यक्ष कारण होय. व स्वधर्मप्रीति वगैरे दुय्यम प्रकारचीं होत. —के० ले० २-२३८

१४३१

संकटाच्या भावनेशिवाय **राष्ट्रीयत्वाची** कल्पनाच उत्पन्न होत नाहीं. —के० १९०६-७-४-२

१४३२

**राष्ट्रीयत्वाची** कल्पना, सुष्टांचा उत्कर्ष व दुष्टांचा नाश या दोन्ही प्रकारच्या परमेश्वरी कार्यास व्यवहारांत उत्तम प्रकारानें मदत करणारी आहे. —के० १९०६-७-४-२

१४३३

**राष्ट्रीयत्वाची** कल्पना सिद्ध होण्यास कारणीभूत अशा गोष्टींमध्यें स्वधर्म, स्वभाषा, स्वदेशाभिमान व पूर्वेतिहासस्मरण ह्या होत. —धा० २२

१४३४

आपसांत झगडा चालला असतां तिसऱ्याशीं टक्कर देण्याचा प्रसंग जेव्हां येतो तेव्हां सर्व द्वैतभाव विसरून सर्वांनीं एक होणें हेंच **राष्ट्रीयत्वाचें** प्रधान लक्षण होय. —के० १९०८-१८-४-४

१४३५

पृथ्वीतलावर जर आज कोणतेंच राष्ट्र परतंत्र नसतें किंवा परतंत्र होण्याची भीतिहि कोणास नसती तर **राष्ट्रीयत्वाच्या** कल्पनेस मानवी इतिहासांत थाराच मिळाला नसता. —के० १९०६-७-४-२

१४३६

**राष्ट्रीय महोत्सव** समारंभ हे केवळ चैनीचे किंवा ऐषआरामीचे नसतात; राष्ट्रीयत्वाचे कल्पनेस वृद्धिंगत करण्याचें व पूर्णावस्थेस पोंचविण्याचें सामर्थ्य या उत्सवांचें अंगीं असतें. —के० १९०२-१६-४-५

१४३७

**राष्ट्रीय मर्यादेच्या** आंतील द्वैत प्रगतीला कारण होत असतें.
—के० १९०८-१८-४-४

१४३८

कोणत्याहि राष्ट्राची सजीवता कायम राहण्यास **राष्ट्रीय महोत्सवांची** आवश्यकता आहे व सुधारलेल्या किंवा न सुधारलेल्या कोणत्याहि जिवंत राष्ट्राचा इतिहास पाहिला असतां, ऐतिहासिक महोत्सव कोणत्या ना कोणत्या रूपानें त्या राष्ट्रांत होत असतात. —के० १९०२-१६-४-५

१४३९

राष्ट्रोन्नतीचें हृद्गत प्रत्येकाच्या कानाशीं लागून सांगणाऱ्या **राष्ट्रीय महोत्सवांसारखे** उत्सव मृत राष्ट्रांनीं करावयाचे नाहींत तर करावयाचें तरी काय ? —के० १९०२-१६-५-१

१४४०

राष्ट्राचें आयुष्य **राष्ट्रीय विचारांनीं** बद्ध असतें. —स्व० मो० ५९

१४४१

वस्तुतः वर्षातून एकदां भरणाऱ्या व दोन दिवसांत काम उरकणाऱ्या **राष्ट्रीय** किंवा प्रांतिक सभांचें काम, अगोदर तयार झालेल्या लोकमताला ठरावांचें रूप देऊन योग्य रीतीनें तें सरकारपुढें मांडणें एवढेंच आहे.
—के० ले० १ ११५

१४४२

औषध एक असलें तरी अनुपानें भिन्न असतात. सरकारी शाळेंतील अनुपान आम्हांस अहितकारक आहे. म्हणून हितकारक अनुपानाच्या **राष्ट्रीय-शाळा** आम्हांला पाहिजेत. —व्या० १-९१

१४४३

देशांतील तरुण पिढी देशाचें राजकीय, औद्योगिक आणि सामाजिक वैभव राखण्यास किंवा वाढविण्यास समर्थ होईल अशा प्रकारें त्यांस शिक्षण देणें हें देशांतील विद्याखात्याचें कर्तव्य आहे; आणि त्यासच **राष्ट्रीय-शिक्षण** असें म्हणतात. —के० १९०६-४७-४-३

१४४४

राष्ट्राला काय पाहिजे हें पाहून ज्यानें राष्ट्राची इभ्रत व संपत्ति वाढेल, राष्ट्राची छाप इतरांवर बसेल असें शिक्षण तें **राष्ट्रीय शिक्षण** होय.
—के० १९०८-१२-२-५

१४४५

राष्ट्रांतील लोकांस जर खरें **राष्ट्रीय शिक्षण** द्यावयाचें असेल तर तें स्वतंत्र लोकांनीं स्वतंत्र खासगी शाळेंतच दिलें पाहिजे व देणें शक्य आहे.
—के० १९०५-४४-४-२

१४४६

राजा व प्रजा जेथें एक नाहींत तेथें **राष्ट्रीय शिक्षण** मिळणें शक्य नाहीं. —व्या० २-१२६

१४४७

पाहिजे तें मिळवूं हें शिकविणारें **राष्ट्रीय शिक्षण** होय.
—व्या० २-१२६

१४४८

राजकीय सिद्धान्तांचें व सामाजिक प्रमेयांचें विद्यार्थ्यांस लहानपणापासून बाळकडू देणें हेंच **राष्ट्रीय शिक्षणाचें** बीज होय. —व्या० १-९०

१४४९

धीट व नोकरशाहीला तोंड देणारे पुढारी तयार करणें हेंच **राष्ट्रीय शिक्षणाचें** ध्येय आहे; मग त्यांना तुम्ही सुतारकाम, वीणकाम शिकवा अगर न शिकवा. —आ० आ० १-१४८

१४५०

**राष्ट्रीय शिक्षणाच्या** दृष्टीनें जाती–जातींच्या शाळा योग्य नव्हेत. सर्व जातींनीं एकाच शाळेंत बसून राष्ट्रोद्धारक शिक्षण घेणें अत्यंत इष्ट व आवश्यक आहे. –व्या० १-९५

१४५१

सरकारी ग्रँटचें भूत एकदां घरांत शिरलें कीं तें **राष्ट्रीय शिक्षणाच्या** मानगुटीस बसल्याशिवाय रहात नाहीं. –लो० टि० व्या० २-१२६

१४५२

**राष्ट्रीय शिक्षणानें** सरकारी शिक्षणाचें घोरण आम्हीं हाणून पाडलें, तर आमचा तरणोपाय आहे. –व्या० १-९४

१४५३

स्वतःच्या हिमतीवर पोट भरण्याचें सामर्थ्य जर **राष्ट्रीय शिक्षणानें** अंगीं येणार नाहीं, तर तें राष्ट्रीय शिक्षणच नव्हे. –व्या० १-९०

१४५४

आमचे लोक आपल्या गतवैभवाचा, पूर्वजांचा, धर्माचा व शहाणपणाचा कितीहि गर्व वाहोत, तथापि आम्हांस राहून राहून असें वाटतें कीं, आमच्या एकंदर **राष्ट्रीय स्वभावांत** दीर्घ प्रयत्न, रंगेलपणा, आत्मसन्मान वगैरे असेच दुसरे गुण जितके असावेत तितके नाहींत; व त्या गुणांच्या अभावामुळें आमच्या एतद्देशीय अधिकाऱ्यांवर अंशतः तरी दुष्ट परिणाम होतो. –के० ले० १-४८२

१४५५

**राष्ट्रीय स्वातंत्र्य** परत मिळवावयाचें असेल तर, आधीं कुटुंब–दास्यांतून पुष्कळ लोकांनीं आपणास मुक्त करून घेतलें पाहिजे.

–के० १८९२-१३-२-३

१४५६

**राष्ट्रीय सभा** हेंच सर्व हिंदुस्थानचें एक मुख असल्यानें त्या सभेच्या प्रतिनिधीस त्या सभेच्या ठरावालाच धरून वागणें उचित आहे.

–के० १९१९-४६-५-४

१४५७

**राष्ट्रीय सभा** म्हणजे कांहीं एका व्यक्तीचें मत नव्हे. राष्ट्रांतील समजदार लोकांच्या बहुमतानें जो सिद्धान्त ठरेल तो सभेचा सिद्धान्त होय. व प्रत्येक व्यक्तिमात्रानें या सभेचे सर्व सिद्धान्त कबूल केले पाहिजेत असें म्हणणें म्हणजे राष्ट्रांतील एकंदर मनुष्यांची सरासरीनें जी उंची आहे तीच प्रत्येकाची उंची असली पाहिजे, निदान सेन्सस-कमिशनर तरी तेवढ्या उंचीचा असला पाहिजे असें म्हणण्याइतकेंच वेडगळ होय.

—के० ले० १-३७५

१४५८

**राष्ट्रीय सभेच्या** हातून किंवा मार्फत पुष्कळ गोष्टी आम्हांस करून घ्यावयाच्या आहेत; व ज्या कोणास स्वदेशहिताची खरी कळकळ असेल त्यानें सदर सभेंत जाऊन ती गोष्ट साध्य करावी हें चांगलें.

—के० ले० २-४८४

१४५९

**राष्ट्रीय सभेची** पिछेहाट होऊं नये, राष्ट्रीय सभेचें पाऊल मागें ओढण्याचा प्रयत्न दुसरे कोणी करीत असल्यास त्यांस तसें करूं देऊं नये, हें राष्ट्रीय सभेच्या प्रत्येक भक्ताचें पवित्र कर्तव्य आहे. —व्या० १-१०३

१४६०

**राष्ट्रीय सभेच्या** रचनेविषयीं नियम असणें हें चांगलें होय; पण शक्ति, खरा जोम किंवा आयुष्याची ज्योत उत्पन्न करण्याचा पराक्रम या नियमांत असणें शक्य नाहीं. राष्ट्रीय सभेच्या पुढाऱ्यांच्या व अनुयायांच्या अंगांत जो जोम तोच राष्ट्रीय सभेचा जोम होय.

—के० १८९९-५१-२४

१४६१

देशांतील लोकांपुढें अंतिमांतला अंतिम हेतु मांडून त्यांच्या मनोवृत्तीस एक प्रकारचें उदात्त वळण देणें हें केवळ श्लाध्य नव्हे, तर **राष्ट्रोन्नतीच्या** दृष्टीनें आवश्यकहि आहे. —के० १९०७-३४-४-३

१४६२

हिंदुस्थानांतील सर्व लोकांनीं बंधुभावानें हातांत हात घालण्यास **राष्ट्रीय सभेच्या** मंडपासारखी दुसरी जागा नाहीं. —व्या० २-८८

१४६३

**राष्ट्रीयत्वाच्या** कल्पनेचा उदय होण्यास लोकशिक्षण, स्वाभिमान, स्वार्थत्यागबुद्धि वगैरे [illegible]

१४६८

समाजामध्यें आज शेंकडों वर्षें ज्या **रीतीभाति** चालत आलेल्या आहेत व विशेषेंकरून ज्या रीतीभातींचा धर्माशीं संबंध आहे, त्यांत फेर-बदल करणें तो जुलमानें न करितां खुषीनें केला पाहिजे.

—के० १९०१-४४-२-५

१४६९

ज्या रूढीस धर्मग्रंथांत स्पष्ट आधार नाहीं ती **रूढी** मोडल्यानें मनुष्य जरी लोकांच्या टीकेस पात्र होतो, तरी शास्त्रदृष्ट्या तो अधर्माचरण करणारा ठरत नाहीं. —के० १९००-४५-२-४

१४७०

शिक्षणानें, कायद्यांनीं किंवा दुसऱ्या कृत्रिम साधनांनीं राष्ट्राचे नैसर्गिक गुणधर्म किंवा लोकांचे जीविताला अत्यावश्यक झालेल्या **रूढी** कधींहि बदलूं शकत नाहींत. —के० १९०३-३३-४-४

१४७१

ज्यांस **रूढी** बदलावयाची असेल त्यांनीं कृतीच्या आणि वर्तणुकीच्याच मार्गाचें अवलंबन केलें पाहिजे. —के० १९००-४६-२-४

१४७२

निवळ युरोपियन लोकांचें अनुकरण केल्यानें आपली उन्नति होईल हें म्हणणें जितकें चुकीचें आहे तितकेंच परंपरागत **रूढींना** घट्ट बिलगून राहिल्यानें आपला उद्धार होईल हा समजहि मूर्खपणाचा आहे.

—के० १९०३-३३-४-४

१४७३

मनुष्याचा पोषाख व मनुष्य या दोहोंमध्यें पोशाख ज्याप्रमाणें गौण व मनुष्य ज्याप्रमाणें प्रधान, त्याप्रमाणें तलवार, भाला, बंदुका, इत्यादि लढाईची सामुग्री गौण, व **लढाई** करणारांच्या अंगचा स्वदेशाभिमान, चपलता, सहनशीलता, तीक्ष्णबुद्धि, दृढनिश्चय व धैर्य हीं योध्यांचीं प्रधान अंगें समजलीं पाहिजेत. —के० १९०२-२४-४-४

१४७४

बंदुकीची लढाई असो कीं तरवारीची लढाई असो, डावपेचाचें मर्म एकच व तें हें कीं, लहान घोंड्यावर मोठ्या घोंड्याची धाड आणून घालावयाची, शत्रूच्या अंगावर आपलें सर्वस्वाचें बळ ढकलावयाचें.
—के० १९०२-२६-४-५.

१४७५

सामोपचाराच्या किंवा औदार्याच्या गोष्टी शिष्टाईच्या वेळच्या असतात; प्रत्यक्ष लढाई सुरू झाल्यावरच्या नसतात. —के० १९०८-२-४-३.

१४७६

ज्या वेळीं मनुष्यजातींतील एक भाग दुसऱ्या भागावर आपलें वर्चस्व स्थापण्यास पहातो, तेव्हां त्यांच्यामधील वादाचा निकाल एखाद्या भयंकर लढाईनेंच व्हावा लागतो. —के० १९०५-१२-४-४

१४७७

शहाणा सरदार शिपायांची कुवत लक्षांत आणूनच लढाईची सिद्धता करीत असतो. —के० १८९२-६-२-५

१४७८

संख्येच्या व हत्यारांच्या मानानें दोन्ही बाजू समतोलाच्या असल्यास लढाईचें तोंड लागल्यावर जयापजय सेनापतीच्या डावपेंचाच्या कौशल्या-वर विशेष अवलंबून नसतो. —के० १९०२-२६-४-५.

१४७९

लष्करी शिक्षणाची योग्यता कित्येक परीक्षांहून अधिक आहे.
—के० १९१७-१०-२-४

१४८०

लहानपणीं कांहीं वर्षेंपर्यंत मनास व शरिरास स्वच्छंद खेळूं दिल्यानें पुढील उत्कर्षास लागणारा मानसिक व शारीरिक कंटकपणा प्राप्त होतो. —के० १९००-३७-२-५.

१४८१

जबाबदार प्रातिनिधिक राज्यशासनपद्धतीनें राज्य चालविण्यास हिंदुस्थानांतील लोक पूर्णपणें **लायक** आहेत. —का. जा.

१४८२

एखादा प्राणी ज्ञान नसतां मेला तर मरतेवेळीं त्याच्या आत्म्याबरोबरच प्रकृतीच्या १८ तत्त्वांचें हें **लिंगशरीर** स्थूल देहांतून बाहेर पडतें आणि ज्ञानप्राप्ति होईपर्यंत त्या पुरुषास नवेनवे जन्म घेण्यास लावीत असतें.
—गी० १८२

१४८३

नुसतें **लिहितां** वाचतां आलें म्हणजे मनुष्य शहाणा होतो अशांतला भाग नसून शहाणा होण्याचें एक नवें साधन त्यास मिळतें.
—के० १९२०-१६-७-२

१४८४

एकदां **लढाईस** सुरुवात झाल्यावर प्रतिपक्षानें आपलीं शस्त्रास्त्रें अधिक तीक्ष्ण करण्याची खबरदारी ठेविली होती अशी ओरड करीत बसणें म्हणजे आपल्या दौर्बल्याचा दोष विनाकारण लोकांच्या माथीं मारणें होय. —विष्णु० १६

१४८५

कोणताहि प्रसंग असो, त्याचा उपयोग **लोकजागृतीकडे** कसा करतां येईल इकडेच आम्ही पाहणार; नाहीं तर सरकार आमच्यावर हां हां म्हणतां मात करील. —आ० आ० १-६९

१४८६

विद्वान् लोक स्वतः पुढाकार घेऊन लोकमताला वळण अथवा स्वरूप देऊं शकतात व देतात. पण तेवढयावरून **लोकमत** म्हणजे त्या विद्वानांचें मत असें कोणी समजत नाहीं व समजणेंहि योग्य नाहीं.
—के० १८९५-४५-२-४

१४८७

सामान्यतः खाऊनपिऊन सुखी अथवा लिहितांवाचतां येत असून आपल्या कष्टानें आपला व आपल्या कुटुंबाचा नेकीनें व सचोटीनें निर्वाह करणारे असे समाजांत जे लोक असतील–मग ते विद्वत्तेनें, श्रीमंतीनें किंवा अधिकारानें कमी असोत किंवा जास्त असोत–त्या सर्वांचें जें मत तें **लोकमत** होय. –के० १८९५-४५-२-४

१४८८

अधिकारीवर्गावर पूर्ण वजन पडेल इतकें प्रचंड **लोकमत** तयार झालें पाहिजे. लक्षावधि स्वराज्यवादी उत्पन्न झाल्यावर कोणत्याहि सत्तेला त्यास विरोध करतां येणार नाहीं. –के० १९१७-४३-४-४

१४८९

मागें **लोकमताचा** पाठिंबा असला म्हणजे मनुष्याला स्पष्टपणें आपले विचार कळविण्याला धैर्य येतें. –के० १८९०-२०-२-४

१४९०

जेथें कायदे दंडेलीच्या किंवा मनगटाच्या जोरावर पास होतात तेथें लोकपक्षाचे मुद्दे खोडण्याऐवजीं **लोकमताची** पायमल्ली व लोकनियुक्त सभासदांचा व त्यांच्या भाषणांचा निवळ उपहास व तिरस्कारच व्हावयाचा !

–के० १९०५-८-५-२

१४९१

कायदेशीर वर्तन करणाऱ्या लोकांचा निष्कारण छळ व उपमर्द केला असतां **लोकमताचें** बळ कमी न होतां अधिकच वाढत जातें.

–के० १९०५-४६-५-२

१४९२

**लोकमताचें** बल निश्चयांत आहे, केवळ समुच्चयांत नाहीं.

–के० १९०५-३३-५-२

१४९३

लोकसंरक्षण जसें सरकारचें कर्तव्य, तसेंच **लोकशिक्षणाहि** सरकारचें कर्तव्य आहे. –के० १८९१-५२-२-५

१४९४

**लोकमताच्या पुरस्कर्त्यांनीं** आपला संभावितपणा राहण्याकरितां अथवा सरकारी अधिकाऱ्यांकडून वाहवा मिळविण्याकरितां तडजोड करून लोकमत सरकारास विकून टाकावें यापरतें दुसरें कोणतेंही बेभरंवशाचें किंवा बेइमानीपणाचें कृत्य आहे असें आम्हांस वाटत नाहीं. आम्ही जो वकील नेमतों तो आमच्या घरची मिळकत विकण्याकरितां नव्हे. आमच्यासाठीं भांडण्याकरितां होय.
—के० ले. १-४७०

१४९५

रयतेचा पैसा कसा खर्च करावयाचा हें रयतेच्या मुखत्यारांनीं ठरविणें हेंच काय तें **लोकसत्तात्मक राज्याचें** मुख्य लक्षण होय.
—के० १८९५-३३-२-४

१४९६

**लोकसत्तेच्या** तत्त्वावर स्वतःची राज्यपद्धति ठरवून आपल्या अडचणींतून आपणच मार्ग काढण्याची देशास स्वतंत्रता पाहिजे.
—के० १९१९-१७-७-२

१४९७

**लोकसंग्रह** म्हणजे 'मनुष्यांचा नुस्ता जमाव करणें' किंवा 'स्वतःचा कर्मे सोडण्याचा अधिकार असतांहि अडाणी लोकांनीं कर्मे सोडूं नयेत म्हणून त्यांना गोड वाटण्यासाठीं त्यांच्याप्रमाणें वागण्याचें सोंग करणें' असा अर्थ नव्हे. कारण, लोकांनीं अडाणी रहावें किंवा त्यांना अडाणी ठेवण्यासाठीं ज्ञानी पुरुषानें कर्मे करण्याचें ढोंग करावें हें शिकविण्याचा गीतेचा हेतु नाहीं.
—गी० ३२७

१४९८

**लोकसंग्रह** म्हणजे उगाच कांहीं तरी थोतांड किंवा लोकांना अज्ञानांत ठेवण्याची युक्ति नसून ज्ञानयुक्त कर्म जगांतून नाहींसें झाल्यास जगाचा नाश होण्याचा संभव असतो म्हणून ब्रह्मदेवानें निर्मिलेल्या साधुपुरुषांच्या कर्तव्यांपैकीं हें एक मुख्य कर्तव्य आहे.
—गी० ३२८

१४९९

सरकार इतकें शहाणें आहे कीं, तें आमच्यापेक्षां अधिक जागें आहे; व नुसत्या विद्वानांच्या ओरडीस तें कधींहि भीक घालावयाचें नाहीं. करितां ज्या कोणास खऱ्या विद्येचा संस्कार झाला असेल त्यानें आपल्या देशाच्या खऱ्या हिताच्या काय गोष्टी आहेत त्याचा विचार करून त्याप्रमाणें उदमी, व्यापारी, कारागीर, कारकून, सरदार, जहागिरदार, इनामदार, शेतकरी वगैरे लोकांचें मत आपणांस अनुकूल करून घेतलें पाहिजे; खरें **लोकाग्रणित्व** यांतच आहे. --च० सु० ८२

१५००

**लोकाग्रणित्व** आणि शुद्धाचरण यांचें अन्योन्याश्रयत्वं इतकें बळकट आहे कीं, दोन्ही बाजूंनीं प्रत्येक मनुष्यानें सारखीच दक्षता व कडक नजर ठेवली पाहिजे. –के० १८९१-४१-३-४

१५०१

**वकिलीचा** धंदा उत्तम रीतीनें चालण्यास केवळ पुस्तकी ज्ञान अगर वक्तृत्वच लागतें असें नसून समयसूचकता, दूरदर्शीपणा, आपलें स्वातंत्र्य कायम ठेवून कोर्टाला न दुखवितां आपलें कार्य सिद्ध करून घेण्याची हातोटी, कज्ज्यांतील मुख्य मुद्दा कोणता आणि आपल्या प्रतिपक्षाचें छिद्र कोठें आहे हें चटकन् लक्षांत येण्याजोगी तीव्र पण शांत बुद्धि, आणि तदनुकूल पुराव्याची, युक्तीची व कायद्याची जुळणी करण्याचें अचूक सामर्थ्य हे गुण वकिलीच्या धंद्यांत यश येण्यास अवश्य लागत असतात. –के० १९१६-३५-४-२

१५०२

खरे **वक्ते** निपजण्यास अंगचीच कांहीं स्फूर्ति लागते, ती शिकून येत नाहीं. –के० १८९१-१३-३-३

१५०३

अप्राप्तकाल आणि अप्रमाण असें वचन बृहस्पतीच्या तोंडांतून निघालें तरी तें **वक्त्याच्या** अपमानास कारण होतें. –के० १८९२-१९-३-१

१५०४

तुम्ही अस्सल क्षत्रिय असा अथवा अस्सल ब्राह्मण असा, तुमचीं **वर्णविहित कर्मे** तुम्हांस करावयास लावणें व समाजांत त्यासंबंधीं जागृति उत्पन्न करणें, हें स्वराज्यवाद्यांचें आद्य कर्तव्य आहे. व ह्यांत बेकायदेशीर कांहीं नाहीं. —स्व० मो० २१

१५०५

हिंदुधर्म वेदप्रणीत आहे, आणि वेदांत अस्पृश्यतेला कोठेंहि थारा नाहीं. तेव्हां आपल्याचपैकीं कांहीं जणांस अस्पृश्य लेखणें हा मी देवाचे घरीं गुन्हा समजतों. **वर्णव्यवस्था** ही समाजाचे सोयीसाठीं आहे. समाज हा वर्णव्यवस्थेचे सोयीसाठीं नाहीं. ( १९१८ सालीं श्री० सयाजीराव गायकवाड यांचे अध्यक्षतेखालीं भरलेल्या अस्पृश्यता-निवारण परिषदेंतील लो० टिळकांचें भाषण.)

१५०६

जोंपर्यंत प्राचीन आर्यांनीं आपली जाति शुद्ध ठेविली होती तोंपर्यंत त्यांची भरभराट झाली आणि **वर्णसंकर** होतांच कलियुगास प्रारंभ झाला.
—के० १९०३-२८-४-५

१५०७

मानवी स्वभावांत किंबहुना मनुष्याच्या रक्तांत ज्या कांहीं समजुती खिळून गेल्या आहेत त्यांपैकींच **वर्णव्यवस्था** ही एक समजूत होय.
—के० १८९३-२०-२-४

१५०८

सार्वजनिक कामासंबंधानें जी जी गोष्ट लोकांपुढें येते त्यावर निर्भीड-पणें आणि स्वतंत्रपणें टीका करणें हें **वर्तमानपत्रकर्त्यांचें** कर्तव्य आहे. हें कर्तव्य बजावीत असतां, वाईट गोष्टींचें आविष्करण करणें हेंच पुष्कळदां त्याच्या नशीबीं येतें हें खरें; पण तेवढ्यानें त्यास चांगल्या गोष्टी कळत नाहींत असें म्हणणें म्हणजे वैद्यास निरोगी मनुष्याची पारख करतां येत नाहीं असें म्हणण्यासारखें आहे. —के० ले. १-३५८

१५०९

**वर्णाश्रमव्यवस्था** ही गुणकर्मविभागरूप समाजरचनेची गोष्ट आहे.
—के० १९००-३८-२-२

१५१०

सरकारच्या आवडीकरितां कांहीं आम्ही पत्रें काढलीं नाहींत. व सरकारावर कडक टीका केल्यानें त्यांचा रोष आमच्यावर झाला तर त्याची आह्मांस परवाहि नाहीं. सरकारच्या जुलमी राज्यपद्धतीवर जर कडक टीका करावयाची नाहीं व ती पद्धत परिणामीं लोकांस व राजकर्त्यांस जाचेल असें निर्भीडपणें म्हणावयाचें नाहीं तर **वर्तमानपत्र** काढावें तरी कशाला ?
—के० ले. २-५४६

१५११

**वर्तमानपत्रांचा** खरा उपयोग अनियंत्रित राजसत्तेस आळा घालण्याकडे होत असतो.
—के० १९१७-११-४-४

१५१२

जेणेंकरून समाजाचे व्यापार सुरळीत चालण्यास मदत होईल असें लोकमत जागृत करणें व जो कोणी ह्या कामीं व्यत्यय आणील त्याचें स्वरूपाविष्करण करून वेळींच बंदोबस्त करणें हें **वर्तमानपत्राचें** मुख्य कर्तव्य आहे.
—के० १८९२-३०-२-३

१५१३

केव्हांहि काय, जुलमी किंवा अनियंत्रित राजसत्तेस **वर्तमानपत्राचें** स्वातंत्र्य हें जाचणारच.
—के० १९१७ ११-४-४

१५१४

**वर्तमानपत्रकर्ता** ही जागाच अशी आहे कीं, त्या जागेचें काम करीत असतांना आपण खाजगी स्वत्त्व विसरलेंच पाहिजे. —आ० आ० २-१८०

१५१५

गुळगुळीत कागदावर रंगीबेरंगी बुळबुळीत मजकूर छापून लोकांचें रंजन करणें हें कांहीं **वर्तमानपत्रकर्त्यांचें** मुख्य कर्तव्य नव्हे.
—के० १९१७-११-४-३

१५१६

लोकमताची जागृति करणें अथवा तें उत्पन्न करणें अशीं जीं **वर्तमान-पत्रकारांचीं** दोन मुख्य कामें आहेत तीं चांगल्या रीतीनें बजावण्यास निस्पृह व कडक लेख लिहिणें अत्यंत जरूरीचें आहे.

—के० १८९५-२१-२-४

१५१७

कोणत्याहि राष्ट्राचें **वाङ्मय** त्या राष्ट्रांतील लोकांच्या परिस्थितीवर **अव-लंबून** असतें. —के० १९०६-२३-४-२

१५१८

ईश्वरदत्त **वाणीचा हक्क** काढून घेण्याचा सरकारास हक्क नाहीं.

—व्या० १-५९

१५१९

**विघ्न** न येतां गोष्ट तडीस गेली तर त्यांत पुरुषार्थ तो काय? विघ्नें बाजूला सारून जें यश मिळवितात तेच खरे पराक्रमी पुरुष होत.

—व्या० २-१०९

१५२०

इतिहास व नीतिशास्त्र यांमध्यें **विघ्नांना** बिलकूल थारा नाहीं.

—स्व० मो० १६

१५२१

**विघ्नांमुळेंच** उत्कर्ष होतो. —व्या० २-२९

१५२२

**विघ्नें** हीं यावयाचींच; व विघ्नांशिवाय सौख्यालाहि चव येत नसते.

—के० १९१७-३-४-२

१५२३

देशासंबंधीं **विचार** करतांना मनुष्याच्या विचारांची धांव कुंपण घालून अडवणें हें देशास कधींहि हितकारक होत नाहीं.

—के० १९०८-९-४-३

१५२४

तोंडावाटे बाहेर पडणारे **विचार** पोटांत कोंडले तर अनर्थ होईल.

—व्या० १-५८

१५२५

**विचारस्वातंत्र्य** हा राष्ट्राचा आत्मा आहे; आणि या आत्म्याची उन्नति अमुक पायरीपर्यंतच झाली पाहिजे असा आग्रह धरणें आत्मविघातक होय. —के० १९०८-९-४-४

१५२६

ज्या राष्ट्रांत **विचारस्वातंत्र्य** अबाधित राहात नाहीं तें राष्ट्र पूर्ण—नाहीं-तर अर्धवट तरी—मेलेलेंच समजलें पाहिजे. —के० १९०८-९-४-४

१५२७

**विचारस्वातंत्र्य** कायम राखणें यांतच राष्ट्राचें हित आहे.

—के० १९०८-९-४-५

१५२८

विचारांची अपूर्वता, भाषेचें सौंदर्य, मार्मिक आणि सप्रमाण नवीन शोध आणि भाषेचा सार्वत्रिक प्रचार या गोष्टी एकत्र झाल्यावर कोणती **विचारक्रांति** व्हावयाची नाहीं ? —के० १९००-४४-४-४

१५२९

लोक जमल्यानें देवाला **विटाळ** होतो म्हणणें म्हणजे देवानें माणसें उत्पन्न केलीं नाहींत असें म्हणण्यासारखें आहे. —लो० टि० व्या० १-२६

१५३०

ब्राह्मणादि चार वर्ण हे एकाच विराट पुरुषाचीं चार अंगें आहेत, ही गोष्ट सर्वांस मान्य आहे, असें असूनहि पायांचा **विटाळ** डोक्यास होतो असें मानणें असमंजसपणाचें आहे. —आ० आ० १-१३१

१५३१

चिता पेटली तरी आमची **विडी** त्यावर पेटलीच पाहिजे असें म्हणणारे कांहीं लोक असावयाचेच ! —आ० आ० १-९६

१५३२

**विणकामाचा** धंदा चालण्यास जर कोणता एखादा देश दुसऱ्या देशांपेक्षा अधिक योग्य असेल तर तो हिंदुस्थान हा होय. आणि यामुळें बहिष्कार-योग या कार्यास जितका योग्य आहे तितका दुसऱ्या कशासहि योग्य नाहीं. —के० १९०५-४५-४-४

१५३३

नवीन यंत्राच्या योगानें जगांतील **विणकामाच्या** धंद्याच्या पालटलेल्या स्थितीचा पूर्ण फायदा आपलें कर्तव्यकर्म ओळखून राज्यकर्त्यांनीं जर हिंदुस्थानास दिला असता तर मँचेस्टरला या धंद्यासंबंधानें जें अग्रस्थान मिळालें आहे तें हिंदुस्थानाला खात्रीनें मिळालें असतें.

—के० १९०५-४५

१५३४

**विद्या** ही एका मापानेंच मोजण्यासारखी वस्तु नव्हे.

—के० १८९२-५२-३-१

१५३५

तरुण पिढीस राष्ट्रहिताच्या गोष्टी समजावून सांगणें आणि तरुणपणापासूनच तदनुकुल आचरण करण्याची त्यांच्या मनाची प्रवृत्ति करणें हेंच खऱ्या **विद्यागुरूचें** कर्तव्य होय. —के० १९०५-४२-४-४

१५३६

कोणत्याहि देशांत किंवा राज्यांत नोकर तयार करण्याकरितांच **विद्यादान** करावयाचें हें मतच मुळीं चुकीचें होय. —के० १९०२-३३-४-५

१५३७

**विद्यादेवीची** श्रद्धेनें आणि विश्वासानें जो उपासना करील त्यास ती देवी प्रसन्न झालीच पाहिजे. —के० १९०६-४८-४-३

१५३८

स्वतंत्रतेकरितां लढणाऱ्या लोकांचा इतिहास वाचून आपणहि स्वतंत्रतेकरितां धडपड करावी असें ज्यास वाटणार नाहीं तो **विद्यार्थी** नव्हे, पशु होय. —के० १९०६-४८-४-३

१५३९

शास्त्रांचा सतत अभ्यास व मनन करणारे पुष्कळ विद्वान् ज्या ठिकाणीं राहतात व त्यांची कीर्ति ऐकून दूरदूरचे शेंकडों विद्यार्थी विद्यार्जनाकरितां जेव्हां त्यांजपाशीं येतात, तेव्हां एखाद्या स्थलास **विद्यापीठ**, विद्यामंदिर, अथवा विद्याश्रम ही संज्ञा प्राप्त होते. —के० १८९६-८-२-५

१५४०

देशांतील **विद्यापीठें** हीं चांगलीं व सामर्थ्यवान् माणसें निष्पन्न करण्याच्या टांकसाळी होत. —के० १९००-१-२-५

१५४१

खरें **विद्यापीठ** म्हणजे तेथें राजकीय, सामाजिक, शास्त्रीय, औद्योगिक किंवा व्यावहारिक विषयांसंबंधानें निर्भीडपणें विचारपूर्वक मत देणारे विद्वान् निपजले पाहिजेत. पण जीं विद्यापीठें दारूच्या गुत्त्या-प्रमाणें सरकारच्या लायसेन्सप्रमाणें चालावयाचीं, तेथें सत्यनिष्ठेपासून उत्पन्न होणारें धैर्य किंवा करारीपणा तरी कोठून नजरेस पडणार ?

—के० ले० २-५१७

१५४२

आपलें आयुष्य अध्ययन व अध्यापन यांत घालवितात त्यांसच **विद्यार्थ्यांचे** खरे गुणदोष अथवा अडचणी समजून येणें शक्य असतें.

—के०१८९६-८-३-१

१५४३

राष्ट्राच्या उन्नतीकरितां चालू असणाऱ्या चळवळींत पडून व त्या पाहून त्यांच्या शक्याशक्यतेचा किंवा अधिक उणा फायद्या-गैर-फायद्याचा विचार **विद्यार्थ्यांनीं** विद्यार्थीदशा संपण्यापूर्वींच आपल्या मनाशीं करून ठेवला पाहिजे. —के० १९०५-४४-४-४

१५४४

गुरूचींहि लोकापवादास पात्र असलेलीं कृत्यें आपणाला संमत नाहींत असें **विद्यार्थ्यांनीं** प्रसंग आल्यास स्पष्ट कळविणें व तेवढया कृत्यांबद्दल तिरस्कार दर्शविणें हें त्यांचें कर्तव्य होय. —आ० व० ३८९

१५४५

**विद्यार्थ्यांस** सार्वजनिक चळवळींत पडूं न देण्याचा नियम करणें म्हणजे एकप्रकारें राष्ट्राचें नुकसान—राष्ट्राचा घात—करणें होय.

—के० १९०५-४४-४-४

१५४६

ज्याला देशाची सुधारणा करावयाची असेल त्यानें प्रथमतः त्या देशांतील **विद्यार्थ्यांस** चांगलें वळण लावण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

—के० १८९१-१९-३-१

१५४७

फक्त अंगीं **विद्वत्ता** असली म्हणजे त्याची सर्व कृति लोकांस मान्य होते असें नाहीं.

—के० १८९५-१४-२-४

१५४८

**विद्वत्ता** आणि सद्बुद्धि हीं नेहमीं एकत्र असलीं तरच श्रेयस्कर होतात.

—के० १८९३-३५-२-५

१५४९

जगांत एकाहून एक इतके विद्वान् आहेत कीं, कोणी एकानें आपल्या **विद्वत्तेची** घमेंड मारणें म्हणजे आपली क्षुद्रबुद्धि आणि बेपर्वाई यांचें प्रदर्शन करण्यासारखेंच आहे.

—के० १८९५-४५-२-४

१५५०

केवळ **विद्वत्तेच्या** जोरावर राज्य मिळतहि नसतें आणि टिकतहि नसतें; तें मिळविण्यास आणि राखण्यास ब्राह्मतेजाखेरीज दुसऱ्या प्रकारचें तेज लागत असतें.

—के० १९०६-३०-४-२

१५५१

मनुष्याची बुद्धिमत्ता, त्याचें वाचन, निरनिराळ्या विषयांची त्यास उपलब्ध असलेली माहिती आणि सदर विषयांचा परस्परांशीं असलेला संबंध, कोणत्याहि विषयाचीं मूलतत्त्वें आकलन करून घेण्याची शक्ति, निरनिराळ्या भाषांचें व मतांचें परिज्ञान इत्यादि अनेक गोष्टी खऱ्या **विद्वत्तेस** अवश्य लागतात.

—के० १८९२-५२-३-१

१५५२

एखाद्याचें राजकीय मत अमुक एक प्रकारचें असणें हें त्याच्या **विद्वत्तेपेक्षां** बऱ्याच अंशीं त्याच्या स्वभावावर, धंद्यावर आणि परिस्थितीवर अवलंबून असतें. —के० १९१६-३५-४-२

१५५३

**विद्वान्** जर धर्मपराङ्मुख झाले, तर खालच्या प्रजेस त्राता राहात नाहीं. —व्या० २-४०

१५५४

राष्ट्रांत **विद्वान्** नसले म्हणजे तें राष्ट्र बुडालें असें समजावें. —व्या० २-६९

१५५५

हिंदुस्थानांतील युनिव्हर्सिटींतून किंवा इतर नोकरखान्यांतून जे **विद्वान्** बाहेर पडतात ते या बालमंदार वृक्षासारखे होत. ते गोंडस राहावे, त्यांचीं फलें—पुष्पें युरोपियन अधिकारीवर्गास फार प्रयास न पडतां लीलेनें खुडतां यावीं, अशा बेताबेतानेंच त्यांची वाढ होण्याबद्दल पहिल्यापासून खबरदारी घेण्यांत येते. —के० ले० २-५६२

१५५६

विद्या, नीतिमत्ता, धर्मनिष्ठा, व्यवस्थित आचरण आणि गृहस्थिति यांचा एकमेकांशीं जो नित्य संबंध असावा लागतो तो असल्याखेरीज राष्ट्रांतील **विद्वान् लोक** पुढारीपणा घेऊन जोरानें राष्ट्राचा उत्कर्ष करण्यास पात्र होत नाहींत. —विष्णु० ५

१५५७

'वसुधैव कुटुंबकम्' या न्यायानें पृथ्वीवरील सर्व देशांतील लोकांबद्दल, त्यांच्या धर्मविचारांबद्दल अथवा आचारांबद्दल समताबुद्धि कायम ठेवून, त्यांचें कल्याण व्हावें अगर त्यांनीं ऊर्जितदशेस यावें अशी मनापासून इच्छा बाळगून त्याकरितां आपल्या हातून होईल तेवढा उद्योग करणें हें खऱ्या सत्त्वशील **विद्वानाचें** लक्षण होय. —के० १९००-४४-२-४

१५५८

परकीयांनीं स्वधर्मावर केलेल्या आक्षेपांचें निराकरण करून आपल्या धर्मतत्त्वांची योग्यता स्थापन करणें हें देशांतील **विद्वानांच्या** कर्तव्यांपैकीं एक कर्तव्य होय. —के० १९०१-९-२-५

१५५९

**विभूतिपूजा** जेथें नाहीं असलें राष्ट्र सांपडावयाचें नाहीं, व ज्या समाजांत या गुणाचा लोप होत जातो तो समाज मरणोन्मुख झाला आहे असें समजावें. —के० १८९७-२२-२-४

१५६०

राष्ट्रीयत्व, समाजव्यवस्था व धर्म या सर्वांच्या मुळाशीं **विभूतिपूजा** आहे. —के० १८९७-२२-२-५

१५६१

ईश्वरांश प्रत्येक मनुष्यांत कमीअधिक प्रमाणानें असतोच असतो, व विभूतीचें दर्शन झालें असतां **विभूतिपूजेला** भरती येऊन मूळचा ईश्वरांश दुणावत जातो. —के० १८९७-२२-२-५

१५६२

लोहचुंबकाच्या मागोमाग लोखंडाचा तुकडा ज्याप्रमाणें आपोआप पळत जावयाचाच, त्याचप्रमाणें **विभूति**शेजारीं योग्य अंतरावर मनुष्य गेला कीं या संस्काराचे परिणाम त्याच्या मनावर झाल्यावांचून रहावयाचे नाहींत. —के० १८९७-२२-२-५

१५६३

कोणत्याहि कार्याला **विरोध** उत्पन्न झाल्याशिवाय मला बरें वाटत नाहीं; ज्या कार्यांत विरोधच नाहीं तें सिद्धीस नेण्यांत पुरुषार्थ तरी कसला ! —के० १९२०-२१-२-४

१५६४

**विश्वकुटुंबित्वाची** कल्पना दिसावयास फार मोहक आहे खरी, परंतु केवळ अशा कल्पनेच्या पायावर रचलेली राष्ट्रीयत्वाची इमारत शिखरास पोहोंचल्याचें जगाचे इतिहासांत कोणीं तरी पाहिलें किंवा ऐकलें आहे काय ! —के० १९०१-१७-२-५

१५६५

समुद्रावर तुफानांत सांपडून सुकाणूं मोडलेलें तारूं या खडकावर आपटेल कीं त्या खडकावर आपटेल हा जसा नियम नसतो आणि प्रसंगविशेषीं खडकावर न आपटतांहि तें समुद्राच्या तळास जाऊन पोंचतें, त्याप्रमाणें विवेकशून्य किंवा **विवेकभ्रष्ट मनुष्याची** स्थिति होत असते.
—के० १९०६-४६-४-५

१५६६

**विश्वासघातकी** म्हणून जगांत वावरण्यापेक्षां मृत्यु काय वाईट ? या ताईमहाराजांच्या खटल्यांत मृत्यु आल्यास तो मी आनंदानें पत्करेन. पण खटला मध्येंच सोडून विश्वासघातकी म्हणवून घेऊन जगांत रहाणें कालत्रयींहि पत्करणार नाहीं.
—चरि० १२०

१५६७

कालिदासाच्या मेघदूताचें पुष्कळांनीं पुढें अनुकरण केल्यानें ज्याप्रमाणें कालिदासाच्या मेघदूताची योग्यता स्थापन होते तद्वतच दुसऱ्या अनेक 'सहस्रनामां'मुळें **विष्णुसहस्रनामाची** महति व योग्यता मात्र अधिक स्थापन होते असें आम्हांस वाटतें.
—ई० २

१५६८

'**विष्णुसहस्रनाम**' म्हणजे परमेश्वराचे गुण मनांत बिंबून त्याच्याठायीं मनुष्याची भक्ति दृढ करण्यास साधनीभूत असा एक भक्तिकोशच होय.
—ई० २

१५६९

जगांतील पदार्थांत सोनें, लोखंड, पारा इत्यादि जें नानात्व आहे तें प्रकृतीच्या सत्त्व, रज आणि तम या तीन गुणांच्या अन्योन्य लटपटींचें किंवा कमीजास्त प्रमाणाचें फळ आहे. मूळ प्रकृति एक असतांहि हें नानात्व कसें उत्पन्न होतें याचा जो विचार त्यास **विज्ञान** म्हणतात, व यांतच सर्व आधिभौतिक शास्त्रांचा समावेश होतो. उदाहरणार्थ, रसायनशास्त्र, विद्युच्छास्त्र, पदार्थविज्ञानशास्त्र हीं सर्व विविधज्ञानें म्हणजे विज्ञानेंच होत.
—गी० १५६

१५७०

**वेडगळ समजुतीला** चिकटून राहून धर्मासभोंवतीं अनेक प्रतिबंध उत्पन्न करून ठेवणें हा त्याचें रक्षण करण्याचा खरा मार्ग नव्हे.

—के० १८९३-१०-३-२

१५७१

जर्मनींत छापलेले **वेद** जर आम्ही वाचतों, तर ब्राह्मणेतरांस ते वाचण्याचा व त्याप्रमाणें कर्में करण्याचा अधिकार नाहीं या म्हणण्यांत कांहीं अर्थ नाहीं.

—आ० आ० १-१६

१५७२

वेद तीन माना किंवा चार माना; मंत्र—ब्राह्मणात्मक माना किंवा मंत्रात्मक माना; पौरुषेय माना किंवा अपौरुषेय माना; ऋषि मन्त्रद्रष्टे म्हणा किंवा मंत्रकर्ते म्हणा; जोंपर्यंत **वेद** हे आपल्या धर्माचे मूलभूत ग्रंथ आहेत असें एकदां मनुष्य कबूल करितो तोंपर्यंत तो हिंदु आहे असें म्हटलें पाहिजे.

—धा० म० ६०-६१

१५७३

आर्य लोकांचा इतिहास आणि **वेद** हीं समानमूलक आहेत व आर्य लोकांचा धर्म जर पहावयाचा असेल तर त्याचें मूल वेदाखेरीज दुसरे कोठेंहि सांपडावयाचें नाहीं.

—के० १९००-३८-२-३

१५७४

**वेदान्त** हें परोपकाराचें मोठें माप आहे व देशाभिमान हें धाकटें माप आहे, एवढाच दोहोंमध्यें फरक.

—के० १९०६-६-४-२

१५७५

**वेदान्त** कोणासहि आपला धर्म सोडून दुसऱ्याचा धर्म स्वीकारा असें सांगत नाहीं, तर सर्व धर्मांचें रहस्य एक आहे हेंच त्यांतील प्रतिपाद्य होय. खिस्ती धर्मांत अशा तऱ्हेचीं उदात्त तत्त्वें कोठेंच सांगितलेलीं नाहींत.

—के० १८९९-४४-३-१

१५७६

जीवाचे धर्म ईश्वरांत कोणते आहेत अगर असणें शक्य आहे, सच्चिदानंदस्वरूपी ब्रह्मज्ञानाचा आचाराशीं कितपत संबंध आहे, धर्माचें खरें स्वरूप बाह्याचार होय का तत्त्वज्ञान होय इत्यादि प्रश्नांचा उलगडा आमच्या **वेदान्त** ग्रंथांतून फार चांगल्या रीतीनें केला आहे.

—के० १८९२-८-२-३

१५७७

ज्यानें त्यानें आपआपल्या धर्माप्रमाणें चालून दुसऱ्यास नांवें न ठेवितां सर्वांनीं मिळून सदाचारानें, सन्निष्ठेनें आणि सद्बुद्धीनें परमात्म्याची ओळख करून घेऊन आपल्या आत्म्याचें हित साधावें हाच काय तो खरा पुरुषार्थ होय. वृथाभिमान जाऊन हा पुरुषार्थ साधण्याची योग्यता उत्पन्न

१५८०

प्रकृति, पुरुष व परमेश्वर या त्रयीलाच अध्यात्मशास्त्रांत अनुक्रमें जगत्, जीव व परब्रह्म असें म्हणतात; व या तिन्ही वस्तूंचीं स्वरूपें व परस्पर-संबंध यांचा निर्णय करणें हेंच **वेदान्तशास्त्राचें** मुख्य काम असून उपनिषदांतून सर्वत्र हीच चर्चा आहे. —गी० १९९

१५८१

आधिभौतिक शास्त्रांत ज्याप्रमाणें प्रत्यक्षाला विरुद्ध असणारें अनुमान त्याज्य मानितात, त्याप्रमाणें **वेदान्त**शास्त्रांत युक्तीपेक्षां स्वानुभवाची किंवा आत्मप्रतीतीची मातब्बरी अधिक समजतात. —गी० १९६

१५८२

जें काय करावयाचें तें विकारशांत्यर्थ किंवा वासनातृप्त्यर्थ नाहीं, तर कर्तव्य म्हणून करावयाचें हा **वेदान्ताचा** मुख्य उपदेश, व त्याहून उदात्त सिद्धांत दुसऱ्या कोणत्याहि राष्ट्रांत किंवा धर्मांत आढळावयाचा नाहीं. —के० १८९३-१६-२-४

१५८३

सांख्य प्रकृति व पुरुष अशीं दोन स्वतंत्र तत्त्वें मानितात. पण हें द्वैत सोडून देऊन प्रकृति व पुरुष हीं दोन्ही तत्त्वें एकाच नित्य व निर्गुण परमात्म्याच्या विभूति होत असा **वेदान्ताचा** सिद्धांत असून भगवद्गीतेसहि तो ग्राह्य आहे. —गी० १९२

१५८४

सत्य व मिथ्या या शब्दांचे वेदान्तशास्त्रांतील पारिभाषिक अर्थ लक्षांत न घेतां, किंवा सत्य या शब्दाचा आपणांस वाटतो त्यापेक्षां निराळा अर्थ असूं शकेल कीं नाहीं हें पहाण्याचीहि तसदी न घेतां, "आमच्या डोळ्यांस प्रत्यक्ष दिसणारें जगहि वेदान्ती मिथ्या म्हणतो, काय करावें ?" अशी कांहीं अडाणी परकीय आणि कांहीं स्वकीय पंडितंमन्य लोकहि अद्वैत **वेदान्ताची** टवाळकी करीत असतात! पण यास्कानें म्हटल्याप्रमाणें आंधळ्याला खांब दिसत नाहीं हा कांहीं खांबाचा दोष नव्हे. —गी० २१६

१५८५

जगांतील अत्यंत उदात्त विचारांची जर एकादी शाळा असेल तर ती **वेदान्ताची** होय. —लो० टि० व्या० २-७

१५८६

वेदान्ताचा परिणाम आचरणावर होऊन तामसी वृत्तींचा क्षय व सात्त्विक वृत्तींचा उदय होण्याकडेच त्यांचा उपयोग झाला तरच **वेदान्ताचें** खरें सार्थक होतें. —के० १९०४-३८-४ ३

१५८७

**वेदान्ताचें** तत्त्व ज्याच्या मनावर बिंबलें आहे त्याच्या ठायीं इतका आत्मविश्वास उत्पन्न होतो कीं, तो सर्पालाच रज्जूप्रमाणें पिरगाळून टाकितो. —आ० आ० १-१८४

१५८८

**वेदान्तांत** अलंकार 'मिथ्या' आणि सुवर्ण 'सत्य' असें जेव्हां म्हणतात तेव्हां अलंकार निरुपयोगी किंवा अजीबात खोटा, म्हणजे डोळ्यांना न दिसणारा अगर मातीला बेगड लावून केलेला, अथवा मुळींच अस्तित्वांत नसणारा असा त्याचा अर्थ समजावयाचा नाहीं. 'मिथ्या' हा शब्द या ठिकाणीं पदार्थांच्या रंगरूपादि गुणांस आणि आकृतीस म्हणजे त्याच्या वरच्या देखाव्यास अनुलक्षून योजिलेला आहे, आंतील तात्त्विक द्रव्याला अनुलक्षून नाहीं. कारण तात्त्विक द्रव्य नेहमींच 'सत्य' आहे हें नीट लक्षांत ठेविलें पाहिजे. —गी० २१५

१५८९

**वेदान्तांत** जर नीतिच्या व धर्माच्या सिद्धांतांचा अंतर्भाव होतो व व्यवहारांत जर धर्माला आणि नीतीला मान, तर वेदान्त व्यवहारोपयोगी नाहीं, असें म्हणण्यापेक्षां तो व्यवहारोपयोगी करणारा मनुष्य नाहीं असेंच म्हटलें पाहिजे. —धा० २१५

१५९०

**वेदान्तांत** शिरलें म्हणजे सर्वच ब्रह्ममय होऊन व्यवहाराची उपपत्ति लागत नाहीं अशी जी कित्येकांची समजूत आहे ती चुकीची आहे. —गी० १२१

१५९१

खरा **वेदान्ती** तो होय कीं, जो आपल्या धर्मांतील निरनिराळ्या शाखांचेंच नव्हे तर भिन्न भिन्न धर्मांचेंहि पर्यवसान एकच आहे हें ओळखतो. —के० १८९९-४४-२-५

१५९२

**वेदान्त्याला** पदार्थमात्राच्या नामरूपात्मक पांघरुणाखालीं मूळांत काय तत्त्व आहे हें पहावयाचें असतें; आणि **तत्त्वज्ञानाचा** खरा विषयहि पण तोच आहे. —गी० २१५

१५९३

**वेदोक्त मंत्र** संस्काराचे वेळीं म्हटल्यानें कोणत्याहि जातीस अधिक श्रेष्ठपणा येतो ही समजूत चुकीची आहे. —के० १९०१-४४-२-४

१५९४

इतर धर्मांच्या तडाख्यांतून परकीय राजांच्या अमलाखालींहि **वैदिक धर्मानें** जो आपला बचाव केला आहे, त्याचें मुख्य कारण सदर धर्मांत असलेलीं आध्यात्मिक तत्त्वें व तद्धर्मानुयायांस दिलेली ईशप्राप्तीच्या मार्गांची व साधनांची स्वतंत्रता हें होय. —के० १९०१-९-२-४

१५९५

**वैदिक धर्मांत** वेळोवेळीं आत्मज्ञानी पुरुषांनीं जीं धर्मांगें प्रवृत्त केलीं तीं तत्पूर्वीं प्रचलित असलेल्या धर्मांगांतूनच उद्भवलेलीं असून नव्या धर्मांगांचा पूर्वींच्या धर्मांगांशीं मेळ ठेवणें हें वैदिक धर्माच्या वाढीचें पहिल्यापासून चालत आलेलें मुख्य धोरण आहे; आणि निरनिराळ्या धर्मांगांची एकवाक्यता करण्याचें हेंच धोरण स्वीकारून स्मृतिकारांनीं आश्रमव्यवस्था-धर्म पुढें प्रतिपादिला आहे. —गी० ५३८

१५९६

**वैय्याकरण** हे भाषेचे शास्ते खरे; पण त्यांचा अधिकार मर्यादित आहे; आणि कोणतीहि भाषा बोलणारे लोक हेच जरी त्या भाषेचे कर्ते असले तरी व्याकरणशास्त्र किंवा व्युत्पत्तिशास्त्र हें त्यांस अगदीं झुगारून देतां येत नाहीं. —के० १९०४-३० ४-४

१५९७

नियमित सत्ता असलेला राजा आणि प्रजा यांच्यामध्यें जो संबंध असतो तोच किंवा तशा प्रकारचा **वैय्याकरण** आणि भाषेंतील शब्द यांच्यामध्यें आहे.
—के० १९०४-२८-४-४

१५९८

देशांत संपत्ति कितीहि विपुल असली तरी तिचा एके ठिकाणीं ज्याप्रमाणें व्यवस्थित संग्रह करावा लागतो तद्वतच **व्याकरणाच्या** कसोटीस लावून शब्दरत्नें मोठ्या काळजीनें आणि व्यवस्थित रीतीनें संग्रहित करावीं लागतात.
—के० १९०३-४२-४-३

१५९९

**व्यक्तिस्वातंत्र्य** ज्याचें त्यानें पाहिजे तर आपल्या व्यक्तीपुरतें वापरावें; पण हें त्याला स्वातंत्र्य आहे म्हणून त्या स्वातंत्र्याचे परिणाम आपल्या दुसऱ्या बांधवांवर लादणें कधींहि न्याय्य मानलें जाणार नाहीं.
—के० १९१८-३८-४-२

१६००

जगाचा **व्यवहार** चालण्यास नेहमीं क्रोध किंवा तेजहि उपयोगी नाहीं आणि नेहमीं क्षमाहि कामाची नाहीं; लोभासहि हाच न्याय लागू आहे; कारण संन्यासी झाला तरी त्याला मोक्ष हवाच असतो. —गी० ४७

१६०१

जगांतील **व्यवहार,** राष्ट्राराष्ट्रांतील व्यवहार—विशेषेंकरून जिंकलेल्या

१६०४

प्रेमबुद्धि ही एक चांगली शक्ति आहे. परंतु सर्वच जगाविषयीं समानतेनें आपण प्रेमबुद्धि बाळगूं असें म्हणणाऱ्या सद्भावी परंतु **व्यवहारशून्य** मनुष्यास आपल्या प्रेमबुद्धिरूप शक्तीचा दृश्य परिणाम जगांत कधींहि करून दाखवितां येणार नाहीं. —के० १९०१-१७-२-५

१६०५

खरें **व्यवहारोपयोगी शिक्षण** जबाबदारी आंगावर पडल्याशिवाय येत नाहीं, मग तें शिक्षण राज्यकारभारासंबंधीं असो अगर युद्धकलेसंबंधीं असो. —के० १९०२-५-४-४

१६०६

कार्याकार्याचा निकाल करणें हा ज्या ( व्यवसायात्मिक ) बुद्धींद्रियाचा व्यापार आहे, तें इंद्रिय ताळ्यावर असलें म्हणजे मग भलभलत्या वासना ( बुद्धि ) मनांत उत्पन्न होऊन मन बिघडत नाहीं. म्हणून प्रथम **व्यवसायात्मिकबुद्धि** शुद्ध व स्थिर केली पाहिजे असा गीतेंतल्या कर्मयोगशास्त्राचा पहिला सिद्धान्त आहे. —गी० १३६

१६०७

**व्यवसायात्मक बुद्धि** शुद्ध होण्यास पातंजल योगांतील समाधीनें, भक्तीनें, ज्ञानानें किंवा ध्यानानें परमेश्वरस्वरूप ओळखून सर्व मनुष्यांत एकच आत्मा आहे हें तत्त्व बुद्धींत ठसून गेलें पाहिजे. हिलाच आत्मनिष्ठ बुद्धि असें म्हणतात. व्यवसायात्मक बुद्धि याप्रमाणें आत्मनिष्ठ झाली आणि मनोनिग्रहानें मन व इंद्रियें तिच्या ताब्यांत वागण्यास शिकलेलीं असलीं म्हणजे इच्छा, वासना इत्यादि मनोधर्म ( किंवा वासनात्मक बुद्धि ) आपोआपच शुद्ध व पवित्र राहून शुद्ध सात्त्विक कर्माकडे देहेंद्रियांची साहजिकरीत्याच प्रवृत्ति होत असत्ये. अध्यात्मदृष्टया हेंच सर्व सदाचरणाचें मूळ म्हणजे कर्मयोगशास्त्राचें रहस्य आहे. —गी० १३९

१६०८

आपलें **व्यसन** शास्त्रोक्त मर्यादेच्या बाहेर जाऊं न देणें सामान्य मनुष्यास शक्य नसतें. —के० १९१५-१४-६-२

१६१०

अडाणी मनुष्य **व्यसनांत** पडण्यापेक्षां विद्वान् मनुष्य व्यसनांत पडल्यानें समाजाचें व देशाचें अधिक नुकसान होत असतें.

—के० १९०७-३७-४-२

१६११

**व्यसनासक्त** मनुष्य झाला म्हणजे संपत्ति उत्पादन करण्याचीं सर्व उपसाधनें त्या व्यक्तीपासून पळून जातात आणि तो पुरुष आपला, आपल्या बायकोचा व मुलाबाळांचा आणि आपल्या देशाचा नाश करून देशामध्यें भिकारी लोकांचा वर्ग वाढविण्यास मदत करितो.

—के० १८९०-७-३-२

१६१२

राष्ट्रावर व स्वकीयांवर प्रेम करा म्हणून **व्याख्यानांतून** सांगितल्यानें विद्यार्थी प्रेम करूं लागतात असें नाहीं; त्यांचे पुढें तसलें चालतें बोलतें उदाहरण असावें लागतें. त्याखेरीज मन इष्ट गोष्टीकडे धांव घेत नाहीं.

—के० १९००-४५-५

१६१३

हल्लींचा काल **व्याख्यानें** ऐकत बसण्याचा नाहीं, त्यांतील तत्त्व कृतींत कसें उतरावें याचा विचार प्रत्येकानें केला पाहिजे.

—के० १९१७-५५-४

१६१४

आज आमच्या देशांतील व्यापार सर्वस्वीं बुडालेला आहे, आणि तो इंग्रजांनीं जाणूनबुजून बुडविलेला आहे हें जगप्रसिद्ध आहे. आपल्या देशांतील बुडालेला हा **व्यापार** किंवा उद्योगधंदे पुनः या देशांत सुरू करणें हें आपलें कर्तव्य आहे. —च० सु० ८३

१६१५

परचक्रापासून आमचें संरक्षण उत्तम रीतीनें होत आहे हें खरें; पण मुसलमानांच्या टोळ्या किंवा त्यांच्या तरवारी यांच्या ऐवजीं परकी व्यापारी व त्यांचा **व्यापार** या देशांत येऊन त्यांनीं जी नासाडी केली आहे ती त्याहिपेक्षां फार भयंकर आहे. —के० ले० २-२४६

१६१६

राष्ट्राचें वैभव शांतिसमाधानाच्या काळीं केवळ **व्यापार** आणि उदीम यांजवर अवलंबून असतें. —के० १८९०-३९-२-४

१६१७

राजकीय हक्क आणि **व्यापार** हीं एकमेकांस सोडून कधींहि वृद्धिंगत व्हावयाचीं नाहींत. —के० १९०२-५२-४-५

१६१८

अप्रतिबंध **व्यापाराचें** तत्त्व जरी सयुक्तिक असलें तरी तें ज्या दोन देशांतील व्यापारधंदे सारख्याच उत्कर्षदशेस आले आहेत त्यांसच लागू पडतें. इतरांस पडत नाहीं. किंबहुना जेव्हां एकादा देश शेतकऱ्यांनींच भरलेला असतो तेव्हां शेतकीच्या स्थितींतून त्यास काढून त्यांत उदीम-धंद्याचें बीजारोपण करण्यास खुल्या व्यापाराचें तत्त्व सोडून देऊन सप्रति-बंध व्यापाराचें तत्त्वच अंगीकारलें पाहिजे. —के० ले० २-४४७

१६१९

हल्लींचा काळच असा आहे कीं, आपल्याजवळ कोणतीहि उत्तम वस्तु असली तरी जगाच्या चढाओढीच्या **व्यापारांत** ती मांडून तिची योग्यता स्थापित केली पाहिजे. —के० १९०२-२७-४-३

१६२०

**व्यापारांतला** पहिला अनुभव पदरचे पैसे खर्च करूनच विकत घ्यावा लागतो. —के० १८९९-३०-३-२

१६२१

इमानीपणा, दृढानुसरण, ज्ञान आणि चातुर्य या गोष्टींचें साहाय्य **व्यापारास** अवश्य पाहिजे. —के० १८९०-७-३-१

१६२२

मानसिक श्रम करण्यास शारीरिक **व्यायाम** आवश्यक आहे.

—के० १८९०-३३-३-१

१६२३

काल जसजसा बदलतो तसतसे **व्यावहारिक धर्मां**ताहि फरक पडत जातात, आणि त्यामुळें एखाद्या प्राचीनकालच्या गोष्टीच्या योग्यायोग्यतेबद्दल निर्णय करणें असल्यास तत्कालीन धर्माधर्म समजुतींचाहि अवश्य विचार करावा लागतो.

—गी० ४८

१६२४

ज्याचा राजकीय अंमल त्याचाच **'शक'** चालावयाचा हें उघड आहे. छत्रादिकांप्रमाणें शक हेंही एक महाराजचिन्हच होय.

—के० १९०१-२-२-४

१६२५

'लाखों रुपयांचा व्यापार करणारे लोक गाढव आणि बेकनचीं दोन पुस्तकें घोकून नाकावर चष्मा ठेवलेला ग्रॅज्युएट **शहाणा'** हें म्हणणें कोणास शोभत असेल तें शोभो; आम्हांस तर तें अत्यंत त्याज्य व अश्लाघ्य वाटतें.

—के० १८९५-४५-२-५

१६२६

स्मशानमें भी शांतता रहती है और देवालयमें भी शांतता रहती है। हिंदुस्थानमें जो **शांतता** है वो नामर्द पराक्रमहीन शांतता है।

—स्व० मो० (३) ३७

१६२७

हुरळलेले लोकांस शुद्धीवर आणण्यास **शाब्दिक उपदेश** पुरा पडत नाहीं.

—के० १८९०-३८-३-२

१६२८

इंग्रजी शिक्षणाच्या पहिल्या घोटाबरोबर जो अव्यवस्थितपणाचा मद आला होता तो **शास्त्रीबोवांनीं** दूर केला हें आपणांस कबूल केलें पाहिजे.

—विष्णु० २२

१६२९

**शास्त्रीय विषयांचें** अध्ययन करते वेळीं, प्राच्य व पाश्चात्य हा भेद न मानतां सत्याचेंच मधुकर वृत्तीनें ग्रहण केलें पाहिजे.

—के० १८९६-१८-२-३

१६३०

**शास्त्रीय विषयाच्या** विवेचनांत केवळ सत्यनिरीक्षणाच्या दृष्टीनेंच वागलें तरच शास्त्रीय सिद्धांत बरोबर निघण्याचा संभव असतो.

—के० १८९३-३०-२-४

१६३१

सर्वच **शास्त्रीय शोध** प्रथमतःच कांहीं परिपूर्ण नसतात; करतां ते अमलांत आणतांना चांगली सावधगिरी नेहमीं राखली पाहिजे.

—के० १८९९-४३-३-४

१६३२

जी गोष्ट प्रमाणांनीं व अनुभवानें सिद्ध होईल तीच सर्वांनीं ग्राह्य केली पाहिजे, व असा ज्याचे मनाचा कल नसेल त्याचे हातून **शास्त्रीय शोध** कधींहि व्हावयाचा नाहीं. —के० १८९९-४२-३-२

१६३३

मुळाशीं पाहिलें म्हणजे सर्व शास्त्रें एकरूप आहेत. माणसानें आपल्या सोयीसाठीं **शास्त्रें** निरनिराळीं कल्पिलीं, पण सर्व शास्त्रें मुळांत एक आहेत. गणितांत काव्य आहे व काव्यांत गणित आहे!—आ०आ० १-७९.

१६३४

अनीतीच्या प्रसाराला मोठमोठ्या शाळाच अप्रत्यक्ष रीतीनें कारण

१६३६

राजाचा नोकर म्हणून–परकीय राजाचा नोकर म्हणून–लोभानें बांधला गेलेला अथवा त्या लोभाचा अनेक वर्षें मनावर परिणाम होऊन विचार व मन संकुचित झालेला **शिक्षक** खरा विद्यागुरु नव्हे.

—के० १९०५-४२-४-४

१६३७

शाळेंत जरूर असलेलें धर्मशिक्षण देण्यास जरी अनेक साधनें आहेत तरी **शिक्षकांच्या** वर्तनाचा कित्ता हेंच उत्कृष्ट साधन आहे.

—के० १९०३-३७-२-५

१६३८

आमच्या विद्यार्थ्यांच्या **शारीरिक शिक्षणाची** आम्हीं फार काळजी घेतली पाहिजे.

—व्या० १-८८

१६३९

आमचे तरुण स्वराज्याच्या हक्कासाठीं भांडण्यास व स्वराज्य संपादन करण्यास तयार होतील, असें **शिक्षण** आम्हांस द्यावयाचें आहे.

—व्या० १-९४

१६४०

सरकारी शाळांतील **शिक्षण** गुलामगिरीच्या वळणावर मिळत असतें.

—व्या० १-९१

१६४१

परतंत्र देशांतील तरुण पिढीचें **शिक्षण** देशांतील विद्वान् पुढारी लोकांच्याच हातांत पाहिजे; तें परकीयांचे हातांत उपयोगी नाहीं.

—के० १९०५-२७-५-३

१६४२

अलीकडे आमच्या देशांतील शाळांतून जें **शिक्षण** मिळतें तें निव्वळ तार्किक असल्यामुळें धर्मविचारांची विद्यार्थ्यांच्या मनांत जागृति न होतां उलट स्वधर्माचीच नव्हे तर, धर्ममात्राचीहि टवाळी करण्यास ते प्रवृत्त होतात.

—के० १९०२-२७-४-२

१६४३

धर्मबंधनेंच नको आहेत अथवा ईश्वराचें अस्तित्व नाकबूल न केलें तरी समाजव्यवस्था पीनल कोडानें बद्ध असली म्हणजे पुरे आहे, अशी आमच्यामधील सुशिक्षित म्हणविणाऱ्या लोकांची आध्यात्मिक स्थिति होण्यास शाळांतून व कॉलेजांतून चाललेलें शिक्षण हेंच मुख्य कारण असून तें सुधारल्याखेरीज आध्यात्मिक किंवा दुसऱ्या कोणत्याहि प्रकारची खरी कळकळ सुशिक्षितांत उत्पन्न व्हावयाची नाहीं.

—के० १८९९-४४-२-५

१६४४

देशांतील शिक्षण वास्तविक म्हटलें म्हणजे देशांतील लोकांची उन्नति होण्यासाठींच आहे. —के० १९०१-४१-२-३

१६४५

देशांतील सर्व प्रजा ही शिस्तीच्या दृष्टीनें सैन्याप्रमाणें आहे. सैन्यानें चाल करावयाची झाल्यास सर्वांनीं मिळून चाल करावी लागते. उगाच कांहीं थोड्या लोकांनीं पुढें जाऊन फायदा होत नाहीं.

—के० १९१९-३९-२-३

१६४६

वरिष्ठ प्रतीचें शिक्षण होतां होईल तितकें सरकारच्या कह्यांत नसावें हें राजकीय तत्त्व सुधारलेल्या देशांत सर्वसंमत आहे. —के०ले० २-५१७

१६४७

राज्यकर्ते व प्रजा यांचें हितैक्य झाल्याखेरीज देशांतील शिक्षणक्रम राष्ट्राला खरोखर हितकारक व फायदेशीर करणें दुरापास्त आहे.

—के० १९००-१-२-५

१६४८

कोणत्याहि देशांतील शिक्षणक्रम हा त्या राष्ट्राच्या भावी उन्नतीचा पाया आहे. —के० १९००-१-२-५

१६४९

सामग्री चांगली असतां तीपासून फलनिष्पत्ति चांगली न झाल्यास तो दोष **शिक्षणक्रमाचाच** आहे. —के० १९००-१-२-५

१६५०

**शिक्षण** लोकांच्या हातांत आल्याशिवाय आपली खरी सुधारणा व्हावयाची नाहीं. —आ० आ० १-६

१६५१

आम्हांला स्वराज्य मिळेल तर आम्ही पहिल्यानें **शिक्षण** सक्तीचें व मोफत करूं, मग दुसरी गोष्ट. —के० १९१७-१६-७-१

१६५२

कोणासहि जें **शिक्षण** द्यावयाचें तें त्याच्या पुढील आयुष्यक्रमाला उपयुक्त व साहाय्यकारी होईल असेंच दिलें पाहिजे.

—के० १९१६-८-६-२

१६५३

हल्लीं **शिक्षण** म्हणजे एक प्रकारचा चाकरी करून भाकरी मिळविण्याचा धंदा झाला आहे ! हें शिक्षण नव्हे, हमाली आहे; व त्यापासून राष्ट्राचा उत्कर्ष न होतां उलट अवनति होण्याचा संभव आहे.

—के० १९०१-४१-२-४

१६५४

जेणेंकरून देशांतील लोकांचें उद्योगधंद्याचें ज्ञान वाढून त्यांच्या निर्वाहाची सोय होईल, त्यांची नीति व देशाभिमान वाढेल, स्वतंत्र रीतीनें व इभ्रतीनें दिवस काढतां येतील आणि राजकीय व सामाजिक बाबतींत हितकारक कल्पनांचा प्रसार होऊन, लोकांस आपली स्थिति सुधारण्यास किंवा जास्त सुखकारक करण्यास सांपडेल अशाप्रकारचें **शिक्षण** देशांतील सर्व लोकांस मिळणें जरूर आहे. —के० १९०१-४१-२-३

१६५५

मागील पिढ्यांचा अनुभव पुढील पिढीस प्राप्त करून देणें याचें नांव **शिक्षण**. मग तें पुस्तकद्वारा मिळो अथवा अन्य तऱ्हेनें मिळो.

—व्या० २-५२

१६५६

देशांतील प्रत्येक पुरुष, स्त्री, मुलगा व मुलगी यांना **शिक्षण** मिळाल्याशिवाय कोणताहि देश ऊर्जितावस्थेला येऊं शकत नाहीं.

—स्व० मो० (२) २९

१६५७

जेणेंकरून राष्ट्रांतील पुरुष, स्त्रिया व मुलें अधिकाधिक ज्ञानसंपन्न होऊन राजकीय, सामाजिक, धार्मिक व औद्योगिक दृष्ट्या राष्ट्राची एकजुटीनें उन्नति करण्यास प्रवृत्त होतील तें खरें **शिक्षण** होय.

—के० १९०१-४१-२-३

१६५८

कोणताहि स्वतंत्र देश कोणत्याहि बाबतींत दुसऱ्या स्वतंत्र देशांच्या मागें पडूं लागला असतां तेथील लोक आपल्या राष्ट्रांतील शिक्षण वाईट आहे अशी लगेच ओरड करितात, व त्याप्रमाणें त्या त्या देशाच्या सरकारास **शिक्षणपद्धतींत** सुधारणा करावी लागते. —के० १९०१-४१-२-३

१६५९

मुलींकरितां स्थापलेल्या हायस्कुलांतून जें **शिक्षण** देण्यांत येतें, तें संसारांत शिरणाऱ्या स्त्रियांना इतकें अनुपयुक्त आहे कीं, थोड्यांशा लिहिण्यावाचण्याचा फायदा झाला, तरी इतर गोष्टींत त्या संसारांत अगदीं निरुपयोगी होतात. —के० १९०१-४१-२-४

१६६०

विद्या आणि **शिक्षण** या दोन शक्तिच अशा आहेत कीं, बुद्धिवान् माणसांस त्यांच्यायोगें वाटेल तें सामर्थ्य येऊं शकतें.

—के० १९०६-४८-४-३

१६६१

समाजांतील प्रत्येक पुरुष किंवा मूल याला केवळ लिहिणें-वाचणेंच नव्हे तर नागरिकत्वाचे हक्क व जबाबदारी कळण्याचें **शिक्षण** मिळेल तेंच राष्ट्र खरें. —के० १९१७-१६-७-१

१६६२

बुद्धीला हवें तसें वळण लावावयाचें असल्यास **शिक्षण** हें मुख्य साधन आहे. —के० १९१६-१९-२-४

१६६३

मनाचा संकुचितपणा नाहींसा करून तें विस्तृत, विकसित व उदात्त करणें, त्याचप्रमाणें आपल्या वृत्तींना सारें जग आपलेंसें वाटूं लावणें हा प्रभाव उच्च प्रतीच्या **शिक्षणाचा** होय. —के०१८९०-६-३-२

१६६४

राष्ट्रीयपक्षाला **शिक्षणाचा सर्व** झरा राष्ट्राच्या ताब्यांत हवा आहे.
—व्या० १-९१

१६६५

**शिक्षणाचा** खरा उपयोग प्रत्येक धंद्यांतील माणसास आपापल्या धंद्याचें काम जास्त चांगलें करावयास समर्थ करण्याचें आहे.
—के० १९०७-४६-७-१

१६६६

**शिक्षणाची** सक्ति पाहिजे असेल तर सरकारवर सक्ति करण्याची ताकद आली पाहिजे. —स्व० मो० (२) ३२

१६६७

निसर्गतः भिन्न अशा दगडावर किंवा मातीवर पाहरेचा ज्याप्रमाणें निरनिराळा परिणाम होतो तसा **शिक्षणाचाहि** परिणाम भिन्न स्वभावाच्या लोकांवर भिन्न होत असतो. —के० १९०५-२७-५-२

१६६८

मनुष्य स्वभावत: कितीहि चांगला असला, तरी **शिक्षणानें** त्याच्या बुद्धीचा विकास झाल्याशिवाय देशाची उन्नति होत नाहीं.
—के० १९१६-२७-४-२

१६६९

स्वधर्म, स्वदेश, स्वभाषा यांबद्दल **शिक्षणानें** एक प्रकारची आस्था व कळकळ लोकांचे मनांत उत्पन्न झाली पाहिजे. —के० १९०१-४१-२-३

१६७०

आम्ही आपल्या मुलांना शिक्षण द्यावयाचें आणि गोठ्यांतल्या गुरांना शिक्षण द्यावयाचें यांमध्यें जो फरक आहे तो फरक स्वतंत्र देशांतील शाळेंत दिल्या जाणाऱ्या **शिक्षणांत** व येथें सरकारी शाळांत दिल्या जाणाऱ्या शिक्षणांत आहे. —व्या० १-२३

१६७१

राष्ट्रपुरुषाची सर्व तऱ्हेनें उन्नति करणारें शिक्षण आणि राष्ट्रीयत्वाची ओळख करून देणारें तें **शिक्षण राष्ट्रीय** होय. —व्या० २-१२६

१६७२

वरिष्ठ प्रतीच्या **शिक्षणापासून** एक मोठा फायदा हा झाला पाहिजे कीं, स्व-मत पूर्ण विचारांतीं ठरल्यानंतर सुशिक्षित मनुष्यानें तें प्रतिपादण्यास व होतां होईल तों वर्तणूक ठेवण्यास डगूं नये. —के० १८९०-६-३-२

१६७३

मनुष्याचें **शील** व मतें बनण्यास शिक्षण हें एक कारण आहे खरें;

१६७७

हिंदुस्थानांतील **शेतकरी** लोकांस तुरुंगांतील कैद्याइतकेंहि अन्न मिळत नाहीं. –च० सु० ७५

१६७८

हिंदुस्थानांत शेतकरी हा राष्ट्राचा आत्मा आहे. त्याच्यावरील मालिन्याचा पगडा जर दूर करतां आला तरच हिंदुस्थानचा उद्धार होईल. याकरितां **शेतकरी** आपला व आपण शेतकऱ्याचे असें आपणांस वाटावयाला हवें. –आ० आ० २-३८

१६७९

**शेतकऱ्यांचा** खरा बचाव ज्यास करणें असेल त्यानें त्यांच्याकरितां शेतकीखेरीज दुसरे धंदे देशांत निर्माण होतील अशी तजवीज केली पाहिजे; किंवा शेतींतच अशा सुधारणा करावयास पाहिजेत कीं, जेणेंकरून जमिनीचें उत्पन्न वाढून त्यानें, इतर धंदे बुडाल्यामुळें उदरनिर्वाहार्थ जमिनीवर ज्या लोकांचा जास्त भार आला त्यांची सोय होईल. –के० ले० २-२४६

१६८०

१६८४

**शेतसाऱ्याची** वाढ खुंटल्यामुळें प्रजेस एक प्रकारचा कायमपणा वाटतो व शेतांत जे श्रम आपण करूं त्या सर्वांचा फायदा आपल्याच पदरांत पडेल याविषयीं त्यांस संशय नसल्यामुळें त्यांचे हातून जमिनींकडे पैसा व श्रम यांचा व्यय होऊन शेतकीची सुधारणा होते.

—के० १९०१-३-२-५

१६८५

**शौर्य** हा गुण खरा, पण वाघाच्या अंगांतील शौर्यास लोक क्रौर्य असें नांव देतात. गुण तेच खरे, पण त्याला अधर्माची जोड असल्यास तेच दुर्गुण होतात. —के० १९१५-१९-११-५

१६८६

सर्व जगाचा सूत्रचालक परमेश्वर जसें इच्छित असेल तसें घडून येईल अशी निरंतर **श्रद्धा** बाळगून प्रत्येकानें आपलें कर्तव्य करीत असावें.

—के० १९०३-२२-५-२

१६८७

**श्रद्धा** आणि विचार ह्यांच्या संगमापासून प्रादुर्भूत होणारी जी मोक्षरूप दिव्य संतति तिची कोणाच्यानेंहि बरोबरी करवणार नाहीं.

—के० १८९३-१५-२-३

१६८८

**श्रद्धा** हा मनोधर्म असा नाहीं कीं तो केवळ महाबुद्धिमान् पुरुषांसच लभ्य आहे. अगदीं अडाणी मनुष्यांस देखील श्रद्धेची उणीव पडत नाहीं.

—गी० ४०७

१६८९

**श्रद्धा** क्वचित् अनाठायीं किंवा अतिरिक्त असेल, क्वचित् निष्फळहि होईल; पण ती असल्याशिवाय कोणतेंहि मोठें कृत्य होणार नाहीं.

—के० १९०३-३७-४-३

१६९०

'देवा मला होमरूल दे' अशी प्रार्थना करा म्हणजे तुमची श्रद्धा दृढ असेल तर एक दोन वर्षांच्या आंत तुम्हांला स्वराज्य मिळाल्याशिवाय राहणार नाहीं. —च० सु० ८७

१६९१

बुद्धिमान् मनुष्यें नेहमीं थोडींच असणार. बुद्धिमान् पुरुष जें सांगतात त्यावर विश्वास ठेवून काम भागेल म्हणावें तर बुद्धिमान् पुरुषांमध्येंहि अनेक मतभेद आढळून येतात. शिवाय विश्वास ठेविल्यानें काम भागतें असें म्हणावें तर [illegible] करून घेण्यास 'विश्वास

१६९५

कोणत्याहि देशांत सामान्य जनसमूह धर्माचरण केवळ विश्वासानें व **श्रद्धेनेंच** करतो. —के० १९०४-३८-४-२

१६९६

रोग्याला सक्तीनें औषध पाजणें जितकें जरूर तितकेंच **सक्तीनें शिक्षण** देणें जरूर आहे. —स्व० मो० (२) २९

१६९७

सख्खा-**सावत्रभाव** जेथें उत्पन्न झाला तें घर बुडालें, असा संसारांतला अनुभव आहे. —व्या० २-६०

१६९८

'अद्वैत' मीमांसेचीं तत्त्वें सर्व जगास शिकविणाऱ्या शंकराचार्यांनींहि **सगुणमूर्ति** शंकराची उपासना करून मनास समाधान आणण्यापुरतें तरी जीवात्म्याचें व परमात्म्याचें द्वैत पाळलेंच. —के० १९०१-१७-२-५

१६९९

**सत्कर्माच्या** तेजापुढें विरुद्ध पक्षालाहि किंचित् तरी नम्र व्हावें लागतें. —के० १९०८-२३-४-४

१७००

लाखों दुर्जनांना सुख होईल त्यापेक्षां एकाच कां होईना, पण सज्जनाला ज्यामुळें संतोष होईल तेंच खरें **सत्कृत्य** होय, असें व्यवहारांत सर्व लोक समजतात. —गी० ८६

१७०१

मनांत एकप्रकारचा भित्रेपणा शिरल्यामुळें किंवा सद्गुणाचा ऱ्हास झाल्यामुळें **सती**संबंधाचे लोकांचे विचार पालटले असले पाहिजेत. —के० १९०१-३०-२-५

१७०२

कोणताहि **सद्गुण** झाला तरी तो सर्वच प्रसंगीं साजतो असें नाहीं. —गी० ४७

१७०३

लहानपणापासून निदान मला तरी असें वाटे कीं, आपण नेहमीं असें **वाचावें व लिहावें** कीं, ज्याचा या परम गूढ विश्वाच्या अतर्क्य व अपूर्व बांधणीचा बोध होण्यास व तिचा समर्पक शोध लावण्यास उपयोग होऊन त्याचा आपल्या प्रयत्नानें जीवकोटीच्या उन्नतीस अधिक उपयोग होईल, इतकेंच नव्हे, तर चराचर वस्तुगत स्वयंभु शक्तीचें सर्वैक्य करून शक्य तर **सत्-चित्-आनंद** याचा अनुभव सर्वांस प्राप्त करून घेतां येईल.

—आ० आ० १-१-२००

१७०४

**सत्तेची** आणि शहाणपणाची फारकत झाल्यानंतर निव्वळ सत्तेनें केलेल्या गोष्टी लोकांस असह्य होऊन लोकांचे सत्तेबद्दल असलेले समजहि पालटत जातात. —के० १८९४-३९-३-१

१७०५

मनुष्य म्हणजे केवळ एखादें घड्याळ अगर यंत्र नव्हे, हें आपण लक्षांत ठेविलें पाहिजे. सर्व **सत्पुरुष** जगाच्या कल्याणासाठीं झटत असतात खरें; पण उलट जो कोणी लोकांच्या कल्याणासाठीं झटतो तो प्रत्येक इसम साधुच असला पाहिजे असें निश्चयात्मक उलट अनुमान करितां येत नाहीं; मनुष्याचें अंतःकरण कसें आहे हेंहि पहावयास पाहिजे. —गी० ८७

१७०६

एखादा मोठा दुर्धर रोग झाला असतां वैद्याच्या मदतीशिवाय त्याचें निदान व चिकित्सा होणें जसें शक्य नसतें, त्याचप्रमाणें धर्माधर्म-संशयाच्या बिकट स्थलीं **सत्पुरुषाच्या** मदतीखेरीज 'पुष्कळांचें पुष्कळ हित' एवढ्या एकट्याच साधनानें कोणीहि सामान्य मनुष्य आपण स्वतःच धर्माधर्माचा बिनचूक निर्णय करण्याचा अभिमान बाळगील तर तो व्यर्थ होय.

—गी० ४०२

१७०७

आपलें **सत्य** स्वरूप सिद्ध करण्यास सुवर्णाला अग्नींत शिरून दिव्य करावें लागतें व हिऱ्याला घणाचे घाव सोसावे लागतात.

—के० १९००-१७-३-१

१७०८

लोकहित आणि **सत्य** यांच्याबरोबर निवळ जुलुम व दांडगाई यांचा झगडा आरंभीं जरी जुलमाच्या पक्षास अनुकूल आहे असें भासलें, तरी अखेरीस लोकहित व सत्य यांचाच विजय होत असतो.

के. १९०५-५-५-१

१७१५

**सत्या**सारखी पॉलिसी नाहीं व इतर मार्गानें जाणें हें राष्ट्रास किंवा व्यक्तीस केव्हांहि हितावह व्हावयाचें नाहीं. —के० १९००-४-३-२

१७१६

**सदसद्विवेकबुद्धीची** आज्ञा पाळण्याला जर मनुष्य तयार होत नसेल तर तो आत्मज्ञानच विसरला. —व्या० २-३५

१७१७

ज्यांचीं मनें शुद्ध व आत्मनिष्ठ आहेत, त्यांनीं आपल्या अंतः-करणाची साक्ष घेणें कांहीं गैर नाहीं. किंबहुना त्यांनीं आपलें मन होईल तितकें शुद्ध करून कोणतेंहि कर्म करण्यापूर्वीं त्याची साक्ष घेतली पाहिजे असेंहि म्हणतां येईल. पण लुच्च्या लोकांनीं 'आम्हीहि त्याचप्रमाणें वागतों' असें म्हणण्यांत कांहीं अर्थ नाहीं. कारण, दोघांची **सदसद्विवेचन-शक्ति** एक नसून सत्पुरुषांची सात्त्विक तर चोरांची तामस असते.

—गी० १४०

१७१८

आमचे शास्त्रकार म्हणतात त्याप्रमाणें **सर्वभूतहित** हें ज्ञानी पुरुषांच्या
[illegible]

१७२०

**सनदशीर चळवळीचा** हक्क सरकारचे मर्जीवर अवलंबून असत नाहीं, तो ज्याचा त्याचा जन्मसिद्धच असतो. —के० १९१७-३१-४-५

१७२१

जोंपर्यंत **सनदशीर चळवळीचा** मार्ग सर्वांसच पसंत आहे तोंपर्यंत एखादा मनुष्य शीघ्रगामी किंवा तापट आणि एखादा जरा मंदगामी किंवा मवाळ असल्यास दोघांचें समीकरण होण्यास त्यामुळें कोणताहि प्रत्यवाय येऊं नये, आणि खासगी मनोवृत्तीस किंवा मानापमानास भुलून जो हें तत्त्व सोडून देतो तो राष्ट्राचा हितकर्ता मानतां येत नाहीं.

—के० १९१६-१९-४-३

१७२२

कुबेरासारखा कोट्याधीश सावकार बाजारांत भाजी खरेदी करावयास गेला तर कोथिंबिरीच्या गड्डीस ज्याप्रमाणें तो लाख रुपये देत नाहीं तद्वत् पूर्णसाम्यावस्थेस पोंचलेला पुरुष कोणाला काय योग्य, हें तारतम्य विसरत नाहीं. त्याची बुद्धि सम असत्ये खरी; पण **समता** या शब्दाचा अर्थ गाईचा चारा मनुष्यास आणि मनुष्याचें अन्न गाईस घालावें असा करावयाचा नाहीं. —गी० ३९१

१७२३

सर्वच जेथें स्थितप्रज्ञ त्या समाजांतील पराकाष्ठेची नीति किंवा धर्माधर्म आणि लोभी पुरुषांचाच ज्यांत भरणा विशेष त्या समाजांतील धर्माधर्म हे थोडेतरी भिन्न असलेच पाहिजेत; नाहींपेक्षां साधुपुरुषास हें जग सोडून द्यावें लागेल; आणि दुष्टांचेंच सर्वत्र साम्राज्य होईल. साधुपुरुषानें आपली **समताबुद्धि** सोडिली पाहिजे असा याचा अर्थ नाहीं; तथापि समते-समतेमध्येंहि भेद आहे. —गी० ३७३

१७२४

इंग्रजींत ज्यास moral force असें म्हणतात व ज्यास आम्ही अदृष्ट-साधन असें नांव देतों त्या साधनाची राष्ट्रीय उन्नतीस अनुकूलता करून देणें हेंच श्रीरामदासांसारख्या **समर्थांचें** अत्यंत महत्त्वाचें काम होय.

—के० १९०१-१०-२-५

१७२५

साधुपुरुषांच्या साम्यबुद्धीचें वर्णन करितांना ज्ञानेश्वरमहाराजांनीं त्यांस पृथ्वीची उपमा दिली आहे. या पृथ्वीलाच 'सर्वसहा' असें दुसरें नांव आहे; पण ही 'सर्वसहा'बाई देखील तिला कोणी लाथ मारिली तर लाथ देणाऱ्याच्या पायाच्या तळव्यावर तितक्याच जोराचा प्रत्याघात करून आपली **समता**बुद्धि व्यक्त करीत असते ! —गी० ३९१

१७२६

व्यक्ति मिळूनच **समाज** झालेला आहे; आणि कोणाहि व्यक्तीनें आपल्या प्रयत्नाखेरीज समाजाचा ओघ पालटेल अशी अपेक्षा करणें बरोबर नाहीं. —के० १९००-४५-२-४

१७२७

बहुजनसमाजानें एकचित्त होऊन कोणतीहि गोष्ट करण्यास **समाजाचा** छलच व्हावा लागतो. —के० १९०६-२१ ४-४

१७२८

जसा प्रत्येक मनुष्य स्तुतिप्रिय असतो तसा **समाजहि** स्तुतीला भाळणाराच आहे. —के० १८९०-४८-२-२

१७२९

**समाजबंधनें** कोणत्या प्रकारचीं असावीं याचा निर्णय करणें आणि त्यांचा अंमल करणें या दोन्हींहि गोष्टी समाजाच्याच हातीं पाहिजेत.

—के० १८९३-३२-३-१

१७३०

स्वतंत्रतेचा किंवा राष्ट्रीयत्वाचा अभिमान म्हणून जो कांहीं जोम आहे तो जोंपर्यंत जागृत असतो तोंपर्यंत **समाजरचना** कशीहि असली तरी त्यांतील दोष राष्ट्राच्या उन्नतीस अथवा भरभराटीस आड येत नाहींत.

—के० १८९६-४-२-४

१७३१

**समाजरचनेपेक्षां** लोकांमध्यें एकप्रकारचा आपल्या संस्थांबद्दल व देशाबद्दल अभिमान जागृत ठेवण्याची प्रत्येक देशकल्याणाकरितां झटणाऱ्या माणसानें आधीं तजवीज ठेविली पाहिजे. —के० १८९६-४-२-४

१७३२

कोणत्याहि **समाजरचनेंत** थोडे तरी दोष असतातच; परंतु या दोषांकडे दुर्लक्ष करून लोकांमध्यें एकप्रकारचा हुरूप, अभिमान, कर्तृत्व-शक्ति, उन्नतीची आशा उत्पन्न करणें यांतच राष्ट्राचें हित आहे.

—के० १८९४-१८-२-५

१७३३

कोणतीहि **समाजव्यवस्था** घ्या, तींत दूषणें असतात; व तो कांटा सुज्ञ मनुष्य पाय कायम ठेऊन सोयीनें काढून टाकतो; पण कांटा दिसल्या-बरोबर सुधारक मंडळी आधीं पाय तोडणार व मग अमेरिकेंत कोणी शोध लावला असल्यास तेथें लांकडी पाय आणून लावणार!

—के० १९०३-९-४-४

१७३४

हजारों वर्षें चालत आलेली **समाजव्यवस्था** व रचना आपण चुटकी-सरशी उडवून देऊं असें मानणारा किंवा म्हणणारा मनुष्य उपहासास पात्र झाल्यास त्याचा दोष लोकांकडे देणें चुकीचें होय.

—के० १९०१-१२-२-२३

१७३५

वेष, भाषा, किंबहुना रीतीरिवाज हीं **समाजव्यवस्थेंतील** उपकरणें आहेत; देशकालानुरोधानें व उद्दिष्ट हेतु साधण्याकरितां त्यांत फरक करावाच लागतो. —के० १९०३-२३-४-५

१७३६

ज्यास हिंदुधर्माचा किंवा सामान्यत्वें हिंदुत्वाचा अभिमान नाहीं त्यास हिंदुलोकांनीं काय **समाजसुधारणा** करावी हें सांगण्याचाहि पण अधिकार नाहीं. —के० १९०४-१-४-४

१७३७

राष्ट्रीयत्वाची दिशा सुटली म्हणजे **समाजसुधारणा** झाली काय आणि न झाली काय सारखीच होय. —के० १९०५-२-५-१

१७३८

कोणतीहि गोष्ट एकदम कोठेंच उत्पन्न होत नसून तिची वाढ हळुहळू व बराच वेळ पूर्वीं होत असत्ये आणि अशी वाढ जेथें नजरेस येत नाहीं तेथें ती गोष्ट प्रायः परकी देशांतून किंवा लोकांपासून घेतलेली असत्ये असा **समाजशास्त्राचा** सामान्य सिद्धांत आतां ठरलेला आहे. —गी० ५८३

१७३९

**समाजसुधारणेचा** ज्यांस उद्योग करावयाचा आहे त्यांनीं अगोदर आपण धर्माचीं मोठीं मोठीं बंधनें पाळण्यास कबूल असून आपण त्याप्रमाणें आचरण ठेवतों किंवा ठेवूं अशी लोकांची खात्री करून दिली पाहिजे. —के० १८९१-३०-३-३

१७४०

**समाजाचें** मन वळणें ही फार कठीण गोष्ट आहे. विशेषतः आपल्या कोत्या काच-चक्षूंतून समाजाकडे बघणाऱ्या व समाजाचीं सुखदुःखें समजावून न घेतां टीका करीत बसणाऱ्यांना तर ती कधींहि साध्य होणार नाहीं. —के० १८९९-३८-३-१

१७४१

समाजास कांहीं बंधनें पाहिजेत आणि तीं बंधनें कायम राहण्यास प्राचीन संस्थांचा एक प्रकारचा अभिमान ज्यांस नाहीं किंवा समाजाचीं बंधनें वाटेल तेव्हां तोडण्यास जे नेहमीं तयार असतात अशांनीं **समाजसुधारणेची** ध्वजा हातीं घेऊन लोकांचे पुढारी होण्याची हांव धरणें अत्यंत अप्रयोजक व उपहासास्पद होय. —विष्णु० १५

१७४२

**समाजाच्या स्थितींत** जी कांहीं कोणास पालट करावयाची असेल ती व्यवस्थेनें व बेताबातानेंच केली पाहिजे, व जी पालट करावयाची तीहि अशी असली पाहिजे कीं, तिची उपयुक्तता चटकन् लोकांच्या लक्षांत येईल. —के० १९०१-४३-२-३

१७४३

समाजावर तार्किक हल्ले करणें म्हणजे केवळ पाडापाडीचें काम करणें होय. त्यानें **समाजाचीं बंधनें** शिथिल होतात, पण नवीं मात्र उत्पन्न होत नाहींत. —के० १९१६-२७-४-२

१७४४

**समाजाचे** जे घटकावयव असतात त्यांच्यांत संघटन असलें पाहिजे, तरच समाज एकत्र धरला जाऊन त्याची वाढ अबाधित होत जाते. —के० १८९०-२१-३-४

१७४५

**समाजांतील** रूढ आचार ज्यास पालटावयाचे असतील त्यांनीं आपला पक्ष शास्त्रसिद्ध असला तरीहि धिमेपणानें थोडीतरी अडचण सोसण्यास तयार असलें पाहिजे. —के० १९००-४५-२-४

१७४६

रथाचे घोडे इकडे तिकडे जाऊं न देतां उत्तम सारथी ज्याप्रमाणें त्यांना सरळ रस्त्यानें घेऊन जातो त्यासारखाच प्रयत्न मनुष्याला समाधीसाठीं करावा लागतो. मन एकीकडून आंवरावयाला जावें तों दुसरीकडे फुटत असतें. व हें बंद पडल्याखेरीज **समाधि** लागणें शक्य नाहीं. —गी० ७०४

१७४७

**समानतेनें** प्रेम वाढतें व प्रेमानें एकजीव होतो. —स्व० मों० ६०

१७४८

**समानहितत्व** हें मनुष्यें एकाच धर्माचीं किंवा एकाच चतुःसीमेंत राहणारीं किंवा एकच भाषा बोलणारीं असलीं म्हणजे हटकून साधतेंच असें नाहीं. —के० १९०१-१७-२-५

१७४९

धर्मसंबंधीं विचार किंवा ईश्वराची भक्ति ही एकांतांत बसून केली तरी चालते; पण सामान्य जनांच्या जागृतीसाठीं थाटमाट किंवा **समारंभ** (Demonstration) अवश्य पाहिजेत. —धा० २२६

१७५०

कोणत्याहि **समारंभाचा** मुख्य उद्देश म्हटला म्हणजे ज्याविषयीं समारंभ करावयाचा त्याविषयीं लोकांचें मनावर विशेष प्रकारचा ठसा उमटवून उदात्त कल्पना उत्पन्न करावयाची हा असतो.

—के० १९०२-३२-४-३

१७५१

कोणत्याहि देशांतील लोक **समृद्ध** आहेत कीं नाहींत हें पाहणें असल्यास त्या देशांतील अगदीं हलक्या प्रतीच्या लोकांस कोणतें अन्नवस्त्र व राहण्याची जागा असते हें पाहिलें पाहिजे. —च० सु० ७५

१७५२

**सरकार** हें नपुंसकलिंगी भाववाचक नाम असून परमेश्वराप्रमाणें त्याची क्रिया निर्हेतुक असावयाची असा सिद्धांत मोठमोठ्या लोकांकडून आम्हांस सांगण्यांत येत असतो. परंतु परमेश्वराच्या मागें जशी मायेची उपाधी आहे तशी सरकारच्या मागेंहि सरकारचीं सूत्रें हलविणाऱ्या लोकांची असल्यामुळें आणि ते लोक इतर मनुष्यांप्रमाणें सर्व मानवी विकारांस पात्र असल्यामुळें ते आपल्याबरोबरच सरकारास अंध करून कुमार्गास लावतात असा अनुभव आहे. —के० ले० २-५८१

१७५३

**सरकार** म्हणजे प्रजेच्या कल्याणासाठीं अस्तित्वांत आलेली संस्था, अशा दृष्टीनें पाहूं गेल्यास प्रजेच्या सांपत्तिक स्थितीच्या मुळाशीं सर्वतोपरी सरकारचें धोरण असतें, असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. —के०ले०२-३६०

१७५४

मी गरीब झालों म्हणजे माझा सरकारावर हक्क नाहीं असें मुळींच नाहीं. नव्हे, **सरकार** हें श्रीमंताकरितां नाहीं, तें गरीबाकरितांच आहे.

—स्व० मो० (२) ३५

१७५५

**सरकार** एकमुखी झालें म्हणजे पहिला दोष असा कीं, तें आपल्या घमेंडीवर राज्य चालवितें. स्व० गी० १७

१७५६

इंग्रजी राज्यांत **सरकार** हें निर्जीव, निरिंद्रिय आणि निराकार असें भाववाचकनाम झालें आहे. —के० ले० १-२८४

१७५७

**सरकार** म्हणून सरकाराला एक प्रकारचें कर्तव्य आहे; सरकाराला एक प्रकारचा धर्म आहे; एक प्रकारची जबाबदारी त्याचे अंगावर आहे. ती जेव्हां जबाबदारी सरकार टाळील तेव्हां तें सरकारच नव्हे असें मी म्हणतों. —ज. ३०-३१

१७५८

कायद्यानें प्रस्थापित झालेलें **सरकार** याचा अर्थ अधिकाऱ्यां-व्यतिरिक्त जी सरकारची सत्ता ती होय. अधिकारीवर्ग म्हणजे सरकार नव्हे. —ख० १५५

१७५९

**सरकार** मला फार तर शारीरिक निर्बंध घालूं शकेल, पण त्यांना माझे डोक्यांतील ईश्वरदत्त देणगी काढून घेतां येणें कदापिहि शक्य नाहीं. —आ० आ० १-१६०

१७६०

**सरकारचे हेतु** चांगले आहेत म्हणून सरकारतर्फे एक सबब नेहमीं सांगण्यांत येत असते. पण या सबबींत कांहीं अर्थ नाहीं. आमच्या शेतकऱ्यांचीं तोंडें चित्रांतील चेहऱ्याप्रमाणें सुबक नाहींत म्हणून तीं नीट करण्याकरितां चांगल्या हेतूनें जर त्यांच्या थोबाडींत कोणी भराभर देऊं लागला, तर त्याच्या सद्धेतूची आम्ही जितकी तारीफ करूं तितकीच सरकारच्या सद्धेतूची केली पाहिजे. —के० ले० २-२७१

१७६१

धार्मिक बाबतींत सहिष्णुता असावी, आणि स्वतःपुरता ज्याचा त्याचा धर्म ज्याला त्याला पवित्र असून इतरांनीं त्यांत बिघाड करण्याचा प्रयत्न केल्यास त्यापासून त्या धर्माचें रक्षण करणें हें **सरकारचें न्याय्य कर्तव्य** आहे. —का० जा०

१७६२

आपलें दुःख नाहींसें करण्याकरितां स्वतः कामास लागलें पाहिजे व नंतर **सरकारचें साहाय्य** मागितलें पाहिजे. —के० १९१७-६-७-४

१७६३

**सरकारच्या** बरेवाईटपणाबद्दल विचार करावयाचा असतां राष्ट्रांतील संपत्ति वाढविण्यासाठीं सरकारनें कोणकोणते उपाय अमलांत आणले आहेत व आपल्या अमलाखालीं असलेल्या लोकांस अधिक द्रव्यार्जन करतां येण्याच्या कामीं कसकसें सहाय्य केलें आहे हें पहाणें आवश्यक आहे.

—के० ले. २-३६०

१७६४

चित्त मिळालें तर वित्त मिळेल हें **सरकारला** समजाविलें पाहिजे.

—स्व. मो. (२) ३६.

१७६५

या **सरकारास** दोन तोंडें, बाजू अगर स्वरूपें आहेत. एक शिवाचें आणि दुसरें विष्णूचें; पैकीं शिवाचें रुद्र स्वरूप दाखवून सरकारी अधिकारी लोकांस भिववीत असतात; पण या परीक्षेंतून मंडळी एकदां बाहेर पडली म्हणजे विष्णूचें सौम्य स्वरूप दिसावयास लागतें! —के० ले० १-५९५

१७६६

निर्गुण निराकार असें परब्रह्म निराळें आणि मायेच्या मोहांत यावयाला लागलें म्हणजे मग त्याला जें व्यक्त स्वरूप येतें तें निराळें. तर मग हे मायेचे जे व्यवहार ते पालटणारच. स्वराज्य जो शब्द निघाला आहे तो व्यक्त **सरकारासंबंधानें** आहे. अव्यक्त सरकार एक ठेवून व्यक्त सरकार जें क्षणोक्षणीं बदलणारें त्यांत कोणत्या प्रकारचा बदल झाला असतां आपल्या राष्ट्राला श्रेयस्कर होईल हा प्रश्न स्वराज्याचा आहे.

—ज० ५

१७६७

माझ्या देशबांधवांच्या हातानें खरपूस मार खाऊन मी घायाळ होऊन पडलों तरी हरकत नाहीं; पण मला **सरकारी** शिपायाची मदत घ्यावयाची नाहीं. —आ० आ० १-११४

१७६८

सर्व जगाचें दान करण्याचा संकल्प करावा; पण उदक सोडतांना मात्र झारीच्या तोंडांतून धार गळतां गळूं नये अशी **सरकारची** स्थिति आहे. --के० १९००-४२-३-२

१७६९

स्वार्थ मनुष्याला कोणत्याहि स्थितींत सोडीत नाहीं, व परकी अमलांत नेटिवानें **सरकारी नोकरी** पत्करल्यावर आपला स्वार्थ व सरकारी स्वार्थ एकच आहे असें मानून चालल्याशिवाय त्याचें भागतच नाहीं.

—के० १९०६-४४-४-३

१७७०

गंडकींत ज्याप्रमाणें शालिग्रामच निपजावयाचे तद्वत् **सरकारी नोकरीची** स्थिति आहे. —के० १९०४-१५-५-१

१७७१

कोणत्याहि राष्ट्रांतील लोकांनीं तरुणपिढीच्या शिक्षणाचें काम आपल्या हातीं घेतल्याखेरीज तें कधींहि नीट पार पडत नाहीं. **सरकारी शिक्षणाचा** ओघ एकतर्फी व आकुंचित असतो. —के० ले० २-७३

१७७२

**सरकारी नोकरीच्या** प्रवाहांत जे एकदां सांपडले त्यांचे कानेकोपरे झिजून जाऊन कांहीं वर्षांनीं ते शालिग्रामाप्रमाणें आपणांस लोकांनीं पूज्य मानावें, असें समजूं लागतात. —के० १९०४-१५-५-१

१७७३

**सरस्वती देवीचा** महिमा किंवा रमणीयत्व कोठपर्यंत, तर राज्यश्री देवीच्या तडाक्यांत ती सांपडली नाहीं तोंपर्यंत. —के० १९०५ ४३-४-२

१७७४

**सरस्वतीस** सरकारचा आश्रय पाहिजे खरा, पण तेवढ्याकरितां तिचें स्वातंत्र्य सरकारनें हिरावून घेणें केव्हांहि इष्ट नाहीं.

—के० १९०२-१०-४-५

१७७५

मी **सशस्त्र बंड** देखील सनदशीर समजतों; आज तें शक्य नाहीं इतकेंच; सशस्त्र बंडाला यश येईल, अशी कोणी आठ आणे जरी खात्री दिली तर बाकीच्या आठ आण्यांबद्दल परमेश्वरावर विश्वास ठेवून मी बंड पुकारीन.
—आ० आ० १·२७

१७७६

**सहकारिता** नेहमींच दोहोंबाजूंकडे सापेक्ष असते.
—के० १९२० २-५-४

१७७७

जर सहकारितेनें देशाची प्रगति साधत असेल तर आम्ही कोणत्याहि पक्षाशीं अधिकारी ( अम्मलदार ) पक्षाशीं देखील **सहकार्य** करण्यास तयार आहों. हें असें सहकार्य करणें हाच 'राष्ट्रीय' पक्षाचा 'आत्मा' आहे.
—के० १९१६-१८-५-३

१७७८

**सांख्य** म्हणजे वेदान्ताचे शत्रु होत अशी वेदान्तांतील कित्येक ग्रंथकारांची समजूत असून पुष्कळ वेदान्ती सांख्य उपपत्ति सर्वथा त्याज्य मानितात. पण गीतेंत तसें न करितां क्षेत्रक्षेत्रज्ञविचार हा एकच विषय एकदां वेदान्तदृष्टया व एकदां ( वेदांताचें अद्वैत मत न सोडितां ) सांख्यदृष्टया प्रतिपादन केला आहे, यावरून गीताशास्त्राची समबुद्धि व्यक्त होत्ये. किंबहुना उपनिषदांतील आणि गीतेंतील विवेचनांतला हा एक महत्त्वाचा भेद होय.
—गी० ७९०

१७७९

सृष्टींतील वस्तुमात्राचें अवलोकन करून त्यांचा व त्यांच्या गुणधर्मांचा दहापांच ठळक ठळक वर्गांत समावेश करण्याचा प्रयत्न जर कोणी केला असेल तर तो आमच्याइकडे **सांख्य**-न्याय-दर्शनकारांनींच केला आहे.
—के० १९०१-२०-२-५

१७८०

सृष्टींतील पदार्थांवर निरनिराळे नवे नवे प्रयोग करून पाहणें, किंवा त्यांचें अनेक रीतीनें पृथक्करण करून त्यांतील गुणधर्म निश्चित करणें, किंवा सजीव सृष्टींतील जुन्या नव्या अनेक प्राण्यांच्या शारीरिक अवयवांची एकत्र तुलना करणें इत्यादि आधिभौतिक शास्त्रांच्या अर्वाचीन युक्ति कणादास किंवा कपिलास उपलब्ध नव्हत्या. त्यांच्या दृष्टीसमोर त्यावेळीं जेवढी सामग्री होती तेवढीवरूनच त्यांनीं आपले सिद्धान्त काढिले आहेत. तथापि सृष्टीची वाढ किंवा घटना कशी झाली असावी याबद्दल **सांख्य** शास्त्रकारांनीं दिलेल्या तात्त्विक सिद्धान्तांत आणि अर्वाचीन आधिभौतिक शास्त्र्यांच्या तात्त्विक सिद्धान्तांत फारसा भेद नाहीं, ही आश्चर्य करण्या-सारखी गोष्ट आहे. —गी० १४९

१७८१

**सांख्यांचे** पुरुष निर्गुण असले तरी ते असंख्य असल्यामुळें या असंख्य पुरुषांचा फायदा कशांत आहे तें ओळखून त्याप्रमाणें प्रत्येक पुरुषाशीं वर्तन करण्याचें सामर्थ्य प्रकृतीच्या अंगीं आहे असें मानण्यापेक्षां "अविभक्तं विभक्तेषु" अशी जी एकीकरणाची ज्ञानक्रिया खालपासून वरपर्यंत चालत आली आहे, व ज्या क्रियेच्या सहाय्यानेंच सृष्टींतील अनेक व्यक्त पदार्थांचा एका अव्यक्त प्रकृतींत समावेश करण्यांत येतो—तीच ज्ञानक्रिया निरपवाद शेवटपर्यंत चालवून प्रकृति व असंख्य पुरुष या सर्वांचा एकाच परमतत्त्वांत अखेर अविभागानें समावेश करणें हेंच सक्-द्दर्शनीं सात्त्विक तर्कशास्त्रदृष्ट्या अधिक सयुक्तिक होय. —गी० १९४

१७८२

मानवी इच्छेच्या तोडीची पण अस्वयंवेद्य शक्ति जड पदार्थांतहि आहे असें मानिल्याखेरीज गुरुत्वाकर्षण किंवा रसायन क्रियेचें व लोहचुंबकाचें आकर्षण व अपसारण इत्यादि केवळ जड सृष्टींतच आढळून येणाऱ्या आवडानिवडीची नीट उपपत्ति लागत नाहीं असें अर्वाचीन आधिभौतिक सृष्टिशास्त्रज्ञहि आतां म्हणूं लागले आहेत हें लक्षांत आणिलें म्हणजे प्रकृतीन प्रथम बुद्धि हा गुण उत्पन्न होतो; या **सांख्यांच्या** सिद्धान्ताचें आश्चर्य वाटण्याचें कांहीं कारण राहत नाहीं. —गी० १७०

१७८३

कोणतेंहि कार्य सिद्धीस जाण्यास **साध्य आणि साधन** या दोन्हीं-बद्दल कार्यकारी पुरुषाचे विचार निश्चित व स्थिर असावे लागतात.

—के० १९०७-२-५-२

१७८४

ईश्वरप्राप्तीस ज्याप्रमाणें साधनांची अनेकता ग्राह्य असून साधकाच्या पिंडरचनेप्रमाणें ज्याचें त्याचें साधन बदलणें रीतीचें आहे, त्याचप्रमाणें देशकार्यसिद्धीसहि **साधनांची** अनेकता युक्त असून देशभक्ताच्या पिंड-रचनेप्रमाणें ज्यानें त्यानें आपापले मार्ग पसंत करणें बरोबर आहे.

—के० १९०३-१६-४-५

१७८५

भविष्यकाळानें भूतकाळ पुसला जातो. कार्याची महती अत्यंत आहे. **साधनें** क्षुद्र होत.

—आ० आ० १-१३८

१७८६

परोपकार करण्याचा देहस्वभाव आणि **अनासक्त** बुद्धि यांची जोड जमल्यावर कितीहि संकटें आलीं तरी त्यांची पर्वा न करितां, किंवा संकटें सोसणें बरें अथवा लोककल्याण सोडून देणें बरें यांच्या तारतम्याची विच-क्षणाहि न करतां, ब्रह्मात्मैक्य बुद्धीचे **साधुपुरुष** आपला उद्योग चालू ठेवितात व प्रसंग पडल्यास देह खर्ची पडला तरीहि त्याची फिकीर करीत नाहींत.

—गी० ३८३.

१७८७

स्वार्थपरायण लोकांवर न रागावतां, किंवा त्यांची लोभबुद्धि पाहून आपल्या मनाची समता न ढळूं देतां, उलट अशा लोकांच्या कल्याणार्थच **साधुपुरुष** आपले उद्योग केवळ कर्तव्य म्हणून वैराग्यानें सुरू ठेवीत असतात.

—गी० ३७४

१७८८

राष्ट्रांत **साधुपुरुष** असल्याशिवाय राज्य चालत नाहीं.

—व्या० २-११६

१७८९

कबेराला ज्याप्रमाणें लाख रुपयांची कधींच उणीव पडत नाहीं. तद्वतच

१७९३

प्राचीन हिंदुधर्मशास्त्राप्रमाणें बापाचें कर्ज मुदतीची सबब न सांगतां मुलांस व नातवांसहि फेडावें लागत असे, व कोणाचेंहि ऋण ठेवून मरणें ही मोठी दुर्गति मानीत असत, हें लक्षांत आणिलें म्हणजे जन्मतः प्राप्त झालेल्या महत्त्वाच्या **सामाजिक कर्तव्यास** 'ऋणें' म्हणण्यांत आमच्या शास्त्रकारांचा हेतु काय असावा हें सहज कळून येईल. –गी० ३३५

१७९४

धर्मसंबंधीं अथवा **सामाजिक दुराग्रहास** आम्हीं बळकट धरून बसलों व आम्हांस हितकर असणाऱ्या ज्ञानाचा आमच्या मनामध्यें आग्रहानें प्रवेश करूं दिला नाहीं तर आम्हांस उन्नतावस्था कधींहि येणार नाहीं.
–के० ले० १·४५७

१७९५

ज्याप्रमाणें राजकीय बाबतींत आम्हीं कॉन्स्टिटयूशनल किंवा कायदेशीर चळवळ करतों तशी **सामाजिक** बाबतींतहि शास्त्रोक्त चळवळ झाली पाहिजे.
–च० सु० ५८

१७९६

नव्या परिस्थितीला अनुरूप **सामाजिक फेरफार** कोणास नको आहेत असें नाहीं, पण जे फेरफार व्हावयाचे त्यामुळें हिंदुत्वाचा अभिमान नष्ट होऊं नये. –के० १९०४-१-४-४

१७९७

सर्वांना प्रिय होईल अशी **सामाजिक सुधारणा** करण्याची हांव धरणें म्हणजे शुद्ध वेडेपणा होय. –च० सु० ५८

१७९८

स्वाभिमान, हुरूप, स्वराज्यनिष्ठा हाच राष्ट्राचा खरा जीव होय. आणि हा जिवंतपणा जेथें वसत आहे त्या ठिकाणीं सुईच्या मागें जसा दोरा तद्वत् **सामाजिक सुधारणाहि** मागोमाग येत असतात.
–के० १९१९-४९-४-५

१७९९

**सामाजिक सुधारणा** हें राष्ट्रीय उन्नतीचें एक अंग आहे; अर्थात् या अंगाचा राष्ट्रीयत्वाशीं जर पूर्ण संबंध नसेल तर सामाजिक सुधारणेस केवळ मनःपूत आचाराचेंच स्वरूप प्राप्त होईल. —के० १९०५-२-५-१

१८००

कोणतीहि **सामाजिक सुधारणा** झाली तरी ती स्वीकारतांना आपलें मूळ काय हें विसरतां कामा नये. —के० १९०४-१-४-४

१८०१

**सामाजिक सुधारणा** व राष्ट्रीय उन्नतीबद्दलची कळकळ या दोन गोष्टींत कायमचा कार्यकारण संबंध नाहीं. इतकेंच नव्हे तर यांमध्यें विरोधहि असण्याचा संभव आहे. —च० ६५३

१८०२

राष्ट्रीय किंवा औद्योगिक उन्नति **सामाजिक सुधारणा** झाल्याखेरीज व्हावयाची नाहीं असें जें कित्येक विद्वानांचें म्हणणें आहे तें चुकीचें आहे. —च० ६५३

१८०३

**सामाजिक सुधारणा** सरकारच्या मदतीशिवाय होणें शक्य आहे आणि ती तशीच झाली तर श्रेयस्कर होते व समाजास मानवते. —के० १८९१-७-३-१

१८०४

विचार, उच्चार व आचार या त्रयींची संगत घातल्याखेरीज **सामाजिक सुधारणा** होत नाहीं. —के० १८९३-१-३-५

१८०५

**सामाजिक सुधारणेचा** व राजकीय हक्कांचा संबंध जोडणें भ्रांतिमूलक व निराधार आहे. —के० १८९६-३-२-५

१८०६

देशाची उन्नति व अवनति केवळ **सामाजिक सुधारणेवर** अवलंबून आहे असें जें मत आहे तें मला मान्य नाहीं. —च० ६५३

१८०७

हिंदुधर्म, हिंदुराष्ट्र हें **सामाजिक सुधारणेपेक्षां** अधिक महत्त्वाचें आहे; व जी कांहीं सामाजिक सुधारणा हवी आहे ती लोकांमध्यें राष्ट्रीयत्व उत्पन्न करण्याच्या उद्योगास अभिमानानें, कळकळीनें व स्वार्थत्यागपूर्वक लागलें असतां, सहज घडून येणार आहे.

—के० १९०३-१८-५-५

१८०८

पारतंत्र्यामुळें आमच्या लोकांची स्थितीच अशी झाली आहे कीं, राजकीय बाबतींत सुधारणा झाल्याखेरीज आमची **सामाजिक स्थिति** सुधारावयाचीच नाहीं. —च० १७६

१८०९

राजकीय बाबतींत ज्याप्रमाणें सर्व अधिकार राजाच्या किंवा एकाद्या विशिष्ट संस्थेच्या ताब्यांत असतो, तसा हिंदुसमाजांतील **सामाजिक** बाबतींतील अधिकारहि कांहीं विशिष्ट व्यक्तींच्या व संस्थांच्या ताब्यांत आहे, आणि ह्या संस्था व व्यक्ती हिंदुशास्त्रांत सांगितलेल्या कांहीं नियमांनीं चाललेल्या आहेत. या व्यक्ती, संस्था किंवा शास्त्र यांच्या विरुद्ध उघड बंड केल्यानें कांहीं फायदा नाहीं. —धा० ७८

१८१०

मनुष्य नीतिमान् असो वा अनीतिमान् असो, गरीब असो वा श्रीमंत असो, स्त्री असो वा पुरुष असो, त्या सर्वांस कांहीं **सामान्य हक्क** आहेत व तेवढ्यासंबंधाचे जे प्रश्न असतील तेथें नीतिमत्ता आणि अनीतिमत्ता यांबद्दलचा प्रश्नच उद्भवत नाहीं. —के० १९००-३९ ३-२

१८११

गरुडानें झांप टाकून आपल्या पंजानें मेंढरूं वर आकाशांत उंच उचलून नेलें, म्हणून कावळाहि जर तेंच करूं लागेल तर फसल्याखेरीज राहणार नाहीं. यासाठीं साधुपुरुषांच्या नुसत्या बाह्य युक्तीवर अवलंबून न राहतां अंतःकरणांत सदैव जागृत असलेल्या **साम्यबुद्धीसच** अखेर शरण गेलें पाहिजे. साम्यबुद्धि हेंच कर्मयोगशास्त्राचें खरें मूळ होय. —गी० ४०२

१८१२

केवळ नीतिमत्तेची कसोटी या दृष्टीनें पाहिलें तरीहि कर्माचे नुस्ते बाह्य परिणाम पहाणें हा मार्ग अपुरा व कृपण ठरवून, बाह्य कर्मावरून व्यक्त होणाऱ्या व संकटसमयींहि दृढ राहणाऱ्या **साम्यबुद्धीसच** या कामीं म्हणजे कर्मयोगांत, परिणामीं शरण गेलें पाहिजे, ज्ञानयुक्त निःसीम शुद्धबुद्धि किंवा शील हीच सदाचरणाची खरी कसोटी होय असा जो गीतेंत सिद्धान्त केला आहे, तोच पाश्चिमात्य आधिदैविक किंवा आधिभौतिक पक्षांतील मतांपेक्षां अधिक मार्मिक, व्यापक, मुद्देसूद आणि निर्दोष होय. —गी० ४७९

१८१३

ज्याचा एक भाग दुसऱ्या भागावर सदैव चरत आहे अशा प्रकारचें **साम्राज्य** कधींहि चिरस्थायी होणें शक्य नाहीं. —के० १९०६-२८-४-२

१८१४

ओसाड मुलुखाची वसाहत, जिंकलेल्या लोकांचें नामर्द शिक्षण देऊन शक्तिहरण व परमुलुखांतील प्रजेला कर्जबाजारी बनवून आपले कह्यांत आणण्याचा मारवाडी कावा, हे तिन्ही मार्ग सुधारलेल्या राष्ट्रांचे आपलें **साम्राज्य** वाढविण्याचे राजरोस ठरलेले उपाय आहेत.

—के० १९०३-३२-४-४

१८१५

ज्याचें वर्चस्व अनेक स्वतंत्र मांडलिक राजे मान्य करतात तोच सार्वभौम या नांवास योग्य आहे आणि तोच राष्ट्रसंघ **साम्राज्य** या पदवीस पात्र आहे. —के० १९०४-३७-४-५.

१८१६

नीतिमत्तेला सोडून नुसत्या तरवारीच्या जोरावर कोणतेंहि **साम्राज्य** कधींहि चिरस्थायी व्हावयाचें नाहीं; तर गळ्यांत धोंडा बांधलेल्या पुरुषांप्रमाणें तें अनीतीच्या समुद्रांत गटंगळ्या खात तळास जाईल.

—के० १९०४–४९-४-५.

१८१७

ज्याप्रमाणें सूर्य उगवला म्हणजे मावळलाच पाहिजे त्याप्रमाणें **साम्राज्यहि** अस्तास गेलेंच पाहिजे. —के० १९०५–३४-४-२

१८१८

जित लोकांचा बुद्धिभ्रंश करून मानसिक पारतंत्र्य दृढ करणें हा **साम्राज्यविस्ताराचा** नवीन उपाय सर्वमान्य होत आहे.

--के० १९०३-३७-४-३

१८१९

स्वराज्याशिवाय हिंदुस्थान ही ब्रिटिश **साम्राज्याच्या** गळ्यांत धोंड आहे. ती स्वतः बुडेल व साम्राज्याला बुडवील. —के० १९१७ ४३-४-३

१८२०

सव्वतीस कोटि लोकसंख्येच्या साम्राज्यांत तीस कोटि लोकांस स्वराज्याचा अधिकार न देतां ठेवल्यास ब्रिटिश साम्राज्याची उन्नति व भरभराट कधींहि व्हावयाची नाहीं. —के० १९१७-५-५-४

१८२१

अफाट इंग्रजी **साम्राज्यांत** कोठें कोणताहि खर्च होवो त्याचा हिंदुस्थानाशीं जरी बादरायण संबंध जोडतां आला तरी त्याबद्दलची खर्चाची जबाबदारी बिचाऱ्या हिंदुस्थानावर पडत असते.

—के० १९००-३४-२-३

१८२२

फुटाणे करतांना खापरांत भाजत ठेवलेले हरभरे कितीहि उंच उडाले तरी त्यांच्या धक्क्यानें खापर फुटण्याचा ज्याप्रमाणें कधींहि संभव नसतो तद्वतच **साम्राज्यांतर्गत स्वराज्याच्या** चळवळीची गोष्ट आहे.

—के० १९१७-२५-४-५

१८२३

**साम्राज्यांतर्गत स्वराज्य** म्हणजे साम्राज्याबद्दलचे कांहीं विशिष्ट हक्क किंवा व्यवस्था खेरीजकरून बाकीची व्यवस्था लोकांच्या मताप्रमाणें चालविणें होय. —के० १९१५-४९-६-१

१८२४

**सार्वजनिक काम** करणारास लोकांची टीका सहन करण्याचें शिक्षण अवश्य आहे. —के० १९१५-४७-६-१

१८२५

**सार्वजनिक कामांत** पुढें येणें हें एक प्रकारें असिधाराव्रत आहे. —के० १९०७-३९-४-३

१८२६

एकीकडे सरकारास खूष ठेवावयाचें आणि दुसरीकडे लोकांकडूनहि पुढारीपणाची सनद मिळवावयाची या दोन्ही गोष्टी साधावयाच्या नाहींत; व यांपैकीं कोणती तरी एक गोष्ट निखालस पतकरणारे गृहस्थ जोंपर्यंत मिळणार नाहींत तोंपर्यंत आमचीं **सार्वजनिक कामें** लंगडत लंगडतच पुढें सरकायचीं. —के० १८९१-४७-२-५

१८२७

ज्या देशांत **सार्वजनिक कामें** करण्यास माणसें मिळत नाहींत त्या देशांतील लोकांची स्थिति निकृष्टच असली पाहिजे. —के० ले० १-५९४

१८३१

कोणत्याहि **सार्वजनिक संस्थेंत** एकाच पक्षाचें सदासर्वदा प्राबल्य रहावें हें इष्ट नाहीं; आणि त्याप्रमाणें तें रहातहि नाहीं.

—के० १८९५-३०-२-५

१८३२

उमेदीबरोबर व स्वार्थत्यागाबरोबर असणारी **सावधगिरी** पाहिजे; भित्रेपणाबरोबर असलेली सावधगिरी नको. —व्या० १-४४

१८३३

हिंदुस्थानची राजसत्ता जोंपर्यंत **सिव्हिल सर्व्हिसच्या** हातांत आहे तोंपर्यंत निरनिराळ्या बाबतींतील निरनिराळ्या तक्रारी किंवा गाऱ्हाणीं विलायतेंतील लोकांपुढें मांडून कांहीं उपयोग व्हावयाचा नाहीं.

—के० ले० २-५३२

१८३४

**सुख** जसें दुःखमूलक आहे तसेंच दुःखहि सुखमूलकच आहे.

—के० १९०६-३५-४-३

१८३५

तहान लागली असतां आपणांस पाणी जरी इष्ट आहे, तरी 'पाणी' या बाह्य पदार्थास 'सुख' हें नांव देतां येत नाहीं. तसें होईल तर नदीच्या पाण्यांत बुडणारा मनुष्य सुखांत बुडाला असें म्हणावें लागेल. पाणी पिण्यानें जी इंद्रियतृप्ति होते तें **सुख** होय. —गी० ९६

१८३६

वीट न येतां विषयसुखोपभोगच नित्य एकसारखा मिळणें अगदीं असंभवनीय नसेल; पण दुःख अजीबात नाहींसें होऊन केवळ **सुखच** सदैव अनुभविणें निदान या कर्मभूमींत तरी शक्य नाहीं. —गी० १०२

१८३७

**सुख व दुःख** यांत भेद आहे. दुःखाला भागीदार मिळाले असतां तें कमी होतें तसें सुखाचें नाहीं; सुखाला भागीदार मिळाले असतां उलट तें वाढतेंच. —के० १९१४-२५-५-५

१८३८

**सुखदुःखादि द्वंद्वें** मायासृष्टींतील व खरें परब्रह्म नासदीय सूक्तांत वर्णिल्याप्रमाणें या द्वंद्वापलीकडचें असल्यामुळें अनित्य मायासृष्टींतील हीं द्वंद्वें शांतपणें सोसून बुद्धीची या द्वंद्वांमधून सुटका केल्याखेरीज ब्रह्मप्राप्ति होत नाहीं. —गी० ६१८

१८३९

जोंपर्यंत मिशनरी लोकांप्रमाणें स्वार्थत्याग करून कळकळीनें समाजास पोटाशीं धरण्याचें काम करण्यास कोणीहि **सुधारक** तयार नाहीं, जोंपर्यंत समाजांत जो धर्म प्रचलित आहे त्यावर त्याचा विश्वास नाहीं, अथवा जोंपर्यंत केवळ न्यायमीमांसेच्या जोरावर 'यंव चांगलें आहे, त्यंव चांगलें आहे' असें मुखानें वर्षास एकदां उद्गार काढून आपलें कर्तव्य आपण केलें असें म्हणून तो आपलें समाधान करून घेत आहे तोंपर्यंत त्याचें किंवा सुधारणेचें पाऊल कधींहि पुढें पडणार नाहीं. —के० १९०३-१८-५-४

१८४०

खऱ्या **सुधारकाचें** काम समाजांतील बहुमत आपल्याकडे वळवून घेऊन त्यांच्याकडून व स्वतः सुधारणा अमलांत आणणें व आणविणें होय. —के० १९१९-४९-४-३

१८४१

**सुधारणा** फुकाफुकी घडत नसतात; समाजास कोणती गोष्ट आपल्या उत्कर्षांच्या आड येते हें प्रत्यक्ष कळावें लागतें, आणि तें कळलें म्हणजे समाज आपोआपच हे अडथळे दूर करण्यास प्रवृत्त होतो. —के० १९१९-४९-४-४

१८४२

**सुधारणा** म्हटली म्हणजे त्यांत पूर्वींच्या कांहीं गोष्टी कायम राहतात व कांहीं बदलतात असा सामान्य नियम आहे. गी० ५६७

१८४३

राजकीय परवशता फारतर मुळमुळीत विरोधानें स्वीकारून जिवंत **सुधारणा** होणेंच शक्य नाहीं. —के० १९१९-४९-४-५

१८४४

कोणतीहि **सुधारणा** करणें ती तत्त्वप्रवर्तकांनीं आधीं केली पाहिजे.

—के० १८९०-४४ ३-१

१८४५

नियमांत दुरुस्ती करणें म्हणजे नियम मोडणें नव्हे; कारण तसें म्हटल्यास कोणाच्याहि कायद्याची सर्वच **सुधारणा** बेकायदेशीर ठरेल.

—के० १९१४-५१-५-३

१८४६

गोडीगुलाबीनें जुन्या लोकांचें इष्ट सुधारणांकडे जसें लवकर मन वळतें तशी हडेलहप्पी **सुधारणा** फलदायक होत नाहीं.

—के० १८९३-१०-३-३

१८४७

सर्व लोकांस जी गोष्ट संमत आहे ती अमलांत आणण्यास कायद्याचें सहाय्य देणें हें जितकें अवश्य आहे तितकेंच लोकांच्या मताविरुद्ध त्यांजवर कायद्यानें **सुधारणा** लादणें हें अश्लाध्य होय. —के० १८९२-४१-३ २

१८४८

**सुधारणा** लोकप्रिय करण्यासाठीं शास्त्राची ओढाताण करणें वाजवी नाहीं.

—के० १८९१-७-३-१

१८४९

आम्हांला **सुधारणा** पाहिजे, पण खरा राष्ट्रीय विचाराचा मनुष्य स्वतःच्या पायावरच स्वतःची इमारत बांधतो. —धा० १६

१८५०

माझें मतहि सुधारणेस अनुकूलच आहे. परंतु ज्यांचे विचार सुधारले नाहींत त्यांच्या गळ्यांत सुधारणा कायद्यानें बांधणें मला अगदीं प्रशस्त वाटत नाहीं. इतकेंच नव्हे, तर तें अन्यायाचें व जुलमाचें कृत्य आहे. तेव्हां ज्यांना सुधारणेची खरी कळकळ आहे त्यांनीं **सुधारणा** अमलांत आणण्याबद्दल स्वतःस बांधून घ्यावें.

—च० २५३

१८५१

**सुधारणा** इतक्या अपुऱ्या व मर्यादित आहेत कीं, त्या अमलांत आणण्याऱ्या कामीं तत्परता व सहकारिता दाखवून स्वराज्य चालविण्याची पात्रता सिद्ध करा असें आम्हांस सांगणें म्हणजे पायांत खोडा घातलेला असतांहि पळण्याची आपली पात्रता सिद्ध करा असें आम्हांला सांगण्यासारखें आहे. —के० १९१९-४८-२-३

१८५२

हिंदुधर्मांत किंवा रीतिरिवाजांत ज्यास **सुधारणा** करावयाची असेल त्यास मी हिंदु आहे व मला हिंदु राहावयाचें आहे असा पहिल्यानें पूर्ण अभिमान पाहिजे. —के० १९००-२८-३-३

१८५३

आपल्या जातीचे आचार-विचार किंवा आहार-विहार हें ज्यांस उपहासास्पद वाटतात त्यांनीं पुनर्विवाह केला किंवा हॉटेलांत जाऊन जेवलें अथवा हिंदु देवास रजा देऊन प्रार्थनासमाजांत निराकार देवाची प्रार्थना केली, तर ती **सुधारणा** नव्हे, आचरटपणा होय. —के० १९००-२८-३-४

१८५४

**सुधारणा** ही ज्याची त्यानें सुरू करून आपल्या उदाहरणानें दुसऱ्याचें मन वळविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. —के० १८९०-४४-३-१

१८५५

कोणत्याहि देशाची अगर लोकांची **सुधारणा** करणारांनीं अमुक एक गोष्ट होईल तर आम्ही सुधारणा करूं असें म्हणणें म्हणजे एका तऱ्हेनें आपला कमकुवतपणा कबूल करण्यासारखेंच आहे.

—के० १८९३-२०-२-३

१८५६

समाजाच्या मठ्ठपणाबद्दल शिव्या देत सुटून किंवा परकीय राजाच्या धमक्या देऊन त्याला चिथविणें व जगापुढें आपली असहिष्णुता व क्षुद्रबुद्धि प्रगट करणें हा **सुधारणेचा** खरा उपाय नव्हे.

—के० १८९३-२२-३-२

१८५७

**सुधारणेचा** पहिला व एकंदरींत विशेष यशस्कर मार्ग हा आहे कीं, ज्यानें त्यानें इतरांना उपदेश करीत सुटून आपण सुधारणेपासून अलिप्त राहण्यापेक्षां आपापल्यापरी कृतिद्वारा जी सुधारणा घडवून आणतां येईल ती आणावी. —के० १८९०-४२-३-३

१८५८

रानटी लोकांत **सुधारणेचा** प्रवेश करण्याचीं सुधारलेल्या राष्ट्रांना तीन मुख्य द्वारें आहेत असें म्हणतात. एक दारूच्या बाटलीचें तोंड, दुसरें बंदुकीची नळी व तिसरें मिशनरींचा गळा. —के० १९००-२६-२-४

१८५९

पारतंत्र्याखालीं हताश झालेल्या समाजांत स्वाभिमान जागृत होऊन आपल्या परंपरागत आलेल्या संस्कृतीवरच **सुधारणेची इमारत** उभारण्याचें जेव्हां त्यांच्या मनांत भरेल तेव्हांच देशाचें वैशिष्टय कायम राहून हिंदुस्थान देश सुधारून, जगांतील पहिल्या प्रतीच्या राष्ट्राच्या योग्यतेस चढेल. —के० १९१९-४९-४-४

१८६०

दोष दाखविल्याखेरीज **सुधारणेची** अवश्यकता सिद्ध करतां येत नाहीं. —के० १९००-४७-२-४

१८६१

स्वधर्मावर श्रद्धा, आपलें राष्ट्र पुरातन असून तें ईश्वराच्या कृपेनें जगांतील इतर राष्ट्रांच्या बरोबरीचें होणें शक्य आहे असा दृढविश्वास, अभिमान व भरंवसा आणि या भरंवशास योग्य अशा तऱ्हेचा उद्योग कळकळीनें करण्याची इच्छा किंवा उमेद आणि संवय असल्याखेरीज कोणत्याहि **सुधारणेचें** कार्य तडीस जाणें अशक्य आहे. —के० १९०३-१८-५-४

१८६२

**सुधारणेच्या** गोष्टी बोलतांना मागला पुढला विचार करूनच ज्यानें त्यानें बोलावें हाच उत्तम मार्ग होय. —के० १८९३-७-३-२

१८६३

योग्य बंधनें कायम ठेवून तीं जारीनें पाळणें व अयोग्य उघडपणें सोडून देणें यांतच खऱ्या **सुधारणेचें बीज** आहे.

—के० १८९१-२४-३-१

१८६४

ज्याचें अंतःकरण **सुधारलेलें** तोच खरा सुधारलेला.

—के० १९२०-१०-२-३

१८६५

देशस्थितीचा विचार करून ती सुधारण्याचे योग्य मार्ग कोणते हें लोकांस समजावून देणें व त्या मार्गांकडे त्यांची प्रवृत्ति करणें हेंच देशांतील **सुशिक्षित लोकांचें** मुख्य कर्तव्य आहे.

—के० १८९६-३०-२-३

१८६६

इंग्रजी राजकर्त्यांकडून जर आम्हांस कांहीं हक्क प्राप्त करून घ्यावयाचे असले तर **सुशिक्षित आणि अशिक्षित** या दोघांनींहि एक होऊन हल्लींच्या राज्यकारभाराचें गाडें अडून पडलें, असें राजकर्त्यांच्या अनुभवास आणून दिलें पाहिजे. —के० १९०६-३८-४-४

१८६७

आपल्या शिक्षणाचा जो देशासाठीं उपयोग करतो तोच **सुशिक्षित,** बाकीचे सारे भारवाहीच समजले पाहिजेत. —आ० आ० १-११०

१८६८

बंधुप्रीति हा भाव **सुशिक्षित** म्हणवून घेणाऱ्यांच्या अंगीं अवश्य आला पाहिजे. —के० १८९०-६-३-२

१८६९

**सुशिक्षित** लोकांचे प्रयत्नास व्यापारी व इतर धंद्यांच्या लोकांची पूर्ण मदत असल्याशिवाय व सर्वांनीं एक जुटीनें वागल्याशिवाय देशकार्य घडणार नाहीं. —के० १९००-४८-३-५

१८७०

निर्वाहाच्या सोईपेक्षां जास्त अपेक्षा न धरतां कर्तव्यास जागणें हेंच खऱ्या **सुशिक्षिताचें** काम होय. —विष्णु० २०

१८७१

धर्मग्रंथांचें विचारपूर्वक परिशीलन करून धर्माची जागृति करणें, त्यांचें संरक्षण करणें किंवा त्यांची परंपरा कायम राखून त्यांस योग्य वळण देणें हीं कामें सर्वत्र व सर्व काळीं **सुशिक्षितांचींच** आहेत.

—के० १९०४-३८४-२

१८७२

कोणताहि देश कितीहि निकृष्टावस्थेंत असला तरी शिक्षणानें, विशेषें-करून भरभराटीस आलेल्या स्वतंत्र राष्ट्रांच्या इतिहासाच्या परिशीलनानें, स्वतःच्या उन्नतीबद्दल देशांतील **सुशिक्षितांपैकीं** कांहीं लोकांच्या मनांत तरी आपल्या उन्नतीची इच्छा व उन्नतीच्या साधनांचे विचार उद्‌बुद्ध व्हावयाचेच. —के० १९०२-७-४-२

१८७३

सही करतां येणें किंवा न येणें यावर **सुशिक्षितपणा** अवलंबून आहे असें मला वाटत नाहीं. जो मनुष्य हजारों रुपयाचा धंदा करतो तो सुशिक्षितच समजला पाहिजे. ज्याला दुःख कळतें तो सुशिक्षित.

—स्व० मो० (२) ४६

१८७४

लोकांत मिसळा, त्यांचें कोठें चुकत असल्यास सर्व गोष्टी नीट जुळवून द्या; **सुशिक्षित लोकांचा** अधिकार असा आहे, त्यांचीं कर्तव्यें हींच आहेत. —के० १८९६-३८-२-४

१८७५

सुधारलेल्या राज्यांत लोकमत व्यक्त करण्याचा अधिकार स्वाभाविक-पणें सुशिक्षित पुढाऱ्यांवर येतो ही सूर्यप्रकाशाइतकी उघड गोष्ट न पाहिल्याचा आविर्भाव करून **सुशिक्षित वर्गाची** टर करण्याचा प्रयत्न व्यर्थ होय. —के० ले० २-४६९

१८७६

समाजाहून **सुशिक्षित लोकांचा** वर्ग निराळा समजण्याइतकें मोठय दुसऱ्या कशांतहि नाहीं. —के० लें० १·५७०

१८७७

नित्य **सेवकांचा वर्ग** बुद्धीनें इतर वर्गांपेक्षां श्रेष्ठ असून विद्यार्जनाच्या कामींहि इतर लोकांपेक्षां अधिक दृढ उद्योग करणारा आहे ही गोष्ट खरी; पण वंशपरंपरागत आपापल्या कुलांत किंवा ज्ञातींत चालत असलेल्या सेवाधर्मामुळें त्याच्या स्वाभिमानादि मनोवृत्ति थोड्याबहुत तरी बोथटलेल्याच असतात. स्वराज्यांत या वर्गाचा हा बोथटपणा प्रजेस किंवा राष्ट्रास घातुक होत नाहीं. पण स्वराज्य जाऊन परराज्य झालें म्हणजे हा सेवकवर्ग परकीय राजांस आपले मतलब साधण्यास चांगला उपयोगी पडतो, इतकेंच नव्हे तर सेवाधर्मांत होणारा स्वाभिमानाचा ऱ्हास अधिकाधिक वाढत जाऊन परकीय अमलाखालीं हा वर्ग स्वदेशाचा शत्रु बनण्याचा प्रसंग येतो. —च० सु० ७८

१८७८

आपला धनी आपल्या धर्मांतील, आपल्या देशांतील किंबहुना आपल्या आप्तांतील असला तरी, त्याची सेवा करणें म्हणजे निसर्गतः आपणांस प्राप्त झालेलें स्वातंत्र्य गुंडाळून ठेवून आपली बुद्धि, चातुर्य, शहाणपण व धैर्य यांचा उदरपूरणाकरितां कांहीं कालपर्यंत तरी विक्रय करणेंच होय. त्यांतून ज्या प्रभूची आपण सेवा करतों तो प्रभु जर स्वदेशांतील असेल अथवा स्वदेशाचें किंवा त्यांतील लोकांचें हित करणारा असेल तर क्षणभर स्वाभिमान एका बाजूस ठेवून आपण **सेवावृत्ति** स्वीकारल्यास देशास कांहींतरी उपयोग होण्याचा संभव असतो. पण तोच स्वामी जेव्हां परकीय असतो तेव्हां त्याची सेवा करण्यांत स्वातंत्र्याची व स्वाभिमानाची होळी होते इतकेंच नव्हे तर त्याबरोबर देशाचें अहित होऊं शकतें. —के० १९०५-२५·४·४

१८७९

**संकट** कोणास चुकलें आहे ? रामचंद्राचे ग्रह उच्चीचे होते तरी त्याची बायको चोरीला गेली; यापेक्षां त्यावर जास्त संकट काय यावयाचें होतें ?

—व्या० २-१०९

१८८०

**संकटसमय** प्राप्त झाला असतां विवेक करून त्यापासून बोध काय घ्यावयाचा हें पाहून त्यामुळें समाजाचा व देशाचा फायदा जर करून घेतला नाहीं तर संकटांची किंमत नाहीं व तीं गेलीं म्हणजे आनंद मानण्यांतहि कांहीं अर्थ नाहीं.

—के० १९०४-३१-७-२

१८८१

आतांच निराश व्हाल तर तुमच्यानें कांहींहि व्हावयाचें नाहीं. तुम्हाला पाहिजे आहे तें **संकटा**पलीकडे आहे. कुलूप उघडल्याशिवाय पेटी उघडतां यावयाची नाहीं.

—व्या० २-१५१

१८८२

**संकटाचे** वेळीं घरांत दुफळी असण्यासारखें दुसरें कोणतेंहि दुर्दैव नाहीं.

—के० १८९७-१९-२-६

१८८३

झगडण्यांतच माणसाची खरी पारख होत असते. सत्याकरितां भांडायला तयार झालांत तरच तुम्ही पात्र ठराल. कोणतेंहि सत्कृत्य **संकटा**शिवाय पार पडत नाहीं.

—स्व० मो० (३) १०२

१८८४

जेव्हां बुद्धि उच्च असते, देशप्रीतीनें जेव्हां कार्याला प्रारंभ झालेला असतो, तेव्हां **संकटाचें** कांहीं वाटत नाहीं.

—व्या० २-१०९

१८८५

विघ्नावांचून कोणतेंहि काम तडीस जात नाहीं, व **संकटाच्या** भट्टींत तावूनसुलाखून निघाल्याशिवाय कोणचाहि सद्गुण कणखर व टिकाऊ होत नाहीं.

—के० १९०८-४-४१४

१८८६

मुख्य गुण म्हटला म्हणजे निश्चय व संकटांना हाणून पाडण्याची बुद्धि लागते. **संकटांना** जुमानलें नाहीं म्हणजेच देवता 'वरं ब्रूहि' म्हणते.
—स्व० गी० ६

१८८७

**संकटाला** भिऊन डगमगणें हें मनुष्यपणास कमीपणा आणणारें आहे; संकटें येतील तितकीं चांगलीं; कारण त्यामुळें अंगीं धैर्य येईल व संकटें सोसण्याची संवय लागेल. संकटें काढल्याशिवाय राष्ट्राचा संसार चांगला चालत नाहीं.
—व्या० २-५८

१८८८

**संकटें** आलीं असतां रडावें व तीं गेलीं असतां आनंद प्रदर्शित करावा इतकीच आपली इतिकर्तव्यता आहे असें निदान माणसानें तरी समजणें बरोबर होणार नाहीं.
—के० १९०४-३१-७-२

१८८९

नुसतीं **संकटें** येण्यावरून योग्यता ठरत नसते; तर त्यासमयीं दिसून आलेली मनुष्याची अक्कल, हुषारी व कर्तबगारी यांवरून त्याच्या योग्यतेची पारख होत असते.
—के० १९०२-५१-५-१

१८९०

दुःखें व **संकटें** सहानुभूति व्यक्त करण्यास कारणीभूत होतात हा तरी त्यांपासून एक फायदाच होतो म्हणावयाचा ! —के० १९००-३६-३ ३

१८९१

देशावर **संकटें** येणें म्हणजे पुढें सूर्य उगवणार हें खचित समजावें.
—के० १९०६-३५-४ ३

१८९२

कलमी आंब्याचें बीं रुजत नाहीं व मिश्र जातीपासून संतानवृद्धि होत नाहीं हा नियम खरा असेल तर **संकर जाति** राष्ट्रांचा उत्कर्ष व जागृति फार दिवस कां टिकत नाहीं याचा खुलासा होतो.—के० १९०३-३८-४-४

१८९३

जगाच्या राहाटीप्रमाणें इष्ट गोष्टी घडवून आणण्याकरितां प्रत्येक देशाला केव्हांना केव्हां तरी **संग्राम**-देवतेचें प्रत्यक्ष दर्शन घेणें जरूर पडतें.

—के० १९०२-२४-४-४

१८९४

एखाद्यानें वस्त्रें पालटलीं म्हणून तो जसा दुसरा मनुष्य होऊं शकत नाहीं, त्याप्रमाणें **संग्रामदेवतेनें** सहज लीलेनें धरलेला भाला फेंकून देऊन हातीं जपून काडतुसाची बंदूक धरली म्हणून त्या देवतेचें खरें स्वरूप पालटलें नाहीं.

—के० १९०२-२४-४-४

१८९५

स्वातंत्र्याचें बीज पेरण्याचे आधीं लागणारी राष्ट्रभूमि रामदासापूर्वीच्या **संतमंडळीनें** आपल्या उपदेशानें तयार केली.

—के० १९०३-२४-५-५

१८९६

अहो, परदास्यांतून सुटणें व दुसऱ्यांस सोडविणें हीच खरी पहिली **संध्या** आहे. तुम्हीं ब्रह्मवाक्य मानणाऱ्या आद्य शंकराचार्यांनीं सुद्धां 'को नरकः?' यास 'परतंत्रता' हेंच उत्तर दिलें आहे.

—आ० आ० १-२४८

१८९७

सकाळीं मी जागा झाल्यापासून रात्रीं झोंपीं जाईपर्यंत मातृभूमीच्या चिंतनावांचून माझा एक क्षणहि जात नाहीं. हीच माझी **संध्या**, हेंच त्रिसुपर्ण व हाच ब्रह्मयज्ञ! तरी पण सहज घडल्यास मला तें नको आहे असें मात्र नाहीं.

—आ० आ० १-२४९

१८९८

शंकराचार्यांनीं **संन्याशाची** संस्था काढली ती बुद्ध लोकांचा पाडाव करण्याकरितां त्यांच्याच अनुकरणानें काढली. यापूर्वीं संन्यास होता; पण कलीमध्यें तो निषिद्ध मानला होता.

—आ० व० ४२३

१८९९

निरग्नि व निष्क्रिय होणें हें कांहीं खऱ्या संन्यासाचें लक्षण नव्हे. काम्यबुद्धीचा किंवा फलाशेचा त्याग करणें हाच खरा संन्यास होय. **संन्यास** बुद्धींत आहे. अग्नि किंवा कर्में सोडणें या बाह्य क्रियेंत नाहीं. म्हणून फलाशेचा किंवा संकल्पाचा त्याग करून कर्तव्यकर्म करणारासच खरा संन्यासी म्हटलें पाहिजे. —गी० ६९४

१९००

वामनपंडितांनीं गीतेवरील आपल्या टीकेंत म्हणजे यथार्थदीपिकेंत (१८·२) म्हटल्याप्रमाणें "शिखा बोडुनि तोडिला दोरा" किंवा हातांत दंड घेऊन भिक्षा मागितली, अगर सर्व कर्में सोडून अरण्यांत जाऊन राहिलें, म्हणजेच **संन्यास** होतो असें नाहीं. संन्यास व वैराग्य हे बुद्धीचे धर्म आहेत; दंडाचे, शेंडीचे किंवा जानव्याचे नव्हेत. —गी० ३४६

१९०१

Pessimism या शब्दाचा 'रड्या किंवा दुर्मुखलेला' असा ध्वन्यर्थ होतो. पण संसार अनित्य समजून तो सोडून देणारे लोक आनंदी असतात व संसार सोडिला तरी तोहि आनंदानेंच सोडीत असतात म्हणून त्यांस Pessimist म्हणणें आमच्या मतें बरोबर नाहीं. यापेक्षां कर्मयोगास Energism आणि सांख्य किंवा **संन्यास** मार्गास Quietism अशीं इंग्रजी नांवें देणें प्रशस्त होय. —गी० ३०१

१९०२

आत्मज्ञानानें ज्या सिद्ध पुरुषाची बुद्धि निःसंग व पवित्र झाली तो दुसरें कांहीं करो वा न करो, मानवी बुद्धीच्या शुद्धतेची कमाल आणि निसर्गतःच विषयास लुब्ध होणाऱ्या दुर्धर मनोवृत्तीस आपल्या ताब्यांत आणण्याचें पराकाष्ठेचें मानवी सामर्थ्य तो लोकांच्या प्रत्यक्ष नजरेस आणून देतो. ही कामगिरी लोकसंग्रहदृष्ट्याहि कांहीं लहानसान नव्हे. **संन्यासधर्मा**-बद्दल लोकांत जी आदरबुद्धि आहे त्याचें खरें कारण हेंच होय. —गी० ४६५

१९०३

संन्यासमार्ग आचार्यांनीं जरी नवा काढिला नाहीं तरी कलिवर्ज्यांत पडल्यामुळें त्यास जें गौणत्व आलें होतें तें आचार्यांनीं दूर केलें हें खरें आहे. पण तत्पूर्वीं दुसऱ्या कांहीं कारणांनीं **संन्यासमार्गाची** आवड लोकांत जर उत्पन्न झालेली नसती तर आचार्यांचें संन्यासपर मत इतकें प्रसृत झालें असतें कीं नाहीं याचा वानवाच आहे. —गी० ४९५

१९०४

**संन्यास**-मार्गीयांस मोक्ष मिळतो खरा; पण तो त्यांनीं कर्में सोडिल्या-मुळें मिळत नसून, मोक्षसिद्धि हें त्यांच्या ज्ञानाचें फल होय. कर्में सोडून देण्यानेंच जर सिद्धि मिळेल तर दगडालाहि मुक्ति मिळाली पाहिजे.

—गी० ६४५

१९०५

थोड्याबहुत स्वार्थबुद्धीनें वागणाऱ्या सामान्य लोकांपेक्षां निष्काम-बुद्धीनें वागणारे पूर्णज्ञानी पुरुष लोकसंग्रह करण्यास अर्थातच अधिक समर्थ व पात्र असतात. म्हणून ज्ञानानें त्यांच्या अंगचें हें सामर्थ्य ज्या-वेळेस पूर्णावस्थेस पोंचतें त्याचवेळीं ज्ञानी पुरुषास समाज सोडून जाण्याची मोकळीक ठेविल्यानें चातुर्वर्ण्यव्यवस्था ज्याच्या हितासाठीं निर्माण झालेली आहे त्या समाजाचेंच त्यांत अत्यंत नुकसान होत असतें. शरीरसामर्थ्य नसतां कोणी समाज सोडून अरण्यांत गेल्यास गोष्ट निराळी; व **संन्यासाश्रमास** वृद्धापकालची मर्यादा घालण्यांत मनूचा हाच हेतु असावा.

—गी० ३३८

१९०६

वेळ येईल—**संधी** येईल—म्हणून तिची वाट पहात बसूं नका; वेळ—संधि—आपल्या कर्तबगारीनें आणा. —व्या० २-१

१९०७

देशांतल्या देशांत नानाप्रकारचे धंदे निघावे व लोकांस जीवनसाधन मिळून **संपत्ति** वाढावी याविषयीं सरकारनें निरंतर काळजी बाळगली पाहिजे. —के० १८९०-३८-३-२

१९०८

देशांतील संपत्ति शिल्लक पडण्यास देशाच्या वार्षिक पिकांतून किंवा उत्पन्नांतून त्या देशांतील लोकांच्या परंपरागत ज्या गरजा आहेत त्या भागून बराच भाग शिल्लक राहिला पाहिजे. एरवीं **संपत्ति** वाढत नाहीं हा अर्थशास्त्राच्या मूलसिद्धान्तांपैकीं एक सिद्धान्त आहे. —के० ले० २-४०१

१९०९

**संपत्तीच्या** सदुपयोगाचे मार्गांत नेहमीं दोन प्रकारच्या अडचणी असतात—एक कर्तृविषयक व दुसरी कर्मविषयक.

—के० १९०३-१९-४-३

१९१०

देशाच्या भरभराटीचा व सुस्थितीचा पाया म्हटला म्हणजे देशांत **संपत्तीच्या**, उत्पत्तीच्या व वृद्धीच्या साधनांची समृद्धि हा होय.

—के० १८९१-२१-२४

१९११

दोनशें वर्षांपूर्वी ज्या वेळेस इंग्लिश, डच, फ्रेंच, पोर्तुगीज वगैरे पश्चिमेकडील लोकांनीं सुवर्णभूमीची आख्या ऐकून आमच्याकडे धांव घेतली तेव्हां हिंदुस्थानच्या **संपत्ती**बद्दल पश्चिमेकडील लोकांची जी समजूत झालेली होती, तींत व हल्लींच्या वस्तुस्थितींत जमीन-अस्मानाचें अंतर पडलेलें आहे. आमच्या देशास सुवर्णभूमि हें नांव राहिलेलें आहे; पण 'नांव सोनूबाई व हातीं कथलाचा वाळा' अशी स्थिति आतां येऊन ठेपली आहे.

—के० १९०२-२-२-४

१९१२

साक्षात् अगर परोक्ष रीतीनें **संपत्ति**-वर्धनास जे श्रम कारणीभूत होतात ते सर्व उत्पादक श्रम होत. —के० १८९०-३-३-२

१९१३

देशाच्या **संपत्ती**पैकीं पुष्कळ भाग धनोत्पत्तीकडे खर्च झाला पाहिजे; म्हणजे स्वराज्य असो वा पराराज्य असो त्या देशाची भरभराट होत जाणारच.

—के० १८९०-४-३-१

१९१४

हातीं विपुल **संपत्ति** व तिचा सद्व्यय करण्याची इच्छा या दोन गोष्टी प्रथमतः नेहमीं असमवायिक असावयाच्या; व त्यांतूनहि या गोष्टी एके ठिकाणीं वास करीत असल्या तरी ज्यावर खर्च केला असतां खरोखर सद्व्यय होईल अशा विषयांची योजना होणें कठीण असतें.

—के० १९०३-१९-४-३

१९१५

**संभाषण** ही शक्ति आहे खरी, पण तिचा योग्य वेळीं व योग्य काळीं उपयोग केला असतां ती शक्ति हितकारक होते. —के० १९०३-४८-५-१

१९१६

कोणताहि धार्मिक **संप्रदाय** घेतला तरी त्याचे स्वभावतःच दोन भाग होतात; पहिला तत्त्वज्ञानाचा व दुसरा आचरणाचा. पहिल्यांत पिंडब्रह्मांडाच्या विचारांनीं परमेश्वरस्वरूप काय निष्पन्न होतें तें सांगून मोक्ष कशाला म्हणावें याचा शास्त्रदृष्ट्या निर्णय केलेला असतो; व दुसऱ्यांत तो मोक्ष मिळण्यास साधन किंवा उपाय म्हणून मनुष्यानें या जगांत कसें वागलें पाहिजे याचें निरूपण असतें. —गी० १३

१९१७

कोणताहि **धर्मसंप्रदाय** घेतला तरी सामान्यतः तो प्रमाणभूत धर्मग्रंथांस अनुसरूनच असला पाहिजे हें उघड आहे; कारण, तसें न होईल, तर तो संप्रदाय सर्वस्वीं अप्रमाण ठरून लोकांस अमान्य होईल.

—गी० २०

१९१८

सप्रतिबंध ऊर्फ **संरक्षित व्यापार** आणि स्वदेशी चळवळ हीं दोन्हींहि स्वदेशी व्यापार वाढविण्याचीं कृत्रिम साधनें आहेत; व त्या दोहोंचाहि अखेर परिणाम असा आहे, कीं परदेशी मालावर जकात बसविल्यामुळें किंवा त्यास बहिष्कार टाकल्यानें स्वदेशी वस्तूची किंमत वाढून त्यायोगें कारखानदारांच्या हातांतील भांडवल वाढतें आणि हें भांडवल वाढलें म्हणजे नवीन कारखाने निघून स्वदेशी मालाच्या किंमती उतरत उतरत अखेर परदेशी मालाच्या किंमतीबरोबर होतात. —के० १९०५-४९-४-५

१९१९

निरनिराळ्या धर्मांचा तुलनात्मक पद्धतीनें अभ्यास केल्यास प्रत्येक धर्मांचे कांहीं स्वतःचे असे विशिष्ट **संस्कार** असतात व ते पाळल्याशिवाय कोणाहि मनुष्याचा त्या धर्माच्या अनुयायांमध्यें समावेश होत नाहीं, असें दिसून येतें. किंबहुना अशा प्रकारचे नियम धर्माच्या पोटपंथांतून आणि धर्माशीं संबंध असलेल्या संघांतून देखील सर्वत्र आढळून येतात.—धा० ४४

१९२०

हिंदु, पारशी, मुसलमानी किंवा ख्रिस्ती धर्मांचे कांहीं विशिष्ट विधि, आचार व **संस्कार** असून ते ते विशिष्ट विधि व संस्कार पाळल्याखेरीज कोणीहि त्या त्या विशिष्ट धर्मांचा अनुयायी होऊं शकत नाहीं.

—चि० ज० २

१९२१

धर्मानुयायित्व हा केवळ बुद्धिगम्य ज्ञानाचा परिणाम नसून त्याला बाह्य **संस्कारांची** नेहमींच अपेक्षा असत्ये, बाह्य संस्कारांवांचून तत्तत्धर्मानुयायित्व पुरें होत नाहीं, असें दिसून येतें. —चि० ज० २

१९२२

आमच्या धर्माचें, आचारविचारांचें संस्कृत ग्रंथ हें एक भांडारच होय; इतकेंच नव्हे तर मराठी भाषेची जननी या नात्यानें पाश्चात्य कल्पना आणि विचार यांचा मराठी भाषेंत परिपाक करणें असल्यास तो **संस्कृताचे** साहाय्यावांचून चांगला होणें दुर्घट आहे. —के० १८९५-१८-२-४

१९२३

**हिंदुस्थानची संस्कृति** ही रोम व अथेन्सच्याहि पूर्वीची आहे आणि युरोपखंडानें रानटी दशेतून डोकें वर काढलें नव्हतें त्याच्या पूर्वीपासून कित्येक शतकें हिंदुस्थान सुधारलेलें राष्ट्र म्हणून गाजत आहे.

—के० १९१९-१७-७-२

१९२४

नुसत्या **संस्था** स्थापण्यानें कांहीं व्हावयाचें नाहीं; त्यांमध्यें कार्यकारी माणसें पाहिजेत. —आ० व० ३४७

१९२५

इसापनीतींत नखें काढलेल्या सिंहाची जी गोष्ट आहे, त्यांतील सिंहा-पेक्षांही देशी **संस्थानिक** राजांची स्थिति गरीब झालेली आहे; कारण नखाची गोष्ट तर राहूं द्याच, पण हे जातीनें सिंह राहिले आहेत कीं नाहींत याचीहि वानवाच आहे. —के० १९०३-२-५-२

१९२६

प्रजेंतील निरनिराळ्या जातींच्या लोकांमधील तंट्यांत स्वतःच्या जातीच्या अभिमानानें न पडतां तिऱ्हाईतपणें सर्व जातींशीं व्यवहार ठेवणें हें प्रत्येक **संस्थानिकाचें** व राजाचें कर्तव्य आहे. —के० १९०१-४५-२५

१९२७

ज्याच्या त्याच्या बुद्धिबलानें धर्माचीं तत्त्वें हुडकून काढावीं व तींच तेवढीं खरीं, बाकीचीं खोटीं, अशा समजुतीवर ज्याचा पाया रचला गेला व ज्यांत कळकळरूपी जीवात्म्याचा पूर्ण अभाव, त्या **संस्था** पडल्यास किंवा उत्कर्ष न पावल्यास त्यांत कांहीं नवल नाहीं.

—के० १९०१-३९-२-५

१९२८

कोणत्याहि **संस्थेंत** एकाच विचाराचीं व एकाच धोरणाचीं माणसें असण्याबद्दल खबरदारी घ्यावी म्हणजे भलतेच प्रसंग येत नाहींत.

—आ० आ० २-१८

१९२९

परीक्षा ही कांहीं स्कॉलरशिपकरितां नाहीं. तर **स्कॉलरशिप** ही परीक्षे-करितां आहे. —चरि० २३

१९३०

**स्त्रीवर्गापैकीं** कांहीं एम्. ए., कांहीं बॅरिस्टर व कांहीं डॉक्टर झाल्या तरी तो अपवाद असून सामान्य स्त्रीवर्गाचें प्रमुख ध्येय मनूनें म्हटल्या-प्रमाणें—'उत्पादनमपत्यस्य जातस्य परिपालनम्। प्रत्यहं लोकयात्रायामेतत्स्त्री-स्त्रीनिनंधनम् ॥' हेंच राहणार हें निर्विवाद आहे.

—के० १९१६-८-६-२

१९३१

**स्त्री-शिक्षणाचें** पांघरूण घेऊन आमच्यांत घुसूं पाहणाऱ्या ख्रिस्ति बाया व त्यांस सहाय्य करणारे व्यवस्थापक—मग ते कितीहि विद्वान् अगर राजविभूषित असोत—यांस आम्ही आपल्या समाजाचे, हिंदुत्वाचे आणि स्त्री शिक्षणाचे सुद्धां शत्रुच समजतों. —धा० ८१

१९३२

वेदवाक्यांतून आगगाडी किंवा तारायंत्र काढण्याचा प्रयत्न जितका असमंजस आहे तितकाच स्मृतिग्रंथांतून **स्त्रीस्वातंत्र्यपर** वचनें काढण्याचा होय. —च० १९०

१९३३

**स्त्रियांचें शिक्षण** देशी भाषेंत व्हावें, त्यांत योग्य प्रतीच्या धर्मशिक्षणाचा समावेश झालेला असावा आणि आमच्याकडील कुटुंबव्यवस्थेला तें अनुसरून असावें. —के० १९१६-८-६-२

१९३४

मनुष्यमात्राचीं मतें नेहमीं विचारशक्तीस धरून राहतात असें नाहीं. **स्थानमाहात्म्याचाहि** विचारावर पुष्कळदां परिणाम होत असतो. —के० १९१८-३४-४-२

१९३५

स्थानिक बाबतींत व्यवस्था करण्याचा अधिकार लोकांकडे पूर्णपणें असल्याशिवाय **स्थानिकस्वराज्य** म्हणजे नुसती थट्टाच आहे. —के० १९०१-६-२-२

१९३५

राजसत्ता ज्याप्रमाणें एका स्वतंत्र पुरुषांत किंवा पुरुषसमूहांत अधिष्ठित असते आणि राजनियमांनीं प्रजा बांधिली गेली तरी राजा त्या नियमांनीं बांधिला जात नाहीं असें कित्येक पाश्चात्य राजधर्मशास्त्री मानितात त्याप्रमाणेंच नीतीच्या राज्यांत **स्थितप्रज्ञ** पुरुषांचा अधिकार असतो. —गी० ३६८

१९३७

ज्या कर्मयोग्याची बुद्धि किंवा प्रज्ञा स्थिर झाली त्याला **स्थितप्रज्ञ** असें म्हणतात. —गी० ६३५

१९३८

परमावधीची शुद्ध, सम व पवित्र बुद्धि हेंच काय तें नीतीचें सर्वस्व असल्यामुळें **स्थितप्रज्ञ** पुरुषास नीतिनियम लावूं पहाणें म्हणजे स्वयंप्रकाश सूर्याजवळ अंधकार असेल असें कल्पून त्यास मशाल दाखविण्याइतकें असमंजस होय. —गी० ३६८

१९३९

एखाद्या लक्षाधीशानें एखाद्या भिकाऱ्याजवळचे दोन पैसे हिसकून घेतले तर लक्षाधीशास चोर न म्हणतां भिकाऱ्यानेंच कांहीं अपराध केला असल्यामुळें लक्षाधीशानें त्यास शासन केलें असेल अशी कल्पना करितात. हा न्याय अधिक समर्पकरीत्या किंवा पूर्णपणें स्थितप्रज्ञ, अर्हत् व महा-भगवद्भक्त यांच्या वर्तनास लागू पडतो. कारण लक्षाधीशाची बुद्धिहि एखादे वेळेस चळूं शकेल; पण **स्थितप्रज्ञाच्या** बुद्धीस हे विकार केव्हांच स्पर्श करूं शकत नाहींत. —गी० ३७०

१९४०

समाजाचा उत्कर्ष हेंच **स्थितप्रज्ञाच्या** वर्तनाचें 'बाह्य धोरण' असतें. —गी० ३७७

१९४१

**स्थितप्रज्ञाचें** वर्तन म्हणजे कर्मयोगशास्त्राचा पाया होय. —गी० ६३६

१९४२

इस्तरी केलेल्या व पेज लावलेल्या गळपट्याचीं ऊर्ध्वमुख गलस्तना-सारखीं शुभ्र टोकें वर काढलीं म्हणून कित्येक दिवसपर्यंत **स्नान** न केल्या-मुळें अंगास येणारी दुर्गंधी थोडीच झांकणार आहे! —के० १९०४-४५-५-१

१९४३

थोर पुरुषांचा **स्नेह** अनिमित्त व निरपेक्ष असतो. —च० ६७०

१९४४

खुद्द अग्निहोत्राचा आचार जाणूनबुजून टाकून देऊन वर्षांतून एक वेळ श्रावणीच्या वेळीं प्रायश्चित्तानें काम भागतें, तर **स्पर्शास्पर्श** दोषाबद्दल प्रत्याम्नायद्वारा प्रायश्चित्त करीत गेल्यास सामाजिक प्रगति होऊन शिवाय योग्य धर्माभिमान राहूं शकतो. —धा० ७१

१९४५

**स्पेन्सर**साहेबांच्या ग्रंथांपासून जर कांहीं नवें वळण आपणांस घ्याव-याचें असेल तर तें हेंच होय कीं, सृष्टीच्या बुडाशीं जीं कांहीं अगम्य तत्त्वें आहेत त्यांचा विचार करून तत्त्ववेत्त्यांनीं आपणांस मुक्ति मिळाली म्हणून उगीच बसावयाचें नाहीं. या गूढ तत्त्वांचा विचार करणें तत्त्वज्ञाचें जितकें कर्तव्य आहे, तितकेंच हीं तत्त्वें व्यवहारास कशीं लावावीं हें जगाच्या नजरेस आणून देऊन मानवजातीची पूर्णावस्था कशी संपादावी ह्याचा त्यास बोध करणें हेंहि त्याचें काम होय. —आ० व० २७९

१९४६

**स्वतंत्र मनुष्य** आपल्या देशाकरितां मरेल, आनंदानें मरेल; कारण त्याच्या स्वातंत्र्यावरच गदा आलेली असते. तसा प्रकार दुसऱ्याच्या अमलाखालीं ताबेदार (Dependent) म्हणून राहणाऱ्या लोकांचा होत नाहीं. —के० १९१८-१८-४-३

१९४७

**स्वतंत्रता** हा तरी परमेश्वराचाच गुण आहे. —स्व० गी० ५

१९४८

खरी **स्वतंत्रता** व खरें सत्त्व यांचें जें राकट परंतु तेजःपुंज असें पाणी असतें तें आमच्या या नाजूकसाजूक स्थितींत नाहीं. आम्ही केवळ दिखाऊ बाहुलीं फुंकारानें उभीं राहणार व फुंकारानें पडणार. —के० ले० १-६४७

१९४९

**स्वत्व** हेंच राष्ट्रीयत्वाच्या कल्पनेचा मूळ पाया असून या स्वत्वच्या सीमेचा परिच्छेद ठरविणें हें काम महत्त्वाचें आहे.

—के० १९०१-१७-२-५

१९५०

आत्महित करण्यास **स्वत्व**बुद्धि मनांत नीट ठसली पाहिजे
—के० १९०१-१७-२-५

१९५१

**स्वत्वबुद्धि** जागृत झाल्याशिवाय कोणताहि सद्भाव सुफल-परिणामी होणार नाहीं. —के० १९०१-१७-२-५

१९५२

ईश्वर व स्वदेश भिन्न नाहींत; किंबहुना **स्वदेश** हें ईश्वराचें एक रूप आहे. —के० १९०६-४३-४-३

१९५३

**स्वदेशाचा** उत्कर्ष त्याचें स्वत्व कायम ठेवून करावयाचा असा बाणा बाळगणारे व त्या कामीं तनु-मन-धन खर्चीं घालण्यास तयार असलेले कर्ते पुरुष देशांत उत्पन्न झाल्याशिवाय देशाचें डोकें वर निघत नाहीं.
—के० १९०३-३३-५-१

१९५४

**स्वदेशभक्त** म्हणून नांवाजलेल्या आमच्या इकडील प्रसिद्ध मंडळींत जन्मभर पगाराचे पैसे मिळवून शेवटीं ते सर्व जसेच्या तसे बायको-बहिणी-च्या हवालीं करून देशसेवेच्या व्रताची सांगता करणाऱ्यांचा विशेष भरणा आहे. —के० १९०२-१५-५-२

१९५५

ज्याला स्वराज्य पाहिजे त्यानें **स्वदेशाचें** रक्षणहि केलें पाहिजे.
—के० १९१७-९-४-४

१९५६

आर्यभूमीला 'माता' म्हणून ओळखणें, हीच **स्वदेशी** चळवळ होय.
—व्या० २-१२८

१९५७

**स्वदेशी** आणि स्वराज्य कांहीं भिन्न नाहींत. स्वदेशीचें अंतिम स्वरूप स्वराज्य आहे. —व्या० १-८३

१९५८

जगाच्या उत्पत्तीच्या कार्यामध्यें शिव आणि पार्वती यांची ताटातूट करणें जसें दुरापास्त किंबहुना जगाच्या उत्पत्तीला विघातक त्याप्रमाणें **स्वदेशी** व बहिष्कार या दोन अंगांची ताटातूट करणें अशक्य इतकेंच नव्हे तर इष्ट कार्याच्या सिद्धीचा विध्वंस करणारें आहे.

—के० १९०५-३९-४-३

१९५९

आपल्या लोकांनीं आपली जी उन्नति करून घ्यावयाची ती **स्वदेशी चळवळ** व बहिष्कार यांसारख्या विलायतवाल्यांस फटकारा बसणाऱ्या उद्योगांनींच केली पाहिजे. —के० १९०६-१०-४-४

१९६०

**स्वदेशी** चळवळीनें जीवनकलहांतील फाजील तीव्र मत्सरबुद्धि आपोआप कमी होईल व गुण्यागोविंदानें संसार चालविण्यास सर्व दर्जांच्या व स्थितींच्या लोकांना सुलभ पडेल. —के० १९०६-११-४-२

१९६१

**स्वदेशी** चळवळ ज्याप्रमाणें स्वराज्य संपादन करण्यास उपयोगी आहे त्याचप्रमाणें सर्व देश पूर्ण स्वदेशी बनण्यास स्वराज्यानेंच एक संपादन

१९६४

**स्वदेशी चळवळीच्या** यशाची गुरुकिल्ली त्या चळवळींत केव्हांहि व कोठेंहि खळ न पाडणें यांतच आहे. —के० १९०५-५१-४-४

१९६५

उपासमार टाळावयाची असल्यास, आपल्या पोराबाळांच्या पोटाची तजवीज करावयाची असल्यास झीज सोसून **स्वदेशी चळवळीस** यशस्वी करण्याच्या मार्गास लागलें पाहिजे. —के० १९०५-५०-४-५

१९६६

**स्वदेशी** व बहिष्कार यांत द्वैत नाहीं. —व्या० २-१२८

१९६७

**स्वदेशी** हा पोटापाण्याचा प्रश्न आहे. —व्या० १-९७

१९६८

तुमचें हृदय, तुमचें मन, तुमचें अंतःकरण '**स्वदेशी**' आहे. ओळखलें मात्र पाहिजे ! —व्या० १-९८

१९६९

**स्वदेशी चळवळ** म्हणजे केवळ सुखाचा मार्ग नव्हे; त्यांत गैरसोय आहे व ती लोकांनीं सोसली पाहिजे. —के० १९०५-४९-४-५

१९७०

परदेशचें कापड वापणार नाहीं हा निश्चय ढळूं नये म्हणून लोकांनीं पुरवठ्याची तजवीज होईतों नेहमींच्याच खर्चांत कमी दर्जाच्या **स्वदेशी कपड्यावर** दिवस काढण्यास तयार होणें जरूर आहे.

—के० १९०५-५०-४-५

१९७१

एकपत्नीव्रताप्रमाणें **स्वदेशी** व्रत आहे. —व्या० २-६३

१९७२

**स्वदेशीचें** तत्त्व तुम्हांला मान्य झालें पाहिजे. कारण, तसें न होईल तर तुम्हांला आपला प्राण प्रिय नाहीं असें म्हणावें लागेल. —व्या० १-९९

१९७३

**स्वराज्याची** मागणी भावी यशाच्या उत्कर्षाचा पाया आहे. कळस नव्हे. —के० १९१७-२१-४-२

१९७४

पारतंत्र्यांत **स्वराज्या**शिवाय दुसरें ध्येय डोळ्यापुढें ठेवूं नका. —स्व० मो० ३०

१९७५

आमचें बहिरंग **स्वदेशी** कपड्यांनीं ज्याप्रमाणें सजविणें अवश्य आहे त्याचप्रमाणें अंतरंगहि स्वदेशी विद्येनें व विचारानें स्वदेशी गुरूंच्या हातून भरलें पाहिजे. —के० १९०६-३-४-४

१९७६

**स्वदेशी** व स्वराज्य यांचा अन्योन्याश्रय संबंध आहे, पूर्वापरसंबंध नाहीं. —के १९२०-२५-७-४

१९७७

स्वराज्याच्या साधनत्रयीपैकींच **स्वदेशी** व बहिष्कार हीं दोन साधनें आहेत. —व्या०-२-१२७

१९७८

परकी अंमलांत सरकारी नौकरी जशी राष्ट्रीय कल्पनांचा उदय, जोपासना व उत्कर्ष होतांना नोकरांच्या मनाला वांकड्या मार्गानें जाण्याची दुर्बुद्धि देते, त्याचप्रमाणें व्यापारविषयक व औद्योगिक चळवळींच्या वेळीं **स्वदेशी** तत्त्वांच्या वाढीवर जागजागीं बिब्बा घालण्यास परक्यांच्या व्यापारांचे व पेढ्यांचे गुलाम प्रवृत्त होतात. —के० १९०६-४४-४-३

१९७९

स्वराज्यापेक्षां **स्वदेशी**चीच जास्त प्रशंसा करणें म्हणजे ज्या देवतेची पूजा करावयाची असेल त्या वेळीं इतर सर्व देवतांपेक्षां त्या देवतेलाच इतर सर्वांपेक्षां जास्त प्राधान्य देण्यासारखेंच आहे. —के० १९२०-२५-७-४

१९८०

समाज हिंदूंचा असो वा फ्रेंचांचा असो, प्राचीन असो वा अर्वाचीन असो, पौरस्त्य असो वा पाश्चिमात्य असो त्यांत चातुर्वर्ण्यव्यवस्था अंमलांत असल्यास त्याप्रमाणें, किंवा दुसरी समाजव्यवस्था अमलांत असेल तर त्याप्रमाणें जें काम आपणांस प्राप्त झालें, अथवा शक्य असल्यास आपल्या अभिरुचीप्रमाणें पत्करिलें, तेंच आपला **स्वधर्म** बनतें; आणि तो धर्म सोडून देऊन कोणत्याहि सबबीवर आयत्यावेळीं कोणी दुसऱ्याचें काम करूं लागणें हें धर्मदृष्ट्या व सर्वभूतहितदृष्ट्या गर्ह्य होय असें गीता सांगत आहे. —गी० ४९२

१९८१

**स्वधर्माच्या** श्रेष्ठत्वाचा अभिमान ज्यांस वाटत नाहीं त्यांस स्वराष्ट्राच्या श्रेष्ठत्वाचा तरी अभिमान कोठून वाटणार ? —के० ले० १-४८८

१९८२

सांगोवांगीनें कोणी कांहीं करीत नसतो. जो तो आपल्या **स्वभावा**नुसार वागत असतो. —आ० आ० ११५

१९८३

भाषा हा विषयच असा कांहीं नाजूक आहे कीं, जेव्हां एखाद्या भाषेंत जे विचार व्यक्त करावयाचे असतात तेव्हां ती ज्यांची **स्वभाषा** आहे

१९८६

**स्वभाषेच्या** अंगीं नाना तऱ्हेचे मनोविकार व्यक्त करण्याची शक्ति आणणाऱ्या पुरुषांचे लोकांवर जे उपकार होतात ते ज्यांनीं भाषेची प्रथमतः युक्ति काढून व्यवहारसौकर्य केलें त्यांच्या उपकारांपेक्षां फारसे कमी नाहींत. —विष्णु०-१६

१९८७

आपल्या देशांतील लहानमोठ्या लोकांस आपले विचार कळवावे अशी ज्यांस उत्कट इच्छा असेल त्यास **स्वभाषे**खेरीज दुसरें साधन नाहीं, हें इंग्रजी शिकलेल्या लोकांनीं पक्कें लक्षांत ठेविलें पाहिजे.

—विष्णु० १७

१९८८

एखाद्या इंग्रजी बुकाचें साफ भाषांतर करणें किंवा साळुबाईची गोष्ट समजावून सांगणें यास मराठी भाषेचें ज्ञान लागत नाहीं असें नाहीं; पण मला लोकांच्या मनांत अमुक गोष्ट भरवून दिली पाहिजे अशा कळकळीनें ज्याचें अंतःकरण जळत नाहीं, त्याच्या हातून **स्वभाषेची** खरी सेवा होणें अशक्य होय. —विष्णु०-१७

१९८९

**स्वभाषेच्या** अभिवृद्धीस मदत करणें म्हणजे पुष्कळ अंशीं स्वदेशाच्या अभिवृद्धीस मदत करण्यासारखेंच आहे. —के० १९०३-४२-४-५

१९९०

१९९२

**स्वराज्य** मिळविण्यावर जर तुमचा विश्वास नसेल तर तुम्ही हिंदुस्थानांत राहण्यास नालायख आहांत. यापेक्षां हिंदुस्थानदेश सोडाल तर फार बरें.

—चरि० २३४

१९९३

**स्वराज्य** म्हणजे दुसरें तिसरें कांहीं नाहीं. माझ्या घरचा कारभार मी पाहणें याचेंच नांव स्वराज्य. —के० १९१७-२०-४-३

१९९४

**स्वराज्य** हा प्रत्येकाचा जन्मसिद्ध हक्क आहे. स्वराज्य मागितलें नाहीं तर मी पशु ठरेन अशी भावना आज लोकांमध्यें पसरली आहे.

—स्व. मो. (४) ७०

१९९५

**स्वराज्य** म्हणजे काय हें समजावून सांगावें लागतें हें देशाचें सुलक्षण नाहीं. स्वराज्य हें तुम्हांला जन्मतःच कळलें पाहिजे होतें. तुम्ही स्वराज्य चालविलें जिंकलें, अशा लोकांचे वंशज आहां हें लक्षांत आणा. तुम्ही स्वराज्य विसरला हा राज्यपद्धतीचा दोष आहे. —स्व०गी० ७

१९९६

**स्वराज्य** म्हणजे आपलें राज्य, तें आपलें आहे, आपल्याजवळ आहे. तें कोणी कोणाला देत नसतो. प्रयत्न करा; आपल्या पायांवर उभे रहा. तें तुमच्याजवळ आहे. तें कांहीं आकाशांतून पडत नाहीं. एके दिवशीं सकाळीं उठल्याबरोबर स्वराज्याचा पाऊस पडलेला दृष्टोत्पत्तीस आला असें कधीं होणार नाहीं. —व्या०२-१०८

१९९७

**स्वराज्य** म्हटलें म्हणजे 'स्व'च्या उलट कांहीं तरी राज्य असतें आणि त्या वेळीं ही कल्पना निघत असते हें उघड आहे. इंग्रज सरकारचें राज्य चांगलें कीं वाईट हा प्रश्न निराळा.स्वकीय आणि परकीय हा प्रश्न निराळा.

—ज० ३

१९९८

कोणी तुम्हांला सकाळसंध्याकाळ नळीवाटें जेवण घालूं लागला तर तें तुम्हांला रुचेल काय? रुचि ही अन्नांत नाहीं. ती स्वकष्टांत आहे. स्वकष्टानें मिळविलेलें अन्न जास्त गोड लागतें. तसें **स्वराज्य** व परराज्य यांचें आहे. —स्व० गी. ३५

१९९९

**स्वराज्य** ही कामधेनु आहे. तिची सेवा करणें ही थट्टेची गोष्ट नाहीं. दिलीपानें कसा आपला जीव संकटांत घातला हें ध्यानीं आणा. परमेश्वर वस्तु आणून देत नाहीं. तो प्रयत्नांना यश देतो. —स्व० गी. ३८

२०००

नोकरांचें राज्य जाऊन लोकांचें राज्य व्हावें याचेंच नांव **स्वराज्य.** देव कायमच ठेवावयाचा, बदलायचा तो फक्त पुजारी. —च० सु० ९२

२००१

**स्वराज्य** म्हणजे कायदेकौन्सिलांत लोकपक्षीय सभासदांचें वर्चस्व पाहिजे व कायदेकौन्सिलाचा कार्यकारी मंडळावर दाब पाहिजे. —च० सु० ८८

२००२

गव्हर्नरसाहेबांच्या मागें जसें सी. आय्. डी. आहे तसें तें आमच्या मागें आणणें याचेंच नांव **स्वराज्य**!! —स्व० मो० (२) ४१

२००३

तुम्हांला वाटतें कीं, हे कमिशनर, तहसीलदार, पोलीस सारे सरकार! पण हे कांहीं सरकार नव्हत—राजे नव्हत! हे जर राजे असते, तर त्यांना ५।६वर्षें नोकरी करून निघून कां जावें लागलें असतें! हे राजे नव्हत—ह्यांचे मुलगेहि राजे नव्हत. हे लोक विलायतेंत परीक्षा देऊन इकडे नोकरी करायला येतात. आतां ते तुम्हांला भेवडावतात, हें खरें; पण हे राजे नव्हत अशी जर तुमची समजूत होईल तर भीति जाईल व **स्वराज्य** कळेल. —स्व० मो० (४) ३८

२००४

लोकांच्या पुढाऱ्यांच्या हातीं स्वतंत्र अधिकार पडून त्यांत अधिकाऱ्यांच्या नव्हे तर लोकांच्या देखरेखीखालीं, लोकांच्या सोयीकरितां, लोकांच्या पैशाची व्यवस्था ज्या रीतीनें लावतां येईल अशा प्रकारचें **स्वराज्य** आम्ही मागत आहों. —के० १९१९-४९-६-२

२००५

संस्कृति, देव, धर्म, परंपरा, रक्तसंबंध यांकरितां **स्वराज्य** आहे. पण या सर्वांचे अभावीं नुसतें स्वराज्य – आहार, निद्रा, भय वगैरेंकरितां स्वराज्य – सर्व लोकांस हवें आहे. —आ० आ० १-२०७

२००६

ज्यांच्या मुठींत **स्वराज्य** आहे त्यांची मूठ उघडण्याचें सामर्थ्य हीच पात्रतेची कसोटी होय. —के० १९१९-४-८-४-२

२००७

**स्वराज्य** असलें म्हणजे कुरकुरी कधींहि नसावयाच्या असा कांहीं नेम नाहीं. जेथें राज्य आहे तेथें कुरकुरी या असावयाच्याच.

—के० १९०१-३४-३-५

२००८

**स्वराज्य** लांब नाहीं, तें जवळ आहे; त्याची ओळख पटवून घ्या. ती ओळख पटली म्हणजे स्वराज्य मिळविणें व देणें हे शब्दच राहात नाहींत, म्हणून स्वराज्यप्राप्तीचा पहिला उपाय ओळख पटणें हा होय.

—व्या० २-१२३

२००९

**स्वराज्य** आम्हांस साध्य आहे व स्वदेशी चळवळ, बहिष्कारयोग आणि राष्ट्रीय शिक्षण हीं स्वावलंबनाचीं सदर हेतु सिद्धीस नेण्यास तीन मोठीं साधनें आहेत. —के० १९०७-२-५-२

२०१०

आमचा **स्वराज्याचा** जन्मसिद्ध हक्क मिळेपर्यंत आमचें समाधान होणार नाहीं, ब्रिटिश राष्ट्रासहि बळकटी येणार नाहीं आणि जगांतहि खरी शांतता नांदणार नाहीं. —के० १९१९-४७-२-५

२०११

देशास **स्वराज्य** मिळविण्याकरितां शत्रूंस वेळप्रसंगीं नमस्कार घालण्यापासून तों राज्यक्रांतिकारक कोणताहि शेवटचा बंडखोरीचा अति जालीम उपाय ज्यास सुचेल तो अवलंबण्यास मी तयार आहें.

—आ० आ० १-२२९.

२०१२

सरकारच्या पेटींत नुसती पिशवी टाकूं नका, त्या पिशवीला चिट्टी जोडा, कीं 'हा **स्वराज्याचा** बयाणा आहे'.

—स्व० मो० (२) ३७-५९.

२०१३

मोठमोठ्या पगाराच्या जागा मिळविणें हा **स्वराज्याचा अर्थ** नसून देशांतील उद्योगधंदे वाढवून राष्ट्रीय संपत्तींत भर टाकणें हाच स्वराज्याचा खरा अर्थ आहे. —के० १९१९-५१-७ ४

२०१४

परमेश्वराच्या नांवाप्रमाणें **स्वराज्याची** घोषणा सुरू झाली पाहिजे. या बुद्धीबरोबरच तन-मन-धन अर्पण करण्यास प्रत्येकानें तयार असलें पाहिजे.

—स्व० गी० २५

२०१५

उन्या **स्वराज्याची** म्हणजे ज्यांतील राज्यसत्ता प्रजेच्या हातांत आहे अशाची वाण केवळ व्यवस्थित राज्यानें अगर स्वदेशी राजा असल्यानेंहि भरून येत नाहीं. —के० १९०७-१५-४-४

२०१६

उद्योगाशिवाय, स्वातंत्र्यदेवींचें अधिष्ठानाकरितां श्रीरामचंद्राप्रमाणें वनवास किंवा अज्ञातवास सोसल्याशिवाय **स्वराज्याची** प्राप्ति होऊं शकत नाहीं. —के० १९१७-२०-४-३

२०१७

होमरूल नको असें म्हणणारी एकहि व्यक्ति जेव्हां अधिकारी वर्गाच्या बाजूस राहणार नाहीं त्याच वेळीं **स्वराज्याची** मागणी त्यांस नाकारणें अशक्य होईल. —के० १९१७-५-५-४

२०१८

एकीकरण (ॲसिमिलेशन) किंवा स्वराज्याचे हक्क या दोनच उपायांनीं राष्ट्राची उन्नति होत असते. स्कॉटलंड व इंग्लंड यांचें जसें एकीकरण झालें तसें हिंदुस्थान व इंग्लंड यांचें होणें शक्य नाहीं. हिंदुस्थानांत दुसराच– म्हणजे **स्वराज्याचें** हक्क देण्याचा – उपाय अमलांत आणिला पाहिजे.

–ख० २५९

२०१९

**स्वराज्याचे** हक्क कोणत्याहि हिंदी ज्ञातीला मिळाले तरी चालतील; अशानें झगडा आपापसांत राहील; पण हल्लींच्याप्रमाणें तो तिरंगी होणार नाहीं.

–च० सु० ८६

२०२०

आपला धर्म, आपलें जीवित सारें **स्वराज्या**शिवाय फुकट होय, ही बुद्धि उत्पन्न झाली पाहिजे. –च० सु० ८८

२०२१

**स्वराज्याचें** तिकीट काढलें म्हणजे आपल्या सर्व किरकोळ मागणीचीं स्टेशनें गांठल्याचें श्रेय येईल. –स्व० मो० ५१

२०२२

हिंदुस्थानच्या **स्वराज्याच्या** मागणींत मानवजातीचा हितसंबंध ग्रथित झालेला आहे. –के० १९१७-४१-४-४

२०२३

हिंदी लोक **स्वराज्याच्या** हक्कास पात्र नाहींत असें म्हणणें म्हणजे लोकांसच नव्हे तर, गेलीं शंभर वर्षें हिंदुस्थानचें ज्यांनीं राज्य केलें त्यांसहि पर्यायानें विनाकारण नांवें ठेवण्यासारखें आहे. –के० १९१५-४७-६-३

२०२४

कोणताहि असा प्रश्न नाहीं कीं, जो **स्वराज्यावर** – सत्तेवर – अवलंबून नाहीं. –ज० ६१

२०२५

**स्वातंत्र्य** हें सर्व सुधारणेचें मूळ आहे. –के० १९१९-१७-७-२

२०२६

**स्वातंत्र्य** हा आत्म्याचा धर्म आहे; स्वातंत्र्य असेल तर आत्मा आहे, हें तत्त्व अविनाशी असल्यामुळें कोणाला भीत नाहीं. राजकीय तत्त्वज्ञानाचें या तत्त्वांतच पर्यवसान झालें पाहिजे. जें राष्ट्र उद्योगाला लागलें नाहीं त्याला या वेन्दाताचा उपदेश करणें, त्याचा आत्मा जागृत करणें जरूर आहे.

—के० १९१७-२०-४-३

२०२७

जगांतील प्रत्येक वस्तु दुसऱ्यावर अवलंबून असल्यामुळें पूर्ण **स्वातंत्र्य** कोठेंच नाहीं; सबब स्वातंत्र्य म्हणजे बाह्यशक्तीचा अभाव इतकाच अर्थ घ्यावयाचा. —के० १८९३-१६-२-३

२०२८

मनें तयार होतील तर **स्वातंत्र्य** तुमच्याजवळ ठेवलेलें आहे. तीं तयार नसतील तर पारतंत्र्याच्या रज्जूंनीं तुम्ही आवळलेले असाल. —व्या० २-१९

२०२९

शरीरास जसें चैतन्य तसें राष्ट्रास **स्वातंत्र्य** हें आहे; पूर्ण स्वातंत्र्य असल्यावांचून राष्ट्राची पूर्ण उन्नति कधींहि व्हावयाची नाहीं.

—के० १९०८-१३-५-१

२०३०

स्वराज्याच्या चळवळीचा आत्मा – शरीर नव्हे – स्वातंत्र्य आहे. **स्वातंत्र्य** कधींहि म्हातारें होत नसतें. —के० १९१७-२०-४-३

२०३१

**स्वातंत्र्य** कायम ठेवण्याचा यत्न करणें हा दैवी हक्क आहे.

—के० १९१५-१९-११-५

२०३२

आपल्या देशांत राहून त्याच्याप्रीत्यर्थ झटण्यांत जो मान आहे तो इंग्लंडांत राहून मिळणें शक्य नाहीं. कारण बोलूनचालून काळा अदमी ! घरांत **स्वातंत्र्य** असल्याशिवाय बाहेरचें स्वातंत्र्य फुकट आहे.

—आ० आ० २-५२८-५२९

२०३३

आत्म्याला सायुज्यमुक्ति आणि राष्ट्राला **स्वातंत्र्य** हीं दोन्ही आत्मा व राष्ट्र यांचीं अंतिम साध्यें आहेत. —के० १९०८-७-४-८

२०३४

संकटाखेरीज **स्वातंत्र्य** नाहीं आणि रात्रीखेरीज सकाळ नाहीं.

—के० १९०८-८-४-३

२०३५

पारमार्थिक गोष्टींत काशीयात्रा हें जसें अंतिम साध्य इहलोकीं आहे, तसेंच राजकीय बाबतींत **स्वातंत्र्यगंगा** हा अंतिम हेतु आहे.

—व्या० २-१२१

२०३६

आमचे रस्त्यावर विघ्नें आहेत; पण उमेद अशी आहे कीं, वाटेंत देह पडला तरी शेवटील वासना त्या **स्वातंत्र्यगंगेंत** जाऊन स्नान करीलच करील.

—व्या० २-१३१

२०३७

स्वराज्याचा इष्ट हेतु जो विश्वेश्वर तो स्वातंत्र्य-गंगेच्या कांठीं जें मंदिर आहे त्यांत मांडिलेला आहे. तो कायम ठेवा. संकटें येतील, कित्येकांचे प्राणहि खर्ची पडतील, पण असे प्राण गेले तरी आपल्या वासनेला त्या गंगेंत स्नान करावयाचा कधींना कधीं प्रसंग येईल हें लक्षांत ठेवा.

—व्या० २-१५२

२०३८

स्वतंत्र देशांतील लोक विपत्तींत पडलेल्या लोकांशीं सहानुभूति दाखविण्यास तयार असतात खरे; पण ही सहानुभूति मिळविण्यास विपन्न लोक **स्वातंत्र्यप्रिय** व स्वातंत्र्याकरितां झटणारे असले पाहिजेत.

—के० १९०५-४८-४-४

२०३९

कांस्याच्या कुंपणासारखीं लहान लहान राष्ट्रें बाजूस सारून आपल्या राक्षसी शक्तीचा उपयोग दुसऱ्याचें **स्वातंत्र्यहरण** करण्याकरितां करावा हा धर्म नव्हे. —के० १९१५-१९-११-५

२०४०

मक्केच्या अलीकडील एकाद्या मशिदींत नमाज पढावयास जर मुसलमानास सांगितलें तर तो नाकबूल होईल, त्याचप्रमाणें स्वातंत्र्यदेवीच्या मंदिराकडे तोंड करून जाणाऱ्याला अर्धवट **स्वातंत्र्यमंदिर** अगदीं अंतिम साध्य या नात्यानें पसंत पडावयाचें नाहीं. —व्या० २-११२

२०४१

**स्वातंत्र्या**करितां एकदां तंटा सुरू झाला म्हणजे मग यशप्राप्ति झाल्याखेरीज तो विझत नाहीं. —के० १९०६-१२-४-३

२०४२

**स्वातंत्र्याची** इच्छा मनांत धरणें हा मनुष्यस्वभावाचाच एक धर्म आहे. —के० १९०८-६-४-२

२०४३

२०४७

**स्वार्थ** आणि परार्थ भिन्न समजून ते तराजूंत घातल्यावर कांटा कोणिकडे झुकतो हें पाहून धर्माधर्माचा निर्णय करण्यास जे शिकले आहेत त्यांची लोककल्याणेच्छा तीव्र होणें कधींच शक्य नाहीं.

—गी० ३८४

२०४८

**स्वार्थ** व युक्ति यांच्या तंट्यांत स्वार्थ युक्तीला मारतो.

—के० १९०७-२७-७-३

२०४९

ढळढळीत नागडा **स्वार्थ** अगर आप्पलपोटेपणा जगांत चालत नाहीं.

—गी० ७९

२०५०

**स्वार्थ** इतका बलवत्तर आहे कीं, आपल्या पायाखालीं काय जळत आहे इकडे चांगल्या माणसांचेंहि पुष्कळ वेळां दुर्लक्ष होतें.

—के० १९०६-३२-४-४

२०५१

स्वार्थाचा आणि परार्थाचा विरोध आला असतां स्वार्थाचा त्याग करून परार्थाकडे वळणारेच पुरुष उत्तम होत. हे पुरुष जाणूनबुजून **स्वार्थत्याग** करतात असें म्हणण्यापेक्षां परार्थबुद्धीचा त्यांच्या ठायीं उत्कर्ष असल्यामुळें ते स्वार्थाची मातब्बरी ठेवीत नाहींत असें म्हणणें अधिक सयुक्तिक होय.

—विष्णु० २१

२०५२

जेथें जोम व नेट आहे, जेथें जूट आहे, आणि राष्ट्रांतील प्रत्येक स्त्री-पुरुष देशासाठीं परमावधीचा **स्वार्थत्याग** करण्यास तयार आहेत, 'तत्र श्रीर्विजयो भूतिः' असें आमचेंच काय पण परमेश्वराचेंहि सांगणें आहे.

—के० १९१७-९-४-२

२०५३

युक्तीचा पगडा स्वार्थावर बसण्यास दृढनिश्चयाचें आणि **स्वार्थत्यागाचें** पूर्ण बल पाहिजे.

—के० १९०७-२७-७-३

२०५४

सत्याचा, करारीपणाचा, एकनिष्ठतेचा व **स्वार्थत्यागाचा** महिमा इतका विलक्षण आहे कीं, 'निःस्वो वष्टि शतं शती दशशतं लक्षं सहस्राधिपः" याप्रमाणें व्यावहारिकदृष्ट्या भरभराटीच्या पाठीस लागलेल्या मनुष्यासहि दारिद्र्यांत राहून पूर्ण एकनिष्ठेनें देशसेवेस लागणाऱ्या मनुष्याचा महिमा अखेर गावा लागतो. —के० १९१६-२७-४-१

२०५५

**स्वार्थत्यागांत** आनंद मानण्याची मनास चटक लागल्याशिवाय कोणत्याहि लोकांच्या हातून महत्कार्य घडून येणें शक्य नाहीं. —के० १९०६-१०-४-५

२०५६

लोकस्वातंत्र्यापहारक **स्वार्थाकडे** दृष्टि ठेवून कचरत कचरत केलेलें काम स्वार्थदृष्ट्या मोठें मुत्सद्दीपणाचें वाटेल, पण त्यापासून इष्ट फलप्राप्ति कधींहि होणार नाहीं. —के० १९१८-१९-५-१

२०५७

एकाद्या मनुष्यानें आपलें सर्व द्रव्य समुद्रांत नेऊन टाकलें, किंवा आपण स्वतः विहिरींत जीव दिला तर तो शब्दशः **स्वार्थाचा त्याग** होईल; पण त्याबरोबरच सदर गृहस्थानें शहाणपणाचाहि त्याग केला असें म्हणावें लागेल. —के० १९०५-४४-५-१

२०५८

अमुक एक गोष्ट नीतिदृष्ट्या चांगली किंवा वाईट याचा निर्णय करण्यास ज्यानें **स्वार्थाचा** सर्वस्वी त्याग केला आहे व ज्याचें वैराग्य झळझळीत आहे त्यापेक्षां अधिक चांगला पुरुष कोण सांपडणार ? —के० १९०१-१०-२-५

२०५९

राजकीय व्यवहारांत तत्त्वविचारापेक्षां **स्वार्थाचें** प्राबल्य अधिक असतें. —के० १९०६-३८-४-३

२०६०

परकी लोकांचें स्वातंत्र्य हिरावून त्यांस कायमचे दास्यांत ठेवून आपलें हित करून घेण्याची जी प्रत्येक मनुष्याची लोभमूलक बुद्धि आहे ती कित्येकदां इतकी अनावर होते कीं, सारासार विचार अगर पूर्वींचा अनुभव ऊर्फ इतिहास देखील तो मनुष्य **स्वार्था**पुढें विसरून जातो.

—के० १९०७-४२-४-३

२०६१

ज्या ठिकाणीं मनुष्याच्या मताचा **स्वार्थाशीं** संबंध असतो त्या ठिकाणीं स्वार्थास चट्टा बसल्याखेरीज नुसत्या वादविवादानें त्याचें मत फिरवितां येत नाहीं. —के० १९०५-३४-४-३

२०६२

**स्वार्था**साठीं किंवा पोटासाठीं ज्ञानाच्या पुंजीचा विक्रय करण्यास जेव्हां एखादा मनुष्य तयार होतो, तेव्हां त्याच्या ज्ञानास शुद्ध व पवित्र ज्ञानाची किंमत देणें म्हणजे हिमालयांतून गोमुखाच्या द्वारें बाहेर पडणाऱ्या गंगोदकाची गटारांतील पाण्याशीं तुलना करणें होय.

—के० १९०५-४२-४-३

२०६३

सर्वस्वीं हतभागी झालेल्या लोकांस वर येण्यास जर कांहीं मार्ग असला तर तो **स्वावलंबन**, स्वार्थत्याग, आणि धैर्य हाच होय.

—के० १९०५-४७-४-४

२०६४

कोणतेंहि राष्ट्र अगर संस्था भरभराटीस येण्यास **स्वावलंबन** हें उत्तम साधन होय. —के० १८९२-५२-२-५

२०६५

उद्योग करितां करितां कोणा तरी समर्थ व परोपकारी अशा विभूतीची गांठ पडते, किंवा आपल्या अंगीं जें काय सामर्थ्य असतें त्याचाच **स्वावलंबनाचे** तत्त्वावर उपयोग करण्यास मनुष्य जेव्हां प्रवृत्त होतो तेव्हांच त्याची कार्यसिद्धि होते. —के० ले० २-५५६

२०६६

**स्वावलंबना**सारखा कायदेशीरपणा नाहीं व मणगटासारखा राजदंड सुद्धां नाहीं. —के० १८९७-१९-३-२

२०६७

ज्या राष्ट्रांत **स्वावलंबनाचा** धडा गिरविला जातो तें राष्ट्र अभ्युदयाला चढलेंच पाहिजे. —के० १९१७-३८-७-१

२०६८

प्रजेस हक्क पाहिजे असल्यास तिनें ते स्वपराक्रमानें व **स्वावलंबनानेंच** मिळविले पाहिजेत. —के० १९०८-८-४-३

२०६९

जोंपर्यंत **स्वावलंबनाची** संवय लागलेली नाहीं तोंपर्यंत आम्ही आणखी कितीहि गुणसंपन्न झालों तरी व्यर्थ आहे. झाड जिवंत आहे तोंपर्यंत कितीहि वांकविलें तरी वाढण्याची आशा आहे, पण निर्जीव झाल्यावर तें सुंदर कपाटांत जतन करून ठेविलें तरी काय उपयोग ? —के० ले० १-४०८

२०७०

राज्यांतील अंतर्व्यवस्थेसंबंधानें लोकांस जे **हक्क** द्यावयाचे ते लहान असोत वा मोठे असोत, त्यासंबंधाच्या बाबी तोडून काढून त्या पूर्णपणें लोकांच्या ताब्यांत दिल्या पाहिजेत. त्यांत ढवळाढवळ करण्याची संधि सरकारी अधिकाऱ्यांस असूं नये. —के० १९१५-४८-६-१

२०७१

हक्क संपादन करणें जितकें महत्त्वाचें आहे तितकेंच मिळालेले **हक्क** संभाळून ठेवण्याचें व हक्काची पायमल्ली करणारास योग्य शासन करण्याचें काम महत्त्वाचें आहे. —के० १८९१-२४-३-३

२०७२

**हलकेपणा** कामावर नसतो, मनुष्यावर असतो, हें तत्त्व जसें इंग्रज लोकांच्या हाडीं खिळलें आहे तसें अद्याप आमच्या आंगवळणीं पडलें नाहीं. —के० १८९९-३२-३-२

२०७३

ज्या ठिकाणीं दोनहि बाजू सांखळी तुटूं न देण्याविषयीं झटत असतात त्या ठिकाणीं प्रत्येकानें थोडथोडी हार खाणें योग्य होय.

--के० १९००-७ ३-२

२०७४

हिंदी लोक बौद्धिक ज्ञानांत कोणालाहि हार जाणार नाहींत.

—के० १९१८-५-२-६

२०७५

हिंदु हा शब्द उच्चारल्याबरोबर त्यांतील सर्वांना एकप्रकारची ईर्षा, एक प्रकारचा आवेश, एकप्रकारचा उत्साह उत्पन्न झाला पाहिजे.

—व्या० १-२ ९

२०७६

परधर्मी मनुष्य हिंदुधर्माचीं तत्त्वें स्वीकारून ज्ञानी झाला तर आम्ही त्याचा योग्य मान व गौरव करितों; आणि तो साधु असेल तर मरणा-नंतर त्याचें स्मारक म्हणून कबरस्थान बांधून त्याची पूजाहि करितों. पण तो हिंदु होता किंवा नाहीं असा जेव्हां प्रश्न निघतो, तेव्हां त्यास आम्ही हिंदु म्हणत नाहीं. परधर्मीय ज्ञानी पुरुषांचा व साधूंचा याप्रमाणें हिंदूंनीं सत्कार करणें हें कित्येकांस चमत्कारिक वाटेल. पण आमच्या मतें हिंदूंनीं आपलेपणा न सोडितां अशा रीतीनें परधर्मीय साधुपुरुषांचा सत्कार केल्यास त्यांत त्यांचें औदार्य व समताच जास्त व्यक्त होते. —चि० ज० ४

२०७७

प्रामाण्यबुद्धिर्वेदेषु साधनानामनेकता ।
उपास्यानामनियमश्चैतद्धर्मस्य लक्षणम् ॥
धर्ममेनं समालम्ब्य त्रिविधिभिः संस्कृतस्तु यः ।
श्रुतिस्मृतिपुराणोक्तैः क्रमप्राप्तैरथापि वा ॥
स्वे स्वे कर्मण्यभिरतः श्रद्धाभक्तिसमन्वितः ।
शास्त्रोक्ताचारशीलश्च स वै 'हिंदुः' सनातनः ॥

—चि० ज० ४

२०७८

बेन्थाम-मिल्लप्रभृतींचीं नीतितत्त्वें धर्मापासून स्वतंत्र अशीं आहेत; परंतु **हिंदूंची** नीति धर्माशीं एकरूप झालेली आहे.

—के० १९०१-३-२-३

२०७९

**हिंदूंची** संख्या जास्त आहे, त्यांची परंपरा मोठी आहे, मनोनिग्रह व सोशिकपणा त्यांच्यांत आहे—ह्याचा उपयोग आजपर्यंत आमच्या गळ्या-भोंवतींचीं दास्यत्वाचीं बंधनें घट्ट आवळण्याकडे झाला, आतां त्याचा उपयोग हीं बंधनें कमी करण्याकडे झाला पाहिजे. —व्या० १-५२

२०८०

कमी—जास्त दर्जा असेल, पण महारमांगापासून ब्रह्मवाद्यापर्यंत सारे **हिंदूंत** येतात. —व्या० १-२९

२०८१

औरंगजेबाचे फौजेस तोंड देण्याकरितां शिवाजीच्चे मावळ्यांनीं लंगोटी टाकून मांडचोळणा घातला, व हिंदुस्थान कायीज करण्याकरितां राघो-भरारीनें जानवें कंबरेला गुंडाळलें; पण त्यांनीं आपलें **हिंदुत्व** किंवा ब्राह्मणत्व टाकलें नाहीं. —के० १९०३-३३-४-५

२०८२

**हिंदुत्व** किंवा जातिवैशिष्ट्य म्हणून कांहीं भाग जीवाप्रमाणें आम्हीं पाळला असल्यामुळें ७०० वर्षें जरी मुसलमानी राज्य आम्हांवर गाजलें तरी, सर्व हिंदुस्थान मुसलमान झालें नाहीं, किंवा कोणत्याहि हिंदूचा गोमांसाबद्दलचा तिटकारा कमी झाला नाहीं. —के० १९०३-९-४-३

२०८३

कराल त्या सुधारणा आपल्या **हिंदुत्वाचें** वैशिष्ट्य कायम राखून करा.

—चरि० ३०६

२०८४

**हिंदुधर्म** द्वेष करावयास शिकवीत नाहीं. —व्या० २-१२८

२०८५

पृथ्वीवरील सर्व धर्मांत अत्यंत सहिष्णु, ज्यानें त्यानें आपापल्या धर्मानें वागावें व सर्वांशीं प्रेमानें वागावें असें सांगणारा जर कोणचा धर्म असेल तर तो **हिंदुधर्म** आहे. —व्या० २.५५

२०८६

आपत्कालींहि आपला धर्म न सोडणें हें जिवंतपण होय. हें तत्त्व ज्याला कळलें त्यालाच **हिंदुधर्म** कळला; धर्म म्हणजे नुसतें देवळांत जाऊन पूजा करणें नव्हे. —स्व० मो० ४७

२०८७

**हिंदुधर्म** जुना असून त्यांत सांगितलेल्या मुख्य गोष्टी दुसऱ्या कोणत्याहि धर्मांतील गोष्टींपेक्षां अधिक सयुक्तिक आहेत. —के० १९००-३८-२-१०

२०८८

जात, खाणें, पिणें यांत **हिंदुधर्म** नाहीं; तर त्याचा विचार यापेक्षां फार खोल आहे. —के० १९०१-३८-५-५

२०८९

आत्मानात्मविचाराचें **हिंदुधर्म** हें माहेरघर आहे.
—के० १९०१-९-२-४

२०९०

**हिंदुधर्म** नुसता पुस्तकांत राहून उपयोगी नाहीं; हिंदुधर्माचे अनुयायी जगांत राहिले पाहिजेत किंबहुना त्यांची संख्या वाढली पाहिजे तरच हिंदुधर्म राहील. —के० १९०३-२४-५-५

२०९१

हिंदुधर्माइतका आग्रहशून्य धर्म दुसरा कोणताच नाहीं. ज्यानें त्यानें आपापल्या धर्मांत राहून आत्म्याचें कल्याण करावें, असें हिंदु लोक समजतात. आणि असें आहे तर शाळांत **हिंदुधर्मशिक्षण** दिल्यानें राष्ट्रीयत्वाची हानि होईल असें मानणें असमंजसपणाचें लक्षण होय.
—धा० ८१

२०९२

या इंग्रजी राज्यांत जर सर्व लोक दारूबाज बनले नाहींत, तर त्याचें श्रेय अबकारी खात्याकडे न येतां **हिंदुधर्माकडेच** येईल !

—के० १९०३-९-४-३

२०९३

**हिंदुधर्माइतका** सहिष्णु धर्म जगांत दुसरा सांपडणार नाहीं.

—के० १९०७-३९-७-१

२०९४

सर्व प्रकारच्या लोकांनीं अमुकच धर्ममतावर विश्वास ठेवावा किंवा अमुकच आचरण करावें असा नियम करणें म्हणजे नातवाचें आंगडें आजोबाला घालणें किंवा जवानाचें काम लहान पोराला करूं सांगण्या-सारखेंच आहे. **हिंदुधर्माखेरीज** इतर कोणत्याहि धर्मांत हें तारतम्य राखलेलें आढळत नाहीं. —के० १८९४-३६-२-३

२०९५

समुद्राला भरती येत असतांनाहि लाटांचें पुरःपरावर्तन व्हावें लागतें; त्याप्रमाणेंच **हिंदुधर्माचा** वेळोवेळीं ऱ्हास झाला असें आपाततः वाटलें तरी सूक्ष्मदृष्टीनें अवलोकन करणाराला त्याची हळुहळू पण एकसारखी वृद्धिच होत आली आहे असें आढळून येईल. —के० १८९४-३६-२-२

२०९६

**हिंदुधर्माची** खिस्ती किंवा महंमदी धर्मापासून व्यावृत्ति करण्यासारखें जर लक्षण बांधावयाचें असेल तर विभूतींचें अनंतत्व आणि ईश्वराचें एकत्व ही आमच्या धर्माची विशेष गोष्ट त्यांत घातली पाहिजे.—धा० ६०

२०९७

हिंदुधर्मांत इतर धर्मांहून ज्या कांहीं विशेष गोष्टी आहेत त्यांतील साधनांची अनेकता ही एक मुद्दयाची गोष्ट आहे व त्यामुळें इतर धर्मांपेक्षां **हिंदुधर्माची** योग्यता अधिक आहे असें सहज कळून येईल.

—धा० ३४-३५

२०९८

इतर धर्मांबद्दल द्वेष व विरोध वाढूं न देतां **हिंदुधर्मांची** जागृति व उन्नति करून हिंदुधर्मीयांचा मिलाफ करणें शक्य आहे —आ० व० २४६

२०९९

बौद्ध, ख्रिस्त, महंमदी हे तिन्ही धर्म मूळ **हिंदुधर्मांची** संतती आहे.
—के० १९०३-३७-४-४

२१००

प्रामाण्यबुद्धिर्वेदेषु साधनानामनेकता ।
उपास्यानामनियमश्चैतद्धर्मस्य लक्षणम् ॥

वेदांचें प्रामाण्य, साधनांची अनेकता आणि उपास्यांचा अनियम हीं **हिंदुधर्मांचीं** विशेष लक्षणें होत. —के० १९००-३८-२-३

२१०१

निरनिराळ्या धर्मांत जो भेद आहे तो परंपरेंत आहे. म्हणून **हिंदुधर्मां-ची** ही परंपरा कायम राहील तरच हिंदुधर्मांची उन्नति व रक्षण होईल.
—के० १९०४-३८-४-२

२१०२

यथाधिकार पारंपर्यक्रमानें जे विधिसंस्कार प्राप्त झाले ते पाळणें व त्यांचें बंधन धर्मदृष्ट्या उत्पन्न झालें आहे, निव्वळ नीतिदृष्ट्या किंवा राज-शासनदृष्ट्या नव्हे, अशी दृढ समजूत असणें हें आचारात्मक **हिंदुधर्मांचें** मुख्य तत्त्व होय. —चि० ज० ३

२१०३

जातिभेद किंवा वर्णभेद **हिंदुधर्मांचें** अंग असलें तरी हिंदुधर्मांचें लक्षण बांधतेवेळीं 'हिंदुधर्म' केवळ एकाद्या विशिष्ट जातीच्या आचारावरच अवलंबून नसून या सर्व ज्ञातींचें तो सामान्य बंधन आहे, व कोणत्याहि ज्ञातींतील विशिष्ट आचार किंवा विशिष्ट धर्ममतें यांशीं त्याचें सादृश्य असलें तरी त्यांहून तो विलक्षण आहे हें नेहमीं लक्षांत ठेवलें पाहिजे.
—के० १९०३-७-४-४

२१०४

हिंदु म्हणजे नुसता शैव नव्हे, नुसता वैदिक नव्हे, नुसता वैष्णव नव्हे, किंवा नुसता भागवत धर्महि नव्हे. एका नदींतून फुटून ज्याप्रमाणें निरनिराळे कालवे जातात त्याप्रमाणें हे **हिंदुधर्माचे** कालवे आहेत व या निरनिराळ्या पंथांचीं जीं विशिष्ट लक्षणें आहेत तीं बाजूस ठेवून जें सामान्य स्वरूप राहतें तें हिंदुधर्माचें खरें स्वरूप होय. निरनिराळ्या पंथांतील मतभेदांचे तंटे सामान्य हिंदुधर्मसंमत नाहींत, ही गोष्ट नव्या पिढीच्या मनांत जितक्या स्पष्ट रीतीनें बिंबेल तितकी बिंबवून देणें हें प्रत्येक हिंदुधर्माभिमान्याचें कर्तव्य होय. —धा० ३५

२१०५

**हिंदुधर्माचें** स्वरूपलक्षण सांगतांना त्यांतील विधिसंस्कार परंपरागत पण यथाधिकार भिन्न असतात असें म्हटलें पाहिजे. हे परंपरागत विधिसंस्कार म्हणजेच पारंपर्यक्रमागत आचार होत. हे आचार जो पाळील त्यासच आम्ही **हिंदु** म्हणतों. —चि० ज० ३

२१०६

'प्रामाण्यबुद्धिर्वेदेषु' हें तत्त्व स्वीकारून पारंपर्यागत व श्रुतिस्मृतिपुराण-प्रतिपादित विधिसंस्कार किंवा आचार पाळणारा तो हिंदु होय, असें आचारात्मक **हिंदुधर्माचें** लक्षण करणें आमच्या मतें अधिक प्रशस्त होय. —चि० ज० ३

२१०७

**हिंदुधर्माचें** व देवस्थानांचें प्राचीन स्वरूप व वैभव याची कल्पना या संस्था पाहिल्याशिवाय कोणासहि व्हावयाची नाहीं. —च० ६५१

२१०८

हिंदुधर्माप्रमाणें ख्रिस्ती धर्मांतहि रोमन कॅथोलिक, प्रॉटेस्टंट, प्युरिटन्स वगैरे पुष्कळ शाखा आहेत, पण ते सर्व ख्रिस्ती या नात्यानें जसे एकच

२१०९

रूढीसारख्या भुसभुशीत पायावर हिंदुधर्माची इमारत उभारलेली असती तर ती कधींच ढासळून गेली असती; ती सर्वदा सत्य, अविनाशी व शुद्ध अशा ब्रह्मतत्त्वावर बांधली असल्यामुळेंच इतके दिवस टिकली आहे; ही गोष्ट **हिंदुधर्माच्या** निंदकांनीं व अभिमान्यांनीं सदोदित लक्षांत बाळगिली पाहिजे. —के० १८९३-१२-२-४

२११०

**हिंदुधर्माच्या** पुरातनत्वाकडे लक्ष दिलें तर बौद्ध, ख्रिस्ती किंवा महंमदी हे धर्म म्हणजे अलीकडचीं अर्भकें होत. —के० १९०१-९-२-४

२१११

प्राचीन वैदिक धर्मांतील सर्व विधिसंस्कार आम्ही पाळीत नसलों तरी ते हल्लींच्या विधिसंस्कारांचें मूळ असून हल्लीं अमलांत असलेल्या विधिसंस्कारांस जें प्रामाण्य आलें आहे तें मूळ प्राचीन विधिसंस्कारांच्या परंपरागतत्त्वाचें फल आहे, असें आम्ही मानितों, हें यांतील तत्त्व आहे; आणि तें पाळून तदनुसार वागणें हें **हिंदुधर्माच्या** स्वरूपाचें मुख्य व सामान्य लक्षण होय. —चि० ज० ३

२११२

**हिंदुधर्मांत** आत्म्याचें स्वरूप वर्णिलेलें असून आत्मा आणि ईश्वर एक हा त्याचा सिद्धान्त आहे. —के० १९०१-३८-५-५

२११३

**हिंदुधर्मांत** जर कांहीं विशेष असला तर तो हाच होय कीं, ईश्वराची करणी किंवा प्रसाद मर्यादित आहे असें आम्ही मानीत नाहीं. —धा० ६०

२११४

तुमच्या कर्माप्रमाणें तुम्हांला फळ मिळेल ही कल्पना **हिंदुधर्मांतील** असून ती जगभर पसरेल. हें सोनें ( ही कल्पना ) येथील बाजारांत लोखंड समजलें जात असून सध्यां पाश्चात्यांच्या बाजारांत त्याची किंमत होत आहे. —व्या० १-३७

२११५

आचारविचारावर कोणत्याहि प्रकारचें आवरण नसावें असें वाटून हिंदु रीतिभाती मोडण्यास प्रवृत्त होणें निराळें आणि **हिंदुधर्मावर** पूर्ण विश्वास असून त्यांतले त्यांत देशकालानुरूप फेरफार करण्यास झटणें निराळें. —के० १९००-२८-३-३

२११६

मिशनऱ्यांप्रमाणें **हिंदुधर्मासाठीं** काम करणारांची जरूरी आहे. —आ० आ० १-२

२११७

**हिंदु-मुसलमानांमधील दंगे** होण्यास सार्वजनिक हक्कासंबंधीं वाद व दांडगाई केली असतां आपणांस हक्क मिळतील अशी अडाणी मुसलमानांची समजूत हींच मूळ कारणें आहेत; व दंगे मोडण्यास योग्य उपाय म्हटले म्हणजे मामूल वहिवाटीप्रमाणें हक्काचा निःपक्षपातीपणानें न्याय करणें आणि केलेला न्याय कोणाचीहि भीडमुरवत न धरतां जरूर पडल्यास कडक रीतीनें अंमलांत आणणें हेच होत. —के० ले० १-२३९

२११८

**हिंदुमुसलमान** लोकांनीं ज्या नात्यानें एकत्र रहावयाचें तें कांहीं-अंशीं अमेरिकेंत निरनिराळ्या जातींचे, निरनिराळ्या धर्मांचे लोक जसे एकत्र राहतात तशा प्रकारचेंच असलें पाहिजे. —के० ले० १-२३५

२११९

गोरक्षणाकरितां जर हिंदुलोक दंगा करतात असें मानलें तर मग युरोपियन अगर ख्रिश्चन लोकांविरुद्ध ते कां दंगा करीत नाहींत? यावरून असें उघड होतें कीं, **हिंदु-मुसलमानांतील** वैमनस्य इतर कांहीं कारणामुळें हल्लीं ज्यास्त वाढलें असून कधीं कधीं त्यांच्या मनानें पेट घेण्यास गोरक्षणादिकांची सबब पुरी होते. वास्तविक गोरक्षण हें त्याचें कारण नव्हे. हिंदु-मुसलमानांमध्यें जो कांहीं स्वभावतःच थोडा द्वैतभाव आहे तो शिक्षणाचा अधिक प्रसार झाल्याखेरीज व मुसलमानी धर्ममतांत आमच्या वेदान्ताची अधिक भेसळ झाल्याखेरीज कधींहि पूर्णपणें नाहींसा व्हावयाचा नाहीं. —के० ले० १-२३१

## २१२०

हिंदुस्थानांतील प्रजेचे सामान्य हक्क संपादन करण्याकरितां जरी आम्ही एक झालों व होऊं, तरी धर्माचा, खाण्यापिण्याचा, आणि आचार-विचाराचा **हिंदु-मुसलमान** यांच्यांत जो भेद आहे तो कित्येक शतकें तरी कायम राहील, या समजुतीवरच सरकारानें व आम्हीं त्याची योग्य व्यवस्था लाविली पाहिजे. आणि ती व्यवस्था म्हटली म्हणजे लॉर्ड लॅन्सडौन यांनीं आग्रा येथें सांगितल्याप्रमाणें अथवा १८५८ सालच्या राणीसरकारच्या जाहिरनाम्याप्रमाणें निरनिराळ्या जातींस आपापल्या चालीरीति, एकमेकांस त्रास अगर उपसर्ग न लावतां, पाळूं देण्याची सवलत देणें हीच होय. —के० ले० १-२७५

## २१२१

दंगा होण्यापूर्वीं जीं कांहीं कारणें घडून येतात त्यांपैकीं एखादे वेळेस गोरक्षण, एखादे वेळेस ताबूद आणि दुसऱ्या एखाद्या वेळेस हिंदु अगर मुसलमानांची यात्रा हीं असण्याचा संभव आहे. परंतु **हिंदु-मुसलमानांचें वैमनस्य** ज्यास मोडावयाचें आहे त्यास या सर्व गोष्टींच्या पलीकडे जाऊन विचार करावयास पाहिजे. —के० ले० १-२३१

## २१२२

**हिंदुमुसलमानांचें ऐक्य** दिवसानुदिवस वृद्धिंगत होण्यास नुसत्या उदार बुद्धीपेक्षां न्याय आणि उदारबुद्धि यांच्या जोडगोळीनें या कामाचा निकाल लवकर व कायमचा लागेल हें आम्हीं सांगितलें पाहिजे असें नाहीं. —के० ले० १-२१८

## २१२३

हिंदु लोक हे जात्याच धर्मसंबंधीं जितके उदार आहेत तितके दुसऱ्या कोणत्याहि धर्मांतले लोक आढळावयाचे नाहींत असें असतां जर **हिंदु-मुसलमानांमध्यें तंटे** होतात तर नुसत्या औदार्यानें ते तंटे मिटतील असें आम्हांस वाटत नाहीं. —के० ले० १-२१८

२१२४

**हिंदु-मुसलमान** लोकांच्या पुढाऱ्यांनीं एकत्र मिळून दंगे मिटवावे व पुढें असले दंगे न होण्याची तजवीज ठेवावी, म्हणून सरकारी अधिकारी जो डांगोरा पिटीत आहेत तो अगदीं एकतर्फी व आपमतलबी आहे असें आमचें मत आहे; व सरकारच्या सूचनेस भुलून जर आमचे पुढारी लोक ही सर्व जबाबदारी आपल्या शिरावर घेऊं पहातील तर केव्हां ना केव्हां तरी फसल्यासारखें होऊन त्यांची फजिती झाल्याशिवाय राहाणार नाहीं.

—के० ले० १-२१३

२१२५

**हिंदु व मुसलमान** या दोघांत जर सलोखा व ऐक्य रहावयाचें असेल तर दोन्ही जाती एकमेकांचा प्रतिकार करण्यास समर्थ आहेत अशी त्यांची समजूत होणें अगदीं अवश्य आहे. —के० ले० १-२०९

२१२६

**हिंदु-मुसलमान** पुढारी लोकांची या बाबतींत एकवाक्यता झाली तरी सदर पुढारी लोक जें कांहीं सांगतील त्याचा खालच्या प्रतीच्या लोकांवर कोणत्या रीतीनें अंमल व्हावा हा प्रश्न शिल्लक राहतो तो राहतोच. सारांश, अखेरीस या बाबतींत सरकारचें वर्तन अमुक एक प्रकारचें असलें पाहिजे व त्यांनीं अमुक एक प्रकारचे नियम केले पाहिजेत असें म्हणणें भाग पडतें. —के० ले० १-२१९

२१२७

**हिंदुराष्ट्र** म्हणजे कांहीं गुलामांचें राष्ट्र नव्हे. —आ० व० २६८

२१२८

धर्मांत भेद, फूट होऊं देणें बंद केलें पाहिजे व **हिंदुसमाज** एक राहिला पाहिजे. —व्या० १-२९

२१२९

**हिंदुसमाजाच्या** आजपर्यंतच्या चालत आलेल्या रचनेंत देशकालमानानें कांहीं फेरफार झाले पाहिजेत एवढें कोणीहि विचारी मनुष्य कबूल करील.

—विष्णु० १४

२१३०

सर्व आशियाटिक राष्ट्रांत **हिंदुस्थानदेश** सुधारणेंत व बुद्धिमत्तेत फार प्राचीन काळापासून अग्रेसर व वडील असून हेंच नातें नूतन राष्ट्रजागृतींतहि राहून आशियांतील सर्व राष्ट्रांना भावी मार्ग सर्व हिंदुस्थानचे लोक दाखवतील असा संभव दिसत आहे. —के० १९०३-३५-४-५

२१३१

पृथ्वीवरील कोणतेंहि राष्ट्र सुधारलेल्या अवस्थेंत येण्यापूर्वी **हिंदुस्थान-देश** सुधारणेच्या शिखरास पोहोंचलेला होता. —के० १९०३-४९-४-३

२१३२

**हिंदुस्थान** देश जर सुखी व समृद्ध व्हावयाचा असेल तर त्यांतील शेतकरी वर्गहि समृद्ध पाहिजे आणि मध्यम प्रतीचे लोकहि सुखी पाहिजेत. —के० १९०२-७-४-५

२१३३

तत्त्वज्ञान हा विषय **हिंदुस्थान** देशांतल्या भूमिकेस किंवा लोकांस अपरिचित आहे असें नाहीं; किंबहुना या विषयाचें आदिस्थान हाच देश होय असें म्हटलें तरी चालेल. —के० १९०३-४९-४-३

२१३४

जोंपर्यंत **हिंदुस्थान** देश शृंखलाबद्ध आहे तोंपर्यंत त्याला राष्ट्रसंघांत योग्य स्थान मिळणें आणि जगांत शांतता राखण्याचें संघाचें कार्य करण्याची शक्ति त्यास येणें शक्य नाहीं. —के० १९१९-१७-७-१

२१३७

हिंदुस्थान देश इंग्लंडच्या मालकीचा एक सुंदर सुपीक प्रांतच फक्त नसून खुद्द इंग्लंडच्या स्वातंत्र्याचा, वैभवाचा, किंबहुना अस्तित्वाचा पाया आहे. —के० १९०३-३१-४-४

२१३८

हिंदुस्थान देशाप्रमाणें अध्यात्मज्ञानाची वाढ प्राचीन काळीं दुसरे कोठेंच झालेली नसल्यामुळें दुसऱ्या कोणत्याच देशांत कर्मयोगाचें आध्यात्मिक उपपादन प्रथम निघणें शक्य नव्हतें व निघालेंहि नाहीं. —गी० ४८८

२१३९

विमानासारख्या अशक्य गोष्टी ज्यांनीं शक्य करून दाखविल्या त्यांना हिंदुस्थानसारखें राष्ट्र एकदम स्वराज्याला लायक करण्याला एक शतक पुरलें नाहीं, यावरून हिंदुस्थानची नालायकी सिद्ध होण्यापेक्षां इंग्लंडचीच सिद्ध होते. —आ० आ० २-५२८

२१४०

ज्या न्यायनीतीबद्दल, ज्या जोरदार अध्यात्मस्फूर्तीबद्दल, ज्या खण-खणीत तत्त्वज्ञानाबद्दल हिंदुस्थानची कीर्ति आज सर्व जगभर दुमदुमून राहिली आहे, त्या सर्वांच्या वतीनें मी तुम्हांस आव्हान करतों कीं, शुद्धीवर या, खडबडून जागे व्हा, आणि हा माझ्या घरचा कारभार आहे असें जाहीर करा. —स्व० मो० २२

२१४१

हिंदुस्थान देश हा अनेक राष्ट्रें मिळून झालेला आहे हें म्हणणें एका अर्थी खरें आहे; व या सर्व राष्ट्रांची एकी होणें जरी इष्ट आहे व त्या-करितां आपले प्रयत्नहि जरी चालू आहेत तरी त्यासाठीं प्रांतिक उत्सवास फांटा दिला पाहिजे हें म्हणणें अगदीं अविचाराचें आहे. —के० ले० २-२३२

२१४२

जगांत कोणत्याहि देशांत गेलां व कांहींहि उद्योग करीत असलां तरी **हिंदुस्थान**चे प्रतिनिधि म्हणून नित्य वागत व राहात जा. जग तुमच्या-वरूनच तुमच्या देशाची किंमत ठरवील. —आ० आ० २-४६२

२१४३

**हिंदुस्थान** ही आमची मातृभूमी आणि देवता, हिंदुस्थानवासी हेंच आम्हां सर्वांचें बंधुत्वाचें नातें, आणि वस्तुस्थिति लक्षांत आणून आमची राजकीय व सामाजिक स्थिति सुधारण्याचा एकनिष्ठपणानें व स्वार्थाकडे

२१४८

सांप्रत युरोपियन राष्ट्रें आमच्यावर राज्य करोत, पण सर्वांना श्रेष्ठ प्रकारचे धर्मविचार व तत्त्वज्ञान शिकविण्याचा आशियाखंडाला व विशेषतः **हिंदुस्थानाला** उपजत अधिकार आहे ही गोष्ट कोणाला नाकबूल करतां यावयाची नाहीं. —के० १९०३-३७-२-४

२१४९

अद्भुत व भयानक स्वरूप धारण करून परमेश्वरानें धरणीकंप, ज्वालामुखी वगैरे रूपानें जें शासन गेल्या दोन हजार वर्षांत केलें तें जर एका पारड्यांत घातलें व दारिद्र्य, प्लेग, दुष्काळ व इतर सर्व प्रकारची अवनती यांमुळें **हिंदुस्थानास** भोगाव्या लागणाऱ्या यातना हीं जर दुसऱ्या पारड्यांत घातलीं तर आमचेंच पारडें खालीं जाईल यांत शंका नाहीं. —के० १९०२-२०-५-१

२१५०

**हुषारी** हाच कांहीं माणसाचे अंगचा मुख्य गुण नव्हे; तसें असतें तर इसापनीतींतील बेडकांनीं लांकडाच्या ओंडक्यापेक्षां लांब चोंचीच्या बगळ्या राजासच अधिक पसंत केलें असतें. —के० १९०४-१७-५-१

२१५१

निर्हेतुक क्रिया कधींच पापमय होऊं शकत नाहीं; पापाला **हेतु** Intention हा महत्त्वाचा भाग आहे. निर्हेतुक गुन्हाच घडूं शकत नाहीं. —के० १९०२-३-२-३

२१५२

मेलास तर स्वर्ग, जगलास तर स्वराज्य, असें जेव्हां सांगितलें तेव्हांच **क्षत्रिय** वर्ग निर्माण झाला. —स्व० मो० ६१

२१५३

**क्षमा**, शांति, दया, विवेक हे गुण आहेत; परंतु त्यांचा योग्य स्थळीं उपयोग करावा लागतो. —के० १८९२-३-३-२

२१५४

सत्याप्रमाणेंच **क्षमा** हा धर्महि अखेर म्हणजे समाजाच्या पूर्णावस्थेंत अपवादरहित व नित्यरूपानें शिल्लक राहील यांत संशय नाहीं. —गी० ३८९

२१५५

सृष्टींत अनेक प्रकारचे जे अनेक विनाशी पदार्थ आहेत त्या सर्वांत एकच अविनाशी परमेश्वर भरून राहिला आहे हें समजणें याचें नांव 'ज्ञान'; आणि एकाच नित्य परमेश्वरापासून विविध नाशवंत पदार्थ कसे होतात हें समजणें याचें नांव 'विज्ञान' होय व यासच **क्षराक्षरविचार** असें म्हणतात.

—गी० ७१३

२१५६

सर्वांनीं हिंसा सोडून दिल्यावर मग क्षात्रधर्म तरी कसा राहणार? आणि **क्षात्रधर्म** गेला म्हणजे प्रजेस त्राता नाहींसा होऊन, वाटेल त्यानें वाटेल त्यास खाऊन टाकावें असा प्रसंग येणार. —गी० ३२

२१५७

मानसिक आणि शारीरिक सर्व द्रव्यें व गुण यांचा प्राणरूपी विशिष्ट चेतनायुक्त जो समुदाय त्याचें नांव **क्षेत्र**. —गी० १४२

२१५८

**ज्ञातिभेद** व अंतस्थ कलह नाहींसे करण्याला साधारण संकट व तन्निवारणार्थ संहत प्रयत्न करण्याची आवश्यकता हाच खरा उपाय आहे. प्रीतिभोजनें, मिश्रविवाह किंवा सामाजिक परिषदें असल्या शुष्क उपायांनीं हे समाजरोग बरे होत नाहींत. —के० ले० २·४३४

२१५९

कोणत्याहि **ज्ञातीची सुधारणा** करणें झाल्यास त्या ज्ञातीखेरीज बाहेरच्या लोकांनीं त्यांत पडून फारसा उपयोग होत नाहीं.

—के० १८९०-४६ २-३

२१६०

हिंदु लोकांची ज्ञातिधर्मावरील आसक्ति इतकी दृढ आहे कीं, हिंदूंचे ख्रिस्ती झाले तरी त्यांच्या मनावर परंपरागत आलेले **ज्ञातीभेदाचे** संस्कार जळलेल्या दोरींत तिचा पीळ जसा कायम राहतो तद्वत कायम राहतात.

—के० १९०१-४३-२-३

### २१६१

कोणाची बुद्धि कशी आहे हें समजण्यास त्याच्या आचरणाखेरीज दुसरें बाह्य साधन नसल्यामुळें, **'ज्ञान'** किंवा 'समबुद्धि' या शब्दांतच शुद्ध (व्यवसायात्मक) बुद्धि, शुद्ध वासना (किंवा वासनात्मक बुद्धि) आणि शुद्ध आचरण या तिन्ही शुद्ध गोष्टींचा समावेश केला जातो. हें विशेषतः हल्लींच्या पुस्तकी ज्ञानप्रसाराच्या काळांत नीट लक्षांत ठेविलें पाहिजे. ब्रह्माबद्दल कोरडें वाक्पांडित्य करणारे आणि तें ऐकून 'वा: ! वा:' म्हणत माना डोलविणारे किंवा नाटकी सभासदाप्रमाणें 'पुनश्च तेंच सांगा' म्हणणारे पुष्कळ असतात. —गी० २४६

### २१६२

आपल्यां बायकामुलें हाच कायतो सर्व संसार हें ज्ञान तामस होय.

२१६५

आम्ही शत्रु नव्हे, तर आमच्यामधील **ज्ञान** हें सरकारचें शत्रु आहे.
—व्या १-३

२१६६

सरकारचा खरा शत्रु **ज्ञान** होय. —के० १९०७-२६-४-३

२१६७

**ज्ञान** केव्हांहि गरीब नसतें. —व्या० १-५

२१६८

नुसतें पाटीवर लिहितां येणें याला ज्ञान म्हणत नाहींत. जे लोक लाखों रुपयांचा व्यवहार चालवितात त्यांना पाटीवर लिहितां येत नसलें म्हणून काय मूर्ख म्हणणार? हल्लींच्या काळीं यंत्रें सुद्धां बोलूं लागलीं आहेत म्हणून त्यांना विद्वान् म्हणणार कां? छापखान्यांत ग्रंथ निर्माण होतात म्हणून छापखाना ज्ञानी झाला? देशाची स्थिति इतकी वाईट कां झाली, याचीं कारणें शोधून काढून तिचा प्रतिकार करण्याचें व ती सुधारण्याचें जें ज्ञान त्याला **ज्ञान** असें म्हणतात. एखादा माणूस जरी फटाफट वेद म्हणत असला तरी त्याला कोणीहि ज्ञानी म्हणत नाहीं. देशाबद्दल ज्याला सारखी तळमळ लागून राहिली असेल तोच खरा ज्ञानी होय. गीतेमध्यें सुद्धां सर्व भूतांना आत्मवत् मानील तोच खरा ज्ञानी असें म्हटलें आहे. —स्व० मो० (४) १०२

२१६९

**ज्ञान-दानासारखें** महापुण्यकारक दान नाहीं, व दैवानें आपणास प्राप्त झालेल्या ज्ञानभांडारास कृपण-वित्तासारखें केवळ जपून न ठेवतां त्याचें सदावर्त घालून सर्व अतीत अभ्यागतांस तृप्त करणें हें आपलें कर्तव्य आहे.
—के० १८९२-१५-२-४

२१७०

ज्या लोकांना सदाचरणाची संवय नसून ज्यांची बुद्धिहि पूर्ण शुद्ध झालेली नसते त्यांना नुसतें कोरडें ब्रह्मज्ञान सांगितलें तर 'तुझें तें माझें व माझें तें माझेंच' अशा रीतीनें त्याच **ज्ञानाचा** ते दुरुपयोग करितात.
—गी० ३२८

२१७१

विभक्तांत अविभक्त किंवा नानात्वांत एकत्व ओळखणें हें **ज्ञानाचें** खरें लक्षण होय. —गी० ८३६

२१७२

केवळ **ज्ञानाच्या** जोरावरच शौर्य, निश्चय, निस्पृहता, सदभिमान, कंटकपणा, सत्यप्रीति आणि स्वार्थत्याग वगैरे जे जे गुण हरएक कामांत यश येण्यास आवश्यक आहेत ते प्राप्त होत नाहींत.

—के० १८९१-४८-२-५

२१७३

प्रकृतीच्या म्हणजे सृष्टीच्या अखंड खटाटोपांत आपल्याला नकोत अशा गोष्टीहि कित्येकदां आपणांस करणें भाग पडतें, नाहीं म्हणून चालत नाहीं. अशा वेळीं **ज्ञानी** पुरुष हीं कर्में निरिच्छ बुद्धीनें केवळ कर्तव्य म्हणून करून त्याच्या पापपुण्यापासून अलिप्त रहातो, आणि अडाणी त्यांतच आसक्ति ठेवून दुःख पावतो; हा दोहोंमधला भासकवीनें वर्णिल्याप्रमाणें बुद्धिदृष्ट्या मोठा भेद आहे. —गी० ६६०

२१७४

जगांतील व्यवहार **नीरस** किंवा गोड वाटणें हें कांहीं अंशीं प्रारब्ध कर्मानुसार प्राप्त झालेल्या उपजत स्वभावावर अवलंबून आहे; या प्रारब्धकर्मानुसार प्राप्त झालेल्या उपजत स्वभावामुळें एखाद्या **ज्ञानी** पुरुषास संसाराचा मनापासून कंटाळा येऊन तो संन्यस्त झाल्यास त्यास नांवें ठेवण्यांत हांशील नाहीं. —गी० ४६५

२१७५

**ज्ञानी** पुरुषाचें वर्तन म्हणजे लोकांस त्यानें घालून दिलेला कित्ताच असल्यामुळें हा कित्ता तो कसा घालितो हें पाहिलें म्हणजे धर्माधर्म, कार्याकार्य अगर कर्तव्याकर्तव्य यांचा निर्णय करण्यास साधन अगर युक्ति आपोआपच आपणांस प्राप्त होते. संन्यासमार्गापेक्षां कर्मयोगमार्गांत जो काय विशेष आहे तो हाच होय. —गी० ३६५

२१७६

ब्रह्मात्मैक्यज्ञानानें आपली बुद्धि निर्विषय, शान्त, सर्वभूतीं निर्वैर व सम ठेवणें, आणि आपणांस ही स्थिति प्राप्त झाली म्हणून सामान्य अज्ञानी लोकांस न कंटाळतां किंवा आपण स्वतः सर्व सांसारिक कर्मांचा त्याग करून म्हणजे कर्मसंन्यासाश्रम स्वीकारून या लोकांची बुद्धि न बिघडवितां देशकालपरिस्थितीप्रमाणें ज्यांना जें योग्य असेल त्याचाच त्यांस उपदेश करून व स्वतःच्या निष्काम कर्तव्याचरणानें सद्वर्तनाचा यथाधिकार प्रत्यक्ष धडा घालून देऊन, सर्वांस हळुहळू यथासंभव शांतपणें पण उत्साहानें उन्नतीच्या मार्गास लावणें हाच **ज्ञानी** पुरुषाचा खरा धर्म आहे.

—गी० ४००

२१७७

आपपरभावाचा पूर्ण लोप होऊन 'वसुधैव कुटुंबकम्' अशी ज्याची स्थिति झाली आहे तोच खरा **ज्ञानी** म्हणावयाचा. —के० १८९३-१७-३-१

२१७८

**ज्ञानी** पुरुषाचें वर्तन इतर सर्व लोक प्रमाण मानीत असल्यामुळें, आणि अखेरचें जें साध्य असेल त्याप्रमाणें मनुष्य आपल्या वर्तनाचें पहिल्यापासून धोरण ठेवित असल्यामुळें, 'ज्ञानी पुरुषानें काय केलें पाहिजे' हा प्रश्न लौकिकदृष्ट्याहि महत्त्वाचा होत असतो. —गी० ३४४

२१७९

**ज्ञानी** पुरुष कदाचित् कोणतेंहि व्यावहारिक कर्म न करितां संन्यास घेऊन वनांत जाऊन बसेल. परंतु अशा रीतीनें व्यावहारिक कर्मे सोडिल्यामुळें त्याच्या कर्मांचा क्षय झाला असें समजणें चुकीचें आहे. तो कर्म करो वा न करो, त्याच्या कर्मांचा जो क्षय होतो तो त्याची बुद्धि साम्यावस्थेस पोंचल्यामुळें होत असतो, कर्म सोडल्यामुळें किंवा न केल्यामुळें नव्हे, हें तत्त्व नेहमीं लक्षांत ठेविलें पाहिजे. —गी० २८४

२१८०

**ज्ञानी** पुरुष हे लोकांचे डोळे होत, आणि ते जर आपलें काम सोडतील तर जग आंधळें होऊन लोकांचा सर्वतोपरी नाश झाल्याखेरीज राहणार नाहीं.

—गी० ३२८

## २१८१

मी नाहीं तर दुसरा कोणी तरी तें काम करील असें म्हणणें योग्य नाहीं. कारण, तसें झाल्यानें एकंदर कामास एक इसम कमी पडून त्यांतील संघशक्ति कमी होत्ये; इतकेंच नव्हे, तर **ज्ञानी** पुरुष तें काम जितकें चोख रीतीनें करील तशा रीतीनें इतरांस तें साधणेंहि शक्य नसल्यामुळें, त्या मानानें लोकसंग्रहहि लंगडाच पडतो. शिवाय ज्ञानी पुरुषाच्या कर्मत्यागरूपी उदाहरणानें लोकांची बुद्धिहि बिघडते.

—गी० ३३३

## २१८२

**ज्ञानी** पुरुष हे समाजाचे डोळेच नव्हेत, तर गुरुहि आहेत. म्हणून 'लोकसंग्रह' करण्यास त्यांनीं आपल्या काळीं ज्या समाजव्यवस्था असतील त्यांत कांहीं न्यून असल्यास श्वेतकेतूप्रमाणें देशकालानुरूप तें काढून टाकून समाजाची धारणपोषणाची शक्ति फुटू न देतां तीच वाढत्या पंथास लागेल असे उद्योग करणें मग अर्थतःच प्राप्त होतें. —गी० ३३१

## २१८३

एखाद्याच्या उपदेशाच्या खरेपणाची परीक्षा लोक त्याच्या आचरणावरूनच करीत असतात. म्हणून **ज्ञानी** मनुष्य स्वतः कर्म न करील तर सामान्य लोकांस आळशी बनण्यास ती एक सबब होत्ये, यासच 'बुद्धिभेद' असें म्हणतात. —गी० ३२८

२१८६

जगांतील प्रत्येक सामान्य मनुष्य आपले सर्व व्यवहार माझे किंवा माझ्यासाठीं म्हणून करीत असतो. पण जो ज्ञानी झाला त्याची माझेपणाची बुद्धि सुटली असल्यामुळें ईश्वरनिर्मित जगांतील सर्व व्यवहार परमेश्वराचे आहेत, आणि ते करण्यासाठीं परमेश्वरानें आपणांस उत्पन्न केले आहे अशा बुद्धीनें ( म्हणजे निर्मळबुद्धीनें ) आतां ज्ञानी पुरुष ते व्यवहार करूं लागतो; हा **ज्ञानी** व अज्ञानी यांच्यामध्यें भेद आहे. —गी० ३२२

२१८७

**ज्ञानानें** अंगचें सामर्थ्य ज्या वेळेस पूर्णावस्थेस पोहोंचतें त्याच वेळीं ज्ञानी पुरुषास समाज सोडून जाण्याची मोकळीक ठेवल्यानें, चातुर्वर्ण्य-व्यवस्था ज्यांच्या हितासाठीं निर्माण झालेली आहे त्या समाजाचेंच त्यांत अत्यंत नुकसान होत असतें. —घा० १९२

२१८८

**ज्ञान्यानें** आपली कसोटी व्यवहार करून लावली पाहिजे. —च० सु० ९१

२१८९

मी, जग व परमेश्वर या तीन गोष्टींचा विचार **ज्ञान्याला** कर्तव्य आहे. व्यवहार सोडणें म्हणजे मी व परमेश्वर यांचाच फक्त मेळ घालणें होय. ज्ञान्यानें कर्में सोडल्यानें जगाची परमेश्वरी कार्याची हानि होते. या हानीच्या मानानें स्वतःचा मोक्षरूपी फायदा क्षुल्लक आहे. मला जगाच्या व्यवहाराशीं काय करावयाचें आहे, असें जो म्हणतो तो एक प्रकारें मला पूर्ण ज्ञान झालें नाहीं असेंच कबूल करतो असें म्हटलें पाहिजे.—स्व० मो० ६६

२१९०

सृष्टीमध्यें ज्या कांहीं गोष्टी आपण पाहतों, ऐकतों व अनुभवितों त्या सर्वांचें वस्तुस्वरूप, गुणधर्म, क्रिया वगैरे संबंधानें पुरा विचार करून व निरनिराळ्या वस्तूंबद्दल किंवा गोष्टीबद्दल निरनिराळ्या शास्त्रांतून जे सिद्धान्त ठरविलेले आहेत त्या सर्वांचें एकीकरण करून त्यापासून सर्वांस लागणारे दहापांच सिद्धान्त काढणें व ते सर्व कसे कसे लागतात याचें विवरण करणें हें **ज्ञेयमीमांसेचें** काम होय. —के० १९०१-१९-२-५



# WORDS OF WISDOM

FROM

LOK. B. G. TILAK

# WORDS OF WISDOM

FROM

## LOK. B. G. TILAK

We say that the *Administration* should not be in the hands of a visible entity by whose hands this invisible Government is getting work done, but should pass into some other hands. —W. S. 104

2

Mere *Advisory Councils* will not satisfy the aspirations of the people, nor will they remove the real cause of estrangement between the officials and the people. —S. S. 8

3

Circumstances are changed—nay, they are favourable The voice has gone forth 'Now or never.' Rectitude and constitutional agitation is alone what is expected of you. Turn not back, and confidently leave the ultimate issue to the benevolence of the *Almighty*. —Q. J. July 1917

4

The *Almighty* helps you in His inscrutable Divine ways by offering a unique opportunity. Now it is for you to say whether you will answer by vigorous efforts or sit silent and let the opportunity slip through your fingers.—S.B. 238

5

Modern Science is gradually justifying and vindicating our *Ancient Wisdom*. —W. S. 18

**6**

An *attempt* is an intentional premeditated action which, if it fails in its objects, fails through circumstances indepedent of the person who seeks its accomplishment. —L. 200

**7**

*Attempt* is actually an offence minus the final act of crime. The mere fact that a certain article is published will not make it an attempt. There must be a criminal mind, a culpable indifference to consequences —L. 200

**8**

In these days of writing and printing, we have no need to depend upon memory, and consequently we fail to realise what memory, kept under the strictest discipline, is capable of achieving. The whole of the Rig-Veda, nay, the Veda and its nine supplementary books, have been preserved by the *Brahmins* of India, letter for letter and accent for accent, for the last 3,000 or 4,000 years at least. —A. 428

**9**

It should be the aim of the *British Administration* to educate the people in the management of their own affairs, even at the cost of some efficiency and without entertaining any misgivings regarding the ultimate growth and result of such policy. —S. S. 9

**10**

Appeals to the *bureaucracy* are hopeless. —W. S. 45

**11**

The *bureaucratic government* will never create grievances in all the provinces at the same time. —S. B. 18

**12**

The development of *character* consists in conquering difficulties. —S. I. 9

**13**

If you want to draw a nation together there is no force more powerful than to have a *common language* for all.
—S. B. 8

**14**

Every congressman must have the constitutional liberty to refer in the last resort any matter to the *Congress* and take its decision by majority, where his view may differ from those of others. Congress rules are intended to regulate discussion and not to stifle it.–( From an interview between Lok. Tilak and M. Gandhi in July 1915.)

**15**

For successful work *concentration of energies* is necessary and paying attention to several movements means dissipation of effort. – Rep. 1916-17 P. 27

**16**

Our agitation could not be '*constitutional,*' because we have had no constitution worth the name. It could not be exactly 'legal' as the power of making laws rested with those whose interests clashed with ours. Therefore, justice, morality and history must be our only guides. —L. 147

**17**

If Congressmen abstained, moderates would succeed in capturing the *Councils* and posing themselves as the elected representatives of the people of India. We must preclude this. It is all a question of practical politics.–(From Mr. Tilak's interview by a representative of the 'Bombay Chronicle,' published posthumously.)

18

*Criminal intention* cannot be presumed but must be positively proved by the evidence of surrounding circumstances.
—L. 201

19

He ( *Dadabhai Nawroji* ) is an old man, but his heart is young.
—S. B. 17

20

We say, prepare your forces, organize your power, and then go to work so that they can not refuse you what you *demand.*
—W. S. 48

21

Money payments and your *demands* must go hand in hand.
—W. S. 268

22

I will say it before God Himself, for what I say I have honestly at heart, I will proclaim it from the house-tops if required, I will avow it if a *detective* comes to me and asks for my views.
—W. S. 54

23

Whatever the *differences* in religion, whatever the differences in social customs may be, they are not the essentials. They are something like the dress in youth. Your turban or dhoti may be different from mine and we may put them on in different ways, it matters not in which way we use them. The inner man is the same. He is actuated more or less by the same feelings.
—S. I. 9-10

**24**

A patriot is not to be daunted by the *difficulties* he has to face. If the task is more difficult the better it is for him, for the development of character consists in conquering difficulties. A nation that has no difficulties to encounter would be a nation containing a useless set of men. It is difficulties that test a man and educate a man. —S. I. 8–9

**25**

If you go to one of scenes described in the Mahabharata, Yudhishthira is represented there as saying. "Let me have *difficulties* always." Difficulties give you a training which you can not expect in the circumstances of an easy situation. —S. I. 8-9

**26**

The existence of difficulties in the performance of a task for the good of the country is no argument why there should be any hesitation or halt in the performance of that duty. The *difficulties* must be overcome, they are of human creation and the creation of the antecedents of our karma.

**30**

A nation can not progress if it meets no *difficulties* in the way. —W. S. 79

**31**

*Diplomacy* must be met with diplomacy. —L. 294

**32**

History abounds in cases of kingdoms undone by the *discontent* of penniless beggars. —S. B. 43

**33**

But the ultimate *discovery of truth* is hardly, if ever, prevented by such mishaps. On the contrary, we might even say that the path to such discovery often lies through such errors and the progressive elimination thereof.

—V. C. 10

**34**

The work of *despotism* is always to lull people into silence ; it is an old 'ruse.' —Rep. 1917-18 P. 21

**35**

The *dualism* in the Reforms Bill introduces unnecessary complications and defeats just expectations of the public ; and therefore will fail to evoke the required co-operation of the people and will delay the final devolution of full responsible government for so long a period as would make the Parliamentary announcement of August 20th 1917, practically nugatory and disappointing. —D. 58

**36**

Let us do our *duty* whatever the people may say, let us be honest to ourselves and faithful to our country, and devoted to the high principles of our creed. –Rep. 17-18 P. 19

**37**

The path of *duty* is never sprinkled with rose-water nor do roses grow in it. —W. S. 64

**38**

To be able to read and write alone is no *education.*

—W. S. 69

**39**

That which gives us a knowledge of the experiences of our ancestors is called *Education* —W. S. 69

**40**

If a severe enforcement of false discipline be the price of our acceptance of Government grant or of the affiliation with the University, why, in the name of patriotism and self-sacrifice should we not break off these chains and declare our *educational independence* ? —L. 151

**41**

A hundred years of education has not produced a Hindu Missionary. How many Vivekanandas have you got and how many Dayanandas have you ? An educated man talks glibly of the *education of the masses* but he would not move an inch, he would not give up his home and wander about the country as an ascetic and he would not come in contact with the lower classes and try to reform them by his conduct, instruction and personal example. How many of you will do that ? The whole work in this direction is lying before you unlooked for. A part of that work is being done by Missionaries to whom I give credit though I do not approve of their intention. —S. I. 37-38

**42**

In order that there should be a growing organization and a public opinion growing in power, it is necessary that the *educated Classes* should work among the masses. —S.B.97

**43**

The responsibility of reforming the religion of the masses and their social customs rests entirely on the *educated classes* and if you do not fulfil that responsibility you do not deserve to be the leaders of the masses, and you have no claim to any leadership. —S.I. 37

**44**

The *educated Indian* may aspire to rise to high office, but that is no more culpable in him than for this English Pandit to aspire for a State-Secretaryship. —S. B. 41

**45**

The *educated classes* alone have the knowledge and the courage for the agitation and naturally the State Secretary treats them as enemies. —S. B. 43

**46**

An *empire* now means one rule from the Himalayas to Cape Camorin, and the subject races are governed by the same rules, the same regulations and the the same laws, be they of whatever kind. An empire of that kind never existed before. The older idea of an empire, which was also the Chaldean idea, was that out of the several kingdoms which made up India, the ruler of one province, by his policy and sagacity, distinguished himself and made the rulers of other provinces his subordinates, In that way, they paid tribute to that ruler. But besides this tribute, there was no other mark of subjection. There was complete autonomy in each of these provinces, but only as a mark of subordination, a tribute was levied from the other minor provinces. An empire then did not mean an assumption of the internal administration of a province by the sovereign power. —S. I 3

**47**

There is no *Empire* lost by a free grant of concessions by the rulers to the ruled. --W.S. 45

**48**

*Empires* are lost by luxury, by being too much bureaucratic or over-confident or from other reasons. But an empire has never come to an end by the rulers conceding

**54**

It is to give a corporal shape to our political ideas that we Hindus should have *festivals* like these. —S. B. 13

**55**

They (*festivals* like the Shivaji Festival ) serve like manure to the seeds of enthusiasm and the spirit of nationality. —W. S. 56

**56**

They ( *festivals* like the Shivaji festival ) are an antidote to vague despair. —W. S. 56

**57**

*Festivals* like these prove an incentive to the legitimate ambitions of a people with a great historic past. —W.S.56

**58**

They ( *festivals* like the Shivaji festival ) serve to impart courage, such courage as an appreciation of heroes securing their salvation against odds, can give. —W.S.56

**59**

Human nature is so constituted that we cannot do without *festivals*. It is the nature of man to love festivals. —S. B. 11

**60**

A request without a *force* at its back is of no use. —S. B. 20

**61**

However noble and sympathetic your foreign professors may be, they are not the proper persons to be your teachers for the simple fact that they are *foreigners* in this land. —S.I. 25

**62**

There is no instance in history where a *foreign nation* has ruled another without any expectations of profit.

—L. 146

**63**

Women furnishing the necessary qualifications should not be excluded from the *franchise*, and property qualification should be so low as to include the working classes in the electorate. —D. Para 65

**64**

So long as it ( the philosophy that *freedom* is 'my birth-right ) is awake within me, I am not old. —W.S. 712

**65**

*Gita* is a work on Ethics-not utilitarian, nor intuitional but transcendental,--somewhat on the lines followed in the Green's 'Prolegomena to Ethics.' —L. 345

**66**

Wisdom, as is concentrated in *Gita* in about 700 verses, I am confident, cannot be defeated or overcome by any philosophy, be it be Western or any other. --W. S. 18

**67**

*God* does not help the indolent. You must be doing all that you can to lift yourself up, and then only you may rely on the Almighty to help you. —J. July 1917

**68**

Those who are thus shadowed may however console themselves with the idea that the great *God* who sees everything is the peoples' detective upon kings and governments, and that this Divine Detective must sooner or later bring the British Government to justice. --S. B. 39

**69**

*Good* must lead to good as evil must lead to evil.
—S.I. 12

**70**

The *Governor* should have power to dissolve the Legislative Council, with a proviso, however, that the elections for the new Council must take place within three months from the date of dissolution. —D. 59

**71**

The *Governor*, as representing the Crown, should have the constitutional right of removing the minister or ministers, though the latter will also be responsible to the Legislative Council. —D. 59

**72**

Sir Edward Carson asked whether it was true that resistence to Government was advocated.

Tilak:—No; it was resistence to the Government officers. I draw a distinction between them.

Sir Edward Carson :—*Government* consists of officials. Does it not ?

Tilak :—A house consists of rooms but a room does not mean a house. —L. 280

**73**

You may be serving the government of the country but the interests of the country are above those of Government. You are asked to renounce your nationality simply because you have joined *Government service.* You have not sold yourself and your principles to Government for the salaries you get, you have been given some independence and you should not compromise that independence. —S. I. 31

**74**

It must be acknowledged in the first place that *Government* wants very smart hands for *service* but not self-assertive subordinates. So, at present, the profession that is open to you is a profession where self-assertiveness is at a discount. Smartness is no doubt appreciated but it is that kind of smartness which is not coupled with an individuality of character. —S. I. 29-30

**75**

We believed in the benevolent intentions of the *Government*. But in politics there is no benevolence. Benevolence is used to sugar-coat the declarations of self-interest, and we were in those days deceived by the apparent benevolent intentions under which rampant self-interest was concealed. —W.S. 39

**76**

The *Government* must be taught that money is obtained when hearts are won over. —W. S. 267

**77**

If the *Government* will not listen, he ( the poor raiyat ) must compel their attention —W. S. 265

**78**

Every man must exercise his rights over the *Government*, place his grievances before them and see that they are redressed. —W. S. 265

**79**

The *Government* is not for the rich ; it is for the poor. —W. S. 265

**80**

I strongly condemn the mean attempt to lay the nets for a stray unguarded word to penalize and victimize the speaker. If *Government* wants to know the truth let it be prepared to hear the whole truth. —S. B. 38

**81**

As men do not give up building houses for fear that rats would dig holes, so we should not give up our work for fear of *government displeasure.* —W. S. 78

**82**

The laws which bind society are for common men like ourselves. *Great men* are above the common principles of morality. You have to judge their acts, not from the stand point of the Penal Code, but by a higher standard—a superhuman standard.–(From Mr. Tilak's Speech at the Shri Shivaji Festival of 1897.)

**83**

In no other country could be tolerated the statement that money should be given first and the *grievances* might be heard sometime later on. —W. S. 266

**84**

The rites and the acts prescribed in this behalf have thus a clear socio-religious purpose in view. To belong to a particular religion a man must live in a particular way, marry in a particular way, pray in a particular way and be initiated into that community in a specific manner; and that there must also be a definite set of rules about these rites so as to secure uniformity of practice in that community or sect. According to the terminology of the Vedic writers these constitute our *Girhya Samskaras* or what is loosely expressed by translating that phrase into "domestic rites." —Introd. P. ೨

**85**

Every *hero*, be he Indian or European, acts according to the spirit of his times, and we must therefore judge of his individual acts by the standard prevalent in his time.

—W. S. 31

**86**

*Hero-worship* is a feeling deeply implanted in the human nature, and our political aspirations need all the strength which the worship of a Swadeshi hero is likely to inspire into our minds. —W. S. 28

**87**

In spite of the verdict of the jury, I maintain that I am innocent. There are *higher Powers* that rule the destiny of things; and it may be the will of Providence that the cause I represent will prosper more by my suffering than by my remaining free. — (Lok. Tilak's trial–22nd July 1908.)

**88**

So long as you are divided amongst yourselves, so long as one section does not recognise its affinity with another, you can not hope to rise as *Hindus*. —S B. 72

**89**

*Hindu religion* as such provides for a moral as well as a social tie. —W. S. 13

**90**

No religion holds such promise full of hope as the *Hindu religion*. —W.S. 16

**91**

Our *Hindu religion* is based on the whole, on the Sanatan truth, and therefore it is bound to triumph in the end.

—W. S. 17

**92**

*Hindu religion* as a whole is made up of different parts co-related to each other as so many sons and daughters of one great religion. —W. S. 13

**93**

The idea of a *Hindu University* where our old religion will be taught along with modern science is a very good one and should have the support of all. —W. S. 20

**94**

*History and reason* are against the difficulties created by the bureaucracy and we must triumph in the end.
—W. S. 230

**95**

*Home Rule* is nothing else, but to be masters of your house. —W. S. 245

**96**

But here I must impress upon the attention of Government the popular view that *Home Rule* and home-defence must go together. Pressure, official or unofficial, and pecuniary inducement may perhaps secure for the occasion the Persian hordes who accompanied Xerses, the then Satrap of the East, to Greece. But the enthusiasm of the Greek Citizens who defeated these hordes cannot be purchased by money. For that purpose the hearts of the people must be touched; and these can only be touched by granting them Home Rule.—( Extract from Mr. Tilak's written speech which was ruled out of order by His Execellency at the Provincial War Conference held in Bombay on 10th June 1918.)

**97**

I like to work and never think of *honours*. —L. 33

**98**

I for one do not give up the *hope* of the country steadily making further progress in the realisation of its cherished goal. —L. 193

**99**

*Hope* is the very salt of patriotism. —S. I. 5

**100**

We have grown so stupid owing to our *idleness* that we are required to be told by foreigners that our treasures conceal gold and not iron. —W. S. 20

**101**

If *illiteracy* is not a disqualification in Civil Law, there is no reason why it should not be so in Nature's Law also. The illiterate are our brethren; they have the same rights and are actuated by the same aspirations. It is therefore our bounden duty to awaken the masses. —Q. J. July 1917

**102**

*India* is a land of ancient civilization and culture. The writings of Megasthanes, of Fa Hian and hosts of others bear authentic outside testimony to the fact that long before the Christain era down to modern times, India developed republics and empires, literature and philosophy, art and architecture, industry and commerce–in short, a multi-sided, indigenous culture of which any nation may justly be proud.
—Q. J. July 1919

**103**

From the point of view of the peace of Asia and of the world, it is absolutely necessary that *India* should be self-governed internally and be made the bulwark of liberty in the East. —L. P.

**104**

Surely, *Indian people* are not robbers in their own country. They can certainly proclaim their aspirations and they really ought to do. —S. B. 38

**105**

It is enough if we have full liberty to elevate ourselves in the best possible manner. This is called the immutable Dharma, and *Karma yoga* is nothing but the method which leads to the attainment of Dharma or material and spiritual glory. We demand Swaraj, as it is the foundation and not the height of our future prosperity. —Q. J. July 1917

**106**

It is neither creditable nor beneficial if other people have to do everything for us. God has declared His will. He has willed that self can be exalted only through its own efforts. Everything leis in your hands. *Karma-yoga* does not look upon this world as nothing; it requires only that your motives should be untainted by selfish interest and passion. This is the true view of practical Vendanta the key to which is apt to be lost in sophistry.—Q. J. July 1917

**107**

It must be remembered that Karma yoga has been our sacred hermitage from times immemorial when we Indians were seated on the high pedestal of wealth and lore. *Karmayoga* or to put it in another way, the law of *duty* is the combination of all that is best in spiritual science, in actual action and in an unselfish meditative life. Compliance with this universal Law leads to the realization of the most cherished ideals of Man. —Q. J. July 1971

**108**

The divine *king* as soon as he ceases to be just ceases also to be divine. —W. S. 63

**109**

The divine element in *kingship* even according to the oriental ideas is not free from its peculiar limitations, and I challenge anyone to point out any text which lays down that the yoke of the tyranny of a ruler, whoever he may be, should be quietly borne. —W. S. 63

**110**

They (the educated Indians) possess knowledge, and *knowledge* is not poor, in as much as it possesses unlimited potentiality for wealth of every sort. —S. B. 43

**111**

(British) *Labourers* have their own grievances, but they wont treat you any better. —S. S. 188

**112**

The *League of Nations*, may prove to be sham; but it has provided us a means to put forth our grievances before the forum of the world. —Rep. 1920 P. 11

**113**

The God's *Law of Karma* is rigid and therefore I say

**115**

Victory will always rest with those who can use guns of longer range than those of their enemies, backed up by solid support of an invulnerable ramport of sound *Logic.*

—T. P. 19

**116**

One may differ and differ from the view of the *majority* as much as he likes. But let him remember that it is a free fight and it is his own fault if he cannot win the fight.

—T. P. 20

**117**

If you do not move with the *masses* and sympathise with their grievances, if you do not collect funds for the relief of any evils or miseries to which they become subject, and if you do not take them into your confidence, then you do not deserve the education that you have received. —S. I. 37

**118**

*Moderates* had not then the courage to put forward the ideal of Self-Government before the people and to educate public opinion. —T. P. 13

**119**

The *Moderate school of thought,* mostly led by Government servants and pensioners in those days, never thought of going beyond a mild and diffused criticism of some detailed measures of official administration with a view to get them redressed. —T. P. 13

**120**

He ( *Mr. Morley* ) has disillusioned the over-eredulous and optimistic souls among us, and literally proved that the greatest Radical after all is no better than the worst Conservative so far as India is concerned. —W.S. 60

**121**

The *motive* of an act must not be confounded with the intention; but is always one of the surest indications in an inquiry as to intention. Intention may be inferred from the legal fiction that a man intends the natural consequences of his acts. —L. 201

**122**

The news about my being dejected by the unexpected result of the case ( Chirol case ) is entirely groundless. I am now too old a hand to be upset even if the heavens were to fall down. I would rather utilize the fall of heavens for my purpose than be dismayed thereby. One must face the facts as they are, or turn out to be, and not allow them to rule over you. That has been my *motto* of work hitherto and is so still. —P. L. 81

**123**

A *nation* must either progress or it must fall back. It cannot stand still. —S. B. 95

**124**

The authorities will, more or less, come in the way of *national education*. But these difficulties must be overcome until national education becomes the ideal of the governing class, which can be the case only when the Government is popularised. :—Q. J. April 1918

**125**

Where the people and the Government are one, and are actuated by the same ideals of citizenship, there can arise no conflict or differences of opinion in the matter of *national education*. But where the people and the Government have different ideals of citizenship before them, where the governing class wants to keep the people down in spite of their desire to rise to the status of full citizenship in the Empire, there arises the necessity of national as distinguished from government education. —Q. J April 1918

**126**

Without the power to shape our own destiny our *national regeneration*, in a large sense, cannot, in my opinion be effected and I have throughout my career tried to preach and emphasise this view. —T. P. 12

**127**

A true *Nationalist* desires to build on old foundations. —T. P. 10

**128**

We the *Nationalists* desire to emphasise and preserve the national sentiment by giving due credit to all that is good in the old system but without detriment to progress and reform needed for our national uplift. —T.P.16

**129**

The *National work* which faces us to-day is so great, extensive and urgent that you all must work together with zeal and courage greater than I may have been able to show. It is a task which is not one that can be put off. Our motherland calls every one of us to be up and doing. And I do not think that Her sons will disregard this call. However, I feel it my duty to beg of you to respond to this call of our motherland and banishing all differences from your minds strive to become the embodiments of national ideals. Here there is no room for rivalry, jealousy or fear. God will help us in the fruition of our efforts; and if not by us it is certain that the fruits will be gathered by the next generation.—( From Mr. Tilak's reply to the public Address presented to him on the 23rd of July 1916.)

**130**

**131**

Every *new party* begins as Extremists and ends as Moderates —S. S. 183

**132**

By temperament, by history and by tradition we are a nation who are not strangers to *non-egoistic ideals.*--S. I. 15

**133**

The only way to restore good relations between the *officers and the people* at present is, therefore, to create by law the necessity of consulting the people or their leaders, whom the old officials consulted, or whose advice they practically followed, as a matter of policy in earlier unsettled times. This means transfer of authority and power not between officials themselves, but from officials to the people, and that too in an ungrudging spirit. —S. S. 7

**134**

The *old Sadhus* like Tukaram moved among the masses. Is there a graduate in these days who has this ideal ?
—S. I. 30

**135**

There is not a doctrine in the world which has not its *opponent.* —S. I. 6-7

**136**

It is the unerring clock of the heavens that has helped us in determining it, the oldest period of Aryan civilization, and it is in my opinion, hardly probable to discover better means for the purposes. The bold and brilliant *Orion*, with his attendant Canis, preserves for us the memory of far more important and sacred times in the history of the Aryan race. —O. 220

**137**

India is to get rights from *Parliament* and therefore the British Democracy must be convinced of the necessity of giving India full self-Government. —Rep. 1920—11

**138**

*Patriotism* is non-egoistic virtue. It is altruistic in its operation. —S. I. 2

**139**

*Patriotism* includes love and work combined for the good of one's father-land or one's nation. Patriotism pre-supposes the idea of nationality. If there is no nation, there is no patriotism. If there is already a nation, then to work for the good of that nation is patriotism. I am speaking of Indian patriotism. It may happen that there is no nation and that you have to make one. That also is the duty of a patriot. He has to make a nation and see that it occupies an equal place and an equal rank with the other nations of the world. —S. I. 1

**140**

*Pax Britanica* has been established in this century in order that a foreign Government may exploit the country. —S. S. 184

**141**

We must clearly understand that it is not by waiting upon the pleasure of a bureaucratic Government or by reasoned *petitions* to Parliament that our salvation will be accomplished. —S. B. 97

**142**

It is not by *petitions* that our desires can be fulfilled. —S. B. 96

**143**

If one only attends to one's body as one does to one's mind from the age of 16 to that of 25, and if the *physical strength* thus stored up is not dissipated by gluttony or vice, one can stand any amount of hard intellectual work till oldage. —L. 9

**144**

Lahiri, you must be practical even in *politics.* Don't forget the realities of our position. Enthusiasm and emotion are good servants but bad masters. Try to stand erect and hold your head by all means but you must always have your feet in clay. —R. 2-625

**145**

Philanthrophy has no part in *politics.* —S. T. 106

**146**

Be earnest and show that your *political agitation* is not a joke and you are certain to have your own way. —S. B. 93

**147**

I don't hold that a social reconstruction must be under taken prior to *political emancipation.* I attach greater importance to the latter. —T. P. 12

**148**

*Polities* is a game of worldly people, and not of Sadhus. Instead of the maxim "अक्रोधेन जिने क्रोधं" as preached by Buddha, I prefer to rely on the maxim of Shri Krishna "ये यथा मां प्रपद्यन्ते तांस्तथैव भजाम्यहम्." That explains the whole difference and also the meaning of my phrase '*responsive co-operation.*'—( Extract from Mr. Tilak's letter to M. Gandhi, after the Amritsar Congress dated 18th January 1920, subsequently published in 'Young India.')

149

*Power* (is wanted) first; where there is power there is wisdom. Wisdom is not separate from power. —S. S. 127

150

If we had gone for our own selfish purposes to England we should perform *Prayaschitta*, but that since we had gone on country's behalf, we need not perform any Prayaschitta.
R. 1—221

151

Great is the value of a *precedent* in a question which is not purely astronomical but involves important religious issues. —V. C. 14

152

It has been a fashion to cry down the class of *priests* who make it their sole profession to cultivate their memory by keeping it under strict discipline and transmit by its means our sacred writings without the loss of a single accent from generation to generation. —A. 428

153

Pandits might analyse and explain the Vedic hymns more or less elaborately or correctly; but for that reason, we cannot forget that the very basis of their labours would have been lost long ago, had the institution of *priests*, who made disciplined memory their exclusive business in life, not been in existence. —A. 429

154

*Progress* means adopting yourselves to changed circumstances at each time. —S. I. 16

155

We mean to *progress* and wish our country to occupy a position of equality among the civilised nations of the world.
—T. P. 16

**156**

*Protests* are of no avail. Mere protests, not backed by self-reliance, will not help the people. —W. S. 24

**157**

Three P's *pray*, *please*, *protest* will not do unless backed by solid force. —W. S. 25

**158**

I advocate a re-arrangement of *Provinces* ...

**163**

*Reform* based on utter disrespect for the old does not appeal to him ( a nationalist ) as constructive work.

—T. P. 16

**164**

In reforming society, care ought to be taken to avoid the creation of any gulf between the people on one hand and the reformers on the other. We must always carry public opinion with us ; and this can be done, inter alia, by securing for our *reforms* the sanction of religion. —L. 53

**165**

We must proceed step by step along the lines of least resistance ; and above all the *reformers* must in no way hurt the general pride of the people in their social life and institutions. —L. 61

**166**

*Religion* is an element in nationality. —S. B. 72

**167**

If there be any religion in the world which advocates toleration of other religious beliefs and instructs one to stick to one's own religion, it is the *religion of the Hindus* alone.

—W. S. 74

**168**

We must remember that *religious institutions* are the hardest to die in any country in the world. —A. 429

**169**

The value of *representation* consists in the vote and not in the caste of representative selected. —T. P. 20

**170**

Rights can not be obtained by yearly *resolutions.* There are difficulties in the way of carrying out these resolutions, but these difficulties must strengthen us in our beliefs and in our actions. —W. S. 229

**171**

By *responsible government* we understand a government in which the Executive is under the control of a fully-elected legislature in all financial and administrative matters; and in consequence holding office only while it enjoys the confidence of the popular legislature. —D. 58

**172**

The *rulers* look to their own interest, not that of the ruled. —S. B. 95

**173**

The fluctuating wave of official decentralization may infuse more or less life in the individual members of the bureaucracy, but it cannot remove the growing estrangement between the *rulers and the ruled*, unless and until the people are allowed more and more effective voice in the management of their own affairs in an ever expansive spirit of wise liberalism and wide sympathy, aiming at raising India to the level of self-Govering countries. —L. 184

**174**

Each Community, whether religious or secular, must have some peculiar rites and ceremonies of its own in order to distinguish it from other sects, and that in the absence of such rules, there will result a general confusion. Augustus Comte, the greatest founder of the Positive religion, was no dogmatic beliver in what is generally understood to be the religious efficacy of sacraments and rites prescribed in the sacred books of the different religions. But, in the private worship which he prescribes for the followers of his Religion of Humanity, he has included nine different *Sacraments* to be performed in all the great epochs of private life from the cradle to the grave. —Introd. 2

**175**

Reform the religion of the masses and open *samajams* everywhere. The work that is carried on by Ayra samajams and Brahmo samajams is quite good. I may or may not like the principle of those samajams but the methods which they are following are certainly methods which deserve to be copied everywhere. —S. I. 37

**176**

I admit that even the guesses of a scholar like *Sayana* deserve consideration. But when on a closer examination we find that they are not supported by any old traditions and are besides objectionable on various other grounds, I think we are bound to reject them. —O. 70

**177**

It is now several centuries since the science of Vedic exegetics was founded by Indian Nairuktas;and it may seem surprising that traces of an Arctic home in the Vedas should remain undis-covered so long. But surprises like these are out of place in investigations of this kind, where one must be prepared to accept the results proved, in the lights of advancing knowledge, by the strictest rules of logic and *scientific research.* —A. 465

**178**

It is our clear duty, therefore, to follow truth and re-edit our *scriptures* and place them before the world in the light of modern science that they may be acceptable to all. —S. B. 79

**179**

If it be said that one Governor is not wanted, another should be appointed, would that constitute *sedition* ?

—W. S. 106

**180**

In the atmosphere of political serfdom, there are countless things that make us conscious of our weakness. What we want is *self-confidence*; and all reform that tends to make the nation more conscious of its short-comings than of its strength, is not only undesirable but is positively mischievous. —L. 61

**181**

I want to have the key of my house, and not merely one stranger turned out of it. *Self-Government* is our goal; we want a control over our administrative machinery. We don't want to become clerks. —W. S. 49

**182**

What makes *Shivaji* a national hero for the present is the spirit which actuated him throughout and not his deeds as such. —W. S. 31

**183**

*Shivaji* was essentially a man and that is the reason why we should celebrate his life. —S. S. 12

**184**

*Shivaji* did not fight against the Mohamadans but against the tyrannical power that existed at that time. —S. S. 12

**185**

The *Shivaji Festival* and the Ganpati Festival are in reality means to keep up and maintain a proper pride in the doings of our ancestors. —T. P. 16

**186**

I have always considered that *self-sacrifice* and self-negation are essential to the success of an institution like

**187**

Hero worship is a feeling deeply implanted in human nature, and our political aspirations need all the strength which the worship of a Swadeshi hero is likely to inspirs into our minds. For this purpose *Shivaji* is the only hero to be found in the Indian History. —M. 24-6-06

**188**

I did not think, nor do I think now, that a legislature which is not wholly responsible to the public is competent to deal with *social questions.* —T. P. 12

**189**

We don't want to anglicise our institutions to denationalise them in the name of *Social and Political reforms.*

—T. P. 16

**190**

The keynote of Indian life is purity more than freedom and that in all programmes of *social reform* we cannot lay too much stress on this cardinal principle. —L. 20

**191**

*Society* does not move by logic. —S. I. 24

**192**

Do not be afraid of *speaking* out things, which are plain in themselves. —W. S. 269

**193**

It is the *spirit of nationality* that makes the whole nation one. —S. B. 91

**194**

It is an irony of fate that the greater the scholarship, the less the *statesmanship.* —W. S. 57

**195**

We shall ***stick to our guns*** and if these prove to be of a longer range than those of our opponents, they must take the defeat in good sense. —T. P. 20

**196**

The political atmosphere is hot and when ideas of reconstruction, self-Government, self-determination are in the air, India must ***strike the iron when it is hot*** by agitation in England, America and elsewhere. —Rep. 1920 P. 11

**197**

An ineffectual *struggle* in the face of tremendous odds was itself no mean achievement. —L. 140

**198**

*Students* of to-day are the citizens of tomorrow and it is their duty not only to study public questions but to devote part of their leisure in such work as was allotted to them by the trusted leaders of the country. —L. 151

**199**

Imagine that you are speaking to a villager and not writing for University people. No Sanskrit words please. Avoid quoting statistics. Don't scare away the reader by quoting figures. Keep them to yourself. Let your *style* be simple and homely. It should be as clear as day-light. The meaning must never be obscure. —L. 328

**200**

You can win nothing unless you are prepared to *suffer*. —W. S- 14

**201**

Every day morality could not be applied to the *superman*
—L. 283

**202**

*Swadeshi* is the first step, boycott is the means and Swaraj is the end. —S. B. 17

**203**

Swadeshi, Boycott and National Education are the three most potent weapons (given into our hands by the National Congress,) and with these we must establish '*Swaraj.*' —L. 161

**204**

It is my conviction, it is my thesis, that *Swaraj* in the life to come cannot be the reward of a people who have not enjoyed it in this world. Such was the doctrine taught by our forefathers who never intended that the goal of life should be meditation alone. —Q. J. July 1917

**205**

*Swaraj* is the natural consequence of deligent performance of duty. The Karma Yogin strives for Swaraj, and the Dnyanin or spiritualist yearns for it, what is then this Swaraj ? It is a life centred in self and dependent upon self. There is Swaraj in this world as well as in the world hereafter. —Q. J. July 1917

**206**

The demand for *Swarajya* is such that it has nothing to do with sedition. It has nothing to say against the invisible Government. All domestic concerns should be managed by yourselves and by doing so what will happen is that in the first place your minds will remain in peace. Whatever you have to do you will do with the thought that you are doing it for your good. —W. S. 136

**207**

Do not rely much upon the *Sympathy of the rulers.*-W.S. 26

**208**

There should be a certain *timelimit* when the devolution should be completed. Without that time limit it is not possible to work out the scheme ( of self government ) satisfactorily. It would not create that confidence, it would not attract that kind of co-operation which is essential for the success of this scheme. —D. 63

**209**

The temperament of some *timid men* does not allow them to state boldly what they like, lest they may offend the authorities and even lose what the latter are willing to concede. Such minorities will always be found everywhere. Why, even the Germans found a Flamish minority ready to support their measures when they occupied Belgium.

—Q. J. July 1919

**210**

You would be wanting in duty to yourself and to your ancestors if you do not give up provincial prejudices and promote *unity* that underlies all sects. —S. B. 79

**211**

Parties should realise that only in *Unity* there is safety and that this unity they have to keep inspite of acute differences of opinion —L. 182

**212**

In the absence of *unity* India cannot claim its place among the nations of the world. —W. S. 15

**213**

If God were to toletrate *untouchability*, I would not recognize him as God at all. —R. 2-20

**214**

But if the *Vedas* are really the oldest records of our race who can deny that in the light of the advancing knowledge regarding primitive humanity, we may still discover in these ancient records, facts and statements which may have escaped the attention of older scholars owing to the imperfect nature, in their days, of those sciences which are calculated to throw further light on the habits and environments of the oldest ancestors of our race. —A. 416

**215**

In these days of progress, when the question of the primitive human culture and civilisation is approached and investigated from so many different sides, the science of *Vedic interpretation*, cannot stand isolated or depend exclusively on linguistic or grammatical analysis; and we have simply followed the spirit of the time in seeking to bring about the co-ordination of the latest scientific results with the traditions contained in the oldest books of the Aryan race,–books which have been deservedly held in the highest esteem and preserved by our ancestors, amidst insurmountable difficulties, with religious enthusiasm ever since the beginning of the present age. —A. 465

**216**

If the *Vedantic ideal* is higher it necessarily includes the national ideal which is lower. The two are not irreconcilable if you know how to reconcile them. The two are not opposed to each other. One includes the other much in the same way as thousand include five hundred. The two ideals are mutually consistent and both of them demand a kind of self-sacrifice and self-control. Both of them require in addition to self-control and self-sacrifice a kind of higher altruistic feeling by which man is impelled to ignore selfish considerations and to work for persons or for objects which do not in the least savour of any egoistic aim. That feeling is one of love for hnmanity, for the equality of man before God and it is the spirit of that feeling that governs the two ideals—Vedantic and National. —S. I. 15-16

**217**

We must begin with the *village system* the autonomy of which has been destroyed by the growth of departmentalism under the present rule. —S. S. 8

**218**

Hundreds of thousands of noble youths have shed their blood in this *War* in the honest belief that great ideals were at stake, that democracy must, for once and for ever, be made safe against militarism. Great ideas of liberty and freedom have gripped men's mind in the East as in the West Empires have fallen, oppressed nationalities are setting up free states after centuries of serfdom. Will the thinking Indians be persuaded to believe that they are more incapable than the worst of these? —Q. J. July 1919

**219**

I am thoroughly convinced that the pressing problems of the poverty of India, physical degeneration, industrial regeneration, economic development, technical and primary education, and delicate questions of caste and customs, can never be solved by men exclusively wedded to *Western civilization*, but can be successfully surmounted by Indian alone. —L. P.

**220**

I am living by my *will* and if I am to die I shall die only by my will. —R. 1—291

**221**

*Will* is everything. Will power makes it as strong as you can and the material world round you cannot drive you from attaining the object which you will attain.

—W. S. 247

### 222

Your fault lies not in the want of capacity or want of means but your fault lies in the want of the *will.* —W.S.247

### 223

Let us do our duty. I assure you, that you need not fear anybody in this world, be he great or small. There is nothing to fear. We are in the hands of Providence. Work in faith, work with confidence in Providence. Work in the belief that Providence will never desert you. And if you do that, failure will not come to you. You must succeed. You must get Home-Rule for India. For, such is the *Will of Providence.*—( Extract from Mr. Tilak's Presidential Address at the Home Rule League Conference at Bombay on the 26th March 1918.)

### 224

For years to come, our war with the rulers is bound to be waged on the intellectual plane. If we cannot meet the arguments of the clever civilian with his fifteen or twenty year's experience, what becomes of the moral background of our movement ? What, however, is more important than statistics is readiness to suffer and even die for the country. I want young men to develop their *will more than the intellect.* A combination of the two would of course be an ideal thing.

—R. 2-641

### 225

I say the days of *wonders* are gone. You cannot now feed hundreds of people on a few crumbs of bread as Jesus did. —S. W. 227

**226**

The *work* must be done. This body is already very weak and soon it must fall. Whether it falls here or elsewhere hardly makes a difference. The work cannot wait.

—R. 2-570

**227**

In India my work consists in bringing round the majority in the Congress to my view and once this view was settled, my *work in England* consisted in representing that view as it then was the view of the Indian people. —T. P. 15

**228**

Resolution alone would not effect much. *Work* must be undertaken seriously in all parts of the country and in England also. The response to words would be words, to work work. —Rep. 16–17 P. 26

**229**

Good citizenship is the civic goal of the members of a nation generally; and in this respect the older generation is naturally the best guardian of the interests of the younger one. If we therefore want our *younger generation* to attain to the status of full citizenship, we must educate them according to that ideal. —Q. J. April 1918

**230**

Though it was convenient for the Bureaucracy to forget the part which the youth of England played in the public life of England, India must never neglect to train up her *youth* in public spirit. —L. 151



END

# 'टिळक-सूक्ति-संग्रहां'तील विषयांची सूची

(पहिला आंकडा पृष्ठांकाचा व पुढील आंकडे सूक्ति-संख्येचे आहेत.)


श्रीमद्भगवद्गीता १-१ ते ३; ६७-३८२ते४०८; १७६-१०४४
श्रीरामदास १-४ ते ७; २८३-१७२४
श्रीशिवजंयत्युत्सव २-८ ते ९
श्रीशिवाजीमहाराज २-१० ते २५
श्रीशंकराचार्य ५-२६; १४-८१ ते ८३
अडचणी ५-२७ ते २८
अडवणूक ६-२९ ते ३०
अतिपरिचय ६-३१
अद्वैतवाद ६-३२ ते ३५
अधिकार-री वर्ग ७-३६ ते ४८
अध्यात्मशास्त्र ९-४९ ते ५१
अनधिकारी १०-५२
अनियंत्रित सत्ता १०-५३
अनीति १०-५४
अनुकरण १०-५५
अनुभव १०-५६ ते ५८
अनुयायी ११-५९
अन्याय ११-६०
अपयश ११-६१
अर्ज ११-६२
अव्यक्त ११-६३
असंतोष १२-६४ ते ६९
अस्पृश्यता १३-७० ते ७३
अस्वस्थता १३-७४
अहंकार १३-७५
अहिंसा १३-७६
अज्ञान १४-७७
अज्ञेयवादी १४-७८
आचार १४-७९ ते ८०
आत्मकल्याण १५-८४
आत्मसंरक्षण १५-८५
आत्मा १५-८६ व ८७; १६-९२; १७-९५
आत्मबल १५-८८
आत्मवेत्ता १६-८९
आत्मसुधारणा १६-९०
आत्मज्ञान १६-९१
आत्मौपम्यबुद्धि १६-९३ व ९४
आधिभौतिक सुख १७-९६; १८-९९
आधिभौतिक वाद १७-९७;
आधिभौतिक शास्त्र १८-९८, १००, १०१
आभार १८-१०२
आध्यात्मिक विचार १९-१०३

आर्यधर्म १९–१०४ व १०५
आर्षकाव्य १९–१०६ ते १०८
आशा २०–१०९ ते ११३; २३–१२७ व १२८
आशियाखंड २०–११४ ते १२६
आश्रमव्यवस्था २३–१२९
आसक्ति २४–१३० व १३१
आहारविहार २४–१३२
इंग्रज लोक २४–१३३ ते १३५; २६–१४१
,, सरकार २५–१३६ ते १४०
ईश्वर ३३–१८५; ३४–१८७ ते १८९
,, भजन ३४–१९०
,, भक्ति ३४–१९१
,, अवतार ३४–१९२
,, कृपा ३५–१९३
उत्सव ३५–१९४ ते २०३
उदात्त कल्पना ३६–२०४
उदार मनोवृत्ति ३६–२०५
उत्साह ३७–२०६
उद्योग ३७–२०७–२०८
उपकार ३७–२०९

अंतिममर्यादा ४२-२४२
अंतिमसाध्य ४३-२४३ते२४४
करार-रीपणा ४३-२४६-२४७; ४४-२४९
कर्तव्य ४३-२४८-४४-२५१ते-२५८
कर्तेपणा ४५-२५९-२६२
कर्मयोग ४६-२६३ ते २९९
कल्पकपणा ५४-३००
कॉंग्रेस ५४-३०३
कांटा ५४-३०४
काम ५५-३०५-३०६
कायदा ५५-३०७ ते ३२७
कारुण्यवृत्ति ५८-३२८
काळसमुद्र ५८-३२९
कीर्तनकार ५८-३३० ते ३४२
कौशल्य ६१-३४६
कंटकेनैव कंटकम् ६१-३४७
गायनाभिरुचि ६७-३८० ते ३८१
गुरु ७३-४०९ ते ४११; ७४-४१३ व ४१५
गुणोत्कर्ष ७३-४१२; ७४-४१४
गुलामगिरी ७४-४१६-४१७
गोंधळ ७५-४१९
गृहशिक्षण ७५-४२० ते ४२३
गृहव्यवस्था ७५-४२२
गोब्राह्मण ७५-४२४
ग्रंथ ७५-४२५ ते ४३९
(ग्रंथकर्तृत्व, ग्रंथलेखन, ग्रंथसंग्रह, ग्रंथरचना, ग्रंथपरीक्षण.)
ग्रामपद्धति ७८-४४०
ग्रामसंस्था ७८-४४१-४४५
घर्षण ७९-४४६
चरित्र ७९-४४७ ते ४४९
(चरित्रवाचन.)
चळवळ ८०-४५० ते ४६२

( जातवारनिवडणूक, जाति-
निर्बंध.)
जातिभेद ८६–४८८ ते ४९५
जाहीर सभा ८८–५०६
जिज्ञासा ८९–५०७–५०८
जीर्णोद्धार ८९–५०९
जीवनमुक्तावस्था ८९–५१०
जूट ८९–५११
जुनी पिढी ८९–५१२
जुलूम ९०–५१८ ते ५२५
,, प्रतिकार ९०–५१३
जुलमी राजे ९०–५१४–५१६
,, कायदा ९१–५२६
ज्यूरी ९२–५२८ ते ५३०
ज्योतिषशास्त्र ९२–५२७, ५३१–
५३४
ढोंगी ९३–५३५
तडजोड ९३–५३६ ते ५३८
तत्त्वनिष्ठ ९४–५३९
,, वेत्ता ९४–५४०
तत्त्वज्ञ ९४–५४१ ते ५४७
(तत्त्वज्ञान)
तरवार ९५–५४८
तरुण ९५–५४९ ते ५५६
(तरुणपिढी)
तुकाराम ९६–५५७ ते ५५८
तुरुंग ९७–५५९ ते ५६८
(तुरुंगवास)
तेज ९८–५६९ व ५७०
थिऑसफी ९९–५७१
थोर पुरुष ९९–५७२ ते ५७६
,, विभूति १००–५७७ व
५७८
दडपशाही १००–५७९ ते ५८३
दारिद्र्य १००–५८४ व ५८५
दारू १०१–५८६–५८९
दासबोध १०१–५९०
दास्य १०१–५९१–५९४
दुष्काळ १०२–५९५ ते ५९८
दुही १०३–५९९
दु:ख १०३–६०० ते ६०४
दुर्जन १०३–६०५–६०६
दृढनिश्चय १०४–६०८ व ६०९
देश १०५–६१० ते ६३२
(देशकार्य, देशभक्त, देशभाषा,
देशमाता, देशरक्षण, देशोन्नति,
देशाभिमान.)
देशी माल १०८–६३३
देह १०९–६३४
दैवगति १०९–६३५
दंगे १०९–६३६ व ६३७
धनी ११०–६३९
धनुर्धर ११०–६४०
धर्म ११०–६४१ ते ७१५;
१२१–७१८
(धर्मकार्य, धर्मगुरु, धर्मग्रंथ,
धर्मतत्त्वें, धर्मप्रसार, धर्मशिक्षण,
धर्मश्रद्धा, धर्मस्वरूप, धर्मबुद्धि.)

धार्मिक उत्सव १२१–७१८ व ७१९
धीर पुरुष १२१–७२०
धैर्य १२२–७२१ ते ७३०
धंदा १२३–७३१ ते ७४५
ध्येय १२५–७४६ ते ७५२
नवीन पक्ष १२७–७५३
नव्याजुन्याचा मेळ १२७–७५४
नादब्रह्म १२७–७५५
नाना फडणीस १२७–७५६
नासदीयसूक्त १२८–७५८
निर्गुण उपासना १२८–७५९
निर्वाण १२८–७६०
निराशा १२८–७६१ व ७६२
निष्कामबुद्धि १२९–७६३–७६४
निश्चय १२९–७६६–७६७
निःशस्त्र १३०–७६८
,, प्रतिकार १३०–७६९
नीति १३०–७७० ते ७७८
(नीतिधर्म, नीतिशास्त्र.)
नोकर-री १३२–७८० व ७८१
न्याय १३२–७८२ व ७८३
पतितपरावर्तन १३३–७८४
पढतमूर्ख १३३–७८५
परकी अंमल १३३–७८७–७८९; १३५–७९६
परकी भाषा १३४–७९० ते ७९२; १३५–७९७–९८
परकी राज्य १३४–७९३; १३५–७९९,८००
परकीय अधिकारी १३४–७९४; १३६–८०१–८०२
परकीय गुरु १३४–७९५
परकीय सत्ता १३६–८०३
परदेशप्रवास १३६–८०५
परधर्म १३६–८०६–८०७
परब्रह्म १३७–८०८
परमेश्वर १३७–८१० ते ८१८
परिस्थिति १३९–८२० ते ८२४
परीक्षा १४०–८२५
परंपरा १४०–८२६ ते ८२९
परवशता १४१–८३०
पक्ष १४१–८३१–८३४
पाटीलकुलकर्णी १४१–८३५
पाणिनीचें व्याकरण १४१–८३६
पातक १४२–८३७–८३८
पातंजलयोग १४२–८३९
पात्रापात्र विचार १४२–८४०
पापग्रह १४२–८४१
पारतंत्र्य १४२–८४२
पारलौकिक स्वराज्य १४२–८४३
पाश्चात्त्य शिक्षण १४३–८४४
,, संस्कृति १४३–८४५
पुढारी १४३–८४६ ते ८९१
पुनर्विवाह १५१–८९२
पुरातन रीतिभाती १५१–८९३
पुरावा १५१–८९४

पुरुषत्त्व १५१–८९५
पुरुषार्थ १५१–८९६ ते ८९९
पुष्कळांचें पुष्कळ सुख १५२–
९००–९०१
पेशवाई १५३–९०४–९०५
पूर्वाचार्य १५३–९०६–९०८
पोलीस १५४–९०८ ते ९१४
पोलिसखातें
पंचांग १५५–९१५
प्रकृति १५५–९१६ ते ९१८
प्रजा १५५–९१९ ते ९३४
प्रतिकार १५५–९३६–९३७
प्रतिभा १५८–९३८
प्रयत्न १५८–९४० ते ९४७
(प्रयत्नवादी)
प्रवास १५९–९४८–९४९
प्रसंग १६०–९५० ते ९५७
प्रस्थानत्रयी १६१–९५८
प्रायाश्चित्त १६३–९६२
फेरफार १६२–९६४
बहिष्कार १६३–९६६ ते ९८४
(बहिष्कारयोग)
बहुमत १६५–९८५ ते ९८८
बळी १६६–९८९ ते ९९०
बायका १६६–९९१
बुद्धि १६७–९९३ ते १००३
बौद्धधर्म १६९–१००६–१००७
बंड १७०–१००८
ब्रह्म १७०–१००९
,, ज्ञान १७०–१०१०
ब्राह्मण १७०–१०११ ते १०२०
ब्राह्मण ब्राह्मणेतर १७२–१०२१ ते
१०२३
भक्ति १७३–१०२५ ते १०४२
,, मार्ग
भगवद्गीता १७६–१०४३
भगवंताचें अधिष्ठान १७६–१०४५
भगवद्भक्त १७६–१०४६
भागवतधर्म १७७–१०४९ ते
१०५३
भांडण १७८–१०५४
भांडवल १७८–१०५५
भारतभूमि १७८–१०५६
भाषण १७८–१०५७
भाषा १७९–१०५८ ते १०८५
भिक्षांदेही १८३–१०८७
भिक्षेकरी १८३–१०८८ते१०८९
भेदभाव १८३–१०९०ते१०९२
मजूर १८४–१०९४ते१०९८
मत १८५–११०२ते१११५
(मतभेद)
मध्यममार्ग १८७–१११६
मध्यमास्थिति १८७–१११७ ते
१११९
मन १८७–११२० ते ११२५
मनुष्यस्वभाव १८८–११२६ ते
११३१
मरण १८९–११३२–११३३

मनोनिग्रह १९०-११३५
मराठीभाषा १९०-११३६
मराठीराज्य १९०-११३७-११३९
मराठा १९१-११४०-११४९
महापुरुष १९२-११५०ते११५३
महाभारत १९३-११५४ते११६५
महाराष्ट्र १९६-११६६ते११७२
मागणी १९७-११७३-७४
मार्ग १९७-११७६;२००-११८८
मातृभूमि १९८-११८१
मार्थेफिरूपणा १९८-११८२
मानवीस्वभाव १९९-११८४-८५
माया १९९-११८७
मीमांसा २००-११८९
मुत्सद्दी २००-११९०ते१२११
मुहूर्त २०३-१२१२
मुसलमान २०३-१२१३ते१२२१
मूर्तिपूजा २०५-१२२३ते१२२५
मृत्यु २०६-१२२६ते१२२९
मोक्ष २०६-१२३१ते१२३३
यश २०७-१२३४ते१२४१
यज्ञोपवीत २०८-१२४२
युक्ति २०९-१२४४
युनिव्हर्सिटी २०९-१२४५ ते १२४८
योग २१०-१२५२
योगाभ्यास २१०-१२५३
योगक्षेम २१०-१२५५
राजकारण२११-१२५७ते१२६२
राजकीय चळवळ १२१२-१२६३ ते १२७१
राजद्रोह २१३-१२७२ते १२८३
राजधर्म २१५-१२८४
राजनिष्ठा २१५-१२८५ते१२८८; २१६-१२९०
राजनीति २१५-१२८९; १२९१ ते १३०३
राजभक्ति २१८-१३०४
राजसत्ता २१८-१३०५ते१३०८
राजा २१९-१३०९ ते १३२३
राज्य २२१-१३२४ ते १३२६
,, कर्ते २२१-१३२७ते१३२९
,, कारभार २२२-१३३०
,, क्रांति २२२-१३३१
,, घटना २२२-१३३२-१३३३
,, पद्धत २२२-१३३४ ते १३४०
राष्ट्रीयसभा २४१-१४५७ ते १४६२
राष्ट्रैक्य २४२-१४६६ ते ६७
रीतीभाती २४३-१४६८
रूढी २४३-१४६९ ते १४७२
लढाई २४३-१४७३ ते १४७८; २४५-१४८४
लोकमत २४५-१४८६ते १४९२

लोकसत्ता २४७–१४९५–९६
लोकसंग्रह २४७–१४९७ व ९८
लोकाग्रणित्व २४८–१४९९–१५००
वकिली धंदा २४८–१५०१
वक्ता २४९–१५०२–३
वर्णव्यवस्था २४९–१५०४ ते १५०७; २५०–१५०९
वर्तमानपत्र कर्ता २४९–१५०८, १५१० ते १५१६
,, व्यवस्था २२४–१३४१ ते १३४४
राष्ट्र २२५–१३४९ ते १४११
,, भक्त
राष्ट्रीय उत्सव २३४–१४१२; २३५–१४१६
,, अभिमान २३४–१४१३
,, आपत्ति २३४–१४१४
उन्नति २३५–१४१५;१४१७
,, काम २३५–१४१८
,, ग्रंथ २३५–१४१९
राष्ट्रीयत्व २३५–१४२०ते१४५३ (राष्ट्रीय शाळा, राष्ट्रीय शिक्षण.)
राष्ट्रीय सभा २४०–१४५६
वाङ्मय २५१–१५१७
विघ्न २५१–१५१९ ते १५२२
विचार २५१–१५२३–२४
विचार स्वातंत्र्य २५२–१५२५ ते १५२७
विचार-क्रांति २५२–१५२८
विटाळ २५२–१५२९–३०
विणकाम २५३–१५३२–३३
विद्या २५३–१५३४
,, गुरु २५३–१५३५
,, दान २५३–१५३६
विद्यापीठ २५४–१५३९ ते १५४१
विद्यार्थी २५३–१५३८; २५४–१५४२ ते १५४६
विद्वत्ता २५५–१५४७ ते १५५२
विद्वान् २५६–१५५३ ते १५५८
विभूतिपूजा२५७–१५५९ते१५६५
विरोध २५७–१५६३
विश्वकुटुंबित्व २५७–१५६४
विष्णुसहस्रनाम २५८–१५६७–६८
विज्ञान २५८–१५६९
वेद २५९–१५७१ ते १५७३
वेदान्त २५९–१५७४–१५९२
वैदिकधर्म २६३–१५९४ व ९५
वैय्याकरण २६३–१५९६ते१५९८
व्यवहार २६४–१६०० ते १६०५
व्यवसायात्मिक बुद्धि २६४–१६०६–०७
व्यसन २६६–१६०८ ते १६११
व्यापार २६६–१६१६ ते १६२१
शिक्षण २७०–१६३६ ते १६७२
शेतकरी २७६–१६७७ ते १६८४

श्रद्धा २७७–१६८९ ते १६९५
सत्पुरुष २८०–१७०५–०६
सत्य २८१–१७०७; १७११, १७१३, १७१४
,, धर्म २८१–१७०९
सत्यनिष्ठा २८१–१७१०
सनदशीर चळवळ २८३–१७२०–२१
समता २८३–१७२२,२३,२५
समाज २८३–१७२६ ते १७४५ (समाजरचना, समाजव्यवस्था, समाजसुधारणा, समाजशास्त्र.)
समाधि २८७–१७४६
सरकार २८८–१७५२ ते १७७२
,, री नोकरी
सरस्वती २८८–१७७३–७४
सहकारिता २९२–१७७६–७७
सांख्य २९२–१७७८–१७८२
साध्य-साधन २९४–१७८३–८५; २९५–१७९० ते ९१
साधुपुरुष २९४–१७८६ ते ८९
सामाजिक सुधारणा २९५–१७९२–१८०९
साम्यबुद्धि २९८–१८११–१२
साम्राज्य २९९–१८१३ ते १८२३
सार्वजनिक काम ३०१–१८२४–१८३१
सावधगिरी ३०२–१८३२
सुख-दुःख ३०२–१८३४ ते १८३८
सुधारक ३०३–१८३९–४०
सुधारणा ३०३–१८४१ ते १८६४
सुशिक्षित ३०७–१८६५ ते १८७६
संकट ३१०–१८७९ ते १८९१
संग्राम ३१२–१८९३–९४
संतमंडळी ३१२–१८९५
संध्या ३१२–१८९६–९७
संन्यास ३१३–१८९८ ते १९०५
संपत्ति ३१४–१९०७ ते १९१४
संप्रदाय ३१६–१९१६ व १७
संस्कार ३१७–१९१९ ते १९२३
संस्थानिक ३१८–१९२५ व २६
स्त्रीशिक्षण ३१९–१९३१, १९३३
स्त्रीस्वातंत्र्य ३१९–१९३२
स्थानिक-स्वराज्य ३१९–१९३५
स्थितप्रज्ञ ३१९–१९३५ ते १९४१
स्नेह ३२०–१९४३
स्पर्शास्पर्श ३२१–१९४४
स्वतंत्रता स्वातंत्र्य ३२१–१९४७–४८; ३३२–२०२५ते२०४५
स्वत्व ३२१–१९४९ ते ५१
स्वदेश ३२२–१९५२ ते १९५५
स्वदेशी ३२२–१९५६ ते १९७९
स्वधर्म ३२६–१९८०–८१
स्वभाषा ३२६–१९८३ ते १९९०

स्वयंसेवक ३२७–१९९१
स्वराज्य ३२५–१९७३–७४;
३२८–१९९२ ते २०२४
स्वामिभक्ति ३३५–२०४६
स्वार्थत्याग ३३६–२०४७ ते
२०६२
स्वावलंबन ३३८–२०६३ ते
२०६९
हक्क ३३८–२०७०–७१
हिंदु ३४०–२०७४ ते २११६
(हिंदुत्व, हिंदुधर्म, हिंदुधर्मशिक्षण)
हिंदु-मुसलमान ३४७–२११७ ते
२१२६
(दंगे, ऐक्य, तंटे)
हिंदुसमाज ३४९–२१२८–२९
हिंदुस्थानदेश ३५०–२१३० ते
२१४९
क्षत्रिय ३५३–२१५२
क्षमा ३५३–२१५३–५४
क्षराक्षरविचार ३५४–२१५५
क्षात्रधर्म ३५४–२१५६
ज्ञातिभेद ३५४–२१५८ते२१६०
ज्ञान ३५५–२१६१ ते २१७२
ज्ञानी ३५७–२१७३ ते २१८९
ज्ञेयमीमांसा ३६०–२१९०

# INDEX


**A**

Administration 1-1
Advisory Councils 1-2
Almighty 1-3,4
Ancient Wisdom 1-5
Attempt 2-6,7

**B**

Brahmins 2-8
British Administration 2-9
Bureaucracy 2-10
Bureaucratic Govt., 2-11

**C**

Character 3-12
Common language 3-13
Congress 3-14
Concentration 3-15
Constitutional 3-16
Councils 3-17

**D**

Dadabhai Nawroji 4-19
Demand 4-20, 21
Detective 4-22
Differences 4-23
Difficulties 5-24 to 30
Diplomacy 6-31
Discontent 6-32
Discovery of truth 6-33
Despotism 6-34
Dualism 6-35
Duty 6-36, 37

**E**

Education 7-38 to 45
Empire 7-46 to 48
England 9-49
English education 9-50

**F**

Fanaticism 9-52
Festival 10-54 to 59
Force 10-60
Foreigners 10-61
Foreign nation 11-62
Franchise 11-63
Freedom 11-64

**G**

Gita 11-65, 66
God 11-67, 68
Governor 12-70, 71
Government 12-72 to 81
Great men 14-82
Grievances 14-83
Grihya Samskaras 14-84

**H**

Hero 15-85, 86
Higher powers 15-87
Hindu 15-88
Hindu religion 15-89 to 92
Hindu University 16-98
Home Rule 16-95, 96
Honours 16-97
Hope 17-98, 99

**I**

India 17-102 to 104

**K**

Karma-yoga 18-105 to 107
King 19-108, 109
Knowledge 19-110

**L**

League of Nations 19-112
Law of Karma 19-113
Legislative Assembly 19-114
Logic 20-115

**M**

Majority 20-116
Masses 20-117
Moderates 20-118, 119
Motto 21-122

**N**

Nation 21-123
National Education 21-124 125
Nationalist 22-127, 128
Nationality 32-193
National work 22-129
New party 22-130

**O**

Officers and people 23-133
Opponent 23-135
Orion 23-136

**P**

Parliament 24-137
Patriotism 24-138, 139
Pax Britanica 24-140
Petition 24-141, 142
Physical Strength 25-143
Politics 25-144 to 148
Power 26-149
Prayaschitta 26-150
Priests 26-152, 53
Progress 26-154, 155
Protests 27-156, 157

**R**

Reform 27-159 to 165
Religion 28-166 to 168
Resolutions 29-170
Responsible Govt. 29-171
Rulers 29-172, 73

S

Sacraments 29-174
Scientific Research 30-177
Scriptures 30-178
Sedition 30-179
Self-confidence 31-180
Self-Govt. 31-181
Shivaji 31-182 to 185, 187
Self-sacrifice 31-186
Social reform 32-188 to 190
Society 32-191
Statesmanship 32-194
Struggle 33-197
Students 33-198
Style 33-199
Swadeshi 34-202
Swaraj 34-203 to 206

U

Unity 35-211, 212
Untouchability 35-213

V

Vedas 36-214 to 216
Village-system 37-217

W

Western civiliziation 37-219
Will 37-220 to 224
Work 39-226 to 228

Y

Younger generation 39-229
Youth 39-230